श्री.

शांकरब्रह्मसूत्रभाष्याचें मराठी भाषांतर.

भाग ४.

श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड सेनाखासखेल
समशेर बहादूर यांचे हुकुमावरून

पंडित वासुदेव शास्त्री अभ्यंकर,
व
प्रोफेसर दिनकर त्र्यंबक चांदोरकर.
पुणें फर्ग्युसन कॉलेजांतील शिक्षक
यांनीं तयार केलें.
तें

बडोदें येथें प्रिन्टिंगवर्क्स छापखान्यांत छापिलें.

शके १८३२.

सन १९११.

POONA UNIVERSITY LIBRARY

सर्व हक्क सरकारनें स्वाधीन ठेविले आहेत.'

किंमत रु. १-६-०

श्री.

जाहिरात.

ब्रह्मसूत्रावरील शांकरभाष्याचें मराठी भाषेमध्यें भाषांतर करवावें व तें काम पुणें येथील फरग्युसन कॉलेजचे प्रोफेसर दिनकर त्र्यंबक चांदोरकर व वे. शा. सं. रा. वासुदेवशास्त्री अभ्यंकर या दोन विद्वानांस सोंपण्याविषयीं श्रीमंत सरकार महाराज साहेब यांनीं कृपावंत होऊन हुजूर हुकूम नंबर ९ ता. २४ ऑगस्ट सन १८९८ नें आज्ञा केली होती. सदरहू आज्ञेप्रमाणें ब्रह्मसूत्रावरील शांकरभाष्याचें मराठी भाषेमध्यें तैयार झालेलें भाषांतर प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

२. भाषांतर केलेल्या ग्रंथाची प्रस्तावना वे. शा. सं. रा. वासुदेवशास्त्री अभ्यंकर यांनीं उत्तम लिहिली आहे याजकरितां त्याविषयीं येथें विशेष लिहिण्याची अवश्यकता नाहीं.

३. भाषांतर विस्तीर्ण झालें असल्यानें तें चार भागांत छापविण्यांत आलें असून दरेक भागांत खालीं दर्शविल्याप्रमाणें विषय आले आहेत.

भाग १—भाषांतर कर्त्यांची प्रस्तावना.
प्रथम भागांत जे भाषांतर आहे त्याची अनुक्रमणिका.
ब्रह्मसूत्र शांकरभाष्य अध्याय १.

भाग २—द्वितीय भागांत जे भाषांतर आहे त्याची अनुक्रमणिका.
ब्रह्मसूत्र शांकरभाष्य अध्याय २

भाग ३—तृतीय भागांत जे भाषांतर आहे त्याची अनुक्रमणिका.
ब्रह्मसूत्र शांकरभाष्य अध्याय ३-४

भाग ४—(अ) शंकराचार्य, रामानुजाचार्य, वल्लभाचार्य आणि पूर्णप्रज्ञाचार्य यांच्या मताप्रमाणें ब्रह्मसूत्रांचा अर्थ.
(ब) भाषांतरामध्यें आलेल्या श्रुति वगैरेचें सूचीपत्र.
(क) अधिकरणांची वर्णानुक्रमाप्रमाणें सूची.
(ड) शब्दांच्या संक्षिप्त खुणा.

(ई) शंकराचार्य, रामानुजाचार्य, वल्लभाचार्य व मध्वाचार्य यांच्या मताप्रमाणें ज्या शब्दांच्या अर्थाविषयीं मतभेद आहे त्या शब्दांची सूची.

(फ) भाषांतरांत आलेले विषयांचा वर्णानुक्रम.

(ग) ज्या सूत्रांच्या पदच्छेदाविषयीं मतभेद आहे त्या सूत्रांची सूची.

४. वर दर्शविल्याप्रमाणें चार भागांत भाषांतर प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. यावरून जनसमुहास--आणि त्यांत विशेषेंकरून ज्यांस संस्कृत भाषा अवगत नाहीं अशा लोकांस--अशा अमूल्य व तत्वज्ञानविषयक ग्रंथाचें भाषांतराचा चांगलाच उपयोग होईल अशी आम्ही आशा बाळगिता.

मु. बडोदें. ता. १ माहे जून सन १९११.

G, M. S,

A. M. MASANI.
विद्याधिकारी,
बडोदें राज्य,
बडोदें.

शांकरब्रह्मसूत्रभाष्याच्या मराठी भाषांतराचें

परिशिष्ट.

१ अथातो ब्रह्मजिज्ञासा ।

शंकराचार्यमत.	रामानुजमत.
१ आतां या (कारणा-) स्तव ब्रह्मजिज्ञासा. (१)	१ आतां या (कारणा-) स्तव ब्रह्मजिज्ञासा. (१)

१ येथून मीमांसाशास्त्राच्या उत्तरभागाला आरंभ झाला आहे. तेव्हां 'आतां' या शब्दाचा 'मीमांसाशास्त्राच्या पूर्वभागावरून (म्हणजे पूर्वमीमांसाशास्त्रावरून) कर्मांचें ज्ञान झाल्यानंतर' असा अर्थ समजावा. आतां 'वेदान्तवाक्यांवरून उत्पन्न होणाऱ्या अशा आत्मज्ञानाच्या पूर्वी कर्मांचें ज्ञान झालेंच पाहिजे' असा नियम मानण्याचें कारण हें कीं वेदान्तवाक्यापासून उत्पन्न होणारें ज्ञान हें केवळ वाक्यार्थज्ञान नव्हे. कारण त्याकरतां विधिवाक्याची जरूर नाहीं. आणि त्या केवळ वाक्यार्थज्ञानापासून अविद्येची निवृत्ति होणें शक्य नाहीं. तर ज्याला कर्म अंगभूत आहे असें म्हणजे ज्याला ध्यान उपासना म्हणतात असें ज्ञान होय. तेंच वेदान्तवाक्यापासून आपल्याला प्राप्त करून घ्यावयाचें आहे. तेव्हां अर्थातच त्याला कर्मांची जरूर असल्यामुळें 'पूर्वी कर्मांचें ज्ञान झालेंच पाहिजे' असा नियम मानिला आहे. '१ नित्य वस्तु म्हणजे काय व अनित्य वस्तु म्हणजे काय यांतील भेद, २ ऐहिक आणि पारलौकिक फलभोगाविषयीं तिरस्कार, ३ शमदमादि साधनांची प्राप्ति आणि ४ मोक्षाची इच्छा या चार गोष्टी प्राप्त झाल्यानंतर' असा अर्थ 'आतां' या शब्दाचा घेतला तरी कर्मांच्या ज्ञानाची जरूर आहेच. कारण भोग मोक्ष वगैरे फलें, यज्ञ उपासना वगैरे साधनें, आणि अमुक तऱ्हेनें कर्म करावें ही इतिकर्तव्यता इत्यादि गोष्टींचा निश्चय झाल्यानंतरच नित्य कोण व अनित्य कोण हा विचार मनुष्याला करतां येतो. या कारणास्तव म्हणजे कर्मापासून स्वर्ग वगैरे अस्थिर फलें प्राप्त होतात, पण स्थिर असा जो मोक्ष तो प्राप्त होत नाहीं, तेव्हां तो प्राप्त व्हावा या कारणास्तव. ब्रह्म हें कल्याणकारक अशा अनेक गुणांनीं युक्त आहे आणि तें स्वभावतःच दोषरहित आहे, म्हणजे त्याचा स्वभावतःच अविद्या वगैरे दोषांशीं संबंध होत नाहीं. या ब्रह्मालाच पुरुषोत्तम असें म्हणतात. ब्रह्म हें निर्गुण नाहीं. जर तें निर्गुण असतें तर तें प्रमाणसिद्ध झालें नसतें. कारण निर्गुण (म्हणजे जें अमुकप्रकारचें आहे असें कांहींच सांगतां येत नाहीं) अशा वस्तूविषयीं कोणत्याही प्रमाणाची गति झालेली दृष्टोत्पत्तीत येत नाहीं व संभवतही नाहीं. तसेंच त्याचें जीवाशीं ऐक्यही नाहीं. कारण जीव हे अविद्या वगैरे दोषांनीं युक्त आहेत. मुक्त झालेल्या जीवांचा मुक्त होण्यापूर्वी दोषांशीं संबंध असल्यामुळें त्यांना देखील 'स्वभावतःच दोषरहित' असें म्हणतां येत नाहीं. या अधिकरणामध्यें पूर्वपक्ष्याचें म्हणणें असें आहे कीं येथें ब्रह्मविचार करण्याचें कांहीं कारण नाहीं. कारण ब्रह्म ही सिद्ध वस्तु असल्यामुळें त्या वस्तूविषयीं वेदान्तवाक्यें प्रमाण होऊं शकत नाहींत. ज्या वाक्यामध्यें कांहीं कर्तव्य गोष्टीचें प्रतिपादन केलेलें असतें तींच वाक्यें प्रमाण होत. उदाहरणार्थः—'स्वर्गाची इच्छा करणा-

वल्लभमत.	पूर्णप्रज्ञमत.
१ यास्तव ब्रह्मजिज्ञासा चालू केली आहे. (१)	१ आतां यास्तव ब्रह्मजिज्ञासा. (१)

त्यानें ज्योतिष्टोम यज्ञ करावा ' इत्यादि. शिवाय कांहीं कर्मांपासूनही स्थिर फल प्राप्त होतें. उदाहरणार्थः—' चातुर्मास्य यज्ञ करणाऱ्याचें पुण्य अक्षय्य (म्हणजे स्थिर) आहे ' असें श्रुतीमध्येंच सांगितलें आहे. तेव्हां स्थिर फलाकरितां ब्रह्मविचार करण्याची कांहीं जरूर नाहीं. सिद्धांत्याचें म्हणणें असें कीं वेदान्तवाक्यें हीं प्रमाणच आहेत. कारण ' सिद्ध वस्तूचें प्रतिपादन करणारीं वाक्यें हीं प्रमाण आहेत ' असें प्रामाणिक लोक म्हणतात. तसेंच कोणत्याच कर्मांपासून स्थिर फल प्राप्त होत नाहीं. ' चातुर्मास्यरूपी कर्माचें फळ हें इतर कर्मांच्या फळासारखें लवकर नाश पावत नाहीं ' एवढ्याच अभिप्रायानें श्रुतीमध्यें त्याच्या फलाला ' अक्षय्य ' असें म्हटलें आहे. एकंदरींत ' ब्रह्मविचार केला पाहिजे असें सिद्ध झालें.

२ या अधिकरणामध्यें पूर्वपक्ष्याचें म्हणणें असें आहे कीं येथें ब्रह्मविचार करण्याचें कांहीं कारण नाहीं. कारण वेदाचें अध्ययन केलें असतां त्याच्या अर्थाचें ज्ञान मनुष्याला साहजिकच होणार आहे सिद्धांत्याचें म्हणणें कीं तीक्ष्णबुद्धीच्या मनुष्याला जरी वेदाचें अध्ययन करतांनाच त्याच्या अर्थाचें ज्ञान होण्याचा संभव आहे, तरी मध्यमबुद्धीच्या आणि मंदबुद्धीच्या मनुष्यांना होणार नाहीं त्यांना अनेक तऱ्हेचे संशय येतील. तेव्हां अर्थाचा निश्चय होण्याकरितां येथें ब्रह्मविचार केलाच पाहिजे. यास्तव म्ह. ' कर्म वगैरेंपेक्षां ब्रह्मज्ञान हेंच मोक्षप्राप्तीचें साधन आहे यास्तव. अथ हा शब्द मंगलाकरितां घातला आहे. त्याचा येथें अधिकार हा अर्थ आहे. अधिकार म्हणजे एखादी गोष्ट चालू करणें. ' आनंतर्य ' हा ' अथ ' शब्दाचा अर्थ घेणें बरोबर नाहीं. कारण ' धर्मविचार केल्यानंतर ' असें जर म्हणावें तर धर्मविचार करण्यापूर्वी ब्रह्मविचार करितां येणार नाहीं. बरें ' वैराग्य वगैरे प्राप्त झाल्यावर ' असें म्हणावें तर तसेंही म्हणतां येत नाहीं. कारण तें ब्रह्मविचारानंतरच प्राप्त होणार आहे. शंका:—जर येथें ब्रह्मजिज्ञासा चालू केली आहे तर सूत्रकारांनीं इतर गोष्टी कां सांगितल्या ? उदा०-श्रुतिस्मृति वगैरेंशीं आलेला विरोध दूर करणें इत्यादि उत्तरः-ब्रह्मजिज्ञासा म्हणजे ब्रह्माची जिज्ञासा नव्हे, तर ब्रह्मासंबंधीं जिज्ञासा. तेव्हां त्यासंबंधानें कांहीं इतर गोष्टी जरी सांगितल्या तरी त्या विरुद्ध होत नाहींत.

३ ' आतां ' म्हणजे ब्रह्मजिज्ञासेचा अधिकार प्राप्त झाल्यानंतर. ' आतां ' (अथ) हा शब्द मंगलाकरितां घातला आहे. येथें आनंतर्य हा त्याचा अर्थ आहे.

२ जन्माद्यस्य यतः । ३ शास्त्रयोनित्वात् ।

२ ह्या (जगा-) चें जन्मादि ज्यापासून (होतें तें ब्रह्म होय). (२)	२ ह्या (जगा-) चें जन्मादि ज्यापासून (होतें तें ब्रह्म होय). (२)
३ (ब्रह्म हें सर्वज्ञ आहे.) कारण तें शास्त्रमूळ आहे. (३)	३ (वेदांतवाक्यें ब्रह्माचें प्रतिपादन करतात.) कारण (त्या ब्रह्माविषयीं केवल) शास्त्र हें- (च) प्रमाण आहे. (३)

या अधिकरणामध्यें पूर्वपक्ष्याचें म्हणणें असें आहे कीं ब्रह्मजिज्ञासा करूं नये. कारण जीवापेक्षां ब्रह्म निराळें नाहीं. आणि जीवाचें तर 'मी' असें ज्ञान सर्वांनाच स्पष्ट होत आहे. शिवाय या ब्रह्मजिज्ञासेचा कांहीं उपयोग आहे असें वाटत नाहीं. व यामुळें तिला कोणी अधिकारीही मिळण्याचा संभव नाहीं. सिद्धांत्याचें म्हणणें कीं ब्रह्म म्हणजे विष्णु. तो इतर सर्व जीवांपेक्षां निराळा आहे. त्याचा प्रसाद झाल्याशिवाय त्याचें ज्ञान होणें शक्य नाहीं. तेव्हां ब्रह्मजिज्ञासा केली पाहिजे. तसेंच 'मोक्ष प्राप्त होणें' हा त्या ब्रह्मजिज्ञासेचा उपयोगही आहे. 'विष्णुलोक प्राप्त होऊन तेथें पूर्ण सुख प्राप्त होणें' हा मोक्ष होय. याचेंच सारूप्य, सालोक्य, सामीप्य आणि सायुज्य असे चार भेद आहेत. तसेंच विष्णूविषयीं अत्यन्त भक्तिमान असे देव, ऋषि, गंधर्व आणि मनुष्य हे त्या ब्रह्मजिज्ञासेचे अधिकारीही आहेत.

४ पूर्वपक्षः—ह्या सूत्रामध्यें जें ब्रह्माचें लक्षण म्ह. चिन्ह सांगितलें आहे तें बरोबर नाहीं. कारण 'ब्रह्म म्हणजे एक अमुकप्रकारचा पदार्थ असतो' असें कांहींच पूर्वीं समजलेलें नाहीं. 'देवदत्ताचें घर वडाच्या झाडासमोर आहे' असें देवदत्ताच्या घराचें लक्षण (म्ह. चिन्ह) सांगितलें असतां 'घर अमुकप्रकारचें असतें' अशी कल्पना ज्याच्या मनामध्यें पूर्वीं आलेली असते त्यालाच त्या लक्षणापासून उपयोग होतो. सिद्धांतः—ब्रह्म हा शब्द बृह् धातूपासून सिद्ध झाला आहे, व त्याचा 'वाढणें' असा अर्थ आहे. तेव्हां ब्रह्मशब्दाची व्युत्पत्ति पाहिली असतां तीवरून व श्रुतीमध्यें ब्रह्म प्रसिद्ध असल्यावरून ब्रह्म म्हणून एक कांहींतरी मोठा पदार्थ आहे अशी साधारण कल्पना मनुष्याच्या मनामध्यें येत असल्यामुळें सूत्रामध्यें केलेलें लक्षण संभवतें.

५ पूर्वपक्षः—'जगाची उत्पत्ति वगैरे ज्यापासून होतात तें ब्रह्म' हें ब्रह्माचें लक्षण संभवत नाहीं. कारण ब्रह्माला कर्तृत्व नसल्यामुळें त्यापासून जगाची उत्पत्ति वगैरे कांहींच होत नाहीं. आतां श्रुतीमध्यें जरी तसें वर्णन केलें आहे तरी तें खरें नव्हे, म्ह.

२ ह्या (जगा-) चें जन्मादि ज्यापासून (होतें तें ब्रह्म होय). कारण (तें जगाचें) कारण आहे असें शास्त्रामध्यें (सांगितलें) आहे. (२)	२ ह्या (जगा-) चें जन्मादि ज्यापासून (होतें तें ब्रह्म होय). (२)
	३ (ब्रह्मच जगाचें कारण आहे.) कारण त्याविषयीं शास्त्र प्रमाण आहे. (३)

गौणरीतीनें केलें आहे असें समजावें. सि:—श्रुतीमध्यें केलेलें वर्णन कधींही खोटें होणार नाहीं. तेव्हां ब्रह्माचे ठिकाणीं जगाचें कर्तृत्व खरेंच आहे असें मानलें पाहिजे आणि हें बरोबरच आहे. कारण ब्रह्माचे अंगीं विलक्षण शक्ति आहे त्यामुळें त्याचें ठिकाणीं सत्यत्व वगैरे इतर धर्मांप्रमाणें कर्तृत्वरूपी धर्मही राहूं शकतो. ह्या सूत्रामध्यें ‘ जन्म, आद्यस्य, यत: ’ असा पदच्छेद करून ‘ आद्य म्ह. प्रथम उत्पन्न झालेल्या अशा आकाशरूप वस्तूचें जन्म ज्यापासून होतें ते ब्रह्म होय ’ असाही ह्या सूत्राचा अर्थ वल्लभाचार्यांनीं केला आहे. येथें ‘ तें ब्रह्म होय ’ हे शब्द अध्याहृत आहेत असें मात्र समजूं नये. तर सूत्रकारांनीं ब्रह्मजिज्ञासा चालू केली असल्यामुळें ‘ तें ब्रह्म होय ’ हा अर्थ साहजिकच होत आहे. पूर्वसूत्रामध्यें ‘ अथ ’ ह्या शब्दाचा अधिकार (म्ह॰ चालू करणें) हाच अर्थ घेतला आहे. ‘ जगाच्या उत्पत्ति वगैरेचें ब्रह्म हें कारण आहे ’ ही गोष्ट श्रुतीवरून सिद्ध होत आहे. आणि तीच येथें सूत्रकारांनीं ब्रह्माचें लक्षण म्हणून सांगितली आहे. या गोष्टीविषयीं अनुमान प्रमाण संभवत नाहीं कारण प्रमाण हें अज्ञात वस्तूचें ज्ञान करून देणारें असतें, आणि येथें तर वरील गोष्टीचें श्रुतीवरून ज्ञान होत आहे. आतां श्रुतीमध्यें मनन वगैरे जें सांगितलें आहे तें केवळ श्रवणाचें अंग म्हणूनच सांगितलें आहे. तेव्हां ‘ ब्रह्माविषयीं अनुमान प्रमाण घ्यावें ’ हें त्यावरून सिद्ध होत नाहीं. वल्लभाचार्यांच्या मतीं दुसरें आणि तिसरें हीं दोन सूत्रें मिळून एकच सूत्र आहे असें पुढील भाष्यावरून सिद्ध होतें:—‘ जन्मादिसूत्रद्वयेन वेदप्रकाणकजगत्कर्तृ समवायि चेत्युक्तम् ’ (अणु भा. पृ, २१ पं. ४). याचा अर्थ:— ‘ ब्रह्म हें जगाचें कारण आहे याविषयीं वेद प्रमाण आहे. आणि जगाचें समवायिकारणही तेंच आहे ’ असें ‘ ह्या जगाचें ’ इत्यादि दोन सूत्रामध्यें सांगितलें. आतां वास्तविक पाहिलें असतां हें एकंदर तीन सूत्रामध्यें सांगितलें आहे. तसेंच त्याच्या पुढें ‘ ह्या (आरंभापासून आतांपर्यंत) एकंदर तीन सूत्रामध्यें ब्रह्मविचार करावा हें सिद्ध झालें ’ असें सांगितलें आहे.

६ जन्म म्हणजे जगाची उत्पत्ति. आदिशब्दानें स्थिति, संहार, नियमन, बंध, आणि मोक्ष हे घ्यावेत. कारण ‘हे सर्व नारायणापासून प्राप्त होतात’ असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

● ब्रह्मशब्दाचा विष्णु असा अर्थ आहे. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद, भारत, पंचरात्र, मूलरामायण आणि यांना अनुसरून असलेले इतर ग्रंथ यांना शास्त्र म्हणतात.

४ तत्तु समन्वयात् । ५ ईक्षतेर्नाशब्दम् ।

४ परंतु तें (ब्रह्म शास्त्रगम्य आहे). कारण (त्याविषयीं वेदांतवाक्याचें) तात्पर्य आहे. (४)	४ परंतु तें (ब्रह्म शास्त्रगम्य आहे). कारण (परमपुरुषार्थरूप अशा त्या ब्रह्माचा शास्त्राशीं वाच्य या रूपानें) संबंध आहे. (४)
५ ईक्षण (सांगितलें) असल्यामुळें ज्याला वेद प्रमाण नाहीं असें (प्रधान जगाचें कारण) नाहीं.	५ ज्याला शब्द-(च मुळीं) प्रमाण नाहीं असें (प्रधान जगाचें कारण) नाहीं कारण ईक्षण (सांगितलें) आहे.

८ एखाद्या वाक्यामध्यें एखादी गोष्ट सांगून जर पुढें कांहीं तिच्या उलट सांगावयाचें असेल तर त्या पुढील वाक्याच्या आरंभीं ' परंतु ' शब्द घालण्याची वहिवाट आहे. परंतु सूत्रामध्यें हा नियम नाहीं. म्हणजे एखाद्या सूत्रामध्यें ' परंतु ' हा शब्द आला असतां तेथें पूर्वसूत्रांत सांगितलेल्या गोष्टीपेक्षां कांहीं उलट गोष्ट सूत्रकारांच्या मनांत सांगावयाची आहे असें नियमानें समजूं नये. कारण सूत्रकार हे एखादी गोष्ट प्रत्यक्ष बोलून न दाखवितां नुसती मनामध्यें आणतात. आणि तिच्या उलट गोष्ट बोलून दाखवितांना ' परंतु ' शब्द घालतात. येथें ' ब्रह्माशिवाय दुसरें कोणी तरी जगाचें समवायि कारण असेल ' असें मनांत आणून ' तें बरोबर नाहीं ' हें दाखवावें या उद्देशानें ' परंतु ' शब्द घातला आहे. याप्रमाणेंच इतर ठिकाणींही समजावें.

९ ' वाक्याचें तात्पर्य अमुकच आहे ' असा निश्चय करणारीं जी उपक्रम, उपसंहार वगैरे चिन्हें त्यांना समन्वय म्हणतात.

१० ' जगाचें कारण नाहीं ' म्हणजे जगाचें कारण या रूपानें वेदांतग्रंथामध्यें सांगितलें नाहीं.

३ परंतु तें (ब्रह्मच जगाचें समवायिकारणही आहे). कारण (त्या ब्रह्माचाच सत् चित् आणि आनंद या रूपांनीं जगांतील सर्व वस्तूंमध्यें) चांगला संबंध झालेला आहे. (३)	४ त्या (ब्रह्मा-) विषयींच शास्त्र प्रमाण आहे) कारण समन्वय आहे. (४)
४ ([11]आत्म्यानें) ईक्षण केलें असल्यामुळें तो) शब्दगम्य नाहीं असें नाहीं.	५ (ब्रह्म) अवाच्य[12] नाहीं. कारण (श्रुतीमध्यें त्याचें) ईक्षण (सांगितलें) आहे.[13]

११ शंका:—आत्मा स्वप्रकाश असल्यामुळें तेथें कोणत्याच प्रमाणाची गति चालत नाहीं. तेव्हां तो शब्दगम्य नाहीं म्हणजे वेदांतवाक्यामध्यें त्याचें प्रतिपादन करतां येत नाहीं. उत्तर:—आत्म्याचें प्रतिपादन करण्याचें सामर्थ्य शब्दामध्यें जरी स्वतंत्र रीतीनें नाहीं तरी 'वैदिक शब्दांनीं आपलें प्रतिपादन करावें' अशी परमात्म्याचीच इच्छा असल्यामुळें तेथें शब्दप्रमाणाची गति चालते. कारण 'त्यानें ईक्षण केलें नंतर सृष्टि उत्पन्न केली' असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे. या ईक्षण करण्याचा उद्देश इतकाच कीं 'मी ही सृष्टि उत्पन्न करून तिच्या द्वारानें लोकव्यवहार्य व्हावें'. तात्पर्य परमात्म्या-विषयीं शब्दप्रमाणाची गति प्रमाणाच्या जोरावर होत नाहीं, तर परमात्म्याच्या इच्छेनेंच ही होते असें समजावें.

१२ 'ज्याचें शब्दानें प्रतिपादन करतां येत नाहीं त्याला 'अवाच्य' म्हणतात.

१३ 'प्राणोपासक परमात्म्याला पाहतो' इत्यादि श्रुतीमध्यें ईक्षण सांगितलें आहे. आतां ब्रह्म हें दृष्टिगोचर नसल्यामुळें त्याचें नेत्रांनीं ईक्षण संभवत नाहीं. तेव्हां येथें वाणीच्या साहाय्यानें केलेलें ईक्षण घेतलें पाहिजे. एकंदरींत ब्रह्म अवाच्य नाहीं असें सिद्ध झालें.

६ गौणश्चेन्नात्मशब्दात् । ७ तन्निष्ठस्य मोक्षोपदेशात् ।

६ (ईक्षणक्रिया) गौण आहे. असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण आत्मशब्द (लावलेला) आहे.

७ त्याचे ठिकाणीं ज्याची निष्ठा आहे त्याला मोक्ष प्राप्त होतो असें सांगितल्यामुळें (आत्मशब्द प्रधानाला लावतां येत नाहीं).

८ आणि (तें) हेय आहे असें वचन नसल्यामुळेंही (सत्शब्दानें प्रधान सांगितलें नाहीं).

६ (ईक्षणक्रिया) गौण आहे असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण आत्मशब्द[14] (लावलेला) आहे.

७ त्याचे ठिकाणीं ज्याची निष्ठा आहे त्याला मोक्ष प्राप्त होतो असें सांगितल्यामुळें (प्रधान जगाचें कारण नाहीं).

८ आणि (तें) हेय आहे असें वचन नसल्यामुळेंही (सत्शब्दानें प्रधान सांगितलें नाहीं).

१४ ‘ (चेतन आणि अचेतन असें) हें सर्व (जग) एतदात्मक आहे ’, ‘ तें सत्य आहे तो आत्मा आहे ’ ह्या दोन वाक्यामध्यें जगाच्या कारणाला ‘ आत्मा ’ हा शब्द लावलेला आहे. तो प्रधानाला संभवत नाहीं. कारण प्रधान हें अचेतन असल्यामुळें त्याचें चेतन वस्तूशीं ऐक्य संभवत नाहीं.

१५ शंका:—ईक्षण करणारा म्हणजे ईक्षणपूर्वक जग उत्पन्न करणारा असा आत्मा सगुण आहे. कारण निर्गुण परमात्म्याला कोणत्याही क्रियेचें कर्तृत्व नाहीं. उत्तर:— श्रुतीमधील ‘ आत्मा ’ शब्दाचा ‘ निर्गुण परब्रह्म ’ असा अर्थ आहे, आणि त्या निर्गुण परब्रह्मालाच जगाचें कर्तृत्व आहे असें श्रुतीवरून समजतें. सगुण ब्रह्माला स्वातंत्र्य नसल्यामुळें त्याचे ठिकाणीं कर्तृत्व संभवत नाहीं.

१६ सगुण म्हणजे सत्त्व वगैरे गुणांनीं बद्ध झालेला जीव.

१७ निर्गुण परब्रह्माला आत्मा असें म्हणतात.

८ हेयत्वावचनाच्च ।

५ (ईक्षण करणारा आत्मा) सगुण आहे असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (तेथें त्या ईक्षण करणाऱ्याला) आत्म शब्द (लावलेला) आहे.	६ (ज्याचें ईक्षण सांगितलें आहे तो) सगुण[१८] आहे असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (त्याला) आत्मशब्द (लावलेला) आहे.
६ त्या (जगाच्या कर्त्या-) चे ठिकाणीं ज्याची निष्ठा आहे त्याला मोक्ष प्राप्त होतो असें सांगितल्यामुळें (जगाचा कर्ता निर्गुण आहे).	७ (आत्मशब्दानें गौणात्मा घेतां येत नाहीं.) कारण त्याच ठिकाणीं ज्याची निष्ठा आहे त्याला मोक्ष प्राप्त होतो असें सांगितलें आहे.
७ आणि (तो) हेय आहे असें वचन नसल्यामुळें (जगाचा कर्ता निर्गुणच आहे).	८ आणि (तो[२२]) हेय आहे असें वचन नसल्यामुळें (आत्मशब्दानें गौणात्मा घेतां येत नाहीं).

१८ 'प्रधान जगाचें कारण नाहीं' हे शब्द अध्याहृत आहेत. शंकराचार्यांनाही हा अर्थ मान्य आहे. कारण या सूत्राच्या शेवटीं त्यांनीं 'असाही अर्थ घ्यावा' असें सांगितलें आहे.

१९ कारण सगुण ब्रह्माचे ठिकाणीं कितीही निष्ठा असली तरी मनुष्य संसारांतच पडेल, मुक्त होणार नाहीं.

२० एक विशेषप्रकारचा जीवात्मा.

२१ कारण जगाचा कर्ता जर सगुण असता तर मुमुक्षु लोकांना तो उपास्य नसल्यामुळें 'तो हेय म्हणजे त्याज्य आहे' असें श्रुतीमध्यें सांगितलें असतें. परंतु ज्या अर्थी तसें सांगितलें नाहीं त्या अर्थी जगाचा कर्त्ता सगुण नाहीं असें समजावें.

२२ 'आणि (तो) हेय नाहीं असें सांगितलें असल्यामुळें' असाही (मू. सं.) 'हेयत्वावचनात्' याचा अर्थ होतो. 'त्या (आत्म्या-) लाच जाणा' (मुं. २।२।५) या श्रुतीनें तो हेय नाहीं असें सांगितलें आहे.

९ स्वाप्ययात् ।	१० गतिसामान्यात् ।
	९ प्रतिज्ञा[२३]विरोध येतो म्हणून (प्रधान जगाचें कारण नाहीं).
९ (जीवात्मा) आपणामध्यें अपीत होत असल्यामुळें-(ही सत्-शब्दानें प्रधान सांगितलें नाहीं).	१० (जीवात्मा) आपणांमध्यें अपीत होत असल्यामुळें-(ही सत्-शब्दानें प्रधान सांगितलें नाहीं).
१० सारखाच बोध होत असल्यामुळें (प्रधान जगाचें कारण नव्हे).	११ [२६]सारखीच प्रवृत्ति असल्यामुळें-(ही सत्-शब्दानें प्रधान सांगितलें नाहीं).
११ आणखी श्रुतीमध्यें सांगितलें आहे म्हणून. (९)	१२ आणखी श्रुतीमध्यें सांगितलें आहे म्हणून[२७]. (९)

२३ पृ. ९० टी. १ पहा. ह्या अर्थाचें मूळ सूत्र 'प्रतिज्ञाविरोधात्' हें रामानुजाचार्यांनीं घेतलें आहे. परंतु शंकराचार्य, वल्लभ आणि पूर्णप्रज्ञ या तिघांनींही घेतलें नाहीं. शिवाय या सूत्रामध्यें सांगितलेल्या कारणाचा पूर्वसूत्रांतील 'च' (आणि) शब्दानें शंकराचार्यांनीं संग्रह केला आहे. पृ. ९० पं. २३ पहा. 'सत्-शब्दाचा अर्थ ठरविण्याबद्दल जीं एकंदर कारणें सूत्रकारानीं या अधिकरणामध्यें सांगितलीं आहेत, त्यांपैकीं या छांदोग्य उपनिषद्वाक्यावरून ज्ञात होणारीं कारणें संपलीं' ही गोष्ट सुचविण्याकरतां 'च' शब्द घातला आहे असें श्रीभाष्याच्या टीकेमध्यें (पृ. ७६२ पं. १६) सांगितलें आहे.

२४ तेव्हां अर्थांतच तो शब्दगम्य नाहीं असें म्हणतां येत नाहीं. पांचव्या सूत्रामध्यें सिद्ध केलेली गोष्टच येथून सूत्रकार अन्य कारणें दाखवून सिद्ध करीत आहेत.

२५ कारण गौणात्म्यामध्यें त्याचा लय संभवत नाहीं.

११ श्रुतत्वाच्च ।

८ (जीवात्म्याचा) सतामध्यें लय होतो असें (श्रुतीमध्यें सांगितलें) असल्यामुळें (आत्मा व्यवहारातीत नाहीं)[२४].	९ (त्याचा) स्वतःमध्येंच लय होतो असें सांगितलें असल्यामुळें (आत्मशब्दानें गौणात्मा घेतां येत नाहीं[२५]).
९ मोक्षामध्यें (जीवांना परमात्म्याशीं) तुल्यता आहे असें (श्रुतीमध्यें सांगितलें) असल्यामुळें (आत्मा शब्दगम्य आहे).	१० (शिवाय सर्व वेदांतग्रंथांमध्यें) सारखाच बोध होत आहे.
१० शिवाय[२८] श्रुतीमध्यें (त्याचें निःसंशयच) प्रतिपादन केलें आहे. (४)	११ शिवाय श्रुतीमध्यें सांगितलें असल्यामुळेंही (ब्रह्म अवाच्य[२९] नाहीं). (५)

२६ जगाच्या उत्पत्तीचें वर्णन करणाऱ्या इतर वाक्यांची जशी ‘ ब्रह्म जगाचें कारण आहे ’ असा एकप्रकारचा अर्थ दाखविण्याविषयीं प्रवृत्ति आहे. तशीच ‘ हे सोम्या हें पूर्वीं सतच होतें ’ (छां. ६।२।१) या वाक्याचीही प्रवृत्ति आहे. तेव्हां या वाक्यामध्यें सत्-शब्दानें प्रधान घेतां येत नाहीं, तर ब्रह्मच घेतलें पाहिजे असें सिद्ध होतें.

२७ ‘ हे सोम्या हें पूर्वीं सतच होतें ’ (छां ६।२।१) या वाक्यांतील सत्-शब्दानें जगाचें कारण प्रधान घेतां येत नाहीं, तर परमात्माच घेतला पाहिजे. कारण पुढें श्रुतीमध्यें या जगाच्या कारणाचे जे अनेक गुण सांगितले आहेत ते प्रधानाला संभवत नाहींत. उदा.—नामरूपव्याकर्तृत्व, सर्वज्ञत्व, सर्वशक्तित्व, सर्वाधारत्व, पापरहितत्व, सत्यकामत्व वगैरे; नामरूपव्याकर्तृत्व म्हणजे कोणतीही वस्तू नावारूपाला आणणें.

२८ ‘ सर्व वेद ज्याचें प्रतिपादन करितात ’ या श्रुतीनें ‘ आत्मा शब्दगम्य आहे ’ हें स्पष्टच सांगितलें आहे असाही या सूत्राचा अभिप्राय आहे.

२९ ज्या अर्थी श्रुतीमध्यें या ब्रह्माचें वर्णन केलें आहे त्या अर्थी याचें शब्दानें प्रतिपादन करतां येतें असें सिद्ध होतें.

१२ आनंदमयोऽभ्यासात् । १३ विकारशब्दान्नेति चेन्न प्राचुर्यात् ।

१२ आनंदमय (म्हणजे परमात्माच होय). कारण (त्या अर्थी आनंदशब्दाचा) अनेक वेळां प्रयोग केला आहे.	१३ आनंदमय (म्हणजे परमात्माच होय). कारण गुणाकार केला[30] आहे.
१३ विकारवाचक शब्द आहे म्हणून (आनंदमय म्हणजे परमात्मा) नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (येथें त्या मय-प्रत्ययाचा अर्थ) प्राचुर्य असा आहे.	१४ विकारवाचक शब्द आहे म्हणून (आनंदमय म्हणजे परमात्मा) नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (येथें त्या मयप्रत्ययाचा अर्थ) प्राचुर्य असा आहे.
१४ (ब्रह्म हें) त्या (आनंदा-)चा हेतु आहे असें (श्रुतीनें) सांगितलें आहे म्हणूनही (मय हा प्रत्यय प्राचुर्यार्थी आहे).	१५ (ब्रह्म हें) त्या (जीवांच्या आनंदा-)चा हेतु आहे असें (श्रुतीनें) सांगितलें आहे म्हणूनही (आनंदमय म्हणजे परमात्मा[31]च होय).

३० अमक्याच्या आनंदापेक्षां अमक्याचा आनंद शंभरपट जास्त आहे. त्याच्या पेक्षांही अमक्याचा आनंद शंभरपट ज्यास्त आहे. अशा रीतीनें श्रुतीमध्यें मनुष्याच्या आनंदापासून आरंभ करून थेट ब्रह्माच्या आनंदापर्यंत आनंदाचा गुणाकार केला आहे. तेव्हां ब्रह्माचा आनंद सर्वांपेक्षां अधिक असल्यामुळें येथें आनंदमय--शब्दानें परमात्मा घेतला पाहिजे असें अर्थातच सिद्ध होतें. कारण अगदीं शुद्ध अशा अवस्थेचा जीव घेतला तरी त्याचा आनंद ब्रह्माच्या आनंदापेक्षां कमीच आहे.

३१ ज्या अर्थी ह्या प्रकरणामध्यें आनंदमयाचें पुनः पुनः प्रतिपादन केलें आहे, त्या अर्थी तो आनंदमय पूर्वी सांगितलेल्या अन्नमय वगैरेंहून निराळा आहे असें सिद्ध होतें. आतां अन्नमय वगैरेंहून निराळा जो घ्यावयाचा तो पुढील प्रमाणांवरून परमात्माच घेतला पाहिजे, भलता कोणी घेतां येत नाहीं असें या सूत्राचें तात्पर्य आहे.

१४ तद्धेतुव्यपदेशाच्च ।

११ आनंदमय (म्हणजे परमात्माच होय), कारण तो अनेक वेळां सांगितलेला आहे.	१२ आनंदमय (म्हणजे विष्णूच होय). कारण (त्या आनंदमयाला) अनेक वेळां (ब्रह्मशब्द) लावलेला[३२] आहे.
१२ विकारवाचक शब्द आहे म्हणून (आनंदमय म्हणजे परमात्मा) नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. (कारण येथें तो मय—प्रत्यय) प्राचुर्य या अर्थाला दाखविणारा[३३] आहे.	१३ विकारवाचक शब्द आहे म्हणून (आनंदमय म्हणजे विष्णू) नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (येथें त्या मय—प्रत्ययाचा अर्थ) प्राचुर्य असा आहे.
१३ तो (परमात्मा आनंदा-) चा हेतु आहे असें (श्रुतीनें) सांगितलें आहे म्हणूनही (मय—प्रत्ययाचा विकार हा-[३४] अर्थ नाहीं).	१४ आनंदमय हा त्या (जगांतील सर्व व्यवहारां-) चा कारण आहे असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे. म्हणूनही (आनंदमय म्हणजे विष्णूच होय).

३२ आणि ब्रह्मशब्दाचा विष्णू हा अर्थ आहे.

३३ सूत्रांतील ‘ प्राचुर्यात् ’ ही ‘ प्राचुर्य ’ शब्दाची पंचमी नव्हे. तर ‘ प्राचुर्यात् ’ शब्दाची प्रथमा आहे. प्राचुर्य अतति इति प्राचुर्यात् म्हणजे प्राचुर्य या अर्थाप्रत प्राप्त होणारा अशी या शब्दाची व्युत्पत्ति आहे.

३४ कारण जो ज्यांना आनंद देतो तो त्यांपेक्षा निराळाच असतो असें लोकामध्यें प्रसिद्ध आहे.

३५ ज्याप्रमाणें विकृत अशा जगाचें कारण ब्रह्म अविकृतच आहे त्याप्रमाणें जीवाच्या विकाररूपी आनंदाचें कारण असा आत्मा अविकृतच असला पाहिजे. नाहीं तर त्याचें कारण निराळें मानावें लागेल. आणि अनवस्था दोष येईल. म्हणून येथें मयप्रत्ययाचा ‘ विकार ’ हा अर्थ घेतां येत नाहीं.

१५ मांत्रवर्णिकमेव च [36] गीयते । १६ नेतरोऽनुपपत्तेः ।

१५ (पूर्वीच्या) मंत्रांत प्रतिपादन केलेलें (ब्रह्म-) च (येथें) सांगितलें आहे (म्हणून आनंदमय म्हणजे ब्रह्मच होय).

१६ (पूर्वीच्या) मंत्रांत प्रतिपादन केलेलें (ब्रह्म--) च (येथें) सांगितलें आहे (म्हणून आनंदमय म्हणजे ब्रह्मच होय).

१६ (आनंदमय म्हणजे ईश्वराहून) निराळा (जीव) नव्हे. (पुढें सांगितलेल्या गोष्टी) जुळत नाहींत म्हणून.

१७ (ब्रह्माहून) निराळा (जो जीव त्याचें पूर्वीच्या मंत्रांत प्रतिपादन केलें) नाहीं. कारण (त्याचे ठिकाणीं विपश्चित्त्व [37]) संभवत नाहीं.

१७ आणखी भिन्न अशा रूपानें निर्देश केला असल्यामुळें (आनंदमय हा जीवात्मा नव्हे).

१८ आणखी भिन्न अशा रूपानें निर्देश केला असल्यामुळें [40] (आनंदमय म्हणजे जीव नव्हे).

१८ (आनंदमयानें) इच्छा केली असें सांगितलें आहे म्हणून अनुमानगम्य जें (प्रधान) तें घेण्याची जरूर नाहीं.

१९ (आनंदमयानें केवळ) इच्छा-(पूर्वक सृष्टी) केली. त्याला अनुमाना-(वरून सिद्ध होणारी शरीर वगैरे-) ची जरूर लागत नाहीं (असें श्रुतीमध्यें प्रतीत होत असल्यामुळें आनंदमय म्हणजे [42] ब्रह्मच होय).

---

३६ 'च गम्यते' (वल्ल.)

३७ 'कर्म आणि इंद्रियें यांची जरूर न धरतां सर्व पदार्थांचें ज्ञानपूर्वक ईक्षण करणें' याला 'विपश्चित्त्व' ह्मणतात.

३८ 'ब्रह्मवेत्त्याला आनंदमयाची प्राप्ति होते' असें फल सांगितलें आहे. जर आनंदमय हा जीव असेल तर हें फल संभवत नाहीं. शिवाय 'आनंदमय हा जग उत्पन्न करतो' असें सांगितलें आहे आणि जीवाच्या हातून जगाची उत्पत्ति होणें शक्य नाहीं.

३९ आणि श्रुतीमध्यें तर 'त्या आनंदमयाच्या ज्ञानानें मोक्ष प्राप्त होतो' असें सांगितलें आहे. (तै. २।१।१).

४० विज्ञानमय जो जीव त्यापेक्षां आनंदमय हा भिन्न आहे असा श्रुतीमध्यें त्याचा भिन्न अशा रूपानें निर्देश केला आहे.

१७ भेदव्यपदेशाच्च । १८ कामाच्च नानुमानापेक्षा ।

१४ मंत्रांत प्रतिपादन केलेलें (ब्रह्म-) च (येथें) सांगितलें आहे (म्हणून आनंदमय म्हणजे परमात्माच होय).

१५ मंत्रांत प्रतिपादन केलेलें (ब्रह्म-) च (येथें) सांगितलें आहे (म्हणून आनंदमय म्हणजे विष्णूच होय).

१५ (आनंदमय म्हणजे परमात्म्याहून) निराळा (जीव) नव्हे. (पुढें सांगितलेलें) जुळत नाहीं म्हणून.

१६ (आनंदमय म्हणजे (विष्णूशिवाय) निराळा नाहीं. कारण (त्याच्या ज्ञानानें मोक्ष) प्राप्त होत नाहीं.[४१]

१६ भेद सांगितला असल्यामुळेंही (आनंदमय म्हणजे जीव नव्हे).

१७ भेद सांगितला असल्यामुळेंही (आनंदमय म्हणजे विष्णूशिवाय निराळा नाहीं).[४२]

१७ (आनंदमयानें) इच्छा केली असें सांगितलें आहे म्हणून अनुमानगम्य (अशी जी जड प्रकृति तीही आनंदमय) नव्हे.

१८ अनुमान (हें मनुष्याला आपल्या) इच्छेप्रमाणें हवें तसें करतां येत असल्यामुळें त्याची जरूर बाळगूं नये.[४३]

४१ 'विष्णूचा आनंद हा इतर सर्वांच्या आनंदापेक्षां ज्यास्त आहे' अशा रीतीनें श्रुतीमध्यें विष्णू आणि इतर देव यांचा भेद दाखविला आहे. तेव्हां अर्थातच आनंदमय म्हणजे विष्णूच घेतला पाहिजे. निराळा घेतां येत नाहीं असें सिद्ध होतें.

४२ कारण जीवाला शरीर वगैरेंची अपेक्षा न धरतां एकही पदार्थ उत्पन्न करतां येत नाहीं.

४३ 'ज्या अर्थी हीं सर्व शरीरें आहेत त्या अर्थी तीं माझ्या भोगाचीं स्थानें आहेत' ह्या अनुमानानें विष्णु आणि इतर यांमध्यें ऐक्य सिद्ध होत असल्यामुळें 'आनंदमय म्हणजे विष्णूशिवाय निराळा नाहीं' असें म्हणतां येत नाहीं हें खरें, परंतु अशाप्रकारचीं अनुमानें श्रुतिविरुद्ध असल्यामुळें तीं प्रमाण धरतां येत नाहींत.

१९ अस्मिन्नस्य च तद्योगं शास्ति । २० अंतस्तद्धर्मोपदेशात् ।

१९ ह्या (आनंदमया-) चा (बोध झालेल्या) ह्या (जीवा-) चा ह्या आनंदमयाशीं (ऐक्य-रूपी) संबंध होतो असें (शास्त्र) सांगतें. (म्हणून आनंदमय म्हणजे परमात्माच होय). (६)

२० (सूर्य आणि चक्षु यांच्या) आंत असणारा पुरुष (पर-मात्मा होय). कारण त्याचे धर्म सांगितले आहेत.

२१ आणि (सूर्यमंडलाच्या आंत असणारा पुरुष जीवाहून) निराळा आहे. कारण (त्या दोहोंमध्यें) भेद सांगितला आहे. (७)

२२ आकाश-(शब्द ब्रह्मवाचक आहे). कारण त्याचीं चिन्हें (सांगितलीं) आहेत. (८)

२३ म्हणूनच प्राण-(शब्दही ब्र-ह्मवाचक आहे). (९)

२० ह्या (आनंदमया-) प्रत प्राप्त झालेल्या ह्या (जीवा-) चा त्या (आनंदा-) शीं संबंध होतो असें शास्त्र सांगतें. (म्हणून आनंदमय म्हणजे जीव नव्हे). (६)

२१ (सूर्य आणि चक्षु यांच्या) आंत असणारा पुरुष (पर-मात्मा होय). कारण त्याचे धर्म सांगितले आहेत.

२२ आणि (सुर्यमंडलाच्या आंत असणारा पुरुष जीवाहून) निराळा आहे. कारण (त्या दोहोंमध्यें) भेद सांगितला आहे. (७)

२३ आकाश-(शब्द ब्रह्मवाचक आहे). कारण त्याचीं चिन्हें (सांगितलीं) आहेत. (८)

२४ ह्मणूनच प्राण-(शब्दही ब्र-ह्मवाचक आहे). (९)

---

४४ कारण चेतन जीवाला जड प्रकृतीचें रूप प्राप्त होतें असें मानणें बरोबर नाहीं.

४५ विष्णूहून निराळ्या अशा ह्या जीवाचा.

४६ तेव्हां अर्थातच विष्णु आणि इतर यांमध्यें भेद सिद्ध होतो. एकंदरींत आनंदमय म्हणजे विष्णूच घेतला पाहिजे निराळा कोणी घेतां येत नाहीं हें सिद्ध झालें.

४७ ' आंत प्रविष्ट झालेला असा हा कर्ता ' इत्यादि श्रुतीमध्यें ज्याचें वर्णन केलें आहे तो विष्णूच होय. कारण समुद्रस्थत्व, ब्रह्मांडवीर्यत्व वगैरे तेथें सांगितलेले धर्म विष्णूचे ठिकाणींच संभवतात.

२१ भेदव्यपदेशाच्चान्यः । २२ आकाशस्तल्लिंगात् । २३ अत एव प्राणः

१८ ह्या (जीवा-) चा ह्या आनंदमया-) मध्यें त्याच्या रूपानें संबंध होतो असें श्रुति सांगते. (म्हणूनही आनंदमय म्हणजे जड प्रकृति नव्हे[४४]). (५)	१९ शिवाय ह्या (प्रकरणा-)मध्यें ह्यांचा[४५] (मोक्ष प्राप्त झाला म्हणजे) त्या (विष्णू-) शीं संबंध होतो असें (श्रुति) सांगते[४६]. (६)
१९ (सूर्य आणि चक्षु यांच्या) आंत असणारा (परमात्माच होय). कारण त्याचे धर्म सांगितले आहेत.	२० आंत असणारा (पुरुष विष्णूच होय). कारण त्याचे धर्म सांगितले[४७] आहेत.
२० भेद सांगितला असल्यामुळें (हा आंत असणारा) निराळा (म्ह० परमात्माच) आहे. (६)	२१ आणि (तो इंद्र वगैरेंहून) निराळा आहे. कारण (त्याचा इंद्र वगैरेंपेक्षां) भेद सांगितला[४९] आहे. (७)
२१ आकाश-(शब्द ब्रह्मवाचक आहे). कारण त्याचीं चिन्हें (सांगितलीं) आहेत. (७)	२२ आकाश—(शब्द विष्णु या अर्थाचा आहे). कारण त्याचीं चिन्हें (सांगितलीं)आहेत.(८)
२२ ह्मणूनच प्राण-(शब्दही ब्रम्हवाचक आहे). (८).	२३ म्हणूनच प्राण-(शब्दही विष्णु या अर्थाचा आहे). (९)

४८ सूर्यमंडल वगैरेंहून निराळा.

४९ ‘ आंत प्रविष्ट झालेला ’ इत्यादि श्रुतींमध्यें इंद्र वगैरेंपैकीं कांहींचीं नांवें सांगितलीं आहेत व कांहींचीं चिन्हें सांगितलीं आहेत. तरी ‘ ह्या विष्णूचें इंद्रादिकांशीं ऐक्य आहे ’ असें समजूं नये. कारण श्रुतींमध्यें ‘ इंद्राच्या आंत असणारा ’ अशा रीतीनें ह्या विष्णूचा इंद्र वगैरेंपेक्षां भेद सांगितला आहे.

२४ ज्योतिश्चरणाभिधानात् । २५ छंदोऽभिधानान्नेति चेन्न तथा चेता-

२४ ज्योति-(शब्द ब्रह्मवाचक आहे). कारण चरण सांगितले आहेत.	२५ ज्योति-(शब्द ब्रह्मवाचक आहे). कारण चरण सांगितले आहेत.
२५ वृत्त सांगितलें असल्यामुळें (ब्रह्म सांगितलें) नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण तशा रीतीनें चित्त (ब्रह्माचे ठिकाणीं) लावावें असें सांगितलें आहे. (इतर ठिकाणींहि) असेंच दिसून येतें.	२६ वृत्त सांगितलें असल्यामुळें (ब्रह्म सांगितलें) नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण तशा रीतीनें (ब्रह्माचें) अनुसंधान (करावें असें) सांगितलें आहे. (इतर ठिकाणींहि) असेंच दिसून येतें.
२६ भूत वगैरे पाय आहेत असें (श्रुतीचें) सांगणें जुळतें	२७ भूत वगैरे पाय आहेत असें (श्रुतीचें) सांगणें जुळतें

५० पूर्वपक्षः–'माझे कर्ण (ह्या ज्योतीच्या) विरुद्ध संचार करतात, चक्षु हें विरुद्ध) संचार करतें. आणि (हृदयामध्यें असलेलें) हें ज्योतिहि (कर्ण वगैरेंच्या) विरुद्ध आहे' ह्या श्रुतीमधील ज्योतिशब्दाचा अग्नि हा अर्थ आहे. कारण तो अर्थ प्रसिद्ध आहे. शिवाय ही श्रुति अग्निसूक्तामध्यें आहे. सिद्धांतः–ज्योतिशब्दाचा विष्णू हाच अर्थ आहे. कारण श्रुतिमध्यें सांगितलेला कर्ण वगैरेंचा संचार विष्णूच्याच विरुद्ध आहे, अग्नीच्या विरुद्ध नाहीं. कारण विष्णू हा इंद्रियगोचर नाहीं असें श्रुतीमध्येंच सांगितलें आहे.

५१ ब्रह्माचे चार पाय आहेत आणि गायत्रीचेही चार पाय आहेत. असें गायत्री आणि ब्रह्म यांच्या मध्यें सादृश्य असल्यामुळें येथें गायत्री हा शब्द ब्रह्म या अर्थी गौण रीतीनें योजिला आहे. असें करण्याचा उद्देश 'ब्रह्माचें अनुसंधान करतां यावें' हाच होय. कारण एखाद्या वस्तूचें ज्ञान होत नसेल तर तिला तिच्या सारख्या दुसऱ्या वस्तूचें नांव देऊन तिचें ज्ञान करून देतात. उदाहरणः–'गवय कसा असतो' असें विचारिलें असतां 'अरे गायच असें समज' असें उत्तर देतात.

पेणनिगदात्तथा हि दर्शनम् । २६ भूतादिपादव्यपदेशोपपत्तेश्चैवम् ।

२३ ज्योति-(शब्द ब्रह्मवाचक आहे). कारण चरण सांगितले आहेत.

२४ वृत्ताचे (चरण) सांगितले असल्यामुळें (ब्रह्म घेतां येत) नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण तशा रीतीनें मन ब्रह्माचें ठिकाणीं लावावें असें सांगितलें आहे. कारण तशा रीतीनें ज्ञान होतें[53] असतें.

२५ भूत वगैरे पाय आहेत असें (श्रुतीचें) सांगणें जुळतें.

२४ ज्योति—(शब्द विष्णु या अर्थाचा आहे). कारण (कर्ण वगैरेंचा त्याच्या विरुद्ध) संचार सांगितला आहे. (१०)

२५ (गायत्रीशब्दानें) वृत्त सांगितलें असल्यामुळें (विष्णु सांगितला) नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (त्याचे ठिकाणीं) मन लागण्याकरितां (तो) तसा सांगितला आहे. श्रुतीही[54] असेंच दाखविते.

२६ हें-(च युक्त आहे). कारण असें मानलें म्हणजे भूत वगैरे

५२ वायु, अग्नि, चंद्र, सूर्य, उदक, प्राण, वाणी, चक्षु, श्रोत्र आणि मन या दहांना विराट् हा शब्द ' तो ही विराट् ' या श्रुतीमध्यें लाविला आहे असें दिसून येतें. विराट् म्हणजे एकप्रकारचें वृत्त आहे. या वृत्ताच्या पादाचीं अक्षरें १० असतात. आणि वायु वगैरे हे पदार्थ दहा आहेत असें यांच्या मध्यें सादृश्य आहे.

५३ ज्या प्रमाणें सुईच्या द्वारानें सुताचा इतर वस्तूमध्यें प्रवेश होतो त्याप्रमाणें गायत्रीच्या द्वारानें गायत्रीशब्दाचा अर्थ जें ब्रह्म त्यामध्यें मनाचा प्रवेश होतो. एखाद्या सूक्ष्म वस्तचें दुसऱ्याला ज्ञान करून देण्याचा हा एक मार्गच आहे. नाहीं तर स्थूल बुद्धीचा एकाएकीं ब्रह्मामध्यें प्रवेश होणें असंभवी आहे.

५४ श्रुतीमध्यें गायत्रीशब्दाची ' गायति त्रायतिच ' अशी व्युत्पत्ति केली आहे. आतां गान करणें आणि रक्षण करणें या गोष्टी विष्णूचे ठिकाणींच संभवतात. तेव्हां या श्रुतीवरून गायत्रीशब्दानें विष्णूच घेतला पाहिजे असें सिद्ध होतें. आणि ज्या अर्थी छांदोग्य उपनिषदामध्यें ज्योतीला गायत्रीशब्द लाविला आहे त्या अर्थी ज्योतिशब्दानेंही विष्णूच घेतला पाहिजे ही मागील अधिकरणामध्यें सांगितलेली गोष्ट दृढ होते.

२७ उपदेशभेदान्नेति चेन्नोभयस्मिन्नप्यविरोधात्। २८ प्राणस्तथानुगमात्।

म्हणूनही असेंच (मानलें पाहिजे).

२७ उपदेश भिन्न असल्यामुळें (मागील वाक्यांतील ब्रह्म पुढील वाक्यांत ओळखतां येत) नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण दोन्ही तऱ्हेच्या (उपदेशानें ओळखीला) बाध येत नाहीं. (१०)

२८ प्राण—(शब्द ब्रह्मवाचक आहे). कारण तसें तात्पर्य आहे.

२९ वक्त्यानें आपल्या स्वतःविषयीं उपदेश केला असल्यामुळें (प्राणशब्द ब्रह्मवाचक) नाहीं असें म्हणशील

म्हणूनही असेंच[55] (मानलें पाहिजे).

२८ उपदेश भिन्न असल्यामुळें (मागील वाक्यांतील ब्रह्म पुढील वाक्यांत ओळखतां येत) नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण दोन्ही तऱ्हेच्या (उपदेशानें ओळखीला) बाध येत नाहीं (१०)

२९ प्राण—(शब्द ब्रह्मवाचक आहे). कारण तसें तात्पर्य आहे.

३० वक्त्यानें आपल्या स्वतःविषयीं उपदेश केला असल्यामुळें (प्राणशब्द ब्रह्मवाचक) नाहीं असें म्हणशील

५५ सादृश्यामुळें गायत्री हा शब्द ब्रह्म या अर्थी योजिला आहे असेंच.

५६ ब्रह्म हें सर्वव्यापी असल्यामुळें तें द्युलोकामध्येंही आहे आणि द्युलोकाहून अन्यत्रही आहे. तेव्हां कसेंही म्हटलें तरी कांहीं बाध येत नाहीं.

५७ ज्या वाक्यांत गायत्रीशब्दानें वर्णन केलें आहे त्या वाक्यांत ' द्युलोकामध्यें ' असें म्हटलें आहे. आणि ज्या वाक्यामध्यें ज्योतिशब्दानें वर्णन केलें आहे त्या वाक्यांत ' द्युलोकाहून वर ' असें म्हटलें आहे. असा या दोन्ही वाक्यामध्यें उपदेश भिन्न आहे.

५८ श्वेतद्वीप, अनंतासन आणि वैकुंठ हे स्वतः द्युलोक असल्यामुळें तेथें असलेल्या विष्णूला ' द्युलोकामध्यें आहे ' असें म्हणतां येतें. तसेंच सूर्यमंडळ, मेरु आणि

२९ न वक्तुरात्मोपदेशादिति चेदध्यात्मसंबंधभूमा ह्यस्मिन् ।

म्हणूनही असेंच (मानलें पाहिजे).

२६ उपदेश भिन्न असल्यामुळें (ज्योतिशब्दानें ब्रह्म घेतां येत) नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण दोन्ही तऱ्हेचा उपदेश असला तरी कांहीं बाध येत[५८] नाहीं. (९)

२७ प्राण-(शब्द ब्रह्मवाचक आहे). कारण तसें तात्पर्य आहे.

२८ वक्त्यानें आपल्या स्वत:विषयीं उपदेश केला असल्यामुळें (प्राणशब्द ब्रह्मवाचक) नाहीं असें म्हणशील

पाय आहेत असें श्रुतीचें सांगणें जुळतें.

२७ उपदेश भिन्न असल्यामुळें (दोन्ही वाक्यांमध्यें एक विष्णूच सांगितला आहे असें मानतां येत) नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण दोन्ही तऱ्हेच्या उपदेशामध्यें विरोध येत[५८] नाहीं. (११).

२८ प्राण-(शब्दाचा विष्णू हाचें[५९] अर्थ आहे). कारण (श्रुतीमध्यें विष्णूच्या चिन्हाचा प्राणाशीं) अनुगम केला आहे.

२९ वक्त्याला (इंद्रानें प्राणरूपानें) आपलाच उपदेश केला असल्या[६०]मुळें (प्राणशब्दाचा विष्णू हा अर्थ) नाहीं असें

इंद्रसदन या तीन द्युलोकांपेक्षां क्रमानें श्वेतद्वीप अनंतासन आणि वैकुंठ हे लोक वर असल्यामुळें त्या मानानें विष्णूला 'द्युलोकाहून वर' असेंही म्हणतां येतें. एकंदरींत दोन्ही तऱ्हेच्या उपदेशापासून एका विष्णूचीच प्रतीति होत असल्यामुळें विरोध येत नाहीं असें समजावें.

५९ 'चक्षु, श्रोत्र, मन, वाणी आणि प्राण' इत्यादि श्रुतीमध्यें प्राणशब्दाचा विष्णू हाच अर्थ आहे. चिन्हाचा म्ह. देवोपास्यत्व, सर्ववेदोक्तत्व, देहरयित्व इत्यादि धर्मांचा. अनुगम म्हणजे संबंध होय. अनुगमशब्दाचा अभ्यास असाही अर्थ आहे. तोही येथें घेतां येतो. तेव्हां 'प्राणाला ब्रह्मशब्द अनेक वेळां लाविला आहे म्हणून प्राणशब्दाचा विष्णू हा अर्थ आहे' असा सूत्रार्थ होतो.

६० इंद्रानें 'मी प्राण आहें' असा विश्वामित्राला उपदेश केला आहे.

३० शास्त्रदृष्ट्या तूपदेशो वामदेववत् । ३१ जीवमुख्यप्राणलिंगान्नेति

तर (तसें नाहीं). कारण ह्या (आध्याया) मध्यें अध्यात्म्याच्या संबंधानें पुष्कळ गोष्टी (सांगितल्या) आहेत.

३० (इंद्राचा स्वतःविषयींचा) उपदेश, त्याला वामदेवाप्रमाणें शास्त्रोक्त साक्षात्कार असल्यामुळें होय.

३१ जीव आणि मुख्यप्राण यांचीं चिन्हें (सांगितलीं) असल्यामुळें (या भागांत ब्रह्म विवक्षित) नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (अशा रीतीनें) तीन प्रकारच्या उपासना सांगितल्या असें होईल. (शिवाय हा अर्थ इतर ठिकाणींही) स्वीकारला आहे. आणि

तर (तसें नाहीं). कारण ह्या (अध्याथा-) मध्यें अध्यात्म्याच्या संबंधानें पुष्कळ गोष्टी (सांगितल्या) आहेत.

३१ (इंद्राचा स्वतःविषयींचा) उपदेश त्याला वामदेवाप्रमाणें शास्त्रोक्त साक्षात्कार असल्यामुळें होय.

३२ जीव आणि मुख्यप्राण यांचीं चिन्हें (सांगितलीं) असल्यामुळें (अध्यात्म्याच्या संबंधानें पुष्कळ गोष्टी सांगितल्या) नाहींत असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (परमात्म्याचीच) तीन प्रकारांनीं उपासना सांगण्याकरतां (तीं चिन्हें सांगितलीं आहेत. अशा उपासना इतर

६१ ' अध्यात्मसंबंधभूमा ह्यस्मिन् ' ह्या मूळ सं. वाक्याचा ' ह्या (इंद्राचे) ठिकाणीं परमात्म्याचा जास्त संबंध आहे ' असाही अर्थ होतो.

६२ ' मी मनु होतों, मी सूर्य होतों ' असा वामदेवानें उपदेश केला आहे. आतां जरी वामदेव हा वास्तविक रीतीनें मनु नव्हे, आणि सूर्यही नव्हे, तरी त्या वामदेवाचा आणि मनु सूर्य वगैरेंचा अंतर्यामी एकच परमात्मा असल्यामुळें वामदेवानें त्या अंतर्यामीच्या दृष्टीनें तसा उपदेश केला आहे. तसेंच येथें समजावें.

६३ १ परमात्म्याची स्वतःच्या रूपानें उपासना. २ जीवरूपी शरीरानें युक्त अशा परमात्म्याची उपासना. याकरतांच येथें जीवाचें चिन्ह सांगितलें आहे. आणि ३ भोगाचें साधन जो प्राण तद्रूपी शरीरानें युक्त अशा परमात्म्याची उपासना. या करतांच येथें मुख्यप्राणाचें चिन्ह सांगितलें आहे. असे उपासनेचे ३ प्रकार समजावेत.

६४ ' ब्रह्म, हें सत्य, ज्ञान, आणि अनंत आहे ' इत्यादि श्रुतीमध्यें ब्रह्माची स्वतःच्या रूपानें उपासना स्वीकारली आहे. ' या शरीरामध्यें परमात्मा प्रविष्ट झाला आहे '

चेन्नोपासात्रैविध्यादाश्रितत्वादिह तद्योगात् ॥ प्रथमाध्याये प्रथमः पादः ॥

तर (तसें नाहीं). कारण ह्या (अध्याया-) मध्यें अध्यात्म्याच्या संबंधानें पुष्कळ गोष्टी (सांगितल्या) आहेत.

२९ (इंद्राचा स्वतःविषयींचा) उपदेश त्याला वामदेवाप्रमाणें शास्त्रोक्त साक्षात्कार असल्यामुळें होय.

३० जीव आणि मुख्य प्राण यांचीं चिन्हें (सांगितलीं) असल्यामुळें (या भागांत ब्रह्म विवक्षित) नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (अशा रीतीनें) तीन प्रकारच्या उपासना सांगितल्या असें होईल. (आतां जीव हा ब्रह्मावर) अवलंबून असल्यामुळें (त्याचीं चिन्हें

म्हणशील तर (तसें नाहीं). कारण ह्या (प्रकरणा-) मध्यें परमात्म्याचा पुष्कळ ठिकाणीं संबंध (सांगितला आहे).

३० (इंद्रानें केलेला) उपदेश वामदेवाप्रमाणें अंतर्यामीच्या दृष्टीनें आहे.

३० (जीव आणि मुख्यप्राण यांचीं चिन्हें[६५] (सांगितलीं) असल्यामुळें (त्या भागांत प्राणशब्दाचा विष्णु हा अर्थ नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (विष्णूच्या) तीनप्रकारच्या उपासना[६६] आहेत. (त्याच) येथें स्वीकारिल्या आहेत. (आणि मनुष्यांना) त्या

इत्यादि ठिकाणीं जीवरूपी शरीरानें युक्त अशा परमात्म्याची उपासना स्वीकारिली आहे. ‘ हें सर्व दृश्य जग तो परमात्मा झाला आहे ’ इत्यादि ठिकाणीं जड अजड अशा ज्या सर्व वस्तू तद्रूपी शरीरानें युक्त अशा परमात्म्याची उपासना स्वीकारली आहे.

६५ पुरुष हा शतायु आहे हें जीवाचें चिन्ह होय. आणि इंद्रियांशीं संवाद करणें हें मुख्यप्राणाचें चिन्ह होय.

६६ १ अंतरुपासना २ बहिरुपासना आणि ३ सर्वंगतोपासना असे उपासनांचे तीन प्रकार आहेत. ‘ विष्णु हा सुषुम्नानाडीच्या द्वारानें हृदयामध्यें प्रविष्ट झाला आहे ’ या ठिकाणीं विष्णूची अंतरुपासना सांगितली आहे. ‘ विद्वान् महिदास असें म्हणतो ’ या ठिकाणीं बहिरुपासना (म्ह. महिदासाच्या रूपानें उपासना) सांगितली आहे. ‘ या भगवानानें या पुरुषाला अनंत ब्रह्मरूपानें पाहिलें ’ या ठिकाणीं सर्वंगतोपासना सांगितली आहे.

१ सर्वत्र प्रसिद्धोपदेशात् ।

येथेंही त्यांचा (म्ह० ब्रह्माच्या चिन्हांचा) संबंध सांगितला आहे. (११)	ठिकाणींही) स्वीकारल्या आहेत. म्हणून येथें-(ही) त्या योग्यच आहेत. (११)

अध्याय १ पाद २

१ जें सर्वत्र प्रसिद्ध त्याचाच (येथें) उपदेश केला आहे म्हणून (परब्रह्मच येथें उपास्य आहे).	१ (श्रुतीमध्यें) सर्व (जगाच्या रूपानें निर्दिष्ट केलेलें ब्रह्मच होय). कारण प्रसिद्ध (असल्यासारखा त्याचा) उपदेश केला आहे.
२ विवक्षित गुण (ब्रह्मालाच) संभवतात म्हणूनही (परब्रह्मच येथें उपास्य आहे).	२ विवक्षित गुण (ब्रह्मालाच) संभवतात म्हणूनही (परब्रह्मच येथें उपास्य आहे).

६७ एका मनुष्याला एकप्रकारची उपासना आवडली तर ती दुसऱ्याला आवडतेंच असा नियम नाहीं. त्याला दुसऱ्याच तऱ्हेची उपासना आवडते. याकरितां अनेकप्रकारच्या उपासना सांगितल्या आहेत. आणि त्या मनुष्यांना योग्य आहेत.

१ ' हें सर्व (जग) खरोखर ब्रह्म आहे ' (छां० ३।१४।१) या श्रुतीमध्यें ब्रह्मशब्दानें परब्रह्मच घेतलें पाहिजे. जीवात्मा घेतां येत नाहीं. कारण ' जगाच्या उत्पत्तिस्थितिलयांचें कारण ' अशा प्रसिद्ध रूपानें त्याचा निर्देश केला आहे. जीवात्मा हा जगाच्या उत्पत्ति वगैरेचें कारण नसल्यामुळें तो येथें घेतां येत नाहीं असें समजावें. ' (सर्ववेदांतवाक्या-) मध्यें (ब्रह्माचें म्हणून) प्रसिद्ध (असे जे मनोमयत्वें वगैरे धर्म यांचा) उपदेश केला असल्यामुळें (मनोमय इत्यादि श्रुतीमध्यें सांगितलेला परमात्माच होय) असाही या सूत्राचा अर्थ श्रीभाष्यामध्यें केला आहे.

२ विवक्षितगुणोपपत्तेश्च ॥

ब्रह्म घेतलें असतां विरुद्ध होत नाहींत. तसेंच) ह्या (प्राणा-) चा त्या (ब्रह्मा-) शीं संबंध असल्यामुळें (प्राणाचीं चिन्हेंही ब्रह्म घेतलें असतां विरुद्ध होत नाहींत). (१०)	(उपासना-) ची योग्यता[6] आहे. (१२)

अध्याय १ पाद २

१ (' त्यानें ऋतु[2] करावा ' ही श्रुति ब्रह्मप्रतिपादक[3] आहे). कारण सर्व (वेदांतग्रंथा-) मध्यें प्रसिद्ध अशा ब्रह्माचा (येथें) उपदेश केला आहे.	१ सर्व ठिकाणीं (असणारा[4] विष्णूच होय). कारण (त्या अर्थी) प्रसिद्ध (अशा ब्रह्म-शब्दाचा श्रुतीमध्यें) उपदेश केला आहे.
२ विवक्षित गुण (ब्रह्म घेतलें असतांही) संभवतो म्हणू-नही (ही श्रुति ब्रह्म प्रति-पादक आहे).	२ विवक्षित[5] गुण (विष्णूलाच) संभवतात म्हणूनही (सर्व ठिकाणीं असणारा विष्णूच होय).

२ मनन.

३ म्हणजे ह्या श्रुतीमध्यें जीवाची उपासना सांगितली नाहीं.

४ श्रुतीमध्यें सर्वव्यापी अशा रूपानें जो वर्णिला आहे तो.

५ ' मनुष्य मृत झाल्यानंतर त्याला त्याच्या पूर्व संकल्पाप्रमाणें फल प्राप्त होतें ' असें जें पुढें श्रुतीमध्यें फल सांगितलें आहे त्याला विवक्षित गुण म्हणतात. आतां पूर्वीची श्रुति ब्रह्मप्रतिपादक आहे असें मानलें तरी हा गुण संभवतो. कारण जीवाला भगवत्प्राप्ति झाली असतां तेथें त्याला सर्वप्रकारचीं फलें प्राप्त होत असल्यामुळें त्यांमध्यें त्याच्या पूर्वसंकल्पित फलाचाही समावेश होतो.

६ श्रुतीमध्यें सांगितलेले अश्रुतत्व वगैरे गुण.

३ अनुपपत्तेस्तु न शारीरः । ४ कर्मकर्तृव्यपदेशाच्च ।

---

३ परंतु ज्या अर्थीं (विवक्षित धर्म) जुळत नाहींत त्या अर्थीं (मनोमयत्व वगैरे धर्मांनीं युक्त जो आत्मा तो) शारीर नव्हे.

४ (एक) कर्म (आहे) आणि (दुसरा) कर्ता (आहे) असा उल्लेख आहे म्हणूनही (मनोमयत्व वगैरे धर्मांनीं युक्त जो आत्मा तो शारीर नव्हे).

५ शब्द भिन्न आहेत म्हणून- (ही मनोमयत्व वगैरे धर्मांनीं युक्त जो आत्मा तो शारीर नव्हे).

६ स्मृतीवरूनही (त्या दोहोंमध्यें भेद आहे असें सिद्ध होतें).

३ परंतु ज्या अर्थीं (विवक्षित धर्म) जुळत नाहींत त्या अर्थीं (श्रुतीमध्यें सर्व जगाच्या रूपानें निर्दिष्ट केलेला) जीवात्मा नव्हे.

४ (एक) कर्म (आहे) आणि (दुसरा) कर्ता (आहे) असा उल्लेख आहे म्हणूनही (श्रुतीमध्यें सर्व जगाच्या रूपानें निर्दिष्ट केलेला शारीर नव्हे).

५ शब्द भिन्न आहेत म्हणून- (ही श्रुतीमध्यें सर्व जगाच्या रूपानें निर्दिष्ट केलेला शारीर नव्हे).

६ स्मृतीवरूनही (श्रुतीमध्यें सर्व जगाच्या रूपानें निर्दिष्ट केलेला शारीर नव्हे).

---

७ जीवात्मा हा आत्म्याचें प्रतिपादन करतो, आत्म्याला जाणतो, अशा रीतीनें श्रुतीमध्यें पूर्वीं निर्दिष्ट केलेल्या सर्वव्यापी (विष्णू.) चा पुढें 'प्रतिपादन करणें जाणणें इत्यादि क्रियांचें कर्म ' या रूपानें उल्लेख केला आहे, आणि जीवाचा ' कर्ता ' या रूपानें उल्लेख केला आहे. यावरून ' सर्व ठिकाणीं असणारा शारीर नव्हे ' हें सिद्ध होतें.

८ ' हृदयाच्या आंत असणारा हा माझा आत्मा' (छां० ३।१४।३) ह्या श्रुतीमध्यें ' माझा ' आणि ' आत्मा ' असा जीवात्मा आणि परमात्मा यांचा षष्ठी आणि प्रथमा या भिन्न विभक्तीमध्यें निर्देश केला आहे. दुसरीकडेही श्रुतीमध्यें भिन्न विभक्तीमध्यें निर्देश केला आहे. उदा० जीवात्म्यामध्यें असलेला हा हिरण्मय पुरुष '.

९ येथून निराळ्या अधिकरणाला आरंभ झाला आहे. श्रुती—[श. ब्रा १०।६-३।२) मधील हिरण्मयशब्दाचा अर्थ येथें निश्चित केला आहे. म्हणजे ' वरील श्रुति जीवप्रतिपादक आहे ' असें म्हणतां येत नाहीं. कारण जीव हिरण्मय नसल्यामुळें ' हिरण्मय ' हा शब्दच मुळीं जुळत नाहीं.

५ शब्दविशेषात् । ६ स्मृतेश्च ।

३ परंतु (प्राण हें ज्याचें शरीर आहे ही श्रुतीमध्यें सांगितलेली गोष्ट) संभवत नाहीं म्हणून (वरील श्रुति) जीव-(प्रतिपादक) नव्हे;	३ (सर्वव्यापित्व) संभवत नाहीं म्हणूनच (सर्व ठिकाणीं असणारा) शरीर नव्हे.
४ (एक) कर्म (आहे) आणि (दुसरा) कर्ता (आहे) असा उल्लेख आहे म्हणूनही (वरील श्रुति जीवप्रतिपादक नव्हे). (१)	४ (एक) कर्म (आहे) आणि (दुसरा) कर्ता (आहे) असा उल्लेख आहे म्हणूनही (सर्व ठिकाणीं असणारा शरीर नव्हे).
५ (हिरण्मय पुरुष परमात्माच होय.) कारण शब्दानें-(च) विशेष (सांगितला) आहे.	५ विशेषप्रकारचा[१०] शब्द आहे म्हणून (ब्रह्म-शब्दानें जीव घेतां येत नाहीं).
६ स्मृतीवरूनही[११] (असेंच सिद्ध होतें).	६ स्मृतीवरूनही[१२] (सर्व ठिकाणीं असणारा विष्णूच होय).

१० ब्रह्मशब्दाचा गौण रीतीनें जीव हा अर्थ घेतला असतां, परंतु तो तेथें घेतां येत नाहीं. कारण 'ह्यालाच ब्रह्म असें म्हणतात' या श्रुतीमध्यें 'च' हा निश्चयद्योतक विशेषप्रकारचा शब्द घातला आहे.

११ 'परमात्मा हा सर्व भूतांच्या हृदयांत आहे' असें स्मृतीमध्यें (भ. गी. १८।६०) सांगितलें आहे. आणि वरील श्रुतीमध्यें हिरण्मय पुरुष हृदयांत आहे असें सांगितलें आहे. तेव्हां अर्थातच स्मृतीला अनुसरून श्रुतीमधील हिरण्मयशब्दाचा परमात्मा हाच अर्थ ठरतो.

१२ 'हे अर्जुना मी सर्व भूतांच्या हृदयामध्यें आहे' (भ. गी. १०-२०) इत्यादि स्मृतीवरून. 'ब्रह्म-शब्दाचा जीव हा अर्थ नाहीं' ही गोष्ट ही ह्या स्मृतीवरून सिद्ध होते (टी).

७ अर्भकौकस्त्वात्तद्व्यपदेशाच्च नेति चेन्न निचाय्यत्वादेवं व्योमवच्च ।

---

७ अल्प आश्रय (सांगितला) असल्यामुळें आणि त्याचा निर्देश केल्यामुळें (येथें परमात्मा सांगितला) नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (परमात्माच) अशा रीतीनें ध्येय आहे (असें सांगितलें आहे). आणि आकाशाप्रमाणें (हें समजावें).

८ (परमात्म्याला) संभोगाची प्राप्ति येते असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (जीवात्मा व परमात्मा यांमध्यें) भेद आहे. (१)

७ अल्प आश्रय (सांगितला) असल्यामुळें आणि त्याचा निर्देश केला असल्यामुळें (येथें परमात्मा सांगितला) नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (परमात्माच) अशा रीतीनें ध्येय आहे (असें सांगितलें आहे). शिवाय (येथें हा) आकाशासारखा[१३] (असें सांगितलें आहे).

८ (परमात्म्याला) संभोगाची प्राप्ति येते असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (संभोगाचें कारण) निराळें[१७] आहे. (१)

---

१३ शरीर आत्मा हा आकाशासारखा मोठा नसल्यामुळें तो ह्या प्रकृत श्रुतीमध्यें घेतां येत नाहीं.

१४ ‘ तो व्रीही वगैरेसारखा आहे ’ असा ह्या हिरण्मयाचा श्रुतीमध्यें निर्देश केला आहे. आणि परमात्मा तर सर्वव्यापी असल्यामुळें व्रीहीएवढा लहान नाहीं.

१५ ज्याप्रमाणें आकाश हें सूक्ष्म असल्यामुळें त्याचा सर्व वस्तूमध्यें प्रवेश आहे त्याप्रमाणेंच परमात्माही सूक्ष्म असल्यामुळें त्याचा सर्व ठिकाणीं प्रवेश आहे हें समजण्याकरतां ‘ तो व्रीहीसारखा सूक्ष्म आहे ’ असें म्हटलें आहे.

१६ ‘ सर्व भूतामध्यें आहे ’ ह्या श्रुतीमध्यें त्याचा हृदयरूपी अल्प आश्रय सांगितला आहे. आणि ‘ तो चक्षुमध्ये आहे ’ असें जीवाचें चिन्ह सांगितलें आहे. कारण जीवाचाच चक्षु वगैरे इंद्रियांशीं संबंध आहे.

८ संभोगप्राप्तिरिति चेन्न वैशेष्यात् ।

७ अल्प आश्रय (सांगितला) असल्यामुळें आणि त्याचा निर्देश केल्यामुळें (येथें परमात्मा सांगितला) नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (परमात्माच अशा रीतीनें) ध्येय आहे (असें सांगितलें आहे), आणि (व्रीहीसारखा) असा निर्देश आकाशाप्रमाणें (केला आहे).

८ (परमात्म्याला) संभोगांची प्राप्ति येते असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (त्याचे ठिकाणीं) विशेष आहे. (२)

७ अल्प आश्रय (सांगितला) असल्यामुळें आणि (जीवाच्या चिन्हांचा) निर्देश केल्यामुळें (येथें विष्णु सांगितला) नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (विष्णूच अशा रीतीनें) उपास्य आहे (असें सांगितलें आहे). आणि आकाशाप्रमाणें (हें समजावें).

८ संभोगांची प्राप्ति येते (म्हणून विष्णु हा सर्वव्यापी नाहीं) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (त्या विष्णूच्या अंगीं) विशेष-(प्रकारचें सामर्थ्य) आहे. (१)

१७ शंका—' परमात्मा हृदयाच्या आंत आहे ' असे उपासनेकरतां कल्पिलें आहे. त्यावरून ' त्याचा जीवाप्रमाणें हृदयाशीं संबंध आहे ' असें समजतें. तेव्हां अर्थातच ह्या परमात्म्याला जीवासारखे सुखदुःखोपभोग होतील. उत्तर—' शरीराशीं संबंध ' हें सुखदुःखाचें कारण नव्हे. तर पुण्यपापरूपी कर्म हें त्याचें कारण आहे, आणि तें तर परमात्म्याला मुळींच संभवत नाहीं.

१८ सर्वरूपत्व, आनंदरूपत्व, स्वकर्तृत्व वगैरे विशेष धर्म परमात्म्याचे ठिकाणीं आहेत. त्यामुळें त्याला त्याच्या इच्छेविरुद्ध भोग प्राप्त होत नाहींत. ' परमात्म्याला मुळींच भोग नाहींत ' असें वल्लभाचार्यांचें मत नाहीं.

१९ कारण विष्णू हा सर्वव्यापी असल्यामुळें त्याचा सर्व शरीराशीं संबंध आहे, तेव्हां अर्थातच त्याला सुखदुःखें होण्याचा संभव आहे.

९ अत्ता चराचरग्रहणात् । १० प्रकरणाच्च ।

९ खाणारा (परमात्माच होय). कारण (तो) चराचराचें ग्रहण करतो (असें सांगितलें आहे).	९ खाणारा (परमात्माच होय). कारण (तो) चराचरांचें ग्रहण करतो (असें सांगितलें आहे).
१० प्रकरणावरूनही (खाणारा परमात्माच होय). (२)	१० प्रकरणावरूनही (खाणारा परमात्माच होय[22]).
११ गुहेमध्यें प्रविष्ट झालेले दोघे (जीव आणि परमात्मा हेच होत). कारण ते आत्मे आहेत. (आणि संख्येपासून एका जातीच्या व्यक्तींचीच प्रतीति झालेली लोकांत) आढळते.	११ गुहेमध्यें प्रविष्ट झालेले दोघे (प्राण आणि जीव किंवा बुद्धि आणि जीव हे नव्हेत. तर) जीव आणि परमात्मा हे तसे आहेत. कारण त्यांचा-(च गुहेमध्यें प्रवेश सांगितलेला) दृष्टीस पडतो.

२० चर म्हणजे मृत्यु. कारण तो सर्व प्राण्यांना मारण्याकरतां संचार करीत आहे. अचर म्हणजे ब्राह्मण आणि क्षत्रिय. कारण त्यांचें कोणालाही चलन करतां येत नाहीं.

२१ खाणारा म्ह० संहार करणारा. पूर्वी (१।१।२) ब्रम्हाचें लक्षण सांगतांना संहार करणारा विष्णु आहे असें सांगितलें आहे. परंतु बृहदारण्यक श्रुती-(बृ. १-२-५) वरून अदिति (म्ह. मृत्यु) ही देवता संहार करणारी आहे असा भास होतो, तो होऊं नये म्हणून या अधिकरणाचा आरंभ केला आहे.

२२ शंका:—जरी हें परमात्म्याचें प्रकरण चालू झालेलें आहे तरी ह्याच प्रकरणामध्यें पुढें ‘ गुहेमध्यें प्रविष्ठ झालेले दोघे ’ असें वर्णन केलें आहे. तेथें दोघे म्हणजे एक जीव आणि दुसरा त्याच्या जोडीला प्राण किंवा बुद्धि. तेव्हां परमात्म्याचेंच हें

११ गुहां प्रविष्टावात्मानौ हि तद्दर्शनात् ।

९ खाणारा (परमात्माच होय). कारण चर आणि अचर (अशा सर्व वस्तूंचा) संहार करणें (त्याचे ठिकाणीं संभवतें).	९ खा[२२]णारा (विष्णूच होय). कारण चराचर (सर्व वस्तू ह्या श्रुतीमध्यें खाण्याच्या म्हणून) सांगितल्या आहेत.
१० प्रकरणावरूनही (खाणारा परमात्माच होय). (३)	१० प्रक[२३]रणावरूनही (खाणारा विष्णूच होय). (२)
११ गुहेमध्यें प्रविष्ट झालेले जीव आणि परमात्मा हेच होत. (आणि हें) योग्य-(च आहे). कारण त्यांच्या संबंधानें (प्रश्न केलेला) दृष्टीस पडतो.	११ गुहेमध्यें प्रविष्ट झालेले(असें सांगितलें असल्यामुळें कर्मफलाचा उपभोग घे[२४]णारे) विष्णुरूपीच होत. कारण त्याचीं (दोन रूपें आहेत) असें दृष्टी[२५]स पडतें. (आणि तो गुहेमध्यें प्रविष्ट झाला आहे हें) दृष्टीस पडतें.

प्रकरण आहे असें म्हणतां येत नाहीं. उत्तरः—तेथें जीवाच्या जोडीला दुसरा परमात्माच आहे असें पुढील सूत्रामध्यें सांगितलें आहे. तेव्हां हें अधिकरण येथेंच संपलें असें समजूं नये.

२३ उदक संवत्सर वगैरे पदार्थ उत्पन्न करणारा अशा रूपानें हें प्रकरण विष्णूच्या संबंधानेंच चालू झालेलें आहे.

२४ विष्णूला शुभ फळांचा उपभोग आहे असें पूर्णप्रज्ञाचार्यांचें मत आहे.

२५ तेज, उदक, आणि पृथ्वी एतद्रूपी शरीराला, प्रदीप्त अशा दोघा भगवानांनीं व्यापलें आहे. आणि त्यांची सेवा करण्याकरितां वायूही तेथें आला आहे. असें श्रुतीमध्यें वर्णिलें आहे. तेव्हां त्यानीं दोन रूपें आहेत असें सिद्ध होतें.

१२ विशेषणाच्च । १३ अंतर उपपत्तेः ।

१२ विशेषणें (दिलीं) आहेत म्हणूनही (गुहेमध्यें प्रविष्ट झालेले, जीव आणि परमात्माच होत). (३)

१३ (डोळ्याच्या) आंत असणारा (पुरुष परमात्मा होय). कारण (सांगितलेले धर्म त्याचे ठिकाणीं) संभवतात.

१४ (इतर-) स्थान वगैरेंचा-(ही) निर्देश केला आहे म्हणून (येथें जो डोळा या स्थानाचा निर्देश केला आहे तो दोष नाहीं).

१५ आणि सुखानें युक्त (जें प्रकृत ब्रह्म तें-) च येथें सांगितलें असल्यामुळें (डोळ्याच्या आंत असणारा पुरुष परमात्माच होय).

१२ विशेषणें (दिलीं) आहेत म्हणूनही (गुहेमध्यें प्रविष्ट झालेले जीव आणि परमात्मा हेच होत). (२)

१३ (डोळ्याच्या) आंत असणारा (पुरुष परमात्मा होय). कारण (सांगितलेले धर्म त्याचे ठिकाणीं) संभवतात.

१४ स्थिति वगैरे सांगितली आहे म्हणूनही (डोळ्याच्या आंत असणारा परमात्माच होय).

१५ सुखानें युक्त अशा (प्रकृत ब्रम्हा-) चें--(च येथें) प्रतिपादन केलें आहे म्हणून (डोळ्याच्या आंत असणारा परमात्मा होय).

२६ ‘ कर्मफलांचा उपभोग घेणारे दोघे ’ असें श्रुतीमध्यें पूर्वीं सांगून नंतर त्यांना ‘ जो सेतु ’ असें एक वचनानें विशेषण दिलें आहे त्यावरून एकाचीच दोन रूपें आहेत असें सिद्ध होतें. तसेंच त्याला पुढें ब्रह्म हा शब्द विशेषण दिला आहे त्यावरून तो विष्णूच आहे हें सिद्ध होतें.

२७ ‘ जो हा डोळ्यामध्यें पुरुष दृष्टीस पडतो ’ (छां० ४।१५।१) या श्रुतीमध्यें ज्ञानी मनुष्यानें अज्ञान्याला ब्रह्माचा उपदेश केला आहे. तो उपदेश करतांना कोणतें तरी एखादें ब्रह्माचें स्थान सांगावयाचें तें डोळा हें सांगितलें आहे. कारण तें सन्निध आहे आणि स्वच्छही आहे. तेव्हां जें डोळ्यामध्यें पुरुषाचें दर्शन सांगितलें आहे तें अशा रीतीनें परमात्म्याला संभवतें.

२८ बृहदारण्यक श्रुती-(३।७।१८) मध्यें ‘ परमात्मा हा चक्षूमध्यें राहून त्याचें नियमन करतो ’ असें सांगितलें आहे. ‘ वगैरे ’ शब्दानें नियमन घ्यावें.

१४ स्थानादिव्यपदेशाच्च ।	१५ सुखविशिष्टाभिधानादेव च[३१] ।
१२ विशेषणें (दिलीं) आहेत म्हणूनही (गुहेमध्यें प्रविष्ट झालेले जीव आणि परमात्माच होत). (४)	१२ विशेषणांवरूनही (असेंच सिद्ध होतें). (२)
१३ (डोळ्याच्या) आंत असणारा (पुरुष परमात्माच होय). कारण (तेथें परमात्म्याचें दर्शन) संभवतें.	१३ (डोळ्याच्या) आंत असणारा (पुरुष विष्णूच होय). कारण (श्रुतीमध्यें सांगितलेले अमृतत्व निर्भयत्व वगैरे धर्म त्यालाच) संभवतात.
१४ स्थान वगैरेंचा निर्देश केला आहे म्हणूनही (तो पुरुष परमात्माच होय).	१४ स्थान वगैरेंचा निर्देश केला आहे म्हणूनही (डोळ्याच्या आंत असणारा पुरुष विष्णूच होय).
१५ (डोळ्याच्या आंत असणारा पुरुष) सुखानें युक्त आहे असें (श्रुतीमध्यें) सांगितलें आहे म्हणूनही (तो पुरुष परमात्माच होय).	१५ आणि सुखानें युक्त (जें प्रकृत ब्रह्म तें-) च येथें सांगितलें असल्यामुळें (डोळ्याच्या आंत असणारा पुरुष परमात्माच होय).

२९ ' परमात्मा हा कर्मफलाच्या लयानें स्थान आहे ' असें श्रुतीमध्यें (छां० ४।१५।२) सांगितलें आहे. ' प्राण्यांना त्यांच्या कर्माचें फल देणें ' इत्यादि गोष्टी वगैरे शब्दानें घ्याव्या.

३० श्रुतीमध्यें (छां. ४।१५।१) जो डोळा या स्थानाचा निर्देश केला आहे तो या डोळ्याची असंगत्वरूप शक्ति दाखवून केला आहे. कारण डोळ्यांत पाणी घातलें तरी तें पापणीच्या वाटेनें निघून जातें असें तेथें म्हटलें आहे. तेव्हां असें ज्याचें स्थान आहे तो विष्णूच असला पाहिजे. प्राण्यांना त्याच्या कर्माचें फल देण्याची जी शक्ति श्रुतीमध्यें या डोळ्यांतील पुरुषाचे ठिकाणीं दाखविली आहे ती वगैरे शब्दानें घ्यावी.

३१ या सूत्राच्या पुढें ' अतएव च स ब्रह्म ' असें सूत्र रामानुजाचार्यांनीं घेतलें आहे.

१६ श्रुतोपनिषत्कगत्यभिधानाच्च । १७ अनवस्थितेरसंभवाच्च नेतरः ।

१६ ज्यानें उपनिषदें ऐकिलीं आहेत अशा (मनुष्या-) चा (जो) मार्ग (तो येथें) सांगितला असल्यामुळेंही (डोळ्याच्या आंत असणारा पुरुष परमात्मा होय).

१७ कायमची स्थिति नाहीं आणि (सांगितलेल्या धर्मांचा) संभवही नाहीं म्हणून (डोळ्याच्या आंत असणारा पुरुष परमात्म्याहून) निराळा नव्हे. (४)

१८ देवादिकांचे ठिकाणीं असणारा(जो) अंतर्यामी (तो परमात्मा होय). कारण त्याचे

१६ म्हणूनच[३२] तें (आरंभीं सांगितलेलें) ब्रह्म होय).

१७ ज्यानें उपनिषदें ऐकिलीं आहेत अशा (मनुष्या-) चा (जो) मार्ग (तो येथें) सांगितला असल्यामुळेंही(डोळ्याच्या आंत असणारा पुरुष परमात्मा होय).

१८ कायमची स्थिति नाहीं आणि (सांगितलेल्या धर्मांचा) संभवही नाहीं म्हणून (डोळ्याच्या आंत असणारा पुरुष परमात्म्याहून) निराळा नव्हे. (३)

१९ देव[३५] वगैरेंचें ठिकाणीं आणि लोक वगैरेंचे ठिकाणीं असणारा जो अंतर्यामी (तो

३२ क आणि ख हे दोन शब्द परस्परांना विशेषण दिले आहेत म्हणूनच. (भाषांतराचें पान २०० पहा). हें सूत्र रामानुजाचार्यांच्या पाठामध्यें आहे. इतरांच्या पाठामध्यें नाहीं.

३३ डोळ्याच्या आंत राहून त्याचें नियमन करणारा असा हा पुरुष जर एखादा जीव असेल तर अर्थातच त्या जीवाचें नियमन करणारा दुसरा कोणी तरी जीव असलाच पाहिजे, पुनः त्या जीवाचें नियमन करणारा तिसरा जीव पाहिजे. अशा रीतीनें अनवस्थानामक दोष येतो.

३४ ‘ वाधिलोकादि ’ (रा.)

३५ देव वगैरेंच्या ठिकाणीं असलेल्या अंतर्यामीचें काण्वांच्या पाठामध्यें (बृ. ३।७।३) वर्णन केलें आहे. माध्यंदिनांच्या पाठामध्यें (बृ. ३।७।३) तें वर्णन करून आणखी लोक वगैरेंच्या ठिकाणीं असलेल्या अंतर्यामीचेंही वर्णन केलें आहे. त्या दोन्ही

१८ अंतर्याम्यधिदैवा[३४]दिषु तद्धर्मव्यपदेशात् ।

१६ ज्यानें उपनिषदें ऐकिलीं आहेत अशा (मनुष्या) चा (जो) मार्ग (तो येथें) सांगितला असल्यामुळेंही (डोळयाच्या आंत असणारा पुरुष परमात्मा होय).

१७ कायमची स्थिति नाहीं आणि (सांगितलेल्या धर्मांचा) संभवही नाहीं म्हणून (डोळयाच्या आंत असणारा पुरुष परमात्म्याहून) निराळा नव्हे. (५)

१८ देवा[३६]दिकांचे ठिकाणीं असणारा अंतर्यामी (परमात्माच होय.) कारण त्याचे धर्म

१६ ज्यानें ही विद्या ऐकिली आहे अशा (मनुष्या-) ला (येथें ब्रह्म) मार्ग सांगितला असल्यामुळेंही (डोळयाच्या आंत असणारा पुरुष परमात्मा होय).

१७ अनव[३३]स्था येते आणि संभव नाहीं म्हणून (डोळयाच्या आंत असणारा पुरुष विष्णूहून) निराळा (जीव) नव्हे. (४)

१८ अंतर्यामी (विष्णूच होय). कारण आधिदैविक वगैरे प्रकरणामध्यें त्याचे धर्म सांगि-

ठिकाणीं वर्णिलेला अंतर्यामी हा परमात्माच आहे, जीवात्मा नव्हे. कारण तेथें पुढें सांगितलेले जे सर्वात्मकत्व सर्वशरीरकत्व सर्वनियंतृत्व वगैरे धर्म ते परमात्म्याचे ठिकाणींच संभवतात, जीवाचे ठिकाणीं संभवत नाहींत. तसेंच ते धर्म प्रधानाचे ठिकाणीं संभवत नाहींत.

३६ 'देव वगैरेंच्या मध्यें अंतर्यामी परमात्मा आहे' ही गोष्ट (अ. १ पा. १ सू २०) सूत्रावरून सिद्ध झाल्यासारखीच आहे. कारण या सूत्रामध्यें 'सूर्य वगैरेंच्या आंत अंतर्यामी परमात्मा आहे' हें सिद्ध केलें आहे. येथें सूत्रकारांचा अभिप्राय असा आहे कीं श्रुतीमध्यें (बृ. ३।७।३) 'देवादिकांच्या आंत राहून त्यांचें नियमन करतो' असें जें सांगितलें आहे तेथें हा अंतर्यामी परमात्माच सांगितला आहे दुसरा कोणी सांगितला नाहीं.

१९ न च स्मार्तमतद्धर्माभिलापात्[37] । २० शारीरश्चोभयेऽपि हि

धर्म सांगितले आहेत.

१९ (सांख्य-) स्मृतीमध्यें कल्पना केलेलें (प्रधान-) ही (अंतर्यामी) नव्हे. कारण त्या (प्रधाना-)चे जे धर्म नव्हेत ते येथें सांगितले आहेत.

२० शारीर आत्मा देखील (अंतर्यामी नव्हे). कारण दोन्ही (शाखेचे लोक) ह्या (अंतर्यामीहून) निराळा आहे असें (दाखविणारें वाक्य) पठन करितात. (५)

२१ अदृश्यत्व वगैरे धर्मांनीं युक्त (असा जो भूतयोनि म्हणून

परमात्मा होय). कारण त्याचे धर्म सांगितले आहेत.

२० (सांख्य[38]-) स्मृतीमध्यें कल्पना केलेलें (प्रधान) आणि शारीर आत्मा हे (अंतर्यामी) नव्हेत. कारण त्यां्चे जे धर्म नव्हेत ते येथें सांगितले आहेत.

२१ (शिवाय) दोन्ही (शाखेचे लोक) हा (शारीर आत्मा अंतर्यामीहून) निराळा आहे असें (दाखविणारें वाक्य) पठन करतात. (त्यावरूनही शारीर आत्मा अंतर्यामी नव्हे असें सिद्ध होतें). (४)

२२ अदृश्यत्व[39] वगैरे धर्मांनीं युक्त (असा जो सांगितला आहे

३७ ' लापाच्छारीरश्च । उभये ' (रा.)

३८ मागील टीप ३५ पहा.

३९ सत्व, रज आणि तम हे तीन गुण किंवा त्या गुणांची कार्यें हे प्रधानाचे धर्म होत, ते त्या श्रुतीमध्यें (बृ. ३।७।३) सांगितले नाहींत. आणि पृथ्वी हें ज्याचें शरीर आहे (बृ. ३।७।३) असे प्रधानाच्या विरुद्ध धर्म सांगितले आहेत.

४० त्रिगुणात्मकत्व वगैरे जे प्रधानाचे धर्म ते तेथें श्रुतीमध्यें (बृ. ३।७।३) सांगितले नाहींत.

४१ ' जें हें अदृश्य ' (मुं. १।१।५) या श्रुतीमध्यें प्रधानाचें वर्णन केलें आहे. आणि ' दिव्य अमूर्त ' (मुं. २।१।२) ह्या श्रुतीमध्यें पुरुषाचें वर्णन केलें आहे. तेव्हां एकंदर मुंडकोपनिषदामध्यें सांख्यांच्या मताप्रमाणें प्रधान आणि पुरुष यांचें वर्णन केलें आहे असें समजूं नये. कारण त्या श्रुतीमध्यें (मुं. १।१।९) सर्वज्ञत्व वगैरे

भेदेनैनमधीयते। २१ अदृश्यत्वादिगुणको धर्मोक्तेः।

सांगितले आहेत.	तले आहेत.
१९ (सांख्यें-) स्मृतीमध्यें कल्पना केलेलें (प्रधान) नव्हे. कारण त्या (प्रधाना-) चे धर्म सांगितले नाहींत आणि त्याच्या विरुद्ध धर्म सांगितले आहेत.	१९ (सांख्य-) स्मृतीमध्यें कल्पना केलेलें (प्रधान-) हीं (अंतर्यामी) नव्हे. कारण त्या (प्रधाना-) चे धर्म सांगितले नाहींत.
२० शारीर आत्मा देखील (अंतर्यामी नव्हे). कारण दोन्ही (शाखेचे लोक) हा (अंतर्यामीहून) निराळा आहे असें (दाखविणारें वाक्य) पठन करितात. (६)	२० शारीर आत्मा देखील (अंतर्यामी नव्हे). कारण दोन्ही (शाखेचे लोक) हा (अंतर्यामीहून) निराळा आहे असें (दाखविणारें वाक्य) पठन करितात. (९)
२१ अदृश्यत्व वगैरे धर्मांनीं युक्त (असा जो भूतयोनि म्हणून	२१ अदृश्यत्व वगैरे धर्मांनीं युक्त (असा जो सांगितला आहे

धर्म सांगितले आहेत. ते प्रधान आणि पुरुष यांना त्यांच्या मताप्रमाणें जुळत नाहींत. तात्पर्य, हें वर्णन परमात्म्याचेंच आहे असें समजावें.

४२ शंका—मुंडक उपनिषदामध्यें (१।१।६) ‘ भूतयोनि ’ शब्दानें प्रकृतीचें वर्णन केलें आहे. आणि तेथेंच पुढें (२।१।२) ‘ दिव्य अमूर्त पुरुष ’ असें पुरुषाचें वर्णन केलें आहे. तेव्हां सांख्यमताप्रमाणें हें प्रकृति आणि पुरुष यांचें वर्णन आहे असें समजतें. उत्तरः—हें सर्व परमात्म्याचेंच वर्णन आहे. कारण तेथें श्रुतीमध्यें ‘ जग उत्पन्न करणें वगैरे ’ परमात्म्याचे धर्म सांगितले आहेत.

४३ परमात्मा हा परविद्याविषय आहे म्ह. परविद्येच्या योगानें जाणला जातो. तेव्हां प्रकृतश्रुतीमध्यें (मुं. १।१।५-६-७) अदृश्यत्व वगैरे गुणांनीं युक्त असा परमात्माच होय. कारण परविद्याविषयत्व हा धर्म सांगितला आहे तो त्यालाच संभवतो. प्रकृति किंवा ब्रह्मदेव नव्हे. कारण त्यांना तो धर्म संभवत नाहीं.

२२ विशेषणभेदव्यपदेशाभ्यां च नेतरौ।

सांगितला आहे तो परमात्मा होय). कारण (त्याचे) धर्म सांगितले आहेत.	तो परमात्मा होय). कारण (त्याचे) धर्म सांगितले आहेत.
२२ (भूतयोनि म्हणजे परमात्म्याहून) निराळे (जीव आणि प्रधान हे) नव्हेत. कारण विशेषणें दिलीं आहेत. व भेद सांगितला आहे.	२३ (श्रुतीमध्यें) निराळे (म्ह० प्रधान आणि पुरुष हे सांगितले) नाहींत. कारण विशेष सांगितला आहे व भेद सांगितला आहे.
२३ रूप सांगितलें आहे म्हणूनही (भूतयोनि म्हणजे परमात्मा होय). (६)	२४ रूप सांगितलें आहे म्हणूनही (श्रुतीमध्यें परमात्माच सांगितला आहे असें समजतें). (५)
२४ वैश्वानर (म्हणजे परमात्मा) होय. कारण साधारण शब्दासंबंधानें एक विशेष सांगितला आहे.	२५ वैश्वानर (म्हणजे परमात्मा) होय. कारण (वैश्वानर हा) साधारण शब्द (परमात्म्याचे धर्म दाखविणाऱ्या शब्दांचा) विशेष्य आहे.

४४ प्रकृत श्रुतीमध्यें एकाच्या ज्ञानानें सर्वांचें ज्ञान होतें असा विशेष सांगितला आहे. आणि प्रधानाच्या किंवा पुरुषाच्या ज्ञानानें सर्वांचें ज्ञान होत नाहीं. तसेंच तेथें (मुं. २।१।२) ‘ अक्षराहून म्ह. प्रधानाहून पर जो पुरुष त्याहूनही परमात्मा पर आहे ’ असा प्रधान आणि पुरुष यांपेक्षां परमात्म्याचा भेद सांगितला आहे. तेव्हां यावरून ‘ हें परमात्म्याचेंच वर्णन आहे ’ असें सिद्ध होतें.

४५ अदृश्य वगैरे विशेषणें प्रकृतीला संभवत नाहींत. कारण सांख्यांच्या मतीं जग हा प्रकृतीचा परिणाम आहे. आणि तो तर दृश्य आहे. तसेंच दिव्य सर्वगत वगैरे विशेषणें पुरुषाला संभवत नाहींत. कारण त्यांच्या मतीं पुरुष तसा नाहीं. शिवाय ह्या प्रकरणाच्या आरंभीं, मध्यें आणि शेवटीं ‘ ही ब्रह्मविद्या आहे ’ असा व्यवहार केला आहे. तेव्हां हें वर्णन परमात्म्याचेंच आहे असें सिद्ध झालें.

४६ श्रुतीमध्यें (मुं. १।१।९) सर्वज्ञ असें विशेषण दिलें आहे. म्हणून अदृश्यत्व वगैरे धर्मांनें युक्त अशी प्रकृती घेतां येत नाहीं. तसेंच श्रुतीमध्यें (मुं. १।१।९) ‘त्यापासून ब्रह्मदेव उत्पन्न होतो ’ असा भेद सांगितला आहे. त्यामुळें ब्रह्मदेव घेतां येत नाहीं.

४७ ‘ रुग्मवर्ण म्हणजे सुवर्णाप्रमाणें पिंवळा, आणि ब्रह्मदेव वगैरे सर्व जग उत्पन्न करणारा अशा भूतयोनीला जेव्हां जीव पहातो ’ इत्यादि श्रुतीमध्यें (मुं. ३।१।३) रूप सांगितलें आहे.

२३ रूपोपन्यासाच्च । २४ वैश्वानरः साधारणशब्दविशेषात् ।

सांगितला आहे तो परमात्मा होय). कारण (त्याचे) धर्म सांगितले आहेत.

२२ (श्रुतीमध्यें[48]) निराळे (म्ह. प्रकृति आणि पुरुष सांगितले) नाहींत. कारण भिन्न भिन्न विशेषणें (दिलीं) आहेत. आणि व्यवहार केला आहे.

२३ रूप सांगितलें आहे म्हणूनही (श्रुतीमध्यें परमात्माच सांगितला आहे असें समजतें). (७)

२४ वैश्वानर (म्हणजे परमात्मा) होय. कारण साधारण शब्दापेक्षां विशेष सांगितला आहे.

तो परमात्मा होय). कारण (त्याचे) धर्म सांगितले आहेत.

२२ निराळे[46] (प्रकृति आणि ब्रह्मदेव हे अदृश्यत्व वगैरे धर्मांनीं युक्त म्हणून सांगितले) नाहींत. कारण विशेषण दिलें आहे व भेद सांगितला आहे.

२३ रूप[47] सांगितलें आहे त्यावरूनही (हेंच सिद्ध होतें). (६)

२४ वैश्वानर (म्हणजे परमात्मा) होय. कारण साधारणशब्दाला विशेषण दिलें आहे.

४८ ‘ सर्वांचा आत्मा ’ अशाप्रकारचीं विशेषणें वैश्वानराला दिलीं आहेत. शिवाय ‘ आमचा आत्मा कोणता, ब्रह्म कोणतें ? ’ (छां० ५-११) असा श्रुतीमध्यें उपक्रम केला असल्यामुळें पुढें जरी वैश्वानर हा साधारण शब्द दिला आहे तरी तो ब्रह्म या विशेष अर्थींच योजिला आहे असें समजतें.

४९ परमात्मा आणि ब्रह्मदेव या दोघांना श्रुतीमधील ब्रह्म आत्मा वगैरे शब्द जरी साधारण आहेत तरी ब्रह्मदेवाचे ठिकाणीं न संभवणारा आणि परमात्म्याचे ठिकाणीं संभवणारा असा विशेष श्रुतीमध्यें सांगितला आहे. ‘ प्रादेशएवढ्या (म्ह. टीचिएवढ्या) पुरुषाचें स्वर्ग हें मस्तक असणें ’ हा जो श्रुतीमध्यें धर्म सांगितला आहे तोच विशेष होय, हा धर्म विरुद्ध असल्यामुळें परमात्म्याशिवाय इतर ठिकाणीं कोठेंही संभवत नाहीं. परमात्म्याचे ठिकाणीं मात्र संभवतो. कारण जरी एखादा धर्म आपल्याला विरुद्ध भासला तरी परमात्म्याची अचिंत्य शक्ति असल्यामुळें त्याचे ठिकाणीं तो विरुद्ध होत नाहीं. तेव्हां वैश्वानर म्हणजे परमात्मा होय. विश्व म्हणजे जड आणि नर म्हणजे जीव हे आहेत वसतिस्थान ज्याचें, तो वैश्वानर म्हणजे परमात्मा. जड आणि जीव हे परमात्म्याचेच अंशभूत असल्यामुळें त्यांचे ठिकाणीं अंशरूपानें परमात्मा हा वास करतो असें समजावें.

५० वैश्वानर हा शब्द जरी साधारण आहे म्हणजे अग्नि आणि परमात्मा या दोन अर्थांचा वाचक आहे तरी श्रुतीमध्यें (छा० ५।११।२) वैश्वानराला आत्मा असें विशेषण दिलें असल्यामुळें वैश्वानरशब्दानें परमात्माच घेतला पाहिजे.

२५ स्मर्यमाणमनुमानं स्यादिति । २६ शब्दादिभ्योऽन्तः प्रतिष्ठानाच्च

२५ स्मृतीमध्यें सांगितलेलें रूप अनुमान आहे म्हणून—(हा वैश्वानर हा परमेश्वर होय).	२६ (अग्नि हें मस्तक आहे) इ-त्यादिप्रकारचें (परमात्म्याचें रूप येथें) ओळखतां येतें. (त्यावरून वैश्वानर हा पर-मात्मा आहे असें) अनुमान होतें.
२६ शब्द (भिन्नार्थक आहेत) वगैरे (कारणां-)वरून आणि अंतःस्थिति (सांगितली) आहे यावरून (वैश्वानर हा परमात्मा) नव्हे असें म्हण-शील तर तसें नाहीं. कारण तशा रीतीनें पहावें असें सां-	२७ शब्द (भिन्नार्थक आहेत) वगैरे (कारणां-)वरून आणि अंतःस्थिति (सांगितली) आहे यावरून (वैश्वानर हा परमात्मा) नव्हे असें म्हण-शील तर तसें नाहीं कारण तशा रीतीनें पहावें असें सां-

५१ ‘ अग्नि म्हणजे स्वर्गलोक हें मस्तक आहे ’ इत्यादिप्रकारचें जें श्रुतिस्मृती-मध्यें परमात्म्याचें रूप वर्णिलें आहे, तेंच रूप येथें श्रुतीमध्यें वैश्वानराचें वर्णिलें आहे अशी ओळख पटते. कारण दोन्ही ठिकाणचें वर्णन सारखेंच आहे.

५२ ‘ कांहीं लोक आपल्या हृदयामध्यें असणारा, प्रादेशाएवढा, शंख चक्र गदा पद्म धारण करणारा, अशा चतुर्भुज पुरुषाचें स्मरण करतात ’ या स्मृतीमध्यें सांगित-ल्याप्रमाणें उपासक लोक हे प्रादेशमात्र अशा परमात्म्याचें रूप स्मरण करतात असें समजतें. तेव्हां ज्या अर्थी परमात्म्याचें प्रादेशमात्र रूप आहे त्या अर्थी प्रकृत श्रुतीमध्यें वर्णिलेला जो प्रादेशमात्र वैश्वानर तो परमात्माच आहे असें अनुमानावरून सिद्ध होतें.

५३ ‘ मीं वैश्वानर होऊन प्राण्यांच्या देहांचा आश्रय केला आहे ’ असें भगवद्गीते-मध्यें (१५-१४) वैश्वानर हें परमात्म्याचें रूप आहे असें सांगितलें आहे. त्यावरून प्र-कृत श्रुतीमध्यें- वैश्वानर म्हणजे परमात्मा असें अनुमान होतें.

५४ ‘ नान्निति ’ (म० व०)

५५ ‘ षविधम ’ (शं० म०)

५६ ‘ तशा रीतीनें पहावें ’ म्हणजे ‘ जाठराग्नि हें परमात्म्याचें शरीर आहे अशा रीतीनें परमात्म्याला पहावें ’.

नेति चेन्न तथा दृष्ट्युपदेशादसंभवात्पुरुषमपि चैनमधीयते ।

२५ स्मर्यमाणम्[57] केलें जाणारें रूप अनुमान आहे म्हणून—(हा वैश्वानर हा परमात्मा होय).

२५ (मी[53] वैश्वानर) असें स्मरलें जाणारें (रूप वैश्वानर म्हणजे परमात्मा या गोष्टीचें) अनुमान करणारें आहे.

२६ शब्द वगैरेवरून[58] (आणि) अंतःस्थिति (सांगितली) आहे यावरून (वैश्वानर म्हणजे परमात्मा) नव्हे असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण तशा दृष्टीचा उपदेश केला आहे. (असें न मानावें तर

२६ शब्दें वगैरेवरून (आणि) अंतःस्थिति (सांगितली) आहे यावरून (वैश्वानर म्हणजे परमात्मा) नव्हे असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण तशा रीतीनें पहावें असें सांगितलें आहे. (असें न

५७ ‘ तो हा वैश्वानर अग्नि ’ (पृ. २३५ पं. १३ पहा) या श्रुतीमध्यें वैश्वानर हा शब्द अग्नीला लावलेला आहे यावरून.

५८ ‘ परमात्मा हा सर्वभोक्ता आहे ’ असें समजण्याकरतां ‘ परमात्म्याचे ठिकाणीं जाठराग्नीची दृष्टी ठेवावी ’ असा या श्रुतीमध्यें उपदेश केला आहे.

५९ शंका—हा वैश्वानर आहे (बृ. ५-९-१) ह्या श्रुतीमध्यें वैश्वानर हा शब्द अग्नीला लाविलेला आहे. तसेंच या श्रुतीमध्यें हा वैश्वानर अग्नि पुरुषाच्या आंत असून अन्नाचा पाक करतो अशी वैश्वानराची अंतःस्थिति सांगितली आहे. तेव्हां वैश्वानर म्हणजे परमात्मा नव्हे. उ:—अग्नि वगैरे नांवांनीं आणि अंतःस्थिति वगैरे धर्मांनीं परमात्म्याची उपासना या श्रुतीमध्यें सांगितली आहे. कारण सर्व नांवें आणि सर्व धर्म परमात्म्याचे आहेत. अशा दृष्टीनें परमात्म्याची उपासना महोपनिषदामध्यें सांगितली आहे. शिवाय ‘ आमचा आत्मा कोणता ब्रम्ह कोणतें ’ (छा. ५।११।१) ह्या उपक्रमावरून वैश्वानर म्हणजे परमात्मा असें समजतें. कारण आत्मत्व, ब्रम्हत्व हे धर्म परमात्म्याशिवाय दुसरीकडे संभवत नाहींत. शिवाय ‘ मस्तकापासून द्युलोक उत्पन्न झाला ‘ चक्षूपासून सूर्य उत्पन्न झाला ’ अशा रीतीनें पुरुषसूक्तामध्यें जो परम पुरुष परमात्मा वर्णिला आहे, त्यासारखाच येथें वैश्वानर वर्णिला आहे. कारण येथें ‘ द्युलोक हा वैश्वानराचें मस्तक आहे, सूर्य हा चक्षु आहे ’ असें (छां. ५।१८।२) सांगितलें आहे. तेव्हां यावरून वैश्वानर म्हणजे परमात्मा असें सिद्ध होतें.

२७ अत एव न देवता भूतं च ।

२८ साक्षादप्यविरोधं जैमिनिः ।

गितलें आहे. (असें न मानावें तर सांगितलेले धर्म) संभवत नाहींत. आणि हा (वैश्वानर) पुरुष आहे असेंही (कांहीं लोक) पठन करतात.

२७ म्हणूनच (वैश्वानर म्हणजे भूताग्नीचा अभिमान बाळगणारी) देवता नव्हे आणि भूताग्नीही नव्हे.

२८ साक्षात् (परमेश्वरच येथें उपास्य म्हणून सांगितला आहे) असें जरी मानलें तरी विरोध नाहीं असें जैमिनि म्हणतो.

२९ व्यक्तीमुळें (तो प्रादेशाएवढा आहे असें म्हटलें आहे) असें आश्मरथ्य म्हणतो.

गितलें आहे. (असें न मानावें तर सांगितलेले धर्म) संभवत नाहींत. आणि हा(वैश्वानर) पुरुष आहे असेंही (कांहीं लोक) पठन करितात.

२८ म्हणूनच (वैश्वानर म्हणजे भूताग्नीचा अभिमान बाळगणारी) देवता नव्हे आणि भूताग्नीही नव्हे.

२९ (अग्नि[६०]शब्द) देखील (परमेश्वराचें) साक्षात् (प्रतिपादन करतो असें मानलें तरी) विरोध नाहीं असें जैमिनि म्हणतो.

३० अभि[६१]व्यक्तीस्तव (त्याला प्रादेशमात्र असें म्हटलें आहे) असें आश्मरथ्य म्हणतो.

६० ‘ अग्निशब्दाचा जाठराग्नि हा अर्थ घेऊन त्या जाठराग्निरूपी शरीरानें युक्त अशा परमात्म्याची उपासना करावी’ असें श्रुतीचें तात्पर्य पूर्वी सांगितलें. परंतु जैमिनीचें म्हणणें असें आहे कीं वैश्वानरशब्दाप्रमाणें अग्निशब्दाचा देखील साक्षातच परमेश्वर हा अर्थ घेतला म्हणजे कांहींच विरोध येत नाहीं. अग्निशब्दाचा परमात्मा हा अर्थ कसा होतो तें मागें (पृ. २४० पं. १५ पहा).

६१. परमात्मा हा प्रादेशाएवढा आहे असें जें सांगितलें आहे, तेथें परमात्म्याचें परिमाण स्वाभाविक आहे कीं नाहीं हा विचार ह्या अधिकरणामध्यें केला आहे. परमात्मा हा आकाशासारखा व्यापक आहे, त्याला आकार आहे. त्याच्या स्वभावतःच अनेक मूर्ती आहेत. तेव्हां त्याला साक्षातच प्रादेशाएवढा असें म्हणतां येतें असें जैमिनीचें मत आहे.

६२ शंकाः—अग्नि वगैरे शब्द परमात्म्याचे जर वाचक आहेत तर त्यांचा जो लोक इतर अर्थी उपयोग करतात हें विरुद्ध आहे. उः—अज्ञानी लोक शब्दांचा खरा अर्थ न समजल्यामुळें तसा उपयोग करतात, आणि अज्ञानी लोकाशीं व्यवहार करण्याकरतां ज्ञानी लोक तसा उपयोग करतात. तेव्हां कांहीं विरोध येत नाहीं असें जैमिनीनें सांगितलें आहे.

२९ अभिव्यक्तेरित्याश्मरथ्यः ।

सांगितलेले धर्म) संभवत नाहींत. आणि हा (वैश्वानर) पुरुष आहे असेंही (कांहीं लोक) पठन करतात.

२७ म्हणूनच (वैश्वानर म्हणजे भूताग्नीचा अभिमान बाळगणारी) देवता नव्हे आणि भूताग्नीही नव्हे. (८)

२८ ([६३]परमात्मा हा) साक्षातच (प्रादेशाएवढा आहे असें मानलें) तरी विरोध नाहीं असें जैमिनि म्हणतो.

२९ [६४]व्यक्तीमुळें (तो प्रादेशाएवढा आहे असें म्हटलें आहे) असें आश्मरथ्य म्हणतो.

मानावें तर सांगितलेले धर्म) संभवत नाहींत. आणि हा (वैश्वानर) पुरुषासारखा आहे असें पठन करितात.

२७ म्हणूनच (वैश्वानर म्हणजे भूताग्नीचा अभिमान बाळगणारी) देवता नव्हे आणि भूताग्नीही नव्हे.

२८ (जरी [६५]अग्नि वगैरे शब्द) साक्षात् (परमात्म्याचे वाचक आहेत) तरी विरोध नाहीं असें जैमिनि म्हणतो.

२९ अभि[६४]व्यक्तीस्तव (विरोध नाहीं) असें आश्मरथ्य म्हणतो.

---

६३ शंकाः—वैश्वानरशब्दानें परमात्मा घेतां येत नाहीं. कारण श्रुतीमध्यें वैश्वानराला प्रादेशमात्र असें म्हटलें आहे. प्रदेशासंबंधानें ज्याला मात्रा म्ह. इयत्ता लागते तो प्रादेशमात्र होय. येथें स्वर्गापासून पृथिवीपर्यंत प्रदेशावर वैश्वानराच्या मस्तक वगैरे अवयवांची कल्पना केला आहे. तेव्हां वैश्वानर हा त्या प्रदेशाएवढा आहे अशी त्याची येथें इयत्ता समजते. आणि परमात्म्याला तर इयत्ता मुळींच नाहीं. उः—उपासकांना परमात्म्याची अभिव्यक्ति म्ह. सुलभरीतीनें ज्ञान व्हावें या हेतूनें परमात्म्याला ती इयत्ता लाविली आहे. वास्तविकच ती इयत्ता त्याची आहे असें मात्र समजूं नये.

६४ परमात्मा हा वास्तविक निराकारच आहे. परंतु ज्याठिकाणची माया नष्ट होते त्या ठिकाणीं कृष्ण वगैरे रुपानें साकार असल्यासारखा भासतो म्ह. व्यक्त होतो म्हणून त्याला प्रादेशाएवढा असें म्हटलें आहे असें आश्मरथ्याचें मत आहे.

६५ शंकाः—श्रुतीमध्यें अग्नि वगैरे शब्दांचा इतर अर्थी उपयोग कसा केला? उः—अग्निसूक्त वगैरेंच्या योगानें परमात्म्याची उपासना केली असतां परमात्मा हा अग्नि वगैरेंच्या ठिकाणीं अभिव्यक्त होतो म्हणून अग्नि वगैरे सूक्तामध्यें अग्नि वगैरे शब्दांचा इतर अर्थी उपयोग केला आहे. तेव्हां तो विरोध येत नाहीं असें आश्मरथ्यानें सांगितलें आहे.

३० अनुस्मृतेर्बादरिः । ३१ संपत्तेरिति जैमिनिस्तथा हि दर्शयति ।

३० ध्यानामुळें (तो प्रादेशाएवढा आहे असें) बादरि म्हणतो.

३१ भावनेमुळें (तो प्रादेशा एवढा आहे असें म्हटलें आहे) असें जैमिनि म्हणतो. कारण (इतर ठिकाणीं) श्रुति तसेंच सांगते.

३२ आणि हा (परमेश्वर) ह्या (मस्तक आणि हनवटी यांच्या मधल्या जागे-)मध्यें (राहतो असें जाबालशाखेचे लोक) पठन करतात. (७)

३१ [66]उपासनेस्तव (त्याला प्रादेशमात्र म्हटलें आहे असें) बादरि म्हणतो.

३२ ([68]प्राणाहुति हें अग्निहोत्र आहे हें) सिद्ध करण्याकरतां (ऊर वगैरेंच्या ठिकाणीं वेदि वगैरेंची कल्पना केली आहे) असें जैमिनि म्हणतो. कारण श्रुति तसेंच सांगते.

३३ आणि (स्वर्ग वगैरे हे ज्याचे मस्तक वगैरे अवयव आहेत असा वैश्वानर परमात्मा) हा (प्राणाग्निहोत्राच्या द्वारानें आपली उपासना करतां यावी म्हणून) ह्या (उपासकाच्या शरीरा-)मध्यें (राहतो असें) सांगतात.[72] (६)

६६ पुरुषाच्या अवयवासारखे जे परमात्म्याला अवयव कल्पिले आहेत ते उपासनेकरतां होत असें बादरि म्हणतो. कारण अशी उपासना केली म्हणजे उपासकाला ब्रम्हानंदाचा अनुभव येतो असें ह्या उपासनेचें फल श्रुतीमध्यें पुढें सांगितलें आहे.

६७ परमात्मा हा वास्तविक निराकारच आहे. परंतु जो उपासक ज्या रूपानें परमात्म्याचें ध्यान करतो त्याला त्या रुपानें तो व्यक्त होतो म्हणून त्याला प्रादेशाएवढा असें म्हटलें आहे, असें बादरीचें मत आहे.

६८ उपासक लोक अग्नियुक्त वगैरेंच्या योगानें अग्नि वगैरेंच्या ठिकाणीं परमात्म्याचें ध्यान करतात, म्हणून श्रुतीमध्यें अग्नि वगैरे शब्दांचा इतर अर्थी उपयोग केला आहे, असें बादरीनें सांगितलें आहे.

६९ 'वैश्वानरशब्दानें जाठराग्नि न घेतां जर परमेश्वर घेतला तर श्रुतीमध्यें ऊर वगैरेंच्या ठिकाणीं वेदि वगैरेंची कल्पना करण्याचें कारण नाहीं' अशी जो शंका येते तिचें हें उत्तर दिलें आहे. हा जो वैश्वानर परमात्मा त्याच्या उपासकांनीं केलेल्या प्राणाग्निहोत्राची श्रुतीमध्यें (छां० ५।२४।१) विशेष प्रशंसा केली आहे.

७० 'परमात्म्याला आकार आहे' असें जैमिनीचें मत पूर्वी सांगितल आहे. परंतु परमात्मा नियमानें प्रादेशाएवढाच आहे असें मात्र समजूं नये. कारण त्याचीं अनेक रूपें

३२ आमनन्ति चैनमस्मिन् ॥ प्रथमेध्याये द्वितीयः पादः ॥

३० ध्यानामुळें[६७] (तो प्रादेशाएवढा आहे असें म्हटलें आहे असें) बादरि म्हणतो.

३१ भावनेमुळें[६८] (तो प्रादेशाएवढा आहे असें म्हटलें आहे) असें जैमिनि म्हणतो. कारण श्रुति तसें सांगते.

३२ आणि हा (परमेश्वर) ह्या (मस्तक आणि हनवटी यांच्या मधल्या जागे—) मध्यें (राहतो असें जाबाल शाखेचे लोक) पठन करितात[७३]. (९)

३० ध्यानामुळें[७०] (विरोध नाहीं असें) बादरि म्हणतो.

३१ प्राप्ति[७१] होते म्हणून (विरोध नाहीं) असें जैमिनि म्हणतो. कारण श्रुति तसेंच सांगते.

३२ आणि हें[७४] (परमात्मा) ह्या (अग्नि वगैरे—) मध्यें (राहतो असें) सांगतात. (७)

आहेत. तो भावनेमुळें प्रादेशाएवढा होतो असें समजावें. ह्याकरतांच सूत्रकारांनीं फिरून जैमिनीच्या मताचा उपन्यास केला आहे.

७१ अग्नि वगैरेंच्या ठिकाणीं परमात्म्याची उपासना केली असतां अग्नि वगैरेंचीच प्राप्ति होते. कारण 'या परमात्म्याची लोक जशी उपासना करतात तसेच ते प्राप्त होतात' असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे. म्हणून श्रुतीनें देखील लोकाप्रमाणें अग्नि वगैरे शब्द इतर अर्थी योजिले आहेत असें जैमिनीनें सांगितलें आहे.

७२ छांदोग्य श्रुतीमध्यें (५।१८) असें सांगितलें आहे.

७३ तात्पर्य:—परमात्मा हा प्रादेशाएवढ्या रूपानेंच सर्वव्यापक आहे असें समजावें. हेंच सूत्रकारांचें मत आहे.

७४ शंका:—परमात्म्याची उपासना केली असतां अग्नीची प्राप्ति कशी होते. उ. अग्नि वगैरेंच्या ठिकाणीं त्यांचें नियमन करण्याकरतां परमात्मा राहतो असें श्रुतीमध्यें (बृ॰ ३।७।५) सांगितलें आहे. तेव्हां अशा रीतीनें परमात्म्याचा अग्नि वगैरेंशीं संबंध असल्यामुळें अग्नि वगैरेंच्या ठिकाणीं परमात्म्याची उपासना केली असतां अग्नि वगैरेंची प्राप्ति होते, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

१ द्युभ्वाद्यायतनं स्वशब्दात् । २ मुक्तोपसृप्यव्यपदेशात् ।

अध्याय १ पाद ३.

१ स्वर्गपृथिव्यादिकांचा जो आधार तो (ब्रह्म होय). कारण स्वशब्द आहे.

२ (स्वर्ग पृथिव्यादिकांचा आधार ब्रह्म होय). कारण तो मुक्तोपसृप्य आहे असें सांगितलें आहे.

३ (स्वर्गपृथिव्यादिकांचा जो आधार तो) अनुमानानें सिद्ध केलेलें (प्रधान) नव्हे. कारण अतच्छब्द आहे.

१ स्वर्गपृथिव्यादिकांचा जो आधार तो (ब्रह्म होय). कारण स्वशब्द आहे.

२ (स्वर्गपृथिव्यादिकांचा आधार ब्रह्म होय). कारण तो मुक्तोपसृप्य आहे असें सांगितलें आहे.

३ (स्वर्गपृथिव्यादिकांचा जो आधार तो ज्याप्रमाणें) अतच्छब्द आहे म्हणून अनुमानानें सिद्ध केलेलें (प्रधान) नव्हे, (त्याप्रमाणें) प्राण धारण करणारा (जीवात्मा) देखील नव्हे.

१ स्वतःचा म्ह. ब्रह्माचा प्रतिपादक जो शब्द तो स्वशब्द होय. ' अमृताचा सेतु ' ' आत्मा ' हे येथें स्वशब्द होत.

२ शंकाः–स्वर्ग पृथ्वी वगैरेंचा जो आधार तो ब्रह्म नव्हे. कारण ब्रह्माला स्वर्ग पृथ्वी वगैरेंचा मोठा भार सहन होणार नाहीं. उ.:–ब्रह्म हें स्वर्ग पृथ्वी वगैरेंचा आत्मा असल्यामुळें त्याला त्यांचा भार होत नाहीं. हें दाखविण्याकरितां श्रुतीमध्यें (मुं. २।२।५।) आत्मशब्द घातला आहे. सूत्रांतील ' स्वशब्द ' याचा ' आत्मशब्द ' असा अर्थ आहे.

३ स्वशब्द म्ह. आत्मशब्द होय. ' आत्मा ब्रम्ह वगैरे शब्द विष्णूशिवाय बाकीच्या कोणालाही संभवत नाहींत ' असें ब्रह्मवैवर्तांमध्यें सांगितलें आहे.

४ ' शाच ' (र.)

३ नानुमानमतच्छब्दात् ।

अध्याय १ पाद ३.

१ स्वर्गपृथिव्यादिकांचा जो आधार तो (ब्रह्म होय). कारण स्वशब्द आहे.	१ स्वर्गपृथिव्यादिकांचा जो आधार तो (विष्णूच होय). कारण स्वशब्द आहे.
२ (ब्रह्म हें) मुक्तोपसृप्य आहे असें सांगितलें असल्यामुळें (' अन्यवस्तूसंबंधानें भाषण करूं नका ' असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे).	२ (स्वर्गपृथिव्यादिकांचा आधार विष्णूच होय.) कारण तो मुक्तोपसृप्य आहे असें सांगितलें आहे.
३ (स्वर्गपृथिव्यादिकांचा जो आधार तो) अनुमानानें सिद्ध केलेलें (प्रधान) नव्हे. कारण अतच्छब्द आहे.	३ (स्वर्गपृथिव्यादिकांचा जो आधार तो) अनुमानानें सिद्ध केलेला (रुद्र) नव्हे. कारण अतच्छब्द आहे.

५ शं:—जर ती श्रुती ब्रह्मप्रतिपादक आहे तर त्या श्रुतीमध्यें (मुं.२।२।५) ' अन्य वस्तूसंबंधानें भाषण करूं नका ' असें कां सांगितलें आहे ? उ.:—तसें सांगितल्यामुळें जीवन्मुक्त हे शरीर वगैरे विकारासंबंधानें भाषण करीत नाहींत, म्ह. त्यावरील आपलेपणाचा संबंध सोडतात. आणि तो संबंध सुटला म्हणजे त्या जीवन्मुक्तांना तो परमात्मा उपसृप्य म्ह. प्राप्य होतो. तात्पर्य तें सांगणें विरुद्ध होत नाहीं.

६ ' नानुमानमतच्छब्दात्प्राणभृच्च ' दोन सूत्रांचें असें एकच सूत्र रामानुजाचार्यांच्या पाठामध्यें आहे.

७ ज्यांचें प्रामाण्य अनुमानावरून सिद्ध होत आहे अशा पाशुपत वगैरे आगमामध्यें सांगितलेला रुद्र नव्हे. कारण भस्म धारण करणारा उग्रस्वरुपाचा असे त्या रुद्राचे प्रतिपादक शब्द येथें नाहींत.

४ प्राणभृच्च । ५ भेदव्यपदेशात् ।

४ प्राण धारण करणारा (जीवात्मा) देखील (स्वर्गपृथिव्यादिकांचा आधार नव्हे).	
५ भेद दाखविला आहे म्हणून (जीवात्मा हा स्वर्गपृथिव्यादिकांचा आधार नव्हे).	४ भेद दाखविला आहे म्हणून (जीवात्मा हा स्वर्गपृथिव्यादिकांचा आधार नव्हे).
६ प्रकरणावरून (जीवात्मा हा स्वर्गपृथिव्यादिकांचा आधार नव्हे).	५ प्रकरणावरून (जीवात्मा हा स्वर्गपृथिव्यादिकांचा आधार नव्हे).
७ स्थिति आणि भक्षण या (दोन	६ स्थिति आणि भक्षण या

८ कारण श्रुतीमध्यें आनंद, अमृत असे शब्द आहेत. ते सांख्यांच्या मताप्रमाणें जीवाला संभवत नाहींत. तेव्हां त्यांचें मत येथें श्रुतीला विवक्षित आहे असें म्हणतां येत नाहीं.

९ यावरून म्ह. पूर्वीच्या तीन सूत्रामध्यें सांगितलेल्या कारणांवरून.

१०. 'जीवात्मा हा शोकरहित होऊन ह्याचें माहात्म्य पाहतो' अशा रीतीनें श्रुतीमध्यें (मुं. ३।१।२।) जीवापेक्षां ह्या परमात्याचा भेद दाखविला आहे.

११ शं.:—'जीवात्मा हा स्वर्गपृथ्व्यादिकांचा आधार आहे' असें म्हणतां येतें. कारण जीवात्मा आणि परमात्मा यांचें ऐक्य असल्यामुळें पूर्वीच्या तीन सूत्रांत दिलेलीं कारणें जीवाला संभवतात. उ.:—जीवात्मा आणि परमात्मा यांचें ऐक्य नाहीं. कारण जीवात्मा हा शोकरहित होऊन ह्याचें माहात्म्य पहातो अशा रीतीनें श्रुतीमध्यें (मुं. ३।१।२।) जीवात्म्याचा परमात्म्यापेक्षां भेद दाखविला आहे. श्रुतीमधील 'ह्याचें' या शब्दाचा 'परमात्म्याचें' असा अर्थ आहे. कारण मागून परमात्म्याचेंच प्रकरण चालू झालें आहे. तेव्हां श्रुतीमध्यें 'दुसऱ्या कोणापेक्षां तरी जीवाचा भेद सांगितला असेल' असें समजूं नये.

१२ 'हें परमात्म्याचें प्रकरण आहे' हें मागेंच (अ. १ पा. २ सू. २२) सिद्ध झालें आहे. तरी 'नाडीसंबन्ध वगैरे जीवाचीं चिन्हें मध्यें दृष्टीस पडत असल्यामुळें तें प्रकरण मध्येंच संपलें कीं काय' अशी शंका येते ती न यावी म्हणून हें सूत्र केलें आहे.

६ प्रकरणात् । ७ स्थित्यदनाभ्यां च ।

४ प्राण धारण करणारा (जीवात्मा) देखील (स्वर्गपृथिव्यादिकांचा आधार नव्हे).

५ भेद दाखविला आहे म्हणून (जीवात्मा हा स्वर्गपृथिव्यादिकांचा आधार नव्हे).

६ प्रकरणां[१३]वरून (स्वर्गपृथिव्यादिकांचा आधार ब्रह्मच होय).

७ स्थि[१६]ति आणि भक्षण हे सां-

४ (यावरून) प्राण धारण करणारा (जो जीव किंवा वायु तो) देखील (स्वर्गपृथिव्यादिकांचा आधार नव्हे).

५ (जीवात्म्या[१३]संबंधानें आत्मा वगैरे शब्द संभवत नाहींत.) कारण भेद दाखविला आहे.

६ प्रकरणां[१४]वरून (जीवात्म्याचा हा भेद परमात्म्यापेक्षाच दाखविला आहे असें समजतें).

७ स्थि[१५]ति आणि भक्षण यावरू-

१३ ह्या मुंडकोपनिषदामध्यें आरंभीं (मुं. १।१।१) ‘ त्यानें ब्रह्मविद्या सांगितली ’ असें म्हटलें आहे. आणि शेवटीं (मुं. ३।२।१०) ‘ त्यांनांच ही ब्रम्हविद्या सांगावी ’ असें म्हटलें आहे. तेव्हां ‘ हें ब्रह्माचेंच प्रकरण चालूं आहे ’ असें सिद्ध होतें.

१४ मागील टीप ११ पहा.

१५ श्रुतीमध्यें (मुं. ३।१।१) ‘ परमात्मा हा कर्मफळाचा उपभोग घेत नाहीं तो नेहमीं प्रकाशित असतो, तो सर्वज्ञ आहे ’ अशी परमात्म्याची स्थिति वर्णिली आहे. त्यावरून ‘ परमात्मा हा स्वर्गपृथ्व्यादिकांचा आधार असण्याला योग्य आहे ’ असें, समजतें. तसेंच तेथें ‘ जीवात्मा हा कर्मफळाचा उपभोग घेतो, तो शोक करतो ’ असें वर्णिलें आहे. त्यावरून ‘ जीवात्मा हा स्वर्गपृथ्व्यादिकांचा आधार असण्याला योग्य नाहीं ’ असें समजतें.

१६ ह्या मुंडकोपनिषदामध्यें ‘ दोन पक्षी ’ (मुं. ३।१।१) या ऋचेमध्यें जीवात्मा आणि परमात्मा यांचें स्पष्टच वर्णन केलें आहे. आणि तें वर्णन सांख्यमताला मुळींच जुळत नाहीं. एकंदरीत ‘स्वर्गपृथ्व्यादिकांचा आधार ब्रह्मच होय’ असें सिद्ध झालें.

१७ ‘ दोन पक्षी ’ (मुं. ३।१।१) या श्रुतीमध्यें परमात्म्याची केवल स्थिति आणि जीवाचें भक्षण म्ह. कर्मफलोपभोग हे सांगितले असल्यामुळें ह्या दोहोंमधील भेद सिद्ध होतो.

८ भूमा संप्रसादादध्युपदेशात् ।

कारणां)—वरूनही (जीवात्मा हा स्वर्गपृथिव्यादिकांचा आधार नव्हे). (१)	(दोन कारणां—) वरूनही (जीवात्मा हा स्वर्गपृथिव्यादिकांचा आधार नव्हे). (१)
८ भूमा हा (परमात्मा होय). कारण संप्रसादानंतर तो सांगितला आहे.	७ भूमा हा (परमात्मा होय). कारण (तो) संप्रसादापेक्षां मोठा असा सांगितला आहे.
९ धर्म जुळतात म्हणूनही (भूमा हा परमात्मा होय). (२)	८ धर्म जुळतात म्हणूनही (भूमा हा परमात्मा होय). (२)
१० अक्षर म्हणजे (परमात्मा होय). कारण तें आकाशापर्यंत (सर्व वस्तूं-) चें धारण करतें.	९ अक्षर म्हणजे (परमात्मा होय). कारण तें आकाशाच्या अंताचें धारण करतें.

१८ संप्रसाद म्ह. जीवात्मा होय. त्याचा मोठेपणा 'प्राण हा मोठा आहे' (छां. ७।१५।१) या श्रुतीमध्यें सांगितला आहे. ह्या श्रुतीमध्यें 'प्राण' शब्दाचा 'प्राणानें युक्त जीवात्मा' असा अर्थ आहे. कारण नुसत्या प्राणाला मोठेपणा संभवत नाहीं. पुढें श्रुतीमध्यें सत्यशब्दानें परमात्म्याचा निर्देश करून पूर्वीच्या जीवापेक्षांही त्या परमात्म्याचा मोठेपणा सांगितला आहे. तेव्हां परमात्मा हा जीवापेक्षां मोठा असल्यामुळें आणि 'सत्य' शब्दानें निर्दिष्ट केलेल्या परमात्म्याचाच मोठेपणा 'भूमा' शब्दानें वर्णिला असल्यामुळें भूमा हा परमात्माच होय जीवात्मा नव्हे असें सिद्ध झालें.

१९ संप्रसाद म्हणजे सुषुप्ति. तद्रूपी जें सुखाचें आधिक्य त्याला श्रुतीमध्यें 'भूमा' असें म्हटलें नाहीं. तर तें परमात्म्यालाच म्हटलें आहे. कारण 'तोच खालीं आहे' (छां. ७।२५।१) इत्यादि श्रुतीमध्यें जे भूम्याचे सर्वव्यापित्व वगैरे गुण सांगितले आहेत त्या गुणांनीं परमात्मा हा संप्रसादापेक्षां म्हणजे सुषुप्तीपेक्षां अधिक आहे.

२० भूमा हा परमात्माच होय, प्राणवायु नव्हे. कारण 'भूमा हा संप्रसाद आहे म्ह. पूर्णसुखस्वरूप आहे' असें श्रुतीमध्यें (छां. ७।२३।१ सांगितलें आहे. आणि श्रुतीमध्यें (छां. ७) नाम वगैरे सर्वांच्या पुढें 'सर्वापेक्षां उत्तम' अशा रूपानें भूम्याचें वर्णन केलें आहे. प्राणवायु हा पूर्णसुखस्वरूप नाहीं, आणि सर्वापेक्षां उत्तमही नाहीं.

२१ श्रुतीमध्यें जे भूम्याचे अमृतत्व सर्वात्मकत्व वगैरे धर्म सांगितले आहेत त

९ धर्मोपपत्तेश्च । १० अक्षरमम्बरान्तधृतेः ।

गितले असल्यावरून (श्रुतीमध्यें सांख्यमताप्रमाणें वर्णन केलें नाहीं असें समजतें). (१)	नही (जीवात्मा आणि परमात्मा यांमधील भेद सिद्ध होतो). (१)
८ भूमा[२१] हा (परमात्मा होय). कारण तो संप्रसादापेक्षां अधिक असा सांगितला आहे.	८ भूमा[२१] हा (परमात्मा होय). कारण संप्रसाद आहे (आणि तो भूमा सर्वांपेक्षां) अधिक असें सांगितलें आहे.
९ धर्म[२२,२३] जुळतात म्हणूनही (भूमा हा परमात्मा होय). (२)	९ धर्म[२२,२३] जुळतात म्हणूनही (भूमा हा परमात्मा होय).(२)
१० अक्षर[२४,२५] म्हणजे (परमात्मा होय). कारण तें आकाशापर्यंत (सर्व वस्तूं-) चें धारण करतें.	१० अक्षर[२६] म्हणजे (परमात्मा होय). कारण तें आकाशापर्यंत (सर्व वस्तूं-) चें धारण करतें.

परमात्म्याचे ठिकाणींच जुळतात. कारण परमात्मा हाच खरा अमृत आहे. आणि तो जीवात्म्याचाही आत्मा आहे.

२२ ‘ इतर कांही न पहाणें ’ हे जे श्रुतीमध्यें भूम्याचे धर्म सांगितले आहेत ते परमात्म्याचे ठिकाणीं जुळतात. तसेंच पुढें श्रुतीमध्यें (छां. ७।२५।२) भूम्याच्या ज्ञानापीं जीं स्वाराज्य कामचार वगैरे फळें सांगितलीं आहेत तीं ब्रह्मवेत्त्यालाच संभवतात. तेव्हां ‘ भूमा हा परमात्माच होय ’ असें सिद्ध झालें.

२३ ‘ तोच खालीं आहे ’ (छां. ७।२५।१) इत्यादि श्रुतीमध्यें जे भूम्याचे सर्वव्यापित्व वगैरे धर्म सांगितले आहेत ते परमात्म्याचे ठिकाणींच जुळतात. प्राणवायूचे ठिकाणीं जुळत नाहींत.

२४ अव्याकृत जें भूतसूक्ष्म तें आकाशाचें अंत आहे म्ह॰ पलीकडचें आहे. आतां ‘ ह्या अक्षरामध्यें आकाश (म्ह. अव्याकृत) ओतप्रोत भरलें आहे ’ (बृ. ३।८।११) ह्या श्रुतीमध्यें ज्याअर्थीं अक्षर हें त्या अव्याकृताचें धारण करतें असें सांगितलें आहे त्या अर्थी अक्षरशब्दानें परमात्माच घेतला पाहिजे प्रधान किंवा जीवात्मा घेतां येत नाहीं.

२५ ‘अक्षरशब्दानें सूक्ष्म भूतें किंवा प्रकृति घेऊं नये’ असें या सूत्राचें तात्पर्य आहे.

२६ ‘ अक्षरशब्दानें चेतन प्रकृति घेऊं नये ’ असें या सूत्राचें तात्पर्य आहे.

११ सा च प्रशासनात् ।	१२ अन्यभावव्यावृत्तेश्च ।
११ तें (धारण) तर आज्ञा (सांगितली असल्या-) वरून (परमात्म्याचेंच कर्म होय).	१० तें (धारण) तर (ह्या परमात्म्याच्या) उत्कृष्ट शासनामुळें-(च होतें).
१२ अन्यभावव्यावृत्ति केली आहे म्हणूनही (अक्षर म्हणजे परमात्मा होय). (३)	११ अन्यभावव्यावृत्ति केली आहे म्हणूनही (अक्षर म्हणजे परमात्मा होय). (३)
१३ ईक्षण-(क्रिये-)चें कर्म या रूपानें (परमपुरुषाचा) निर्देश केला असल्यामुळें तो (परम पुरुष परमात्मा होय). (४)	१२ तो (परमात्माच) ईक्षण-(क्रिये-) चें कर्म होय[31]. कारण (तसा) निर्देश केला आहे. (४)
१४ पुढील (कारणां-) वरून द-	१३ पुढील[33] (कारणां-) वरून

२७ ‘अक्षराच्या आज्ञेनेंच सूर्य चंद्र वगैरे धारण केले जातात’ असें श्रुतीमध्यें (बृ. ३।८।९) सांगितलें आहे. आतां ज्या अर्थी नुसत्या आज्ञेनें सूर्य चंद्र वगैरे वस्तू धारण करण्याचें सामर्थ्य परमात्म्याशिवाय इतर ठिकाणीं नाहीं त्या अर्थी अक्षरशब्दानें परमात्माच घेतला पाहिजे असें सिद्ध झालें.

२८ अक्षराचा जो अन्यभाव म्ह. परमात्म्यापेक्षां निराळेपणा त्याची श्रुतीमध्यें (पृ. २७२ पं. ५ प्रहा.) व्यावृत्ति केली आहे.

२९ शं:—अक्षर म्ह. भूतसूक्ष्म वगैरे. त्यांच्या ठिकाणीं ‘सर्व वस्तूंचें धारण करणें’ ह्या परमात्म्याच्या धर्माची भावना करून ह्या भूतसूक्ष्म वगैरेंची उपासना करावी असें प्रकृत श्रुतीचें तात्पर्य आहे. उ.—परमात्म्याहून अन्याचा म्हणजे सूक्ष्मभूत वगैरेंचा जो भाव म्हणजे धर्म त्याची ह्या प्रकृत श्रुतीमध्यें व्यावृत्ति केली आहे म्हणजे तसला धर्म सांगितला नाहीं. जर तसला एखादा धर्म सांगितला असता तर श्रुतीचें उपासना करण्याविषयीं तात्पर्य मानलें असतें.

३० परमात्म्याहून अन्य वस्तूंचे जे भाव म्हणजे स्थूलत्व वगैरे धर्म त्यांची ‘अक्षर हें स्थूल नाहीं, अणु नाहीं’ (बृ. ३।८।७।८) या श्रुतीमध्यें अक्षराचे ठिकाणीं व्यावृत्ति म्हणजे निषेध केला आहे.

१३ ईक्षतिकर्मव्यपदेशात्सः ।	१४ दहर उत्तरेभ्यः ।
११ तें (धारण) तर आज्ञा (सांगितली असल्या-) वरून (परमात्म्याचाच धर्म होय).	११ आणि तें (धारण केवळ) आज्ञेच्यायोगानें (होतें असें सांगितलें आहे).
१२ अन्य[३०]भावव्यावृत्ति केली आहे म्हणूनही (अक्षर म्हणजे परमात्मा होय). (३)	१२ [३]अन्यभावव्यावृत्ति केली आहे म्हणूनही (अक्षर म्हणजे परमात्मा होय). (३)
१३ ईक्षण (क्रिये-) चें कर्म या रूपानें (परमपुरुषाचा) निर्देश केला असल्यामुळें तो (पुरुष परमात्मा होय). (४)	१३ (सत्[३२] म्हणजे) तो (परमात्माच होय). कारण ईक्षणक्रियेचा निर्देश केला आहे. (४)
१४ पुढीलें[३४] (कारणां-) वरून	१४ पुढीलें[३५] (कारणां-) वरून

३१ 'तो पराहून पर अशा पुरुषाला पाहतो' या श्रुतीमध्यें (पृ० २७५। पं० ६ पहा) ईक्षण (म्हणजे पाहणें) या क्रियेचें कर्म या रूपानें जो पुरुष वर्णिला आहे तो परमात्माच होय, ब्रह्मदेव नव्हे. कारण या पुरुषासंबंधानेंच श्रुतीमध्यें (प्र० ५।७) शांत, अजर, अमृत, अभय असा निर्देश केला आहे. मूळ सं. सूत्रामध्यें 'ईक्षतिकर्म' आणि 'व्यपदेशात्' अशीं २ पदें आहेत.

३२ 'हें पूर्वी सतच होतें. त्यापासून जग उत्पन्न झालें' असें जें श्रुतीमध्यें (छां० ६।२।१) सांगितलें आहे त्या ठिकाणीं सत् शब्दानें परमात्माच घेतला आहे प्रधान नाहीं, कारण पुढें 'त्यानें ईक्षण केलें' (छां० ६।२।३) या श्रुतीमध्यें ईक्षणक्रिया सांगितली आहे. ती अचेतन प्रधानाचे ठिकाणीं संभवत नाहीं.

३३ श्रुतीमध्यें (छां. ८।१।५) पापरहितत्व, सत्यकामत्व वगैरे गुण सांगितले आहेत. या कारणांवरून 'दहर आकाश म्हणजे परमात्मा होय भूताकाश नव्हे' हें सिद्ध होतें.

३४ पुढील सूत्रामध्यें सांगितलेल्या कारणांवरून 'दहर म्हणजे परमात्मा होय जीव नव्हे' असें सिद्ध होतें असें या सूत्राचें तात्पर्य आहे.

३५ श्रुतीमध्यें (छां० ८।७।१) पुढें 'आत्मा पापरहित शोकरहित' असें वर्णन केलें आहे. या कारणावरून पूर्वी सांगितलेला जो दहराकाश तो परमात्माच होय भूताकाश किंवा जीवात्मा नव्हे असें सिद्ध होतें.

१५ गतिशब्दाभ्यां तथा हि दृष्टं लिङ्गं च ।

हर (आकाश म्हणजे परमात्मा होय).

१५ (दहर म्हणजे परमात्माच होय.) कारण गति (सांगितली) आहे आणि शब्द (हा) आहे. हीच (गति इतर ठिकाणीं सांगितलेली) दृष्टीस पडते; आणि (हीच गति) ज्ञापक आहे.

१६ धृति (सांगितली आहे या-) वरूनही (दहर म्हणजे परमात्मा होय). कारण हा महिमा ह्या (परमात्म्या-) चाच (असलेला इतर ठिकाणीं) उपलब्ध होत आहे.

१७ प्रसिद्धीवरूनही (दहर म्हणजे परमात्मा होय).

दहर (आकाश म्हणजे परमात्मा होय).

१४ (दहर म्हणजे परमात्मा होय). कारण गति (सांगितली) आहे आणि शब्द[36] (हा) आहे. हे (गति आणि शब्द इतर ठिकाणीं परमात्म्याच्या संबंधानें लावलेले) दृष्टीस पडतात. आणि चिन्हें[37] (हीं) आहे.

१५ ह्या (परमात्म्या-) चा धृतिरूपी महिमा ह्या (दहराकाशाचे) ठिकाणीं उपलब्ध होत आहे. म्हणूनही (दहर म्हणजे परमात्मा होय).

१६ प्रसिद्धीवरूनही[38] (दहर म्हणजे परमात्मा होय).

---

३६ ' हा ब्रह्मलोक ' (बृ० ४।३।३२) इत्यादि श्रुतीमध्यें ' ब्रह्मलोक ' हा शब्द ' पर ब्रह्म ' या अर्थी योजिलेला आहे. आणि तो ब्रह्मलोक हा शब्द प्रकृत श्रुतीमध्यें (छां० ८।३।२) दहराकाशाला लाविलेला आहे.

३७ ' सुषुप्तिकालीं दहराकाशामध्यें सर्व जीवांची दुःखरहित स्थिति होते ' असें प्रकृत श्रुतीमध्यें (छां. ८।३।२) सांगितलें आहे. या चिन्हावरून ' दहराकाश म्हणजे परब्रह्म ' हें सिद्ध होतें. तसेंच प्रकृत श्रुतीमधील ब्रह्मलोकशब्दाचा कर्मधारयसमासानें ' ब्रह्मरूपी लोक ' असा अर्थ होतो. या चिन्हावरूनही दहराकाश म्हणजे परब्रह्म हें सिद्ध होतें.

३८ ' सूक्ष्म अशा दहराकाशानें एवढ्या मोठ्या जगाचें धारण करणें ' ही गोष्ट अशक्य आहे. तेव्हां असली अशक्य गोष्ट एक परमात्माच करूं शकेल. कारण त्याचा

१६ धृतेश्च महिम्नोऽस्यास्मिन्नुपलब्धेः । १७ प्रसिद्धेश्च ।

दहर (म्हणजे परमात्मा होय).

दहर (आकाश म्हणजे परमात्मा होय).

१५ (दहर म्हणजे परमात्मा होय असें) गति आणि शब्द यांवरून (समजतें). कारण तसेंच दृष्टीस पडतें. आणि (त्या गोष्टीचें) चिन्हही आहे.

१५ (दहर म्हणजे परमात्मा होय असें) गति आणि शब्द यांवरून (समजतें). कारण तसेंच दृष्टीस पडतें. आणि (त्या गोष्टीचें)चिन्हही आहे.

१६ हा धृतिरूपी महिमा ह्या (परमात्म्या-) चे ठिकाणीं उपलब्ध होतो म्हणूनही दहर) म्हणजे परमात्मा होय).

१६ धृतीवरूनही (दहर म्हणजे परमात्मा होय). कारण (परमात्म्याचा) हा (धृतिरूपी) महिमा ह्या (प्रकरणा-) मध्यें उपलब्ध होतो.

१७ प्रसिद्धीवरूनही (दहर म्हणजे परमात्मा होय.)

१७ प्रसिद्धीवरूनही (दहर म्हणजे परमात्मा होय).

महिमा विलक्षणप्रकारचा उपलब्ध होतो. यावरून 'दहराकाश म्हणजे परमात्मा' हें सिद्ध होतें.

३९ आकाशशब्दाचा श्रुतीमध्यें (तै. २.७-१ छां. १-९-१) परमात्मा हा अर्थ प्रसिद्ध आहे. आतां भूताकाश हा अर्थही जरी प्रसिद्ध आहे तरी तो भूताकाशरूपी अर्थ प्रकृत श्रुतीमध्यें सांगितलेल्या पापरहितत्व वगैरे गुणांनी युक्त अशा रूपानें अन्यत्र प्रसिद्ध नाहीं. म्हणून येथें भूताकाश घेतां येत नाहीं असें समजावें.

४० ह्या दहराकाशाच्या प्रकरणामध्यें असलेले आकाश वगैरे शब्द आणि पापरहितत्व वगैरे धर्म परमात्म्याचे ठिकाणीं प्रसिद्ध आहेत. ह्यावरून 'दहर म्हणजे परमात्मा' हें सिद्ध होतें.

४१ 'दहराकाश शोकरहित आहे ह्याच्या आंत जें काय आहे त्याची उपासना करावी' असें इतर ठिकाणीं प्रसिद्ध आहे.

१८ इतरपरामर्शात्स इति चेन्नासंभवात् ।

१८ इतराचा (जीवाचा) परामर्श केला आहे म्हणून तो (जीव दहर होय) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण असंभव[४३] आहे. (५)	१७ इतराचा (जीवाचा) परामर्श केला आहे म्हणून तो (जीव दहर होय) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण असंभव आहे.
१९ पुढील (वाक्या-) वरून (दहरवाक्यांत जीव विव-	१८ पुढील[४४] (वाक्या-) वरून (जीवाचें ज्ञान होत आहे)

४२ येथें पांचवें दहराधिकरण संपलें किंवा नाहीं असा संशय येतो. ह्या दहराधिकरणामध्यें जी गोष्ट निश्चित केली आहे तिच्या संबंधानें आलेल्या शंकेचें पुढें निरसन केलें असल्यामुळें येथें अधिकरण संपलें नाहीं असें वाटतें. शिवाय शारीरकमीमांसान्यायसंग्रहामध्येंही १८ व्या सूत्रामध्यें दहराधिकरण संपविलें नाहीं. परंतु भाष्यामध्यें १९ सूत्राच्या आरंभीं ' आतां ज्याप्रमाणें मृत झालेला मनुष्य अमृत शिंपडलें असतां पुन्हां उठतो त्याप्रमाणें पुढील प्रजापतीच्या वाक्यावरून जीवाबद्दलची शंका पुन्हां येथें उद्भवते ' असें म्हटलें आहे. (पृ. २९४ पं. १ पहा) या ठिकाणीं ' पुन्हां उठतो ' असें म्हटलें असल्यावरून ' निराळ्या अधिकरणाला आरंभ झाला ' असें भाष्यकारांच्या मनामध्यें असावें असें दिसून येतें. आणि हें योग्यच आहे. कारण जरी ह्या दहराधिकरणामध्यें निश्चित केलेल्या गोष्टीसंबंधानें आलेल्या शंकेचेंच पुढें निरसन केलें आहे तरी त्यावरून ' प्रजापतिवाक्य हें ब्रह्मप्रतिपादक आहे ' अशा रीतीनें एका निराळ्या श्रुतीच्या अर्थाचा निश्चय होत आहे. श्रीमद्विद्यारण्यांनीं केलेल्या अधिकरणमालेमध्यें तसेंच शंकरानंदांनीं केलेल्या ब्रह्मसूत्रदीपिकेमध्यें १९ सूत्रापासून निराळेंच अधिकरण केलें आहे. त्यावरून आम्ही १८ व्या सूत्रामध्यें पांचवें अधिकरण संपविलें आहे असें समजावें.

४३ ह्या अधिकरणामध्यें पूर्वीच्या सूत्रापर्यंत विधिमुखानें विचार केला, म्ह० दहराकाशशब्दानें परमात्मा घेण्याचीं कारणें दाखविलीं. आतां निषेधमुखानें विचार केला आहे. म्ह० दहराकाशशब्दानें जीवात्मा न घेण्याचीं कारणें दाखविलीं आहेत. असंभव आहे म्ह० जगाचें धारण करणें वगैरे जे धर्म ह्या प्रकरणामध्यें सांगितले आहेत त्यांचा जीवाचे ठिकाणीं असंभव आहे.

१९ उत्तराच्चेदाविर्भूतस्वरूपस्तु ।

१८ इतराचा[43] (जीवाचा) परामर्श केला आहे म्हणून तो (जीव दहर होय) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण असंभव आहे.	१८ इतराचा (जीवाचा) पराशर्म केला आहे म्हणून तो (जीव दहर होय) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (जीवाचे ठिकाणीं पापरहितत्व वगैरे धर्मांचा) असंभव आहे.
१९ पुढील[45] (वाक्या-) वरून (दहरवाक्यांत जीव विव-	१९ पुढील[46] (वाक्या-) वरून (दहर वाक्यांत जीव विव-

४४ पुढील प्रजापतिवाक्यामध्यें आविर्भूतस्वरूप म्ह. परज्योतीप्रत प्राप्त झालेला असा जीव विवक्षित आहे. त्याचे ठिकाणीं जरी पापरहितत्व वगैरे धर्म संभवतात तरी तो दहराकाशशब्दानें घेतां येत नाहीं. कारण जीव जरी आविर्भूतस्वरूप म्ह. मुक्त झाला तरी त्याला ‘ सर्व लोक धारण करणें सर्व लोकांचें नियमन करणें ’ हे व्यापार करतां येत नाहीत (अ. ४ पा. ४ सू. १७ पहा). आणि दहराकाशाचे ठिकाणीं ते व्यापार श्रुतीमध्यें (छां. ८।४।१) सांगितले आहेत. तेव्हां ‘ दहराकाश म्ह. परमात्माच होय ’ असें सिद्ध झालें.

४५ शंकाः—पुढील प्रजापतिवाक्यामध्यें जीवाचें वर्णन करून त्या जीवाचे ठिकाणीं ब्रह्माचे अमृतत्व वगैरे धर्म सांगितले आहेत. त्यावरून ‘ जीवाचे ठिकाणीं ब्रह्माचे धर्म असतात ’ हें सिद्ध होत असल्यामुळें दहराकाशशब्दानें जीवात्मा घेण्यास हरकत नाहीं. उ. इंद्राला उपदेश करतांना प्रजापतीचे ठिकाणीं परमात्म्याच्या स्वरूपाचा आविर्भाव झाला असल्यामुळें त्याचे ठिकाणीं जरी ब्रह्माचे धर्म संभवले तरी ते धर्म सामान्यतः जीवाचे ठिकाणीं स्वाभाविक आहेत असें म्हणतां येत नाहीं. म्हणून येथें दहराकाशशब्दानें जीवात्मा घेतां येत नाहीं.

४६ शंकाः—‘ जीव हा यथेच्छ क्रीडा करतो ’ असें पुढें श्रुतीमध्यें (छां. ८।१२।३) सांगितलें आहे. त्यावरून पापरहितत्व वगैरे धर्म सुद्धां जीवाचे ठिकाणीं संभवत असल्यामुळें ‘ दहर म्हणजे जीवात्मा ’ असें म्हणतां येतें. उ. पुढील वाक्यामध्यें आविर्भूतस्वरूप म्ह. मुक्त अशा जीवाचें वर्णन केलें आहे. मुक्त जीवाचे ठिकाणीं सुद्धां ते पापरहितत्व वगैरे गुण मूळचे नाहींत. तर ते परमात्म्याच्या प्रसादानेंच प्राप्त होतात. तेव्हां ते गु ज्या परमात्म्याच्या ठिकाणीं स्वाभाविकच आहेत तो परमात्माच ह्या दहरवाक्यामध्यें विवक्षित आहे असें समजावें.

२० अन्यार्थश्च परामर्शः ।

क्षित आहे) असें म्हणशील तर (त्यावर आमचें उत्तर:—) पण आविर्भूतस्वरूप (असाच जीव तेथें विवक्षित आहे).

२० आणि (वाक्यशेषामध्यें जो जीवाचा) परामर्श (केला आहे तो) दुसऱ्याकरतां होय.

२१ श्रुतीमध्यें अल्प असें म्हटल्यामुळें (आकाश म्हणजे जीवात्मा होय) असें म्हणशील तर (त्याचें) उत्तर दिलेंच आहे. (६)

२२ अनुकृति आहे म्हणून आणि

असें म्हणशील तर (त्यावर आमचें उत्तर:-) पण अविर्भूतस्वरूप (असाच जीव तेथें विवक्षित आहे).

१९ [४७]आणि (वाक्यशेषामध्यें जो जीवाचा) परामर्श (केला आहे तो) दुसऱ्याकरतां होय.

२० श्रुतीमध्यें अल्प असें म्हटल्यामुळें (आकाश म्हणजे जीवात्मा होय) असें म्हणशील तर (त्याचें) उत्तर दिलेंच आहे.

२१ ([५१]मुक्त जीवाचे ठिकाणीं)

४७ जीवाला परमेश्वराची प्राप्ति झाली म्हणजे त्याचें जें पापरहितत्व वगैरे गुणांनीं युक्त असें मूळचें स्वरूप तें त्याला प्राप्त होतें म्हणून 'जीवाला मूळचें स्वरूप मिळवून देणें' हा जो परमेश्वराचा गुण त्याचा उपदेश करण्याकरतां प्रजापतिवाक्यामध्यें सांगितलेल्या जीवाचा ह्या दहरवाक्यामध्यें परामर्श केला आहे.

४८ 'जीवाला ब्रह्मज्ञान झालें असतां त्याचे ठिकाणीं ब्रह्माचे धर्म प्राप्त होतात' असें समजलें म्हणजे लोक ब्रह्मज्ञानाकरतां प्रयत्न करतील. याकरतांच जीवाचा परामर्श केला आहे.

४९ 'हा आत्मा' या श्रुतीमध्यें (छां. ८।३।४) 'हा' या शब्दानें जो परामर्श केला आहे, तो जीव या अर्थाचा नव्हे, तर परज्योतिशब्दानें पूर्वी सांगितलेला जो परमात्मा त्याच अर्थाचा आहे.

५० 'सर्वव्यापी परमात्मा हा लहानशा हृदयकमलामध्यें कसा राहूं शकेल' अशी जी शंका येते तिचें उत्तर मागें दिलेंच आहे. (१।२।७ पहा)

५१ 'जर मुक्त जीव हा परमात्मस्वरूपच असता, तर दहराकाशशब्दानें तो घेतां आला असता. परंतु मुक्त जीव हा परमात्मस्वरूप नाहीं. कारण श्रुतीमध्यें (मुं. ३।१।३) मुक्त जीवाचें परमात्म्याशीं केवळ साम्य वर्णिलें आहे.

२१ अल्पश्रुतेरिति चेत्तदुक्तम् । २२ अनुकृतेस्तस्य च ।

क्षित आहे) असें म्हणशील तर (त्यावर आमचें उत्तरः—) पण आविर्भूत स्वरूप (असाच जीव तेथें विवक्षित आहे).	क्षित आहे) असें म्हणशील तर (तसें नाहीं. कारण) आविर्भूतस्वरूप (असा जीव तेथें विवक्षित आहे).
२० आणि (वाक्यशेषामध्यें जो जीवाचा) परामर्श (केला आहे तो) दुसऱ्याकरतां होय.	२० आणि[५१] (वाक्यशेषामध्यें जो) परामर्श(केला आहे तो) दुसऱ्या अर्थाचा आहे.
२१ श्रुतीमध्यें अल्प असें म्हटल्यामुळें (दहर म्हणजे जीवात्मा होय) असें म्हणशील तर (त्याचें) उत्तर दिलेंच आहे. (५)	२१ श्रुतीमध्यें अल्प (ठिकाणीं असलेला) असें सांगितलें असल्यामुळें (दहर म्हणजे जीवात्मा होय) असें म्हणशील तर (तसें नाहीं. कारण त्याचें) उत्तर दिलेंच आहे. (५)
२२ (ज्यां ठिकाणीं सूर्य वगैरे	२२ (ज्ञेय यां रूपानें इच्छिलेला

५२ शं. ‘ त्या ठिकाणीं सूर्य भासत नाहीं ’ (मुं २।२।१०) या श्रुतीमध्यें ‘ त्या ठिकाणीं ’ या शब्दानें निराळेंच एखादें विशेषप्रकारचें सत्यलोकामधील तेज घेतलें पाहिजे. ब्रह्म घेतां येत नाहीं. कारण ‘ दहराकाशामध्यें सूर्य वगैरे आहेत ’ असें श्रुतीमध्यें (छां. ८।१।३) सांगितलें आहे. आणि दहराकाश म्हणजे ब्रह्म हें पूर्वीच्या अधिकरणामध्यें सिद्ध केलेंच आहे. उ. परमात्म्याचे ठिकाणीं सूर्य वगैरे असूनही त्यांचा प्रकाश परमात्म्याच्या प्रकाशाचें अनुकरण करीत असल्यामुळें म्ह. त्याच्या अधीन असल्यामुळें ‘ त्याठिकाणीं सूर्य भासत नाहीं ’ (मुं. २।२।१०) असें श्रुतीमध्यें म्हटलें आहे. तात्पर्य “ श्रुतीमध्यें ‘ त्या ठिकाणीं ’ या शब्दानें ब्रह्माचा निर्देश केला आहे ” असें सिद्ध झालें.

५३ तें हें अनिर्देश्य सुख आहे असें मानतात. तें मी कसें जाणीन (का. ५।१४) ह्या श्रुतीमध्यें ज्ञेय या रूपानें जो इच्छिलेला आहे तो परमात्माच होय. ज्ञान्याचें सुख नव्हे. कारण इतर सर्व वस्तूंचा प्रकाश हा त्या परमात्म्याच्या प्रकाशाची अनुकृति म्ह. अनुकरण आहे. आणि ‘ त्या परमात्म्याच्या प्रकाशानें हें सर्व प्रकाशतें ’ असें पुढें श्रुतीमध्यें (का. ५।१५) सांगितलें आहे. ज्ञान्याचें सुख असें नाहीं म्हणून तें ह्या प्रकृत श्रुतीमध्यें घेतां येत नाहीं.

२३ अपि च स्मर्यते । [54] २४ शब्दादेव प्रमितः ।

त्याच्या (असा शब्द आहे म्हणून सर्वांना प्रकाशविणारा हा परमात्माच होय).

त्या (परमात्म्या-) चें साम्य आहे म्हणूनही (दहराकाश म्हणजे मुक्त जीव नव्हे).

२३ स्मृतीमध्येंही (असेंच) सांगितलें आहे. (७)

२४ शब्दावरूनच (आंगठ्यानें) मोजलेला (पुरुष परमात्मा होय).

२५ पण हृदयांत (राहतो या गोष्टीला) अनुलक्षून (परमात्म्याला आंगठ्याएवढा असें म्हटलें आहे). कारण (ह्या शास्त्राचा) अधिकार मनुष्यांनाच आहे. (८)

२२ स्मृतीमध्येंही (असेंच) सांगितलें आहे. (५)

२३ शब्दावरूनच (आंगठ्यानें) मोजलेला (पुरुष परमात्मा होय).

२४ पण हृदयांत (राहतो या गोष्टीला) अनुलक्षून (परमात्म्याला आंगठ्याएवढा असें म्हटलें आहे). कारण (ह्या शास्त्राचा) अधिकार मनुष्यांनाच आहे. (६)

५४ ' अपि स्मर्यते ' (रा., म., वल्ल. वृ.).

५५ ' ज्ञानी जीवाला परमात्म्याचें साधर्म्य प्राप्त होतें ' असें भगवद्गीतेमध्यें (१४।२) सांगितलें आहे.

५६ काठकोपनिषदामध्यें ' आंगठ्याएवढा ' (का. २।४।१२) ह्या श्रुतीमध्यें ईशानाचें वर्णन केलें आहे. तो ईशान परमात्माच होय, वायु नव्हे. कारण श्रुतीमध्यें पुढें (का. ५।३) ' वामन ' असा शब्द स्पष्टच घातला आहे. आतां प्राण अपान यांचा प्रेरक, असें जें तेथें वायूचें चिन्ह दृष्टीस पडतें तें परमात्म्याकडे लावितां येतें. कारण परमात्मा हा सर्वांचाच प्रेरक आहे.

२५ हृद्यपेक्षया तु मनुष्याधिकारत्वात् ।

मासत नाहींत तें ठिकाण परब्रह्मच होय.) कारण (सूर्य वगैरेंचा प्रकाश हा) त्या (परमात्म्याच्या प्रकाशा-) चें अनुकरण आहे.

२३ स्मृतीमध्येंही (असेंच) सांगितलें आहे. (६)

२४ शब्दावरूनच विशेषरूपानें मोजलेला (जो पुरुष तो परमात्माच होय).

२५ (कांहीं[५७] कार्या-) करतां हृदयामध्यें (असलेल्या परमात्म्याला ‘ आंगठ्या एवढा ’ असें) मनुष्य अधिकारी असल्यामुळें (म्हटलें आहे). (७)

परमात्माच होय.) कारण अनुकृति आहे आणि ‘त्याचा’ (इत्यादि श्रुति आहे).

२३ स्मृतीमध्येंही (असेंच) सांगितलें आहे. (६)

२४ (ईशान[५८] हा) शब्दावरूनच (परमात्मा असा) निश्चित होतो.

२५ पण हृदयांत (राहतो या गोष्टीला) अनुलक्षून (परमात्म्याला ‘ आंगठ्याएवढा ’ असें म्हटले आहे). कारण (ह्या वेदविद्येचा) अधिकार मनुष्यांनाच आहे. (७)

---

५७ शं. सर्वव्यापी अशा परमात्म्याला आंगठ्याएवढा म्हणण्याचें कारण काय ? उ. सर्व प्राण्यांचें रक्षण करण्याकरतां त्यांच्या हृदयामध्यें परमात्मा असतो. आतां मनुष्यांचें हृदय आंगठ्याएवढें असल्यामुळें परमात्म्याला तसें म्हटलें आहे, कारण ह्या श्रुतीमध्यें (का. २।४।१२) मृत्यूनें नचिकेत्याला उपदेश केला असल्यामुळें येथें मनुष्य अधिकारी आहे.

५८ ‘ परमात्म्याला आंगठ्याएवढा असें कसें म्हटलें ? ’ अशी जी शंका येते तिचें हें उत्तर दिलें आहे.

२६ तदुपर्यपि बादरायणः संभवात् ।

२६ त्या (मनुष्यां—) च्या वरच्या (देवां—) नाहीं (अधिकार आहे) असें बादरायण मानतो. कारण (अधिकारी असण्याचीं कारणें त्यांच्या ठिकाणींही) संभवतात.	२५ (मनुष्यांच्या) वरच्या (देवां-) नाहीं तों (ब्रह्माची उपासना संभवते) असें बादरायण मानतो. कारण (त्या उपासनेचा अधिकार असण्याचीं कारणें त्यांच्या ठिकाणींही) संभवतात.
२७ कर्माचे ठिकाणीं विरोध येतो असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (देव) अनेकरूपें धारण करितात असें दृष्टोत्पत्तीस येतें.	२७ कर्माचे ठिकाणीं विरोध येतो असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (देव) अनेकरूपें धारण करितात असें दृष्टोत्पत्तीस येतें.

५९ ‘ पूर्वसूत्रामध्यें ‘ मनुष्य अधिकारी आहे ’ असें म्हटलें असल्यामुळें ‘ ब्रह्मविद्येचा अधिकार मनुष्यांनाच आहे ’ असा कदाचित् भ्रम होण्याचा संभव आहे. म्हणून सूत्रकारांनीं हें सूत्र केलें आहे. तात्पर्य:—मनुष्यापासून ब्रह्मदेवापर्यंत सर्वांना ब्रह्मविद्येचा अधिकार आहे. कारण देव वगैरे देखील कांहीं विशेष ज्ञानामुळें एकप्रकारच्या जन्मालाच आलेले आहेत.

६० शंका:—‘ मनुष्यानांच वेदविद्येचा अधिकार आहे ’ असें पूर्वसूत्रामध्यें सांगितलें असल्यामुळें देवांना अधिकार नाहीं. उ. ‘ पशुपक्ष्यांना विशेषप्रकारची बुद्धि नसल्यामुळें त्यांना अधिकार नाहीं ’ असें पूर्वसूत्राचें तात्पर्य आहे. तेव्हां मनुष्यांना कर्माच्या योगानें देवपणा प्राप्त झाल्यानंतर देखील त्यांचा अधिकार कायमच असतो. कारण विशेषप्रकारची बुद्धि हें त्या अधिकाराचें कारण आहे. आणि तें त्यांच्या ठिकाणीं संभवतें. आतां देव म्हणून जितके आहेत तितके मनुष्याचे झालेले आहेत. जर देव हे मूळपासूनच देव असते तर मात्र त्यांना विद्येची जरूर नसल्यामुळें अधिकार नाहीं असें म्हणतां आलें असतें.

२७ विरोधः कर्मणीति चेन्नानेकप्रतिपत्तेर्दर्शनात् ।

२६ त्यांचा (मनुष्या—) च्या वरच्या (साध्य वगैरे-) नाही (अधिकार आहे) असें बादरायण मानतो. कारण (त्याच्या ठिकाणींही अधिकार). संभवतो.	२६ (मनुष्यांनीं) तें (देवत्व प्राप्त झाल्या-) वर देखील (त्यांना अधिकार आहे असें) बादरायण मानतो. कारण (अधिकार असण्याची कारणें त्यांच्या ठिकाणींही) संभवतात.
२७ कर्माचे ठिकाणीं विरोध येतो असें म्हणशील तर तसें नाहीं कारण अनेक (साध्य वगैरे-) चीं (कर्म करण्याविषयीं) प्रवृत्ति (झालेली) दृष्टीस पडते.	२७ कर्माचे ठिकाणीं विरोध येतो असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण अनेकांना (देवपणाची) प्राप्ती (झालेली) दृष्टीस पडते.

६१ शं. ' जर देवांना ज्ञानाचा अधिकार आहे तर त्यांना वेदाध्ययन, उपनयन, यज्ञ वगैरे कर्मांचा अधिकार असलाच पाहिजे. कारण कर्म केल्याशिवाय ज्ञानाचा अधिकार येत नाहीं. परंतु त्यांना कर्मांचा अधिकार संभवत नाहीं. कारण त्यांना ब्राह्मणत्व वगैरे जाती नाहींत. तसेंच कर्माला उपयोगी पडणारे जे भूतलांमधील पदार्थ तेही सर्व त्यांच्या जवळ नाहींत ' असा विरोध येतो. उ. इंद्र वगैरेंनी कर्म केलेलें श्रुतीमध्यें (छां. ८।११।३) सांगितलें आहे. आतां श्रुतीमध्यें सांगितलेले असे कर्माच्या उपयोगी पडणारे जे पदार्थ त्यांच्या जवळ नसतील त्यांची भावना करून देव कर्म करतात म्हणून विरोध येत नाहीं असें समजावें.

६२ शं. ' ज्या कर्माच्या योगानें मनुष्याचे देव झाले तें कर्म मनुष्यांनीं कोणत्या देवांना उद्देशून केलें. कारण त्या वेळीं देवच नव्हते असा कर्माचे ठिकाणीं विरोध येतो. उ० हा विरोध येत नाहीं. कारण तें कर्म त्याच्या पूर्वी झालेल्या देवांना उद्देशून करतां येतें. कारण ' ज्या ठिकाणीं पूर्वीच्या कल्पांतील साध्य देव आहेत ' (चित्ति. उ० ११) या श्रुतीवरून अनेकांना देवत्व प्राप्त झालेलें दृष्टीस पडतें.

२८ शब्द इति चेन्नातः प्रभवात्प्रत्यक्षानुमानाभ्याम् ।

२८ शब्दाचे ठिकाणीं (विरोध येतो) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण ह्या (शब्दा-) पासून (सर्वांची) उत्पत्ति आहे असें प्रत्यक्ष आणि अनुमान यांवरून (सिद्ध होतें).	२७ शब्दाचे ठिकाणीं (विरोध येतो) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण ह्या (शब्दा-) पासून (सर्वांची) उत्पत्ति आहे असें [६३]प्रत्यक्ष आणि अनुमान यांवरून (सिद्ध होतें).
२९ म्हणूनच (वेदाला) नित्यत्व आहे.	२९ म्हणूनच (वेदाला) नित्यत्व आहे.

६३ 'परमात्म्यानें वेदाच्या योगानें जगाला नांवारूपाला आणिलें' इत्यादि श्रुती प्रत्यक्ष शब्दानें घ्याव्यात.

६४ शं० वेदाचा अर्थ समजल्यानंतर त्यावरून कर्म करतां येतें. परंतु साध्य वगैरेंनीं जीं कर्में केलीं तीं तशीं केलीं असें म्हणतां येत नाहीं. कारण 'साध्यांनीं कर्में केली' ही गोष्ट वेदामध्येंच सांगितली आहे. आतां 'हे साध्य निराळे आहेत' असें म्हणावें तर त्या निराळ्या साध्यांनीं जीं कर्में केलीं तीं वेदावरूनच केलीं असल्यामुळें त्या साध्यांपेक्षांही आणखी निराळे साध्य मानावें लागतील अशी अनवस्था येते. आतां साध्यांनीं जीं कर्में केलीं तीं वेदावरून केलींच नाहींत. वेद हे मागून तयार झाले असें म्हणावें तर 'वेद अनित्य आहेत' असें म्हणावें लागेल. असा वेदरूपी शब्दाचें ठिकाणीं विरोध येतो. उ० वेदामध्यें वर्णिलेले जेवढे म्हणून पदार्थ आहेत, मग ते साध्य वगैरे चेतन असोत, किंवा घट पट वगैरे अचेतन असोत ते सर्व परमात्म्याचे अंशभूत आहेत, नित्य आहेत, आणि ते लौकिक साध्य वगैरेंपेक्षां निराळे आहेत. ते पदार्थ वैदिक शब्दावरूनच प्रकाशित होतात. ह्या वैदिक पदार्थांना केवल नाम आहे, रूप नाहीं. यज्ञ वगैरे कर्में करतांना यज्ञांतील त्या त्या लौकिक पदार्थांमध्यें त्या त्या वैदिक पदार्थांचा आवेश होतो. कारण हल्लीं यज्ञामध्यें जे यजमान ऋत्विज वगैरे लौकिक पदार्थ ते 'आम्ही वैदिक वगैरे पदार्थ आहोंत' असें प्रत्यक्षरीतीनें जाणून तीं तीं कार्यें वेदावरूनच समजून करतात असें दृष्टीस पडतें. तसेंच जामदग्न्य गोत्रांत उत्पन्न

२९ अतएव च नित्यत्वम् ।

२८ शब्दाचे ठिकाणीं (विरोध येतो) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण ह्या (शब्दा-) पासून (वैदिक पदार्थांचा) प्रकाश होतो असें प्रत्यक्ष आणि अनुमान यांवरून (समजतें).	२८ शब्दाचे ठिकाणीं (विरोध येतो) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण ह्या (शब्दा-) वरून (च देवांचें) अस्तित्व (नियमित) होतें. प्रत्यक्ष आणि अनुमान यांवरून—(ही हें सिद्ध होतें). [65]
२९ म्हणूनच (वेदाला) नित्यत्व आहे.	२९ आणि (वेदाला नित्यत्व आहे) म्हणूनच (देवांनाही) नित्यत्व आहे. [66]

झालेले लोक हे ' ज्या अर्थी आमचे पूर्वज हे वैदिकजामदग्न्यस्वरूप होऊन तीं तीं कर्में करीत आले आहेत त्या अर्थी आम्हीही वैदिकजामदग्न्यस्वरूप आहोंत ' असें अनुमानानें जाणून तीं तीं कार्यें करतात असें दृष्टीस पडतें. तात्पर्य वेदामध्यें अनित्यवस्तूचें वर्णन केलें नसल्यामुळें वेदाला अनित्यत्व येत नाहीं.

६५ शं० देव हे जर मनुष्याचेच होत असतील तर ते अनित्य असल्यामुळें त्या देवांचें प्रतिपादन करणारा जो वेदरूपी शब्द त्याचे ठिकाणीं विरोध येतो. कारण नित्य अशा वेदामध्यें अनित्य देवांचें प्रतिपादन करतां येत नाहीं. उ० ज्याप्रमाणें मामलेदार वगैरे अधिकारी त्या त्या व्यक्तीच्या दृष्टीनें अनित्य असले तरी ते अधिकारी या दृष्टीनें नित्यच आहेत. कारण त्या अधिकारावर कोणींना कोणी तरी असतोच. त्याप्रमाणेंच देव हे नित्य आहेत. ' ब्रह्मदेवानें पूर्वींप्रमाणेंच सूर्य चंद्र उत्पन्न केले ' (म० ना. ५।७) इत्यादि शब्दांवरून ' देव हे सदोदित असतात ' अशा त्यांच्या अस्तित्वाचा नियम सिद्ध होतो. महात्मे जे लोक त्यांना ही गोष्ट प्रत्यक्षच आहे. शिवाय ' वर्तमानकालीं ज्याअर्थी देव आहेत त्याअर्थी भूतकालीं आणि भविष्यकालीं ते असलेच पाहिजेत ' असें अनुमानही करतां येतें.

६६ कारण नित्य शब्द अनित्य अर्थाचें प्रतिपादन करूं शकत नाहीं. तात्पर्य देव हे प्रवाहरूपानें नित्य आहेत हें सिद्ध झालें.

३० समाननामरूपत्वाच्चावृत्तावप्यविरोधो दर्शनात्स्मृतेश्च।[६७]

३० सारखींच नामरूपें असल्यामुळें (कांहीं विरोध येत नाहीं. तसेंच) आवृत्ति मानली असतांही कांहीं विरोध येत नाहीं. कारण (असेंच) श्रुति आणि स्मृति यांवरून समजतें.	२९ सारखींच नामरूपें असल्यामुळें आवृत्ति मानली असतांही कांहीं विरोध येत नाहीं. कारण (असेंच) श्रुति आणि स्मृति[६८] यांवरून समजतें. (७)
३१ मधु वगैरे (विद्यां-) चा (देवादिकांना अधिकार) संभवत नसल्यामुळें (ब्रह्मविद्येचाही त्यांना) अधिकार नाहीं असें जैमिनि म्हणतो.	३० मधु वगैरे (विद्यां-)चा (देवादिकांना) अधिकार नाहीं. कारण (तो) संभवत नाहीं. असें जैमिनि म्हणतो.
३२ ज्योति या अर्थी (आदित्य	३१ ज्योती-[७२] (च्या उपासने-) वि-

६७ 'त्वादावृ' (व.)

६८ 'परमात्मा हा सृष्टीच्या आरंभीं जल उत्पन्न करून त्यामध्यें वीर्य स्थापन करून त्यापासून उत्पन्न झालेल्या ब्रह्मांडामध्यें सर्व लोकांचा पितामह जो ब्रह्मदेव त्या रूपानें आपण अवतीर्ण झाला' (मनु. १।८।९) इत्यादि स्मृतींमध्यें 'पूर्वीप्रमाणेंच फिरून सृष्टि उत्पन्न होते' असें सांगितलें आहे.

६९ शं. वैदिक जे घट वगैरे पदार्थ त्यांना रूप नसल्यामुळें त्यांचें ज्ञान लौकिक घट वगैरे पदार्थांवरूनच होतें असें मानलें पाहिजे. तेव्हां लौकिक जे घट वगैरे अनित्य पदार्थ त्यांच्यावर अवलंबून वेद हा आपल्या अर्थांचें ज्ञान करून देत असल्यामुळें अनित्य पदार्थांची जरूर बाळगणाऱ्या त्या वेदाला अनित्यत्व येतें. उ० लौकिक पदार्थांना उत्पत्ति आणि नाश नाहींत, केवल त्यांचे आविर्भाव आणि तिरोभाव होतात. कदाचित् व्यवहारदृष्टीनें लौकिक पदार्थांची आवृत्ति म्ह. उत्पत्ति आणि नाश मानिले तरी देखील ते लौकिक पदार्थ जलाच्या धारेप्रमाणें प्रवाहरूपानें नित्यच आहेत. कारण उत्पन्न झालेल्या घट वगैरे पदार्थांचीं नामरूपें पूर्वीं नष्ट झालेल्या घट वगैरे पदार्थांच्या नामरूपांसारखींच असतात. लोकामध्यें तसें दृष्टोत्पत्तीस येतें. 'ब्रह्मदेवानें पूर्वीप्रमाणेंच सूर्य व चंद्र उत्पन्न केले' (म. ना. ५।७) या श्रुतीवरूनही हेंच सिद्ध होतें. शिवाय 'माझे ठिकाणीं लीन झालेल्या प्रजांना पूर्वीप्रमाणें उत्पन्न कर' अशी स्मृति आहे.

७० शंका—एक देव मुक्त झाला असतां त्याच्या जागेवर जरी दुसरा देव आला तरी त्याचीं नामरूपें पूर्वीच्यापेक्षां भिन्न असल्यामुळें देवांना प्रवाहरूपानें नित्य म्हणतां

३० समाननामरूपत्वाच्चावृत्तावप्यविरोधो दर्शनात्स्मृतेश्च ।

३० सारखींच नामरूपें असल्यामुळें (कांहीं विरोध येत नाहीं, तसेंच) आवृत्ति मानली असतांही कांहीं विरोध येत नाहीं. कारण (असेंच) श्रुति आणि स्मृति यांवरून समजतें.

२९ सारखींच नामरूपें असल्यामुळें आवृत्ति मानली असतांही कांहीं विरोध येत नाहीं. कारण (असेंच) श्रुति आणि स्मृति यांवरून समजतें. (६७)

३१ मधु वगैरे (विद्यां-) चा (देवादिकांना अधिकार) संभवत नसल्यामुळें (ब्रह्मविद्येचाही त्यांना) अधिकार नाहीं असें जैमिनि म्हणतो.

३० मधु वगैरे (विद्यां-)चा (देवादिकांना) अधिकार नाहीं. कारण (तो) संभवत नाहीं. असें जैमिनि म्हणतो.

३२ ज्योति या अर्थी (आदित्य

३१ ज्योती-७२ (च्या उपासने-) वि-

६७ 'त्वादावृ' (व.)

६८ 'परमात्मा हा सृष्टीच्या आरंभीं जल उत्पन्न करून त्यामध्यें वीर्य स्थापन करून त्यापासून उत्पन्न झालेल्या ब्रह्मांडामध्यें सर्व लोकांचा पितामह जो ब्रह्मदेव त्या रूपानें आपण अवतीर्ण झाला' (मनु. १।८।९) इत्यादि स्मृतींमध्यें 'पूर्वीप्रमाणेंच फिरून सृष्टि उत्पन्न होते' असें सांगितलें आहे.

६९ शं. वैदिक जे घट वगैरे पदार्थ त्यांना रूप नसल्यामुळें त्यांचें ज्ञान लौकिक घट वगैरे पदार्थांवरूनच होतें असें मानलें पाहिजे. तेव्हां लौकिक जे घट वगैरे अनित्य पदार्थ त्यांच्यावर अवलंबून वेद हा आपल्या अर्थाचें ज्ञान करून देत असल्यामुळें अनित्य पदार्थांची जरूर बाळगणाऱ्या त्या वेदाला अनित्यत्व येतें. उ० लौकिक पदार्थांना उत्पत्ति आणि नाश नाहींत, केवळ त्यांचे अविर्भाव आणि तिरोभाव होतात. कदाचित् व्यवहारदृष्टीनें लौकिक पदार्थांची आवृत्ति म्ह. उत्पत्ति आणि नाश मानिले तरी देखील ते लौकिक पदार्थ जलाच्या धारेप्रमाणें प्रवाहरूपानें नित्यच आहेत. कारण उत्पन्न झालेल्या घट वगैरे पदार्थांचीं नामरूपें पूर्वीं नष्ट झालेल्या घट वगैरे पदार्थांच्या नामरूपांसारखींच असतात. लोकामध्यें तसें दृष्टोत्पत्तीस येतें. 'ब्रह्मदेवानें पूर्वीप्रमाणेंच सूर्य व चंद्र उत्पन्न केले' (म. ना. ५।७) या श्रुतीवरूनही हेंच सिद्ध होतें. शिवाय 'माझे ठिकाणीं लीन झालेल्या प्रजांना पूर्वीप्रमाणें उत्पन्न कर' अशी स्मृति आहे.

७० शंका—एक देव मुक्त झाला असतां त्याच्या जागेवर जरी दुसरा देव आला तरी त्याचीं नामरूपें पूर्वीच्यापेक्षां भिन्न असल्यामुळें देवांना प्रवाहरूपानें नित्य म्हणतां

३१ मध्वादिष्वसंभवादनधिकारं जैमिनिः । ३२ ज्योतिषि भावाच्च ।

३० सारखींच नामरूपें असल्यामुळें आवृत्ति मानली असतांही कांहीं विरोध येत नाहीं. कारण (असेंच) दृष्टोत्पत्तीस येतें. स्मृतीही अशीच आहे.

३१ मधु वगैरे (विद्यां-)चा (देवादिकांना अधिकार) संभवत नसल्यामुळें (सर्व विद्या आणि कर्म यांचा त्यांना) अधिकार नाहीं असें जैमिनि म्हणतो.

३२ ज्योतिश्चक्रामध्यें (देव)

३० (मुक्त झालेल्या देवांची) स्थिति नसली तरी सारखींच नामरूपें असल्यामुळें कांहीं विरोध येत नाहीं. कारण (असेंच) श्रुति आणि स्मृति यांवरून समजतें.

३१ मधु वगैरे (विद्यां-)चा (देवांना) अधिकार नाहीं. कारण (तो) संभवत नाहीं. असें जैमिनि म्हणतो.

३२ ज्योतीमध्यें (सर्व वस्तूंचें)

येत नाहीं. उत्तर-पूर्वीच्या देवापेक्षां पुढच्या देवाचीं नामरूपें भिन्न असत नाहींत. कारण ‘ ब्रह्मदेवानें पूर्वीप्रमाणेंच सूर्य व चंद्र उत्पन्न केले ’ (म. ना. ५।७) अशी श्रुती आहे. आणि ‘ वेदावरूनच महेश्वरानें ऋषींचीं नांवें वगैरे ठेविलीं ’ अशी स्मृती आहे.

७१ ‘ देवत्व प्राप्त होणें ’ हें मधु वगैरे विद्यांचें फल आहे. तेव्हां अर्थातच देवांना त्या विद्येचा अधिकार नाहीं. कारण देवांना देवत्व हें प्राप्त झालेलेंच आहे.

७२ ‘ देव हे ज्योतीच्या ज्योतीची म्ह. परब्रह्माची उपासना करतात ’ असें श्रुतीमध्यें (बृ. ४।४।१६) सांगितलें आहे. ह्या श्रुतीमध्यें जो देवशब्द घातला आहे तो ‘ मनुष्यांना ब्रह्मविद्येचा अधिकार नाहीं ’ असें सुचविण्याकरतां घातला नाहीं. कारण ‘ मनुष्यांना देखील ब्रह्मविद्येचा अधिकार आहे ’ ही गोष्ट इतर श्रुतीवरूनच सिद्ध होते आहे. तेव्हां देवांना ह्या ब्रह्मविद्येचाच अधिकार आहे इतर विद्येचा नाहीं हें सुचविण्याकरितांच येथें ‘ देव ’ शब्द घातला आहे.

७३ देव हे नक्षत्रांच्या रूपानें ज्योतिश्चक्रामध्यें यथेच्छ उपभोग घेत आहेत. तेव्हां ज्यांना एवढें मोठें ऐश्वर्य प्राप्त झालेलें आहे त्यांना अर्थातच ज्ञान आणि कर्म यांचा कांहीं उपयोग नाहीं म्हणून त्यांना अधिकार नाहीं.

७४ शं. ज्या विद्येचें मोक्ष हें फळ आहे त्या विद्येचा अधिकार देवांना असला पाहिजे. उ० त्या विद्या देखील देवांना सिद्धच आहेत. कारण देव हे सर्वज्ञ असल्यामुळें यांच्या सर्वज्ञत्वरूप ज्योतीमध्यें सर्व विद्यांचा अंतर्भाव होत आहे.

३३ भावं तु बादरायणोऽस्ति हि ।

वगैरे शब्दांचा प्रयोग) आहे म्हणूनही (देव वगैरेंना अधिकार नाहीं).

३३ परंतु (देव वगैरेंना अधिकार) आहे असें बादरायण म्हणतो. कारण (त्यांना अधिकाराचा संभव) आहे. (९).

३४ आपला अनादर ऐकिल्यावरून झाला शोक (उत्पन्न झाला). त्या (शोका-) चें (त्याला) आद्रवण आहे (असा शूद्र शब्दाचा अर्थ असल्यामुळें शूद्रशब्दानें तो शोक) सुचविला जातो.

षयीं (अधिकार सांगितला) असल्यामुळेंही (मधु वगैरे इतर विद्यांचा देवादिकांना अधिकार नाहीं असें समजतें).

३२ परंतु[७५] (देव वगैरेंना मधु वगैरे विद्यांचा अधिकार) आहे असें बादरायण म्हणतो. कारण (संभव) आहे. (८)

३३ (शूद्र हा शब्द शूद्रजातीचा बोधक नाहीं). कारण आपला अनादर ऐकिल्याबरोबर (त्याच वेळीं) त्याचें आद्रवण झालें. त्यावरून ह्या (जानश्रुती-) ला शोक (झाला असें) सूचित होतें.

---

७५ देवत्व प्राप्त होणें हे मधु वगैरे विद्यांचें फळ होय. आतां तें फळ देवांना जरी प्राप्त झालेलें आहे, तरी त्यांना ' अन्य कल्पामध्येंसुद्धां हल्लींप्रमाणें देवत्व प्राप्त व्हावें ' अशी इच्छा होण्याचा संभव आहे. मधु वगैरे विद्यांमध्यें ज्या उपासना सांगितल्या आहेत त्या जरी देवाच्या स्वरूपानें करावयाच्या आहेत, तरी त्या त्या रूपानें ब्रह्माच्याच उपासना आहेत. तेव्हां देवांना ब्रह्मविद्येचाच अधिकार आहे असें जें पूर्वसूत्रामध्यें सांगितलें आहे तें विरुद्ध होत नाहीं.

७६ ' देवांनीं यज्ञ केला ' (तै. सं. २।३।३) ' देवांना ज्ञान झालें ' (बृ. १।४।१०) असें श्रुतीमध्यें सांगितलें असल्यामुळें त्यांना अधिकार आहे असें बादरायणाचें मत आहे. शिवाय उपासना करणारे जे आदित्य वगैरे देव ते लौकिक आहेत, आणि ज्यांची उपासना करावयाची ते आदित्य वगैरे वैदिक आहेत (मागील टीप ६४ पहा). तेव्हां अशा रीतीनें देवांनाही देवांची उपासना करतां येत असल्यामुळें त्यांना अधिकार असणें हें योग्यच आहे.

३४ शुगस्य तदनादरश्रवणात्तदाद्रवणात्सूच्यते हि ।

आहेत म्हणूनही (त्यांना अधिकार नाहीं).

अस्तित्व असल्यामुळेंही (देवांना अधिकार नाहीं असें सिद्ध होतें).

३३ परंतु[७६] (देवांना अधिकार) आहे असें बादरायण म्हणतो. (त्यांना अधिकार) असणें हें योग्यच आहे. (८)

३३ परंतु[७७] (देवांना मधु वगैरे विद्यांचा अधिकार) आहे असें बादरायण म्हणतो. कारण-(संभव) आहे. (८)

३४ त्या (हंसा-) पासून (आपला) अनादर ऐकिल्यावरून ह्या (जानश्रुती-) ला शोक (उत्पन्न झाला). नंतर (त्याचें) आद्रवण झालें म्हणून (त्याला शूद्र असें म्हटलें आहे. यावरून रैक ऋ-

३४ तो अनादर ऐकिल्यावरून ह्या (जानश्रुती-) ला शोक (उत्पन्न झाला असें त्याच्या वर्तनावरून[७८]) सूचित होतें. त्या (शोका-) नें (त्याचें) आद्रवण झालें असल्यामुळें (शूद्रशब्दाचा श्रुतीमध्यें तसा

७७ जरी देवांना देवस्वरूपीं फल प्राप्त झालेलेंच आहे तरी त्या फलामध्येंच कांहीं विशेष प्राप्त करून घेण्याकरितां देवांना मधु वगैरे विद्यांचा अधिकार असण्याचा संभव आहे. तसेंच देव जरी सर्वज्ञ आहेत तरी त्यांना विद्यांच्या विचारानें विशेषप्रकारचें ज्ञान होण्याचा संभव आहे.

७८ जानश्रुति राजानें आपला अनादर ऐकिल्याबरोबर आद्रवण केलें, म्हणजे रैकऋषीकडे वेगानें धावला. त्यावरून 'त्याला शोक झाला' असें सूचित होतें. आणि त्यावरून 'तो विद्येचा अधिकारी आहे' असें समजतें. हें दाखविण्याकरितांच रैकानें जानश्रुतीला हे शूद्रा (म्ह० हे शोक करण्याचा) असें म्हटलें आहे. शुच् धातुला 'र' हा प्रत्यय लागून 'शूद्र' हा शब्द सिद्ध झाला आहे. तात्पर्य शूद्राला ब्रम्हविद्येचा अधिकार नाहीं.

७९ रैकऋषीच्या शोधाकरतां सारथ्याशीं तशा प्रकारचें भाषण करणें इत्यादि वर्तनावरून.

३५ क्षत्रियत्वगतेश्चोत्तरत्र चैत्ररथेन लिङ्गात् ।

३४ आणि (जानश्रुति हा शूद्र-जातीचा नव्हे). कारण (तो) क्षत्रिय आहे असें समजतें.
३५ पुढें चैत्ररथाबरोबर (निर्देश केला आहे) या चिन्हावरून-(ही तो क्षत्रिय आहे असें समजतें).

३५ आणखी पुढें चैत्ररथाबरोबर (निर्देश केला आहे) या चिन्हावरून क्षत्रिय आहे असें ज्ञान होत असल्यामुळें (तो जानश्रुति शूद्रजातीचा नव्हे).

३६ संस्काराचा परामर्श केला असल्यामुळें आणि (शूद्राला) त्या (संस्कारा-) चा अभाव सांगितला असल्यामुळें (शूद्राला अधिकार नाहीं).

३६ संस्काराचा परामर्श केला असल्यामुळें आणि (शूद्राला) त्या (संस्कारा-) चा अभाव सांगितला असल्यामुळें (शूद्राला अधिकार नाहीं).

३७ तो (शूद्र) नव्हे असा निश्चय झाल्यानंतर प्रवृत्ति झाली आहे म्हणूनही (शूद्राला अधिकार नाहीं).

३७ तो (शूद्र) नव्हे असा निश्चय झाल्यानंतर प्रवृत्ति झाली आहे म्हणूनही (शूद्राला अधिकार नाहीं).

८० 'यत्वावग' (व. म.) 'यत्वावगतेश्च । उत्तर' (रा.)

८१ जानश्रुति राजाचे दानशूरत्व वगैरे गुण श्रुतीमध्यें (छा. ४।१।१) वर्णिले आहेत त्यावरून 'तो क्षत्रिय आहे' असें समजतें.

८२ जानश्रुतीनें रैक्कऋषीला गाय वगैरे पदार्थ दिले. त्यावरून 'तो क्षत्रिय आहे' असें समजतें, तसेंच श्रुतीमध्यें पुढें संवर्गविद्येच्या उपासनेमध्यें शौनक कापेय ब्राह्मण आणि अभिप्रतारी काक्षसेनी चैत्ररथनामक क्षत्रिय या दोघां गुरुशिष्यांचें वर्णन केलें आहे. तेव्हां पूर्वी वर्णिलेले जे रैक्क गुरु आणि जानश्रुति शिष्य हे दोघे अनुक्रमानें ब्राह्मण व क्षत्रिय आहेत असें मानणें योग्य आहे.

३६ संस्कारपरामर्शात्तदभावाभिलापाच्च। ३७ तदभावनिर्धारणे च प्रवृत्तेः।

षीचें सर्वज्ञत्त्व) सूचित होतें. (ब्रह्मवेत्त्याला सर्वज्ञत्त्व असणें) हें योग्यच आहे.

३५ आणि (तो) क्षत्रिय आहे असें ज्ञान होतें. तसेंच पुढें चैत्ररथा-(चा निर्देश केला आहे हें) चिन्ह आहे. यावरून (तो जानश्रुति शूद्रजातीचा नव्हे).

३६ संस्काराचा परामर्श केला असल्यामुळें आणि (शूद्राला) त्या (संस्कारा-) चा अभाव सांगितला असल्यामुळें (शूद्राला अधिकार नाहीं).

३७ तो (शूद्र) नव्हे असा निश्चय झाल्यानंतरच प्रवृत्ति झाली आहे म्हणून-(ही शूद्राला अधिकार नाहीं).

अर्थ आहे).

३५ आणखी पुढें चित्ररथाच्या संबंधाचें चिन्हें असल्यावरून क्षत्रिय आहे असें ज्ञान होत असल्यामुळें (तो जानश्रुति शूद्रजातीचा नव्हे).

३६ (वेदाध्ययनाकरतां) संस्काराचा परामर्श केला असल्यामुळें आणि (शूद्राला) त्या (संस्कारा-) चा अभाव सांगिला असल्यामुळें (शूद्राला वेदाचा अधिकार नाहीं).

३७ आणि तो (शूद्र) नव्हे असा निश्चय झाल्यानंतर प्रवृत्ति झाली आहे म्हणून (शूद्राला संस्कार नाहीं).

---

८३ श्रुतीमध्यें पुढें (छां० ४।२।२) 'त्या जानश्रुतीचा रथ अश्वतरीनें युक्त आहे' असें सांगितलें आहे. हेंच चित्ररथाच्या संबंधाचें चिन्ह होय. कारण 'अश्वतरीनें युक्त' अशा रथाला चित्ररथ म्हणतात असें ब्राह्मणमध्यें सांगितलें आहे. तेव्हां या चिन्हावरून 'जानश्रुति हा क्षत्रिय आहे' असें समजतें. कारण जर तो शूद्रजातीचा असेल तर त्याला वेदाचा अधिकार नसल्यामुळें रथित्वच संभवत नाहीं. कारण 'जेथें वेद आहे तेथेंच रथ आहे' असें ब्रह्मवैवर्तीमध्यें सांगितलें आहे. शूद्राला वेदाचा अधिकार नाहीं हें पुढच्या सूत्रामध्यें सांगितलें आहे.

८४ 'उपनयनानंतर त्याचेकडून वेदाध्ययन करवावें' असा स्मृतीमध्यें (आ. सू.) अध्ययनाकरतां संस्काराचा परामर्श केला आहे. आणि पैंगीश्रुतीमध्यें 'शूद्राला संस्कार नाहीं' असें सांगितलें आहे.

३८ श्रवणाध्ययनार्थप्रतिषेधात्स्मृतेश्च ।

३८ श्रवण अध्ययन आणि वैदिक गोष्टी-(चें ज्ञान आणि आ-चरण) यांचा स्मृतीमध्यें निषेध केला आहे म्हणूनही (शूद्राला अधिकार नाहीं). (१०)

३९ कंपनावरून (हा परमात्मा आहे असें समजतें). (११)

४० ज्योति म्हणजे (ब्रह्म होय). कारण (ब्रह्म) दृष्टोत्पत्तीस येत आहे. (१२)

३८ (वेदाचें) श्रवण अध्ययन आणि त्याप्रमाणें आचरण यांचा (शूद्राला) निषेध केला आहे म्हणून-(हीं शू-द्राला अधिकार नाहीं).

३९ स्मृतीवरूनही (असेंच सिद्ध होतें). (९)

४० कंपनावरून-(हा आंगव्या-एवढा पुरुष परमात्मा होय).

४१ (श्रुतीमध्यें आंगव्याएवढ्या पुरुषाचें) तेज (सांगितलेलें) दृष्टीस पडतें. त्यावरून-(हा तो

८५ श्रवणाध्ययनार्थप्रतिषेधात् । स्मृतेश्च । (रा.)

८६ शूद्रानें वेदाचें श्रवण केलें असतां त्याला जें प्रायश्चित्त सांगितलें आहे (पृ. ३६१ पं. २० पहा), आणि त्याला जो उपदेशाचा निषेध केला आहे तो येथें स्मृति-शब्दानें घेतला आहे.

८७ ' शूद्रानें वेदाक्षराचा विचार केला असतां तत्क्षणीं तो पतित होतो ' या स्मृतीवरून हेंच सिद्ध होतें.

८८ ' शूद्रांना अग्नि नाहीं, यज्ञ नाहीं, अध्ययन नाहीं, त्यांनीं फक्त तीन वर्णांची सेवा करावी ' असें स्मृतीमध्यें सांगितलें आहे.

८९ सूत्रकारांनीं मध्येंच कांहीं प्रसंग आल्यावरून ब्रह्मविद्येच्या अधिकारासंबंधानें विचार केला. आतां ' आंगव्याएवढा पुरुष परमात्माच आहे ' हें जें पूर्वी सहाव्या अधिकरणामध्यें सिद्ध केलें आहे त्याचीं कारणें पुन्हां या सूत्रापासून सांगतलीं आहेत. ' सूर्य चंद्र वगैरे सर्व जग ह्याच्या भीतीनें कंपित होतें ' असें श्रुतीमध्यें (का. ६।६।२) पुढें आंगव्याएवढ्या पुरुषासंबंधानेंच म्हटलें आहे. तेव्हां अर्थातच ' आंगव्याएवढा पुरुष परमात्माच आहे ' असें सिद्ध होतें.

९० काठक उपनिषदामध्यें (पृ. ३६४ पं. १० पहा), परमात्म्याच्या मारक रूपाचें वर्णन केलें आहे. प्राणाचें किंवा इंद्राचें वर्णन केलें नाहीं. कारण तेथें ' जग

३९ कम्पनात् । ४० ज्योतिर्दर्शनात् ।

३८ शिवाय (वेदाचें) श्रवण अध्ययन आणि त्याच्या अर्थाचें ज्ञान यांचा (शूद्राला) निषेध केला आहे. स्मृतीमध्येंही तसेंच सांगितलें आहे. (९)	३८ शिवाय (वेदाचें) श्रवण अध्ययन आणि त्याच्या अर्थाचें ज्ञान यांचा (शूद्राला) निषेध केला आहे. स्मृतिमध्येंही तसेंच सांगितलें आहे. (९)
३९ कंपन सांगितलें असल्यावरून (ब्रह्मच उपास्य आहे जसें समजतें). (१०)	३९ कंपन सांगितलें असल्यावरून (वज्र म्ह० परमात्माच होय). (१०)
४० न्यायावरून ज्योति (म्हणजे ब्रह्म होय). (११)	४० ज्योति म्हणजे (ब्रह्म होय). कारण (तसें) दृष्टोत्पत्तीस येतें. (११)

कंपित होतें ' असें सांगितलें आहे.

९१ काठक उपनिषदामध्यें (पृ. ३६४ पं. १० पहा.) ' जग कंपित होतें ' असें सांगितलें असल्यामुळें तेथें वज्रशब्दानें जो वर्णिला आहे तो परमात्माच वर्णिला आहे असें समजावें. कारण ' जर परमात्म्याचा संबंध नसेल तर कोणत्याही वस्तूची हालचाल होत नाहीं ' असें श्रुतीमध्यें (तै. २।७।१) सांगितलें आहे

९२ ' त्या ठिकाणीं सूर्य प्रकाशत नाहीं ' (का. ५।१५) इत्यादि श्रुतीमध्यें त्या आंगठ्याएवढ्या पुरुषाचें कांहीं विलक्षणप्रकारचें तेज वर्णिलेलें दृष्टीस पडतें.

९३ ' सुषुप्त्यवस्थमध्यें जीवात्मा हा परमात्म्याच्या रूपानें संपन्न होतो ' असें श्रुतीमध्यें (छां ६।८।१) इतर ठिकाणीं वर्णिलें आहे त्या न्यायानें प्रकृत-श्रुतीमध्यें (पृ. ३६७ पं. २६ पहा) हीं तेंच वर्णिलें आहे असें समजतें. कारण येथें सुषुप्त्यवस्थेचा बोधक संप्रसाद ' हा शब्द आहे. तर्‍हीं अर्थातच ' प्रकृत—श्रुतीमध्यें ज्योतिशब्दानें परमात्माच घेतला पाहिजे ' असें सिद्ध होतें

९४ बृहदारण्यकामध्यें [४।३।७] हृदयाच्या आंतील ज्योतीचें वर्णन केलें आहे. तेथें ज्योति म्हणजे परमात्माच होय, जीवात्मा नव्हे. कारण ' विष्णुच ज्योति आहे ' असें चतुर्वेदशिखेमध्यें सांगितलेलें दृष्टोत्पत्तीस येतें

४१ आकाशोऽर्थान्तरत्वादिव्यपदेशात् । ४२ सुषुप्त्युत्क्रान्त्योर्भेदेन ।

	परमात्मा आहे असें सिद्ध होतें. (६)
४१ निराळी वस्तु आहे इत्यादि सांगितलें आहे म्हणून आकाश म्हणजे (परब्रह्म होय). (१३)	४२ निराळी वस्तु आहे इत्यादि सांगितलें आहे म्हणून आकाश म्हणजे (परब्रह्म होय).
४२ सुषुप्त्यवस्थेमध्यें आणि उत्क्रांतीमध्यें भिन्न आहे (असें सांगितलें आहे) म्हणून (परमात्म्याचेंच स्वरूप सांगण्याविषयीं तात्पर्य आहे)	४३ सुषुप्त्यवस्थेमध्यें आणि उत्क्रांतीमध्यें (परमात्म्याचा जीवात्म्यापेक्षां) भेदानें (निर्देश केला आहे म्हणून आकाश म्हणजे परमात्माच होय, जीवात्मा नव्हे).
४३ पति वगैरे शब्दांवरून (परमात्म्याचें स्वरूप सांगण्याविषयीं तात्पर्य आहे). (१४)	४४ पति वगैरे शब्दांवरून-(हा परमात्मा हा जीवात्म्यापेक्षां भिन्न आहे असें समजतें). (१०)

९५ छांदोग्यश्रुतीमध्यें [८।१४।१] आकाश म्हणजे परमात्माच होय, मुक्त आत्मा नव्हे. कारण तेथें नामरूपांचा निर्वाह करणारा [म्ह. उत्पन्न करणारा] असें म्हटलें आहे. तेव्हां अर्थातच आकाश म्हणून जी वस्तू आहे ती जीवापेक्षां निराळी आहे असें सांगितल्यासारखें होतें. कारण जीव मुक्त झाला तरी त्याला जगासंबंधीं व्यापार करतां येत नसल्यामुळें त्याचे हातून नामरूपांची उत्पत्ति संभवत नाहीं.

९६ छांदोग्य श्रुतीमध्यें (८।१४।१) आकाश म्हणजे परमात्माच होय, भूताकाश नव्हे. कारण भूताकाशाचा जो प्रसिद्ध उपयोग (म्ह. प्रयोजन) त्यापेक्षां ह्या आकाशाचा निराळा उपयोग सांगितला आहे. 'नामरूपांचा खरोखर निर्वाह करणारा' हे श्रुतीमधील शब्द 'नामरूपांना जागा देणारा' अशा अर्थानें भूताकाशाकडे लावणें बरोबर नाहीं. कारण 'नांवारूपाला जागा देणें' हें कांहीं विलक्षण सामर्थ्य होत नाहीं. आणि येथें तर 'खरोखर' या शब्दावरून 'नामरूपांचा निर्वाह करणें' हें कांहीं विलक्षण माहात्म्य वर्णिलें आहे असें समजतें. तेव्हां 'नामरूपांचा निर्वाह करणारा'

४३ पत्यादिशब्देभ्यः ॥ प्रथमाध्याये तृतीयः पादः ॥

४१ निराळें[96] प्रयोजन वगैरे सांगितलें आहे म्हणून आकाश म्हणजे (परब्रह्म होय). (१२)	४१ निराळी वस्तु आहे इत्यादि सांगितलें आहे म्हणून आकाश म्हणजे (परब्रह्म होय). (१२)
४२ सुषुप्त्यवस्थेमध्यें आणि उत्क्रांतीमध्यें भिन्न आहे (असें सांगितलें आहे) (म्हणून परमात्म्याचेंच स्वरूप सांगण्याविषयीं तात्पर्य आहे).	४२ सुषुप्त्यवस्थेमध्यें[98] आणि उत्क्रांतीमध्यें (जीवात्मा आणि परमात्मा यांचा) भेदानें (निर्देश केला आहे म्हणून असंग पुरुष परमात्माच होय). (१३)
४३ पति वगैरे शब्दांवरून (परमात्म्याचें स्वरूप सांगण्याविषयीं तात्पर्य आहे). (१३)	४३ पति[99] वगैरे शब्दांवरून (ब्राह्मण हा परमात्माच होय). (१४)

हे शब्द ' नामरूपें उत्पन्न करणारा ' अशा अर्थानें परमात्म्याकडे लावणें योग्य असल्यामुळें आकाश म्हणजे परमात्मा हें सिद्ध होतें.

९७ ' आकाशशब्दानें परमात्माच घेतला पाहिजे. मुक्त असा जीवात्मा घेतां येत नाहीं असें जें पूर्वसूत्रांत सांगितलें तें बरोबर नाहीं, कारण जीवात्मा आणि परमात्मा यांमध्यें मुळीं भेदच नाहीं ' अशी जी शंका येते तिचें हें उत्तर आहे.

९८ बृहदारण्यकामध्यें [४।३।१५] असंग पुरुषाचें वर्णन केलें आहे. तो पुरुष परमात्माच होय जीवात्मा नव्हे. कारण जीवाला असंगत्व संभवत नाहीं. शं. परमात्मा ज्याअर्थी असंग आहे त्याअर्थी जीवात्मा असंग असलाच पाहिजे. कारण त्या दोघांमध्यें भेद नाहीं. उ. सुषुप्त्यवस्थेमध्यें आणि उत्क्रांतीमध्यें त्या दोघांचा भेदानें निर्देश केला आहे (पृ. ३७२ पं. २६ पहा).

९९ बृहदारण्यकामध्यें (४।४।२३) ' हा ब्राह्मणाचा नित्य महिमा ' असें सांगितलें आहे. त्याठिकाणीं ब्राह्मण म्हणजे परमात्माच होय; ब्रह्मदेव नव्हे. कारण तेथें त्या ब्राह्मणाला ' सर्वांचा अधिपति ' असें म्हटलें आहे.

१ आनुमानिकमप्येकेषामिति चेन्न शरीररूपकविन्यस्तगृहीतेर्दर्शयति च।

अध्याय १ पाद ४.

१ आनुमानिक (जें प्रधान तें) देखील कांहीं (शाखे-) मध्यें (शब्दानें सांगितलें आहे) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण रूपकामध्यें आलेलें जें शरीर तेंच तेथें घेतलें आहे. (श्रुतीही असेंच) सांगते.

२ तथापि (अव्यक्तशब्दानें येथें) सूक्ष्म (शरीर विवक्षित आहे). कारण (तेंच) त्या (शब्दानें घेण्यां-) ला योग्य आहे.

१ आनुमानिक (जें प्रधान तें-) देखील कांहीं (शाखे—) मध्यें (शब्दानें सांगितलें आहे) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण रूपकामध्यें आलेलें जें शरीर तेंच तेथें घेतलें आहे. (श्रुतीहि असेंच) सांगते.

२ तथापि (अव्यक्तशब्दानें येथें) सूक्ष्म (शरीर विवक्षित आहे). कारण तें-(च पुरुषार्थसाधनाविषयीं होणाऱ्या प्रवृत्तीला) योग्य आहे.

१ श्रुती पहा. (पृ. ३८९ पं. २३)

२ महत् म्ह. ब्रह्मज्ञान. तें बुद्धीपेक्षां पर म्ह. श्रेष्ठ आहे. त्या महतापेक्षां अव्यक्त म्ह. भगवत्कृपा पर आहे. तिच्यापेक्षां पुरुष म्हणजे परमात्मा पर आहे. असा काठक श्रुती-(३।११) चा अर्थ आहे. 'हा आत्मा सूक्ष्म बुद्धीच्या योगानें प्रकाशित होतो' (का. ३।१२) असें श्रुतीनेंच पुढें सांगितलें आहे. तेव्हां श्रुतीमधील महत् वगैरे शब्दांचे सांख्यांनीं कल्पिलेले महत्तत्व वगैरे अर्थ नाहींत असें सिद्ध झालें.

३ शं. अव्यक्त वगैरे शब्द परमात्म्याचे वाचक नव्हेत. कारण काठकश्रुती. मध्यें (१।३।११) अव्यक्तशब्दानें प्रधान घेतलें आहे. उ. ज्याप्रमाणें शरीर हें पुरुषाच्या अधीन असतें, त्याप्रमाणें प्रधान हें परमात्म्याच्या अधीन असल्यामुळें प्रधान हें परमात्म्याच्या शरीरासारखें आहे, आणि त्या शरीरामध्यें तो स्थित आहे. तेव्हां अव्यक्तशब्दानें तो परमात्माच घेतला आहे म्ह. अव्यक्त हा शब्द परमात्म्याचाच वाचक

२ सूक्ष्मं तु तदर्हत्वात् ।

अध्याय १ पाद ४.

१ आनुमानिक (जे प्रधान वगैरे पदार्थ ते-) देखील कांहीं (शाखे-) मध्यें (शब्दानें सांगितले आहेत) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण रूपकामध्यें आलेले जे शरीर-(संबंधी पदार्थ) तेच तेथें घेतले आहेत. (श्रुतीही असेंच) सांगते.

२ तथापि तें (ब्रह्म) सूक्ष्म आहे. (तेव्हां त्याची कृपा ही अव्यक्तशब्दानें घेण्याला) योग्य आहे.

१ आनुमानिक (जें प्रधान तें) कांहीं (शाखे-) मध्यें (शब्दानें सांगितलें आहे) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण शरीरासारख्या (प्रधाना-) मध्यें असलेलें (ब्रह्मच तेथें) घेतलें आहे. (श्रुतीही असेंच) सांगते.

२ सूक्ष्म हाच (अव्यक्तश-ब्दाचा अर्थ आहे). कारण तें (सूक्ष्मच अव्यक्तशब्दानें घेण्याला) योग्य आहे.

आहे. आतां परमात्म्याचा प्रधानाशीं संबंध असल्यामुळें प्रधानरूपी गौण अर्थही कांहीं श्रुतीमध्यें अव्यक्तशब्दानें घेतला आहे. ' अल्प अशा (अव्यक्ता-) नें ब्रह्म आच्छादित झालें ' (तै. ब्रा. ३।८।९). ही श्रुति ' प्रधानामध्यें परमात्मा स्थित आहे ' असें सांगते.

४ शं. श्रुतीमध्यें इंद्रिय वगैरे धर्मींचें प्रकरण चालू झालें असतां मध्येंच अव्यक्त शब्दानें भगवत्कृपारूपी धर्म घेणें बरोबर नाहीं. आतां अव्यक्तशब्दाचा सूक्ष्म असा अर्थ असल्यामुळें सूक्ष्म असा कोणी तरी धर्म अव्यक्तशब्दानें घेतला पाहिजे. उ० सूक्ष्म जें ब्रह्म तो येथें अव्यक्तशब्दाचा मुख्य अर्थ आहे. परंतु धर्म आणि धर्मी यांचें ऐक्य असल्यामुळें भगवत्कृपारूपी जो ह्या ब्रह्माचा धर्म तो अव्यक्तशब्दानें येथें घेण्यास हरकत नाहीं.

५ तेव्हां ब्रह्म हें अनंत सूक्ष्म असल्यामुळें तोच अव्यक्तशब्दाचा मुख्य अर्थ होय असें सिद्ध झालें.

३ तदधीनत्वादर्थवत् ।	४ ज्ञेयत्वावचनाच्च ।
३ (जगाची पूर्व स्थिति म्हणजे प्रधान नव्हे.) कारण ती त्या (म्हणजे परमेश्वरा-)च्या अधीन आहे. (आणि ती मानण्यापासून) उपयोग आहेत.	३ (सूक्ष्म[६] शरीर हें) त्या (परमात्म्या-)च्या अधीन असल्यामुळें उपयोगी आहे.
४ शिवाय (अव्यक्त म्हणजे प्रधान नव्हे). कारण तें ज्ञेय अशा रूपानें (येथें) सांगितलें नाहीं.	४ शिवाय (अव्यक्त म्हणजे प्रधान नव्हे). कारण तें ज्ञेय अशा रूपानें (येथें) सांगितलें नाहीं.
५ (प्रधान ज्ञेय आहे असें श्रुति) सांगते असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण प्रकरणावरून प्राज्ञ (आत्मा तेथें ज्ञेय म्हणून सांगितला आहे असें समजतें).	५ (प्रधान ज्ञेय आहे असें श्रुति) सांगते असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण प्रकरणावरून प्राज्ञ (आत्मा तेथें ज्ञेय म्हणून सांगितला आहे असें समजतें).

६ अव्यक्त म्ह. सूक्ष्म शरीर, आणि त्याचे परिणाम, हीं स्वतंत्र तत्वें नव्हेत. तर तीं परमात्म्याचें जें शरीर तत्स्वरूपच आहेत. म्हणूनच त्या सूक्ष्म शरीर वगैरेंच्या पासून व्यवहारामध्यें सर्व कार्यें साधतात. ही गोष्ट सांख्य लोक मानीत नसल्यामुळें प्रकृत श्रुतीमध्यें अव्यक्तशब्दानें सांख्य लोकांनीं मानिलेलें प्रधान घेतां येत नाहीं.

७ शं० धर्म आणि धर्मी यांचें जर ऐक्यच आहे तर ‘ कृपारूपी धर्मीपेक्षां ब्रह्म-रूप धर्मी पर आहे ’ असें म्हणतां येत नाहीं. उ० ज्याप्रमाणें एकच परमात्मा सत् आणि चित् यारूपानें साधनीभूत ज्ञानाचा विषय होतो आणि आनंद रूपानें तोच त्या ज्ञानाचें अर्थ म्ह. फल होतो, त्याप्रमाणें कृपेनें युक्त आत्मा साधन आहे आणि आनंदरूप आत्मा फल आहे. तेव्हां जरी धर्म आणि धर्मी यांचें ऐक्य मानिलें तरी ‘कृपारूप आत्म्यापेक्षां आनंदरूपी ब्रह्म पर आहे ’ असें म्हणण्यास हरकत नाहीं.

५ वदतीति चेन्न प्राज्ञो हि प्रकरणात् ।

३ (रूपाँ हीं) त्या (परमात्म्या-) च्या अधीन असल्यामुळें (तिच्यापेक्षां परमात्मा पर आहे). अर्थाप्रमाणें हें होय.	३ (प्रधानाचे धर्म) त्या (परमात्म्या-) च्या अधानि असल्यामुळें (ते शब्द परमात्म्याचे ठिकाणींच) अर्थवान् आहेत.
४ शिवाय (अव्यक्त म्हणजे प्रधान नव्हे). कारण तें ज्ञेय अशा रूपानें (येथें) सांगितलें नाहीं.	४ (शिवाय अव्यक्त म्हणजे प्रधान नव्हे). कारण तें ज्ञेय अशा रूपानें (येथें) सांगितलें नाहीं.
५ (प्रधान ज्ञेय आहे असें श्रुति) सांगते असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण प्रकरणावरून प्राज्ञ (आत्मा तेथें ज्ञेय म्हणून सांगितला आहे असें समजतें).	५ (प्रधान ज्ञेय आहे. असें श्रुति) सांगते असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण प्राज्ञ (आत्मा तेथें ज्ञेय म्हणून सांगितला आहे). ६ प्रकरणावरून (हें सिद्ध होतें).

८ शं० अव्यक्तशब्दानें प्रधानच घेतलें पाहिजे. कारण ‘ अव्यक्त हें महताहून पर आहे ’ (का० १।३।११) ह्या श्रुतीमध्यें ‘ महताहून पर असणें ’ इत्यादि प्रधानाचे धर्म सांगितले आहेत. उ० प्रधान हें परमात्म्याच्या अधीन असल्यामुळेंच ते धर्म ह्या प्रधानाचे ठिकाणीं प्राप्त झाले आहेत. तेव्हां त्या धर्मांना दाखविणारे शब्द परमात्म्याचे ठिकाणींच अर्थवान् आहेत म्ह० खऱ्या रीतीनें परमात्म्याचेच वाचक आहेत.

९ ‘ वदतीतिचेन्न प्राज्ञो हि । प्रकरणात् ’ (म.)

१० आतां जरी श्रुतीमध्यें (पृ. ३९८ पं. १ पहा) ‘ महताहून पर ’ असें म्हटलें आहे तरी तेवढ्यावरून अव्यक्तशब्दाचा प्रधान हा अर्थ ठरवितां येत नाहीं. कारण परमात्मा हा सर्व वस्तूंपेक्षां पर असल्यामुळें तो महताहून पर आहेच.

११ ‘ तें विष्णूचें श्रेष्ठ पद होय ’ (का. ३।९) असें ह्या श्रुतीमध्यें परमात्म्याचेंच प्रकरण चालूं आहे.

६ त्रयाणामेव चैवमुपन्यासः प्रश्नश्च ।

६ आणखी तिहींचाच अशा रूपानें उपन्यास केला आहे, व प्रश्नही (तिहींबद्दलच) आहे.

७ आणि महत् (शब्दा-) प्रमाणें (अव्यक्तशब्द प्रधानवाची नव्हे). (१)

८ (अजा म्हणजे प्रधान नव्हे.) कारण (कोणताही) विशेष सांगितला नाहीं. चमसाप्रमाणें (ही गोष्ट होय).

६ आणखी[12] तिहींचाच ज्ञेय अशा रूपानें उपन्यास केला आहे. व प्रश्नही (तिहींबद्दलच) आहे.

७ आणि महत् (शब्दा-) प्रमाणें (अव्यक्तशब्द प्रधानवाची नव्हे). (१)

८ (अजा म्हणजे प्रधान नव्हे.) कारण (कोणताही) विशेष सांगितला नाहीं. चमसाप्रमाणें (ही गोष्ट होय).

१२ उपाय म्ह. साधन, उपेय म्ह. साध्य, उपेता म्ह. साधक या तिघांसंबंधानेंच काठक उपनिषदामध्यें प्रश्न व उपन्यास आहे. नचिकेत्यानें 'आपल्यावर बापाची मर्जी सुप्रसन्न असावी' असा पहिला वर मागितला. यामध्यें साधनाचा उपन्यास केला आहे. कारण 'बापाची मर्जी सुप्रसन्न असणें' हें मोक्षाचें साधन आहे. त्याशिवाय तो मोक्षाला योग्य होत नाहीं. तसेंच दुसऱ्या वरामध्यें मोक्षाचें साधन जी अग्निविद्या तिचा उपन्यास केला आहे. तसेंच तिसऱ्या वरामध्यें 'मनुष्य मृत झाला असतां जो हा संशय येतो' (का. १-२०) इत्यादि श्रुतीनें साध्य मोक्ष, साधक जीवात्मा, आणि साधनीभूत उपासना या तिघांबद्दल प्रश्न केला आहे. व पुढें त्याचीं उत्तरें दिलीं आहेत. तात्पर्य या काठक उपनिषदामध्यें प्रधानाचा ज्ञेय या रूपानें उपन्यास केला नाहीं, व प्रश्नही नाहीं. म्हणून अव्यक्त शब्दानें प्रधान घेतां येत नाहीं.

१३ 'देवांनाही या गोष्टीविषयीं संशय आहे,' इत्यादि श्रुतीमध्यें (का. १।२१) जीवाचा उपन्यास केला आहे.

१४ पितृसौमनस्य म्ह. बापाची मर्जी खुष राहणें, स्वर्गाचें साधन अग्नि आणि परमात्मा या तिहींचाच. जरी 'पितृसौमनस्य असावें' अशी नचिकेत्यानें यमाची प्रार्थना केली आहे, प्रश्न केला नाहीं, तरी 'प्रार्थना' असाही प्रश्नशब्दाचा अर्थ असत्यामुळें 'येथें तिहींबद्दल प्रश्न आहे' असें म्हणतां येतें.

१५ ज्याप्रमाणें श्रुतीमध्यें (का. १।२।२२) महत् शब्दाचा परमात्मा हाच मुख्य अर्थ आहे त्याप्रमाणेंच अव्यक्त शब्दाविषयीं समजावें.

७ महद्वच्च । ८ चमसवदविशेषात् ।

६ आणखी तिहींचाच अशा रूपानें उपन्यास केला आहे, व प्रश्नही (तिहींबद्दलच) आहे.

७ आणि महत् (शब्दा-) प्रमाणें (अव्यक्त शब्द प्रधानवाचीं नव्हे). (१)

८ (अजा म्हणजे प्रधान नव्हे.) कारण विशेष (प्रकारची कल्पना करतां येत) नाहीं. चमसाप्रमाणें (ही गोष्ट होय).

७ आणखी तिहींचेंच अशा रूपानें उपन्यास केला आहे. व प्रश्नही (तिहींबद्दलच) आहे.

८ आणि महत् (शब्दा-) प्रमाणें- (च अव्यक्तशब्द आहे).

९ चमसाप्रमाणें (अव्यक्त वगैरे शब्द परमात्म्याचे वाचक आहेत). कारण विशेष नाहीं. (१)

१६ ब्रह्मस्वरूपी जे प्रधान, महत्तत्व, अहंकार, वगैरे पदार्थ ते सूत्रकारांना मान्यच आहेत. परंतु ‘ ब्रह्मस्वरूपाहून भिन्न असे प्रधान वगैरे पदार्थ आहेत ’ असें जें सांख्य लोकांचें मत त्याचें खंडन करण्याविषयीं ह्या पादामध्यें सूत्रकार प्रवृत्त झाले आहेत असें समजावें.

१७ ‘ ज्याप्रमाणें खालीं तोंडाचा ’ (बृ. २।२।३) ह्या मंत्रामध्यें इतर मंत्र पाहिल्याशिवाय विशेष प्रकारच्या चमसाची कल्पना करतां येत नाहीं, त्याप्रमाणें ‘ एक अजा ’ (श्वे. ४।५) ह्या एकट्या मंत्रावरून लोहित, शुक्ल, कृष्ण म्ह. सत्व, रज आणि तम हे तीन गुण आणि ‘ अजा म्ह. प्रधान ’ अशी विशेषप्रकारची कल्पना करतां येत नाहीं. तसेंच श्रुतीमध्यें (पृ. ४७८ पं. ८ पहा) कपिलाचा मोठेपणा वर्णिला आहे म्हणून त्या कपिलाचें मत म्ह. सांख्यमत श्रुतिसिद्ध आहे. अशी विशेष प्रकारची कल्पना करणें बरोबर नाहीं. कारण श्रुतीमध्यें वर्णिलेला कपिल वैदिक आहे. मागें (परिशिष्ट पृ. ६४ टीप ६४) पहा.

१८ ज्याप्रमाणें चमस शब्दाचा ‘ यज्ञांतील पात्र ’ हा अर्थ प्रसिद्ध असूनही श्रुतीवरून (पृ. ४०९ पं. १३ पहा) त्या शब्दाचा ‘ मस्तक ’ हा अर्थ घेतला जातो, त्याप्रमाणें अव्यक्त वगैरे शब्दांचे प्रधान वगैरे अर्थ प्रसिद्ध असूनही ‘ सर्व नांवें विष्णूमध्यें प्रविष्ट होतात ’ या श्रुतीवरून त्या शब्दांचा परमात्मा हा अर्थ घेतला जातो. श्रुतिप्रमाण दोन्ही ठिकाणीं सारखेंच आहे.

९ ज्योतिरुपक्रमा तु तथा ह्यधीयत एके ।

९ परंतु (अजा म्हणजे) तेज आदिकरून (तीन महाभूतें) होत. कारण कांहीं (शाखेचे) लोक असाच पाठ म्हणतात.

१० आणि मधु वगैरें- (च्या रूपका-) प्रमाणें (येथें) रूपक वर्णिलें आहे. म्हणून (यांत कांहीं) विरुद्ध नाहीं. (२)

९ ब्रह्म[२] हें जिचें कारण आहे अशीच (ही अजा आहे). कारण कांहीं (शाखेचे) लोक असाच पाठ म्हणतात.

१० आणि[२३] सृष्टीचा उपदेश केला आहे म्हणून विरोध येत नाहीं. मधु वगैरेंप्रमाणें (हें समजावें). (२)

१९ ' मात्तु तथा (व. म.).

२० तैत्तिरीय शाखेमध्यें ब्रह्मापासून प्राण वगैरेंची उत्पत्ति सांगून पुढें 'एक अजा' (म. ना. ९।२) ह्या मंत्राचा पाठ केला आहे. तेव्हां सर्व वस्तूंची कारणीभूत जी ही अजा (म्ह. प्रधान) ती ब्रह्मापासून उत्पन्न झालेलीच आहे असें प्रकरणावरून समजतें.

२१. प्रकृत श्रुतीमध्यें (श्वे. ४।५) अजा म्हणजे तेजोबन्नरूपी देवता (पृ. ४०९ पं. २० पहा) होय. कारण श्रुतीमध्यें मागें अग्नि वगैरे ज्योतींचाच उपक्रम केला आहे.

२२. कर्म वगैरे अर्थांचे प्रतिपादक असे जे ज्योतिष्टोम वगैरे शब्द यांचाही 'परमात्मा' हाच अर्थ आहे. कारण 'सर्व ऋचा, सर्व वेद यांचा परमात्माच वाच्य आहे' असें एका शाखेच्या लोकांनीं श्रुतीमध्यें म्हटलें आहे.

२३. शं० जर ही अजा ब्रह्मापासून उत्पन्न झालेली आहे तर हिला अजा असें कसें म्हणतां येतें? उ० 'परमात्मा हा ह्या अजेपासून जग उत्पन्न करतो' असा श्रुती-

१० कल्पनोपदेशाच्च मध्वादिवदविरोधः ।

९ परंतु[21] (अजा म्हणजे) ज्योतीरूपी (देवता होय)असें उपक्रमावरून (समजतें). कारण कांहीं (शाखेच) लोक असाच पाठ म्हणतात.	१० ज्योति[22] वगैरे (शब्दांचा परमात्मा-) च (अर्थ आहे). कारण कांहीं (शाखेचे) लोक असेंच म्हणतात.
१० आणि मधु वगैरें-(च्या रूपका-) प्रमाणें (येथें) रूपक वर्णिलें आहे. म्हणून यांत (कांहीं) विरुद्ध नाहीं. (२)	११ मधु[24] वगैरेंप्रमाणें कल्पना केली असल्यामुळें कांहीं विरोध येत नाहीं. (२)

मध्यें (श्वे. ४।९) सृष्टीचा उपदेश केला आहे. त्यावरून ह्या अजेच्या 'कारण आणि कार्य' अशा दोन अवस्था आहेत असें समजतें. प्रलयाचे वेळीं ही अजा कारणावस्थेंत असते म्हणजे ब्रह्मरूप असते. ह्या दृष्टीनें हिला 'अजा' म्हणतां येतें. आणि सृष्टीच्या वेळीं ही कार्यावस्थेंत असते, ह्या दृष्टीनें हिला 'ब्रह्मापासून उत्पन्न झाली' असें म्हणतां येतें. म्हणून विरोध येत नाहीं. ज्याप्रमाणें आदित्य हा कारणावस्थेच्या दृष्टीनें एक असूनही त्याचे ठिकाणीं कार्यावस्थेच्या दृष्टीनें मधूची कल्पना केली आहे तशीच उदय अस्त यांची कल्पना केली आहे त्याप्रमाणेंच हें होय.

२४. शं. ज्योतिष्टोम वगैरे सर्व शब्दांचा जर 'परमात्मा' हा एकच अर्थ असेल तर त्या शब्दांचा कर्म वगैरे अर्थ समजून लोकांमध्यें जो व्यवहार होतो तो होणार नाहीं असा विरोध येतो. उ. ज्याप्रमाणें श्रुतीनें (छां. ३.१) सूर्याला मध म्हटलें आहे म्हणून त्या कल्पनेवरून मध वगैरे शब्दांचा लौकिक अर्थ नाहींसा होऊन लोकांचे व्यवहार बंद होत नाहींत; त्याप्रमाणेंच हें होय. तात्पर्य: 'ज्योति' वगैरे सर्व शब्दांचा त्या त्या लौकिक अर्थांशीं असलेला जो संबंध तो न सोडूनच त्याचा परमात्म्याशीं संबंध झाला आहे असें समजावें.

११ न संख्योपसंग्रहादपि नानाभावादतिरेकाच्च ।

११ संख्येनें (तत्वांचा) संग्रह केला आहे या (मुद्या-) वर देखील (प्रधानाला शब्द प्रमाण आहे असें म्हणतां येत) नाहीं. कारण (तत्वें) अनेक आहेत. शिवाय आधिक्य आहे.

१२ प्राण वगैरे (हेच पांच जन नामक पदार्थ होत, असें) वाक्यशेषावरून (समजतें).

१३ कांहीं (शाखे-) च्या मतीं अन्न जरी (सांगितलें) नाहीं तरी ज्योति (सांगितली) असल्यामुळें (पांच संख्या पूर्ण होते). (३)

११ संख्येनें (तत्वांचा) संग्रह केला आहे या (मुद्या-) वर देखील (सांख्यांचीं तत्वें श्रुतिसिद्ध आहेत असें म्हणतां येत) नाहीं. कारण (तत्वें) भिन्न आहेत. शिवाय आधिक्य आहे.

१२ प्राण वगैरे (हेच पांच जन नामक पदार्थ होत, असें) वाक्यशेषावरून (समजतें).

१३ कांहीं[२६] (शाखे-)च्या मतीं अन्न (सांगितलें) नाहीं. तेव्हां ज्योतीच्या योगानें (इंद्रियें हींच पांच जन नामक पदार्थ आहेत असें समजावें). (३)

२५. 'तत्वें भिन्न आहेत' म्हणजे सांख्यांचीं जीं तत्वें त्यापेक्षां हीं श्रुतीमधील तत्वें निराळीं आहेत. कारण हीं तत्वें परमात्म्यावर अवलंबून आहेत. असें या श्रुतीमध्यें सांगितलें आहे. आणि सांख्यलोक हीं तत्वें स्वतंत्र मानतात.

२६. शं. बृहदारण्यकांतील (४४।१७) पंचजन वगैरे शब्दांचा परमात्मा हा अर्थ घेतां येत नसल्यामुळें परमात्मा हा सर्व शब्दांचा वाच्य आहे असें म्हणतां येत नाहीं. कारण तेथें पंचजन अनेक आहेत असा संख्येचा बोध होत आहे. आणि परमात्मा तर एकच आहे. उ. परमात्मा जरी एक आहे तरी तो सर्व वस्तूंचे नियमन करणारा असल्यामुळें अनेक वस्तूंमध्यें अनेक रूपांनीं राहू शकतो. शं. 'ज्या परमात्म्याचे ठिकाणीं पंचजन आहेत' असा श्रुतीमध्यें 'परमात्मा हा पंचजनाचा आधार आहे' असें सांगितलें असल्यामुळें पंचजन शब्दानें परमात्मा घेतां येत नाहीं. उ. शरीरामध्यें त्या शरीराचें नियमन करणारा परमात्मा आहे आणि त्या शरीरामध्येंच असलेल्या आकाश

१२ प्राणादयो वाक्यशेषात् । १३ ज्योतिषैकेषामसत्यन्ने ।

११ संख्येनें (तत्वांचा) संग्रह केला आहे या (मुद्या-) वर देखील (सांख्यांचें मत सिद्ध होत) नाहीं, कारण (तत्वें) अनेक आहेत. शिवाय आधिक्य आहे.

१२ प्राण वगैरे (हेच पांच जन नामक पदार्थ होत, असें) वाक्यशेषावरून (समजतें).

१३ कांहीं (शाखेच्या) मतीं अन्न (सांगितलें) नाहीं. तेव्हां ज्योतीच्या योगानें (इंद्रियें हींच पांच जननामक पदार्थ आहेत असें समजावें). (३)

१२ संख्येचा संग्रह केला आहे तरी (परमात्मा हा सर्व शब्दांचा वाच्य आहे या गोष्टीला विरोध येत) नाहीं. कारण (परमात्म्याचीं रूपें) अनेक आहेत. आणि (तो) निराळा आहे.

१३ प्राँण वगैरे (हेच पांच जन नामक पदार्थ होत असें) वाक्यशेषावरून (समजतें).

१४ कांहीं (शाखे-) च्या मतीं अन्न जरी (सांगितलें) नाहीं तरी ज्योति (सांगितली) असल्यामुळें (पांच संख्या पूर्ण होते). (३)

प्राण वगैरेंचें नियमन करणारा परमात्मा आकाश, प्राण वगैरेंमध्यें आहे. तेव्हां 'ज्या परमात्म्याचे ठिकाणीं' या शब्दानें शरीराचें नियमन करणारा परमात्मा घ्यावा म्हणजे कांहीं दोष येत नाहीं.

२७. 'प्राणाचा प्राण, मनाचें मन' असें पुढें सांगितलें असल्यामुळें प्राण वगैरेंना प्राणत्व वगैरे देणारीं (म्हणजे प्राण वगैरेंचें नियमन करणारीं) जीं परमात्म्याचीं पांच रूपें तीं पांच जन शब्दानें घेतलीं आहेत असे समजतें.

२८. ब्रह्म हें ज्योतींचें ज्योति आहे असें पूर्वींच्या मंत्रामध्यें (बृ. ४।४।१६) सांगितलें आहे. ज्योति म्हणजे विषयांचा प्रकाश करून देणारीं पांच ज्ञानेंद्रियें होत. ब्रह्म हें त्याइंद्रियांचें ज्योति म्ह. प्रकाशक आहे असें या मंत्राचें तात्पर्य आहे. तेव्हां त्या पूर्वींच्या मंत्रावरून पुढील मंत्रामध्यें पांच जन म्ह. इंद्रियें होत असें समजतें.

१४ कारणत्वेन चाकाशादिषु यथाव्यपदिष्टोक्तेः ।

१४ आकाश वगैरेंचें (ब्रह्म) कारण आहे याविषयीं (श्रुतींचा विरोध नाहीं). कारण जशा रूपानें (तें ब्रह्म एका श्रुतींत) सांगितलें आहे तशाच रूपानें तें (इतर श्रुतीमध्यें) सांगितलें आहे.

१४ परंतु (परमात्म्यापासूनच जग उत्पन्न होतें). कारण पूर्वीं सांगितलेलें (ब्रह्मच) आकाश वगैरेंचें कारण आहे असें (श्रुतीमध्यें) सांगितलें आहे.

१५ (पुढील वाक्यांत ब्रह्माचाच) संबंध असल्यामुळें (मागील वाक्यांत असत् म्हणजे ब्रह्मच होय). (४)

१५ (पुढीलें[३१] वाक्यांत ब्रह्माचाच) संबंध असल्यामुळें (मागील वाक्यांत असत् अव्याकृत म्हणजे ब्रह्मच होय). (४)

२९. श्रुतीमध्यें परस्पर विरोध असल्यामुळें (पृ. ७७२ पं. १० पहा). तिचा अनादर करून स्मृतीच घेतली पाहिजे. तेव्हां कपिल स्मृतीवरून प्रधान हेंच जगाचें कारण सिद्ध होतें अशी जी शंका येते तिचें हें उत्तर आहे.

३०. शं० परमात्मा हा सर्व जगाचें कारण नाहीं. कारण 'आकाश, वायु वगैरेंच्यापासून वायु, अग्नि वगैरेंची उत्पत्ति होते' असें श्रुतीमध्यें (तै० २ । १ । १) सांगितलें आहे. उ० या श्रुतीमधील आकाश वायु वगैरे शब्दांचा 'आकाश, वायु वगैरेंमध्यें असलेला परमात्मा' असाच अर्थ आहे. कारण सर्व शब्द परमात्म्याचेच वाचक आहेत. 'परमात्मा हा सर्व वस्तूंमध्यें त्यांचें नियमन करण्याकरितां राहतो' असें श्रुतीमध्यें (बृ. ३ । ७ । १२) सांगितलें आहे. तात्पर्यः-आकाश वगैरेंचें जें बाह्य रूप तें वायु वगैरेंच्या उत्पत्तीचें कारण नव्हे. तर त्या ठिकाणीं असलेला परमात्माच त्या त्या रूपांनीं त्या त्या वस्तूंचें कारण होतो असें समजावें.

३१. बृहदारण्यकामध्यें (पृ. ४२७ पं. १७ पहा) अव्याकृत शब्दानें ब्रह्मच घेतलें पाहिजे प्रधान घेतां येत नाहीं. कारण पुढें श्रुतीमध्यें (बृ. १ । ४ । ७) 'तो

१५ समाकर्षात् ।

१४ आकाश[२९] वगैरेंचें (ब्रह्म) कारण आहे याविषयीं (श्रुतींचा विरोध नाहीं). कारण जशा रूपानें (तें ब्रह्म एका श्रुतींत) सांगितलें आहे तशाच रूपानें तें (इतर श्रुतींमध्यें) सांगितलें आहे. (४)	१४ आकाश[३०] वगैरेंच्या ठिकाणीं कारण या रूपानें (परमात्माच स्थित आहे). कारण पूर्वी सांगितलेला (परमात्मा आकाश वगैरेंच्या ठिकाणीं आहे असें श्रुतीमध्यें) सांगितलें आहे. (४)
१५ (असत्[३२] वगैरे शब्द परमात्म्याचेच वाचक आहेत.) कारण समाकर्ष आहे. (५)	१६ आकर्षण[३३] होत असल्यामुळें (व्यवहार संभवतो).

शरीरामध्यें प्रविष्ट झाला आहे, तो पाहतो, ऐकतो, मनन करतो' अशा रीतीनें परमात्म्याचाच संबंध केला आहे.

३२. स्वतःच्या स्थानापासून आकर्षण केली जाणारी जी वस्तू तिला 'समाकर्ष' म्हणतात. जगाच्या कारणाचें वर्णन करणाऱ्या श्रुतीमधील जे असत् अव्याकृत वगैरे शब्द ते समाकर्ष होत. असत् वगैरे शब्दांचे जे शून्य वगैरे लौकिक अर्थ ते अर्थच त्या शब्दांचें स्थान होय. प्रकरणावरून त्या शब्दांचें त्या स्थानापासून आकर्षण होतें, आणि ते शब्द ब्रह्म या अर्थी लाविले जातात.

३३. शं. जर सर्व शब्द परमात्म्याचेच वाचक असतील तर व्यवहारामध्यें आकाश वगैरे शब्दांपासून त्या त्या वस्तूंचा बोध होणार नाहीं. उ० सर्व शब्दांचा मुख्य अर्थ परमात्माच आहे. परंतु व्यवहारामध्यें त्या अर्थांपासून शब्दांचें आकर्षण करून त्यांचा अन्य अर्थाचे ठिकाणीं संकेत केला आहे; त्यामुळें व्यवहार विरुद्ध होत नाहीं.

१६ जगद्वाचित्वात् ।

१६ (हें ज्याचें कर्म तें ब्रह्मच होय); कारण (कर्म शब्द येथें) जगाला लावितां येतो.	१६ (हें ३४ज्याचें कर्म तें ब्रह्मच होय.) कारण (कर्म शब्द येथें) जगाला लावितां येतो.
१७ जीव आणि मुख्य प्राण यांचीं चिन्हें (सांगितलीं) आहेत म्हणून (परमेश्वर येथें घेतां येत) नाहीं असें म्हणशील तर त्या (म्हणण्या-) चें खंडन केलें आहे.	१७ जीवाचें चिन्ह सांगितलें आहे म्हणून आणि मुख्य प्रा३ण सांगितला आहे या चिन्हावरून (परमेश्वर येथें घेतां येत) नाहीं असें म्हणशील तर त्या (म्हणण्या -)चें खंडन केलें आहे.

३४. पूर्वपक्ष्याचें मत असें आहे कीं, कौषीतकि ब्राम्हणामध्यें (४ । १९) ज्ञेय या रूपानें जीवात्माच सांगितला आहे. कारण ' जीवस्वरूपी पुरुषानें युक्त जी प्रकृति ती जगाचें कारण आहे, आणि त्या कारणापेक्षां जीवात्मा निराळा आहे ' असें ज्ञान मनुष्याला झालें पाहिजे; हें निरीश्वर सांख्यांचें मत होय.

३५. कौषीतकि ब्राह्मणामध्यें (४ । १९) ' हें ज्याचें कर्म ' या ठिकाणीं ' हें ' हा शब्द जगाचा वाचक आहे. आणि तेथेंच पूर्वी ह्या पुरुषांचा (म्ह० जीवांचा) कर्ता असें म्हटलें आहे. आतां जीव आणि जड या सर्वांचा कर्ता परमात्माच आहे, तेव्हां जगाचा कर्ता परमात्माच आहे असें ह्या प्रकरणामध्यें सांगितलें आहे. ' ब्रह्मत्व रूपी धर्मानें युक्त जीव हा प्रकृतीच्या द्वारानें जग उत्पन्न करतो ' असें येथें सांगितलें नाहीं; असें समजावें.

३६. शं. जर सर्व शब्दांचा परमात्मा हाच मुख्य अर्थ आहे तर जगामध्यें त्या शब्दांची परमात्म्याहून निराळ्या अर्थीं प्रसिद्धि कशी झाली ? उ० ज्या लोकांना ज्या शब्दाचा जो अर्थ समजलेला असतो ते लोक ' या शब्दाचा तोच अर्थ प्रसिद्ध आहे ' असें मानतात. ज्याप्रमाणें बोबडें बोलणाऱ्या लहान मुलानें राजाला ' लाजा ' म्हटलें व त्या मुलाची समजूत जरी तशी असली तरी ' लाजा ' शब्दाचा मुख्य अर्थ जो लहान त्याचें मुख्यत्व

१७ जीवमुख्यप्राणलिङ्गान्नेति[37] चेत्तद्व्याख्यातम् ।

१६ (हें हीं[35] शब्द) जगाचा वाचक असल्यामुळें (परमात्माच जगाचा कर्ता आहे असें समजतें).	१७ (आकाश[36] वगैरे शब्द) जगां-(तील वस्तूं-) चे वाचक (आहेत अशी समजूत) असल्यामुळें (तशी प्रसिद्धी आहे).
१७ जीव आणि मुख्य प्राण यांचीं (चिन्हें सांगितलीं) आहेत म्हणून (परमात्मा येथें घेतां येत नाहीं) असें म्हणशील तर त्या (म्हणण्या-) चें खंडन केलें आहे.	१८ जीव[38] आणि मुख्य प्राण यांचे ठिकाणीं चिन्ह दृष्टीस पडतें म्हणून (तेही सर्व शब्दांचे अर्थ आहेत) असें म्हणशील तर (तसें नाहीं कारण) तें सांगितलेंच आहे.

नाहींसें होत नाहीं. त्यप्रमाणेंच हें होय. कारण जगांतल्या लोकांना जगांतलेच अर्थ माहीत असणें हें साहजिकच आहे.

३७ 'गादिति' (व. म.)

३८ 'मुख्य प्राण सांगणें' हें जीवाचेंच चिन्ह आहे. तेव्हां 'या वाक्यामध्यें ज्ञेय या रुपानें जीवात्माच वर्णिला आहे' असें पूर्वपक्षाचें म्हणणें आहे.

३९ आकाश वगैरे सर्व शब्दांचा परमात्मा हाच मुख्य अर्थ आहे. आतां भूताकाश वगैरे वस्तूंना जे लोकांमध्यें आकाश वगैरे शब्द लावतात त्याचें कारण 'भूताकाश वगैरे वस्तू परमात्म्याच्या अधीन आहेत' हें होय असें मागें (१।४।३) सांगितलें आहे. शं. सर्व वस्तू स्वाधीन असणें हें चिन्ह जीव आणि मुख्य प्राण यांचे ठिकाणीं असलेलें दृष्टीस पडतें. झाडाच्या एखाद्या फांदीला जीवानें सोडिलें कीं लागलीच तिची वाढ खुंटून ती शुष्क होते' (छां. ६।११।२) वायूच्या योगानें सर्व लोकांचें चलनवलन होतें' या श्रुतीवरुन 'जीव आणि वायुस्वरूपी मुख्य प्राण यांच्या सर्व अधीन आहे' असें समजतें. तेव्हां जीव आणि मुख्य प्राण हे सर्व शब्दांचें अर्थ आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. उ. जीव आणि मुख्य प्राण यांचा अंतर्यामी जो परमात्मा त्याला अनुलक्षून त्या श्रुतीमध्यें तसें वर्णन केलें आहे. 'परमात्मा हा सर्वांचा अंतर्यामी आहे, त्याच्या अनेक तऱ्हेच्या उपासना संभवतात' असें पूर्वी (१।१।३१) सांगितलें आहे. 'ऐश्वर्यवान् अशा सर्व वस्तू माझ्या अंशापासून उत्पन्न झालेल्या आहेत' असें भगवद्गीतेमध्यें (१०।१४) सांगितलें आहे.

१८ अन्यार्थं तु जैमिनिः प्रश्नव्याख्यानाभ्यामपि चैवमेके ।

१८ परंतु (जीवाचा उल्लेख) निराळ्या (कामा-)करतां आहे असें प्रश्नोत्तरावरून जैमिनि म्हणतो. शिवाय कांहीं (लोकां-) चा असाच (पाठ आहे). (५)

१८ परंतु (जीवाचा उल्लेख) निराळ्या(कामा-)करतां आहे असें प्रश्नोत्तरावरून जैमिनि म्हणतो. शिवाय कांहीं (लोकां-)चा असाच (पाठ आहे). (५)

१९ भागाच्या संदर्भावरून (आत्म्याचें श्रवण करावें वगैरे वाक्यांत परमात्माच सांगितला आहे).

१९ भागाच्या संदर्भावरून (आत्म्याचें श्रवण करावें वगैरे वाक्यांत परमात्माच सांगितला आहे).

४० सुषुप्ति आणि जागृति हे जीवाचे धर्म होत. आणि 'चक्षु वगैरेंच्या त्यांचा आश्रय असणें ' हा प्राणाचा धर्म होय. हे धर्म जरी ह्या प्रकृत श्रुतीमध्यें सांगितले आहेत तरी जीव आणि मुख्य प्राण हे परमात्म्याच्या अधीन असल्यामुळें परमात्म्याचे ठिकाणीही ते धर्म लावितां येतात. तेव्हां 'ही श्रुति ब्रह्मप्रतिपादकच आहे ' असें पूर्वसूत्रामध्यें सांगितलें. शं० जैमिनीच्या मतीं 'ही श्रुति ब्रह्मप्रतिपादक आहे ' असें म्हणतां येत नाहीं. कारण तो 'नियतधर्मवादी ' आहे. म्ह. सुषुप्ति वगैरे धर्म जीव वगैरेंच्या ठिकाणींच आहेत परमात्म्याचे ठिकाणीं नाहींत. उ० जीव आणि प्राण हे ब्रह्मापेक्षां निराळे आहेत. परंतु 'जीव आणि प्राण हेच ब्रह्म आहेत ' असा कदाचित् भ्रम होईल. तो दूर करण्याकरतां ह्या ब्रह्माच्या प्रकरणामध्यें जीव आणि मुख्य प्राण यांचें स्वरूप सांगितलें आहे. कारण एखादा मनुष्य बैलालाच जर घोडा म्हणूं लागला तर त्याचा भ्रम दूर करण्याकरतां बैलाचें वर्णन चालू असतांही त्यामध्यें घोड्याचें स्वरूप सांगावें लागतें. 'हा जीवात्मा कोठें शयन करतो ? ' 'हा जीवात्मा ह्यामध्यें शयन करतो ' हीं प्रश्नोत्तरें परमात्म्यासंबंधानेंच केलीं आहेत. 'जीवात्मा हा नाडीमध्यें निद्रिस्त होत असल्यामुळें हीं प्रश्नोत्तरें नाडीच्या संबंधानें केलीं आहेत ' असें मात्र समजूं नये. कारण 'जीवात्मा हा हृदयांतील आकाशामध्ये म्ह. परमात्म्यामध्यें निद्रिस्त होतो ' असें एका श्रुतीमध्यें (बृ. २ । १ । १७) स्पष्टच सांगितलें आहे.

४१ शं. व्यवहारामध्यें सर्व शब्दांचें परमात्मरूपी अर्थापासून आकर्षण केलें आहे. असें पूर्वी सांगितलें (टी. ३३ पहा). परंतु कर्मकांडांतील श्रुतींनीं शब्दांचें तसें आकर्षण करून त्या शब्दांनीं कर्माचें प्रतिपादन कां केलें ? उ० आत्मज्ञान होणे ह्या निराळ्या कामाकरतांच कर्माचें प्रतिपादन केलें आहे असें जैमिनीचें मत आहे. कारण श्रुतीमध्यें

१९ वाक्यान्वयात् ।

१८ परंतु[40] (जीव आणि मुख्य प्राण यांचा उल्लेख) निराळ्या (कामा-) करतां केला आहे असें जैमिनि म्हणतो. प्रश्नोत्तरावरूनही (हें सिद्ध होतें. कारण) कांहीं (लोकां-)चा असाच (पाठ आहे). (६)	१९ (कर्म[41] वगैरे) निराळ्या (कामा-) करतां सांगितलें आहे असें जैमिनि म्हणतो. प्रश्नोत्तरावरून (हें सिद्ध होतें). शिवाय कांहीं (लोकां-) चा असाच पाठ आहे).
१९ वाक्याचा[42] अन्वय होत असल्यामुळें (आत्म्याचें श्रवण करावें वगैरे वाक्यांत परमात्माच सांगितला आहे).	२० (अशा[3] रीतीनें) वाक्याचा अन्वय होतो म्हणून (श्रुतीमध्यें आत्मज्ञानाकरतां कर्म सांगितलें आहे).

प्रश्नोत्तरें अशीं आहेत. प्रश्नः–कोणती वस्तू जाणली असतां (कर्म वगैरे) हें सर्व ज्ञात होतें? (मु. १ । ३). 'कर्म वगैरेंचें ज्ञान कशानें होतें' आणि 'झालेलें ज्ञान सफल कशानें होतें' असा दोन प्रकारचा अभिप्राय या प्रश्नाचा आहे. उ. 'पर आणि अपर अशा दोन विद्या जाणल्या पाहिजेत' (मुं. १ । १ । ४) 'ऋग्वेद वगैरे अपर विद्येच्या योगानें कर्माचें ज्ञान होतें आणि तें ज्ञान उपनिषद् वगैरे परविद्येच्या योगानें सफल होतें' असा उत्तराचा अभिप्राय आहे. यावरून आत्मज्ञान होणें हाच कर्मज्ञानाचा खरा उपयोग आहे असें सिद्ध होतें. शिवाय ज्याला 'आत्मज्ञान नाहीं तो ऋचेनें काय करील?' (श्वे. ४ । ८) असें कांहीं लोक स्पष्टच पठन करतात.

४२ श्रुतीमध्यें (बृ. ४ । ५) 'पुत्र वगैरे प्रिय होतात' अशा रीतीनें जें पुत्र वगैरे जीवांचें प्रियत्व वर्णिलें आहे त्यावरून हें जीवाचें प्रकरण आहे आणि म्हणूनच जीवानें युक्त जी प्रकृति ती जगाची कर्त्री आहे असें समजूं नये. कारण परमात्मा हा आनंदस्वरूप असल्यामुळें खरें प्रियत्व (आवडणें) हे परमात्म्याचें ठिकाणींच आहे. तेव्हां या वाक्यांचा अन्वय म्ह. संबंध परमात्म्याचे ठिकाणीं होत आहे. आतां पुत्र वगैरे जीवाचे ठिकाणीं जें प्रियत्व आहे तें जीव हे परमात्म्याचे अंश असल्यामुळें आहे असें समजावें.

४३ शं. श्रुतीनें ज्ञानकांडामध्यें ब्रह्माचें प्रतिपादन केलेंच आहे. तेव्हां कर्माच्या द्वारानें आत्मप्रतिपादन करण्यांत काय अर्थ आहे? उ०– ज्ञानकांडांतील श्रुतीचा जो आत्म्याकडे अन्वय होतो तो पदाचा अन्वय होय. आणि कर्मकांडांतील श्रुतींचा जो आत्म्याकडे अन्वय होतो तो वाक्याचा अन्वय होय. पदांचा अन्वय होऊन अर्थबोध झाल्यानंतर जो वाक्याचा तात्पर्यार्थ काढतात तो वाक्याचा अन्वय होय.

२० प्रतिज्ञासिद्धेर्लिङ्गमाश्मरथ्यः । २१ उत्क्रमिष्यत एवं भावादि-

२० (पाहण्याचा विषय म्हणून जीवात्मा सांगितला आहे ही गोष्ट) प्रतिज्ञासिद्धीचें चिन्ह आहे असें आश्मरथ्य म्हणतो.

२१ पुढें निघून जातांना तसा होतो म्हणून (जीवात्म्याचा परमात्म्याशीं अभिन्न या रूपानें उपक्रम केला आहे) असें औडुलोमि म्हणतो.

२२ (परमात्माच जीवात्म्याच्या स्थितींत) राहत असल्यामुळें

२० (जीवात्म्याचे वाचक जे शब्द त्यांनीं परमात्म्याचें प्रतिपादन करणें ही गोष्ट) प्रतिज्ञासिद्धीचें चिन्ह आहे असें आश्मरथ्य म्हणतो.

२१ पुढें निघून जातांना तसा होतो म्हणून (जीवात्म्याचे वाचक शब्द परमात्म्याला लाविले आहेत) असें औडुलोमि म्हणतो.

२२ (परमात्मा हा जीवात्मरूपी स्वतःच्या शरीरामध्यें) राहत

४४ परमात्म्याचें प्रतिपादन करण्याविषयींच प्रकृत श्रुतीचें (बृ. ४।५।६) तात्पर्य आहे. आतां तेथें ‘ पुत्र वगैरे प्रिय होतात ’ असा जो प्रिय शब्दावरून जीवांचा उपक्रम केला तो विरुद्ध होत नाहीं. कारण जीव हा परमात्म्याचा अंश आहे. ‘ परमात्म्यानें उपभोग घेण्याकरतां जो आपल्यापैकींच भाग निराळा काढला जातो तोच जीव होय ’ असें आश्मरथ्याचें मत आहे. प्रतिज्ञा सिद्ध व्हावी हाच येथें जीवाच्या रूपानें उपक्रम करण्याचा हेतु आहे (पृ. ४५३ पं. ४ पहा).

४५ ‘ आत्मज्ञानाशिवाय मोक्षप्राप्तीचा दुसरा मार्ग नाहीं ’ अशी श्रुतीमध्यें (श्वे. ३।८) प्रतिज्ञा केली आहे. ही प्रतिज्ञा सिद्ध करण्याकरतां ‘ कर्मापासून मोक्ष प्राप्त होत नाहीं ’ असें दाखविलेंच पाहिजे. म्हणून श्रुतींमध्यें कर्म वगैरेचें स्वरूप सांगून त्याचें स्वर्ग वगैरे अनित्यफल दाखविलें आहे. तेव्हां ‘ कर्माचें ज्ञान झालें म्हणजे लोकांची कर्म मार्ग सोडून आत्मज्ञानाकडे प्रवृत्ति होते ’ अशा रीतीनें कर्माचें ज्ञान हें आत्मज्ञानाच्या उपयोगीं पडतें.

४६ ‘ ज्याप्रमाणें मैत्रेयी ही ज्ञानाच्या योगानें अशी (म्ह. मुक्त) झाली. त्या प्रमाणेंच ज्ञानी जीव शरीरांतून निघून जाऊन मुक्त होतो, हें सुचविण्याकरतां प्रकृत श्रुतीमध्यें ब्रह्माच्या प्रकरणांत जीवाचा उपक्रम केला आहे असें औडुलोमी म्हणतो.

त्यौडुलोमिः । २२ अवस्थितेरिति काशकृत्स्नः ।

२० (जीवाचा[44] उपक्रम हें) प्रतिज्ञासिद्धीचें चिन्ह आहे असें आश्मरथ्य म्हणतो.	२१ (कर्म[45] सांगणें हें) प्रतिज्ञासिद्धीचें चिन्ह आहे असें आश्मरथ्य म्हणतो.
२१ (जीवाचा[46] उपक्रम हें) पुढें निघून जाणाऱ्या (जीवा-) चें (चिन्ह आहे). कारण (मैत्रेयी) अशी झाली आहे असें औडुलोमि म्हणतो.	२२ पुढें निघून जाणाऱ्या (मुमुक्षू-) ला असें (कर्म करीत) असावें लागतें म्हणून (कर्म सांगितलें आहे) असें औडुलोमि म्हणतो.
२२ (जीवाचा[47] उपक्रम हें परमात्म्याच्या) स्थितीचें (चिन्ह	२३ (परमात्म्याचे[49] ठिकाणीं सर्वांची) स्थिति आहे म्हणून

चें मत असें आहे कीं जीव हा मूळचा परमात्म्यापेक्षां भिन्न केवळ चैतन्यरूपी असा अनादिसिद्धच आहे. तो शरीरामध्यें प्रविष्ट झाला आहे. परंतु तो जीव ज्ञानाच्या योगानें चित्स्वरूपी परमात्म्यामध्यें केवळ चैतन्यरूपानें प्रविष्ट होतो. हाच मोक्ष होय.

४७ जरी ज्ञान हेंच मोक्षाचें साधन आहे, तरी ज्ञानप्राप्तीकरतां मुमुक्षूला कर्म करावें लागतें. कारण कर्मापासून चित्त शुद्ध होतें. आतां कर्माचीं जीं स्वर्ग वगैरे फळें सांगितलीं आहेत तीं कर्म करण्याविषयीं लोकांना आवड उत्पन्न व्हावी याकरतां सांगितलीं आहेत.

४८ काशकृत्स्नाचें मत असें आहे कीं जीव म्हणून जें काय आहे तें परमात्म्याचें उपभोग घेणारें असें एक प्रकारचें स्वरूप आहे. तेव्हां येथें जीवाच्या उपक्रमावरून 'जीव हो परमात्म्याचीच एक प्रकारची स्थिति आहे' असें सूचित होतें. ह्या करतांच जीवाचा उपक्रम केला आहे.

४९ परमात्म्याचे ठिकाणीं कर्म वगैरे सर्वांचीच स्थिति आहे. तेव्हां आधेयाचें ज्ञान हें अधिकरणाच्या ज्ञानाचा एक प्रकारचा उपाय असल्यामुळें आत्मरूपी अधिकरणाचें 'हा कर्म वगैरे सर्वांचा आधार आहे' अशा रूपानें ज्ञान होण्याकरितां आधेयरूपी कर्म श्रुतीनें सांगितलें आहे.

२३ प्रकृतिश्च प्रतिज्ञादृष्टान्तानुपरोधात् । २४ अभिध्योपदेशाच्च ।

(जीवात्म्याचा परमात्म्याशींच अभिन्न या रूपानें उपक्रम केला आहे) असें काशकृत्स्न म्हणतो. (६)

२३ (ब्रह्म) उपादानकारणही आहे. कारण (असें मानलें तरच) प्रतिज्ञा आणि दृष्टांत हे विरुद्ध होत नाहींत.

२४ आणि संकल्प केला असें सांगितल्यामुळें (आत्मा उपादानकारण आहे).

२५ आणि साक्षात् (ब्रह्मच घेऊन) दोन्हीं (म्ह० उत्पत्ति आणि प्रलय) सांगितल्यामुळें (आत्मा उपादानकारण आहे).

असल्यामुळें (जीवात्म्याचे वाचक शब्द परमात्म्याला लाविले आहेत) असें काशकृत्स्न म्हणतो. (६)

२३ (ब्रह्म) उपादानकारणही आहे. कारण (असें मानलें तरच) प्रतिज्ञा आणि दृष्टांत हे विरुद्ध होत नाहींत.

२४ आणि संकल्प केला असें सांगितल्यामुळें (आत्मा उपादानकारण आहे).

२५ शिवाय (ब्रह्म हें उपादान कारण आहे व निमित्त कारण आहे या) दोन्ही गोष्टी (श्रुतीमध्यें) प्रत्यक्षच सांगितल्या आहेत.

५० येथून सूत्रकारांनीं सेश्वर सांख्य मताचें खंडन करण्यास आरंभ केला आहे. त्यांचें मत असें आहे कीं ईश्वरानें युक्त जी प्रकृति म्ह. प्रधान तेंच जगाचें उपादान कारण आहे. ईश्वर उपादान कारण नाहीं. हेंच येथें पूर्वपक्ष्याचें मत होय.

५१ तात्पर्य:—' ब्रह्म हें जगाचें केवळ निमित्त कारण आहे, आणि प्रकृति ही उपादान कारण आहे ' असें जें अर्धजरतीय मत तें बरोबर नाहीं.

५२ प्रकृति वगैरे स्त्रीलिंगी शब्दांचा सुद्धां परमात्मा हाच मुख्य अर्थ आहे. कारण ' सर्व नांवें ह्या परमात्म्याचीं वाचक आहेत ' अशी श्रुतीमध्यें प्रतिज्ञा केली आहे. आणि ' ज्याप्रमाणें सर्व नद्या समुद्रामध्यें प्रविष्ट होतात त्या प्रमाणें सर्व नांवें ह्या परमात्म्यामध्यें प्रविष्ट होतात ' असा पुढें दृष्टांत दिला आहे.

५३ ' आणि उपासना करावी असें सांगितल्यामुळें (आत्मा उपादानकारण आहे) ' असाही ह्या (मू. सं.) सूत्राचा अर्थ होतो. ह्याचें तात्पर्य:—' हें सर्व ब्रह्म आहे अशी ह्या सर्वांची ब्रह्माच्या रूपानें उपासना करावी ' असें श्रुतीमध्यें (छां. ३।१४।१) सांगितलें आहे. ह्यावरून ' आत्मा उपादान कारण आहे ' असें सिद्ध होतें. कारण जर ब्रह्म हें जगाचें उपादानकारण नसेल तर ब्रह्माच्या रूपानें जगाची उपासना संभवत नाहीं.

२५ साक्षाच्चोभयाम्नानात् ।

आहे) असें काशकृत्स्न म्हणतो. (७).

२३ (ब्रह्म) उपादानकारणही आहे. कारण (असें मानलें तरच) प्रतिज्ञा आणि दृष्टांत हे विरुद्ध होत नाहींत.

२४ आणि संकल्प केला असें सांगितल्यामुळें (आत्मा उपादानकारण आहे).

२५ आणि साक्षात् (ब्रह्मच घेऊन) दोन्ही (म्ह० उत्पत्ति आणि प्रलय) सांगितल्यामुळें (आत्मा उपादान कारण आहे).

(कर्म सांगितलें आहे) असें काशकृत्स्न म्हणतो. (१)

२४ प्रकृति (म्हणजे परमात्माच होय). कारण (असें मानलें तरच) प्रतिज्ञा आणि दृष्टांत हे विरुद्ध होत नाहींत.

२५ इच्छा (हा प्रकृतिशब्दाचा अर्थ) सांगितला आहे म्हणूनही (प्रकृति म्हणजे परमात्माच होय).

२६ (श्रुतीमध्यें) दोन्ही (गोष्टी) साक्षात् सांगितल्या असल्यामुळेंही (प्रकृति म्हणजे परमात्माच होय).

---

५४ 'माया म्ह. [इच्छा] ही प्रकृति आहे असे जाणावें' ह्या श्रुतीमध्यें [श्वे. ४ । १०] आणि 'हे अनंता ! तुझ्या इच्छेला प्रकृति म्हणतात' ह्या स्मृतीमध्यें इच्छा हा प्रकृति शब्दाचा अर्थ आहे असा उपदेश केला आहे. आणि इच्छा हें परमात्म्याचें स्वरूपच आहे. कारण 'परमात्मा हाच इच्छा आहे' असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

५५ 'जगाच्या उत्पत्तीच्या वेळीं परमात्मा कोठें बसला होता, व त्याचे जवळ सामुग्री कोणती होती' अशा रीतीनें अधिकरण आणि साधन यांच्या संबंधानें प्रश्न करून पुढें 'ब्रह्म हेंच अधिकरण आहे, ब्रह्म हेंच साधन आहे' असें उत्तर श्रुतीमध्यें (तै. ब्रा. २ । ८ । ९) दिलें आहे.

५६ 'माझे पासून सर्व जग उत्पन्न होतें, आणि माझे ठिकाणींच लीन होतें' असें स्मृतीमध्यें [भ. गी. ७ । ६] देखील श्रुतीप्रमाणेंच सांगितलें आहे.

५७ 'हा [परमात्मा] पुरुष आहे, हा प्रकृति आहे' ह्या पैंगि श्रुतीमध्यें दोन्ही गोष्टी प्रत्यक्षच सांगितल्या आहेत. तेव्हां जसा पुरुषशब्दानें परमात्मा घेतला जातो तसा प्रकृतिशब्दानेंही परमात्माच घेतला पाहिजे.

२६ आत्मकृतेः परिणामात् । २७ योनिश्च हि गीयते ।

२६ आपल्याला आपण (उत्पन्न) करीत असल्यामुळें—(ही ब्रह्म उपादानकारण आहे). परिणामामुळें (हें शक्य आहे).	२६ आपल्याला आपण (उत्पन्न) करीत असल्यामुळें-(ही ब्रह्म दोन्ही तऱ्हेचें कारण आहे असें समजतें).
	२७ परिणामामुळें (उपादानकारण मानणें शक्य आहे.)
२७ आणि (ब्रह्म) योनि आहे असें देखील म्हटलें आहे. (७)	२८ आणि (ब्रह्म) योनि आहे असें देखील म्हटलें आहे.(७)
२८ ह्या (खंडना-) नें (इतर) सर्वांचें खंडन झालें, खंडन झालें.(८)	२९ ह्या (व्याख्याना-) नें (इतर) सर्व (वाक्यां-) चें व्याख्यान झालें, व्याख्यान झालें. (८)

५८ आत्मकृतेः । परिणामात् [शं. रा.]

५९ शं. परमात्मा हा दोषरहित केवल आनंदरूपी असल्यामुळें त्याला जगाचें उपादानकारण म्हणतां येत नाहीं. उ. 'परिणाम पावणें' हा परमात्म्याचा स्वभाव आहे. आतां जगांतील वस्तूमध्यें जरी कांहीं ठिकाणीं दोष दृष्टीस पडतात व कांहीं ठिकाणीं आनंद दृष्टीस पडत नाहीं, तरी परमात्म्याच्या अंगीं विचित्र शक्ति असल्यामुळें तशा रूपानेंही त्याचा परिणाम होतो असें म्हणण्यास हरकत नाहीं.

६० 'ज्याप्रमाणें सुवर्ण हे अविकृत असूनच अलंकाराच्या रूपानें परिणाम पावतें त्याप्रमाणेंच ब्रह्म हें परिणाम पावतें' असे समजावें.

६१ 'परमात्म्यानें प्रधान वगैरेंमध्यें प्रवेश करून त्यांचा महत्तत्व वगैरे रूपांनीं परिणाम करून महत्तत्व वगैरे वस्तूंचें त्या त्या रूपांनीं नियमन करण्याकरितां आपलीं अनेक रूपें केलीं आहेत' अशी परमात्म्याची कृती असल्यामुळें त्याला प्रकृति असें म्हणतां येतें. कारण प्र. म्ह. प्रकृष्ट आहे कृति ज्याची. असा प्रकृति या शब्दापासून अर्थ निघतो.

६२ शं. ब्रह्म हें जड वस्तूंचें समवायिकारण असेल. परंतु 'मनुष्य वगैरे चेतन वस्तूंचें तें समवायिकारण आहे' असें मानतां येत नाहीं. कारण 'योनी व बीज हें

२८ एतेन सर्वे व्याख्याता व्याख्याताः ॥ प्रथमाध्याये चतुर्थः पादः ॥

२६ आपल्याला आपण (उत्पन्न) करीत असल्यामुळें—(ही ब्रह्म उपादान कारण आहे). परिणामुळें (हें शक्य आहे).	२७ परिणाम[६१] करून आपलीं (अनेक रूपें, केलीं असल्यामुळें- ही प्रकृति म्हणजे परमात्माच होय).
२७ आणि[६२] योनि देखील (ब्रह्मच) आहे). कारण (असेंच) सांगितलें आहे.	२८ आणि[६३] (ब्रह्म) योनि आहे असें देखील म्हटलें आहे.(६)
२८ ह्या (खंडना—) नें (इतर) सर्वांचें खंडन झालें, खंडन झालें.(८)	२९ ह्यो[६४] (व्याख्याना-) नें (इतर) सर्व (शब्दां-) चें व्याख्यानें झालें, व्याख्यान झालें. (७)

त्यांचें समवायिकारण आहे ' असें लोकांमध्यें प्रसिद्ध आहे. ड. योनि वगैरे हे पदार्थ ब्रह्मच आहेत. कारण त्या पदार्थांची उत्पत्ति ब्रह्मापासूनच होत आहे. श्रुतीमध्यें [पृ. ४७० पं. १७ पहा] देखील ब्रह्माला योनि असें म्हटलें आहे.

६३ ज्या वस्तूपासून साक्षात् उत्पत्ति होते त्या वस्तूला प्रकृति म्हणतात. आणि ज्या वस्तूपासून त्रियांच्या द्वारानें उत्पत्ति होते त्या वस्तूला पुरुष म्हणतात. आतां श्रुतीमध्यें [मु. १।१।६] ज्या अर्थी परमात्म्याला भूतांची योनि असें म्हटलें आहे त्या अर्थी परमात्म्यांपासून जगाची साक्षात् देखीलें उत्पत्ति होतें असें समजतें. तेव्हां प्रकृति वगैरे शब्द जरी स्त्रीलिंगी आहेत तरी त्यांचा परमात्मा हा अर्थ घेण्याला कांहीं हरकत नाहीं.

६४ ' परमात्म्यापेक्षां निराळें जगाचें कारण आहे ' असें भासविणाऱ्या ज्या वेदांत वाक्यांचें ह्या अध्यायामध्यें सूत्रकारांनीं व्याख्यान केलें नाहीं, त्या वाक्यांचेंही ह्या अध्यायावरून व्याख्यान झाल्यासारखेंच होत आहे.

६५ शून्य, तुच्छ, अभाव, नाश, असत् वगैरे शब्दांची जरी निषेधरूपानें प्रवृत्ति होत आहे, तरी त्यांचा देखील परमात्मा हाच मुख्य अर्थ आहे. कारण निषेध हा परमात्म्याच्या अधीनच आहे. ' सर्व नांवें या परमात्म्यामध्यें प्रविष्ट होतात ' ह्या श्रुतीवरूनही ' शून्य वगैरे शब्दांचा परमात्मा हा अर्थ आहे, असें सिद्ध होतें.

१ स्मृत्यनवकाशदोषप्रसङ्ग इति चेन्नान्यस्मृत्यनवकाशदोषप्रसङ्गात् ।

अध्याय २ पाद १

१ (कांहीं) स्मृति निरुपयोगी होतील असा दोष येतो (म्हणून ब्रह्म जगाचें कारण नाहीं) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (तुझें म्हणणें कबूल केलें तर) इतर स्मृती निरुपयोगी होतील असा दोष येतो.

२ आणि इतर (तत्त्वें) उपलब्ध होत नाहींत म्हणून (ही कापिलस्मृति अप्रमाण होय). (१)

३ ह्या (खंडना-) नें योगाचें खंडन झालें. (२)

१ (कांहीं) स्मृति निरुपयोगी होतील असा दोष येतो (म्हणून ब्रह्म जगाचें कारण नाहीं) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (तुझें म्हणणें कबूल केलें तर) इतर स्मृती निरुपयोगी होतील असा दोष येतो.

२ परंतु (मनु वगैरे) इतर स्मृतिकारांना (कपिलासारखीं तत्त्वें) उपलब्ध झालीं नाहींत म्हणून (कपिलाचें ज्ञान खरें नव्हे). (१)

३ ह्या (खंडना-) नें योगाचें खंडन झालें. (२)

१ पाशुपत वगैरेंच्या स्मृतींमध्यें रुद्र वगैरे जगाचें कारण म्हणून सांगितलें असल्यामुळें त्या स्मृती ‘ विष्णु जगाचें कारण आहे ’ असें मानिलें असतां निरुपयोगी होतील.

२ पंचरात्र वगैरे इतर स्मृती निरुपयोगी होतील. आणि त्या स्मृती तर अत्यंत सर्वज्ञ अशा विष्णु वगैरेंनींच केलेल्या आहेत.

३ कपिल ऋषीला त्याच्या स्वतःच्या सामर्थ्यानें प्रधान वगैरे तत्त्वांचें खरें ज्ञान झालें असल्यामुळें त्याचें मत खरें धरलें पाहिजे, अशी जी शंका येते तिचें उत्तर ह्या

२ इतरेषां चानुपलब्धेः । ३ एतेन योगः प्रत्युक्तः ।

अध्याय २ पाद १.

१ (कांहीं) स्मृति निरुपयोगी होतील असा दोष येतो (म्हणून ब्रह्म जगाचें कारण नाहीं) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (तुझें म्हणणें कबूल केलें तर) इतर स्मृती निरुपयोगी होतील असा दोष येतो.	१ (कांहीं) स्मृति निरुपयोगी होतील असा दोष येतो (म्हणून विष्णु जगाचें कारण नाहीं) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (तुझें म्हणणें कबूल केलें तर) इतर स्मृती निरुपयोगी होतील असा दोष येतो.
२ आणि इतर (तत्वें) उपलब्ध होत नाहींत म्हणून (ही कापिलस्मृति अप्रमाण होय).	२ आणि (त्या पाशुपत वगैरेंच्या स्मृतींमध्यें सांगितलेल्या) कांहीं इतर गोष्टी (प्रत्यक्ष) उपलब्ध होत नसल्यामुळें (त्या स्मृति अप्रमाण होत).
३ ह्या (खंडना) नें योगाचें खंडन झालें. (१)	३ ह्यामुळें योगाचें खंडन झालें. (१)

सूत्रामध्यें दिलें आहे.

४ पाशुपत वगैरे स्मृतीमध्यें सांगितलेल्या चांगल्या वाईट फळांपैकीं कांहींचा प्रत्यक्ष अनुभव येत नाहीं.

५ मनुष्यानें योगाभ्यास केला असतां त्याच वेळीं त्याला योगस्मृतीमध्यें क्रमानें सांगितल्याप्रमाणें स्वेदन वगैरे कांहीं गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव येत नसल्यामुळें योगस्मृति ही अप्रमाणच आहे.

४ न विलक्षणत्वादस्य तथात्वं च शब्दात् ।

४ (ब्रह्म जगाचें कारण) नाहीं. कारण ह्या (जगाचें ब्रह्माहून) भिन्न रूप आहे. आणि (जगाचें) तसलें (रूप) आहे असें श्रुतीवरून समजतें.

४ (ब्रह्म जगाचें कारण) नाहीं. कारण ह्या (जगाचें ब्रह्माहून) भिन्न रूप आहे. आणि (जगाचें) तसलें (रूप) आहे असें श्रुतीवरून समजतें.

५ परंतु विशेष आणि संबंध यांवरून (हा) अभिमानी (देवतां-)चा निर्देश आहे.

५ परंतु विशेष आणि संबंध यांवरून (हा) अभिमानी (देवतां-) चा निर्देश आहे.

६ पंचरात्र वगैरे स्मृती.

७ श्रुती ह्या पाशुपत स्मृतींसारख्या अनित्य नाहींत. तसेंच पंचरात्र वगैरे स्मृती ह्या पाशुपत स्मृती सारख्या श्रुतीला विरोधी नाहींत. तेव्हां अर्थातच श्रुति आणि पंचरात्र स्मृति यांचें पाशुपत स्मृतींहून भिन्नरूप आहे असें सिद्ध होतें.

८ 'हे विरूपा! नित्य अशा वेदवाणीनें' (तै. सं. २।६।११) इत्यादि श्रुतींवरून व 'जिला आदि नाहीं अंत नाहीं अशी आणि नित्य अशी (वेदवाणी)' इत्यादि स्मृतींवरून वेद नित्य आहे असें समजतें.

९ योग्य अधिकाऱ्याच्या हातून जर सांग कर्म घडेल तर त्या कर्माचें फल वेदामध्यें सांगितल्याप्रमाणें त्याला प्राप्त होतेंच. तेव्हां वेद हे पाशुपत स्मृतींसारखे अप्र-

९ अभिमानिव्यपदेशस्तु विशेषानुगतिभ्याम् ।

४ (ब्रह्म जगाचें कारण) नाहीं. कारण ह्या (जगाचें ब्रह्माहून) भिन्न रूप आहे. आणि (जगाचें) तसलें (रूप) आहे असें श्रुतीवरून समजतें.

५ परंतु विशेष आणि संबंध यांवरून (हा) अभिमानी (देवतां-) चा निर्देश आहे.

४ (श्रुती आणि तिला अनुसरणाऱ्या स्मृती ह्या पाशुपत स्मृतीप्रमाणें अप्रमाण) नव्हेत. कारण त्यांचें भिन्न रूप आहे. आणि (ह्यांचें) तसलें रूप आहे असें शब्दावरून समजतें.

५ (अधिकाऱ्यांना वेदामध्यें सांगितल्याप्रमाणें कर्माचें फल प्राप्त झालेलें) दृष्टीसें पडतें. (२)

६ (मृत्तिका बोलली इत्यादि श्रुतीमध्यें) अभिमानी (देवतां-) चाच निर्देश केला आहे. कारण (त्यांचा सर्वत्र) संबंध आहे आणि (त्यांच्या अंगीं) विशेष (सामर्थ्य) आहे.

माण नव्हेत असा या सूत्राचा अभिप्राय आहे. वेद या शब्दानें पंचरात्र स्मृतीचा संग्रह होतो. हें सूत्र (मूळ संस्कृत 'दृश्यते तु') पूर्णप्रज्ञाचार्यांनींच फक्त घेतलें आहे, शंकराचार्य, रामानुज आणि वल्लभ या तिघांनीं घेतलें नाहीं.

१० शंका: मृत्तिका बोलली, (श. ब्रा. ६।१) इत्यादि श्रुतीमध्यें जें वर्णन केलें आहे तें संभवत नसल्यामुळें वेद अप्रमाण आहेत. उत्तर:—'मृत्तिका बोलली' या श्रुतीचा 'मृत्तिकेची अभिमानी देवता बोलली' असा अर्थ आहे.

११ शंका-जर मृत्तिका वगैरे जड पदार्थांमध्यें अभिमानी देवता असतील तर त्या देवता दिसत कां नाहींत ? उत्तर—त्यांच्या अंगीं विशेष प्रकारचें सामर्थ्य असल्यामुळें त्या गुप्त रीतीनें वास करितात.

६ दृश्यते[12] तु । ७ असदिति चेन्न प्रतिषेधमात्रत्वात् ।

६ परंतु (एका वस्तूपासून विजातीय अशा दुसऱ्या वस्तूची उत्पत्ति) आढळून येते.	६ परंतु (एका वस्तूपासून विजातीय अशा दुसऱ्या वस्तूची उत्पत्ति) आढळून येते.
७ (उत्पत्तीच्या पूर्वी कार्य) असत् होतें असें म्हणशील तर नाहीं. कारण हा केवळ प्रतिषेध आहे.	७ (उत्पत्तीच्या पूर्वी कार्य) असत् होतें असें म्हणशील तर नाहीं. कारण हा केवळ प्रतिषेध[13] आहे.
८ अपीतीच्या वेळीं (कारणाला) कार्याप्रमाणें प्रसंग येत असल्यामुळें (वेदांत-मत) असमंजस होय.	८ [14]अपीतीच्या वेळीं (कारणाला कार्याप्रमाणें प्रसंग येत—असल्यामुळें (वेदांत वाक्य) असमंजस होय.

१२ ‘ दृश्यते च ’ असा पाठ पूर्वप्रज्ञांनीं घेतला आहे.

१३ ‘ कार्य आणि कारण यांमध्यें सादृश्य असलेंच पाहिजे ’ ह्या नियमाचा प्रतिषेधमात्र पूर्व सूत्रामध्यें दाखविला आहे. कारणाहून कार्य निराळें असतें असें दाखविण्याचा तेथें उद्देश नाहीं. तात्पर्य ‘ जग उत्पन्न होतें ’ म्हणजे ‘ कारण जें ब्रह्म तेंच आपल्यापेक्षां विलक्षण अशा जगाच्या रूपानें परिणाम पावतें ’ असें समजावें.

१४ ‘ हें पूर्वी असतच होतें ’ (छां. ३।१९।१) ह्या श्रुतीमध्यें जें जगाचें कारण असत् सांगितलें आहे तें केवळ प्रतिषेधाकरतां सांगितलें आहे. म्हणजे खंडन करण्याकरतांच सांगितलें आहे. श्रुतीमध्येंच पुढें ‘ असतापासून सत् कसें बरें उत्पन्न होईल ’ (छां. ६।२।२) असें ह्या असत् कारणाचें खंडन केलें आहे.

८ अपीतौ तद्वत्प्रसङ्गादसमञ्जसम् ।

६ परंतु (एका वस्तूपासून विजातीय अशा दुसऱ्या वस्तची उत्पत्ति) आढळून येते. (२)

७ आणि (त्या देवतांचें सामर्थ्य मोठ्या लोकांना) दृष्टिगोचर होतें. (३)

७ (श्रुतीमध्यें जगाचें कारण) असत् (सांगितलें) आहे असें म्हणशील तर नाहीं. कारण तें केवळ प्रतिषेधाकरतांच सांगितलें आहे.[१४]

८ (श्रुतीमध्यें जगाचें कारण) असत् (सांगितलें) आहे असें म्हणशील तर नाहीं. कारण तें केवळ प्रतिषेधरूपीं[१६] आहे.

८ अपीतीच्या वेळीं (कारणाला) कार्याप्रमाणें प्रसंग येत असल्यामुळें (वेदांत—मत) असमंजस होय.

९ प्रलयाच्या वेळीं (जगाला) त्या (असता -) सारखा प्रसंग येत असल्यामुळें (जगाचें कारण असत् आहे हें मत) असमंजस होय.

१५ तेव्हां जगाचें कारण विष्णु आहे असें म्हणतां येत नाहीं.

१६ असत् म्हणजे शून्य. तें केवळ अभावरूपीं असल्यानें कोणत्याही कार्याचें कारण होऊं शकत नाहीं. कारण शशशृंग वगैरेंपासून कोणतेंही कार्य उत्पन्न झालेलें दृष्टोत्पत्तीस येत नाहीं.

१७ जगाच्या अवस्थांचा परमात्म्याशीं संबंध होत असल्यामुळें ' जो सर्वज्ञ ' (मुं. १।१।९) इत्यादि वेदांतवाक्यें असमंजस होतात.

१८ प्रलयाचे वेळीं कार्याला कारणाचें रूप प्राप्त होतें असा नियम आहे. तेव्हां जर जगाचें कारण असत् असेल तर प्रलयाचे वेळीं जग हें असतच होईल असा प्रसंग येतो.

९ न तु दृष्टान्तभावात् । १० स्वपक्षदोषाच्च ।

९ दृष्टांत (सांपडत) असल्यामुळें (वेदांत मत-असमंजस) नाहींच.

१० शिवाय (वरील) दोष स्वतः-च्या मताला—(ही लागूं होत) असल्यामुळें (ते दोष आमच्या मताला लागूं करणें बरोबर नाहीं).

११ तर्क अप्रतिष्ठित आहे म्हणून-ही (जगाचें कारण तर्कानें ठरवूं नये. आतां) एक तर्क अप्रतिष्ठित झाला तरी आम्ही दुसरा तर्क करूं असें म्हणशील तर (त्यावर आमचें उत्तरः—) अशा रीतीनें देखील तुला मुक्ति प्राप्त होणार नाहीं. (३)

९ दृष्टांत[१९] (सांपडत) असल्यामुळें (वेदांत-वाक्य असमंजस) नाहींच.

१० (सांख्यांच्या[२०]) स्वतःच्या मतावर दोष येत असल्यामुळेंही (तें मत बरोबर नाहीं).

११ तर्क अप्रतिष्ठित आहे म्हणून हा (जगाचें कारण तर्कानें) ठरवूं नये.

१२ उलट अनुमान करितो[२४] असें म्हणशील तर (त्यावर आमचें उत्तरः—) तसें म्हटलें तरी देखील तुझी (दोषापासून) सुटका होणार[२५] नाहीं. (३)

१९ ज्याप्रमाणें शरीरावरील बालत्व तरुणत्व वगैरे धर्मांचा जीवात्म्याचे ठिकाणीं संबंध होत नाहीं त्याप्रमाणेंच हें होय. कारण परमात्मा, आणि कार्य जग, यांमध्यें जरी ऐक्य आहे तरी या जगावरील अपुरूषार्थरूपी धर्मांचा परमात्म्याचे ठिकाणीं संबंध होत नाहीं.

२० ' घटाच्या उत्पत्तीच्या पूर्वी मृत्तिका असते आणि घटाच्या नाशानंतरही मृत्तिका असते. तेव्हां या दृष्टांतावरून जगाची उत्पत्ति देखील कोणत्या तरी भावरूपी पदार्थांपासूनच होतें असें सिद्ध होतें.

२१ पुरुष आणि प्रकृति यांच्या केवळ संनिधानानें जग उत्पन्न होतें असें म्हणतां येत नाही. कारण पुरुष हा उदासीन आहे आणि प्रकृति ही जड आहे. आतां नुसत्या त्यांच्या संनिधानानें जग उत्पन्न होतें असें मानावें तर मुक्त झालेले लोकही फिरून संसारांत पडूं लागतील इत्यादि दोष सांख्य मतावर येतात.

११ तर्का[23]प्रतिष्ठानादप्यन्यथानुमेयमिति चेदेवमप्यविमोक्षप्रसङ्गः ।

९ दृष्टांत (सांपडत) असल्यामुळें (वेदांत–मत असमंजस) नाहींच.	१० दृष्टांत[22] (सांपडत) असल्यामुळें (प्रलयाचे वेळीं जग असतच असतें असें समजूं) नये.
१० (सांख्यांच्या) स्वतःच्या मतावर दोष येत असल्यामुळें (तें मत बरोबर नाहीं).	११ स्वतः[22]च्या मतावर दोष येत असल्यामुळेंही (तें मत बरोबर नाहीं).
११ तर्क अप्रतिष्ठित आहे म्हणूनही (जगाचें कारण तर्कानें ठरवूं नये. आतां) एक तर्क अप्रतिष्ठित झाला तरी आम्ही दुसरा तर्क करूं असें म्हणशील तर (त्यावर आमचें उत्तरः—) अशा रीतीनें देखील तुला मुक्ति प्राप्त होणार नाहीं.	१२ तर्क अप्रतिष्ठित असल्यामुळें उलटही अनुमान करतां येईल असें म्हणशील तर (त्यावर आमचें उत्तरः-) असें म्हटलें तर (मोक्षाविषयीं) देखील (कांहीं तरी उलट अनुमान करतां येत असल्यामुळें) मोक्षच नाहीं असें म्हणण्याचा प्रसंग येईल.

२२ प्रलयाचे वेळीं जग असत् असतें असा अनुभव नाहीं, श्रुतीही याविषयीं प्रमाण मिळत नाहीं, अनुमान करावें तर दृष्टांत मिळत नाहीं, इत्यादि दोष येतात असें समजावें.

२३ ह्या एका सूत्राचीं दोन सूत्रें रामानुजांनीं केलीं आहेत. तीं अशीं:–' तर्काप्रतिष्ठानादपि ', ' अन्यथानुमेयमितिचेदेवमप्यविमोक्षप्रसङ्गः '.

२४ ' ज्याअर्थी सांख्य लोकांनीं कांहीं युक्त्या लढवून इतरांच्या मतांचें खंडन केलें आहे त्याअर्थी त्यांनीं केलेला तर्क खरा असला पाहिजे ' हें उलट अनुमान होय.

२५ कारण कांहीं युक्त्या लढवून तुझ्या मताचेंही खंडन करणारा असा कोणी तरी या जगामध्यें निपजण्याचा संभव आहे. तात्पर्य अतींद्रिय गोष्टींविषयीं श्रुतीच प्रमाण धरली पाहिजे. तेथें कांहीं तरी भलतेंच तर्क करीत बसूं नये.

१२ एतेन शिष्टापरिग्रहा अपि व्याख्याताः ।[२६]

१२ ह्याचा योगानें शिष्टापरिग्रह देखील खंडित झाले. (४)	१२ (श्रुतीनें) न स्वीकारलेले असे बाकीचे पक्ष देखील ह्याच्या योगानें खंडित झाले. (४)
१३ (भोग्याला किंवा भोक्त्याला) जर (अनुक्रमें) भोक्त्याची (किंवा भोग्याची) स्थिति प्राप्त होईल तर (जगांतील) भेद राहणार नाहीं असें म्हणशील तर (त्यावर आमचें उत्तरः- आमच्या मतीं ही) जगांतल्याप्रमाणें (भेद) राहू शकतो. (५)	१४ (परब्रह्माला जीवाप्रमाणें) भोक्तृत्व प्राप्त होत असल्यामुळें (परब्रह्म आणि जीव यांमध्यें स्वभावतः) भेद आहे असें म्हणतां येत नाहीं असें म्हणशील तर (त्यावर उत्तरः—) लोकाप्रमाणें (परब्रह्म आणि जीव यांमध्येंही स्वभावतः भेद[२९]) आहे (च). (५)

२६ ' शिष्टा अपरिग्रहा ' असा पाठ पूर्णप्रज्ञाचार्यांनीं घेतला आहे.

२७ हें जग आपोआपच उत्पन्न झालें, हें जग प्रधान वगैरे अचेतन पदार्थांपासून उत्पन्न झालें, हें जग जीवानें उत्पन्न केलें इत्यादि विरुद्ध सिद्धांत होत.

२८ जगांतील चेतनाचेतन सर्व वस्तू ह्या परमात्म्याचें शरीर असल्यामुळें जीवाप्रमाणें परमात्मा देखील शरीरीच आहे. तेव्हां अर्थातच त्याला जीवाप्रमाणें सुखदुःखोपभोग प्राप्त होतील.

२९ जरी राजा आणि इतर जन हे दोघेही सारखेच शरीरी आहेत तरी त्यांमध्यें जसें राजाच्या आज्ञेप्रमाणें वागणें, आणि न वागणें या कारणांमुळें इतर जनांना सुख-

१३ भोक्त्रापत्तेरविभागश्चेत्स्याल्लोकवत् ।

१२ ह्याच योगानें शिष्टापरिग्रह देखील खंडित झाले.	१३ ह्याच्या योगानें बाकीचे विरुद्ध सिद्धांतही[27] खंडित झाले. (४)
१३ (भोग्याला किंवा भोक्त्याला) जर (अनुक्रमें) भोक्त्याची (किंवा भोग्याची) स्थिति प्राप्त होईल तर (जगांतील) भेद राहणार नाहीं असें म्हणशील तर (त्यावर आमचें उत्तर:-आमच्या मतींही) जगांतल्याप्रमाणें (भेद) राहूं शकतो. (२)	१४ भोक्ता जो (जीव) त्याला (मोक्षावस्थेमध्यें परमात्मरूप) प्राप्त होत असल्यामुळें (जीव आणि परमात्मा यांमध्यें) भेद नाहीं असें म्हणशील तर (तसें नाहीं. कारण त्या दोहोंमध्यें) लोकाप्रमाणें (भेद[30]) आहे. (५)

दुःखें होतात व राजाला होत नाहींत तसेंच येथें समजावें. कारण सुखदुःखें हीं शरीरामुळेंच होत नसतात. पुण्यपापरूपी कर्मांमुळें तीं होतात. आणि कर्म तर परमात्म्याला मुळींच नाहीं.

३० ज्याप्रमाणें एका पाण्यामध्यें दुसरें पाणी मिसळलें असतां तें जरी एकच झाल्यासारखें दिसतें तरी त्यामध्यें वास्तविक भेद असतो. कारण त्या दोन्ही पाण्यांचें जर ऐक्य होत असेल तर तें पाणी वाढणार नाहीं. त्याप्रमाणें जीवाला जरी परमात्मरूप प्राप्त झालें तरी त्यामध्यें वास्तविक रीतीनें भेद असतोच असें समजावें. तेव्हां जीव हा जरी जगाचें कारण नाहीं तरी परमात्मा हा त्याहून भिन्न असल्यामुळें तो जगाचें कारण आहे असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

१४ तदनन्यत्वमारम्भणशब्दादिभ्यः ।

१४ आरंभण शब्द वगैरेंवरून त्यांचें (म्ह. कार्य आणि कारण यांचें) ऐक्य (सिद्ध होतें).	१५ आरंभण शब्द वगैरेंवरून त्या (ब्रह्मरूपी कारणाशीं जगद्रूपी कार्याचें) ऐक्य सिद्ध होतें.
१५ आणि (उपादानकारण) असतांनाच (कार्य) उपलब्ध होतें म्हणून-(हीं कार्य आणि उपादानकारण हीं एक आहेत).	१६ [33]आणि (कार्य) असतांना तेथें (कारण) उपलब्ध होतें म्हणून-(हीं कार्य आणि उपादान कारण हीं एक आहेत).
१६ मागून येणाऱ्या (कार्या-)चें (कारणरूपानेंच) अस्तित्व असल्यामुळेंही (कार्य आणि कारण एक आहेत).	१७ (कारणामध्यें) दुसऱ्याचें (म्ह. कार्याचें) सत्व असल्यामुळेंही (कार्य आणि कारण एक आहेत).

३१ जर कार्यच मुळीं मिथ्या असेल तर ब्रह्माला 'कारण' असा शब्दच लावतां येणार नाहीं. एकंदरीत 'जग हें मिथ्या आहे' असें समजूं नये.

३२ 'त्याला कांहीं अधिष्ठान कां आहे? त्याला कांहीं आरंभण कां आहे?' ह्या श्रुतीमध्यें अधिष्ठान म्हणजे आश्रय आणि आरंभण म्हणजे साधन ह्यांचा निषेध केला आहे. तात्पर्य घट उत्पन्न करतांना कुंभाराला जसें मृत्तिका वगैरे साधन लागतें तसें परमात्म्याला कांहीं लागत नाहीं.

३३ ज्याअर्थी घट वगैरे कार्य अस्तित्वांत असतांना तेथें मृत्तिका वगैरे कारण नियमानें उपलब्ध होतें त्याअर्थीं त्यांमध्यें ऐक्य आहे. जर त्यांमध्यें भेद असता तर घट असतांना तेथें मृत्तिका नियमानें उपलब्ध झाली नसती.

१५ भावे चोपलब्धेः । १६ सत्त्वा[३५]च्चावरस्य ।

१४ आरंभण शब्द वगैरेंवरून त्या (ब्रह्मरूपी कारणा-) शीं (जगद्रूपी कार्याचें) ऐक्य सिद्ध होतें. (मिथ्यात्व सिद्ध होतें[३१] नाहीं).

१५ (कार्य) अस्तित्वांत[३४] असतांना- (च त्याची) उपलब्धि होते म्हणूनही (कार्याचें मिथ्यात्व सिद्ध होत नाहीं).

१६ आणि ह्या प्रपंचाचें (तिन्हीं कालीं) अस्तित्व असल्या[३६]मुळें (कार्य हें मिथ्याभूत नव्हे). (४)

१५ (जगाच्या उत्पत्तीचें) त्या (परमात्म्या-) हून अन्य (साधन कांहीं) नाहीं असें आरंभण शब्द वगैरेंवरून समजतें[३२].

१६ (जर स्वतंत्र साधन) असतें तर (श्रुति वगैरेमध्यें) उपलब्ध झालें असतें.

१७ (श्रुतीमध्यें उपलब्ध[३७] होणारीं साधनें त्या परमात्म्याच्या) अधीन आहेत (स्वतंत्र नाहींत).

३४ जर मिथ्याभूत जगाचीच केवळ शब्दानें उपलब्धि होत असेल तर घट नसतांना तेथें ‘घट आहे’ असें नुसतें म्हटल्यानें घटाची उपलब्धि होऊं लागेल. तात्पर्य जग हें केवळ वाचारंभण नव्हे असें समजावें.

३५ ‘सत्वाच्चापरस्य’ असा पाठ रामानुजाचार्यांचा आहे.

३६ ‘हे सोम्या! हें पूर्वी सतच होतें’ इत्यादि श्रुतींवरून ह्या प्रपंचाचें तिन्हीं-काळीं अस्तित्व सिद्ध होतें.

३७ ‘उदकापासून ब्रह्मदेव उत्पन्न झाला’ इत्यादि श्रुतीमध्यें उदक वगैरे साधनें उपलब्ध होतात.

१७ असद्व्यपदेशान्नेति[38] चेन्न धर्मान्तरेण वाक्यशेषात् ।

१७ (उत्पत्तीच्या पूर्वी कार्याला) असत् असें म्हटलें असल्यामुळें (तें त्या वेळीं सत्) नव्हतें असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण निराळ्या धर्मामुळें (कार्याला असत् असें म्हटलें आहे असें) वाक्यशेषावरून (समजतें).

१८ युक्तीवरून आणि अन्यश्रुतीवरून (उत्पत्तीच्या पूर्वी कार्याचें अस्तित्व आणि कार्याचें कारणाशीं ऐक्य हीं समजतात).

१८ (उत्पत्तीच्या पूर्वी कार्याला) असत् असें म्हटलें असल्यामुळें (कारणामध्यें कार्याचें सत्व) नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण निराळ्या धर्मामुळें (कार्याला असत् असें म्हटलें आहे[39]. हें) वाक्यशेषावरून[40], युक्तीवरून[44], आणि अन्यश्रुतीवरून[45] (समजतें).

३८ रामानुजाचार्यांनीं ‘ असद्व्यपदेशान्नेति चेन्न धर्मांतरेण वाक्यशेषाद्युक्तेः शब्दान्तराच्च ’ असें दोन सूत्रांचें एकच सूत्र केलें आहे.

३९ सत्वधर्म म्हणजे नांव आणि रूप. त्यापेक्षां निराळा जो असत्वधर्म म्हणजे कार्याची सूक्ष्मावस्था. तात्पर्य उत्पत्तीच्या पूर्वी कार्याची सूक्ष्मावस्था होती म्हणून त्याला असत् म्हटलें आहे. ‘ कार्य हें उत्पत्तीच्या पूर्वी शशशृंग वगैरेंप्रमाणें तुच्छ होतें ’ अशा अभिप्रायानें असत् म्हटलें नाहीं. तेव्हां असत्व (सूक्ष्मावस्था) हा एक पदार्थाचा स्वतंत्र धर्मच आहे असें सिद्ध झालें.

४० ‘ त्या असतानें असें मनांत आणिलें कीं जग उत्पन्न करावें ’ हा वाक्यशेष होय. येथें असत् शब्दाचा शशशृंगासारखें तुच्छ असा अर्थ घेतां येत नाहीं. कारण तो अर्थ घेतला असतां ‘ मनांत आणणें ’ संभवत नाहीं. तेव्हां ‘ असत्वरूपी धर्मानें युक्त ’ असा असत् शब्दाचा अर्थ मानला पाहिजे, आणि इतर धर्मांप्रमाणें असत्व हा देखील पदार्थाचा एक स्वतंत्र धर्म आहे असें मानिलें पाहिजे.

४१ तेव्हां कार्याचें तिन्हीकाळीं अस्तित्व सिद्ध होत नसल्यामुळें फक्त मधल्या अवस्थेंत भासणारें कार्य मिथ्याभूत आहे असेंच मानलें पाहिजे असा पूर्वपक्ष्याचा अभिप्राय आहे.

४२ अव्यक्तत्व पारतंत्र्य वगैरे निराळे धर्म होत.

४३ ‘ (प्रकृतिनामक) तम पूर्वी होतें, त्यानें हें सर्व व्यापून टाकिलें होतें ’ ह्या वाक्यशेषावरून पूर्वी कांहींच नव्हतें असें म्हणतां येत नाहीं.

१८ युक्तेः शब्दान्तराच्च ।

१७ (उत्पत्तीच्या पूर्वी कार्याला) असत् असें म्हटलें असल्यामुळें (तें त्या वेळीं सत्) नव्हतें[41] असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण निराळ्या धर्मामुळें (कार्याला असत् असें म्हटलें आहे असें) वाक्यशेषावरून (समजतें).

१८ शिवाय (उत्पत्तीच्या पूर्वी कार्याचें अस्तित्व आहे असें) युक्तीवरून आणि अन्य शब्दावरून (समजतें[46]).

१८ (उत्पत्तीच्या पूर्वी कार्याला) असत् असें म्हटलें असल्यामुळें (परमात्म्याच्या अधीन असें सुद्धां कांहीं साधन) नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण निराळ्या धर्मा[42]मुळें (कार्याला असत् असें म्हटलें आहे असें) वाक्यशेषावरून (समजतें[43]).

१९ (परमात्म्याच्या अधीन अशीं कांहीं साधनें आहेत असें) युक्तीवरून आणि अन्यशब्दावरून (समजतें[47]).

४४ ज्याप्रमाणें सत्व हा घट वगैरे पदार्थांचा धर्म आहे त्याप्रमाणेंच असत्व हाही त्यांचा एक धर्म आहे. आंतून पोकळ अशी मृत्तिकेची अवस्था असली म्हणजे घटाचा सत्वधर्म असतो आणि दुसरी कोणतीही अवस्था असली म्हणजे घटाचा असत्वधर्म असतो. ह्या असत्व धर्मामुळेंच ' घट नाहीं ' हा व्यवहार होतो. घटाचा अभाव म्हणून निराळा पदार्थ मानण्याचें कांहीं कारण नाहीं. कारण तो उपलब्ध होत नाहीं. ही युक्ति होय.

४५ ' हें पूर्वी अव्याकृत होतें ' इत्यादि अन्य श्रुतीमध्यें सूक्ष्मावस्था हा एक जगाचा धर्म स्पष्टच सांगितला आहे.

४६ ' मृत्तिका वगैरे कारणांशीं समवायसंबंधानें संबंध पावलेलीं अशीं घट वगैरे कार्यें उत्पन्न होतात ' असा नियम आहे. आतां जर उत्पत्तीच्या पूर्वी घट वगैरे कार्यें नसतील तर कारणाचा समवायसंबंध कोणाशीं आहे हें सांगतां येणार नाहीं. तेव्हां अर्थातच उत्पत्तीच्या पूर्वी कार्यांचें अस्तित्व युक्तीवरून सिद्ध होतें. सत् शब्दाहून अन्य असा जो आत्मशब्द म्हणजे आपण हा शब्द त्यावरूनही उत्पत्तीच्या पूर्वी कार्याचें अस्तित्व सिद्ध होतें. कारण ' त्यानें आपणाला स्वतःच नामरूपाला आणिलें ' ह्या श्रुतीमध्यें ' आपणाला ' असें म्हटलें आहे.

४७ ' परमात्मा हा कांहीं एक साधन न घेतां सृष्टि उत्पन्न करतो ' असें म्हणण्यापेक्षां ' आपल्या स्वाधीन अशा कांहीं साधनांच्या योगानें तो सृष्टि उत्पन्न करतो ' असें म्हणणें योग्य आहे ही युक्ति होय. ' उदकापासून ब्रह्मदेव उत्पन्न झाला ' इत्यादि अन्य श्रुती होत.

१९ पटवच्च । २० यथा च प्राणादि । २१ इतरव्यपदे-

१९ आणि पटाप्रमाणें (कार्य कारणाहून भिन्न नाहीं).

२० आणि प्राण वगैरेप्रमाणेंही (कार्य कारणाहून भिन्न नाहीं). (६)

२१ इतर (जो जीव तो ब्रह्मरूप) आहे असें सांगितलें असल्यामुळें हितकर गोष्टी न करणें वगैरे दोष प्राप्त होतील.

२२ परंतु (जीवाहून जें ब्रह्म) निराळें (तें जगाचा स्रष्टा होय. जीवाहून ब्रह्म निराळें आहे हें जीव आणि ब्रह्म यांमध्यें) भेद सांगितल्यावरून (समजतें).

१९ आणि पटाप्रमाणें (कार्य कारणाहून भिन्न नाहीं).

२० आणि प्राण वगैरेप्रमाणेंही (कार्य कारणाहून भिन्न नाहीं). (६)

२१ इतर (जो जीव तो ब्रह्मरूप) आहे असें सांगितलें असल्यामुळें हितकर गोष्टी न करणें वगैरे दोष प्राप्त होतील.

२२ परंतु (जीवाहून जें ब्रह्म) निराळें (तें जगाचा स्रष्टा होय. जीवाहून ब्रह्म निराळें आहे हें जीव आणि ब्रह्म यांमध्यें) भेद सांगितल्यावरून (समजतें).

४८ ज्याप्रमाणें गुंडाळलेल्या पटाचें स्पष्ट ज्ञान होत नाहीं त्याप्रमाणें उत्पत्तीच्या पूर्वी कार्य अस्तित्वांत असूनही त्याचें ज्ञान होत नाहीं.

४९ जशीं पट उत्पन्न करतांना कोष्ट्याला अन्य साधनें लागतात तशीं परमात्म्याला देखील त्याच्या अधीन अशीं अन्य साधनें लागतात.

५० 'यथा प्राणादिः' असा पाठ मध्वभाष्यामध्यें आहे.

५१ ब्रह्म हें केवळ जीवरूपच नाहीं, तर तें जीवाहून अधिक म्हणजे मोठें आहे. जीव हा त्याचा एक अंश आहे. आतां अवयवीनें आपल्या अवयवाचें हित केलेंच पा-

शाद्धिताकरणादिदोषप्रसक्तिः । २२ आधिकं तु भेदनिर्देशात् ।

१९ आणि[४८] पटाप्रमाणें (हें होय).	२० आणि[४९] पटाप्रमाणें (हें होय).
२० आणि प्राण वगैरेप्रमाणेंही (कार्य कारणाहून भिन्न नाहीं), (९)	२१ जसा प्राण वगैरे-(मध्यें परमात्मा प्रविष्ट झाला आहे तसा त्या साधनांमध्येंही प्रविष्ट झाला असल्यामुळें तीं साधनें परमात्म्याच्या अधीन आहेत स्वतंत्र नाहींत). (६)
२१ इतर (जो जीव तो ब्रह्मरूप) आहे असें सांगितलें असल्यामुळें (आपल्याला हितकर गोष्टी न करणें वगैरे दोष (ब्रह्माला) प्राप्त होतील.	२२ इतर (जो जीव त्यानें हें जग उत्पन्न केलें असें श्रुतीमध्यें) सांगितलें असल्यामुळें (ह्या जगाचें कारण विष्णु नव्हे असें म्हणशील तर तसें नाहीं कारण तसें मानलें तर जीवाला) हितकर गोष्टी न करणें वगैरे दोष प्राप्त होतील.
२२ परंतु (ब्रह्म हें जीवाहून) [५१]अधिक आहे (असें जीव आणि ब्रह्म यांमध्यें) भेद सांगितल्यावरून (समजतें).	२३ (श्रुतीमध्यें ब्रह्माविषयीं) विशेषप्रकारचा निर्देश[५२] केला असल्यामुळें (ब्रह्माची शक्ति) अधिक[५३] आहे (असें समजतें).

हिजे असा कांहीं नियम नाहीं. कारण मनुष्य हा आपल्या प्रत्येक अवयवाला सर्व तऱ्हेनें जर सुख देऊं लागेल तर सर्व इंद्रियांचा व्यापारच बंद राहील. शिवाय तसें संभवतही नाहीं.

५२ ‘ ज्याला क्षुधा, तृषा, शोक, मोह, जरा, मरण वगैरे कांहीं नाहीं असा आत्मा सर्वांचा अंतर्यामी आहे ’ असा श्रुतीमध्यें विशेषप्रकारचा निर्देश केला आहे.

५३ तेव्हां ‘ एवढें मोठें जग उत्पन्न करतांना त्या एकट्या ब्रह्माला श्रम होतील ’ इत्यादि दोषांची कल्पना करूं नये.

२३ अश्मादिवच्च तदनुपपत्तिः ।

२३ आणि पाषाण वगैरेंप्रमाणें (हें असल्यामुळें) तो (दोष) बरोबर नाहीं. (७)	२३ आणि पाषाण वगैरेंप्रमाणें तो (जीव ब्रह्मरूप आहे असें) मानतां येत नाहीं. (७)
२४ (साधनांचा) संग्रह (करतांना लोक) आढळतात म्हणून (ब्रह्म जगाचें कारण) नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण क्षीराप्रमाणें (ब्रह्म आहे).	२४ (साधनांचा) संग्रह (करतांना लोक) आढळतात म्हणून (ब्रह्म जगाचें कारण) नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं कारण क्षीराप्रमाणें (ब्रह्म आहे).
२५ जगांतील देव वगैरेंप्रमाणें (ब्रह्म देखील प्रवृत्त होईल). (८)	२५ जगांतील देव वगैरेंप्रमाणें (ब्रह्म देखील प्रवृत्त होईल). (८)

५४ ज्याप्रमाणें पाषाण वगैरे जड पदार्थ हे ब्रह्मरूप नव्हेत त्याप्रमाणें चेतन जीव देखील ब्रह्मरूप नव्हे. कारण जीवाला अनंत दुःखें होतात व त्याला पुण्यपाप आहे, पण परमात्म्याला तें कांहींच नाहीं.

५५ शंका-सर्व जीव ब्रह्माचे सारखेच अंश असल्यामुळें सर्वांना सारखें सुखदुःख प्राप्त व्हावें. उत्तरः-हिरे माणिक वगैरेंप्रमाणें जीवांमध्यें कमजास्तपणा आहे, त्यामुळें सर्वांना सारखें सुखदुःख ब्रह्मापासून प्राप्त होत नाहीं. मरीचिका नांवाच्या सूत्रवृत्तिमध्यें 'तदुपपत्तिः' असा पाठ घेतला आहे. तेथें 'तत्' या शब्दानें जीवांमधील वैषम्य घ्यावें.

२४ उपसंहारदर्शनान्नेति चेन्न क्षीरवद्धि । २५ देवादिवदपि लोके ।

२३ पाषाण वगैरेंप्रमाणें (जीवामध्यें कमजास्तपणा असल्यामुळें ब्रह्म हें) त्या (सर्वां-) चा (सारखा) अनुरोध करीत नाहीं.(६)

२४ (साधनांचा) संग्रह (करतांना लोक) आढळतात म्हणून (ब्रह्म जगाचें कारण) नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण क्षीराप्रमाणें (ब्रह्म आहे).

२५ जगांतील देव वगैरेंप्रमाणें (ब्रह्म देखील प्रवृत्त होईल.)

२४ शिवाय पाषाण वगैरेंप्रमाणें (जीव हा परतंत्र असल्यामुळें त्याच्या हातून) ती (जगाची उत्पत्ति) संभवत नाहीं.

२५ (जीवाच्या हातून घट पट वगैरे) कार्यें उत्पन्न होतात असें आढळतें म्हणून (जीवापासून जगाची उत्पत्ति संभवत नाहीं असें) नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (तें) क्षीराप्रमाणें आहे.

२६ जगांतील देव वगैरेंप्रमाणें (परमात्मा देखील कोणाच्या दृष्टीस न पडतां जीवाच्या हातून कार्यें करवील).

---

५६ ‘ ज्याप्रमाणें मनुष्याच्या स्वाधीन असलेली लांकडाची बाहुली हात पाय हालविते त्याप्रमाणेंच हे परमात्म्याच्या अधीन असलेले जीव हात पाय हालवितात ’ असें भारतामध्यें सांगितलें असल्यामुळें जीव हा परतंत्र आहे असें समजतें.

५७ गाय ही तृणापासून क्षीर उत्पन्न करते असें जरी दृष्टीस पडतें तरी तेथें कांहीं गाईला स्वातंत्र्य नाहीं, तर ती गोष्ट प्राणावर अवलंबून आहे. तसें येथेंही जीवाला स्वातंत्र्य नाहीं, तर तो परमात्म्यावर अवलंबून आहे. आणि म्हणूनच ह्या जीवाच्या हातून कार्यें उत्पन्न होतात.

२६ कृत्स्नप्रसक्तिर्निरवयवत्वशब्दकोपो वा ।

२६ सगळें ब्रह्म (परिणाम पावतें असें) होईल किंवा (ब्रह्म) निरवयव आहे असें सांगणाऱ्या श्रुती बाधित होतील.	२६ सगळें ब्रह्म (परिणाम पावतें असें) होईल किंवा (ब्रह्म) निरवयव आहे असें सांगणाऱ्या श्रुती बाधित होईल.
२७ परंतु श्रुति असल्यामुळें आणि (ब्रह्माला) श्रुतीचा आधार असल्यामुळें (हा दोष येत नाहीं).	२७ परंतु श्रुति असल्यामुळें आणि (ब्रह्माला) श्रुतीचा आधार असल्यामुळें (हा दोष येत नाहीं).
२८ शिवाय आत्म्याचे ठिकाणीं देखील (विचित्र सृष्टि सांगितली आहे. जगामध्यें) देखील विचित्र (पदार्थ उत्पन्न झालेले दिसतात). त्याप्रमाणें (येथें होय).	२८ शिवाय असें मानलें असतां आत्म्याचे ठिकाणीं (देखील अचेतन वस्तूंच्या धर्मांचा संबंध होईल. परंतु) ज्याअर्थी (प्रत्येक वस्तूचे स्वभाव) विचित्र आहेत त्याअर्थी (तो संबंध होत नाहीं).

५८ ब्रह्माला अवयव नसल्यामुळें सगळ्या ब्रह्माचा परिणाम होईल.

५९ चित् आणि अचित् असे ब्रह्माचे दोन अंश आहेत. त्यांपैकीं चिदंशापासून जीव उत्पन्न झाले. आणि अचिदंशापासून आकाश वगैरे जड पदार्थ उत्पन्न झाले असें मानलें असतां.

६० मनुष्यानें आपल्या एका लहानशा अवयवानें (म्हणजे एका बोटानें) गवताची काडी अलीकडे घेतली असतां त्या कामीं देखील जीवाच्या पूर्ण शक्तीचा उपयोग होतो असें मानावें लागेल.

६१ ‘ जो जीव तो नित्य आहे निरवयव आहे ’ इत्यादि भाल्लवेय श्रुतीमध्यें ‘ जीव निरवयव आहे ’ असें सांगितलें आहे.

२७ श्रुतेस्तु शब्दमूलत्वात् । २८ आत्मनि चैवं विचित्राश्च हि ।

२६ सगळ्या (ब्रह्माचा एकच रूपानें परिणाम) होईल किंवा (ब्रह्म) निरवयव आहे असें सांगणाऱ्या श्रुती बाधित होतील.

२७ (शिवाय जीव हा जगाचा कर्ता आहे असें मानलें तर प्रत्येक कार्याविषयीं जीवाची) पूर्णपणानें (प्रवृत्ति होते असें) मानावें लागेल. किंवा (जीव) निरवयव आहे असें सांगणाऱ्या श्रुती बाधित होतील. (७)

२७ परंतु श्रुति असल्यामुळें आणि (ब्रह्माला) श्रुतीचा आधार असल्यामुळें (हा दोष येत नाहीं).

२८ (परमात्मा हा जगाचा कर्ता आहे असें मानलें असतां मात्र हे दोष येत नाहींत.) कारण तशी श्रुति आहे.[६२] (शिवाय परमात्म्याचें स्वरूप केवळ) शब्दावरूनच समजण्यास योग्य आहे.

२८ (परमात्म्यानें) आपणामध्येंच (जग उत्पन्न केलें असल्यामुळें त्याला कधींही देशकाल वगैरेंची देखील अपेक्षा नाहीं). कारण (त्याच्या अंगीं) अशा विचित्र शक्ती आहेत.

२९ शिवाय अशाप्रकारच्या विचित्र (शक्ती) परमात्म्याचे ठिकाणींच आहेत.

६२ ‘ (लोकांमध्यें) जो विरुद्ध धर्म तो परमात्म्याचे ठिकाणीं अविरुद्ध आहे ’ अशी पैंगी श्रुति आहे. तेव्हां ‘ जीव हा जगाचा कर्ता आहे ’ ही गोष्ट जशी युक्तिविरुद्ध आहे तशी ‘ परमात्मा हा जगाचा कर्ता आहे ’ ही गोष्ट देखील युक्तिविरुद्धच आहे असें समजूं नये.

६३ दृष्टिगोचर अशा एखाद्या वस्तूचे ठिकाणीं जसे धर्म दृष्टीस पडतात तसेच धर्म दृष्टिगोचर न होणाऱ्या अशा दुसऱ्या वस्तूचे ठिकाणीं देखील असतात असें.

६४ तात्पर्य घट पट वगैरे पदार्थ पाहून त्याप्रमाणें ब्रह्माविषयीं कल्पना करूं नये. कारण ब्रह्माची शक्ति अचिंत्य आहे.

२९ स्वपक्षदोषाच्च । ३० सर्वोपेता च तद्दर्शनात् ।

२९ आणि स्वतःच्या मतावर हा दोष येत असल्यामुळें (तो आमचेवर आणतां येत नाहीं. (९)

३० आणि (परब्रह्म हें) सर्व-(शक्ति-) संपन्न आहे. कारण (श्रुतींत) तसें सांगितलें आहे.

३१ (ब्रह्म) इंद्रियरहित असल्यामुळें (कार्य उत्पन्न करूं शकत) नाहीं असें म्हणशील तर त्याचें उत्तर दिलें आहे. (१०)

३२ (चेतनाच्या प्रवृत्तीला) प्रयोजन असल्यामुळें (ब्रह्म जग उत्पन्न करूं शकत) नाहीं.

२९ आणि स्वतःच्या मतावर हा दोष येत असल्यामुळें (तो आमचेवर आणतां येत नाहीं).

३० आणि (परब्रह्म हें) सर्व-(शक्ति-) संपन्न आहे. कारण (श्रुतींत) तसें सांगितलें आहे.

३१ (ब्रह्म) इंद्रियरहित असल्यामुळें (कार्य उत्पन्न करूं शकत) नाहीं असें म्हणशील तर त्याचें उत्तर दिलें आहे. (९)

३२ (चेतनाच्या प्रवृत्तीला) प्रयोजन असल्यामुळें (ब्रह्म जग उत्पन्न करूं शकत) नाहीं.

६५ ‘ जीवाचे ठिकाणीं जे दोष भासतात तेच परमात्म्याचे ठिकाणीं गुण समजले जातात ’ ह्या वचनावरून ‘ जीव हा जगाचा कर्ता आहे ’ या मतावरच दोष येतात असें समजावें.

६६ ‘परमात्म्याच्या अंगीं जरी विचित्र शक्ति आहे तरी ती शक्ति विचित्रच अस-

३१ विकरणत्वान्नेति चेत्तदुक्तम् । ३२ न प्रयोजनवत्त्वात् ।

२९ आणि स्वतःच्या मतावर हा दोष येत असल्यामुळे (तो आमचेवर आणतां येत नाहीं). (७)

३० आणि (परब्रह्म हें) सर्व- (शक्ति-) संपन्न आहे. कारण (श्रुतींत) तसें सांगितलें आहे.

३१ (ब्रह्म) इंद्रियरहित असल्यामुळें (कार्य उत्पन्न करूं शकत) नाहीं असें म्हणशील तर त्याचें उत्तर दिलें आहे.

३२ (चेतनाच्या प्रवृत्तीला) प्रयोजन असल्यामुळें (ब्रह्म जग उत्पन्न करूं शकत) नाहीं.

३० स्वतःच्या मतावरच दोष येत असल्यामुळें[६६] (जीव हा जगाचा कर्ता आहे असें मानतां येत नाहीं).

३१ शिवाय[६६] (परमात्मा हा) सर्व-प्रकारच्या (शक्तींनीं) युक्त आहे. कारण तसें सांगितलेलें[६७] दृष्टीस पडतें.

३२ (परमात्मा हा) इंद्रियरहित असल्यामुळें (जगाचा कर्ता) नव्हे असें म्हणशील तर त्याचें उत्तर दिलें आहे. (८)

३३ (जगाच्या उत्पत्तीपासून परमात्म्याला कांहींच फल प्राप्त होत नसल्यामुळें तो जगाचा कर्ता नाहीं असें समजूं नये). कारण (परमात्मा हा कृतकृत्य असल्यामुळें त्याची प्रवृत्ति) फलाच्या उद्देशानें झालीच नाहीं.

ल्यामुळें तिचा व्हावा तसा उपयोग होणार नाहीं' अशी जी शंका येते तिचें ह्या सूत्रामध्यें उत्तर दिलें आहे.

६७ 'ती परदेवता सर्व शक्तींनीं युक्त आहे' असें चतुर्वेदशिखेमध्यें सांगितलें आहे.

६८ ' परमात्म्याच्या अंगीं सर्व प्रकारच्या शक्ती आहेत ' हें उत्तर.

३३ लोकवत्तु लीलाकैवल्यम्। ३४ वैषम्यनैर्घृण्ये न सापेक्षत्वात्तथा हि दर्शयति।

३३ परंतु (ब्रह्माची प्रवृत्ति म्हणजे) व्यवहारांत जशी (लीला दृष्टीस पडते) तशी केवळ लीला होय. (११)

३४ (ईश्वराला) वैषम्य आणि नैर्घृण्य (हीं प्राप्त होत) नाहींत. कारण त्याला अपेक्षा आहे. श्रुति तसेंच सांगते.

३५ (सृष्टीच्या पूर्वीं) भेद नसल्यामुळें कर्म नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (संसार) अनादि आहे.

३६ (संसार अनादि आहे ही गोष्ट) युक्तीला धरून आहे. व (श्रुतींतही) उपलब्ध होते. (१२)

३३ परंतु (ब्रह्माची प्रवृत्ति म्हणजे) व्यवहारांत जशी (लीला दृष्टीस पडते) तशी केवळ लीला होय.

३४ (ईश्वराला) वैषम्य आणि नैर्घृण्य (हीं प्राप्त होत) नाहींत. कारण त्याला अपेक्षा आहे. श्रुति तसेंच सांगते.

३५ (सृष्टीच्या पूर्वीं) भेद नसल्यामुळें कर्म नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (जीव आणि त्यांचीं कर्में) अनादि आहेत. (जरी तीं अनादि आहेत तरी 'सृष्टीच्या पूर्वीं भेद नाहीं' ही गोष्ट) जुळते. आणि (तीं अनादि आहेत ही गोष्ट श्रुतींतही) उपलब्ध होते.

६९ परमात्म्याची लीला गाइली असतां मोक्ष प्राप्त होतो. म्हणून लीलेला मोक्ष म्हटलें आहे असा अभिप्राय आहे.

७० रामानुजाचार्यांनीं 'न कर्माविभागादिति चेन्नानादित्वादुपपद्यते चाप्युपलभ्यते च' असें दोन सूत्रांचें एकच सूत्र केलें आहे.

७१ कर्में करणारे चेतन जीव आणि आकाश वगैरे अचेतन पदार्थ हे सर्व सृष्टीच्या पूर्वीं परमात्म्याचें शरीरच असल्यामुळें त्या शरीरानें युक्त असा परमात्मा एकच आहे तेथें कांहीं भेद नाहीं असें म्हणतां येतें.

७२ कारण परमात्मा हाच जीवांकडून कर्में करवीत असल्यामुळें कर्म हें परमा-

३५ न कर्माविभागादिति चेन्नानादित्वात् । ३६ उपपद्यते चाप्युपलभ्यते च ।

३३ परंतु (ब्रह्माची प्रवृत्ति म्हणजे) व्यवहारांत जशी (लीला दृष्टीस पडते) तशी लीला होय. (आणि लीलाच) मोक्ष[72] आहे.

३४ (ईश्वराला) वैषम्य आणि नैर्घृण्य (हीं प्राप्त होत) नाहींत. कारण त्याला अपेक्षा आहे. श्रुति तसेंच सांगते.

३५ (सृष्टीच्या पूर्वी) भेद नसल्यामुळें कर्म नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (संसार) अनादि आहे.

३६ (संसार अनादि आहे ही गोष्ट) युक्तीला धरून आहे. व (श्रुतींत) ही उपलब्ध होते. (१२)

३४ तर (परमात्म्याची प्रवृत्ति म्हणजे) व्यवहारांत जशी (लीला दृष्टीस पडते) तशी केवळ लीलाच होय. (९)

३५ (ईश्वराला) वैषम्य आणि नैर्घृण्य (हीं प्राप्त होत) नाहींत. कारण त्याला अपेक्षा आहे. श्रुति तसेंच सांगते.

३६ (सृष्टीच्या पूर्वी) भेद नसल्यामुळें कर्म नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (संसार) अनादि आहे.

३७ आणि (जरी परमात्म्याला कर्माची अपेक्षा आहे तरी त्याचें स्वातंत्र्य) संभवतें. आणि (अशा रीतीनें जें परमात्म्याचे ठिकाणीं वैषम्य येतें तो दोष नाहीं) असें सांगितलें आहे[73]. (१०)

त्म्याच्या अधीनच आहे. लोकामध्यें देखील असें दृष्टीस पडतें कीं मनुष्यानें आपल्या स्वाधीन असलेल्या अशा हातपाय वगैरेंच्या साहाय्यानें एखादें कर्म केलें असतां या कामीं मनुष्याला लोक स्वतंत्रच समजतात, परतंत्र समजत नाहींत.

७३ जर परमात्मा हाच जीवाकडून चांगलें किंवा वाईट कर्म करवून त्याप्रमाणें जीवाला फल देत असेल तर अर्थातच परमात्म्याला वैषम्य हा दोष प्राप्त होणारच. परंतु चतुर्वेदशिखेमध्यें असें सांगितलें आहे:-' तो (परमात्मा जीवाकडून) पुण्य आणि पाप करवितो, पण तेवढ्यानें तो कांहीं दोषी होत नाहीं.' तेव्हां यावरून परमात्म्याकडे दोष नाहीं असें सिद्ध होतें.

३७ सर्वधर्मोपपत्तेश्च ।

३७ आणि ज्याअर्थी (ब्रह्माच्या ठिकाणीं) सर्व धर्म जुळतात त्याअर्थी (हें वेदांतमत निर्दोष आहे). (१३)	३६ आणि ज्याअर्थी (ब्रह्माच्या ठिकाणीं) सर्व धर्म जुळतात त्याअर्थी (हें वेदांतमत निर्दोष आहे). (१०)

अध्याय २ पाद २

१ आणि रचना जुळत नाहीं म्हणून अनुमान-(गम्य जें प्रधान तें जगाचें कारण) नाहीं.	१ आणि रचना जुळत नाहीं म्हणून व (लोकांमध्यें चेतनानें युक्त असल्या अचेतनाची) प्रवृत्ति दृष्टीस पडते म्हणून अनुमानगम्य (जें प्रधान तें जगाचें स्वतंत्र कारण) नाहीं.
२ प्रवृत्ति जुळत नाहीं म्हणूनही (प्रधान जगाचें कारण नाहीं).	
३ क्षीर आणि उदक यांप्रमाणें (प्रधान प्रवृत्त होईल) असें म्हणशील तर (त्यावर उत्तर:--) तेथेंही (चेतनापासूनच प्रवृत्ति आहे).	२ क्षीर आणि उदक यांप्रमाणें (प्रधान प्रवृत्त होईल) असें म्हणशील तर (त्यावर उत्तर:--) तेथेंही (चेतनापासूनच प्रवृत्ति आहे).

१ रामानुजाचार्यांनीं 'रचनानुपपत्तेश्च नानुमानं प्रवृत्तेश्च' असें दोन सूत्रांचें एकच सूत्र केलें आहे.

२ जर प्रधानाचा आपोआपच घट पट वगैरे रूपानें परिणाम घडत असेल तर त्या घट, पट वगैरे वस्तू तयार करण्याकरितां जो जीवाची प्रवृत्ति झालेली दृष्टीस पडते तो जुळत नाहीं. या सूत्राचा शंकराचार्यांनीं केलेला अर्थही वल्लभाचार्यांस मान्य आहे.

३७ सर्वधर्मोपपत्तेश्च ।

३७ आणि ज्याअर्थी (ब्रह्माच्या ठिकाणीं) सर्व धर्म जुळतात त्याअर्थी (हें वेदांतमत निर्दोष आहे). (१२)	३६ आणि ज्याअर्थी (ब्रह्माच्या ठिकाणीं) सर्व धर्म जुळतात त्याअर्थी (हें वेदांतमत निर्दोष आहे). (१०)

अध्याय २ पाद २

१ आणि रचना जुळत नाहीं म्हणून अनुमान-(गम्य जें प्रधान तें जगाचें कारण) नाहीं.	१[१] आणि रचना जुळत नाहीं म्हणून व (लोकांमध्यें चेतनानें युक्त असाच अचेतनाची) प्रवृत्ति दृष्टीस पडते म्हणून अनुमानगम्य (जें प्रधान तें जगाचें स्वतंत्र कारण) नाहीं.
२ प्रवृत्ति जुळत नाहीं म्हणूनही (प्रधान जगाचें कारण नाहीं).	
३ क्षीर आणि उदक यांप्रमाणें (प्रधान प्रवृत्त होईल) असें म्हणशील तर (त्यावर उत्तरः--) तेथेंही (चेतनापासूनच प्रवृत्ति आहे).	२ क्षीर[३] आणि उदक यांप्रमाणें (प्रधान प्रवृत्त होईल) असें म्हणशील तर (त्यावर उत्तरः--) तेथेंही (चेतनापासूनच प्रवृत्ति आहे).

१ रामानुजाचार्यांनी 'रचनानुपपत्तेश्च नानुमानं प्रवृत्तेश्च' असें दोन सूत्रांचें एकच सूत्र केलें आहे.

२ जर प्रधानाचा आपोआपच घट पट वगैरे रूपानें परिणाम घडत असेल तर त्या घट, पट वगैरे वस्तू तयार करण्याकरितां जो जीवाची प्रवृत्ति झालेली दृष्टीस पडते तो जुळत नाहीं. या सूत्राचा शंकराचार्यांनी केलेला अर्थही वल्लभाचार्यांस मान्य आहे.

४ व्यतिरेकानवस्थितेश्चानपेक्षत्वात् । ५ अन्यत्राभावाच्च न तृणादिवत् ।

४ आणि (प्रधानाहून) व्यतिरिक्त (असें कांहींच) नसल्यामुळें (प्रधानाला कोणाचें) साहाय्य नाहीं. त्यामुळें (तें प्रवृत्त किंवा निवृत्त होऊं शकत नाहीं).

५ आणि तृण वगैरेंप्रमाणें (प्रधान आपोआप परिणाम पावूं शकत) नाहीं. कारण इतर ठिकाणीं (तृण वगैरे परिणाम पावत) नाहींत.

६ (प्रधान आपोआप प्रवृत्त होतें असें) जरी मानलें तरी (दोष येतोच). कारण (प्रधानाला प्रवृत्त होण्याला) कांहीं प्रयोजन नाहीं.

३ (प्रधानाला दुसऱ्या कोणाचीही) अपेक्षा नसल्यामुळें (त्याची सृष्टी-) वांचून अन्य तऱ्हेनें स्थिति होणार नाहीं म्हणूनही (प्रधान हें जगाचें स्वतंत्र कारण नाहीं).

४ आणि तृण वगैरेंप्रमाणें (प्रधान आपोआप परिणाम पावूं शकत) नाहीं. कारण इतर ठिकाणीं (तृण वगैरे परिणाम पावत) नाहींत.

४ ह्या सूत्रापर्यंत निरीश्वर सांख्य मताचें सूत्रकारांनीं खंडन केलें आहे.

५ तृण वगैरेंचा क्षीररूपानें परिणाम फक्त स्तनामध्येंच होतो, शृंग वगैरे इतर ठिकाणीं होत नाहीं. तेव्हां 'तृण वगैरेंचा सुद्धां आपोआप परिणाम होत नाहीं' हें सिद्ध होतें.

६ ह्या सूत्रामध्यें सूत्रकारांनीं सेश्वर सांख्यमताचें खंडन केलें आहे. 'ज्याप्रमाणें तृण वगैरे पृथिवीपासूनच उत्पन्न होतें. पर्जन्य हा केवळ त्याला अनुग्राहक आहे, त्याप्रमाणें हें जग प्रधानापासूनच उत्पन्न होतें. ईश्वर हा केवळ त्याला अनुग्राहक आहे. असें त्यांचें मत आहे. परंतु तें मत बरोबर नाहीं. कारण 'जगाचें अस्तित्व परमात्म्यावरच अवलंबून आहे, असें श्रुतीवरून सिद्ध होतें.

६ अभ्युपगमेऽप्यर्थाभावात् ।

४ (प्रधानाला दुसऱ्या कोणा-चीही) अपेक्षा नसल्यामुळें (त्याची कार्यें उत्पन्न के-ल्या-) वांचून स्थिति होणार नाहीं म्हणूनही (प्रधान हें जगाचें स्वतंत्र कारण नाहीं).

४ (परमात्म्याच्या संबंधा-) वांचून (कोणाचीच प्रवृत्ति) होत नाहीं म्हणूनही (लो-कांनीं सांख्यमताची) अ-पेक्षा करूं नये. (१)

५ आणि तृण वगैरेंप्रमाणें (प्रधान आपोआप परिणाम पावूं शकत) नाहीं. कारण इतर ठिकाणीं (तृण वगैरे परिणाम पावत) नाहींत.

५ (ज्याप्रमाणें) तृण वगैरें-(चें पर्जन्य कारण आहे त्या-) प्रमाणें (परमात्मा हा जगाचें कारण) नाहीं. का-रण (परमात्म्याहून) अन्य ठिकाणीं (जगाची स्थिती-च) नाहीं. (२)

६ (प्रधान आपोआप प्रवृत्त होतें असें) जरी मानलें तरी (दोष येतोच). कारण (प्रधानाला प्रवृत्त होण्या-ला) कांहीं प्रयोजन नाहीं. (१)

६ (चार्वाकमत बरोबर नाहीं.) कारण (त्यांनीं आपला) सिद्धांत घेतला तरी त्यापा-सून कांहींच प्रयोजन सिद्ध होत नाहीं. (३)

७ रामानुजाचार्य हें सूत्र येथें पठन करीत नाहींत. ' अन्यथानुमितौ च ज्ञशक्तिवियोगात् ' ह्या ९ व्या सूत्राच्या पुढें पठन करतात.

८ सांख्यमतीं ' कोणतीही गोष्ट विचारपूर्वक करणारा ' असा कोणीही नसल्यामुळें पुरुषार्थ सिद्ध होणार नाहीं.

९ ह्या सूत्रामध्यें सूत्रकारांनीं चार्वाक मताचें खंडन केलें आहे. हे लोक धर्म, अधर्म, स्वर्ग वगैरे अदृष्ट पदार्थ कांहींच मानीत नाहींत. त्यामुळें त्यांच्या शास्त्रामध्यें विषय, प्रयोजन, अधिकारी वगैरे अमुक आहेत असें सांगतां येत नाहीं. ज्याला धर्माधर्म नाहीं त्याला शास्त्रांतील सिद्धांत मानून काय उपयोग आहे ?

७ पुरुषाश्मवदिति चेत्तथापि । ८ अङ्गित्वानुपपत्तेश्च ।

७ मनुष्य आणि पाषाण यांप्रमाणें (पुरुष प्रधानाला प्रवृत्त करील) असें जरी म्हणशील तरी (दोष येतोच).	७ मनुष्य आणि पाषाण यांप्रमाणें (पुरुष प्रधानाला प्रवृत्त करील) असें जरी म्हणशील तरी (दोष येतोच).
८ (गुण-) प्रधानभाव जुळत नाहीं म्हणूनही (प्रधानाला प्रवृत्ति नाहीं).	८ (गुण-) प्रधानभाव जुळत नाहीं म्हणूनही (प्रधानाला प्रवृत्ति नाहीं).
९ आणि निराळ्या रीतीनें अनुमान केलेंस तरी (प्रधानाला) ज्ञानशक्ति नसल्यामुळें (मागील दोष येतातच).	७ आणि निराळ्या रीतीनें अनुमान केलें तरी (प्रधानाला) ज्ञानशक्ति नसल्यामुळें (मागील दोष येतातच).

१० जर पुरुष हा प्रधानाला स्वभावतःच प्रवृत्त करीत असेल तर ' प्रधान हें प्रवृत्त होतें ' हें म्हणणें अप्रयोजक आहे. आतां ' प्रधान हेंच पुरुषाकडून आपणाला प्रवृत्त करवीत असेल ' असें म्हणावें तर पूर्वीचे दोष येणार. तेव्हां कसेंही म्हटलें तरी दोष येतोच.

११. ' प्रधान हें जगाचें मुख्य कारण आहे, आणि पुरुष हा त्याचें अंगभूत साधन आहे, म्हणजे पुरुषानें युक्त प्रकृति ही जगाची कर्त्री आहे ' असें सांख्य लोकांपैकीं कांहीं लोकांचें मत आहे. त्याचें येथें सूत्रकारांनीं खंडन केलें आहे. ' ईश्वरावांचून कोठेंही कोणतीही गोष्ट होत नाहीं ' असें श्रुतीमध्यें सांगितलें असल्यामुळें ईश्वर हा सर्व ठिकाणीं मुख्य साधनच समजला पाहिजे. तेव्हां ' ईश्वर हा गौण साधन आहे ' अशाविषयीं एक देखील दृष्टांत मिळत नाहीं.

१२ पुरुष आणि प्रधान यांमध्यें गुणप्रधानभाव जुळत नाहीं. कारण पुरुषाला मुख्यत्व मानलें तर सांख्यांचें स्वतःचें मत सुटतें. प्रधानाला मुख्यत्व मानलें तर नित्य

९ अन्यथानुमितौ च ज्ञशक्तिवियोगात् ।

७ मनुष्य आणि पाषाण यांप्रमाणें (पुरुष प्रधानाला प्रवृत्त करील) असें जरी म्हणशील तरी (दोष येतोच[12]).	७ ज्याप्रमाणें (शरीर हें चेतन-) पुरुषाच्या संबंधानें पाषाण वगैरेंचें ग्रहण करतें त्याप्रमाणें (प्रधान हें पुरुषाच्या संबंधानें प्रवृत्त होईल) असें म्हणशील तर तो देखील (दृष्टांत संभवत नाहीं[11]).
८ (गुण-) प्रधानभाव जुळत नाहीं म्हणूनही (प्रधानाला प्रवृत्ति नाहीं).	८ (चेतन अशा पुरुषापेक्षां अचेतन शरीराला) मुख्यत्व संभवत नाहीं[13] म्हणून-(ही तो दृष्टांत संभवत नाहीं). (४)
९ आणि निराळ्या रीतीनें अनुमान केलें तरी (प्रधानाला) ज्ञानशक्ति नसल्यामुळें (दोष येतातच).	९ आणि निराळ्या रीतीनें अनुमान केलें तरी (ईश्वराच्या अंगीं) प्रवृत्तिशक्ति नाहीं (असें मानावें लागतें) म्हणून (तेंही बरोबर नाहीं[14]).

सृष्टि उत्पन्न होत असल्यामुळें पुरुषाला तिचा वियोग होणार नाहीं. आणि त्यामुळें मोक्ष प्राप्त होणार नाहीं.

१३ कारण लोकामध्यें कोणतीही गोष्ट करतांना शरीरापेक्षां पुरुषालाच मुख्यत्व समजलें जातें. सूत्रांतील ' च ' हा शब्द मध्वाचार्यांच्या पाठांत नाहीं.

१४ ' पुरुष हा जगाचें मुख्य कारण आहे आणि प्रधान हें त्याचें अंगभूत साधन आहे म्हणजे प्रकृतीनें युक्त पुरुष हा जगाचा कर्ता आहे ' असें सांख्य लोकांपैकीं कांहीं लोकांचें मत आहे. त्याचें येथें सूत्रकारानीं खंडन केलें आहे. हे लोक पूर्वींच्या लोकांपेक्षां निराळ्या रीतीनें अनुमान करतात. तें असें:– ज्याप्रमाणें लोकामध्यें कोणतेंही कर्म करतांना चेतनाला मुख्यत्व असतें आणि इतर पदार्थांना गौणत्व असतें त्याप्रमाणें जगाची उत्पत्ति करतांना सुद्धां चेतन पुरुषाला मुख्यत्व आहे आणि प्रकृतीला गौणत्व आहे. परंतु ह्या मतावर असा दोष येतो कीं जर पुरुषाला जग उत्पन्न करतांना प्रकृतीचें साहाय्य लागतें तर अर्थातच पुरुषाच्या अंगीं प्रवृत्तिशक्ति नसली पाहिजे, आणि जर ती प्रवृत्तिशक्ति नसेल तर त्याला मुख्यत्व देतां येत नाहीं. वरें प्रवृत्ति शक्ति असेल तर प्रकृतीची कल्पना निरर्थक होईल.

१० विप्रतिषेधाच्चासमञ्जसम् ।

	८ (अनुमानानें प्रधान सिद्ध होतें असें) जरी मानलें तरी (दोष येतोच). कारण (प्रधानाला प्रवृत्त होण्याला) कांहीं प्रयोजन (संभवत) नाहीं.
१० विरोध असल्यामुळेंही (सांख्यमत) असमंजस आहे. (१)	९ विरोध असल्या[१६]मुळेंही (सांख्यमत) असमंजस आहे. (१)
११ ज्याप्रमाणें ऱ्हस्व आणि परिमंडल यांपासून महत् आणि दीर्घ (उत्पन्न होतात) त्याप्रमाणें (ब्रह्मापासून जग उत्पन्न होईल). (२)	१० ज्याप्रमाणें ऱ्हस्व आणि परिमंडल यांपासून महत् आणि दीर्घ (असें द्व्यणुक उत्पन्न होतें हें वैशेषिकांचें मत [१८]असमंजस आहे) त्याप्रमाणें (त्यांचीं इतर मतेंहीं असमंजसच आहेत).

१५ हें सूत्र रामानुजाचार्यांनीं येथें पठन केलें आहे.

१६ सांख्य लोक हे 'पुरुष हा उदासीन आहे, त्याला कर्तृत्व नाहीं' असें एकीकडे सांगून दुसरीकडे त्याच्याविरुद्ध 'पुरुष हा साक्षी आहे, द्रष्टा आहे, भोक्ता आहे' असें सांगतात. तसेंच त्यांनीं 'पुरुष हा विकाररहित आहे' असें एका ठिकाणीं सांगितलें आहे. आणि दुसरे ठिकाणीं 'अध्यास व भ्रम हे पुरुषाचेच विकार आहेत' असें सांगितलें आहे असा त्यांच्या मतामध्यें परस्पर विरोध आढळून येतो.

१७ कारण 'ईश्वर हा जगाचें स्वतंत्र कारण आहे' असें श्रुति, स्मृति वगैरेंवरून सिद्ध होत आहे.

१८ परमाणु हे निरवयव आहेत असें वैशेषिकांनीं मानिलें असल्यामुळें त्यांचा कितीही संयोग झाला तरी त्यापासून अधिक परिमाणाचें कार्य उत्पन्न होणार नाहीं (पृ. ६५० पं. ४ पहा). म्हणून हें मत असमंजस आहे.

११ महद्दीर्घवद्वा ह्रस्वपरिमण्डलाभ्याम् ।

१० विरोध असल्यामुळेंही (सां- ख्यमत) असमंजस आहे. (२)	१० शिवाय (श्रुति वगैरेंशीं) विरोध असल्यामुळेंही[17] (हें सांख्यमत) असमंजस आहे. (९)
११ (द्व्यणुक हें) उंच असेल किंवा लांबट असेल. कारण अखूड आणि सर्वोवर्ती वर्तुल (असें परमाणूचें परिमाण) आहे.	११ महत् आणि दीर्घ यांप्रमाणें ह्रस्वत्व आणि पारिमांडल्य या (परिमाणां-) पासून- (हीं परिमाण उत्पन्न हो- ईल), किंवा (महत् आणि दीर्घ यांपासूनही उत्पन्न होणार नाहीं).

१९ हें पुढील सूत्रांवरून समजेल. तसेंच ' आकाश नित्य आहे ' इत्यादि प्रकारचीं त्यांचीं इतर मतेंही श्रुतिविरुद्ध असल्यामुळें असमजसच आहेत.

२० जर एका परमाणूवर दुसरा परमाणु ठेविला तर द्व्यणुक उंच होईल आणि एका परमाणूच्या जवळ दुसरा परमाणु ठेविला तर द्व्यणुक हें लांबट होईल. ही सूत्रकारानीं वैशेषिक लोकांची थट्टा केली आहे.

२१ ज्याप्रमाणें त्र्यणुक वगैरेंच्या महत् आणि दीर्घ या परिमाणापासून त्यांच्या चतुरणुक वगैरे कार्यांवर तसलें परिमाण उत्पन्न होतें त्याप्रमाणें द्व्यणुक आणि परमाणु यांच्या ह्रस्वत्व आणि पारिमांडल्य या परिमाणापासूनही त्यांच्या त्र्यणुक द्व्यणुक वगैरे कार्यांवर तसलें परिमाण उत्पन्न होईल किंवा महत् आणि दीर्घ या परिमाणांपासूनही तसलें परिमाण उत्पन्न होणार नाहीं. तात्पर्य ' कारणाचे गुण हे कार्याच्या गुणांचें असमवायिकारण असतात ' हा वैशेषिकांचा सिद्धांत बरोबर नाहीं.

१२ उभयथाऽपि[22] न कर्मातस्तदभावः ।

१२ दोन्ही प्रकारांनींही कर्म (संभवत) नाहीं. म्हणून त्या (सृष्टि आणि प्रलयां-) चा अभाव होईल.	११ दोन्ही प्रकारांनीं कर्म (संभवत) नाहीं.[23] म्हणून त्या (परमाणूच्या कर्मापासून जगाच्या उत्पत्ती-) चा अभाव होईल.
१३ (तूं) समवाय मानीत अस- ल्यामुळेंही (तुझ्या मतीं सृष्टि आणि प्रलय यांचा अभाव आहे). कारण (तुजवर) सारखेपणामुळें अनवस्था (दोष) प्राप्त होतो.	१२ समवाय मानीत असल्यामुळें- ही (हें वैशेषिकांचें मत असमंजस आहे). कारण सारखेपणामुळें अनवस्था[26] (दोष) प्राप्त होतो.

२२ ह्या सूत्रामध्यें अपि शब्द श्रीभाष्याच्या छापील पुस्तकांत दिसत नाहीं तरी पुढें अर्थ केला आहे त्यावरून अपि शब्द असावा असें वाटतें. वेदांतदीपामध्येंही अपि शब्द दृष्टीस पडतो.

२३ पृ. ६४८ पं. ८ पहा.

२४ 'एका परमाणूवर दुसरा परमाणु किंवा एका परमाणूच्या जवळ दुसरा परमाणु' अशा दोन्ही प्रकारांनीं जरी परमाणूंचा संयोग मानिला तरी त्यांचें संघटन होणार नाहीं, म्हणजे परस्परांच्या अवयवामध्यें परस्परांचें अवयव मिळून जो अत्यंत संयोग व्हावयचा तो होणार नाहीं. कारण परमाणू हे निरवयव आहेत. तसेंच ते निरव- यव असल्यामुळें त्यांच्यावर कर्म देखील संभवत नाहीं. कारण कर्माचें कांहींच कारण सांगतां येत नाहीं. 'ईश्वराचा संयोग' हें कारण म्हणावें तर कोणत्या अवयवाशीं संयोग होतो व कोणत्या अवयवावर कर्म उत्पन्न होतें आणि कोणत्या अवयवाशीं दुसऱ्या पर- माणूचा संयोग होतो तें कांहींच सांगतां येत नाहीं. तात्पर्य द्व्यणुक उत्पन्न होणार नाहीं.

२५ जर ईश्वराची इच्छा नित्य असेल तर ज्याप्रमाणें प्रलयाचे वेळीं ती इच्छा असूनही परमाणूवर कर्म उत्पन्न होत नाहीं त्याप्रमाणें सृष्टीच्या वेळींही कर्म उत्पन्न होणार नाहीं. आतां जर ईश्वराची इच्छा अनित्य असेल तर ती इच्छाच नसल्यामुळें परमाणू- वरील कर्म हें जें तिचें कार्य तें उत्पन्न होणार नाहीं. तात्पर्य दोन्ही प्रकारांनींही कर्म

१२ समवायाभ्युपगमाच्च साम्यादनवस्थितेः ।

१२ दोन्ही प्रकारांनीही (बरोबर) नाहीं. (कारण) कर्म (संभवत) नाहीं. म्हणून त्या (द्व्यणुका-) चा अभाव होईल.	१२ दोन्ही प्रकारांनीही कर्म (संभवत) नाहीं. म्हणून त्या (द्व्यणुक वगैरे कार्या-) चा अभाव होईल.
१३ (वैशेषिक लोक) समवाय संबंध मानीत असल्यामुळेंही (त्यांच्या मतीं ' द्व्यणुक उत्पन्न होतें ' असें म्हणतां येत नाहीं). शिवाय (समवायाला संयोगाशीं) सारखेपणा असल्यामुळें अनवस्था दोष प्राप्त होतो.	१३ (वैशेषिक लोक) समवायसंबंध मानतात म्हणून (त्यांच्यावर) सारखेपणामुळें अनवस्था दोष प्राप्त होतो.

संभवत नाहीं. तेव्हां ' ईश्वरेच्छा ही सर्व कार्यांचें निमित्तकारण आहे ' हा वैशेषिकांचा सिद्धांत बरोबर नाहीं.

२६ अधिकरणापेक्षां निराळे उपलब्ध न होणारे असे जे जाति, गुण वगैरे पदार्थ त्यांच्याशीं ज्याप्रमाणें समवाय संबंध मानला आहे त्याप्रमाणें समवायाशीं देखील दुसरा समवाय मानावा लागेल. कारण समवाय हा देखील अधिकरणापेक्षां निराळा उपलब्ध होत नसल्यामुळें जाति, गुण वगैरेंसारखाच आहे. असा अनवस्था दोष येतो.

२७ वैशेषिक लोक हे परमाणु आणि द्व्यणुक यांच्या मध्यें समवाय संबंध मानतात. आतां समवाय संबंध तर नित्य आहे; तेव्हां अर्थातच त्याचें संबंधी जें द्व्यणुक तें देखील त्यांना नित्यच मानावें लागेल. म्हणून ' द्व्यणुक उत्पन्न होतें ' असें म्हणतां येत नाहीं.

२८ संबंध या नात्यानें त्या दोघांमध्यें सारखेपणा आहे. तेव्हां जसा संयोग संबंध हा आपल्या संबंधीशीं समवाय संबंधानें संबंध पावतो तसा समवाय संबंध हा देखील आपल्या संबंधीशीं दुसऱ्या संबंधानें संबंध पावेल. तो दुसरा संबंध तिसऱ्या संबंधानें संबंध पावेल. असा अनवस्थादोष येतो.

२९ पृ. ६५२ पं. ४ पहा. तेव्हां या अनवस्थादोषामुळें वैशेषिक लोकांना समवाय संबंध मानतां येत नाहीं. म्हणून त्यांनीं कारणामध्यें ' समवायिकारण ' म्हणून जें एक प्रकारचें कारण मानिलें आहे तें बरोबर नाहीं.

१४ नित्यमेव च भावात् । १५ रूपादिमत्त्वाच्च विपर्ययो दर्शनात्[32] ।

१४ (प्रवृत्ति आणि निवृत्ति) सदोदितच (चालू) असल्यामुळेंही (सृष्टि आणि प्रलय यांचा अभाव आहे).	१३ शिवाय (समवाय संबंध नित्य असल्यामुळें त्याचे संबंधी जें जग तें देखील) नित्यच[31] होईल. म्हणून (हें वैशेषिकांचें मत असमंजस आहे).
१५ आणि (परमाणूंना) रूप वगैरे (गुण) असल्यामुळें (तुझ्या मताच्या) उलट गोष्ट (सिद्ध होऊं लागेल). कारण (व्यवहारांत) तसें दृष्टीस पडतें.	१४ आणि (परमाणूंना) रूप वगैरे (गुण) असल्यामुळें (ह्या मताच्या) उलट गोष्ट (सिद्ध होऊं लागेल). कारण (व्यवहारांत) तसें दृष्टीस पडतें.
१६ दोन्ही रीतींनीं दोष येतो म्हणूनही (तुझें मत बरोबर नाहीं).	१५ दोन्ही रीतींनीं[34] दोष येतो म्हणूनही (हें मत असमंजस आहे).
१७ आणि (तुझ्या मताचा शिष्ट लोकांनीं) अंगीकार केला नसल्यामुळें-(ही त्याचा) सर्वथैव त्याग (करावा). (२)	१६ आणि (ह्या मताचा शिष्ट लोकांनीं) अंगीकार केला नसल्यामुळें-(ही त्याचा) सर्वथैव त्याग (करावा). (२)

३० कारण, संबंधी पदार्थ अस्तित्वांत असल्याशिवाय संबंध अस्तित्वांत असूं शकत नाहीं.

३१ कारण, परमाणु, त्यांचा द्व्यणुकाशीं समवाय, ईश्वरेच्छा इत्यादि कारणें नित्य आहेत. तात्पर्य त्यांच्या मतीं प्रलय संभवत नाहीं.

३२ येथें वल्लभाचार्यांनीं ‘ अदर्शनात् ’ असा पदच्छेद केला आहे.

३३ ‘ उभयथापि च दोषात् ’ असा वल्लभाचार्यांचा पाठ आहे.

३४ परमाणूंना रूप वगैरे गुण मानले तर ते घट, पट वगैरेंप्रमाणें अनित्य, स्थूल,

१६ उभयथा च दोषात्[35] । १७ अपरिग्रहाच्चात्यन्तमनपेक्षा ।

१४ शिवाय (वैशेषिकांच्या मतीं परमाणु वगैरे कारणें) नित्य अस्तित्वांत असल्यामुळें (नेहमीं त्यांपासून कार्य उत्पन्न होईल).

१५ आणि (परमाणूंना) रूप वगैरे (गुण) असल्यामुळें (वैशेषिक मताच्या) उलट गोष्ट (सिद्ध होऊं लागेल. त्या गोष्टीला येथेंच अपवाद मानतां येत नाहीं). कारण (व्यवहारांत तसें) दृष्टीस पडत नाहीं.

१६ दोन्ही रीतींनीं दोष[35] येतो म्हणूनही (हें मत बरोबर नाहीं).

१७ आणि (ह्या मताचा वैदिक लोकांनीं) अंगीकार केला नसल्यामुळें (त्याचा) सर्वथैव त्याग (करावा). (२)

१४ शिवाय (वैशेषिकांच्या मतीं द्व्यणुक वगैरे कार्य) नित्य होऊं लागेल[31].

१५ आणि (परमाणूंना) रूप वगैरे (गुण) असल्यामुळें (वैशेषिक मताच्या) उलट गोष्ट (सिद्ध होऊं लागेल). कारण (व्यवहारांत तसें) दृष्टीस पडतें.

१६ दोन्ही रीतींनीं[35] दोष येतो म्हणूनही (हें मत बरोबर नाहीं).

१७ शिवाय (ह्या मताचा श्रुतिस्मृतीमध्यें) स्वीकार केला नसल्यामुळें (ही त्याचा) सर्वथैव त्याग (करावा). (६)

सावयव होतील असा दोष पूर्वी सूत्रांमध्यें दिलाच आहे. आतां जर परमाणूंना रूप वगैरे गुण न मानले तर त्यांचीं जीं घट पट वगैरे कार्यें त्यांमध्येंही रूप वगैरे गुण येणार नाहींत असा दोन्ही रीतींनीं दोष येतो.

३५ जर परमाणु हे नित्य मानले तर त्या परमाणूसारखे जे घट पट वगैरे रूपी पदार्थ ते देखील नित्य मानावे लागतील. आतां जर परमाणु हे अनित्य मानले तर ते परमाणुरूपी समवायिकारण नसल्यामुळें द्व्यणुक वगैरे कार्यांचा अभाव होईल असा दोन्ही रीतींनीं दोष येतो.

१८ समुदाय उभयहेतुकेऽपि तदप्राप्तिः ।

१८ दोन्ही कारणांपासून उत्पन्न होणारे समुदाय जरी मानले तरी ते सिद्ध होत नाहींत.	१७ दोन्ही कारणांपासून उत्पन्न होणारे समुदाय[३६] जरी मानले तरी ते सिद्ध होत नाहींत.
१९ (अविद्या वगैरे) एकमेकांचीं कारणें असल्यामुळें (संघात उत्पन्न होतो) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण ते फक्त (एकमेकांच्या) उत्पत्तीचीं कारणें आहेत.	१८ (अविद्या वगैरे) एकमेकांचीं कारणें असल्यामुळें (समुदाय) संभवतो असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (ते अविद्या वगैरे) समुदाय बनण्याचे निमित्त नव्हेत.

३६ पृथिवी, जल, तेज आणि वायु हीं जीं भूतें तद्रूप समुदाय परमाणूंपासून उत्पन्न होतो आणि शरीर, इंद्रिय आणि विषय एतद्रूपी समुदाय हा पृथिवी वगैरे भूतांपासून उत्पन्न होतो.

३७ कारण जीव वगैरे सर्वच पदार्थ क्षणिक आहेत. तेव्हां या समुदायाच्या संबंधामुळें जीव संसारांत पडतो असें मानतां येत नाहीं.

३८ समुदाय हा एका परमाणूपासून होतो असें मुळींच म्हणतां येत नाहीं. अनेक परमाणूंपासून होतो असें म्हणावें तर ते अनेक परमाणू मिळित असतात कीं विरळ असतात तें कांहींच सांगतां येत नाहीं. ' मिळित असतात ' असें म्हणावें तर तें त्यांचें मेळन समुदाय सिद्ध झाल्यावांचून होत नाहीं आणि मेळनावांचून समुदाय सिद्ध होत नाहीं असा अन्योन्याश्रय येतो. ' विरळ असतात ' असें म्हणावें तर तसे (मिळित नसलेले) परमाणु प्रळयाचे वेळीं देखील असल्यामुळें प्रळयाचाच अभाव होईल. तात्पर्य, कोणत्याही रीतीनें समुदाय सिद्ध होत नाहींत. तेव्हां घट, पट वगैरे कार्य परमाणुसमुदाय आहेत हें बौद्धमत बरोबर नाहीं.

३९ ' इतरेतरप्रत्ययत्वादुपपन्नमिति चेन्न संघातभावानिमित्तत्वात् ' असा रामानुजाचार्यांचा पाठ आहे.

१९ इतरेतर[३९]प्रत्ययत्वादिति चेन्नोत्पत्तिमात्रनिमित्तत्वात् ।

१८ दोन्ही कारणांपासून उत्पन्न होणारे समुदाय जरी मानले तरी त्या (समुदायां) ची प्राप्ति (जीवाला होणार) नाहीं.[३७]	१८ दोन्ही कारणापासून उत्पन्न होणारे समुदाय जरी मानले तरी ते सिद्ध होत नाहींत.[३८]
१९ (पूर्वपूर्वक्षणचा पदार्थ) उत्तरोत्तर वस्तूंचा कारण होत असल्यामुळें (दोष नाहीं) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (पूर्वक्षणचे पदार्थ) उत्पत्तीचे मात्र कारण आहेत[४०].	१९ परस्परांच्या ज्ञानामुळें (व्यवहार होतो म्हणून दोष नाहीं) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (कोणतीही वस्तु एका कार्याच्या) उत्पत्तीचीच फक्त कारण होऊं शकते.[४१]

४० क्षणिक अशा आत्म्यांची जी संतति तोच जीव होय. आणि क्षणिक अशा घट पट वगैरे पदार्थांची जी संतति तेच जड पदार्थं (विषय) होत असें मानलें म्हणजे सर्व व्यवहार सिद्ध होतो कांहीं दोष येत नाहीं. परंतु असें मानलें असतां ‘ सर्व वस्तू क्षणिक आहेत ’ हा सिद्धांत बौद्धांना सोडावा लागेल. तो सिद्धांत घ्यावा तर पूर्वक्षणचे पदार्थ हे फक्त उत्तर क्षणीं होणाऱ्या ज्ञानाच्या उत्पत्तीचें आणि उत्तर क्षणच्या पदार्थांच्या उत्पत्तीचें कारण मात्र होतील परंतु त्याचें अनुसंधान करतो कोण आणि तें कसें करतो त्याची उपपत्ति क्षणिकपक्षीं करतां येत नाहीं.

४१ शं. ‘ विरल परमाणूंपासून मिलित परमाणू उत्पन्न होतात ’ असें मानलें तर विरल परमाणु प्रलयाचे वेळीं देखील असल्यामुळें प्रलयाचाच अभाव होईल असा दोष पूर्वी (३८ टी.) दिला आहे तो येत नाहीं. कारण प्रलयाचे वेळीं जरी पदार्थ असले तरी त्यांचें ज्ञान नसल्यामुळें व्यवहार होत नाहीं. ‘ हा घट, हा पट, हें आणणें, हें नेणें ’ अशा परस्पर वस्तूंच्या ज्ञानामुळेंच व्यवहार होत असतो. आणि व्यवहार न होणें हाच प्रलय होय. उ. असें मानलें तर सृष्टीच्या वेळीं सुद्धां व्यवहार होणार नाहीं. कारण कोणतीही वस्तु क्षणिक असल्यामुळें ती एका कार्याच्या उत्पत्तीचेंच कारण होईल. परंतु द्रष्ट्याला ‘ ही वस्तु अमुक आहे, ही वस्तु अमुक आहे ’ अशी अनेक वस्तूंची परस्पर अपेक्षा व त्यामुळें व्यवहार, इतके होतोपर्यंत वस्तु कायम रहात नाहीं.

२० उत्तरोत्पादे च पूर्वनिरोधात् । २१ असति प्रतिज्ञोपरोधो

२० आणि उत्तर (क्षण) उत्पन्न झाल्याबरोबर पूर्व (क्षण) नष्ट होत असल्यामुळें (अविद्या वगैरे हे एकमेकांच्या उत्पत्तीचीं देखील कारणें होत नाहींत).

२१ कारण नसतांना (कार्य उत्पन्न होतें असें म्हणशील तर) प्रतिज्ञा विरुद्ध होईल. नाहीं तर (कार्यकारणांचें) यौगपद्य होईल.

२२ विच्छेद नसल्यामुळें प्रतिसंख्यानिरोध आणि अप्रतिसंख्यानिरोध हे सिद्ध होत नाहींत.

१९ आणि उत्तर (क्षण) उत्पन्न झाल्याबरोबर पूर्व (क्षण) नष्ट होत असल्यामुळें (अविद्या वगैरे हे एकमेकांच्या उत्पत्तीचीं देखील कारणें होत नाहींत).

२० कारण नसतांना (कार्य उत्पन्न होतें असें म्हणशील तर) प्रतिज्ञा विरुद्ध होईल. नाहीं तर (कार्यकारणांचें) यौगपद्य होईल.

२१ विच्छेद नसल्यामुळें प्रतिसंख्यानिरोध आणि अप्रतिसंख्यानिरोध हे सिद्ध होत नाहींत.

४२ विरल परमाणूंपासून मिळित परमाणू उत्पन्न होतात असें मानून दोष दिला. परंतु तसें मुळीं मानतांच येत नाहीं. कारण 'कारणासारखें कार्य होतें' असा नियम असल्यामुळें विशेषप्रकारचें कार्य उत्पन्न होत नाहीं. आतां 'विरल परमाणु हे आरंभीं आपल्यासारखे विरल परमाणु उत्पन्न करून नंतर त्यांचें मेळन करतात' असें म्हणावें तर तसेंही म्हणतां येत नाहीं. कारण सर्व पदार्थ क्षणिक असल्यामुळें पूर्वींचे विरल परमाणु हे पुढील विरल परमाणू उत्पन्न झाल्याबरोबर नष्ट होतात. त्यांचें मेळन होतोपर्यंत ते टिकत नाहींत.

४३ पृ. ६९४ पं. १० पहा.

४४. जर कारण नसतांनाच कार्य उत्पन्न होईल तर त्या कार्याला कार्यच म्हणतां येणार नाहीं. तेव्हां 'अमुक कार्य आहे' ही जी प्रतिज्ञा ती विरुद्ध होईल. आतां 'कार्य उत्पन्न होतांना कारण असतेंच म्ह. तें क्षणिक नाहीं' असें म्हणावें तर कार्य उत्पन्न झाल्यानंतर सुद्धां त्या कारणाचा नाश होणार नाहीं. कारण तो नाश कां होतो हें सांगतां येत नाहीं. अशा रीतीनें प्रत्येक क्षणचे घट रहात गेले तर एका ठिकाणीं असंख्य घट एककालीं होतील.

४५ प्रतिक्षणीं उत्पन्न होणाऱ्या घट, पट वगैरे पदार्थांची जी संतति तिचा विच्छेद संभवत नाहीं. कारण त्याचें कांहीं कारण सांगतां येत नाहीं. तेव्हां त्यांचा प्रतिक्षणीं प्रति-

यौगपद्यमन्यथा । २२ प्रतिसंख्याप्रतिसंख्यानिरोधाप्राप्तिरविच्छेदात् ।

२० आणि उत्तर (क्षणचा पदार्थ) उत्पन्न होतेवेळीं पूर्व (क्षणचा पदार्थ) नष्ट झाला असल्यामुळें (त्यापासून उत्तर क्षणच्या पदार्थाची उत्पत्ति संभवत नाहीं).

२१ (वस्तु उत्पन्न झाल्यानंतर तिचा दुसऱ्या क्षणाशीं संबंध) नसेल तर प्रतिज्ञा विरुद्ध होईल[४३]. (ती प्रतिज्ञा) न मानिली तर (सर्व वस्तू) एकदम उत्पन्न होतील.

२२ विच्छेद नसल्यामुळें प्रतिसंख्यानिरोध आणि अप्रतिसंख्यानिरोध हे सिद्ध होत नाहींत[४५].

२० आणि पुढची वस्तु (म्ह. कार्य) उत्पन्न झाल्याबरोबर पूर्वीची वस्तु (म्ह. कारण) नष्ट होत असल्यामुळें (त्यापासून विशेष कार्य उत्पन्न होणार[४२] नाहीं).

२१ कारण नसतांना[४४] (कार्य उत्पन्न होतें असें म्हणशील तर) प्रतिज्ञा विरुद्ध होईल. नाहींतर (सर्व कार्यांचें) यौगपद्य होईल.

२२ विच्छेद नसल्यामुळें प्रतिसंख्यानिरोध आणि अप्रतिसंख्यानिरोध हे सिद्ध होत नाहींत[४६].

संख्यानिरोध संभवत नाहीं. आतां त्यांचा अप्रतिसंख्यानिरोध मानावा तर तो निरुपयोगी आहे. कारण ' पदार्थ हे क्षणिक आहेत ' असें मानल्यानेंच ती गोष्ट सिद्ध होत आहे.

४६ ' प्रत्येक वस्तूचा प्रतिक्षणीं नाश होतो ' हें बौद्धांचें म्हणणें संभवत नाहीं. कारण पूर्वक्षणचा घट हा द्वितीय क्षणच्या घटाला उत्पन्न करून नंतर नष्ट होतो असें ते म्हणतात. ' नष्ट होतो ' म्हणजे त्या दोन घटांचा वियोग होतो. आतां तिसऱ्या क्षणीं होणारें जें वियोगरूपी कार्य तें होतांना त्या वियोगाचीं कारणें म्हणजे दोन घट ते अस्तित्वांत असलेच पाहिजेत. तेव्हां प्रथमक्षणच्या घटाचें तिसऱ्या क्षणीं अस्तित्व येत असल्यामुळें त्या घटानें जसा दुसऱ्या क्षणीं घट उत्पन्न केला, तसा तिसऱ्या क्षणीं देखील आणखी एखादा निराळा घट उत्पन्न केलाच पाहिजे. कारण ' कारण असतांना कार्य उत्पन्न झालेंच पाहिजे ' असा नियम आहे. व त्या निराळ्या घटाचा होणारा जो चवथ्या क्षणीं वियोग त्या वेळीं प्रथमक्षणच्या घटाचें अस्तित्व येत असल्यामुळें त्या वेळीं त्या प्रथमक्षणच्या घटानें आणखी एक निराळा घट उत्पन्न केलाच पाहिजे. अशा रीतीनें त्या घटांचा विच्छेद संभवत नसल्यामुळें प्रतिक्षणीं नाश संभवत नाहीं. तसेंच घटाचा जो सर्वथा नाश होतो तो देखील संभवत नाहीं. कारण त्या नाशाच्या पूर्वक्षणचा जो घट तो इतर घटाप्रमाणें आपल्या पुढील घट उत्पन्न करीलच. तेव्हां घटांचा विच्छेद संभवत नाहीं.

२३ उभयथा च दोषात् । २४ आकाशे चाविशेषात् ।

२३ आणि दोन्ही बाजूंनीं दोष येत असल्यामुळें (बौद्ध-दर्शन असमंजस आहे).	२२ आणि दोन्ही बाजूंनीं दोष येत असल्यामुळें (बौद्धांनीं मानिलेले पदार्थांचे उत्पत्ति आणि नाश हे बरोबर नाहींत).
२४ आणि आकाशाचे ठिकाणीं कांहीं विशेष नसल्यामुळें (आकाश निःस्वरूप आहे हें मत देखील बरोबर नाहीं).	२३ आणि आकाशाचे ठिकाणीं कांहीं विशेष नसल्यामुळें (आकाश निःस्वरूप आहे हें मत देखील बरोबर नाहीं).
२५ आणि (आत्म्याला) अनुस्मरण होत असल्यामुळें (आत्मा क्षणिक नाहीं).	२४ आणि प्रत्यभिज्ञा होत असल्यामुळें (पदार्थ क्षणिक नाहींत).

४७ ‘ सर्व पदार्थ क्षणिक आहेत त्यांची उत्पत्ति आणि नाश हे आपोआप होतात म्हणजे तुच्छापासून पदार्थ उत्पन्न होतो आणि क्षणभर त्याची स्थिति झाली म्हणजे तो पदार्थ फिरून तुच्छरूपच होतो ’ असें बौद्धांचें मत आहे. परंतु तुच्छापासून उत्पन्न झालेला पदार्थ तुच्छच होईल. कारण ‘ कारणाप्रमाणें कार्य होतें ’ असा नियम आहे. तेव्हां पदार्थ हा एक क्षणभर सुद्धां भावरूप होणार नाहीं. तसेंच पदार्थांचा आपोआप नाश होत असल्यामुळें एका क्षणांत सर्व जग तुच्छ होऊन जाईल असें दोन्ही बाजूंनीं दोष येतात.

४८ अविद्येचा नाश झाला म्हणजे मोक्ष प्राप्त होतो असें बौद्ध लोक मानतात. आतां तो अविद्येचा नाश जर आपोआपच होईल तर शास्त्र फुकट होईल. कांहीं कारणानें तो नाश होत असेल तर तें कारण काय तें सांगतां येत नाहीं. कारण बौद्धमतीं

२९ अनुस्मृतेश्च ।

२३ आणि दोन्ही बाजूंनीं दोष येत असल्यामुळें (बौद्धदर्शन असमंजस आहे).

२३ आणि दोन्ही बाजूंनीं दोष येत असल्यामुळें (बौद्धदर्शन असमंजस आहे).

२४ आणि आकाशाचे ठिकाणीं कांहीं विशेष नसल्यामुळें (आकाश निःस्वरूप आहे हें मत देखील बरोबर नाहीं).

२४ आणि आकाशाचे ठिकाणीं (इतर वस्तूंपेक्षां) कांहीं विशेष नसल्यामुळें (आकाशाप्रमाणें इतर वस्तूंनाही क्षणिक म्हणतां येत नाहीं).

२५ आणि प्रत्यभिज्ञा होत असल्यामुळें (पदार्थ क्षणिक नाहींत.

२५ आणि प्रत्यभिज्ञा होत असल्यामुळें (पदार्थ क्षणिक नाहींत). (७)

अविद्या आणि तिचीं कार्यें यांशिवाय अन्य पदार्थच अस्तित्वांत नाहीं म्हणून दोन्ही बाजूंनीं दोष येतो.

४९ ‘ कारण असतांना कार्य असलेंच पाहिजे ’ असा नियम मानिला तर कारण आणि कार्य हीं दोन्ही एकदमच अस्तित्वांत येत असल्यामुळें त्यामध्यें मुळीं कार्यकारणभावच मानतां येणार नाहीं. आतां तो नियम न मानिला तर ‘ प्रतिक्षणचे घट हे नियमानें उत्तर क्षणीं घट कां उत्पन्न करतात’ तें सांगतां येत नाहीं असा दोन्ही बाजूंनीं दोष येतो.

५० जसा घट पट ह्या वस्तू आहेत तशीच आकाश ही एक वस्तू आहे; त्यामध्यें वस्तू या नात्यानें कांहीं विशेष नाहीं.

५१ मनुष्यानें पूर्वी अनुभवलेली वस्तू फिरून पाहिली असतां त्याला ‘ तीच ही वस्तू आहे ’ अशी प्रत्यभिज्ञा म्हणजे ओळख पटते. तेव्हां अर्थातच ती वस्तूही क्षणिक मानतां येत नाहीं. आणि अनुभव घेणारा आत्माही क्षणिक मानतां येत नाहीं.

२६ नासतोऽदृष्टत्वात् । २७ उदासीनानामपि चैवं सिद्धिः ।

२६ अभावापासून (भाव उत्पन्न होत) नाहीं. कारण (तसें) दृष्टीस पडत नाहीं.	२५ (ज्ञानाचे ठिकाणीं उपलब्ध होणारा आकार) असत्पदार्थाचा नव्हे. कारण (तसें) दृष्टीस पडत नाहीं.[53]
२७ आणि अशा रीतीनें उदासीनांना देखील (इष्ट गोष्टी) प्राप्त होतील. (४)	२६ आणि अशा रीतीनें[54] उदासीनांना देखील (इष्ट गोष्टी) प्राप्त होतील. (३)
२८ (बाह्य वस्तूंचा) अभाव नाहीं. कारण त्या उपलब्ध होतात.	२७ (ज्ञानव्यतिरिक्त वस्तूंचा) अभाव नाहीं. कारण (तसें ज्ञान) उपलब्ध होतें.[55]
२९ आणि वैधर्म्यामुळें स्वप्न वगैरें-(तील ज्ञानां-) सारखीं (जागृतींतील ज्ञानें असूं शकत) नाहींत.	२८ आणि वैधर्म्यामुळें स्वप्न वगैरें-(तील ज्ञानां-) सारखीं (जागृतींतील ज्ञानें असूं शकत) नाहींत.

५२ बौद्धांपैकीं सौत्रांतिक लोकांचें असें मत आहे कीं घट, पट वगैरे बाह्य पदार्थ ज्ञानाचे वेळीं मुळींच अस्तित्वांत नाहींत. ते असतच आहेत. कारण उत्पन्न झाल्याबरोबरच (म्ह. ज्ञानाच्या पूर्वीच) त्यांचा नाश झालेला आहे. फक्त त्या घट, पट वगैरेंचा आकार मात्र ज्ञानामध्यें असतो. उदा:-हा घट आहे, हा पट आहे इत्यादि. परंतु हें मत बरोबर नाहीं. कारण, अस्तित्वांत असलेल्या पदार्थाचा धर्म त्याच्या संबंधानें दुसऱ्या पदार्थावर भासतो असें दृष्टीस पडतें. तेव्हां जो पदार्थ ज्या वेळीं अस्तित्वांत नसतो त्या वेळीं त्याचा धर्म दुसऱ्या पदार्थावर भासतो हें म्हणणें अत्यंत असंभवनीय आहे.

५३ असत् म्हणजे शून्य होय. येथून सूत्रकारांनीं शून्यवादी बौद्धांचें खंडन केलें आहे.

५४ ‘ सर्व पदार्थ क्षणिक आहेत, ते आपोआप उत्पन्न होतात, आणि आपोआप नष्ट होतात ’ अशा रीतीनें.

२८ नाभाव उपलब्धेः । २९ वैधर्म्याच्च न स्वप्नादिवत् ।

२६ अभावापासून (भाव उत्पन्न होत) नाहीं. कारण (तसें) दृष्टीस पडत नाहीं.	२६ असतूं[५७] (हें जगाचें कारण) नाहीं. कारण (तसें) दृष्टीस पडत नाहीं.
२७ आणि अशा रीतीनें उदासीनांना देखील (इष्ट गोष्टी) प्राप्त होतील. (४)	२७ आणि अशा रीतीनें उदासीनांपासून देखील (इष्ट गोष्टी) प्राप्त होतील[५५].
२८ (बाह्य वस्तूंचा) अभाव नाहीं. कारण त्या उपलब्ध होतात.	२८ (जगांतील वस्तूंचा[५६]) अभाव नाहीं. कारण त्या उपलब्ध होतात.
२९ आणि वैधर्म्यामुळें स्वप्न वगैरें-(तील ज्ञानां–) सारखीं (जागृतींतील ज्ञानें असूं शकत) नाहींत.	२९ आणि वैधर्म्यामुळें स्वप्न वगैरें-(तील वस्तूं–) प्रमाणें (जागृतींतील वस्तू असूं शकत) नाहींत. (८)

५५ असतापासून पदार्थांची उत्पत्ति होते असें मानलें तर उदासीन म्ह. ज्या टाकतां येत नाहींत आणि घेतां येत नाहींत अशा शशशृंग, खपुष्प वगैरे वस्तूंपासून देखील घट पट वगैरे वस्तू प्राप्त होतील.

५६ ‘ मी घटाला जाणतों ’ इत्यादि ज्ञान उपलब्ध होतें. यावरून ‘ जाणणें या क्रियेचा कर्ता आत्मा आणि जाणणें या क्रियेचें कर्म घट, पट वगैरे विषय हे ज्ञानापेक्षां निराळे आहेत ’ असें अर्थातच सिद्ध होत आहे.

५७ “ जगांतील वस्तूंना खरें अस्तित्व नाहीं, म्हणजे त्या शून्यच आहेत. तेव्हां ‘ त्यांचें कारण देखील शून्य आहे ’ असें म्हटलें असतां त्यांत कांहीं विरुद्ध होत नाही ” अशी जी शंका येते तिचें हें उत्तर आहे.

३० न भावोऽनुपलब्धेः । ३१ क्षणिकत्वाच्च[58]।

३० (वासनांना) अस्तित्व नाहीं. कारण (बाह्य पदार्थ) उपलब्ध होत नाहींत.	२९ (विषयावांचून नुसत्या ज्ञानाचें) अस्तित्व (संभवत) नाहीं. कारण (तसें कोठेंही) उपलब्ध होत नाहीं. (४)
३१ आणि (आलयविज्ञान हें) क्षणिक असल्यामुळें (वासनांचा आश्रय होऊं शकत नाहीं).	
३२ आणि सर्व तऱ्हेनें निर्युक्तिक असल्यामुळें (हें बौद्धदर्शन त्याज्य आहे). (५)	३०[60] आणि सर्व तऱ्हेनें निर्युक्तिक असल्यामुळें (शून्यवादी बौद्धांचें मत बरोबर नाहीं). (५)
३३ एका (वस्तू-) चे (अनेक विरुद्ध धर्म) संभवत नसल्यामुळें (जैनदर्शन बरोबर) नाहीं.	३१ एका (वस्तू-) चे (अनेक विरुद्ध धर्म) संभवत नसल्यामुळें (जैनदर्शन बरोबर) नाहीं.
३४ त्याप्रमाणेंच आत्म्याचें अकात्स्न्र्य (हाही दोष येतो).	३२ आणि असें मानलें असतां आत्म्याचें अकात्स्न्र्य (हाही दोष येतो).

५८ 'घट, पट वगैरे वस्तू ह्या केवल ज्ञानरूपीच आहेत. ज्ञानाशिवाय दुसऱ्या कोणत्याही वस्तूला अस्तित्व नाहीं' असें विज्ञानवादी बौद्धांचें मत आहे. ह्या मताचें खंडन सूत्रकार येथून करीत आहेत.

५९ रामानुजाचार्यांच्या पाठामध्यें हें सूत्रच नाहीं.

६० सर्वशून्यवादी असे जे बौद्धांपैकीं माध्यमिक लोक त्यांच्या मताचें ह्या सूत्रामध्यें सूत्रकारांनीं खंडन केलें आहे. तें असें–शून्यवादी लोक हे 'सर्व सत् आहे' असें म्हणतात, किंवा सर्व असत् आहे असें म्हणतात, किंवा कांहीं निराळ्याच प्रकारचें आहे

३२ सर्वथानुपपत्तेश्च । ३३ नैकस्मिन्नसंभवात् । ३४ एवं चात्माऽकार्त्स्न्यम् ।

३० (वासनांना) अस्तित्व नाहीं. कारण (बाह्य पदार्थ) उपलब्ध होत नाहींत.	३० (जगांतील वस्तूंना केवल ज्ञानस्वरूपानें) अस्तित्व नाहीं. कारण तसा अनुभव येत नाहीं.
३१ आणि (आलयविज्ञान हें) क्षणिक असल्यामुळें (वासनांचा आश्रय होऊं शकत नाहीं).	३१ (पदार्थ स्थिर आहेत आणि ज्ञान) क्षणिक आहे म्हणूनही (त्यांचें ऐक्य नाहीं).
३२ आणि सर्व तऱ्हेनें निर्युक्तिक असल्यामुळें (हें बौद्धदर्शन त्याज्य आहे). (९)	३२ आणि सर्व तऱ्हेनें निर्युक्तिक असल्यामुळें-(ही बौद्धांचीं मतें त्याज्य आहेत). (९)
३३ एका (वस्तू-) चे (अनेक विरुद्ध धर्म) संभवत नसल्यामुळें (जैनदर्शन बरोबर) नाहीं.	३३ एका (वस्तू-) चे (अनेक विरुद्ध धर्म) संभवत नसल्यामुळें (जैनदर्शन बरोबर) नाहीं.
३४ असें मानिलें तरी आत्म्याचें अकार्त्स्न्य (हा दोष येतो).	३४ त्याप्रमाणेंच आत्म्याचें अकार्त्स्न्य (हाही दोष येतो).

असें म्हणतात. कोणताही प्रकार घेतला तरी प्रकार हा अस्तित्वांत असलेल्या पदार्थालाच संभवत असल्यामुळें पदार्थाचें अस्तित्वच सिद्ध होतें. ‘ सर्व शून्य आहे ’ या वाक्यापासूनही ‘ शून्य अशाप्रकारचें कांहीं तरी अस्तित्वांत आहे ’ असाच बोध होतो. तेव्हां कोणत्याही रीतीनें शून्यवादाची उपपत्ति होत नाहीं.

६१ आत्मा हा कोणत्या तरी एका परिमाणाचा असल्यामुळें त्याला कृत्स्न शरीराशीं सारखेपणा येणार नाहीं, म्ह० तो सर्व शरीराएवढा आहे असें मानतां येणार नाहीं. हत्ती, मुंगी वगैरेंच्या शरीरांपैकीं कोणत्या तरी एका शरीराएवढा असेल. हाच अकार्त्स्न्य दोष होय.

३५ न च पर्यायादप्यविरोधो विकारादिभ्यः ।

३५ पाळीपाळीनें (अवयव मिळतात व कमी होतात असें मानिलें तरी) देखील विरोध येत नाहीं असें नाहीं. कारण (तसें मानिलें असतां) विकार वगैरे दोष येतात.

३६ शेवटलें (परिमाण) नित्य असल्यामुळें (मागील) दोन्ही (परिमाणें) नित्य होतात म्हणून भेद नाहीं. (६)

३७ ईश्वर (हा जगाचें कारण होऊं शकत नाहीं); कारण (तसें मानिलें असतां) असामंजस्य येतें.

३३ (आत्म्याला) पर्यायानें (भिन्न भिन्न अवस्था प्राप्त होतात[६२] असें मानलें तरी) देखील विरोध येत नाहीं असें नाहीं. कारण (तसें मानलें असतां) विकार वगैरे दोष येतात.

३४ शेवटलें (परिमाण) कायम रहात असल्यामुळें (आत्मा आणि त्याचें परिमाण या) दोघांनाही नित्यत्व येतें म्हणून (पूर्वीही आत्मा) भिन्न परिमाणाचा असणार नाहीं. (६)

३५ पशुपतीचें[६५] (मत बरोबर नाहीं). कारण (त्यामध्यें) असामंजस्य आहे.

६२ एखादे वेळीं आत्मा संकुचित होतो आणि एखादे वेळीं विकसित होतो. अशा आत्म्याच्या भिन्न भिन्न अवस्था आहेत.

६३ शेवटीं म्ह० मोक्षावस्थेमध्यें आत्म्याची स्थिति असल्यामुळें दोघांना नित्यत्व येतें म्ह० एक त्याच्या अणु परिमाणाला, किंवा महत् परिमाणाला नित्यत्व येतें. कारण ' मध्यम परिमाणाचा पदार्थ अनित्य असतो ' असा नियम आहे. आतां या दोहोंपैकीं कोणतेंही परिमाण मानलें तरी सारखेंच. कारण, आत्म्याचें मध्यम परिमाण मानतां येत नसल्यामुळें ' आत्मा हा शरीराएवढा आहे ' हें जैनांचें मत सिद्ध होत नाहीं.

६४ परिमाण हें शरीरावांचून संभवत नसल्यामुळें परिमाणाला नित्यत्व मानलें कीं शरीराला नित्यत्व मानलेंच पाहिजे. आणि पूर्वीचें शरीर आणि मोक्षावस्थेंतील शरीर ह्यांत कांहीं विशेष नसल्यामुळें पूर्वीचें शरीर देखील नित्य होईल.

६५ पाशुपतमतांतील सर्व ग्रंथ सारखे नाहींत. एका ठिकाणीं ' सहा मुद्रा धारण कराव्यात ' असें सांगितलें आहे. दुसऱ्या ठिकाणीं ' भगासनावर बसलेल्या आ-

३६ अन्त्यावस्थितेश्चोभयनित्यत्वादविशेषः । ३७ पत्युरसामञ्जस्यात् ।

३५ पाळीपाळीनें (अवयव मिळतात व कमी होतात असें मानिलें तरी) देखील विरोध येत नाहीं असें नाहीं. कारण (तसें मानिलें असतां) विकार वगैरे दोष येतात.

३६ शेवटीं[६३] (आत्म्याची) स्थिति असल्यामुळें दोघांना नित्यत्व येतें. म्हणून त्यांत कांहीं विशेष नाहीं. (९)

३७ ईश्वर[६६] (हा जगाचें कारण होऊं शकत नाहीं); कारण (तसें मानिलें असतां) असामंजस्य येतें.

३५ पाळीपाळीनें (अवयव मिळतात व कमी होतात असें मानिलें तरी) देखील विरोध येत नाहीं असें नाहीं. कारण (तसें मानिलें असतां) विकार वगैरे दोष येतात.

३६ शेवटलें (परिमाण) नित्य असल्यामुळें (आत्मा आणि शरीर या) दोघांना नित्यत्व[६४] येतें. (तेव्हां पूर्वीचें शरीर देखील नित्य होईल) कारण त्यांत कांहीं विशेष नाहीं. (१०)

३७ पशुपति[६७] (जगाचें कारण नाहीं); कारण असामंजस्य आहे.

त्म्याचें ध्यान करावें ' असें सांगितलें आहे. तिसरीकडे सुराकुंभाची स्थापना वगैरे सांगितली आहे. एका ठिकाणीं तर ' प्रेत–भस्मानें स्नान करावें ' असेंच सांगितलें आहे. एकंदरींत त्यांच्या मतामध्यें कशास कांहीं मेळ नाहीं. शिवाय त्यांनीं मानिलेल्या गोष्टी श्रुतीशीं विरुद्ध आहेत म्हणून पशुपतीचें मत असमंजस आहे म्हणजे बरोबर नाहीं.

६६ जीवाहून निराळा असा ईश्वर हा जर जग उत्पन्न करीत असेल तर या ईश्वराला वैषम्य आणि नैर्घृण्य हीं प्राप्त होतात. त्याला कर्मांची अपेक्षा आहे असें मानलें तर त्याला परतंत्रता येत असल्यामुळें त्याचें ईश्वरत्व नष्ट होतें. म्हणून तार्किकांचें मत असमंजस आहे.

६७ पशुपति हा नारायणाच्या अधीन आहे. शिवाय त्याला उत्पत्ति व नाश आहेत असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे; तेव्हां 'तो जगाचें कारण आहे' असें म्हणणें बरोबर नाहीं.

३८ संबन्धानुपपत्तेश्च । ३९ अधिष्ठानानुपपत्तेश्च ।

३८ संबंध जुळत नसल्यामुळेंही (असामंजस्य येतें).	
३९ अधिष्ठितत्व जुळत नसल्यामुळेंही (ईश्वराविषयींची कल्पना समंजस नाहीं).	३६ अधिष्ठितत्व जुळत नसल्यामुळेंही (पशुपतीच्या मतांतील ईश्वराविषयींची कल्पना समंजस नाहीं).
४० (ईश्वर हा) इंद्रियांप्रमाणें (प्रधानावर अधिष्ठित होतो असें) म्हणशील तर (तसें) नाहीं. कारण (तशा रीतीनें ईश्वराला) भोग वगैरे प्राप्त होतील.	३७ (ईश्वर हा) इंद्रियांप्रमाणें (प्रधानावर अधिष्ठित होतो असें) म्हणशील तर (तसें) नाहीं. कारण (तशा रीतीनें ईश्वराला) भोग वगैरे प्राप्त होतील.
४१ त्याला अंत आहे किंवा तो सर्वज्ञ नाहीं, (असें होईल). (७)	३८ त्याला अंत आहे आणि तो सर्वज्ञ नाहीं, (असें होईल). (७)

६८ रामानुजाचार्यांच्या पाठामध्यें हें सूत्र नाहीं.

६९ जीव आणि ब्रह्म हीं दोन्हीही विभू आहेत आणि नित्य आहेत. म्हणून त्यांचा संबंध जुळत नाहीं. कारण तार्किक लोक हे विभुद्वयसंयोग मानीत नाहींत.

७० पशुपति हा शरीरी नसल्यामुळें त्याचा मृतपुरुषाप्रमाणें जगाशीं कर्ता या नात्यानें संबंध संभवत नाहीं.

७१ घटाचा कर्ता जो कुंभार त्याला जसा पृथिवी हा आश्रय आहे तसा जगाचा कर्ता जो पशुपति त्याला पृथिवी वगैरे कांहींच आश्रय सांगतां येत नाहीं. कारण पृथिवी वगैरे सर्व पदार्थ जगापैकींच असल्यामुळें त्याचें कार्यच आहेत.

७२ हा अर्थ वृत्तीला अनुसरून केला आहे.

७३ ज्याप्रमाणें मनुष्याला शरीर वगैरेंचा वियोग होतांना दुःख होतें त्याप्रमाणें पशुपतीला देखील माया वगैरेंचा वियोग होतांना दुःख होईल.

७४ पूर्वसूत्रांत सांगितल्याप्रमाणें जर ईश्वराला जीवासारखे भोग असतील तर

४० करणवच्चेन्न भोगादिभ्यः । ४१ अन्तवत्त्वमसर्वज्ञता वा ।

३८ संबंध जुळत नसल्यामुळेंही[६९] (असामंजस्य येतें).

३९ आश्रय नसल्यामुळेंही[७१] (असामंजस्य येतें).

४० (ईश्वराला[७३]) इंद्रियें आहेत असें मानलें तर तसें नाहीं. कारण (तशा रीतीनें ईश्वराला) भोग वगैरे प्राप्त होतील.

४१ (जीव[७५] आणि जड यांना) अंत आहे (असें होईल) किंवा (ईश्वर) सर्वज्ञ नाहीं (असें होईल). (७)

३८ संबंध जुळत नसल्यामुळेंही[७०] (तो जगाचें कारण नाहीं.)

३९ आश्रय नसल्यामुळेंही[७०] (तो जगाचें कारण नाहीं).

४० (माया वगैरे[७२] साधनें हीं पशुपतीला) शरीराप्रमाणें (अधिष्ठान आहेत) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (तशा रीतीनें ईश्वराला) भोग वगैरे प्राप्त होतील.

४१ त्याला[७६] अंत आहे किंवा तो सर्वज्ञ नाहीं, (असें होईल). (११)

त्याचा जीवासारखाच अंत होईल, आणि तो जीवासारखाच सर्वज्ञ नाहीं असें म्हणावें लागेल.

७५ ज्या अर्थी ईश्वर हा जीव आणि जड यांचा नियमन करणारा आहे त्या अर्थी जीव आणि जड यांना इयत्ता म्हणजे कांहीं तरी परिमाण असलें पाहिजे. तेव्हां अर्थातच त्यांचा अंत होतो, असें मानावें लागेल. कारण ‘ ज्या वस्तूला परिमाण आहे ती वस्तू विनाशी आहे ’ असा नियम आहे. तेव्हां मोक्षशास्त्र फुकट होईल. आतां जर जीव आणि जड यांना परिमाण नसेल तर अर्थातच ते ईश्वरासारखेच विभू आणि नित्य असे होत असल्यामुळें ईश्वराचा त्यांच्याशीं संबंध होणार नाहीं, म्हणून ईश्वर हा सर्वज्ञ नाहीं असें होईल.

७६ पशुपतीला जर शरीर असेल तर त्याचा अंत असला पाहिजे. जर शरीर नसेल तर त्या ईश्वराला ज्ञानच मुळीं होणार नाहीं. कारण शरीर असेल तरच ज्ञान होतें असा नियम आहे.

४२ उत्पत्त्यसंभवात् । ४३ न च कर्तुः करणम् । ४४ विज्ञानादिभावे

४२ उत्पत्ति संभवत नसल्यामुळें (भागवतांचें मत बरोबर नाहीं).

४३ आणि कर्त्यापासून करण (उत्पन्न होत) नाहीं.

४४ किंवा (त्या सर्वांना) विज्ञान वगैरे (धर्म) आहेत (असें जरी मानलें तरी देखील) तो (दोष) प्रतिषिद्ध होत नाहीं.

४५ विरोध असल्यामुळेंही (हें शास्त्र बरोबर नाहीं). (८)

३९ (जीवांची[77]) उत्पत्ति संभवत नसल्यामुळें (भागवतांचें मत बरोबर नाहीं).

४० आणि[78] कर्त्यापासून करण (उत्पन्न होत) नाहीं.

४१ परंतु चैतन्य[79]रूपी (आणि जगाचें) मूल कारण (असें जें वासुदेवरूपी परब्रह्म त्याचें स्वरूप संकर्षण वगैरेंना) मानलें म्हणजे तें (भागवत-मत) प्रतिषिद्ध होत नाहीं.

४२ (जीवांच्या[80] उत्पत्तीचा) निषेध केला असल्यामुळेंही (भागवत मत प्रतिषिद्ध होत नाहीं). (८)

७७ हें सूत्र आणि ह्याच्या पुढचें सूत्र पूर्वपक्ष्याच्या मताचें आहे, सिद्धांत्याच्या मताचें नव्हे. ‘ जीव नित्य आहे ’ असें श्रुतीमध्यें सांगितलें असल्यामुळें जीवाची उत्पत्ति संभवत नाहीं. तेव्हां संकर्षणरूपी जीव वासुदेवापासून उत्पन्न होतो असें मानणाऱ्या भागवत लोकांवर श्रुतिविरोध हा दोष येतो.

७८ येथून सूत्रकारांनीं शक्तिपक्षाचें खंडन केलें आहे. पुरुषाच्या अनुग्रहाशिवाय केवल शक्तीपासून जगाची उत्पत्ति संभवत नाहीं. कारण केवळ स्त्रियांपासून उत्पत्ति झालेली दृष्टीस पडत नाहीं.

७९ ‘ कारण असें जें मन तें कर्त्यापासून म्ह० जीवापासून उत्पन्न होतें ’ असें भागवत लोक मानतात परंतु तें बरोबर नाहीं. कारण (मु. २ । १ । ३) श्रुतीमध्यें ब्रह्मापासून मनाची उत्पत्ति वर्णिली आहे.

८० शक्तीवर अनुग्रह करणारा असा सदाशिव हा कर्ता आहे असेंही मानतां येत नाहीं. कारण त्याला ज्ञान वगैरे साधन नसल्यामुळें त्याला कर्तृत्व संभवत नाहीं.

वा तदप्रतिषेधः। ४५ विप्रतिषेधाच्च। द्वितीयेध्याये द्वितीयपादः समाप्तः॥

४२ उत्पत्ति संभवत नसल्यामुळें (भागवतांचें मत बरोबर नाहीं).	४२ उत्पत्ति संभवत नसल्यामुळें (शक्ति ही जगाची कर्त्री नाहीं).
४३ आणि कर्त्यापासून करण (उत्पन्न होत) नाहीं.	४३ आणि कर्त्याला (कांहीं) साधन नाहीं.
४४ (त्या सर्वांना) विज्ञान वगैरे (धर्म) आहेत असें मानलें तर त्या (सर्वां–)ना (ईश्वरत्वाचा) निषेध (करितां) येत नाहीं.	४४ (कर्त्याला) विज्ञान वगैरे (साधनें) असतील तर त्यांला (पाशुपत मताचाच) स्वीकार केल्यासारखा होईल.
४५ विरोध असल्यामुळेंही (हें शास्त्र बरोबर नाहीं). (८)	४५ (श्रुतींशीं) विरोध असल्यामुळेंही (शक्तिमत बरोबर नाहीं). (१२)

८१ हें सिद्धांत सूत्र आहे. येथें सूत्रकारांनीं भागवतांचें मत स्थापिलें आहे. भगवान वासुदेवरूपी जें परब्रह्म तेंच वात्सल्यामुळें भक्तांवर अनुग्रह करण्याकरतां 'वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न, आणि अनिरुद्ध' अशा चार स्वरूपांनीं स्थित झालें आहे असें भागवतमत आहे. श्रुतीही अशी आहे:–'ज्याची उत्पत्ति नाहीं असा परमात्मा अनेक रूपांनीं प्रकट होतो.' तेव्हां संकर्षण म्ह०. जीवाची उत्पत्ति खऱ्या रीतीनें होत नसल्यामुळें ७६ टीपेमध्यें सांगितलेला दोष येत नाहीं.

८२ आणि अगदीं सारख्या ऐश्वर्याचे असे अनेक ईश्वर मानणें सर्वथा निरुपयोगी आहे. शिवाय ते सर्वच स्वतंत्र होऊन परस्पर विरुद्धही कार्य करतील.

८३ परमसंहिता वगैरे ग्रंथांमध्यें 'जीव नित्य आहे' असें सांगितलें आहे. त्यावरून पंचरात्रतंत्रामध्यें जीवाच्या उत्पत्तीचा निषेधच केला आहे. तेव्हां कांहीं ठिकाणीं जें जीवाच्या उत्पत्तीचें वर्णन केलेलें आढळतें तें गौण आहे असें समजावें.

१ न वियदश्रुतेः । २ अस्ति तु ।

अध्याय २ पाद ३

१ आकाश (उत्पन्न होत) नाहीं. कारण श्रुतींत (तसें) सांगितलें नाहीं.	१ आकाश (उत्पन्न होत) नाहीं. कारण शब्दापासून तसें ज्ञान होण्याचा संभव नाहीं.
२ परंतु (इतर श्रुतीमध्यें आकाशाची उत्पत्ति सांगितली) आहे.	२ परंतु (आकाशाची उत्पत्ति) आहे.
३ (आकाशाची उत्पत्ति सांगणारी श्रुति) गौण होय. कारण (आकाशाची उत्पत्ति) संभवत नाहीं.	३ (आकाशाची उत्पत्ति सांगणारी श्रुति) गौण होय. कारण (आकाशाची उत्पत्ति) संभवत नाहीं. आणि शब्दावरूनही (आकाश उत्पन्न होत नाहीं असें सिद्ध होतें).
४ शब्दावरूनही (आकाश उत्पन्न होत नाहीं असें सिद्ध होतें).	

१ कारण आकाश निरवयव असल्यामुळें त्याची उत्पत्ति कोणत्याही अन्य प्रमाणानें सिद्ध होत नाहीं. तेव्हां जरी तैत्तिरीय उपनिषदामध्यें ' आकाश उत्पन्न होतें ' असें सांगितलें आहे तरी तें बाधित आहे असें समजलें पाहिजे.

२ हें सूत्र आणि पुढील सूत्रें पूर्वपक्ष्याच्या मताचीं नव्हेत.

३ तैत्तिरीय उपनिषदामध्यें सांगितलेली आकाशाची उत्पत्ति बाधित आहे असें म्हणतां येत नाहीं. कारण अतींद्रिय वस्तूचें ज्ञान श्रुतीवरूनच होत असतें.

३ गौण्यसंभवात् । ४ शब्दाच्च ।

अध्याय २ पाद ३

१ आकाश (उत्पन्न होत) नाहीं. कारण श्रुतींत (तसें) सांगितलं नाहीं.	१ आकाश (उत्पन्न होत नाहीं असें) नाहीं. कारण (आकाश उत्पन्न होत नाहीं अशा अर्थाची) श्रुति नाहीं.
२ परंतु (इतर श्रुतींमध्यें आकाशाची उत्पत्ति सांगितली) आहे.	२ (आणि आकाश उत्पन्न होतें अशा अर्थाची श्रुति) आहेच.
३ (आकाशाची उत्पत्ति सांगणारी श्रुति) गौण होय. कारण (आकाशाची उत्पत्ति) संभवत नाहीं.	३ (आकाश अनादि आहे असें सांगणारी श्रुति) गौण होय. कारण (असें न मानलें तर अनेक श्रुतींमध्यें सांगितलेली आकाशाची उत्पत्ति) संभवत नाहीं (असें मानावें लागेल).
४ शब्दावरूनही (आकाश उत्पन्न होत नाहीं असें सिद्ध होतें).	४ शब्दावरूनही (हेंच सिद्ध होतें).

४ 'गौण्यसंभवाच्छब्दाच्च' असें रामानुजाचार्यांच्या पाठामध्यें दोन सूत्रांचें एकच सूत्र आहे.

५ कारण छांदोग्यउपनिषदामध्यें परमात्म्यापासून आरंभीं तेजाचीच उत्पत्ति वर्णिली आहे.

६ 'हें आकाश अनादि, सूक्ष्म आणि अतींद्रिय आहे' ही श्रुति गौण आहे.

७ बाष्कलेय श्रुतीमध्यें आकाशाची उत्पत्ति वर्णिली आहे.

५ स्याच्चैकस्य ब्रह्मशब्दवत् । ६ प्रतिज्ञाहानिरव्यतिरेकाच्छब्देभ्यः ।

५ एका (उत्पन्न होणें या शब्दा-) चा ब्रह्मशब्दाप्रमाणें (गौण आणि मुख्य अशा दोन्ही तऱ्हांनीं प्रयोग) होईल.	४ एका (उत्पन्न होणें या शब्दा-) चा ब्रह्मशब्दाप्रमाणें (गौण आणि मुख्य अशा दोन्ही तऱ्हांनीं प्रयोग) होईल.
६ अभेद मानला तर-(च) प्रतिज्ञेची हानी होणार नाहीं. शब्दावरून असें समजतें.	५ अभेद मानला तर-(च) प्रतिज्ञेची हानी होणार नाहीं.
	६ शब्दांवरून (आकाशाची उत्पत्ति सिद्ध होतें).
७ परंतु व्यवहाराला अनुसरून जेवढा विकार आहे, तेवढाच विभाग आहे (असें समजतें). (१)	७ आणि विकार म्हणून जेवढा आहे, तेवढ्याची (ब्रह्मापासून) उत्पत्ति आहेच. लोकांप्रमाणें हें समजावें.

८ 'त्या (परमात्म्या-) पासून हें ब्रह्म (म्ह. प्रधान), नाम, रूप आणि अन्न उत्पन्न होतें' (मुं. १।१।९) ह्या श्रुतीमध्यें ब्रह्मशब्दाचा प्रधान याअर्थीं गौण रीतीनें प्रयोग केला आहे, आणि 'तपाच्या योगानें ब्रह्म पुष्ट होतें' (मुं. १।१।८) ह्या श्रुतीमध्यें ब्रह्मशब्दाचा मुख्य अर्थींच प्रयोग केला आहे. त्याप्रमाणें, (येथें पुष्ट होतें हें क्रियापद मात्र गौण अर्थीं घातलें आहे)

९ 'तपाच्या योगानें ब्रह्म जाणण्याची इच्छा कर, तपच ब्रह्म आहे' (तै. ३।२।१) ह्या श्रुतीमध्यें ब्रह्म शब्दाचा मुख्य आणि गौण अशा दोन्ही अर्थीं प्रयोग केला आहे त्याप्रमाणें.

१० ज्याप्रमाणें ब्रह्म शब्दाचा परब्रह्म हा अर्थ मुख्य आहे. आणि ब्रह्मदेव वगैरे अर्थ गौण आहेत त्याप्रमाणें आकाशासंबंधानें 'उत्पत्ति होते ' ही गोष्ट मुख्य आहे आणि 'उत्पत्ति होत नाहीं ' ही गोष्ट गौण आहे असें समजावें.

११ ह्या एका सूत्राचीं दोन सूत्रें 'प्रतिज्ञाहानिरव्यतिरेकात्', 'शब्देभ्यः' अशीं रामानुजाचार्यांच्या पाठामध्यें आहेत.

१२ 'हे सोम्या! हें पूर्वीं एक आणि अद्वितीय असें सतच होतें' (छां. ६।२।१) ह्या श्रुतीवरून 'आकाश उत्पन्न होतें' हें समजतें. कारण जर आकाश उत्पन्न होत

७ यावद्विकारं तु विभागो लोकवत् ।

५ एका (उत्पन्न होणें या शब्दा-)चा ब्रह्मशब्दाप्रमाणें (गौण आणि मुख्य अशा दोन्ही तऱ्हांनीं प्रयोग) होईल.

६ (आकाशाची) उत्पत्ति न मानली तर प्रतिज्ञेची हानी होईल. कारण शब्दावरून (प्रकृतिविकारभावानेंच आकाशाचें ज्ञान होतें असें समजतें).

७ परंतु व्यवहाराला अनुसरून विकार म्हणून जेवढा आहे, तेवढ्याची उत्पत्ति आहेच (असें समजतें). (१)

५ एका—(च आकाशा-) संबंधानें (उत्पत्ति आणि अनुत्पत्ति ह्या दोन गोष्टी) ब्रह्म शब्दाप्रमाणें समजाव्यात.

६ अभेद असल्यामुळें प्रतिज्ञेची हानी होईल. श्रुतिवरून-(हो सृष्टीच्या पूर्वीं एकट्या आत्म्याचेंच अस्तित्व सिद्ध होतें).

७ आणि व्यवहाराला अनुसरून जेवढा विकार आहे तेवढाच विभाग आहे (असें समजतें). (१)

नसेल तर सृष्टीच्या पूर्वीं ब्रह्माहून निराळी अशी आकाशरूपी दुसरी वस्तु अस्तित्वांत असल्यामुळें ही छांदोग्य श्रुति विरुद्ध होईल.

१३ पृ. ७८७ पं. ३ पहा. तेव्हां 'आकाश जरी नित्य असलें तरी त्याचा परमात्म्याशीं संबंध असल्यामुळें परमात्म्याच्या ज्ञानानें त्याचें ज्ञान होईल' अशा रीतीनें प्रतिज्ञा सिद्ध करतां येत नाहीं.

१४ श्रुतीमध्यें 'परमात्म्यानें हें सर्व उत्पन्न केलें' अशी प्रतिज्ञा केली आहे. आतां आकाश हें सर्व वस्तूंपैकींच एक आहे निराळें नाहीं. तेव्हां अर्थातच आकाश उत्पन्न होत नाहीं असें मानलें असतां प्रतिज्ञेची हानी होईल.

१५ सृष्टीच्या पूर्वीं हा आत्मा एकच होता (ऐ. १।१) इत्यादि श्रुतींवरून.

१६ हें सर्व आत्मस्वरूप आहे (छां. ६।८।७) ह्या श्रुतीवरून आकाश देखील ब्रह्माचा विकारच आहे असें समजतें. तेव्हां अर्थातच इतर वस्तूंप्रमाणें आकाशाची देखील उत्पत्ति सांगितल्यासारखीच होते. ज्याप्रमाणें लोकांमध्यें एका ठिकाणीं पांच मुलगे बसले असतां 'हे देवदत्ताचे पुत्र आहेत' असें आरंभीं सांगून नंतर जरी त्यांपैकीं एकाच्या किंवा दोघांच्याच उत्पत्तीचें वर्णन केलें तरी बाकीच्यांच्या उत्पत्तीचेंही वर्णन केल्यासारखेंच होतें, त्याप्रमाणेंच हें होय.

८ एतेन मातरिश्वा व्याख्यातः । ९ असंभवस्तु सतोऽनुपपत्तेः ।

८ ह्यावरून मातरिश्व्याचें व्याख्यान झालें. (२)	८ ह्यावरून मातरिश्व्याचें व्याख्यान झालें.
९ परंतु सत्-(स्वरूपी आत्मा) उत्पन्न होत नाहीं. कारण (त्याची उत्पत्ति) संभवत नाहीं. (३)	९ अनुत्पत्ति ही फक्त परमात्म्याचीच[18] आहे (इतराची नाहीं). कारण (इतराची अनुत्पत्ति) संभवत नाहीं[19]. (१)
१० त्या (वायू-) पासून तेज (उत्पन्न होतें). कारण (श्रुती) तसेंच सांगते. (४)	१० त्यां[21] (वायू-)पासून-(च)तेज (उत्पन्न होतें). कारण (श्रुति) तसेंच सांगते.
११ उदक (ह्या तेजापासून उत्पन्न होतें. कारण श्रुती तसेंच सांगते). (५)	११ उदक (देखील ह्या तेजापासूनच उत्पन्न होतें. कारण श्रुति तसेंच सांगते).

१७ म्हणजे ‘ ती श्रुति गौण आहे ’ असें समजावें.

१८ सूत्रांतील (सं.) ‘ तु ’ शब्दाचा निश्चय हा अर्थ आहे.

१९ कारण इतराची अनुत्पत्ति मानली तर प्रतिज्ञेची हानि होईल.

२० पृ. ७९९ पं. १३ पहा.

२१ ह्या दहाव्या सूत्राला आरंभ करून सतराव्या सूत्रापर्यंत आठ सूत्रांचें एक अधिकरण आहे. त्यांपैकीं पहिलीं ४ सूत्रें पूर्वपक्ष्याच्या मताचीं आहेत आणि पुढील चार सूत्रें सिद्धांत्याच्या मताचीं आहेत. परमात्म्याच्या संबंधाशिवाय नुसत्या वायु वगैरें-पासून तेज वगैरेंची उत्पत्ति होते असें पूर्वपक्ष्याचें मत आहे. आणि ‘ परमात्म्याच्या

१० तेजोऽतस्तथा ह्याह। ११ आपः।

८ ह्यावरून मातरिश्म्याचें व्याख्यान झालें. (२)	८ ह्यावरून ' वायु (नित्य आहे ' या श्रुती-) चें व्याख्यान झालें. (२)
९ परंतु सत्-(स्वरूपी आत्मा) उत्पन्न होत नाहीं. कारण (त्याची उत्पत्ति) संभवत नाहीं. (३)	९ सत्-(स्वरूपी आत्मा) उत्पन्न होत नाहींच. कारण (त्याची उत्पत्ति) संभवत [२०]नाहीं. (३)
१० त्या (वायू-) पासून तेज (उत्पन्न होतें). कारण (श्रुति) तसेंच सांगते. (४)	१० ह्या ([२२]परमात्म्या-) पासून-(च) तेज (उत्पन्न होतें). कारण (श्रुति) तसेंच सांगते. (४)
११ उदक (ह्या तेजापासून उत्पन्न होतें. कारण श्रुति तसेंच सांगते). (५)	११ [२३]उदक (देखील ह्या परमात्म्यापासूनच उत्पन्न होतें. कारण श्रुति तसेंच सांगते). (५)

संबंधानेंच वायु वगैरेंपासून तेज वगैरेंची उत्पत्ति होते ' असें सिद्धांत्याचें मत आहे.

२२ ' ह्या (परमात्म्या-) नें तेज उत्पन्न केलें ' (छां. ६ । २ । ३) अशी श्रुती आहे. ' आतां वायूपासून अग्नि उत्पन्न होतो ' (तै. २ । १ । १) अशी जी श्रुति आहे तिचा असा अभिप्राय आहे कीं वायु हें तेजाच्या उत्पत्तीचें फक्त द्वार आहे. तेव्हां तेज उत्पन्न करण्याचें पूर्ण स्वातंत्र्य परमात्म्यालाच आहे असें समजावें.

२३ ' त्या (परमात्म्या-) नें उदक उत्पन्न केलें ' (छां. ६।२।३) अशी श्रुती आहे. ' अग्नीपासून उदक उत्पन्न होतें ' (तै. २।१।१) या श्रुतीचा अभिप्राय पूर्वी (टी. २२) सांगितल्याप्रमाणें समजावा.

१२ पृथिव्यधिकाररूपशब्दान्तरेभ्यः[24] ।

१२ प्रकरण, रूप, आणि इतर श्रुती यांवरून (अन्न म्हणजे) पृथ्वी-(च होय). (६)

१३ तो (परमात्मा-) च त्या त्या कार्याचें ध्यान करून (तें तें कार्य उत्पन्न करितो); कारण (श्रुतीमध्यें) त्याचें चिन्ह (दृष्टीस पडतें). (७)

१२ पृथ्वी (देखील उदकापासूनच उत्पन्न होते. कारण श्रुति तसेंच सांगते).[25]

१३ प्रकरण, रूप आणि इतर श्रुती यांवरून (अन्न म्हणजे पृथ्वीच होय).[26]

१४ तो (परमात्मा-) च (तें तें कार्य उत्पन्न करितो); कारण (श्रुतीमध्यें) त्या त्या कार्याचें ध्यान करणें हें त्याचें चिन्ह (सांगितलेलें दृष्टीस पडतें[27]).

२४ ह्या एका सूत्राचीं दोन सूत्रें रामानुजाचार्यांच्या पाठामध्यें आहेत. तीं अशीं:- ‘ पृथिवी ’, ‘ अधिकाररूपशब्दांतरेभ्यः ’. मध्वाचार्यांचा पाठ ‘ पृथिव्यविकाररूपशब्दान्तरादिभ्यः ’ असा आहे.

२५ ‘ त्या (उदकां-) नीं अन्न उत्पन्न केलें ’ (छां. ६ । २ । ४) अशी श्रुति आहे. ह्या श्रुतींतील अन्न शब्दाचा पृथ्वी असा अर्थ आहे. हें पुढील सूत्रावरून स्पष्ट होईल.

२६ ‘ पृथिवी हें अन्न आहे ’ (तै. ३।९।१) इत्यादि इतर श्रुती होत. वगैरे शब्दानें युक्ति घ्यावी. ती अशी:-श्रुतीमध्यें एका ठिकाणीं (तै. २ । १ । १) उदकापासून पृथ्वीची उत्पत्ति सांगितली आहे. आणि दुसऱ्या ठिकाणीं (छां. ६ । २ । ४) उदकापासून अन्नाची उत्पत्ति सांगितली आहे. आतां ज्याअर्थी अपौरुषेय श्रुति प्रमाणभूत आहे त्याअर्थी तिच्या मध्यें परस्पर विरोध नसला पाहिजे. तेव्हां अर्थातच तो विरोध जाण्याकरतां अन्न शब्दाचा पृथ्वी हा अर्थ घेतला पाहिजे.

१३ तदभिध्यानादेव तु तल्लिङ्गात्सः ।

१२ प्रकरण, रूप, आणि इतर श्रुती यांवरून (अन्न म्हणजे) पृथ्वी-(च होय). (६)	१२ प्रकरण, रूप, इतर श्रुती[26] वगैरेंवरून (अन्न म्हणजे) पृथ्वी-(च) होय. (६)
१३ तो (परमात्मा-) च (तें तें कार्य उत्पन्न करितो); कारण (श्रुतीमध्यें) त्याचें चिन्ह दृष्टीस पडतें. (वायु वगैरे शब्द देखील) त्याच्या ध्यानामुळें (परमात्मा या अर्थींच आहेत).(७)	१३ त्यां[27] (परमात्म्या-) चें ध्यान करणें ह्या चिन्हावरूनच तो (जगाचा संहारकर्ता आहे असें समजतें). (७)

२७ 'त्या आत्म्यानें इच्छा केली:—मी पुष्कळ व्हावें, मीं प्रजा उत्पन्न कराव्यात' (तै. २ । ६ । १) ह्या श्रुतीमध्यें ध्यान करणें हें परमात्म्याचें चिन्ह सांगितलें आहे. तात्पर्य, परमात्माच वायु वगैरे शरीरें धारण करून तेज वगैरे उत्पन्न करतो.

२८ परमात्मा हा सर्व जगाचा कर्ता आहे असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे. या चिन्हावरून परमात्मा हा सर्व उत्पन्न करतो असें समजतें. आतां ज्या ठिकाणीं श्रुतीमध्यें आकाश वगैरेंपासून वायु वगैरेंची उत्पत्ति सांगितली आहे त्या ठिकाणीं आकाश वगैरे शब्दांचा परमात्मा हाच अर्थ आहे. कारण परमात्म्यानें आकाश वगैरेंचें ध्यान करून नंतर आकाश वगैरेंचीं रूपें घेऊन त्या रूपांनीं वायु वगैरेंची उत्पत्ती केली आहे.

२९ मुमुक्षु लोकांनीं परमात्म्याचें ध्यान केलें म्हणजे ते मुक्त होतात. तेव्हां अनादि अशा संसारबंधाचा नाश करण्याचें ज्या परमात्म्याच्या अंगीं सामर्थ्य आहे त्याला ह्या सादि अशा जगाचा नाश करणें हें मुळींच अशक्य नाहीं.

१४ विपर्ययेण तु क्रमोऽत उपपद्यते च ।

१४ (परंतु प्रलयाचा) क्रम ह्या (उत्पत्तीच्या क्रमा-) हून उलट आहे. आणि (हें) रास्त-(च) आहे. (८)	१५ (आणि) असें मानलें म्हणजेच (श्रुतीमधील) उलट क्रम संभवतो.
१५ विज्ञान आणि मन (यांचे) मध्यें (कोठें तरी) क्रमानें (उत्पत्ति आणि लय मानले	१६ (प्राण आणि भूतें यांच्या) मध्यें, मन आणि इंद्रियें क्रमानें (उत्पन्न होतात).

३० परमात्म्यापासून आरंभीं अव्यक्त उत्पन्न होतें. नंतर ह्या अव्यक्तापासून महत्तत्व (बुद्धि), नंतर त्यापासून अहंकार, नंतर आकाश, नंतर वायु ह्या क्रमापेक्षां 'अव्यक्त वगैरे सर्वांची उत्पत्ति परमात्म्यापासूनच होते' हा उलट क्रम होय. हा (मुं. २।१।३) श्रुतीमध्यें सांगितला आहे. आतां 'परमात्माच वायु वगैरेंच्या रूपानें तेज वगैरेंचें कारण होतो असें मानलें म्हणजे हा क्रम जुळतो. जर परमात्म्याच्या संबंधाशिवाय स्वतंत्र रीतीनें वायु वगैरे पदार्थ तेज वगैरेंचीं कारणें होतील तर हा क्रम मुळींच संभवणार नाहीं.

३१ उत्पत्तीच्या क्रमाहून विपरीत क्रमानें जगाचा लय होतो असें भाल्लवेय श्रुतीमध्यें सांगितलें आहे म्हणूनच.

३२ ज्या कारणापासून जें कार्य उत्पन्न होतें त्या कार्यापेक्षां त्या कारणाचें सामर्थ्य अधिक आहे असें मानलें पाहिजे. तेव्हां अर्थातच कारणाचा कार्यामध्यें लय होतो असें मानण्यापेक्षां कार्याचाच कारणामध्यें लय होतो असें मानणें रास्त आहे.

३३ शं. मुंडकोपनिषदामध्यें उलट क्रम सांगितला नाहीं. कारण तेथें मन आणि इंद्रियें यांचा भूतांच्या बरोबर पाठ केला आहे (पृ. ८१४ पं. ३ पहा). तेव्हां या चिन्हावरून मन आणि इंद्रियें यांची उत्पत्ति भूतांप्रमाणेंच होते असें मानलें पाहिजे. म्हणजे ज्याप्रमाणें वायु वगैरेंची उत्पत्ति परमात्म्यापासून न होतां आकाश वगैरेंच्यापासून होते असें (तै. २। १। १) श्रुतीवरून समजतें, त्याप्रमाणें प्राणापासून मनाची उत्पत्ति होते आणि मनापासून इंद्रियांची उत्पत्ति होते नंतर भूतांची उत्पत्ति होते. असें मुंडकोपनिषदांतील श्रुतीचें तात्पर्य मानलें पाहिजे. उ. श्रुतीचें असें तात्पर्य मानतां येत नाहीं. कारण श्रुतीमध्यें 'ह्या (परमात्म्या-) पासून उत्पन्न होतो' ह्या पदांचा प्राण, मन वगैरे सर्वांशीं सारखाच संबंध आहे. तेव्हां 'वायूपासून तेज उत्पन्न होतें' इत्यादि श्रुतीमध्यें वायु वगैरे शब्दांचा 'वायु वगैरेंचें आत्मभूत ब्रह्म' असा अर्थ समजावा.

१५ अन्तरा विज्ञानमनसी क्रमेण तल्लिङ्गादिति चेन्नाविशेषात् ।

१४ (परंतु प्रलयाचा) क्रम (उत्पत्तीच्या क्रमाहून) उलट आहे. आणि (हें) रास्त-(च) आहे. (८)	१४ म्हणूनच[३२] (प्रलयाचा) क्रम ह्या (उत्पत्तीच्या क्रमा-) हून उलटच आहे. आणि (हें) शास्तच[३३] आहे. (८)
१५ विज्ञान[३४] आणि मन (यांची) मध्यें क्रमानें (उत्पत्ति होते. असें मानलें पाहिजे.) कारण	१५ विज्ञान[३५] आणि मन यांवांचून (इतर तत्त्वांचा उलट) क्रमानें (लय होतो). का॰

३४ शां. तैत्तिरीय उपनिषदामध्यें आत्म्यापासून आकाश वगैरे पंचमहाभूतांची उत्पत्ति सांगून पुढें अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, आणि आनंदमय, असे पांच कोश सांगितले आहेत. या चिन्हावरून (म्ह. सांगितले आहेत म्हणून) सृष्टीच्या वर्णनामध्यें कोठें तरी त्यांची उत्पत्ति वर्णिली पाहिजे. त्यांपैकीं अन्नमय कोश हा तेज, उदक, आणि पृथ्वी, या तिघांचा आहे, आणि प्राणमय कोश हा वायु आणि आकाश या दोघांचा आहे. तेव्हां त्या दोन कोशांची उत्पत्ति भूतांच्या उत्पत्तीचें वर्णन केल्यानें वर्णिल्यासारखीच झाली. आनंदमय कोश हा आत्मस्वरूप असल्यामुळें त्याच्या उत्पत्तीच्या वर्णनाची जरूर नाहीं. बाकी राहिलेल्या मन आणि विज्ञान या दोन कोशांची उत्पत्ति आत्मा आणि आकाश यांच्यामध्यें वर्णिली पाहिजे. उ. विज्ञान आणि मन यांना विशेषप्रकारचें नाम आणि रूप नसल्यामुळें त्यांचा भूतांमध्यें आणि भूतांच्या विकारामध्यें प्रवेश होत नाहीं म्हणून त्यांची उत्पत्ति सांगण्याचें कारण नाहीं. कारण विज्ञानमय कोश म्ह. जीव आणि मन, हीं नित्य आहेत.

३५ शां. ‘ मनापासून विज्ञान उत्पन्न होतें ’ (म. ना. २३।१) आणि ‘ मनाचा विज्ञानामध्यें लय (होतो असें चिंतन) करावें ’ (का. ३।१३) या दोन श्रुतींवरून मन आणि विज्ञान यांमध्यें अगोदर मन आणि नंतर विज्ञान असा उत्पत्तीचा आणि लयाचा सारखाच क्रम आहे असें सिद्ध होतें. उ. विज्ञान या तत्वापासून मन या तत्त्वाची उत्पत्ति होते असा उत्पत्तीचा क्रम आहे. मन हें तत्त्व अगोदर उत्पन्न होतें असें मानण्याला कांहीं विशेष प्रमाण नाहीं. ‘ मनापासून विज्ञान उत्पन्न होतें ’ या श्रुतीमध्यें मन आणि विज्ञान या शब्दांचा तीं तत्वें असा अर्थ नाहीं. तर ‘ मनापासून विज्ञान उत्पन्न होतें ’ या श्रुतीचा मन या इंद्रियाच्या योगानें ज्ञान होतें असा अर्थ आहे. पुढील सूत्र पहा.

१६ चराचरव्यपाश्रयस्तु स्यात्तद्व्यपदेशो भाक्तस्तद्भावभावित्वात् ।

पाहिजेत). कारण (यांच्या अस्तित्वाचीं) चिन्हें आहेत असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण कांहीं भेद नाहीं. (९)

१६ चराचर (वस्तू-) च्या संबंधानें (तो जन्मला, तो मेला) हा व्यवहार (मुख्य) आहे. पण (जीवासंबंधानें हा व्यवहार) गौण आहे. कारण (त्याचें) अस्तित्व त्या (शरीरा-) च्या अस्तित्वावर अवलंबून आहे. (१०)

१७ आत्मा (उत्पन्न होत) नाहीं. (एक) कारण (असें कीं) श्रुतीमध्यें (त्याची उत्पत्ति सांगितली) नाहीं. आणि दुसरें कारण असें कीं त्या (श्रुती-) वरून (आत्म्याचें) नित्यत्व (सिद्ध होतें). (११)

कारण 'त्यांच्या (बरोबर पाठ करणें' हें) चिन्ह (श्रुतीमध्यें) दृष्टीस पडतें. असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण त्यांत कांहीं भेद नाहीं.

१७ चराचर[३६] (वस्तू-) च्या संबंधानें होत असलेला त्या त्या (शब्दां-) चा व्यवहार गौण आहे. कारण (ब्रह्मा- च्या) अस्तित्वानेंच (त्या वस्तू) अस्तित्वांत येत आहेत. (२)

१८ आत्मा[३७] (उत्पन्न होत) नाहीं. कारण श्रुतीमध्यें तसें (स्पष्ट सांगितलें) आहे. शिवाय (आत्म्याचें) नित्यत्व--(हीं) श्रुतीवरून-(च समजत आहे). (३)

३६ जर वायु वगैरे सर्व शब्दांचा ब्रह्म हाच अर्थ आहे तर लोकांमध्यें ह्या सर्व शब्दांचा चराचर (म्हणजे स्थावरजंगम अशा वस्तू) या अर्थी प्रयोग कसा होतो ? ह्या शंकेचें उत्तर ह्या सूत्रामध्यें दिलें आहे. ह्या (मू. संस्कृत) सूत्रामध्यें 'अभाक्तः' असाही पदच्छेद निघतो. तेव्हां या सूत्राचें असें तात्पर्य समजावें:-- चराचर वस्तूंचे वाचक असे जे सर्व शब्द त्यांचा ब्रह्म हा अर्थ मुख्यच आहे. कारण ब्रह्माच्या अस्तित्वानेंच ह्या वस्तू अस्तित्वांत आहेत.

३७ शरीराचा आश्रय होणें म्ह. शरीर धारण करणें. हीच जीवाची उत्पत्ति होय. त्याची खरी उत्पत्ति संभवत नाहीं.

३८ "लोकांमधील स्थिति पाहिली असतां सर्व स्थावरजंगम वस्तूंचें ज्ञान मनाच्या

१७ नात्माऽश्रुतेर्नित्यत्वाच्च ताभ्यः[39] ।

(श्रुतीमध्यें) तसें चिन्ह दृष्टीस पडतें असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (त्यांच्यामध्यें) विशेष नाहीं.

१६ परंतु[37] (जीव हा) चराचर (अशा शरीरां-) चा आश्रय होतो. त्या (शरीराच्या उत्पत्ति वगैरे धर्मां-) चा (जीवाचे ठिकाणीं जो) व्यवहार होतो तो गौण आहे. कारण (त्याचें) अस्तित्व त्या (शरीरा-) च्या अस्तित्वावर अवलंबून आहे. (९)

१७ आत्मा (उत्पन्न होत) नाहीं. (एक) कारण (असें कीं) श्रुतीमध्यें (त्याची उत्पत्ति सांगितली) नाहीं. आणि दुसरें कारण असें कीं त्या (श्रुती-) वरून (आत्म्याचें) नित्यत्व (सिद्ध होतें). (१०)

रण (श्रुतीमध्यें तसें) चिन्ह दृष्टीस पडतें. असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (तसें मानण्याला कांहीं) विशेष (प्रमाण) नाहीं.

१६ तो व्यवहार[38] स्थावर जंगम (अशा सर्व) वस्तूंच्या स्थितीवर अवलंबून केला असल्यामुळें गौण आहे. कारण (मनाच्या) अस्तित्वानेंच (ज्ञान) अस्तित्वांत येत आहे. (९)

१७ परमात्म्याचा (लय होत) नाहीं. कारण श्रुतीमध्यें (त्याचा लय सांगितला) नाहीं[41]. शिवाय (त्याचें) नित्यत्व श्रुतीवरून सिद्ध होतें. (१०)

योगानेंच होत असल्यामुळें ‘ मनापासून विज्ञान उत्पन्न होतें ’ असा श्रुतीमध्यें व्यवहार केला आहे” असें या सूत्राचें तात्पर्य आहे.

३९ रामानुजाचार्य ‘ अश्रुतेः ’ असा पदच्छेद करीत नाहींत. ‘ श्रुतेः ’ असाच करतात.

४० ‘ आत्मा उत्पन्न होत नाहीं ’ (का. २।१८) असें श्रुतीमध्यें स्पष्टच सांगितलें आहे. तसेंच ‘ आत्मा नित्य आहे ’ (का. ५।१३) असेंही श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

४१ ‘ आत्मा लीन होतो ’ या श्रुतीचा ‘ आत्मा आच्छादित होतो ’ असा अर्थ आहे.

१८ ज्ञोऽत एव । १९ उत्क्रान्तिगत्यागतीनाम् ।

१८ म्हणूनच (जीवात्मा) ज्ञ (म्हणजे नित्यज्ञानरूप आहे). (१२)

१९ म्हणूनच[42] (जीवात्मा हा) 'ज्ञाता' (अशा स्वरूपाचा आहे).

१९ (जीवात्मा अणु आहे. कारण श्रुतीमध्यें त्याच्या) उत्क्रांती, गती आणि आगती (सांगितल्या आहेत).

२० (जीवात्मा[45] अणु आहे. कारण श्रुतीमध्यें त्याच्या) उत्क्रांती, गती आणि आगती (सांगितल्या आहेत).

२० (गती आणि आगती ह्या) पुढील दोन्ही क्रियांचा (कर्त्याच्या) आत्म्याशीं (संबंध असल्यामुळेंही जीवात्मा अणु आहे).

२१ (गती आणि आगती ह्या) पुढील दोन्ही क्रियांचा (कर्त्याच्या) आत्म्याशींच (संबंध असल्यामुळें जीवात्मा अणु आहे).

४२ 'म्हणूनच' म्ह. 'श्रुतीमध्यें सांगितलें आहे म्हणूनच'. काठक (२।१८) श्रुतीमध्यें आत्म्याला ज्ञानी असें म्हटलें आहे. तसेंच इतर श्रुतीमध्येंही आत्म्याला 'पाहणारा, ऐकणारा, वास घेणारा, चव घेणारा, मनन करणारा, जाणणारा' अशीं विशेषणें दिलीं आहेत.

४३ म्हणूनच म्ह. विज्ञानमय असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे म्हणूनच.

४४ 'परमात्म्यापासून हे सर्व जीव उत्पन्न होतात' असें (काषायण) श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

४५ 'ज्ञोऽत एव' ह्या सूत्राच्या पुढें 'युक्तेश्च' असें सूत्र मध्वाचार्यांच्या पाठामध्यें आहे. जीवाच्या ज्या शरीर वगैरे उपाधी त्या उत्पन्न होत असल्यामुळें त्यांच्या योगानें 'जीव उत्पन्न होतो' असा व्यवहार होतो. शं. तर मग 'जीव उत्पन्न होतो' असें म्हणण्यांत कांहींच अर्थ नाहीं. उ. जरी जीव हा शरीर वगैरे उपाधींचा संबंध होण्यापूर्वी सामान्य रूपानें नित्यच आहे तरी त्या वेळीं तो नसल्यासारखाच आहे. कारण त्याच्या अंगीं जें कांहीं कोणतीही गोष्ट करण्याचें विशेष सामर्थ्य आहे तें शरीर वगैरे उपाधी उत्पन्न झाल्या म्हणजेच त्यांच्या संबंधानें प्राप्त होतें. आणि तें सुद्धां आपोआप प्राप्त होत

२० स्वात्मना चोत्तरयोः ।

१८ म्हणूनच[४३] (जीवात्मा) ज्ञ (म्ह. ज्ञानरूप) आहे. (११)	१८ ह्या[४४] (परमात्म्या-) पासूनच ज्ञानी (म्ह. जीव देखील उत्पन्न होतो). १९ आणि युक्तीवरून (जीवाच्या[४५] उत्पत्तीचें समर्थन होतें).(११)
१९ (श्रुतीमध्यें जीवात्म्याच्या) उत्क्रांती, गती आणि आगती (सांगितल्या आहेत. म्हणून त्यांना अनुसरून जीवाचें अणु परिमाण मानावें).	२० (जीवात्मा अणु आहे. कारण श्रुतीमध्यें त्याच्या) उत्क्रांती, गती आणि आगती (सांगितल्या आहेत).
२० (गती आणि आगती ह्या) पुढील दोन्ही क्रियांचा (कर्त्याच्या) आत्म्याशीं (संबंध असल्यामुळेंही जीवात्मा अणु आहे).	२१ (जीवाच्या उत्क्रांती गती आणि आगती ह्या) परमात्म्याच्या योगानें- (च होतात. कारण श्रुतीमध्यें) पुढील दोन वाक्यांत[४८] (तसें सांगितलें आहे).

नाहीं. तर तें ईश्वराधीन आहे. तेव्हां ‘ जीव उत्पन्न होतो ’ हें म्हणणें वाजवीच आहे.

४६ ह्या सूत्रामध्यें जीवात्मा अणु आहे असें प्रतिपादन केलें आहे. ‘ जीवात्मा अणु आहे ’ हें पूर्वपक्ष्याचें मत आहे असें शंकराचार्य मानतात. आणि हें सिद्धांत्याचें मत आहे, असें रामानुजाचार्य, वल्लभाचार्य, आणि मध्वाचार्य मानतात.

४७ पूर्वसूत्रांत सांगितल्याप्रमाणें जीवाचें ‘ ज्ञाता ’ असें स्वाभाविक रूप असल्यामुळें त्याला नेहमीं सर्व ठिकाणचें ज्ञान होईल ही शंका दूर करण्याकरितां हें सूत्र केलें आहे. जीव अणु असल्यामुळें त्याला नित्य ज्ञान होत नाहीं असें या सूत्राचें तात्पर्य आहे. जीवात्मा अणु आहे असाच सिद्धांत आहे.

४८ ‘ ह्या परमात्म्याच्या योगानेंच जीव हा गर्भामध्यें प्रवेश करतो. त्याच्या योगानेंच उत्पन्न होतो ’ असें श्रुतीमध्यें एका वाक्यांत सांगितलें आहे. आणि दुसऱ्या वाक्यांत ‘ परमात्माच ह्या जीवाला जगवितो, नेतो, आणतो ’ असें सांगितलें आहे. तेव्हां यावरून श्रुतीमध्यें पूर्वींच्या वाक्यांत सांगितलेल्या जीवाच्या उत्क्रांती, गती, आणि आगती ह्या परमात्म्याच्या अधीनच आहेत असें समजावें. सूत्रकारांनीं हा विचार येथें प्रासंगिक रीतीनें केला आहे.

२१ नाणुरतच्छ्रुतेरिति चेन्नेतराधिकारात् । २२ स्वशब्दोन्मानाभ्यां च ।

२१ (जीवात्मा) अणु नाहीं कारण श्रुतीमध्यें त्याहून भिन्न (परिमाण) सांगितलें आहे असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (जीवाहून) इतरांचें हें प्रकरण आहे.

२२ साक्षात् शब्द आणि उन्मान ह्यांवरूनही (जीवात्मा अणु आहे).

२३ चंदनाप्रमाणें विरोध नाहीं.

२४ स्थितीचा विशेष असल्यामुळें (चंदनाचा दृष्टांत बरोबर नाहीं) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (जीवात्म्याच्याही स्थितीचा विशेष श्रुतीनें) मानिला आहे. कारण (जीवात्मा) हृदयामध्यें आहे (असें श्रुति सांगते).

२२ (जीवात्मा) अणु नाहीं कारण श्रुतीमध्यें त्याहून भिन्न (परिमाण) सांगितलें आहे असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (जीवाहून) इतरांचें हें प्रकरण आहे.

२३ साक्षात् शब्द आणि उन्मान[५०] ह्यांवरूनही (जीवात्मा) अणु आहे[५१].

२४ चंदनाप्रमाणें[५३] विरोध नाहीं.

२५ स्थितीचा विशेष असल्यामुळें (चंदनाचा दृष्टांत बरोबर नाहीं) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (जीवात्म्याच्याही स्थितीचा विशेष श्रुतीनें) मानिला आहे. कारण (जीवात्मा) हृदयामध्यें आहे (असें श्रुति सांगते).

४९ 'आत्मे हे व्यापक, चेतन आणि निर्गुण असे आहेत' ह्या श्रुतीमध्यें परमात्म्याचें वर्णन केलें आहे, जीवाचें नाहीं. कारण 'तो आत्मा हें (जग) उत्पन्न करतो' असें परमात्म्याचेंच प्रकरण मागून चालू झालेलें आहे.

५० 'उद्धृत्य मानं उन्मानं' अशी उन्मान शब्दाची व्युत्पत्ति आहे. उद्धृत्य म्हणजे (एखादी बारीक वस्तू) शोधून काढून (तिचें) मान म्हणजे परिमाण (जीवाला सांगणें).

५१ श्रुतीमध्यें (बृ. ४ । ३ । ९) 'स्व' या शब्दानें आत्म्याचा निर्देश करून त्याचा स्वप्नांतील विहार सांगितला आहे. त्यावरून आत्म्याचें अणु परिमाण सिद्ध होतें. कारण जर आत्मा विभु असेल किंवा शरीराएवढा असेल तर त्याचा विहार संभवणार नाहीं.

२३ अविरोधश्चन्दनवत् ।२४ अवस्थितिवैशेष्यादिति चेन्नाभ्युपगमाद्धृदि हि।

२१ (जीवात्मा) अणु नाहीं कारण श्रुतीमध्यें त्याहून भिन्न (परिमाण) सांगितलें आहे असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (जीवाहून) इतरांचें हें प्रकरण आहे.

२२ स्वशब्दें[५३] आणि उन्मान ह्यांवरूनही (जीवात्मा अणु आहे हें सिद्ध होतें).

२३ चंदनाप्रमाणें विरोध नाहीं.

२४ स्थितीचा[५५] विशेष असल्यामुळें (चंदनाचा दृष्टांत बरोबर नाहीं) असें म्हणशील तर तसें नाही. कारण (जीवात्म्याच्याही स्थितीचा विशेष) मानिला आहे. कारण (जीवात्मा) हृदयामध्यें आहे.

२२ (जीवा[५२]त्मा) अणु नाहीं कारण श्रुतीमध्यें त्याहून भिन्न (परिमाण) सांगितलें आहे असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (जीवाहून) इतरांचें हें प्रकरण आहे.

२३ साक्षात्[५३] शब्द आणि उन्मान ह्यांवरूनही (हें परमात्म्याचेंच वर्णन आहे असें सिद्ध होतें).

२४ चंदना[५४]प्रमाणें विरोध नाहीं.

२५ स्थितीचा विशेष असल्यामुळें (चंदनाचा दृष्टांत बरोबर नाहीं) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (जीवात्म्याच्याही स्थितीचा विशेष) मानिला आहे. कारण (जीवात्मा) हृदयामध्यें आहे (असें श्रुती सांगते.)

---

५२ ‘ हा आत्मा परिमाणशक्तीपासून उत्क्रांत झालेला ’ असें श्रुतीमध्यें पुढें वाक्य आहे. त्यामध्यें साक्षात् आत्मा हा शब्दच घातलेला आहे. आणि तो परिमाणशक्तीपासून उत्क्रांत म्ह. परिमाणातीत असें म्हटलें आहे.

५३ पृ. ८३५ पं. १७ पहा. सूत्रकारांनीं हें उत्तर इतरांच्या मतानें दिलें आहे.

५४ ज्याप्रमाणें चंदनबिंदु हा स्वरूपानें एका ठिकाणींच असतो पण आपल्या अंशांनीं सर्व शरीराला व्यापतो त्याप्रमाणें जीवात्मा हा स्वरूपानें हृदयांत असतो आणि आपल्या अंशांनीं सर्व शरीराला व्यापतो.

५५ शरीराच्या दृढत्वचेवर चंदनाची चांगली स्थिति झालेली असते. तेव्हां त्वचा सर्व एकच असल्यामुळें चंदनापासून होणारें सुख सर्व शरीराला होतें हें बरोबर आहे. तेव्हां चंदनाचा दृष्टांत येथें लागू पडत नाहीं असा शंकाकाराचा अभिप्राय आहे.

२५ गुणाद्वा लोकवत् । २६ व्यतिरेको[५८] गन्धवत् ।

२५ अथवा गुणामुळें व्यवहारांतल्याप्रमाणें (विरोध नाहीं).	२६ अथवा[५६] गुणामुळें आलोकाप्रमाणें (विरोध नाहीं).
२६ गंधाप्रमाणें (चैतन्य हा गुण जीवात्म्याला) सोडून राहील.	२७ गंधा[५९]प्रमाणें (ज्ञान हा गुण आत्म्याहून) निराळा आहे. आणि (श्रुतीमध्यें) असेंच सांगितलें आहे.
२७ आणि (श्रुतीही) असेंच सांगते.	
२८ (जीवात्मा हा चैतन्य गुणानेंच सर्व शरीर व्यापतो.) कारण (श्रुतीमध्यें) पृथक् उपदेश केला आहे.	२८ (श्रुतीमध्यें[६२]) पृथक् उपदेश केला आहे. म्हणून-(ही ज्ञानगुण आत्म्याहून निराळा आहे).

५६ ह्या सूत्रामध्यें सूत्रकारानीं स्वमतानें उत्तर दिलें आहे.

५७ ज्याप्रमाणें आलोकाची म्ह. तेजाची ज्योत एका ठिकाणींच असते पण तें तेज प्रकाशाच्या योगानें सर्व भागाला व्यापतें, त्याप्रमाणें जीव हा ज्योतीच्या रूपानें एका ठिकाणीं आहे आणि आपल्या चैतन्य गुणानें सर्व शरीर व्यापतो.

५८ ह्या दोन सूत्रांचें एकच सूत्र रामानुजाचार्य आणि मध्वाचार्य यांच्या पाठामध्यें आहे. तें असें:-व्यतिरेको गन्धवत्तथा च दर्शयति.

५९ ज्याप्रमाणें पृथिवीचा गंध हा गुण पृथिवीपेक्षां निराळा आहे त्याप्रमाणें आत्म्याचा ज्ञान हा गुण आत्म्यापेक्षां निराळा आहे. तेव्हां आत्मा हा ज्ञानस्वरूपच आहे असें समजूं नये. हा आत्मा जाणतो ह्या श्रुतीवरून हीच गोष्ट सिद्ध होतो.

६० श्रुतीमध्यें (म. ना. ८।२) फुललेल्या वृक्षाचा गंध दूरपर्यंत जातो असें सांगितलें आहे. म्हणून तो दृष्टांत सूत्रकारांनीं येथें दिला आहे.

६१ शं. ' जीव एक आहे, ' ' जीव अनेक आहेत ' अशा विरुद्ध गोष्टी श्रुतीमध्यें सांगितल्या असल्यामुळें श्रुतीला प्रामाण्य नाहीं. तेव्हां श्रुतीवरून जगाच्या कारणाचा निश्चय करतां येत नाहीं. उ. ' अनेक जीवांचें स्वरूप एक प्रकारचें आहे ' असा ' जीव एक आहे ' या श्रुतीचा अभिप्राय आहे. ज्याप्रमाणें फुलांचा गंध फुलांपासून दूरपर्यंत

२७ तथा च दर्शयति । २८ पृथगुपदेशात् ।

२५ अथवा गुणामुळें (विरोध नाहीं). आलोकाप्रमाणें हें होय.	२५ अथवा गुणामुळें आलोकाप्रमाणें (विरोध नाहीं). (६२)
२६ गंधाप्रमाणें (चैतन्य हा गुण जीवात्म्याला) सोडून राहील.	२७ (जीवाचे अंश जीवापासून) गंधासारखे पृथक् होतात. आणि (श्रुतीमध्यें) असेंच सांगितलें आहे. (६३)
२७ आणि (श्रुतीही) असेंच सांगते.	
२८ (जीवात्म्याचा चैतन्य हा गुण आहे.) कारण (श्रुती-मध्यें) पृथक् उपदेश केला आहे.	२८ (श्रुतीमध्यें) पृथक् उप-देश केला आहे म्हणून (जीवात्मा हा परमात्म्याहून निराळा आहे).

वाहत जातो त्याप्रमाणें जीवाचे अंश जीवापासून दूरपर्यंत जातात. हे अनेक अंश घेऊनच ‘ जीव अनेक आहेत ’ असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे. ‘ ईश्वर हा जीवाच्या अनेक तऱ्हा करतो ’ असें शांडिल्य श्रुतीवरून समजतें. एकंदरींत श्रुतीमध्यें विरोध नसल्या-मुळें श्रुतीला अप्रमाण म्हणतां येत नाहीं.

६२ ‘ ज्ञात्याच्या ज्ञानाचा कधींही नाश होत नाहीं ’ (बृ. ४ । ३ । ३०) ह्या श्रुतीमध्यें ज्ञाता जो आत्मा त्यापेक्षां ज्ञानाचा पृथक् उपदेश केला आहे.

६३ ‘ जीवात्म्यानें प्रज्ञेच्या योगानें शरीरावर आरोहण करून ’ (कौ. ३ । ६) या श्रुतीमध्यें. ह्या सूत्रामध्यें चैतन्य हा आत्म्याचा गुण आहे हें सिद्ध केलें आहे.

६४ शं. ‘तें तूं आहेस’ (छां. ६।८।७) या श्रुतीवरून जीवात्मा आणि परमात्मा यांचें ऐक्य सिद्ध होतें. आणि ‘ दोन पक्षी ’ (पृ. १९० पं. २६ पहा) या श्रुतीमध्यें पृथक् उपदेश केला आहे त्यावरून त्यांमध्यें भेद सिद्ध होतो. असा श्रुतीमध्यें परस्पर विरोध असल्यामुळें ‘ श्रुती प्रमाण आहे ’ असें म्हणतां येत नाहीं. उ. जीवात्मा आणि परमात्मा हे भिन्नच आहेत. आतां ‘ तें तूं आहेस ’ ही श्रुती विरुद्ध आहे असें मात्र समजूं नये. कारण त्या श्रुतीचा अभिप्राय निराळा आहे. तो पुढील सूत्रीं स्पष्ट होईल.

२९ तद्गुणसारत्वात्तु[६५] तद्व्यपदेशः प्राज्ञवत् ।

२९ परंतु (जीवाला) तद्गुण-सारत्व असल्यामुळें (त्याच्या संबंधानें) प्राज्ञाप्रमाणें ते व्यवहार होतात.	२९ परंतु[६६] (जीवाचा) तो गुण मुख्य असल्यामुळें तसा व्यवहार होतो. प्राज्ञाप्रमाणेंच हें होय.
३० जोंपर्यंत जीवात्मा (संसारी) आहे तोंपर्यंत (बुद्धीचा संयोग) असल्यामुळें (हा) दोष येत नाहीं. कारण तसेंच दृष्टोत्पत्तीस येतें.	३० शिवाय[६७] जेवढें म्हणून (आत्म्याचें) स्वरूप आहे तेवढ्यावर (ज्ञान हा गुण) असल्यामुळें दोष येत नाहीं. कारण तसें दृष्टोत्पत्तीस येतें.

६५ 'तु' हा शब्द मध्वाचार्यांच्या पाठामध्यें नाहीं.

६६ शं. जर ज्ञान हा गुण आत्म्याहून निराळा आहे तर श्रुतीमध्यें (बृ. ३।७।२२) आत्म्याला ज्ञान शब्द लाविला आहे तो व्यवहार कसा ? उ. आत्म्याचा ज्ञान हा गुण इतर गुणांपेक्षां मुख्य असल्यामुळें तसा व्यवहार होत आहे. 'आत्मा ज्ञानस्वरूप आहे' या अभिप्रायानें तो व्यवहार केलेला नाहीं. परमात्मा हा आनंदाचा आश्रय आहे आनंदस्वरूप नाहीं असें असूनही ज्याप्रमाणें त्या परमात्म्याला आनंद हा शब्द श्रुतीमध्यें (तै. २।७।१) लाविला आहे, कारण त्याचा आनंद हा गुण मुख्य आहे, त्याप्रमाणेंच हें होय.

६७ शं. जीवात्मा हा जर अणु आहे तर श्रुतींमध्यें त्याचें सर्वव्यापी अशा परमात्म्याशीं ऐक्य कसें सांगितलें ? उ. या परमात्म्याचे जे प्रज्ञा द्रष्टृत्व वगैरे गुण तेच गुण जीवाचे ठिकाणीं मुख्यत्वानें आहेत. कारण या गुणांच्या योगानेंच जड वस्तूंपेक्षां जीवाचें वैलक्षण्य सिद्ध होतें. म्हणून श्रुतीमध्यें गौण रीतीनें ऐक्याचा व्यवहार केला आहे. ज्याप्रमाणें श्रुतीमध्यें (बृ. ४।३।२१) प्राज्ञाला म्ह. सुषुप्तीचा साक्षिभूत जो आत्मा त्याला पापरहित असें गौण रीतीनें म्हटलें आहे त्याप्रमाणेंच हें समजावें. पापरहितत्व हें चिन्ह मुख्य रीतीनें परमात्म्याचेंच आहे; प्राज्ञाचें नव्हे.

६८ ज्याप्रमाणें प्राज्ञाच्या अंगीं सर्व गुण असल्यामुळें तो सर्वस्वरूपी असा

३० यावदात्मभावित्वाच्च न दोषस्तद्दर्शनात् ।

२९ परंतु[६७] (जीवाचे ठिकाणीं) त्या (परमात्म्या-) चे गुण मुख्य असल्यामुळें (त्याच्या संबंधानें) प्राज्ञाप्रमाणें ते व्यवहार होतात.

३० जीवात्मा हा (आनंदांश प्रकट होऊन ब्रह्मरूप) होतोपर्यंत (हा व्यवहार) असल्यामुळें दोष येत नाहीं. कारण (त्या वेळीं जीवाला स्वतःचे ठिकाणीं ब्रह्माचे धर्म) दृष्टीस पडतात.

२९ त्या (परमात्म्या-) चे गुण हेंच जीवाचें स्वरूप असल्यामुळें ते एकच आहेत असा व्यवहार होतो. प्राज्ञा[६९]प्रमाणे हें होय. (१४)

३० जोंपर्यंत[७०,७१] परमात्मा आहे तोंपर्यंत (जीवात्म्याचें) अस्तित्व आहे. म्हणून दोष नाहीं. कारण तसें दृष्टोत्पत्तीस येतें. (१५)

व्यवहार होतो त्याप्रमाणेंच हें होय.

६९ ज्याप्रमाणें गोव्यक्तीवर नेहमीं गोत्व धर्म रहात असल्यामुळें गोत्व या धर्मानें गोव्यक्तीचा व्यवहार होतो असें दृष्टोत्पत्तीस येतें त्याप्रमाणें ज्ञान हा गुण आत्म्याच्या स्वरूपावर नेहमीं रहात असल्यामुळें आत्म्याला ज्ञान शब्द लावणें हा दोष येत नाहीं.

७० अत्यंत निकृष्ट अशा जीवावर उत्कृष्ट परमात्म्याचें ऐक्य श्रुतीमध्यें कसें कल्पिलें ? ह्या शंकेचें ह्या सूत्रामध्यें उत्तर दिलें आहे. जीवात्मा हा ब्रह्म होण्याला योग्य असल्यामुळें निकृष्ट नव्हे. जीवामध्यें आनंद हा गुण नेहमीं असतो असें श्रुतीमध्यें सांगितलेलें दृष्टोत्पत्तीस येतें.

७१ शं. ' जीव नित्य आहे ' ' जीव अनित्य आहे ' अशा दोन्ही परस्पर विरुद्ध गोष्टी श्रुतीमध्यें सांगितल्या आहेत. तेव्हां ' श्रुति प्रमाण आहे ' असें म्हणतां येत नाहीं. शिवाय जीवाला अनित्यत्व हा दोष प्राप्त होतो. उ. हा दोष येत नाहीं. कारण परमात्म्याबरोबर जीवाचें अस्तित्व आहे. आतां शरीर वगैरे ज्या जीवाच्या उपाधी त्या अनित्य असल्यामुळें श्रुतीमध्यें जीवाला अनित्य असें गौण रीतीनें म्हटलें आहे. ' जीव नित्य आहे आणि त्याच्या धातू अनित्य आहेत ' असें अग्निवेश्य श्रुतीमध्यें आणि भारतामध्यें सांगितलेलें दृष्टोत्पत्तीस येतें.

३१ पुंस्त्वादिवत्त्वस्य सतोऽभि[७२]व्यक्तियोगात् ।

३१ परंतु पुरुषत्व वगैरेंप्रमाणें हा (बुद्धीचा संबंध बीजरूपानें) असूनच (पुढें त्याची) अभिव्यक्ति होते असें (मानणें) बरोबर असल्यामुळें वरील गोष्ट सिद्ध होते.

३२ (अंतःकरण मानिलें) नाहीं तर नित्य उपलब्धि होईल किंवा नित्य अनुपलब्धि होईल अथवा (आत्मा आणि इंद्रियें या) दोहोंपैकीं एकाचें नियमन होतें असें मानावें लागेल. (१३)

३१ परंतु पु[७३]रुषत्व वगैरेंप्रमाणें (सुषुप्तीमध्यें ज्ञान) हा (धर्म बीजरूपानें) असूनच (त्याची फक्त जागृतीमध्यें) अभिव्यक्ति होते म्हणून वरील गोष्ट सिद्ध होते.

३२ ([७५]आत्मा अणु आहे आणि त्याचा ज्ञान हा गुण आहे असें मानिलें) नाहीं तर नेहमीं उपलब्धि आणि अनुपलब्धि या दोन्ही बरोबर होतील किंवा दोहोंपैकीं कोणी तरी एक नियमानें होईल. (४)

७२ ‘ अभि ’ हा शब्द अणुभाष्याच्या कांहीं पुस्तकामध्यें दृष्टीस पडत नाहीं.

७३ शं. सुषुप्तीमध्यें ज्ञान होत नसल्यामुळें ज्ञान हा आत्म्याच्या स्वरूपाचा धर्म मानतां येत नाहीं. उ. ज्याप्रमाणें बाल्यावस्थेमध्यें बीजरूपानें पुरुषत्व असतें त्याप्रमाणें सुषुप्तीमध्यें बीजरूपानें ज्ञान असतें. तेव्हां ज्ञान हा आत्म्याच्या स्वरूपाचा धर्म आहे ही गोष्ट सिद्ध होते.

७४ शं. ज्ञान, आनंद वगैरे गुण हे जीवाचे स्वरूपतःच आहेत असें श्रुतीमध्यें एका ठिकाणीं सांगितलें आहे. आणि ‘ मोक्षाचे वेळीं ते गुण उत्पन्न होतात ’ असें दुसरीकडे सांगितलें आहे. तेव्हां श्रुतीमध्यें परस्पर विरोध येतो. उ. जीवाचे ठिकाणीं ते गुण स्वरूपतःच आहेत. फक्त मोक्षाचे वेळीं ते गुण व्यक्त होत असल्यामुळें ‘ उत्पन्न होतात ’ असें श्रुतीमध्यें गौण रीतीनें म्हटलें आहे. तेव्हां श्रुतीमध्यें विरोध नसल्यामुळें तिला अप्रामाण्य आहे असें समजूं नये.

७५ लोकामध्यें आत्म्याची उपलब्धि शरीरामध्यें होते, अन्यत्र होत नाहीं. आतां सर्वव्यापी आणि ज्ञानरूपी असा आत्मा, जर आत्म्याची उपलब्धि आणि अनुपलब्धि या दोहोंचा कारण आहे असें मानिलें तर त्या दोन्ही बरोबर सर्व ठिकाणीं नेहमीं होऊं लागतील. एकाचेंच कारण आहे असें मानलें तर जिचें कारण असेल ती एकच होईल. आत्मा अणु मानला म्हणजे मात्र कांहीं दोष येत नाहीं. कारण तो शरीराच्या आंत असल्यामुळें तेथेंच त्याची उपलब्धि होते अन्यत्र होत नाहीं.

३२ नित्योपलब्ध्यनुपलब्धिप्रसङ्गोऽन्यतरनियमो वाऽन्यथा ।

३१ पुरुषत्व वगैरेंप्रमाणें (आनंद) हा (गुण व्यवहारावस्थेमध्यें बीजरूपानें) असूनच (पुढें मोक्षावस्थेमध्यें त्याची) अभिव्यक्ति होते, म्हणून वरील गोष्ट सिद्ध होते.	३१ परंतु पुरुषत्व[७४] वगैरेंप्रमाणें (जीवाचे आनंद, ज्ञान वगैरे गुण बीजरूपानें) असूनच (मोक्षाचे वेळीं त्यांची) अभिव्यक्ति होते.
३२ नाहींतर[७६] (आनंदाची) नित्य उपलब्धि होईल किंवा नित्य अनुपलब्धि होईल. अथवा अन्यतराचा नियम होइल. (१२)	३२ नाहींतर[७७] (आनंदाची) नित्य उपलब्धि आणि नित्य अनुपलब्धि होईल. आणि नियमानें त्या दोन्ही होतील. (१६)

७६ व्यवहारावस्थेमध्यें म्ह. मोक्षापूर्वी जीवाचे ठिकाणीं आनंद हा गुण प्रकट नाहीं असें मानलें नाहीं तर त्या आनंदाची नेहमीं उपलब्धि होईल, आणि संसारच मुळीं संभवणार नाहीं. वरें, स्वभावतःच आनंदाची उपलब्धि होत नाहीं असें मानिलें तर मोक्ष संभवणार नाहीं. आतां जीवाला आनंद नाहींच तर तो ब्रह्मालाच फक्त आहे असा अन्यतर नियम मानिला तर श्रुतिविरोध येईल. कारण ' मोक्षावस्थेमध्यें जीव हा ब्रह्मरूप होतो ' असें (बृ. ४।४।५) श्रुतीवरून सिद्ध होतें. तात्पर्य, मोक्ष प्राप्त होण्यापूर्वी जीवाचे ठिकाणीं आनंद हा गुण बीजरूपानें आहे, प्रकट नाहीं असेंच मानलें पाहिजे.

७७ मोक्षाचे वेळीं आनंद वगैरे गुणांची अभिव्यक्ति होते असें मानलें नाहीं तर म्ह. जीवाला आवरण मानलें नाहीं तर मोक्षाचे पूर्वी देखील सत्वगुणी अशा देवांना नित्यसुखाची उपलब्धि होईल. तमोगुणी अशा दैत्यांना नित्य अनुपलब्धि होईल. आणि दोन्ही गुणांच्या अशा मनुष्यांना नित्य उपलब्धि आणि अनुपलब्धि होईल. कारण ' देवावस्थेमध्यें जीवांना स्वरूपतः सुखस्वरूपत्व आहे. दैत्यावस्थेमध्यें दुःखरूपत्व आहे आणि मनुष्यावस्थेमध्यें उभयरूपत्व आहे ' असें आग्निवेश्य श्रुतीमध्यें सांगितलें आहे. आणि अनुभव पाहिला असतां देवांनाही कदाचित् दुःख होतें, दैत्यांनाही सुख होतें, असा येतो. तेव्हां ' जीवाचें स्वाभाविक रूप मोक्षाचे पूर्वी कांहीं आवरणानें आच्छादित होतें आणि मोक्षाचे वेळीं तें व्यक्त होतें ' असेंच मानलें पाहिजे.

३३ कर्ता शास्त्रार्थवत्त्वात् । ३४ विहारोपदेशात् ।

३३ (जीवात्मा) कर्ता आहे. कारण (तसें मानिलें तरच) शास्त्राला साफल्य येतें.	३३ (जीवात्माच) कर्ता आहे. कारण (तसें मानिलें तरच) शास्त्राला साफल्य येतें.
३४ (श्रुतीमध्यें) विहाराचा उपदेश केला आहे म्हणून-(हा जीवात्मा कर्ता आहे).	३४ (श्रुतीमध्यें) ग्रहण सांगितलें आहे, आणि विहाराचा उपदेश केला आहे म्हणूनही (जीवात्माच कर्ता आहे).
३५ ग्रहण (सांगितलें) आहे म्हणून-(हा जीवात्मा कर्ता आहे).	
३६ आणि (जीवात्मा कर्ता आहे). कारण (त्याचा) क्रियेचे ठिकाणीं (कर्ता या रूपानें) निर्देश केला आहे. जर (तसा) नसता तर (श्रुतीनें) उलट निर्देश केला असता.	३५ आणि (जीवात्मा कर्ता आहे). कारण (त्याचा) क्रियेचे ठिकाणीं (कर्ता या रूपानें) निर्देश केला आहे. जर (तसा) नसता तर (श्रुतीनें) उलट निर्देश केला असता.

७८ म्हणजे त्रिगुणात्मक प्रकृतीला कर्तृत्व नाहीं.

७९ ‘ ईश्वर हा तर कर्ता आहेच, परंतु जीव देखील कर्ता आहे ’ असें या सूत्राचें तात्पर्य आहे.

८० ह्या दोन सूत्रांचें एकच सूत्र रामानुजाचार्यांच्या पाठामध्यें आहे. तें असें:-- ‘ उपादानाद्विहारोपदेशाच्च ’.

८१ ‘ मोक्षावस्थेमध्यें सुद्धां जीवात्मा हा स्त्रिया, यानें, ज्ञाति वगैरेंच्या साहाय्यानें विहार करतो ’ असा उपदेश केला आहे.

३५ उपादानात् । ३६ व्यपदेशाच्च क्रियायां न चेन्निर्देशविपर्ययः ।

३३ (जीवात्मा) कर्ता आहे. कारण (तसें मानिलें तरच) शास्त्राला साफल्य येतें.	३३ (जीवा[80]त्मा) कर्ता आहे. कारण (तसें मानिलें तरच) शास्त्राला साफल्य येतें.
३४ (श्रुतीमध्यें) विहाराचा उपदेश केला आहे म्हणून-(ही जीवात्मा कर्ता आहे).	३४ वि[81]हाराचा उपदेश केला आहे म्हणून-(हा जीवात्मा कर्ता आहे).
३५ ग्रहण (सांगितलें) आहे म्हणून-(ही जीवात्मा कर्ता आहे).	३५ [82]ग्रहण (सांगितलें) आहे म्हणून-(हा जीवात्मा कर्ता आहे).
३६ आणि (जीवात्मा कर्ता आहे). कारण (त्याचा) क्रियेचे ठिकाणीं (कर्ता या रूपानें) निर्देश केला आहे. जर (तसा) नसता तर (श्रुतीनें) उलट निर्देश केला असता.	३६ [83]आणि (जीवात्मा कर्ता आहे). कारण (त्याचा) क्रियेचे ठिकाणीं (कर्ता या रूपानें) निर्देश केला आहे. जर (तसा) नसता तर (श्रुतीनें) उलट निर्देश केला असता.

८२ ‘जीवात्मा हा मोक्षप्राप्तीकरतां अनेक साधनांचें ग्रहण करतो’ असें सांगितलें आहे. तेव्हां संसारावस्थेमध्यें सुद्धां जीवात्मा हा खराच कर्ता आहे असें सिद्ध होतें. कारण त्या साधनापासून खरें फल प्राप्त होत आहे.

८३ ‘परमात्मरूपी लोकाची उपासना करावी’ (बृ. १।४।१५) ह्या श्रुतीमध्यें ‘जीवानें’ हा कर्ता अध्याहृत आहे. येथें उपासनारूपी क्रियेच्या ठिकाणीं जीवाचा कर्ता या रूपानें निर्देश केलेला आहे. जर येथें जीव हा कर्ता घेतला नाहीं तर जडाला कर्तृत्व संभवत नसल्यामुळें परमात्म्यालाच तें घ्यावें लागेल, आणि तसें असतें तर श्रुतीनें ‘परमात्मरूपी’ असा निर्देश न करतां ‘परमात्म्यानें’ असा निर्देश केला असता.

३७ उपलब्धिवदनियमः । ३८ शक्तिविपर्ययात् ।

३७ अनुभवाप्रमाणें (प्रवृत्तीही) अनियमित आहे.	३६ (आत्मा कर्ता नसेल तर कर्माच्या फलाचा) उपलब्धीप्रमाणें नियम होणार नाहीं.
३८ शक्तीची उलथापालथ होईल म्हणून--(हा बुद्धीहून भिन्न असा जीवात्मा कर्ता आहे).	३७ शक्तीची उलथापालथ होईल म्हणून-(ही जीवात्मा कर्ता आहे).
३९ समाधि संभवत नाहीं म्हणूनही (जीवात्मा कर्ता आहे). (१४)	३८ समाधि संभवत नाहीं म्हणूनही (जीवात्मा कर्ता आहे).
४० आणि ज्याप्रमाणें सुतार दोन्ही तऱ्हांचा (दृष्टीस पडतो त्याप्रमाणें जीवात्मा दोन्ही तऱ्हांचा आहे). (१५)	३९ आणि ज्याप्रमाणें सुतार दोन्ही तऱ्हांचा (दृष्टीस पडतो त्याप्रमाणें जीवात्मा दोन्ही तऱ्हांचा आहे). (५)

८४ ज्याप्रमाणें आत्मा विभु मानला असतां उपलब्धीचा नियम राहणार नाहीं असा दोष ३२ सूत्रामध्यें दिला आहे त्याप्रमाणें जर आत्म्याला कर्तृत्व नसून प्रकृतीलाच तें असेल तर कर्मांच्या फलाचा उपभोग सर्वांना सारखाच होईल. त्याविषयीं नियम राहणार नाहीं, असा दोष येतो. असें या सूत्रानें तात्पर्य आहे.

८५ ज्याप्रमाणें जीवाला त्याच्या इच्छेप्रमाणेंच अनुभव येतो असा नियम नाहीं त्याप्रमाणें कर्म देखील त्याच्या हातून त्याच्या इच्छेप्रमाणेंच होतें असा नियम नाहीं. त्याचें कारण पुढील सूत्रांत सांगितलेंच आहे. तेव्हां जीवाला कर्तृत्व असूनही नसल्यासारखेंच होतें. ईश्वराला मात्र त्याच्या इच्छेप्रमाणें हवें तसें कर्म करतां येतें. याच अभिप्रायानें पूर्वी ‘ ईश्वरच कर्ता आहे ’ असें सांगितलें आहे.

८६ जर बुद्धीला म्ह. प्रकृतीला कर्तृत्व असेल तर भोक्तृत्वशक्तीची उलथापालथ होईल, म्ह. भोक्तृत्वशक्ति तिचे ठिकाणींच मानावी लागेल. तेव्हां सांख्यांच्या मता भोक्तृत्वशक्तीवरून जो आत्मा सिद्ध होत असतो तो होणार नाहीं असा दोष येतो.

८७ तेव्हां ईश्वराप्रमाणें त्याला सर्व गोष्टी आपल्या इच्छेप्रमाणें करतां येत नसल्यामुळें अनिष्टही भोगावें लागतें.

८८ जीवात्मा हा समाधीमध्यें ‘ प्रकृतीपेक्षां मी निराळा ’ असा संकल्प करून मुक्त होतो. परंतु जर प्रकृतीच समाधि लावणारी असेल तर जिचा तिलाच ‘ माझ्यापेक्षां मी निराळी ’ असा संकल्प करतां येत नाहीं. शिवाय ती अचेतन आहे. तेव्हां ह्या दोन्ही

३९ समाध्यभावाच्च । ४० यथा च तक्षोभयथा ।

३७ अनुभवाप्रमाणें (प्रवृत्तीही) अनियमित आहे.	३७ अनुभवाप्रमाणें (जीवाचें कर्मही) अनियमित आहे.
३८ (जीवात्मा हा जरी कर्ता आहे तरी त्याला अनिष्टही प्राप्त होतें). कारण (त्याचें) सामर्थ्य कमी आहे.	३८ कारण (जीवाचें) सामर्थ्य कमी आहे म्हणून (त्याला पारतंत्र्य आहे).
३९ समाधीचा अभाव आहे म्हणूनही (जीवाचें सामर्थ्य कमी आहे).	३९ समाधान नसल्यामुळेंही (जीवाचें पारतंत्र्य सिद्ध होतें).
४० आणि ज्याप्रमाणें सुतार दोन्ही तऱ्हांचा (दृष्टीस पडतो त्याप्रमाणें जीवात्मा दोन्ही तऱ्हांचा आहे). (१३)	४० आणि ज्याप्रमाणें सुतार दोन्ही तऱ्हांचा (दृष्टीस पडतो त्या प्रमाणें जीवात्मा दोन्ही तऱ्हांचा आहे).

कारणांवरून समाधि संभवत नाहीं हें सिद्ध होतें.

८९ जीवाला समाधीच्या योगानें म्ह. योगबलानें क्रियाशक्ति आणि ज्ञानशक्ति ह्या प्राप्त होतात. तेव्हां अर्थातच ‘ समाधीचा अभाव असला म्हणजे त्याचें सामर्थ्य कमी असतें ’ असें सिद्ध होतें.

९० ‘ मला आतां कांहीं एक नको ’ अशी जी बुद्धि असते तिला समाधान म्हणतात. हें समाधान ईश्वरालाच आहे, जीवाला नाहीं. जीव हा ईश्वराच्या अधीन आहे.

९१ जर बुद्धीला कर्तृत्व असेल तर ती नेहमीं कांहीं तरी करीलच. परंतु जीवाला कर्तृत्व मानलें म्हणजे मात्र तो चेतन असल्यामुळें आपल्या इच्छेप्रमाणें कार्य करील किंवा करणार नाहीं. ज्याप्रमाणें सुतार एखादे वेळीं हत्यारें घेऊन काम करूं लागतो आणि एखादे वेळीं करीत नाहीं त्याप्रमाणेंच हें होय.

९२ ज्याप्रमाणें सुतार हा एखादें घर बांधून त्याचा उपभोगही आपणच घेतो त्याप्रमाणेंच जीवात्मा आहे. कर्ता आणि भोक्ता या दोन तऱ्हा होत. तेव्हां ‘ जीवात्मा हा भोक्ता असल्यामुळें कर्ता असणार नाहीं ’ अशी शंका घेऊं नये.

९३ शं. जर जीवाला स्वतंत्र रीतीनें कांहींच करतां येत नाहीं तर त्याला ‘ कर्ता ’ असें कसें म्हटलें ? उ. ज्याप्रमाणें सुतार हा मालकाच्या इच्छेप्रमाणेंच वाडा तयार करून देतो तरी त्याला कर्ता म्हणतात त्याप्रमाणेंच येथें समजावें. दुसरा कोणी प्रेरक असणें आणि स्वतः काम करणें ह्या दोन तऱ्हा होत.

४१ परात्तु तच्छ्रुतेः । ४२ कृतप्रयत्नापेक्षस्तु विहितप्रतिषिद्धावैयर्थ्यादिभ्यः ।

४१ परंतु परमेश्वरापासून-(च जीवात्म्याला कर्तृत्व वगैरे प्राप्त होतें). कारण तशी श्रुती आहे.	४० परंतु परमेश्वरापासून-(च जीवात्म्याला कर्तृत्व वगैरे प्राप्त होतें). कारण तशी श्रुती आहे.
४२ परंतु विहित आणि प्रतिषिद्ध अशा गोष्टींना वैयर्थ्य येतें इत्यादि कारणांवरून (ईश्वराला जीवानें) केलेल्या प्रयत्नाची अपेक्षा आहे (असें सिद्ध होतें). (९६)	४१ परंतु विहित आणि प्रतिषिद्ध अशा गोष्टींना वैयर्थ्य येतें इत्यादि कारणांवरून (ईश्वराला जीवानें) केलेल्या प्रयत्नाची अपेक्षा आहे (असें सिद्ध होतें). (९)
४३ (जीवात्मा ईश्वराचा) अंश आहे. कारण (श्रुतीमध्यें जीवात्मा आणि परमात्मा हे) भिन्न आहेत असा व्यवहार केला आहे, आणि अन्य तऱ्हेचाही व्यवहार केला आहे. कारण कांहीं लोक (ईश्वरच) दास, कितव वगैरे आहे असें पठन करितात.	४२ (जीवात्मा ईश्वराचा) अंश आहे. कारण (श्रुतीमध्यें जीवात्मा आणि परमात्मा हे) भिन्न आहेत असा व्यवहार केला आहे. आणि अन्य तऱ्हेचा व्यवहार केला आहे. शिवाय कांहीं लोक (ईश्वरच) दास, कितव वगैरे आहे असें पठन करितात.

९४ 'कर्तृत्व, करणत्व, स्वभाव वगैरे जे जीवाचे ठिकाणीं असतात ते परमात्म्याच्या कृपेनेंच असतात. त्यानें उपेक्षा केली म्हणजे असत नाहींत' अशी पैंगी श्रुति आहे.

९५ 'प्रतिषिद्ध' या शब्दाबद्दल 'प्रतिषेध' असा शब्द मध्वाचार्यांच्या पाठामध्यें आहे.

९६ 'ज्याप्रमाणें अग्नीपासून ठिणग्या निघतात त्याप्रमाणेंच चांगलें आचरण करणारे व वाईट आचरण करणारे असे जीवात्मे हे परमात्म्यापासून निघतात' ह्या श्रुतीमध्यें जीवाचें नानात्व अंशरूपानें सांगितलें आहे. जीव हा ईश्वराचा अंश आहे ही एक तऱ्हा होय; आणि जीव ईश्वराचें शरीर आहे ही दुसरी तऱ्हा होय. तात्पर्य, जीव हा

४३ अंशो नानाव्यपदेशादन्यथा चापि दाशकितवादित्वमधीयत एके ।

४१ परंतु परमेश्वरापासून--(च जीवाला कर्तृत्व प्राप्त होतें). कारण त्या (परमेश्वराचे ठि-काणींच कर्तृत्व आहे असें) श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

४२ परंतु विहित आणि प्रतिषिद्ध अशा गोष्टींना वैयर्थ्य येतें इत्यादि कारणांवरून (ईश्व-राला जीवानें) केलेल्या प्र-यत्नाची अपेक्षा आहे (असें सिद्ध होतें). (१४)

४३ (जीवात्मा ईश्वराचा) अंश आहे. कारण (श्रुतीमध्यें जीवाचें) नानात्व सांगितलें आहे. आणि कांहीं लोक अन्य तऱ्हेनेंही (ईश्वरच) दाश, कितव वगैरे आहे असें पठन करितात.

४१ (जीवाला कर्तृत्वशक्ति) परमात्म्यापासूनच (प्राप्त होते). कारण तैशी श्रुती आहे.

४२ परंतु विधि आणि निषेध-यांना वैयर्थ्य येतें इत्यादि कारणांवरून (ईश्वराला जीवानें) केलेल्या प्रयत्नाची अपेक्षा आहे (असें सिद्ध होतें). (१७)

४३ (जीवात्मा ईश्वराचा) अंश आहे. कारण (श्रुतीमध्यें जीवाचा ईश्वराशीं) अनेक तऱ्हेचा संबंध सांगितला[९७] आहे आणि अन्य तऱ्हेचाही व्य-वहार केला आहे. कांहीं लोक (ईश्वरच) दाश, कितव वगैरे आहे असें पठन करितात[९८].

स्वरूपानें ईश्वराचें कार्य आहे असें समजूं नये. त्याचाच एक प्रकार आहे अशा रूपानें पाहिजे तर कार्य म्हणतां येईल.

९७ ' परमात्मा माझें रक्षण करो, मी त्याचा पुत्र आहें ' इत्यादि प्रकारांनीं जी-वाचा ईश्वराशीं अनेक तऱ्हेचा संबंध सांगितला आहे.

९८ तात्पर्य, ज्या अर्थी श्रुतीनें जीवात्मा आणि परमात्मा यांमध्यें भेद आणि अभेद असे दोन्ही वर्णिले आहेत त्या अर्थी जीवात्मा हा परमात्म्याचा अंश आहे असेंच मानलें पाहिजे. कारण भेद आणि अभेद हे दोन्ही खऱ्या रीतीनें संभवत नाहींत. तेव्हां त्या दोहोंमध्यें भेद खरा आहे आणि अभेद गौण आहे. कारण तो अंश या दृष्टीनें व-र्णिला आहे असें समजावें.

४४ मन्त्रवर्णाच्च । ४५ अपि च स्मर्यते ।

४४ मंत्रवर्णावरूनही (जीवात्मा हा परमात्म्याचा अंश आहे असें समजतें).	४३ मंत्रवर्णावरून--(ही जीवात्मा हा परमात्म्याचा अंश आहे असें समजतें).
४५ स्मृतीमध्येंही (जीव हा ईश्वराचा अंश आहे असें) सांगितलें आहे.	४४ स्मृतीमध्येंही (जीव हा ईश्वराचा अंश आहे असें) सांगितलें आहे.
४६ परमात्मा हा प्रकाश वगैरेंप्रमाणें ह्या (जीवात्म्या-) सारखा (दुःखी) होत नाहीं.	४५ परंतु[103] (जीव हा) प्रकाश वगैरेंप्रमाणें आहे. (म्हणून जसा जीव आहे) तसा परमात्मा नाहीं.
४७ स्मृतीमध्यें देखील (असेंच) सांगितलें आहे.	४६ स्मृतीमध्यें देखील (असेंच) सांगितलें आहे.

९९ ' मंत्रवर्णात् ' असा पाठ रामानुजाचार्य आणि मध्वाचार्य यांचा आहे.

१०० ' अपि स्मर्यते ' असा पाठ रामानुजाचार्य आणि मध्वाचार्य यांचा आहे.

१०१ गीतेमध्यें देखील (१५-७) जीव हा ईश्वराचा अंश आहे असें सांगितलें आहे.

१०२ ' प्रकाशादिवत्तु नैवं परः ' असा रामानुजाचार्यांचा पाठ आहे.

१०३ शं. जर जीव हा परमात्म्याचा अंश आहे तर जीवाचे दोष परमात्म्याला कां लागत नाहींत. उ. ज्याप्रमाणें सूर्य, अग्नि वगैरेंचा प्रकाश हा अंश आहे तसेंच ज्याप्रमाणें गोत्व वगैरे धर्म गो वगैरेंचे अंश आहेत किंवा ज्याप्रमाणें देहधारी जीवाचा देह हा अंश आहे त्याप्रमाणें जीव हा ईश्वराचा अंश आहे म्हणजे विशेषण आहे. म्हणून जसा जीव आहे तसा परमात्मा नाहीं म्हणजे विशिष्ट या रूपानें जीवापेक्षां परमात्मा निराळा आहे. तेव्हां अर्थातच जीवाचे ठिकाणीं असलेले दोष परमात्म्याचे ठिकाणीं येत नाहींत.

१०४ ज्याप्रमाणें अग्नीला संताप होत नाहीं व बर्फाला थंडी होत नाहीं त्याप्रमाणें परमात्म्याला दुःख होत नाहीं. जसे अग्नि वगैरेंचे संताप वगैरें धर्म असल्यामुळें त्या

४६ प्रकाशादिवन्नैवं परः[१०६] । ४७ स्मरन्ति च ।

४४ मंत्रवर्णावरूनही (जीवात्मा हा परमात्म्याचा अंश आहे असें समजतें).	४४ मंत्रवर्णावरून—(हा जीवात्मा हा परमात्म्याचा अंश आहे असें समजतें).
४५ शिवाय (ह्या गोष्टींचें अन्य ठिकाणीं देखील) स्मरण[१०१] केलें आहे.	४५ स्मृतीमध्येंही (जीव हा ईश्वराचा अंश आहे असें) सांगितलें आहे.
४६ परमात्मा[१०४] हा प्रकाश वगैरें-प्रमाणें ह्या (जीवात्म्या-) सारखा (दुःखी) होत नाहीं.	४६ (अवतार[१०५]रूपी) परमात्मा हा ह्या (जीवात्म्या-) सारखा नाहीं. प्रकाश वगैरें-प्रमाणें हें होय.
४७ (ऋषी असेंच) स्मरतात.	४७ स्मृतीमध्यें[१०७] देखील (असेंच) सांगितलें आहे.

धर्माविषयीं अग्नि वगैरेंची द्वैतबुद्धी नसते तसेंच दुःख हा परमात्म्याचा धर्म असल्यामुळें परमात्म्याची त्याविषयीं द्वैतबुद्धि होत नाहीं. आनंदांशाच्या तिरोभावालाच दुःख म्हणतात आणि तिरोभावशक्ति ही परमात्म्याचीच आहे. आतां जीव हा अंशभूत असल्यामुळें त्याची मात्र दुःखाविषयीं द्वैतबुद्धि असते म्हणून तो दुःखी होतो हें बरोबरच आहे.

१०५ मत्स्य, कूर्म वगैरे जे अवतार ते जरी जीवाप्रमाणें परमात्म्याचे अंश आहेत तरी ते जीवासारखे भिन्नांश नाहींत तर ते त्याच्या स्वरूपाचे अंश आहेत. कारण त्यांच्या अंगीं पूर्ण शक्ति आहे.

१०६ प्रकाश वगैरेंप्रमाणें जीव हा ईश्वराचा अंश आहे असें पराशर वगैरेंनीं सांगितलें आहे. विष्णु पु. १।२।५५ पहा.

१०७ ' मत्स्य, कूर्म वगैरे अवतार हे परमात्म्याच्या स्वरूपाचे अंश आहेत आणि जीव हे विभिन्नांश आहेत. एका अंशीचे स्वरूपांश आणि विभिन्नांश असे दोनप्रकारचे अंश आहेत. त्यांपैकीं स्वरूपांश आणि अंशी यांमध्यें कोणत्याही प्रकारचा भेद नसतो. आणि विभिन्नांश मात्र अंशीपेक्षां भिन्न असतो व त्याच्या अंगीं अंशीसारखी शक्ति नसते' असें वाराह स्मृतीमध्यें सांगितलें आहे.

४८ अनुज्ञापरिहारौ देहसंबन्धाज्ज्योतिरादिवत् ।

४८ विधि आणि निषेध हे देहाच्या संबंधामुळें संभवतात. ज्योति वगैरेंप्रमाणें (हे समजावें).	४७ विधि आणि निषेध हे देहाच्या संबंधामुळें संभवतात. ज्योति वगैरेंप्रमाणें (हें समजावें).
४९ जीव व्यापक नाहीं म्हणून (कर्मांचा किंवा फळांचा) घोटाळा होत नाहीं.	४८ जीव व्यापक नाहीं म्हणून (कर्माच्या फळांचा) घोटाळा होत नाहीं.
५० शिवाय (जीवात्मा हा परमात्म्याचें) प्रतिबिंबच आहे.	४९ (इतर मताचे लोक जो हेतु दाखवितात तो) केवळ आभास आहे. (खरा नव्हे).

१०८ शं. जर सर्व जीव ईश्वराचे सारखेच अंश आहेत तर श्रुतीमध्यें वेदाध्ययनाचा विधि ब्राह्मण वगैरेंनाच कां केला शूद्राला कां केला नाहीं? उ. जीव जरी सर्व सारखे आहेत तरी त्यांचे देह सारखे नाहींत. कांहींचे शुद्ध आहेत व कांहींचे अशुद्ध आहेत. त्यामुळें विधि आणि निषेध सांगितले आहेत.

१०९ 'जीवाला दुःखें होऊं नयेत. कारण तो परमात्म्याचा अंश असल्यामुळें त्याविषयीं विधि आणि निषेध हे लागू होत नाहींत. म्हणून त्याच्या हातून कर्मे घडतात असें म्हणतां येत नाहीं' अशी जी शंका येते तिचें हें उत्तर दिलें आहे.

११० जीवात्मा हा जरी परमात्म्याचा अंश आहे तरी त्याचा देहाशीं संबंध असल्यामुळें त्याची संसारामध्यें प्रवृत्ति होते आणि संसारापासून निवृत्ति म्हणजे मोक्ष होतो. ह्या जीवाच्या प्रवृत्तिनिवृत्ती परमात्म्याच्या अधीन आहेत. कारण जीवाच्या अंगीं परमात्म्याप्रमाणें शक्ति नाहीं. ज्याप्रमाणें चक्षुरिंद्रिय हें आदित्याचा अंश असूनही त्याचा देहाशीं संबंध असल्यामुळें त्याची शक्ति कमी आहे म्हणून त्याची विषयाकडे प्रवृत्ति आणि निवृत्ति ह्या आदित्याच्या अधीन आहेत त्याप्रमाणेंच हें जाणावें. तात्पं., मत्स्य कूर्म वगैरे अवतार आणि जीव हे जरी परमात्म्याचे अंश या नात्यानें सारखे आहेत तरी त्यांमध्यें इतर गोष्टींनीं पुष्कळ वैलक्षण्य आहे.

१११ शं. अमक्या जातीच्या मनुष्यानें अमुक कर्म करावें असें जें ब्राह्मण वगैरे जातींना उद्देशून सांगितलेले विधि ते देहाच्या संबंधानें सुद्धां जीवाला व्यवस्थित रीतीनें संभवत नाहींत. कारण बाल्य, तारुण्य वगैरे भिन्न भिन्न अवस्थांच्या योगानें देह भिन्न

४९ असंततेश्चाव्यतिकरः । ५० आभास एव च ।

४८ विधि आणि निषेध हे देहाच्या संबंधामुळें संभवतात. ज्योति वगैरेंप्रमाणें (हें समजावें).	४८ प्रवृत्ति आणि निवृत्ति या देहाच्या संबंधामुळें संभवतात. ज्योति वगैरेंप्रमाणें (हें समजावें).
४९ प्रवाह नाहीं म्हणून (कर्मांचा) घोटाळा होत नाहीं.	४९ (जीवांना) पूर्ण शक्ति नाहीं म्हणून (जीव आणि मत्स्य कूर्म वगैरे अवतार यांमध्यें) घोटाळा होत नाहीं.
५० शिवाय (जीवात्मा हा परमात्म्याचा) केवळ आभास मात्र आहे. (१९)	५० शिवाय (जीवात्मा हा परमात्म्याचें) प्रतिबिंबच आहे. (१८)

भिन्न होत असल्यामुळें उपनयन संस्कारामुळें ज्या देहाला ब्राह्मणत्व आलें तो देह तारुण्यावस्थेमध्यें नष्ट होतो. आतां जीव एक आहे असें म्हणावें तर जन्मांतरीं शूद्र झाला असतांही त्याला ब्राह्मणकर्म करावें लागेल असा कर्मांचा घोटाळा होतो. उ. जरी बाल्य वगैरे अवस्थांच्या योगानें देह भिन्न झाला तरी देहाचा प्रवाह एकसारखाच आमरणांत चालूं असतो. परंतु जन्मांतरीं मात्र तो प्रवाह चालूं रहात नाहीं. म्हणून कर्मांचा घोटाळा होत नाहीं.

११२ जर जीवांना पूर्ण शक्ति असती तर सर्वच सारखे होत असल्यामुळें घोटाळा झाला असता.

११३ ‘ जरी सर्व जीव हे ब्रह्मरूपच आहेत आणि ब्रह्म हें एकच आहे ’ तरी ब्रह्माचें स्वरूप आच्छादित होऊन तें एकच ब्रह्म उपाधीच्या योगानें भिन्न भिन्न झालें आहे त्यामुळें कर्मांच्या फळांचा घोटाळा होत नाहीं ’ असा जो कांहीं इतर मताचे लोक हेतु दाखवितात तो खरा नव्हे. कारण ब्रह्माचें प्रकाश हें स्वरूप आहे तें आच्छादित झालें म्हणजे त्याच्या स्वरूपाचा नाश झाला असें म्हणावें लागेल.

११४ कारण परमात्म्याचा आनंदांश येथें आच्छादित झालेला आहे. तेव्हां अर्थातच जीवाला संसारित्व कसें प्राप्त झालें अशी शंका घेऊं नये.

११५ जीवात्मे हे परमात्म्याचे प्रतिबिंबांश आहेत स्वरूपांश नव्हेत म्हणून त्यांना ‘ विभिन्नांश ’ असें पूर्वी म्हटलें आहे. आतां प्रतिबिंबांशाचे बिंबांशीं कांहीं थोड्या गुणांनीं साम्य असतें. म्हणून त्यांची मत्स्य कूर्म वगैरे स्वरूपांशांशीं बरोबरी होत नाहीं.

५१ अदृष्टानियमात् । ५२ अभिसंध्यादिष्वपि चैवम् ।

५१ अदृष्टासंबंधानें नियम करितां येत नसल्यामुळें (कर्मफलांची व्यवस्था लागणार नाहीं).	५० (शिवाय यांच्या मतीं अदृष्टामुळेंही व्यवस्था होत नाहीं.) कारण अदृष्टासंबंधानें नियम करितां येत नाहीं.[११६]
५२ विचार वगैरेंविषयीं देखील असेंच (समजावें).	५१ विचार वगैरेंविषयीं देखील असेंच (समजावें).
५३ (आत्म्याला) प्रदेश-(भेद) असल्यामुळें (कर्मफलांची व्यवस्था लागेल) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (सर्व आत्म्यांचा सर्व शरीरांमध्यें) अंतर्भाव होतो. (१७)	५२ (आत्म्याला उपाधींच्या संबंधानें) भिन्न भिन्न प्रदेश असल्यामुळें (कर्मांच्या फलांची व्यवस्था लागेल) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (सर्व प्रदेशांचा सर्व उपाधींमध्यें) अंतर्भाव होतो. (७)

११६ अदृष्ट हें एक ब्रह्माच्या स्वरूपावर अवलंबून असल्यामुळें त्याच्या योगानें नियम न होतां उलट ब्रह्माचें ठिकाणीं दोष लागतील.

११७ शं. जीव हे परमात्म्याचे प्रतिबिंबांश नव्हेत. कारण जर ते प्रतिबिंबांश असते तर सर्वच सारखे झाले असते. उ. सर्वांचें अदृष्ट सारखें नसल्यामुळें सर्व जीव सारखे असत नाहींत.

११८ इच्छा, द्वेष, सुख आणि दुःख हीं जीं सर्व जीवांचीं सारखीं नसतात त्यांचें कारण देखील सर्वांचें अदृष्ट सारखें नाहीं हेंच होय. तेव्हां सर्व जीव सारखे नाहींत याचें

५३ प्रदेशा[119]दिति चेन्नान्तर्भावात् । द्वितीयेध्याये तृतीयः पादः ॥

५१ अदृष्टासंबंधानें नियम करितां येत नसल्यामुळें (कर्मफलांची व्यवस्था नैयायिकमतीं लागणार नाहीं).	५१ अ[117]दृष्ट नियमित नसल्यामुळें (प्रतिबिंबभूत जीव हे परस्पर विचित्र होतात).
५२ इच्छा वगैरेंविषयीं देखील असेंच (समजावें).	५२ इ[118]च्छा वगैरेंविषयीं देखील असेंच (समजावें).
५३ (आत्म्याला) प्रदेश-(भेद) असल्यामुळें (कर्मफलांची व्यवस्था लागेल) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (सर्व आत्म्यांचा सर्व शरीरामध्यें) अंतर्भाव होतो. (१६)	५३ प्रदेश (भिन्न भिन्न[120]) असल्यामुळें (जीव हे परस्पर विचित्र होतात) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (त्याचा अदृष्टामध्येंच) अंतर्भाव होत आहे. (१९)

कारण अदृष्टच मानलें पाहिजे; इच्छा वगैरे मानतां येत नाहींत.

११९ 'प्रदेशभेदादिति चेन्नान्तर्भावात्' असा रामानुजाचार्यांचा पाठ आहे.

१२० 'कांहीं जीव स्वर्गामध्यें असतात, कांहीं भूमीवर असतात, आणि कांहीं नरकामध्यें असतात. असें जीवाचे प्रदेश म्हणजे स्थानें निरनिराळीं असल्यामुळेंच जीव परस्पर विचित्र होतात' असें मात्र म्हणूं नये. कारण जीवांना आपआपल्या अदृष्टाप्रमाणेंच भिन्न भिन्न स्थानें प्राप्त होतात. शिवाय एका ठिकाणीं असलेल्या अशा अनेक जीवांमध्यें सुद्धां परस्पर वैचित्र्य दृष्टोत्पत्तीस येतें. तेव्हां जीवांमधील परस्पर वैचित्र्याचें अदृष्टवैचित्र्य हेंच कारण आहे असें सिद्ध झालें.

१ तथा प्राणाः । २ गौण्यसंभवात् ।

अध्याय २ पाद ४

१ त्याप्रमाणें प्राण (देखील उत्पन्न होतात).

२ गौण्यसंभव आहे म्हणून (प्राण उत्पन्न होतात असें सिद्ध होतें).

३ तें (उत्पत्तिवाचक क्रियापद) श्रुतीमध्यें पर्वी घातलें आहे म्हणूनही (प्राण उत्पन्न होतात असें सिद्ध होतें).

१ त्या (जीवा-) प्रमाणें प्राण (उत्पन्न होत नाहींत).

२ परंतु श्रुतीमध्यें (सृष्टीच्या) पूर्वीं त्या (एक परमात्म्या-) चेंच (अस्तित्व सांगितलें आहे). म्हणूनच (बहुवचनश्रुति) गौण आहे. कारण (बहुत्व) संभवत नाहीं.

१ ‘ तथा प्राणः ’ (व.)

२ पूर्वींच्या पादामध्यें उत्क्रांति वगैरे कारणें दाखवून जीवाचे अणुत्व वगैरे जे गुण सिद्ध केले आहेत ते गुण प्राणाचे ठिकाणीं म्ह० इंद्रियांचे ठिकाणींही आहेत असा या सूत्रानें अतिदेश केला आहे. इंद्रियांमध्यें मुख्य जें मन त्याला अनुसरून सूत्रामध्यें प्राण शब्द एकवचनीं घातला आहे.

३ ‘ गौण्यसंभवात्तत्प्राक्श्रुतेश्च ’ असें ह्या दोन सूत्रांचें एकच सूत्र रामानुजाचार्यांच्या पाठामध्यें आहे. सूत्रांतील ‘ च ’ या शब्दाचा निश्चय असा अर्थ आहे. वेदान्तदीपामध्यें परंतु असा अर्थ केला आहे.

४ शं० पूर्वसूत्रामध्यें प्राणांची उत्पत्ति होत नाहीं असा पूर्वपक्ष करून त्याचें उत्तर या सूत्रांत दिलें आहे. ज्या श्रुतीमध्यें (पृ. ९०० पं. ८) सृष्टीच्या पूर्वीं प्राणाचें अस्तित्व सांगितलें आहे त्या श्रुतीमधील प्राण शब्दाचा परमात्मा असा अर्थ आहे. आतां त्या श्रुतीमध्यें प्राणाला म्हणजे परमात्म्याला जें बहुवचन लाविलें आहे तें मात्र गौण आहे असें समजावें. कारण परमात्म्याला बहुत्व संभवत नाहीं.

५ शं० श्रुतीमध्यें प्राणाची उत्क्रान्ति सांगितली आहे खरी, परंतु ती गौण आहे. तेव्हां तीवरून प्राणाचें अणुत्व सिद्ध होत नाहीं. उ० श्रुतीमध्यें एकाच ठिकाणीं जीव

३ तत्प्राक्श्रुतेश्च ।

अध्याय २ पाद ४

१ त्याप्रमाणेंच प्राण आहे.

२ (उत्क्रांतिश्रुति गौण नाहीं.) कारण (तिला) गौणी म्हणणें संभवत नाहीं.

३ श्रुतीमध्यें त्या (सृष्टी-) च्या पूर्वी (प्राणांचें अस्तित्व सांगितलें आहे) त्यावरूनही (प्राण हे जीवाप्रमाणें आहेत असें समजावें).

१ त्याप्रमाणें प्राण (देखील उत्पन्न होतात).

२ (प्राण उत्पन्न होत नाहींत असें सांगणारी श्रुति) गौण आहे. कारण (तिचा मुख्यार्थ) संभवत नाहीं.

२ शिवाय (प्राणांची उत्पत्ति मानिली असतां) प्रतिज्ञा विरोध येत नाहीं. (१)

४ श्रुतीमध्यें (इतर इंद्रियांपेक्षां) पूर्वी त्या (मना-) ची (उत्पत्ति सांगितली आहे). (२)

आणि प्राण यांची उत्क्रांति सांगितली आहे. तेव्हां ती उत्क्रांति जीवाची जर खरी आहे तर प्राणांचीही खरीच मानली पाहिजे.

६ कारण प्राणांना मुख्य रीतीनें नित्यत्व नाहीं असें भविष्यत्पर्वामध्यें सांगितलें आहे. शिवाय त्या परमात्म्यापासून प्राण उत्पन्न होतो अशी श्रुति आहे (मु. २ । १ । ३).

७ ' गौण्यसंभवात् ' या सूत्रापुढें ' प्रतिज्ञानुपरोधाच्च ' असें सूत्र मध्वाचार्यांच्या पाठामध्यें आहे. प्राण नित्य मानले तर ' परमात्म्यानें हें सर्व उत्पन्न केलें ' ही श्रुतीमधील (तै. २।६।१) प्रतिज्ञा विरुद्ध होईल.

८ ' जीवाप्रमाणेंच प्राण देखील नित्य आहेत त्यांची स्वरूपतः उत्पत्ति होत नाहीं ' असें या सूत्रामध्यें सांगितलें आहे.

९ शं० इतर इंद्रियें उत्पन्न होत असतील. पण मन मात्र उत्पन्न होत नाहीं. कारण गोपवन श्रुतीमध्यें मन नित्य आहे असें सांगितलें आहे. उ० मनही उत्पन्न होतें. कारण मुंडकोपनिषदामध्यें (२।१।३) आरंभाच मनाचा उत्पत्ति वर्णिली आहे आणि नंतर इतर इंद्रियांची उत्पत्ति सांगितली आहे. आतां प्रलयाचे वेळीं सूक्ष्म रूपानें मन असतें या अभिप्रायानें गोपवन श्रुतीमध्यें त्याचें नित्यत्व वर्णिलें आहे.

४ तत्पूर्वकत्वाद्वाचः ।

४ वाणी (प्राण आणि मन हीं) त्या (भूत-) पासून उत्पन्न होतात. (असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे) म्हणून-(हीं प्राण उत्पन्न होतात असें सिद्ध होतें). (१)	३ वाणी त्यां (वस्तू-) पासून उत्पन्न होते म्हणून (श्रुती-मधील प्राण शब्दाचा अर्थ परमात्मा हा आहे असें समजतें). (१)
५ (प्राण) सात आहेत. कारण (तितकेच श्रुतीवरून) समजतात. शिवाय, (त्या अर्थाचेंच) विशेषणही दिलें आहे.	४ (प्राण) सात आहेत. कारण (श्रुतीमध्यें तितक्यांचीच) गति (सांगितली) आहे. शिवाय (तितकेच) विशेष स्वरूपानें सांगितले आहेत.

१० पूर्वीं दाखविलेल्या तैत्तिरीय श्रुतीमधील प्राण शब्दाचा इंद्रियें हा अर्थ घेतां येत नाहीं. कारण तेथें सृष्टीच्या पूर्वीं प्राणाचें अस्तित्व वर्णिलें आहे आणि इंद्रियांना तर त्या वेळीं मुळींच अस्तित्व नाहीं. कारण पंचमहाभूतें उत्पन्न झाल्यानंतर त्यापासून इंद्रियांची उत्पत्ति होत आहे. तेव्हां त्यावेळीं इंद्रियरूपी वस्तू अस्तित्वांत नसल्यामुळें त्या अर्थाचा प्राण शब्द संभवत नाहीं.

११ मन हें पूर्वरूप आहे, वाणी हें उत्तररूप आहे अशी तैत्तिरीय श्रुति आहे. आतां वेद नित्य असल्यामुळें वाणी जर नित्य आहे तर मनाचें नित्यत्व कबूल केलेंच पाहिजे. तेव्हां मन वगैरे सर्वच प्राण म्ह० इंद्रियें नित्य आहेत असें यावरून सिद्ध होतें.

१२ पूर्वींच्या सूत्रामध्यें मनाची उत्पत्ति सिद्ध केली आहे. तेव्हां अर्थातच तें मन ज्या वाणीचें पूर्वरूप म्हणजे कारण आहे ती वाणीही उत्पन्न होते असें सिद्ध होतें. आतां श्रुतीमध्यें जें वाणीचें नित्यत्व वर्णिलें आहे तें वेदवाणीच्या अभिप्रायानें वर्णिलें आहे असें समजावें.

९ सप्त गतेर्विशेषितत्वाच्च ।

४ वाणीचें[11] तें (मन) पूर्वरूप असल्यामुळें- (हीं प्राणांचें नित्यत्व सिद्ध होतें).	५ तें (मनें[12]) वाणीचें पूर्व रूप असल्यामुळें (वागींद्रियाचीही उत्पत्ति सिद्ध होते). (२)
५ सातें[14] (प्राणां-)च्या गती (श्रुतीमध्यें सांगितल्या) आहेत. आणि (त्या गती आणि जीवाची गति ह्या परस्परांचे) विशेषण केल्या आहेत. त्या वरूनही (प्राणांचें नित्यत्व सिद्ध होतें). (१)	६ ज्ञानाचें (साधनें[15] असे प्राण) सात आहेत. शिवाय (श्रुतीमध्यें त्या सातांनाच ' ज्ञानाचें साधन ' असें) विशेषण दिलें आहे.

१३ श्रुतीमध्यें पांच ज्ञानेंद्रियें, मन आणि बुद्धि या सातांचीच जीवाबरोबर गति सांगितली आहे. शिवाय काठकउपनिषदामध्यें (का. ६ । १०) हेच सात प्राण विशेष स्वरूपानें निर्दिष्ट केले आहेत.

१४ चक्षु वगैरे सात प्राणांच्या गतींचें जीवाच्या गतीशीं मरणसमयीं एकीकरण होतें म्हणून मरणसमयीं इंद्रियांचे व्यापार बंद पडतात असें बृहदारण्यकामध्यें (बृ- ४।४।२) सांगितलें आहे. ह्या ठिकाणीं ह्या गती परस्परांचें विशेषण केल्या आहेत. तेव्हां अर्थातच जीवाप्रमाणें प्राण देखील नित्य आहेत असें सिद्ध होतें. शिवाय ह्या सूत्राचा दुसराही अर्थ होतो तो असा:-' (प्राण) सात आहेत कारण (श्रुतीमध्यें तितक्यांचीच) गति (सांगितली) आहे शिवाय (तितकेच) विशेष स्वरूपानें सांगितले आहेत. ' हा अर्थ घेतला असतां हें पूर्वपक्षाचें सूत्र आहे असें समजावें. पहिला अर्थ घेतला तरी सूत्राच्या बाहेरचा हाच पूर्वपक्ष मनांत घेऊन त्याचें उत्तर पुढच्या सूत्रांत दिलें आहे.

१५ श्रोत्र, त्वक्, चक्षु, जिव्हा, घ्राण, मन आणि बुद्धि हे सात प्राण होत. आतां कौंडिन्य श्रुतीमध्यें जें ' प्राण बारा आहेत ' असें सांगितलें आहे तें कर्मेंद्रियें पांच धरून सांगितलें आहे असें समजावें.

६ हस्तादयस्तु स्थितेऽतो नैवम् । ७ अणवश्च ।

६ परंतु हात वगैरे (ज्यास्त प्राण सांगितले आहेत. तेव्हां ज्या अर्थी असें) निश्चित होतें त्या अर्थी तशी (कल्पना) करूं नये. (२)

७ आणखी (प्राण हे) अणू आहेत. (३)

८ श्रेष्ठ देखील (उत्पन्न होतो). (४)

९ (मुख्य प्राण हा) वायुरूपी किंवा क्रियारूपी नाहीं. कारण (त्याचा) पृथक् उपदेश केला आहे.

६ परंतु हात वगैरे (ज्यास्त प्राण आहेत. कारण शरीरामध्यें जीव) स्थित असतांना (ते त्याच्या उपयोगीं पडतात). म्हणून (सातापेक्षां ज्यास्त प्राण नाहींत) असें समजूं नये. (२)

६ आणखी (प्राण हे) अणू आहेत.

७ श्रेष्ठ देखील (उत्पन्न होतो). (३)

८ (मुख्य प्राण हा) वायुरूपी किंवा क्रियारूपी नाहीं. कारण (त्याचा) पृथक् उपदेश केला आहे.

१६ ज्यांचें अणु परिमाण आहे असे.

१७ शांडिल्य श्रुतीमध्यें प्राणांचें अणुत्व सांगितलें आहे.

१८ मुख्य प्राण देखील नित्य आहे, त्याला गति आहे आणि त्याचें अणु परिमाण आहे.

१९ 'ह्या परमात्म्यापासून प्राण, मन, सर्व इंद्रियें, आकाश आणि वायु, हे उत्पन्न होतात' (मुं. २।१।३) ह्या श्रुतीमध्यें प्राणाचा वायूपेक्षां पृथक् उपदेश केला आहे म्हणून प्राण हा वायुरूपी नाहीं. तसेंच वायूची जी श्वासोच्छ्वासरूपी क्रिया तद्रूपीही प्राण नाहीं. कारण तो प्राण जर वायूची क्रियाच असता तर त्याचा वायूपेक्षां पृथक् उपदेश

८ श्रेष्ठश्च । ९ न वायुक्रिये पृथगुपदेशात् ।

६ परंतु हात वगैरे (जास्त प्राण आहेत असें) स्थित झालें असतां ह्याच कारणावरून (सातच प्राण आहेत) असें समजूं नये. (२)	७ हात वगैरे (जे जास्त प्राण आहेत ते) तर कर्माचें (साधन आहेत) म्हणून (ते तेथें श्रुतीमध्यें साता-) सारखे सांगितले नाहींत. (४)
७ आणखी (प्राण हे) अणू आहेत. (३)	८ आणखी (प्राण हे) अणू आहेत. (५)
८ श्रेष्ठ देखील (तसाच आहे).	९ श्रेष्ठ देखील (उत्पन्न होतो).
९ (मुख्य प्राण हा) वायुरूपी किंवा क्रियारूपी नाहीं. कारण (त्याचा) पृथक् उपदेश केला आहे. (४)	१० (प्राण शब्दाचा) वायु किंवा कर्म (असा अर्थ) नाहीं. कारण (त्याचा) पृथक् उपदेश केला आहे. (६)

केला नसता. कारण क्रियावानाचा उपदेश करून तेथें फिरून निराळा क्रियेचा उपदेश करण्याचें कांहीं कारण नाहीं.

२० शं. मुख्य प्राणाची उत्पत्ति होत नाहीं. आतां श्रुतीमध्यें ज्या ठिकाणीं मुख्य प्राणाची उत्पत्ति सांगितली असेल त्या ठिकाणीं प्राण शब्दाचा वायु किंवा कर्म असा अर्थ घ्यावा. कारण महाभूतांपैकीं वायु आणि सामान्य चलनरूपी कर्म ह्यांची उत्पत्ति होते हें प्रसिद्ध आहे. उ० ‘ त्या परमात्म्यानें प्राण उत्पन्न केला. तसेंच आकाश, वायु, तेज, उदक, तप, मंत्र कर्म वगैरे उत्पन्न केलीं ’ (पृ. ९०० पं. १६) ह्या श्रुतीमध्यें वायु आणि कर्म यांचा प्राणापेक्षां निराळा उपदेश केला आहे.

१० चक्षुरादिवत्तु तत्सहशिष्ट्यादिभ्यः।

१० परंतु (मुख्य प्राण हा) त्या (चक्षु वगैरे-) च्या बरोबर (च) सांगितला आहे. इत्यादि (कारणां-) वरून (मुख्य प्राण देखील) चक्षु वगैरेंप्रमाणें (जीवात्म्याचें साधन आहे असें सिद्ध होतें).	९ परंतु (मुख्य प्राण हा) त्या (चक्षु वगैरे-) च्या बरोबर- (च) सांगितला आहे इत्यादि (कारणां-) वरून (मुख्य प्राण देखील) चक्षु वगैरेंप्रमाणें (जीवात्म्याचें साधन आहे असें सिद्ध होतें).
११ (मुख्य प्राण हा) इंद्रिय नसल्यामुळें (हा) दोष येत नाहीं. (शिवाय मुख्य प्राणाचें जें कार्य आहे) तें (श्रुतीच) दाखवितें.	१० (मुख्यप्राण हा) क्रियारहित असल्यामुळें दोष येतो असें समजूं नये. कारण त्याची क्रिया (श्रुतीनेंच) दाखविली आहे.
१२ (श्रुतीमध्यें प्राणाचे) मनासारखे पांच व्यापार सांगितले आहेत. (९)	११ (श्रुतीमध्यें) पांच व्यापारांचा (प्राण) सांगितला आहे. मनाप्रमाणें हें होय. (४)

२१ ‘ चक्षु वगैरे इंद्रियें आणि मुख्य प्राण हे सर्व परमात्म्याच्या अधीन आहेत ’ असें गोपवन श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

२२ मुख्य प्राण हा जीवात्म्याचें साधन नाहीं. कारण त्याच्या अंगीं कोणतीही क्रिया नसल्यामुळें त्याला जीवात्म्याच्या उपयोगीं पडतां येत नाहीं. असा जो दोष येतो तो खरा नाहीं. कारण श्रुतीमध्यें त्याची क्रिया सांगितली आहे (मागें पृ. ९३१ पं. ७ पहा.)

२३ शं. मुख्य प्राण हा जर पराधीन असेल तर आग्निवेश्यश्रुतीमध्यें आणि पैंगीश्रुतीमध्यें मुख्य प्राणाचें स्वातंत्र्य कसें वर्णिलें आहे ? उ. ‘ मुख्य प्राण हा चक्षु वगैरे इतर प्राणांप्रमाणें करण नाहीं. म्हणजे त्याचा व्यापार जीवाच्या प्रेरणेनें चालतो असें नाहीं. आणि म्हणूनच त्याला मुख्य प्राण म्हणतात’ असें मांडव्य श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

२४ ‘ पञ्चवृत्तिः ’ असा वल्लभाचार्यांचा पाठ आहे.

२५ ज्याप्रमाणें श्रुतीमध्यें ‘ काम, संकल्प वगैरे सर्व मनच आहे ’ (बृ. १।५।३) असें सांगितलें आहे त्याप्रमाणें ‘प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान हे प्राणच आहेत’

११ अकरणत्वाच्च न दोषस्तथा हि दर्शयति। १२ पञ्चवृत्तिर्मनोवद्व्यपदिश्यते।

---

१० परंतु (मुख्य प्राण हा) त्या (चक्षु वगैरे-) च्या बरो-बर (च) सांगितला आहे इत्यादि (कारणां-) वरून (मुख्य प्राण देखील) चक्षु वगैरेंप्रमाणें (पराधीन आहे असें सिद्ध होतें).

११ (मुख्य प्राण हा) इंद्रिय नसल्यामुळें (हा) दोष येत नाहीं. (शिवाय मुख्य प्राणाचें जें कार्य आहे) तें (श्रुतीच) दाखवितें.

१२ (प्राणाचे[२६]) पांच व्यापार असल्यामुळें (तो जीवाला उपकारक होतो. कारण प्राण हा श्रुतीमध्यें) मनासारखा सांगितला आहे.

---

११ परंतु (मुख्य[२४] प्राण हा) त्या (चक्षु वगैरें-) च्या बरोबर सांगितला आहे इत्यादि (कारणां-) वरून (मुख्य प्राण देखील) चक्षु वगैरें-प्रमाणें (पराधीनच आहे असें सिद्ध होतें).

१२ (मुख्य प्राण हा[२५]) करण नसल्यामुळें दोष येत नाहीं. (श्रुतीनें) असेंच दाखविलें आहे. (७)

१३ (प्राण[२७] अपान वगैरे हे मुख्य प्राणाचेच) मनासारखे पांच व्यापार आहेत असें(श्रुती मध्यें) सांगितलें आहे. (८)

(बृ. १।५।३) असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे. तात्पर्य, प्राण अपान वगैरे नांवें जरी भिन्न भिन्न आहेत व जरी त्यांचीं कार्यें हीं भिन्न भिन्न आहेत तरी तीं पांच प्राणांपेक्षां निराळीं तत्वें नव्हेत असें समजावें.

२६ ‘ मुख्य प्राण हा प्राण, अपान वगैरे आपले पांच भाग करून हें शरीर धारण करतो ’ (प्र. २।३) अशी श्रुति आहे. तेव्हां प्राण हा पांच व्यापारांच्या योगानें जीवाच्या उपयोगीं पडतो असें समजतें. ज्याप्रमाणें मन हें चक्षु वगैरे अकरा प्रदेशांमध्यें अकराप्रकारचे व्यापार करून जीवाच्या उपयोगीं पडतें त्याप्रमाणेंच हें होय. चक्षु, श्रोत्र, त्वक्, जिव्हा, घ्राण, वाक्, पाणि, पाद, पायु, उपस्थ, आणि हृदय हे अकरा प्रदेश होत.

२७ ‘ प्राण, अपान वगैरे हे मुख्य प्राणाचे दास आहेत. बाकी दुसरा कोणत्याही प्रकारचा त्यांचा मुख्य प्राणाशीं संबंध नाहीं, तीं स्वतंत्र तत्वें आहेत ’ असें समजूं नये. कारण ते मुख्य प्राणाचेच व्यापार आहेत असें गोपवन श्रुतीमध्यें सांगितलें आहे. ज्याप्रमाणें मन, बुद्धि, अहंकार, चित्त आणि चेतना हे पांच व्यापार मनाचे आहेत त्याप्रमाणेंच हें होय.

१३ अणुश्च । १४ ज्योतिराद्यधिष्ठानं तु तदामननात् ।

१३ आणि (मुख्य प्राण हा) अणू आहे. (६)

१४ परंतु (प्राण हे) ज्योति वगैरेंनीं अधिष्ठित आहेत. कारण श्रुतीमध्यें तसें सांगितलें आहे.

१५ (प्राणांचा) प्राणवानाशीं (संबंध आहे असें) श्रुतीवरून (समजतें).

१६ आणि तो नित्य असल्यामुळें (प्राणांचा त्यांच्याशींच संबंध आहे). (७)

१२ आणि (मुख्य प्राण हा) अणू आहे. (५)

१३ प्राणवान् (जो जीव त्या-) च्या सहवर्तमान ज्योति वगैरे हे (प्राणावर) अधिष्ठित झाले आहेत. हे त्या (परमात्म्या-) च्या संकल्पानेंच होय. कारण श्रुतीमध्यें तसेंच सांगितलें आहे.

१४ [३३] त्या (परमात्म्याच्या संबंधा-) ला नित्यत्व आहे त्यावरूनही (असेंच सिद्ध होतें). (६)

---

२८ ह्या २ सूत्रांचें १ च सूत्र रामानुजाचार्यांच्या पाठामध्यें आहे.

२९ त्याप्रमाणें इंद्रियें हीं जीवात्म्यानें अधिष्ठित आहेत त्याप्रमाणेंच अग्नि वगैरे देवतांनींही तीं अधिष्ठित आहेत. हें परमात्म्याच्या इच्छेनेंच होत आहे. कारण अग्नि वगैरे सर्व देवतांचें परमात्मा नियमन करतो असें श्रुतीमध्यें (बृ. ३।७।५) सांगितलें आहे.

३० 'जो परमात्मा प्राणामध्यें राहून त्या प्राणाचें नियमन करतो' (बृ. ३।७।१६) इत्यादि श्रुतीवरून परमात्माच सर्व प्राणांचा प्रवर्तक आहे असें सिद्ध होतें.

३१ 'पर अशा प्राणानें युक्त अग्नि प्रदीप्त होतो' अशी बृहदारण्यक श्रुती (बृ. १।३।१२) आहे.

३२ 'जर ब्रह्मच प्राणांचें म्ह. इंद्रियांचें प्रवर्तक आहे तर इंद्रियें हीं जीवाचीं करणें

१५ प्राणवता शब्दात् । १६ तस्य च नित्यत्वात् ।

१३ आणि (मुख्य प्राण हा) अणू आहे. (९)	१४ आणि (मुख्य प्राण हा) अणू आहे. (९)
१४ परंतु (प्राण हे) ज्योति वगैरेंनीं अधिष्ठित आहेत. कारण श्रुतीमध्यें तसें सांगितलें आहे. (६)	१५ ज्योति वगैरेंच्या ठिकाणीं अधिष्ठित असलेलें (ब्रह्मच त्या प्राणांकडून व्यापार करवितें). कारण (श्रुतीमध्यें) तसें सांगितलें आहे.
१५ प्राणवान् (अशा अग्नि वगैरे-) नीं (हीं इंद्रियें अधिष्ठित आहेत असें) श्रुतीवरून (समजतें).	१६ प्राणवान् (जो जीव त्या द्वारा-) नें—(च ब्रह्म हें प्राणांकडून व्यापार करवितें असें) श्रुतीवरून (समजतें).
१६ (इंद्रियें हीं नेहमींच देवतांनीं अधिष्ठित आहेत.) कारण तो (प्राण आणि देवता यांचा संबंध) नित्य आहे. (७)	१७ शिवाय तो (जीव आणि प्राण यांचा संबंध) नित्य आहे यावरून (प्राण हे जीवाचीं करणें आहेत असें म्हणतां येतें). (१०)

आहेत असें श्रुतीमध्यें कसें सांगितलें ' अशी जी शंका येते तिचें हें उत्तर दिलें आहे. 'परमात्मा हाच जीवाकडून चक्षूच्या साहाय्यानें दर्शन करवितो, श्रोत्राच्या साहाय्यानें ऐकवितो ' अशी माध्वेय श्रुति आहे.

३३ परमात्म्याचा संबंध नित्य असल्यामुळें अग्नि वगैरे देवतांचें स्वरूप देखील त्या परमात्म्याच्या अधीन आहे. तेव्हां अर्थातच त्या देवता इंद्रियावर अधिष्ठित होतात ही गोष्ट परमात्म्याच्या अधीन असलीच पाहिजे.

३४ ज्याप्रमाणें लोकांमध्यें एखाद्या मनुष्याचा एखाद्या वस्तूशीं फार दिवस संबंध असला म्हणजे ती वस्तू त्या मनुष्याची आहे असा गौण रीतीनें व्यवहार होतो त्याप्रमाणें जीवांचा प्राणाशीं संबंध नित्य असल्यामुळें ते प्राण जीवाचीं करणें आहेत असा व्यवहार होतो.

१७ त इन्द्रियाणि[35] तद्व्यपदेशादन्यत्र श्रेष्ठात् ।

१७ मुख्य प्राणाखेरीज बाकीच्या त्या (प्राणां-) ना इंद्रियें असें म्हणतात. कारण (श्रुतीमध्यें) तसा व्यवहार केला आहे.

१८ (वाणी वगैरे हे मुख्य प्राणापेक्षां निराळेच पदार्थ आहेत.) कारण श्रुतीमध्यें पृथक् निर्देश केला आहे.

१९ विजातीय स्वरूप आहे म्हणूनही (मुख्य प्राणाहून इतर प्राण निराळे आहेत असें सिद्ध होतें). (८)

१९ मुख्य प्राणाखेरीज बाकीच्या त्या (प्राणां-) ना इंद्रियें असें म्हणतात. कारण (स्मृतीमध्यें त्यांनाच) तसा व्यवहार केला[36] आहे.

६६ श्रुतीमध्यें[37] पृथक् निर्देश केला आहे. आणि वैलक्षण्य आहे. त्यावरूनही (मुख्य प्राणाखेरीज बाकीच्या प्राणांनाच इंद्रियें म्हणतात असें सिद्ध होतें). (७)

---

३५ ' तदिंद्रियाणि ' असा वल्लभाचार्यांचा पाठ आहे.

३६ ' इंद्रियें हीं दहा आणि एक आहेत ' (भ. गी. १३।५) ह्या स्मृतीमध्यें पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें आणि मन ह्या अकरांनाच इंद्रियें म्हटलें आहे.

३७ ' इंद्रियें हीं बाराच आहेत मुख्य प्राण हा इंद्रिय नाहीं ' असें पौत्रायण श्रुतीमध्यें सांगितलें आहे. पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें, मन आणि बुद्धि हीं बारा इंद्रियें होत.

३८ ह्या २ सूत्रांचें १ च सूत्र रामानुजाचार्यांच्या पाठामध्यें आहे.

३९ श्रुतीमध्यें (पृ. ९०२ पं. १४) प्राणाचा इंद्रियांपेक्षां पृथक् निर्देश केला आहे. तसेंच निद्रावस्थेमध्यें चक्षु वगैरेंचे व्यापार बंद पडतात आणि मुख्य प्राणाचा मात्र

१८ भेदश्रुते: । १९ वैलक्षण्याच्च ।

१७ प्राण अपान वगैरे शिवाय बाकींचीं तीं इंद्रियें (मुख्य प्राणापेक्षां निराळेच पदार्थ आहेत). कारण (त्यांना श्रुतीमध्यें) तसा (म्ह. इंद्रिय शब्दानें) व्यवहार केला आहे.	१९ मुख्य प्राणाखेरीज बाकीच्या त्या (प्राणां-) ना इंद्रियें असें म्हणतात. कारण (श्रु- तीमध्यें त्यांनाच) तसा व्य- वहार केला आहे.
१८ श्रुतीमध्यें पृथक् निर्देश केला आहे त्यावरून—(ही हेंच सिद्ध होतें).	१९ (शिवाय) श्रुतीनें (मुख्य प्राण आणि इतर प्राण यां- मध्यें) भेद दाखविला आहे.
१९ विजातीय स्वरूप आहे म्ह- णूनही (मुख्य प्राणाहून इतर प्राण निराळे आहेत असें सिद्ध होतें). (८)	२० तसेंच (मुख्य प्राण आणि इतर प्राण यांमध्यें) वैल- क्षण्य आहे. त्यावरूनही (इतर प्राणच इंद्रियें आहेत असें समजतें). (११)

श्वासोच्छ्वासरूपी व्यापार चालू असतो असें मुख्य प्राण आणि इंद्रियें यांमध्यें वैलक्षण्यही आहे.

४० श्रुतीमध्यें ज्या ठिकाणीं प्राण शब्दाचा प्रयोग केला आहे त्या ठिकाणीं देखील मुख्य प्राण आणि इतर प्राण यांचा पृथक् निर्देश केलेला आढळतो. (पहा. पृ. ९६२ पं. ९)

४१ मुख्य प्राण असेल तरच सर्व गोष्टी होतात म्हणून त्या मुख्य प्राणाचें ईश्वराशीं साम्य आहे, तसें इतर प्राणांचें नाहीं असें मैत्रायण श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

४२ मुख्य प्राण हा केवळ ईश्वराच्या अधीन आहे. कारण झोपेंत सुद्धां तो चालू असतो आणि इतर प्राण हे जीव व ईश्वर या दोघांच्या अधीन आहेत असें वैलक्षण्य आहे.

२० संज्ञामूर्तिक्लृप्तिस्तु त्रिवृत्कुर्वत उपदेशात्। २१ मांसादि भौमं यथाशब्द-

२० परंतु संज्ञा आणि मूर्ती यांची रचना ही त्रिवृत् करणाऱ्याचीच कृती होय. कारण (श्रुतीमध्यें तसेंच) सांगितलें आहे.

२१ श्रुतीमध्यें सांगितल्याप्रमाणें मांस वगैरे (कार्यें) पार्थिव आहेत. आणि इतरांचीं (देखील कार्यें) श्रुतीमध्यें सांगितल्याप्रमाणें (समजावीत).

२२ परंतु (त्यांच्या) वैशेष्यामुळें त्यांना (विशेषप्रकारचीं) नांवें (मिळतात), नांवें (मिळतात). (९)

१७ परंतु संज्ञा आणि मूर्ती यांची रचना ही त्रिवृत् करणाऱ्याचीच कृती होय. कारण (श्रुतीमध्यें तसेंच) सांगितलें आहे.

१८ श्रुतीमध्यें सांगितल्याप्रमाणें मांस वगैरे (कार्यें) पार्थिव आहेत. तशी इतरांची (देखील कार्यें) श्रुतीमध्यें सांगितल्याप्रमाणें (समजावीत).

१९ परंतु (त्यांच्या) वैशेष्यामुळें त्यांना (विशेषप्रकारचीं) नांवें (मिळतात), नांवें (मिळतात). (८)

४३ ही श्रुती मागें पहा. (पृ. ८७८ पं. २५)

४४ शं. त्रिवृत्करण हें परमात्म्यानें केलेलें नाहीं तर तें जीवानेंच (म्ह. ब्रह्मदेवानेंच) केलेलें आहे. कारण श्रुतीमध्यें त्रिवृत्करण करण्याकरतां जे पृथ्वी, जळ आणि तेज या तीन भूतांचे तीन तीन भाग केले आहेत ते खाल्लेल्या अन्नाचे, तेजाचे आणि प्राशन केलेल्या जलाचे केलेले आहेत. मन, मांस आणि पुरीष हे अन्नाचे तीन भाग होत. प्राण, रक्त आणि मूत्र हे जलाचे तीन भाग होत. तसेंच वाणी, मज्जा आणि अस्थि हे तेजाचे तीन भाग होत. तिघांचेही तिसरे भाग स्थूल आहेत, दुसरे भाग अणु आहेत आणि पहिले तीन भाग अत्यंत अणु आहेत. उ. हे जे श्रुतीमध्यें प्रत्येकाचे तीन तीन भाग केले आहेत ते त्रिवृत्करण करण्याकरतां केले नाहींत. तर शरीरामध्यें अन्न वगैरेंचा परिणाम काय होतो तें दाखविण्याकरतां केले आहेत. त्रिवृत्करण हें त्यांचें पूर्वींच झालेलें आहे. असें मानलें नाहीं तर मन व प्राण हे पदार्थ तेजाचे मानावे लागतील. कारण ते तेजासारखे अत्यंत अणु आहेत. तसेंच मांस व मज्जा हे जलाचे मानावे लागतील. कारण ते जलासारखे अणु आहेत. तसेंच मूत्र व अस्थि हे पृथ्वीचे मानावे लागतील. कारण ते पृथ्वीसारखे स्थूल आहेत. आणि श्रुतीवरून तर असें सिद्ध होतें कीं, मन, मांस आणि पुरीष हे तीन पदार्थ पार्थिव आहेत. प्राण, रक्त आणि मूत्र हे तीन पदार्थ जलाचे

मितरयोश्च । २३ वैशेष्यात्तु तद्वादस्तद्वादः । द्वितीयेध्याये चतुर्थः पादः ॥

२० परंतु संज्ञा आणि मूर्ती यांची रचना ही त्रिवृत् करणाऱ्या-चीच कृती होय. कारण (श्रुतीमध्यें तसेंच) सांगितलें आहे. (९)	२१ परंतु संज्ञा आणि मूर्ती यांची रचना ही त्रिवृत् करणाऱ्याचीच कृति होय. कारण (श्रुतीमध्यें तसेंच) सांगितलें आहे. (१२)
२१ मांस वगैरे हे[४५] पृथिवी (वगैरें-) पासून उत्पन्न झालेले आहेत असें श्रुतीवरून समजतें. म्हणून इतर (जे मन व प्राण) ते (देखील भौतिकच असले पाहिजेत).	२२ श्रुतीमध्यें सांगितल्याप्रमाणें मांस वगैरे (कार्यें) पार्थिव आहेत. तशीं इतरांचीं (देखील कार्यें) श्रुतीमध्यें सांगितल्याप्रमाणें (समजावींत.)[४६]
२२ परंतु[४७] वैशेष्यामुळें (श्रुतीमध्यें) तसें म्हटलें आहे, तसें म्हटलें आहे. (१०)	२३ परंतु (त्यांच्या) वैशेष्यामुळें त्यांना (विशेष प्रकारचीं) नांवें (मिळतात), नांवें (मिळतात). (१३)

आहेत. आणि वाणी, अस्थि व मज्जा हे तीन पदार्थ तेजाचे आहेत. हेंच या सूत्रानें दाखविलें आहे.

४५ हें पूर्वपक्षसूत्र आहे. मन व प्राण हे भौतिक पदार्थ आहेत, निराळीं तत्वें नव्हेत असें पूर्वपक्षाचें मत आहे. हे सोम्य, मन हें अन्नमय आहे प्राण हा जलमय आहे (पृ. ९०८ पं. १९) अशी श्रुती आहे. प्राण्यानें पार्थिव पदार्थ भक्षण केले म्हणजे त्याचा परिणाम पुरीष मांस आणि मन असा तीन तऱ्हेचा होतो. मागें श्रुती पहा (पृ. ९५२ पं. १). त्याप्रमाणेंच मूत्र, रक्त आणि प्राण असा तीन तऱ्हेचा परिणाम जलाचा होतो. तेव्हां पुरीष, मांस, मूत्र, रक्त हे पदार्थ जर भौतिक म्हणून प्रसिद्ध आहेत तर मन व प्राण हेही भौतिकच असले पाहिजेत.

४६ तात्पर्य शरीर हें भूतत्रयात्मक आहे. तें केवळ पृथिवीचाच विकार आहे किंवा जलाचाच विकार आहे किंवा तेजाचाच विकार आहे असें समजूं नये.

४७ मन हें अन्नानें संयुक्त झालें म्हणजे तें मन मनन करणें वगैरे आपले व्यापार चांगलें करूं शकतें. त्याप्रमाणेंच प्राण हा जलानें संयुक्त झाला म्हणजे त्याच्या हातून चांगले व्यापार होतात. म्हणून मनाला अन्नमय आणि प्राणाला जलमय असें म्हटलें आहे. वास्तविक रीतीनें कांहीं ते त्याचे विकार नव्हेत. 'संयुक्त होणें' यालाच वैशेष्य म्हणतात.

१ तदन्तरप्रतिपत्तौ रंहति संपरिष्वक्तः प्रश्ननिरूपणाभ्याम् ।

अध्याय ३ पाद १.

१ दुसरा (देह) प्राप्त होतांना (जीव हा सूक्ष्म भूतांनीं) वेष्टित होऊन-(च त्याप्रत) गमन करितो (असें) प्रश्न आणि निरूपण यांवरून (समजतें).

२ परंतु (उदक हें भूत-) त्र्यात्मक असल्यामुळें (केवळ उदकानेंच जीव वेष्टित होत नाहीं). आधिक्यामुळें (उदकाचाच तेवढा निर्देश केला आहे).

३ प्राण जात असल्यामुळेंही (सूक्ष्म भूतें जातात असें सिद्ध होतें).

१ दुसरा (देह) प्राप्त होतांना (जीव हा सूक्ष्म भूतांनीं) वेष्टित होऊन-(च त्याप्रत) गमन करितो (असें) प्रश्न आणि निरूपण यांवरून (समजतें).

२ परंतु (उदक हें भूत-) त्र्यात्मक असल्यामुळें (केवळ उदकानेंच जीव वेष्टित होत नाहीं). आधिक्यामुळें (उदकाचाच तेवढा निर्देश केला आहे).

३ प्राण जात असल्यामुळेंही (सूक्ष्म भूतें जातात असें सिद्ध होतें).

---

१ मोक्षावस्था प्राप्त होण्याकरितां जीव हा जो ब्रह्मज्ञानाला योग्य असा जन्म घेतो ती त्याची मधली अवस्था होय. शरीराच्या पांच आहुती होतांना आरंभापासूनच जीव त्यांबरोबर असतो. ‘ तो जीव मध्येंच केव्हां तरी येतो, किंवा पांचव्या (शेवटच्या) आहुतीच्या वेळीं येतो ’ असें समजूं नये.

२ शं० मोक्षाकरितां प्रयत्न करण्याचें कारण नाहीं. कारण ‘ जीवाचा जो पंचमहाभूतांशीं संबंध झालेला आहे तो दूर होणें’ हाच मोक्ष आहे. आणि तो संबंध तर मरणकाळीं आपोआपच दूर होत आहे. उ० पंचमहाभूतांशीं झालेला संबंध मरणकाळीं दूर होत नाहीं. हेंच ह्या सूत्रामध्यें सांगितलें आहे. तात्पर्य–‘ मोक्षाकरितां प्रयत्न केला पाहिजे ’ असें सिद्ध झालें.

२ त्र्यात्मकत्वात्तु भूयस्त्वात् । ३ प्राणगतेश्च ।

अध्याय ३ पाद १.

---

१ त्या (जीवा-) च्या मधल्या[3] अवस्थेमध्यें (तो जीव सूक्ष्म भूतांनीं) वेष्ठित होऊन-(च दुसऱ्या देहांत) गमन करितो (असें) प्रश्न आणि निरूपण यांवरून (समजतें).

२ परंतु (उदक हें भूत-) त्र्यात्मक असल्यामुळें (केवळ उदकानेंच जीव वेष्ठित होत नाहीं). अनेक कारणांमुळें[3] (उदकाचाच तेवढा निर्देश केला आहे).

३ प्राण[4] जात असल्यामुळेंही (सूक्ष्म भूतें जातात असें सिद्ध होतें).

१ दुसरा[2] (देह) प्राप्त होतांना (त्याकरतां जीव हा सूक्ष्म भूतांनीं) वेष्ठित होऊन-(च) गमन करितो (असें) प्रश्न आणि निरूपण यांवरून (समजतें). (१)

२ परंतु (उदक हें भूत-) त्र्यात्मक असल्यामुळें (केवळ उदकानेंच जीव वेष्ठित होत नाहीं). आधिक्यामुळें (उदकाचाच तेवढा निर्देश केला आहे). (२)

३ (जीवाबरोबर[5]) इंद्रियें जात असल्यामुळेंही (त्या जीवाबरोबर सूक्ष्म भूतें जातात असें सिद्ध होतें). (३)

---

३ उदक हें पृथ्वी आणि तेज यांच्या मधलें आहे, स्वच्छ आहे, तेजस्वी आहे इत्यादि अनेक कारणें होत.

४ कारण उदकाशिवाय प्राणाचें पोषण होत नाहीं, म्हणून प्राणाबरोबर उदक असतेंच असें मानावें लागतें.

५ कारण ‘ ज्या ज्या ठिकाणीं इंद्रियें असतात त्या त्या ठिकाणीं भूतें असतातच ’ अशी इंद्रियें आणि भूतें यांमध्यें व्याप्ति आहे. आणि ‘ जीव हा मरणसमयींही इंद्रियांनीं वियुक्त होत नाहीं ’ असें श्रुतीवरून सिद्ध होतें.

४ अग्न्यादिगतिश्रुतेरिति चेन्न भाक्तत्वात् । ५ प्रथमेऽश्रवणादिति

४ (प्राण हे) अग्नि वगैरेंप्रत जातात असें श्रुतींत सांगितलें असल्यामुळें (ते जीवाबरोबर जात नाहींत) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (तें सांगणें) गौण आहे.

५ पहिल्या (अग्नीच्या) वेळीं (उदक) सांगितलें नसल्यामुळें (श्रुति बरोबर नाहीं) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण तेंच (सांगितलें आहे) आणि (तसें मानलें तरच वाक्य) संगत होतें.

६ (जीव हा उदकानें वेष्टित होत नाहीं) कारण श्रुतींत (तसें) सांगितलें नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण इष्टि वगैरे करणाऱ्यांची प्रतीति होते.

४ (प्राण हे) अग्नि वगैरेंप्रत जातात असें श्रुतींत सांगितलें असल्यामुळें (ते जीवाबरोबर जात नाहींत) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (तें सांगणें) गौण आहे.

५ पहिल्या (अग्नीच्या) वेळीं (उदक) सांगितलें नसल्यामुळें (श्रुति बरोबर नाहीं) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण तेंच (सांगितलें आहे) आणि (तसें मानलें तरच वाक्य) संगत होतें.

६ (जीव हा उदकानें वेष्टित होत नाहीं) कारण श्रुतींत (तसें) सांगितलें नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण इष्टि वगैरे करणाऱ्यांची प्रतीति होते.

६ 'प्राण हे अग्नि वगैरेंप्रत जातात' असें जें श्रुतीमध्यें सांगितलें आहे तें ब्रह्मविद्येच्या प्रकरणांत सांगितलें असल्यामुळें तें सांगणें मोक्षावस्थेच्या वेळचें आहे असें समजावें. जर तें सांगणें मोक्षावस्थेच्या पूर्वी बद्ध जीवासंबंधानें लागू करावें तर त्या श्रुतीचा अप्राकरणिक गोष्टीशीं संबंध होत असल्यामुळें तिला गौणत्व येईल. तात्पर्य— 'मोक्षावस्थेच्या पूर्वी जीवाबरोबर प्राणांची उत्क्रांतीच होते. ते प्राण अग्नि वगैरेंप्रत जात नाहींत' असें सिद्ध झालें.

७ प्राण म्ह० इंद्रियें हीं एका अंशानें जीवाबरोबर जातात आणि एका अंशानें अग्नि वगैरे देवतांप्रत जातात. याच अभिप्रायानें श्रुतीमध्यें 'प्राण हे अग्नि वगैरेंप्रत जातात' असें सांगितलें आहे.

चेन्न ता एव ह्युपपत्तेः । ६ अश्रुतत्वादिति चेन्नेष्टादिकारिणां प्रतीतेः ।

४ (प्राण हे) अग्नि वगैरेंप्रत जातात असें श्रुतींत सांगितलें असल्यामुळें (ते जीवाबरोबर जात नाहींत) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (तसें मानलें तर त्या श्रुतीला) गौणत्व येतें.

५ पहिल्या (अग्नीच्या) वेळीं (उदक) सांगितलें नसल्यामुळें (श्रुति बरोबर नाहीं) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण तेंच (सांगितलें आहे) आणि (तसें मानलें तरच वाक्य) संगत होतें.

६ (सर्व जीवांच्या पांच आहुती होतात) कारण श्रुतीमध्यें (विशेष) सांगितला नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (तेथें) इष्टि वगैरे करणाऱ्यांची प्रतीति होते.

४ (प्राण हे) अग्नि वगैरेंप्रत जातात असें श्रुतींत सांगितलें असल्यामुळें (ते जीवाबरोबर जात नाहींत) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण (तें सांगणें) गौण आहे. (४)

५ पहिल्या (अग्नीच्या) वेळीं (तसें) सांगितलें नसल्यामुळें (भूतें बरोबर जात नाहींत) असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण तेंच (सांगितलें आहे) आणि (तसें मानलें तरच वाक्य) संगत होतें. (५)

६ (जीवाबरोबर भूतें जात नाहींत.) कारण श्रुतींत (तसें स्पष्ट) सांगितलें नाहीं असें म्हणशील तर तसें नाहीं. कारण यज्ञ वगैरे करणाऱ्यांच्या संबंधानें (श्रुतीमध्यें तशी) प्रतीति (स्पष्ट होते) आहे. (६)

८ इष्टि वगैरे करणाऱ्यांच्याच पांच आहुती होतात सर्वांच्या होत नाहींत. कारण ‘ पहिली आहुति झाली म्हणजे तो सोमस्वरूप होतो ’ असें येथें (पांच आहुतींच्या प्रकरणांत) सांगितलें आहे. आणि इष्टि वगैरे करणारे लोकच धूममार्गानें जातांना सोमस्वरूप होतात, अशी इतर ठिकाणीं श्रुतीच आहे. तेव्हां या दोन श्रुतींच्या एकवाक्यतेवरून वरील गोष्ट सिद्ध होते.

९ ‘ यज्ञ वगैरे करणारा जो यजमान त्याला मरणकाळीं भूतें सोडीत नाहींत. त्यांना बरोबर घेऊनच तो जातो, फिरून उत्पन्न होतो, उपभोग घेतो, संचार करतो ’ असें कौटरव्य श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

७ भाक्तं वाऽनात्मवित्त्वात्तथा हि दर्शयति ।

७ किंवा (इष्टि वगैरे करणारे लोक हे देवांचें) गौण रीतीनें (अन्न होतात). कारण त्यांना आत्मज्ञान नाहीं. श्रुति असेंच सांगते. (१)

८ कर्माचा नाश झाला असतां ते अनुशयसहित (खालीं उतरतात असें) प्रत्यक्ष आणि स्मृति यांवरून (समजतें). जसे (वर) गेले तसेंच (ते खालीं येतात) पण (हुबेहूब) तसें (येत) नाहींत.

७ किंवा (इष्टि वगैरे करणारे लोक हे देवांचें) गौण रीतीनें (अन्न होतात). कारण त्यांना आत्मज्ञान नाहीं. श्रुति असेंच सांगते. (१)

८ कर्माचा नाश झाला असतां ते अनुशयसहित (खालीं उतरतात असें) प्रत्यक्ष आणि स्मृति यांवरून (समजतें). जसे (वर) गेले तसेंच (ते खालीं येतात) पण (हुबेहूब) तसें (येत) नाहींत.

१० शं० पहिली आहुति झाल्यानंतर जर जीव हे सोमस्वरूप होतील तर लागलीच देव त्यांना भक्षण करतील. कारण सोम हें देवांचें अन्न आहे, तेव्हां त्यांच्या पांच आहुती संभवत नाहींत. उ० ‘ देव सोमाचें भक्षण करितात ’ हें म्हणणें गौण आहे. कारण हे जीव अन्न नसल्यामुळें तें म्हणणें खऱ्या रीतीनें संभवत नाहीं. जर हे जीव आत्मज्ञानी असते तर मात्र त्यांच्या दृष्टीनें जगांतील सर्व प्रकारचा भेद नाहींसा होत असल्यामुळें त्यांना अन्नपणा आला असता. ‘ जो अन्य देवतेची उपासना करतो तो पशु होय ’ (बृ. १ । ४ । १०) ह्या श्रुतीमध्यें पशु हा शब्द गौण रीतीनेंच घातला आहे त्याप्रमाणेंच हें होय.

११ ‘ सोमप्राशन केलें म्हणजे अमृतत्व (म्ह. मोक्ष) प्राप्त होतो ’ असें जें (तै. सं. ३।२।५।४) श्रुतीमध्यें सांगितलें आहे तें गौण आहे. कारण ‘ज्याला आत्मज्ञान नाहीं त्याला अमृतत्व प्राप्त होत नाहीं ’ असें श्रुतीमध्यें स्पष्टच सांगितलें आहे.

१२ ह्या एका सूत्राचीं दोन सूत्रें मध्वाचार्यांच्या पाठामध्यें आहेत. तीं अशीं:– ‘ कृतात्ययेऽनुशयवान् दृष्टस्मृतिभ्याम् ’, ‘ यथेतमनेवं च ’.

१३ जीवाला पहिल्या आहुतीचे वेळीं प्राप्त झालेलें जें सोमस्वरूप त्याचा नाश झाल्यानंतर जेव्हां त्याची दुसरी आहुति होते म्हणजे ते जीव मेघामध्यें येतात, तेव्हां त्यांच्या बरोबर अनुशय असतो, म्हणूनच त्यांना पुढें ब्रह्मज्ञानाला योग्य,

८ [12] कृतात्ययेऽनुशयवान् दृष्टस्मृतिभ्यां यथेतमनेवं च ।

७ परंतु[10] (देव सोमाचें भक्षण करितात हें म्हणणें) गौण आहे. कारण आत्मज्ञान नाहीं. श्रुति असेंच दाखविते. (१)

८ प्राप्त[13] झालेल्या (सोमस्वरूपा-) चा नाश झाला असतां ते अनुशय सहित असे (पृथ्वी- मध्यें येतात). कारण (लोकांमध्यें तसें) दृष्टोत्पत्तीस येतें आणि स्मृतीही (तशीच) आहे. (शिवाय ते पूर्वी) जसे आले तसे आहेतच पण (हुबेहूब) तसे नाहींत.

७ (कर्मापासून[11] अमृतत्व प्राप्त होतें हें म्हणणें) गौण आहे. कारण (कर्म करणाऱ्यांना) आत्मज्ञान नाहीं. श्रुति असेंच सांगते. (७)

८ कर्माचा[14] नाश झाला असतां ते अनुशयसहित (खालीं उतरतात असें) श्रुति आणि स्मृति यांवरून समजतें. (८)

९ (जीव[15] हे स्वर्गामध्यें) जसें जातात तसेंच (हुबेहूब खालीं येत) नाहींत. (९)

असा उत्तम जन्म प्राप्त होतो. लोकांमध्यें एखाद्या मनुष्याचें भोगाचें साधन असें मूल द्रव्य नष्ट झाल्यामुळें जेव्हां तो मनुष्य घराच्या बाहेर पडतो तेव्हां त्याच्या जवळ वस्त्र प्रावरण वगैरे कांहीं तरी भोगाचें साधन शिल्लक राहिलेलें दृष्टोत्पत्तीस येतें त्याप्रमाणेंच हें होय. स्मृतीमध्यें म्ह. देवगाथेमध्यें असेंच सांगितलें आहे. शिवाय पहिल्या आहुतीच्या वेळीं जसे जीव उदकानें वेष्टित असतात तसे ते पुढील आहुतींच्या वेळींही असतातच. पण स्वर्गसुखाचा उपभोग झाला असल्यामुळें त्या सुखाचें साधन मात्र त्यांचे जवळ पूर्वीप्रमाणें असत नाहीं.

१४ ‘ उपभोगानें कर्माचा नाश झाला असतां आपोआपच जीव मुक्त होईल; त्याकरितां प्रयत्न करण्याची कांहीं जरूर नाहीं ’ अशी जी शंका येते तिचें ह्या सूत्रामध्यें उत्तर दिलें आहे.

१५ शं. यज्ञ वगैरे कर्म केलें असतां जीवाचें स्वर्गामध्यें सुखानें जाणेंयेणें होतें तेव्हां स्वर्गसुखाविषयीं वैराग्य उत्पन्न होत नसल्यामुळें मोक्षाकरितां कोणी प्रयत्न करणार नाहीं. उ. स्वर्गास जाण्याच्या मार्गापेक्षां तेथून उतरण्याचा मार्ग पुष्कळ अंशानें भिन्न आहे (मागें पृ. १९९ पं. १८ पहा) व तो दुःखदायक आहे. तेव्हां जीवानें स्वर्गाची इच्छा सोडून मोक्षाकरितां प्रयत्न केलाच पाहिजे. कारण जीवांचें गतागत स्वर्गांत गेल्यानें सुटत नाहीं.

९ चरणादिति चेन्नोपलक्षणार्थेति कार्ष्णाजिनिः ।

९ आचरणापासून (नूतन जन्म प्राप्त होतो) असें म्हणशील तर तसें नाहीं. (कारण आचरण शब्द) लाक्षणिक अर्थाचा आहे असें कार्ष्णाजिनि म्हणतो.

१० (आचरणाला) आनर्थक्य येईल असें म्हणशील तर नाहीं. कारण (कर्माला) त्या (आचरणा-) ची अपेक्षा आहे.

११ पण (आचरण म्हणजे) सुकृतदुष्कृतच होय असें बादरि म्हणतो. (२)

९ आचरणापासून (नूतन जन्म प्राप्त होतो) असें म्हणशील तर तसें नाहीं. (कारण आचरण शब्द) लाक्षणिक अर्थाचा आहे असें कार्ष्णाजिनि म्हणतो.

१० (आचरणाला) आनर्थक्य येईल असें म्हणशील तर नाहीं. कारण (कर्माला) त्या (आचरणा-) ची अपेक्षा आहे.

११ पण (आचरण म्हणजे) सुकृतदुष्कृतच होय असें बादरि म्हणतो. (२)

---

१६ तेव्हां त्यावरून तो पूर्वजन्माप्रमाणें ह्या जन्मींही सुकृताचरण करीलच असा नियम नाहीं. म्हणूनच सांप्रतकाळीं ब्राह्मण वगैरे उत्तम योनींत उत्पन्न होऊनसुद्धां लोक निषिद्ध कर्म करितांना आढळतात. तात्पर्य, ज्ञानप्राप्तीकरितां अनुशय पाहिजे असें समजावें.

१७ गतागत म्हणजे स्वर्ग वगैरे लोकांमध्यें जाणयेणें; ह्याचें कारण आचरण आहे, कर्म नव्हे. कारण श्रुतीमध्यें तसें सांगितलें आहे. (मागें पृ. ९७७ पं. १६ पहा). तेव्हां ‘ यज्ञ वगैरे कर्मांचें फल मोक्षच मानिलें पाहिजे ’ असा पूर्वपक्ष्याचा अभिप्राय आहे. ‘ रमणीयचरणाः कपूयचरणाः ’ या श्रुतीमध्यें चरण शब्दाचा लक्षणेनें ‘ कर्म ’

१० आनर्थक्यमिति चेन्न तदपेक्षत्वात्। ११ सुकृतदुष्कृते एवेति तु बादरिः।

९ (पूर्वजन्मींच्या) आचरणापासून- (च उत्तम योनि प्राप्त होत असल्यामुळें अनुशयाची जरूर नाहीं) असें म्हणशील तर तसें नाहीं. (कारण उत्तम योनि ही फक्त पूर्वजन्मींच्या सुकृताची) सूचक[१८] आहे असें कार्ष्णाजिनि म्हणतो.

१० (आचरणश्रुतीला) आनर्थक्य येईल असें म्हणशील तर नाहीं. कारण (धूमादिमार्गाला) त्या (आचरणश्रुती-) ची अपेक्षा आहे.

११ पण (अनुशय म्हणजे) सुकृतदुष्कृतच होय असें बादरि म्हणतो. (२)

१० आचरणापासून (गतागत प्राप्त होतें कर्मापासून होत नाहीं) असें म्हणशील तर तसें नाहीं. (कारण श्रुतीमध्यें सांगितलेलें आचरण हें कर्माचें) उपलक्षण आहे असें कार्ष्णाजिनि म्हणतो.

११ (श्रुतीमधील चरण शब्दाला) आनर्थक्य येईल असें म्हणशील तर नाहीं. कारण (रमणीयत्व वगैरेंना) त्या (चरणा-) ची अपेक्षा आहे.

१२ पण[१९] (आचरण म्हणजे) सुकृतदुष्कृतच होय असें बादरि म्हणतो. (१०)

असा अर्थ आहे असा सिद्धांत्याचा अभिप्राय आहे.

१८ शं० रमणीय व कपूय ह्या शब्दांचा लक्षणेनें कर्म असा अर्थ घेतां येईल. तेव्हां श्रुतीमधील चरण शब्द व्यर्थ येतो. उ० रमणीय व कपूय ह्या शब्दांचा जरी कर्म असा अर्थ घेतला तरी त्याला आचरणाची जरूर आहे. कारण यज्ञ करणाऱ्यांना चांगलेपणा व वाईटपणा आचरणामुळेंच येत आहे. तेव्हां ह्या आचरणाचा बोध होण्याकरितां श्रुतीमध्यें चरण शब्द घातला आहे.

१९ ‘श्रुतीमध्यें चरण शब्दाचा कर्म हा अर्थ लाक्षणिक नव्हे; तर तो वाच्यार्थच आहे’ असें बादरीचें मत आहे.

१२ अनिष्टादिकारिणामपि च श्रुतम् । १३ संयमने त्वनुभूयेतरेषामारो-

१२ इष्टि वगैरे न करणारे देखील (चंद्रमंडलाप्रत जातात असें) श्रुतींत सांगितलें आहे.

१३ परंतु दुसरे (लोक) संयमनामध्यें (यातना) भोगून (खालीं येतात असें त्यांचे) आरोहावरोह होतात. कारण (श्रुतीमध्यें) तशी गति (सांगितलेली) आढळते.

१४ स्मृतिकारांनींही (ही गोष्ट) सांगितली आहे.

१५ सात (नरक-) ही (सांगितले आहेत).

१२ इष्टि वगैरे न करणारे देखील (चंद्रमंडलाप्रत जातात असें) श्रुतींत सांगितलें आहे.

१३ परंतु संयमनामध्यें (यातना) भोगून दुसऱ्या (लोकां-)चे आरोहावरोह होतात. कारण (श्रुतीमध्यें) तशी गति (सांगितलेली) आढळते.

१४ स्मृतिकारांनींही (ही गोष्ट) सांगितली आहे.

१५ सात (नरक-) ही (सांगितले आहेत).

२० हें सूत्र सिद्धांत्याच्याच मताचें आहे. तात्पर्य, इष्टि वगैरे न करणाऱ्यांना गतागत नसल्यामुळें ते आपोआपच मुक्त होतील असें समजूं नये.

२१ पूर्वसूत्रामध्यें जें पूर्वपक्ष्याचें मत प्रतिपादन केलें आहे त्याच्या पुष्टीकरणार्थ हीं चार सूत्रें १३-१६ सूत्रकारांनीं केलीं आहेत. 'इष्टी वगैरे न करणारे लोक अगोदर यमलोकांतील यातना भोगून नंतर चंद्रमण्डलामध्यें जातात' असा पूर्वपक्ष्याचा अभिप्राय या सूत्रानें दाखविला आहे.

२२ 'साधारण पाप करणारे जे लोक आहेत ते यमयातना भोगून नंतर ह्या लोकामध्यें येतात' हा आरोह होय. आणि 'जे अत्यंत पापी लोक आहेत ते यमयातना भोगूनसुद्धां फिरून नरकांत पडतात' हा अवरोह होय. हें कौठरव्य श्रुतीमध्यें सांगितलें आहे. तात्पर्य—इष्टि वगैरे न करणाऱ्यांना नुसतें गतागत आहे इतकेंच नव्हे तर त्यांत त्यांना अत्यंत दुःख आहे असें समजावें.

हावरोहौ तद्गतिदर्शनात् । १४ स्मरन्ति च । १५ अपि च सप्त ।

१२ इष्टि वगैरे न करणारे देखील (चंद्रमंडळाप्रत जातात असें) श्रुतांत सांगितलें आहे.	१३ इष्टि[20] वगैरे न करणाऱ्यांना देखील (गतागत आहे असें) श्रुतीमध्यें सांगितलें आहे.
१३ परंतु दुसरे (लोक) संयमनामध्यें (यातना) भोगून (खालीं येतात असें त्यांचे) आरोहावरोह होतात. कारण (श्रुतीमध्यें) तशी गति (सांगितलेली) आढळते.	१४ परंतु (त्यां[23]) दुसऱ्या (लोकां-) नीं संयमनामध्यें (यातनांचा) अनुभव घेतल्यानंतर (त्यांपैकीं कांहींचा) आरोह होतो (आणि कांहींचा) अवरोह होतो. कारण (श्रुतीमध्यें) तशी गति (सांगितलेली) आढळते.
१४ स्मृ[23]तिकारांनींही (असेंच) सांगितलें आहे.	१५ स्मृ[24]तिकारांनींही (असेंच) सांगितलें आहे. (११)
१५ सात (नरक-) ही (सांगितले आहेत).	१६ सा[26]त (नरक-) ही (सांगितले आहेत). (१२)

२३ ' पूर्वीं अशुभ कर्माच्या फळाचा उपभोग घेतोस किंवा शुभ कर्माच्या फळाचा उपभोग घेतोस ' असें यमानें व्यासाला विचारिलें. तें व्यासानें सांगितलें आहे.

२४ ' जे लोक अत्यन्त पापी आहेत म्हणजे ईश्वर, गुरु वगैरेंशीं द्वेष करणारे आहेत त्यांना उर्ध्वगति कदापि प्राप्त होत नाहीं ' असें स्मृतीमध्यें सांगितलें आहे.

२५ ' अपि सप्त ' (रा. व. म.).

२६ रौरव, महारौरव, वह्नि, वैतरणी, आणि कुंभीपाक हे पांच नरक अनित्य आहेत. आणि तामिस्र व अंधतामिस्र हे दोन नरक नित्य आहेत. ह्यांपैकीं उत्तरोत्तर फारच भयंकर आहेत असें भारतामध्यें सांगितलें आहे. तात्पर्य—पापकर्म सोडून चांगलें कर्म केलें तरच जीवाला ऊर्ध्वगति मिळण्याचा संभव आहे. म्हणून मनुष्यानें पापकर्माकडे प्रवृत्त होऊं नये असें सिद्ध झालें.

१६. तत्रापि च तद्व्यापारादविरोधः ।

१६ तेथें देखील त्या (यमा-) चाच व्यापार असल्यामुळें कांहीं विरोध नाहीं.	१६ तेथें देखील त्या (यमा-) चाच व्यापार असल्यामुळें कांहीं विरोध नाहीं.
१७ परंतु विद्या आणि कर्म यां-पैकीं (कोणत्याही मार्गानें ते वर जात नाहींत. श्रुतीमध्यें विद्या आणि कर्म विवक्षित आहेत)। कारण (तेच) प्रकृत आहेत.	१७ परंतु (देवयान आणि पितृ-यान यांपैकीं कोणत्याही मार्गानें ते वर जात नाहींत. कारण त्या दोन मार्गाचें) विद्या आणि कर्म हे-(च का-रण आहेत). कारण (त्या मार्गामध्यें तेच) प्रकृत आ-हेत.

२७ 'सर्वांना प्रेरणा करणारा ईश्वर आहे' असें कौषीतक श्रुतीमध्यें सांगितलें अ-सल्यामुळें 'नरकांतील प्राण्यांना सुद्धां प्रेरणा करणारा तेथें ईश्वरच आहे' असें समजतें. तेव्हां ज्या अर्थी ईश्वराची नरकामध्यें गति आहे त्या अर्थी तेथें दुःखाचा लेशही मानतां येत नाहीं. आतां तेथें ईश्वराची गति न मानावी तर वरील श्रुतीशीं विरोध येतो अशी जी शंका येते तिचें ह्या सूत्रामध्यें उत्तर दिलें आहे.

२८ हें सिद्धांतसूत्र आहे. तात्पर्य–इष्टि वगैरे न करणाऱ्या लोकांचा देवयान व पितृयान या दोन मार्गांशिवाय तिसराच मार्ग असल्यामुळें 'ते लोक चंद्रमंडलाप्रत जात नाहींत' हें सिद्ध झालें.

२९ शं. पूर्वीच्या अधिकरणामध्यें 'पापी लोक चंद्रमंडलाप्रत न जातां यमाल-यामध्यें जातात' असें सांगितलें. परंतु 'यमालयामध्यें जाणें' हें प्रमाणसिद्ध होत नाहीं. कारण श्रुतीमध्यें 'देवयान आणि पितृयान' असे दोनच मार्ग सांगितले आहेत. व आं-

१७ विद्याकर्मणोरिति तु प्रकृतत्वात् ।

१६ तेथें देखील त्या (यमा-)चा व्यापार असल्यामुळें कांहीं विरोध नाहीं. (३)

१७ परंतु[२९] (श्रुतीमध्यें) विद्या आणि कर्म यांचा (च जो निर्देश केला आहे तो मुख्य मार्गाचे ते हेतू अशा रूपानें) प्रकृत असल्यामुळें केला आहे.

१७ तेथें देखील[२७] त्या (परमेश्वरा-) चा (च स्वतःला दुःखाचा संबंध झाल्यावांचून) व्यापार असल्यामुळें कांहीं विरोध नाहीं. (१३)

१८ (देवयान[३०] आणि पितृयान हे दोन मार्ग) विद्या आणि कर्म यांवर अवलंबून आहेत. कारण (त्या मार्गांमध्यें तेच) प्रकृत आहेत. (१४)

चेच हेतू विद्या आणि कर्म हे दोन दाखविले आहेत. उ० विद्येच्या योगानें देवयानमार्ग प्राप्त होतो. आणि नंतर मोक्षरूपी मुख्य फल प्राप्त होतें व कर्मांच्या योगानें पितृयान-मार्ग प्राप्त होतो. आणि नंतर त्याला स्वर्ग वगैरे गौणफल प्राप्त होतें. हे दोनच मार्ग मुख्य असल्यामुळें तेवढेच श्रुतीमध्यें सांगितले आहेत. तसें यममार्गानें जाणाऱ्याला कांहींच फल प्राप्त होत नाहीं म्हणून श्रुतीमध्यें तो सांगितला नाहीं. परंतु तेवढ्यावरून ‘ तिसरा मार्गच नाहीं ’ असें मात्र समजूं नये.

३० “श्रुतीमध्यें (पृ. ९९३ पं. १२ पहा) ‘देवयान व पितृयान या दोन मार्गां-पैकीं कोणत्याही मार्गानें जे लोक जात नाहींत ’ असें म्हणून पुढें त्या लोकांचा तिसरा मार्ग सांगितला आहे. त्या श्रुतीमधील ‘ जात नाहींत ’ या शब्दांवरून त्या दोन मार्गांनीं जाण्याचें किंवा न जाण्याचें स्वतंत्र रीतीनें सामर्थ्य जीवाचे अंगीं आहे असें सिद्ध होतें. आतां जर असें सामर्थ्य जीवाचे अंगीं असेल तर वैराग्याचा उपदेश करण्यांत कांहींच अर्थ नाहीं ” अशी जी शंका येते तिचें ह्या सूत्रामध्यें उत्तर दिलें आहे.

१८ न तृतीये तथोपलब्धेः। १९ स्मर्यतेऽपि च लोके।

१८ तिसऱ्या (मार्गा-) संबंधानें (हा नियम) घेऊं नये. कारण तसें उपलब्ध होतें.	१८ तिसऱ्या (मार्गा-) संबंधानें (हा नियम) घेऊं नये. कारण तसें उपलब्ध होतें.
१९ लोकामध्येंही (असें) प्रसिद्ध आहे.	१९ लोकामध्येंही (असें) प्रसिद्ध आहे.
२० आणि असें दृष्टीस पडतें.	२० आणि असें दृष्टीस पडतें.
२१ संशोकापासून उत्पन्न होणाऱ्या (कोटी-) चा तिसऱ्या शब्दांत अंतर्भाव होतो. (३)	२१ संशोकापासून उत्पन्न होणाऱ्या (कोटी-) चा तिसऱ्या शब्दांत अंतर्भाव होतो. (३)

३१ शं. ' कीट वगैरे क्षुद्र योनींमध्यें वरचेवर उत्पत्ती आणि वरचेवर मरण असा जो श्रुतीमध्यें तिसरा मार्ग सांगितला आहे, त्यापेक्षां निराळा यममार्ग आहे ' असें मानण्याचें कांहीं कारण नाहीं. उ० ह्या तिसऱ्या मार्गांतील जीवांना जरी सुखदुःखें अंशतः आहेत, तरी त्यांना स्वर्गाप्रमाणें अत्यन्त सुख नाहीं व नरकाप्रमाणें अत्यंत दुःख नाहीं असें वैलक्षण्य असल्यामुळें त्या तिसऱ्या मार्गापेक्षां यममार्ग निराळा मानला पाहिजे. सूत्रामध्यें ' अतथोपलब्धेः ' असा पदच्छेद आहे.

३२ ज्याला ज्ञान नाहीं व ज्यानें चांगलें कर्म केलें नाहीं त्याला अधोगति प्राप्त होते. ह्या अधोगतीचे तीन प्रकार आहेत. त्यांपैकीं पहिल्या दोन प्रकारांमध्यें थोडेंतरी सुख आहे. परंतु तम म्हणून जो तिसरा प्रकार आहे त्यामध्यें सुख मुळींच नाहीं, अशी श्रुति आहे. तात्पर्य–'अधोगतीमध्यें सुद्धां सुख असल्यामुळें त्यापासून विरक्त होण्याचें कांहीं कारण नाहीं ' असें कोणीं समजूं नये. याकरतांच हें सूत्र केलें आहे.

३३ अत्यंत मूर्च्छा येऊन फिरून सावध झालेला असा एखादा मनुष्य ' मी यमाकडे गेलों होतों, तेथें अमुक प्रकारचें भाषण झालें, नंतर मी परत आलों ' असें सांगतो. ह्यावरूनही यममार्ग सिद्ध होतो.

३४ ' तिर्यक् आणि नरक ह्या दोन ठिकाणीं थोडेंतरी सुख आहे. परंतु अंधतमामध्यें मुळींच सुख नाहीं ' असें भविष्यत्पर्वामध्यें सांगितलें आहे. हे पापी लोक ज्या अर्थीं परमेश्वराचे नावडते आहेत त्या अर्थीं त्यांना सुख होण्याविषयीं परमेश्वराची इच्छा नसलीच पाहिजे. लोकामध्येंही हें प्रसिद्ध आहे.

२० दर्शनाच । २१ तृतीयशब्दावरोधः[३७] संशोकजस्य ।

---

१८ तिसऱ्या[३१] (मार्गा-) मध्यें तशा प्रकारचा (सुखदुःखांचा उपभोग) उपलब्ध होत नसल्यामुळें (त्यामध्यें यममार्ग अंतर्भूत होत) नाहीं.

१९ लोकांमध्येंही[३३] (असें) प्रसिद्ध आहे.

२० आणि[३५] असें दृष्टीस पडतें. (४)

२१ (सौम्य[३८] असल्यामुळें) तिसऱ्या (आहुती-) मध्यें (वृष्टि-) शब्दानें शोकापासून उत्पन्न झालेल्या (जला-) चें ग्रहण केलें आहे.

१९ (अधोगतीच्या[३२]) तिसऱ्या प्रकारामध्यें (सुख मुळींच) नाहीं. कारण (श्रुतीमध्यें) तसें उपलब्ध होतें.

२० स्मृतीमध्यें[३४] (असेंच) सांगितलें आहे. शिवाय लोकांमध्येंही (असें प्रसिद्ध आहे).

२१ आणि[३६] असें दृष्टीस पडतें.

२२ तिसऱ्याचा[३९] (तर) शब्द ऐकिल्याबरोबर शोक उत्पन्न होऊन त्यापासून (मूर्च्छा) प्राप्त होते.

---

३५ अजामिळ वगैरेंना यमपुरुष दृष्टीस पडले आहेत. त्यावरूनही यममार्ग सिद्ध होतो.

३६ ‘ ज्यांना बिलकूल सुख नाहीं आणि जे अत्यंत दुःखानें व्यापले आहेत असे अंधतामिस्रांतील लोक ब्रह्मदेवानें पाहिले ’ असें पाद्मामध्यें सांगितलेलें दृष्टीस पडतें.

३७ ‘ तृतीये शब्दावरोधः संशोकजस्य ’ असा मध्वाचार्यांचा पाठ आहे. आणि ह्या सूत्राच्या पुढें ‘ स्मरणाच ’ असें २३ वें सूत्र त्यांच्या पाठामध्यें आहे.

३८ शं. पृथ्वीमध्यें वृष्टिरूपानें जीवाची तिसरी आहुती झाली म्हणजे त्याचें अन्न होतें असें तिसऱ्या आहुतीचें फल छांदोग्यामध्यें सांगितलें आहे (छां० ५।६।२). परंतु तें बरोबर नाहीं. कारण वृष्टि हें फक्त अन्नाचें निमित्त कारण आहे. त्याची उत्पत्ती बीजापासूनच होत असते. उ० छांदोग्यामध्येंच दुसरीकडे (६ । २) तेजापासून जलाची उत्पत्ती होते. शोक झाला असतां नेत्रांतून अश्रू येतात त्या जलाची उत्पत्ती शोकामुळें प्रदीप्त झालेल्या अग्नीपासूनच होतें असें सांगून पुढ वृष्टीपासूनच अन्नाची उत्पत्ती वर्णिली आहे. ह्या ठिकाणीं ज्याप्रमाणें वृष्टिशब्दानें कारणभूत जलाचें ग्रहण केलें आहे त्याप्रमाणें प्रकृत स्थळीं म्ह० पंचाग्निविद्येच्या प्रकरणामध्यें अन्नाचें कारण असेंच जल घेतलें आहे. तात्पर्य ‘ पांच आहुतींमधील अन्नाच्या उत्पत्तीला बीजाची जरूर नाहीं ’ असें समजावें.

३९ महातमाचे प्रकार तीन आहेत:-उर्ध्व, मध्य आणि अधर. ह्यांपैकीं अधर तर इतका भयंकर आहे कीं त्याचें नांव ऐकिलें कीं लागलीच मूर्च्छा येते असें कूर्मपुराणामध्यें सांगितलें आहे.

२२ सा[40]भाव्यापत्तिरुपपत्तेः ।

२२ साम्यप्राप्ति आहे. कारण (तें साम्यच) संभवतें. (४)	२२ त्यांचें[42] साम्य प्राप्त होतें. कारण (तें साम्यच) संभवतें. (४)
२३ (जीव हे आकाश वगैरेंशीं सारखेपणानें) फार वेळ राहत नाहींत. कारण (श्रुतीमध्यें) विशेष (सांगितला) आहे. (५)	२३ (जीव हे आकाश वगैरेंशीं सारखेपणानें) फार वेळ राहत नाहींत. कारण (श्रुतीमध्यें) विशेष (सांगितला) आहे. (५)

४० मागील ३७ आणि ३९ टीप पहा.

४१ ' तत्स्वाभाव्या ' (रा. म.)

४२ जीवाला आकाश वगैरेंचें शरीररूपानें धारण करणें संभवत नाहीं. कारण त्या अवस्थेमध्यें जीवाला कोणत्याही प्रकारचा उपभोग घ्यावयाचा नाहीं.

४३ शं. जीवाचे विकार होतां होतां मध्यें तिसऱ्या आहुतीच्या वेळीं त्या जीवाला वृष्टि हें रूप प्राप्त झालें. तेव्हां असली ही विकृत वृष्टि खऱ्या वृष्टीप्रमाणें अन्नाचें कारण कशी होते? उ. जीवाला खऱ्या रीतीनें कांहींच विकार होत नाहीं. फक्त तो जीव वायु वगैरेंसारखा भासतो. कारण एका वस्तूला दुसऱ्या वस्तूचें स्वरूप प्राप्त होतें असें जरी सांगितलें तरी तें खऱ्या रीतीनें संभवत नसल्यामुळें ती वस्तु त्या दुसऱ्या वस्तूसारखी भासते असाच त्याचा अर्थ मानावा लागतो. जेव्हां तो जीव मध्यें तेजासारखा चकचकीत भासून एकदम जलासारखा होतो त्या वेळीं त्याची कांती एकदम नष्ट झाल्यामुळें त्याचा नाश झाल्यासारखा वाटतो. तात्पर्य-वृष्टीसारखा भासलेला जीव पुढें अन्नासारखा भासूं लागतो असा त्यामध्यें कार्यकारणभाव जुळतो. ' सा आभाव्यापत्तिः ' अशीं पदें मूळ संस्कृत सूत्रामध्यें आहेत.

४४ शं. श्रुतीमध्यें (पृ. ९९९ पं. १८ पहा) ' कर्म करणाऱ्या जीवांना धूम वगैरेंचें स्वरूप प्राप्त होतें' असें सांगितलें आहे. तेव्हां कर्मापासून एवढी उत्कृष्ट स्थिति (म्ह.

२३ नातिचिरेण विशेषात् ।

२२ ती[43] (वायु वगैरेंच्या स्वरूपाची प्राप्ति) भासमात्र आहे. कारण (तसेंच) संभवतें.

२३ तो[45] (वायु वगैरेंच्या स्वरूपाचा) भास फार वेळ राहत नाहीं. कारण (श्रुतीमध्यें) विशेष (सांगितला) आहे. (५)

२३ आणि स्मृतीमध्यें असेंच सांगितलें आहे. (१५)

२४ (जीवांला[44]) त्या (धूम वगैरें॰) चें साम्य प्राप्त होतें. कारण (तें साम्यच) संभवतें. (१६)

२५ (जीव[46] हे) फार वेळानें (गर्भवास करितात असें) नाहीं. कारण विशेष (सांगितला) आहे. (१७)

प्रलयापर्यंत राहणाऱ्या अशा धूम वगैरे देवतांच्या स्वरूपाची प्राप्ती) जर प्राप्त होत आहे, तर कर्मांपासून विरक्त होण्याचें कारण नाहीं. उ. 'एका वस्तूला दुसऱ्या वस्तूचें स्वरूप प्राप्त होतें' हें म्हणणें मुळींच संभवत नाहीं. तेव्हां 'धूम वगैरेंचें स्वरूप प्राप्त होतें' याचा अर्थ 'त्यांच्याशीं साम्य प्राप्त होतें' असाच मानला पाहिजे. म्ह. धूम वगैरेंच्या सारखाच जीवाचा स्वभाव होतो. धूम वगैरे जाऊं लागले म्हणजे हे जाऊं लागतात. ते उभे राहिले म्हणजे हे उभे राहतात. तात्पर्य-कर्मांपासून उत्कृष्ट स्थिति प्राप्त होत नसल्यामुळें त्यापासून विरक्त झालेंच पाहिजे.

४५ जीवांना खऱ्या रीतीनें आकाश वगैरेंचें स्वरूप प्राप्त झालें असतें तर तें तसें फार वेळ राहिलें असतें. तात्पर्य-जीवांना आकाश वगैरेंचें स्वरूप खऱ्या रीतीनें प्राप्त होत नाहीं. टीप ४३ मध्यें जी शंका दिली आहे तिचें हें दुसरें उत्तर ह्या सूत्रामध्यें सूत्रकारांनीं सांगितलें आहे.

४६ पूर्वसूत्रामध्यें सांगितलेलें जें धूम वगैरेंशीं साम्य तें देखील फार वेळ राहत नाहीं. कारण, चांगल्या आचरणाचे लोक चांगल्या योनीप्रत प्राप्त होतात व वाईट आचरणाचे लोक वाईट योनीप्रत प्राप्त होतात हा जो श्रुतीमध्यें विशेष सांगितला आहे त्यावरून आचरण करणें व योनीप्रत प्राप्त होणें यांमध्यें फारसा वेळ लागत नाहीं असें सहजच समजतें. 'स्वर्गांतून निघाला कीं तो एका वर्षाच्या आंतच आईच्या उदरांत येतो' असें नारदीयामध्यें सांगितलें आहे.

२४ अन्याधिष्ठितेषु[47] पूर्ववदभिलापात्। २५ अशुद्धमिति चेन्न शब्दात्।

२४ (जीव हे) पूर्वीप्रमाणेंच अन्य (जीवांनीं) अधिष्ठित झालेल्या (व्रीहि वगैरेंशीं केवळ संयुक्त होतात). कारण (श्रुतींत असेंच) सांगितलें आहे.

२५ (यज्ञकर्म) अशुद्ध आहे असें म्हणशील तर नाहीं. कारण श्रुति आहे.

२६ नंतर रेतसेचकाशीं (त्या जीवाचा) संयोग होतो.

२७ योनीपासून शरीर उत्पन्न होतें. (६)

२४ (जीव हे) अन्य (जीवांनीं) अधिष्ठित झालेल्या (व्रीहि वगैरेंशीं केवळ संयुक्त होतात). कारण (श्रुतींत) पूर्वीप्रमाणेंच सांगितलें आहे.

२५ (यज्ञकर्म) अशुद्ध आहे असें म्हणशील तर नाहीं. कारण श्रुति आहे.

२६ नंतर रेतसेचकाशीं (त्या जीवाचा) संयोग होतो.

२७ योनीपासून शरीर उत्पन्न होतें. (६)

४७ 'ते पू'.

४८ शं. व्रीहि वगैरे जे अन्न तत्स्वरूपी जीवाला रेतस्वरूप प्राप्त होत नाहीं. कारण अन्नाचें भक्षण केलें म्हणजे त्या अन्नस्वरूपी जीवाचा नाश होतो. उ. पांच आहुतींच्या मार्गानें जाणारे जीव हे जसें वायु वगैरेंसारखे भासतात तसें व्रीहि वगैरेंसारखे न भासतां अन्य जीवांनीं अधिष्ठित झालेल्या व्रीहि वगैरेंशीं केवळ संयुक्त होतात. कारण जगामध्यें अस्तित्वांत आलेल्या व्रीहि वगैरेंशीं यांचा फक्त संबंध श्रुतीमध्यें सांगितला आहे. तात्पर्य, अन्नाचा भक्षणानें नाश झाला तरी त्याच्या बरोबर सूक्ष्म रूपानें असणाऱ्या जीवाचा नाश होत नसल्यामुळें त्याला रेतस्वरूप प्राप्त होतें असें म्हणतां येतें. मूळ संस्कृत सूत्रांत 'अपूर्ववत्' असा पदच्छेद आहे.

४९ शं. 'यज्ञ वगैरे कर्म करणारा मनुष्य जेव्हां स्वर्गांतून परत येतो तेव्हां त्याला व्रीहि वगैरेंचें स्वरूप प्राप्त होतें' असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे. तेव्हां कर्मापासून अत्यंत दुःखकारक अशी व्रीहि वगैरे स्थावर योनि प्राप्त होत असल्यामुळें 'कर्म करावें' असें श्रुतीनें सांगितलें असतांही त्या श्रुतीवर अविश्वास उत्पन्न होऊन कर्माविषयीं कोणी प्रवृत्त होणार नाहीं. आणि एकदां श्रुतीवर अविश्वास उत्पन्न झाला म्हणजे 'विरक्त व्हावें' असें सांगणाऱ्या श्रुतीवरही अविश्वास उत्पन्न होऊन मोक्षाविषयीं कोणाची प्रवृत्ती होणार नाहीं अशी जी शंका येते तिचें हें उत्तर दिलें आहे.

५० कौषीतक श्रुतींत.

२६ रेतःसिग्योगोऽथ । २७ योनेः शरीरम् ।। तृतीयेध्याये प्रथमः पादः।।

२४ (जीवें[50] हे) पूर्वीप्रमाणें न होतां अन्य (जीवांनीं) अधिष्ठित झालेल्या (व्रीहि वगैरेंशीं केवळ संयुक्त होतात). कारण (श्रुतींत असेंच) सांगितलें आहे.

२५ (अन्न[51]) अशुद्ध आहे असें म्हणशील तर नाहीं. कारण श्रुति आहे. (६)

२६ नंतर[53] रेतसेचकाशीं (त्या जीवाचा) संयोग होतो. (७)

२७ योनीपासून[54] उत्पन्न झालेलें शरीर (गर्भ शब्दानें घेतलें आहे). (८)

२६ (जीवें[51] हे) पूर्वीप्रमाणेंच अन्य (जीवांनीं) अधिष्ठित झालेल्या (व्रीहि वगैरेंशीं केवळ संयुक्त होतात). कारण (श्रुतींत असेंच) सांगितलें आहे.

२७ (यज्ञकर्म) अशुद्ध आहे असें म्हणशील तर नाहीं. कारण श्रुति आहे. (१८)

२८ नंतर[53] रेतसेचकाशीं (त्या जीवाचा) संयोग होतो. (१९)

२९ योनीपासून[55] शरीर उत्पन्न होतें. (२०)

५१ शं. जर व्रीहि वगैरे हे अन्य जीवांनीं अधिष्ठित आहेत तर व्रीहि वगैरे स्थावर योनीप्रत प्राप्त होणारे जीव अत्यंत पापिष्ठ असल्यामुळें त्यांच्या संबंधानें तें व्रीहि वगैरे अन्न अशुद्ध होईल. आणि पांच आहुतींच्या मार्गानें जाणाऱ्या जीवाचा त्या अशुद्ध अन्नाशीं संबंध झाल्यामुळें त्याला योग्य शरीर प्राप्त होणार नाहीं. उ. अन्न हें संस्कारानें शुद्ध होतें. ह्या ठिकाणीं ‘ त्या अन्नस्वरूपी जीवाचा पुरुषाच्या उदरामध्यें देव होम करतात ’ असें हवन सांगितलें असल्यामुळें त्या संस्कारामुळें तें अन्न शुद्ध होतें.

५२ ह्या अधिकरणामध्यें पांचव्या आहुतीचा विचार केला आहे.

५३ तेव्हां जीव हा एकदमच कांहीं आईच्या उदरामध्यें जात नाहीं; तर अगोदर बापाच्या उदरामध्यें जाऊन नंतर आईच्या उदरामध्यें जातो. तात्पर्य--कर्म करणाऱ्या लोकांना पुनर्जन्म घेतांना असें अनेक प्रकारचे क्लेश होत असल्यामुळें जीवानें कर्मापासून विरक्त व्हावें असा ह्या सूत्राचा अभिप्राय आहे.

५४ तेव्हां पांचव्या आहुतीचें जें गर्भरूपी फल सांगितलें आहे तें शरीररूपी फल समजावें. त्या शरीर वगैरे साधनांच्या योगानें गुरूकडे जाऊन मोक्षमार्गाचें संपादन करितां येतें असें या सूत्राचें तात्पर्य आहे.

५५ तेव्हां अतिदुःखद असा आईच्या उदरांतील गर्भवास झाल्याशिवाय एकदम शरीर प्राप्त होत नाहीं. तात्पर्य, कर्म करणाऱ्यांना गर्भवासाचे विलक्षण क्लेश होत असल्यामुळें जीवानें कर्मापासून विरक्त व्हावें असा या सूत्राचा अभिप्राय आहे.

१ संध्ये सृष्टिराह हि । २ निर्मातारं चैके पुत्रादयश्च ।

अध्याय ३ पाद २

१ सांध्यामध्यें (खरीच) सृष्टि (उत्पन्न होते). कारण (श्रुति तसें) सांगते.	१ सांध्यामधील सृष्टि (जीवानें केलेली आहे). कारण (श्रुति तसें) सांगते.
२ आणि एका (शाखेचे लोक आत्म्याला कामांचा) निर्माता (असें म्हणतात). आणि (काम म्हणजे) पुत्र वगैरे (होत).	२ आणि एका (शाखेचे लोक आत्म्याला कामांचा) निर्माता (असें म्हणतात). आणि (काम म्हणजे) पुत्र वगैरे (होत).
३ परंतु (स्वप्न म्हणजे) केवळ माया होय. कारण पूर्णपणानें (स्वप्नाचें) स्वरूप व्यक्त होत नाहीं.	३ परंतु (स्वप्नांतील सृष्टि म्हणजे) केवळ आश्चर्यच आहे (म्हणून ती जीवानें केलेली नाहीं). कारण (जीवावस्थेमध्यें त्याचें) स्वरूप पूर्णपणानें व्यक्त होत नाहीं.

१ ‘ तो खरोखर कर्ता आहे ’ (बृ. ४ । ३ । १०) या श्रुतीमधील ‘ तो ’ हा शब्द स्वप्नद्रष्ट्याचा परामर्श करणारा असल्यामुळें त्या श्रुतीवरून स्वप्नांतील सृष्टि जीवानें केली आहे असें समजतें.

२ तेव्हां त्या त्या सृष्टिसंबंधानें जीवाला मोक्ष प्राप्त होण्याला प्रतिबंध होईल असा पूर्वपक्ष्याचा अभिप्राय आहे.

३ ह्या पादामध्यें परमात्म्याचे ठिकाणीं भक्ति उत्पन्न होण्याकरितां ‘ परमात्मा स्वप्नांतील सृष्टि उत्पन्न करितो ’ इत्यादि गोष्टी सांगून त्याच्या माहात्म्याचें वर्णन केलें आहे. हें सिद्धांत्याचेंच सूत्र आहे.

४ ज्या अर्थी काम म्हणजे पुत्र वगैरे आहेत त्या अर्थी त्या पुत्र वगैरेंची इच्छा करणारा असा जो जीवात्मा तोच श्रुतीमधील (पृ. १०१२ पं. ११) पुरुष शब्दानें घेतला पाहिजे.

५ परमात्म्याला. श्रुतीमध्यें (पृ. १०१२ पं. ११) पुरुष शब्दाचा परमात्मा असाच अर्थ आहे. कारण त्या श्रुतीमध्यें ‘ जागा राहतो ’ असें म्हटलें आहे. आणि जीवात्मा

३ मायामात्रं तु कार्त्स्न्येनानभिव्यक्तस्वरूपत्वात् ।

अध्याय ३ पाद २

१ स्वप्नामध्यें (खरी) सृष्टि आहे. कारण (श्रुति तसें) सांगते.	१ स्वप्नांतील सृष्टि (परमात्म्यानें केलेली आहे). कारण (श्रुति तसें) सांगते.
२ आणि एका (शाखेचे लोक आत्म्याला कामांचा) निर्माता (असें म्हणतात). आणि (काम म्हणजे) पुत्र वगैरे (होत).	२ आणि एका (शाखेचे लोक परमात्म्याला स्वप्नाचा) निर्माता (असें म्हणतात). तसेंच (स्वप्नांतील) पुत्र वगैरे हे (परमात्म्यापासून उत्पन्न होतात असें) एका (शाखेचे लोक म्हणतात).
३ परंतु (स्वप्न म्हणजे) केवळ माया होय. कारण पूर्णपणानें (स्वप्नाचें) स्वरूप व्यक्त होत नाहीं.	३ परंतु (स्वप्न म्हणजे) केवळ माया होय. कारण (स्वाप्निक पदार्थांचें) स्वरूप पूर्णपणानें व्यक्त होत नाहीं.

तर स्वप्नावस्थेमध्यें कधींही जागा असत नाहीं.

६ 'स्वप्नांतील पुत्र, भाऊ, बायको वगैरे हे सर्व परमात्म्यापासून उत्पन्न होतात' असें गौरवन श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

७ ' त्वात् । ४ पराभिध्याना ' (रा.)

८ म्हणून त्या जीवाचे हातून अशी आश्चर्यकारक सृष्टी उत्पन्न होणें शक्य नाहीं. श्रुतीमधील पुरुष हा शब्द उपक्रमउपसंहारांवरून ' परमात्मा ' याच अर्थाचा आहे असें सिद्ध होतें. तसेंच ' तो ' हा शब्द देखील परमात्म्याचाच परामर्श करतो. कारण तसें मानलें म्हणजे दोन्ही श्रुतींची एकवाक्यता होते.

९ ' मृत्तिका वगैरे समवायिकारण नसल्यामुळें स्वप्नांतील घट, पट वगैरे पदार्थांची मुळीं उत्पत्तीच होत नाहीं ' अशी जी शंका येते तिचें हें उत्तर आहे. पदार्थांच्या अनुभवानें ज्या अंतःकरणावर वासना उत्पन्न होतात त्याच समवायिकारण घेऊन परमात्मा हा आपल्या इच्छेनें स्वप्नांतील पदार्थ उत्पन्न करतो असें समजावें.

४ सूचकश्च हि श्रुतेराचक्षते च तद्विदः ।

४ (स्वप्न केवळ खोटें नाहीं). कारण तें सूचक आहे (असें) श्रुतीवरून (समजतें). तद्वेत्तेही (तसेंच) सांगतात.

५ परंतु पर (अशा आत्म्या-) च्या ध्यानानें गुप्त (असलेले त्याच्या सारखे धर्म प्रकट होतात). कारण त्या (आत्म्या-) पासून ह्या (जीवा-) चे बंधमोक्ष आहेत.

४ परंतु[१२] पर (अशा आत्म्या-) च्या संकल्पानें (जीवाचें मूळचें स्वरूप) गुप्त झालें आहे. कारण त्या (परमात्म्याच्या संकल्पा-) नें (च) ह्या (जीवा-) ला बंधमोक्ष प्राप्त होत आहेत.

१० 'जर स्वप्नांतील सृष्टि खोटी आहे तर ती सृष्टि परमात्मा कां उत्पन्न करितो' अशी जी शंका येते तिचें हें उत्तर आहे.

११ तात्पर्य स्वप्नांतील पदार्थ जरी मायिक आहेत तरी त्यांना अस्तित्व आहे. कारण जी वस्तु अस्तित्वांत नाहीं ती इतराची सूचकही होत नाहीं.

१२ 'सत्यसंकल्प असणें व सर्वपापरहित असणें असें जीवाचें जें मूळचें स्वरूप तें जीवावस्थेमध्यें व्यक्त कां होत नाहीं' अशी जी शंका येते तिचें हें उत्तर आहे.

१३ शं. 'ईश्वर हा जीवांना शुभाशुभ सुचविण्याकरितां स्वप्न दाखवितो' असें पूर्वसूत्रामध्यें सिद्ध केलें. परंतु जीव हा जर परमात्म्याचा अंश आहे तर त्याला दुःखदायक अशी अशुभ स्थिति कां प्राप्त होते? उ. परमात्म्याच्या इच्छेनें जीवाचें ऐश्वर्य आच्छादित झालें आहे. त्यामुळें जीवाला दैन्य प्राप्त होतें. तसेंच वीर्य आच्छादित झाल्यामुळें सर्व दुःखें सोसावीं लागतात. यश आच्छादित झाल्यामुळें हीनपणा येतो. आणि श्री आच्छादित झाल्यामुळें जन्म, मृत्यु वगैरे आपत्ती येतात. ह्या दैन्य वगैरे चार गोष्टींना 'बंध'

५ पराभिध्यानात्तु तिरोहितं ततो ह्यस्य बन्धविपर्ययौ ।

४ (स्वप्न हें शुभाशुभाचें) सूचक आहे (असें) श्रुतीवरून (समजतें). तद्वेत्तेही (तसेंच) सांगतात.

५ परंतु[3] ह्या (जीवा-) चें (ऐश्वर्य वगैरे) परमात्म्याच्या संकल्पानें आच्छादित झालें आहे. त्यामुळेंच बंध आणि विपर्यय हे होतात.

४ (स्वप्न हें शुभाशुभाचें) सूचक आहे (असें) श्रुतीवरून (समजतें). तद्वेत्तेही (तसेंच) सांगतात. (१)

५ (स्वप्नांतील पदार्थ) परमात्म्याच्या संकल्पानें आच्छादित होतात. कारण ह्या (जीवा-) ला त्या (परमात्म्या-) पासूनच बंधमोक्ष प्राप्त होतात. (२)

असें म्हणतात. तसेंच ज्ञान आच्छादित झाल्यामुळें देह वगैरे भलत्या वस्तूंचे ठिकाणीं मीपणा उत्पन्न होतो. आणि वैराग्य आच्छादित झाल्यामुळें विषयांचे ठिकाणीं आसक्ति उत्पन्न होते. ह्या दोन गोष्टींना ' विपर्यय ' म्हणतात. विपर्यय म्हणजे उलटापालट होय.

१४ ज्याप्रमाणें जीवांना ज्ञान व अज्ञान ह्यामुळें प्राप्त होणारे बंध व मोक्ष परमात्माच देतो त्याप्रमाणें तोच जीवांना स्वाप्निक पदार्थ दाखवितो, आणि फिरून नाहींसे करतो. ज्या अर्थीं जीवाला बंधमोक्ष परमात्म्याच्या इच्छेनें प्राप्त होतात त्या अर्थीं स्वाप्निक पदार्थांचें ज्ञान करून देणारा आणि त्या ज्ञानाला आच्छादित करणारा तो परमात्माच आहे असें कौर्मीमध्यें सांगितलें आहे. कारण बंध व मोक्ष देणाऱ्याच्या अंगीं आपलें किंवा अन्य वस्तूंचें दुसऱ्याला ज्ञान करून देण्याची आणि तें ज्ञान आच्छादित करण्याची शक्ति असलीच पाहिजे. तात्पर्य, ' जागृतीमधील ज्ञान झाल्यानें स्वाप्निक पदार्थ आच्छादित होतात ' असें समजूं नये.

६ देहयोगाद्वा सोऽपि[15] । ७ तदभावो नाडीषु तच्छ्रुतेरात्मनि च[20] ।

६ तो (लोप) देखील देहाच्या संबंधामुळेंच होतो. (१)	५ किंवा तो (लोप[16]) देखील देहाच्या संबंधामुळें होतो.
	६ शिवाय (स्वप्न हें शुभाशुभाचें) सुचक आहे (असें) श्रुतीवरून (समजतें). तद्वेत्तेही (तसेंच) सांगतात[19]. (१)
७ नाडीमध्यें आणि आत्म्यामध्यें त्याचा अभाव होतो. कारण तसें श्रुतींत सांगितलें आहे.	७ नाडीमध्यें आणि आत्म्यामध्यें त्याचा अभाव होतो. कारण तसें श्रुतींत सांगितलें आहे.
८ म्हणूनच या (आत्म्या-) पासून (जीवाची) जागृति (श्रुतीमध्यें सांगितली आहे). (१)	८ म्हणूनच या (आत्म्या-) पासून (जीवाची) जागृति (श्रुतीमध्यें सांगितली आहे). (१)

१५ 'सोऽपि । ६ सूचकश्च हि श्रुतेराचक्षते च तद्विदः । ७ तद' (रा.)

१६ लोप म्हणजे जीवाचें मूळचें स्वरूप गुप्त होणें.

१७ ह्या मतीं देह सुटल्याशिवाय जीवाला मूळचें ऐश्वर्य प्राप्त होत नाहीं. आणि पूर्वसूत्रांत सांगितलेल्या मताप्रमाणें जीवाला देह असतांनाही ईश्वराच्या इच्छेनें मूळचें ऐश्वर्य प्राप्त होतें हेंच सूत्रकाराचें मत आहे.

१८ 'तो परमात्माच जीवांना जाग्रदवस्थेमध्यें ठेवतो' या कौठरव्य श्रुतीवरून ही गोष्ट सिद्ध होते.

१९ 'ज्या अर्थी स्वप्नांतील सृष्टी अशुभसूचक देखील असते त्या अर्थी ती जीवानें केलेली नाहीं' असेंच मानलें पाहिजे. कारण जर त्या सृष्टीचा कर्ता जीवच असता तर त्यानें आपल्याला अशुभ सुचविणारी सृष्टी कधींही उत्पन्न केली नसती.

२० 'नि द ।' (म.)

२१ 'निद्रावस्थेमध्यें कामना नाहीं' असें श्रुतीमध्यें (बृ ४।३।२१) सांगितलें असल्यामुळें 'या अवस्थेंत प्रपंच नाहीं' असें सिद्ध होतें. कारण प्रपंच हा कामनामू-

८ अतः प्रबोधोऽस्मात् ।

६ किंवा तो (आच्छादितपणा) वगैरे देहाच्या संबंधानें[२०] होतो. (१)	६ देहाच्या संबंधानें (प्राप्त होणारी अशी) ती (जाग्रदवस्था) देखील (त्या परमात्म्याच्या संकल्पानेंच प्राप्त होते). (२)
७ नाडीमध्यें[२१] आणि आत्म्यामध्यें त्या (स्वप्ना-) चा अभाव होतो. कारण श्रुतीमध्यें तो (प्रपंचाचा अभाव) सांगितला आहे. (२)	७ नाडीमधील आत्म्यामध्यें त्या (स्वप्न आणि जागृति यां-) चा अभाव होतो. कारण श्रुतींत[२२] तसें सांगितलें आहे. (४)
८ (जीवांची[२३]) जागृति ही ह्या (नाडी) पासून- (च होते. आणि) ह्या (आत्म्या-) पासून- (च होते).	८ म्हणूनच[२४] (जीव जो निद्रावस्थेंतून) जागृत होतो तो ह्या (आत्म्या-) पासूनच होतो. (५)

लक आहे. तेव्हां अर्थातच निद्रावस्थेमध्यें स्वाप्निक प्रपंचाचाही अभाव सिद्ध होतो. आतां तो अभाव एक नाडीमध्यें तरी होतो किंवा आत्म्यामध्यें तरी होतो अशा त्या निद्रावस्थेच्या दोन तऱ्हा आहेत. निद्रेच्या योगानें जीवाच्या बहिर्दृष्टीचें आच्छादन झालें म्हणजे तो हृदयामध्यें राहून स्वप्न पाहूं लागतो. व तेथेंही त्याच्या दृष्टीचें आच्छादन झालें म्हणजे तो जीव ह्या हृदयांतून अंतर्यामी अशा परमात्म्यामध्यें प्रवेश करतो. किंवा त्या हृदयांतून नाडीमध्यें जातो. हीच दोन तऱ्हेची गाढ निद्रा होय.

२२ मागें (पृ. १०२५ पं. ८ आणि पृ. १०२६ पं. २) दिलेल्या दोन श्रुतींच्या एकवाक्यतेनें ' नाडीमधील आत्म्यामध्यें स्वप्न आणि जागृति यांचा अभाव होतो हें सिद्ध होतें.

२३ जेव्हां जीव हा निद्रावस्थेमध्यें नाडींत असतो तेव्हां तेथूनच जागा होतो आणि जेव्हां परमात्म्यामध्यें असतो तेव्हां तेथूनच जागा होतो.

२४ ज्या अर्थीं जीवाला निद्रावस्था आत्म्यामध्येंच प्राप्त होते त्या अर्थीं फिरून जाग्रदवस्थाही त्यापासूनच प्राप्त झाली पाहिजे.

९ स एव[25] तु कर्मानुस्मृतिशब्दविधिभ्यः ।

९ परंतु तोच (जीव जागृत होतो असें) कर्म, अनुस्मरण, शब्द आणि विधि यांवरून (समजतें). (३)	९ परंतु तोच (जीव जागृत होतो असें)[26] कर्म, अनुस्मरण, शब्द, आणि विधि यांवरून (समजतें). (३)
१० बेशुद्ध (मनुष्या-) चें (सुषुप्तीशीं) अर्धें ऐक्य असतें (असें) परिशेषावरून (समजतें). (४)	१० बेशुद्ध (मनुष्या-) चें (मरणावस्थेशीं) अर्धें ऐक्य असतें (असें) परिशेषावरून (समजतें). (४)

२५ ' व च क ' (म.)

२६ निद्रावस्था प्राप्त होण्यापूर्वी जें जीवानें कर्म केलें असेल त्याच्या फलाचा त्यानेंच उपभोग घेतला पाहिजे. यावरून तोच जीव जागृत होतो असें समजतें.

२७ 'नाडींतून जागा होतेवेळीं तोच जीव जागा होईल. परंतु जेव्हां तो परमात्म्यांतून जागा होतो तेव्हां त्याला परमात्मस्वरूप प्राप्त झालें असल्यामुळें तोच जागा होतो असें नियमानें म्हणतां येत नाहीं ' अशी जी शंका येते तिचें हें उत्तर दिलें आहे.

२८ शब्द म्हणजे श्रुति. जर तोच जीव जागा झाला नाहीं तर साधारण पापी मनुष्याला देखील अशी उत्तम स्थिति (म्ह. मोक्ष) सहज प्राप्त होत असल्यामुळें ' पुण्यकर्मानें पुण्यवान् होतो आणि पापकर्मानें पापी होतो ' (बृ. ३।२।१३) ही श्रुति जुळणार नाहीं. तसेंच यज्ञामध्यें दुसरे दिवशीं ब्रह्म्याला वरावें इत्यादि जे विधी सांगितले आहेत ते देखील तोच जीव जागृत न झाला तर जुळणार नाहींत. यावरून ' तोच जीव जागृत होतो ' असें सिद्ध होतें.

२९ ' हाच साधुकर्म करवितो ' ह्या श्रुतीमध्यें ' सर्व कर्मे परमात्म्याच्याच अधीन

१० मुग्धेऽर्धसंपत्तिः परिशेषात् ।

९ परंतु[२७] तोच (जीव जागृत होतो असें) कर्म, अनुस्मरण, शब्द[२८] आणि विधि यांवरून (समजतें).	९ परंतु[२९] तो (परमात्मा-) च (सर्व जीवांना सर्व अवस्था देतो असें) कर्म, अनुस्मृति, शब्द, आणि विधि यांवरून (समजतें). (६)
१० बेशुद्ध[३०] (मनुष्या-) संबंधानें अर्धांतच अर्धवट स्थिति आहे. (३)	१० बेशुद्ध[३१] (मनुष्या-) चा (परमात्म्यामध्यें) अर्धा प्रवेश होतो (असें) परिशेषावरून (समजतें). (७)

आहेत ' असा निश्चय केला आहे. तसेंच त्याला अनुसरून स्मृति आहे:—सर्वांना स्वप्न वगैरे दाखविणारा असा एक परम पुरुष विष्णूच आहे, त्याशिवाय दुसरा कोणीच नाहीं. श्रुतीही अशी आहे:—हाच स्वप्न दाखवितो, हाच जागा करितो, हाच परमानंद रूप आहे. 'आत्म्याचीच उपासना करावी' असा विधी आहे तेव्हां अर्थांतच परमात्म्याशिवाय दुसरा कोणी जीवांना प्रेरक नाहीं असें सिद्ध होतें.

३० मूर्च्छा येऊन सावध झालेला जीव जर पूर्वीचें कर्म करील किंवा त्याला पूर्वीचें स्मरण होईल तर तोच जीव असा निश्चय होईल. परंतु ज्या ठिकाणीं या दोन्ही गोष्टी न होतां तो वेड्यासारखाच असेल त्या ठिकाणीं तोच असा निश्चय होत नाहीं.

३१ परमात्मा हा हृदयामध्यें असतो. जाग्रदवस्थेमध्यें जीव हा त्या परमात्म्यापासून फार दूर म्ह. इंद्रियांमध्यें असतो. स्वप्नावस्थेमध्यें त्यापेक्षां जवळ म्ह. कंठामध्यें असतो. मूर्च्छावस्थेमध्यें विषयांचें ज्ञान होत नसल्यामुळें ह्या दोन्ही तऱ्हा तेथें संभवत नाहींत. आतां निद्रावस्थेप्रमाणें अगदीं परमात्म्यामध्यें प्रविष्ट झाल्यासारखा होतो असें म्हणावें तर त्याला जें त्या वेळीं दुःख होतें तें होणार नाहीं. तेव्हां परिशेषावरून जीवाचा त्या वेळीं परमात्म्यामध्यें अर्धवट प्रवेश होतो असें सिद्ध होतें.

११ न स्थानतोऽपि परस्योभयलिङ्गं सर्वत्र हि ।

११ (भिन्न) स्थानांमुळेंही ब्रह्माचें दोन्ही प्रकारचें स्वरूप नाहीं. कारण, सर्वत्र (ब्रह्माचें निर्गुण स्वरूप सांगितलें आहे).

१२ (आकारांचा) भेद (सांगितल्या-) मुळें (ब्रह्म केवळ निर्गुण) नाहीं असें म्हणशील तर नाहीं. कारण प्रत्येक (भेदाच्या-) वेळीं तो (भेद) नाहीं असें सांगितलें आहे.

११ (जीवें[३२] वगैरेंमध्यें) राहत असूनही ब्रह्माला (दोष लागत) नाहींत. कारण सर्वत्र दोन प्रकारचें (ब्रह्माचें स्वरूप सांगितलें आहे).

१२ भेद[३६] असल्यामुळें (दोष लागतील) असें म्हणशील तर नाहीं. कारण प्रत्येक ठिकाणीं तसें (म्ह. दोषयुक्त) नाहीं असें सांगितलें आहे.

---

३२ शं. जागृति, स्वप्न वगैरे भिन्न भिन्न अवस्थांमध्यें जीवांचे ठिकाणीं जे दोष उत्पन्न होतात ते दोष या जीवांचा अंतर्यामी जो परमात्मा त्याला लागतील. उ. हे दोष लागत नाहींत. कारण श्रुतीमध्यें अनेक ठिकाणीं ‘ ब्रह्म हें दोषरहित आहे आणि कल्याणकारक अशा गुणांनीं युक्त आहे ’ असें दोन प्रकारचें ब्रह्माचें स्वरूप सांगितलें आहे.

३३ श्रुतीमध्यें एका ठिकाणीं (छां. ३।१४।२) सर्व कर्म करणें, इच्छा करणें वगैरे संसारांतील धर्म परमात्म्याचे ठिकाणीं सांगितले आहेत. आणि दुसरे ठिकाणीं (बृ. ३।८।८) अस्थूल आहे अनणु आहे म्ह. स्थूल नाहीं, अणु नाहीं, असा संसारांतील स्थूल वगैरे धर्मांचा निषेध केला आहे असा विरोध येतो. पूर्वपक्ष्याचें म्हणणें कीं हा विरोध नाहीं. कारण परमात्मा हा सर्व वस्तूंमध्यें अंतर्यामिरूपानें राहत असल्यामुळें कर्म करणाऱ्या (जीवां-) मध्यें कर्म करणारा आहे. आणि अस्थूल वस्तूंमध्यें अस्थूल आहे. अनणूंमध्यें अनणु आहे. अशा रीतीनें भिन्न भिन्न स्थानांमुळें परमात्म्याचे ठिकाणीं दोन्ही प्रकारचीं चिन्हें जुळतात. सिद्धांत्याचें म्हणणें कीं अशा रीतीनें विरोध घालविणें बरोबर नाहीं. कारण श्रुतीमध्यें सर्व ठिकाणीं सारखेंच ब्रह्माचें स्वरूप सांगितलें आहे.

३४ परमात्मा हा सर्व अवस्थांमध्यें सर्व लोकांना प्रेरणा करणारा असल्यामुळें जरी त्याची सर्वत्र स्थिति आहे तरी त्याचें स्वरूप एकप्रकारचेंच आहे. कारण ‘ सर्व भूतांमध्यें हाच आहे, ह्यालाच ब्रह्म असें म्हणतात ’ अशी श्रुति आहे.

३५ रामानुजाचार्यांच्या पाठामध्यें ‘ न ’ हा शब्द नाहीं.

१२ नं[35] भेदादिति चेन्न प्रत्येकमतद्वचनात् ।

११ (भिन्न[33]) स्थानांमुळें देखील परमात्म्याला दोन प्रकारचीं चिन्हें (जुळत) नाहींत. कारण सर्वत्र (सारखेंच रूप सांगितलें आहे).

१२ भेद[37] असल्यामुळें (विरोध) नाहीं असें म्हणशील तर नाहीं. कारण प्रत्येक ठिकाणीं तो (भेद) नाहीं असें सांगितलें आहे.

११ (भिन्न[34]) स्थानांमुळें देखील ब्रह्माचें भिन्न रूप होत नाहीं. कारण, सर्वत्र (एकच ब्रह्म आहे असें श्रुतीमध्यें सांगितले आहे).

१२ भेद[38] असल्यामुळें (एकच ब्रह्म) नाहीं असें म्हणशील तर नाहीं. कारण प्रत्येक ठिकाणीं तो (भेद) नाहीं असें सांगितलें आहे.

३६ शं. ज्याप्रमाणें जीव स्वतः निर्दुष्ट असूनही त्याला शरीराच्या संबंधानें दोष लागतात त्याप्रमाणें परमात्म्यालाही अवस्थांचा भेद असल्यामुळें दोष लागतील. 'देव' वगैरे अनेक शरीरांचा संबंध होणें' हाच अवस्थांचा भेद होय. देव, मनुष्य वगैरे जे जीव तेच परमात्म्याचें शरीर होय. उ. श्रुतीमध्यें 'जो पृथ्वीमध्यें राहून तिचें नियमन करतो, जो आत्म्यामध्यें राहून त्याचें नियमन करतो' (बृ. ३।७।३) इत्यादि प्रत्येक ठिकाणीं परमात्म्याला अमृत असें म्हटलें आहे. आतां त्या अमृत शब्दाचा सर्व ठिकाणीं 'अविनाशी' असा अर्थ घ्यावा तर अनेक वेळां अमृत म्हणण्याचें कारण नाहीं. म्हणून अमृत शब्दाचा 'दोषरहित' असा अर्थ केला पाहिजे म्हणजे ज्या वाक्यामध्यें ज्या वस्तूचें नियमन करतो असें सांगितलें आहे त्या वाक्यामध्यें अमृत शब्दाचा त्या वस्तूच्या दोषांनीं रहित असा अर्थ जाणावा.

३७ ब्रह्म दोन प्रकारचें आहे. एक संसारांतील धर्मांनीं युक्त म्ह. सगुण, आणि दुसरें संसारांतील धर्मांनीं रहित म्ह. निर्गुण; असा भेद असल्यामुळें, विरोध नाहीं असें म्हणतां येत नाहीं. कारण 'ही पृथ्वी' (बृ. २।५।१) इत्यादि ब्राह्मणांमध्यें 'हाच तो आहे' असा सगुण आणि निर्गुण यांमध्यें अभेद सांगितला आहे.

३८ 'जाग्रदवस्थाभिमानी विश्व, स्वप्नावस्थाभिमानी तैजस, निद्रावस्थाभिमानी प्राज्ञ, आणि तुरीयावस्थाभिमानी शुद्ध' असा जरी भेद सांगितला आहे तरी तो खरा नव्हे. कारण 'जो पृथ्वीमध्यें अंतर्यामिरूपानें राहतो हाच तुझा आत्मा' (बृ. ३।७।३) इत्यादि अनेक श्रुतींमध्यें 'परमात्मा भिन्न नाहीं' असें सांगितलें आहे.

१३ अपि चैवमेके । १४ अरूपवदेव हि तत्प्रधानत्वात् ।

१३ शिवाय एका (शाखेचे लोक) असेंच म्हणतात.	१३ शिवाय एका (शाखेचे लोक) असेंच म्हणतात.
१४ (ब्रह्म) निराकारच आहे. कारण हेंच (श्रुतीचें) मुख्य तात्पर्य आहे.	१४ तें (ब्रह्म) रूपरहित असल्यासारखेंच आहे. कारण (त्यालाच) प्राधान्य आहे.
१५ आणि प्रकाशाप्रमाणें (ब्रह्म	१५ आणि ज्याप्रमाणें (ब्रह्म हें)

३९ ' एकाच शरीरामध्यें जीवात्म्याला मात्र दोष लागत असल्यामुळें पुरुषार्थ प्राप्त होत नाहीं, आणि त्याच ठिकाणीं असणाऱ्या परमात्म्याची त्याच्या उलट स्थिति असते ' असें श्रुतीमध्यें (मुं. ३।१।१) सांगितलें आहे. तात्पर्य--जीव हा कर्माच्या अधीन असल्यामुळें त्याला दोष लागतात आणि परमात्मा हा कर्माच्या अधीन नसल्यामुळें त्याला दोष लागत नाहींत असें जाणावें.

४० बृहदारण्यकामध्यें (४।४।१९) भेद पाहणाऱ्याची निंदा केली आहे.

४१ असेंच म्हणजे परमात्मा एकप्रकारचा आहे असेंच. तात्पर्य, श्रुतीमध्यें कांहीं ठिकाणीं त्या परमात्म्याचें विश्व, तैजस वगैरे अनेक प्रकारचें रूप सांगितलें आहे. तें जागृति वगैरे अवस्थाभेदानें सांगितलें आहे. वास्तविक तें एकाचें आहे. कारण त्याची शक्ति अचिंत्य आहे असें समजावें.

४२ शं. परमात्मा हाच जर अन्तर्यामिरूपानें शरीरामध्यें प्रविष्ट झाला आहे तर तो नामरूपें धारण करून कर्माच्या अधीन होणार. उ. परमात्मा हा नाम आणि रूप यांचा निर्वाह करणारा म्ह. आपण अलिप्त राहून जीवांना नामरूपें देऊन कर्मफल देणारा असल्यामुळें त्याला प्राधान्य म्ह. मुख्यत्व आहे. म्हणून परमात्मा हा कर्माच्या अधीन होत नाहीं.

४३ ब्रह्म हें व्यवहाराचें विषय नसल्यामुळें कर्म करणें वगैरे व्यवहारांतील धर्मांचा उपासनेकरतां त्याच्यावर आरोप केला आहे असें समजावें. तेव्हां पूर्वी (टी. ३३) दाखविलेला विरोध येत नाहीं. आणि वेदांतवाक्यामध्यें ब्रह्माला प्राधान्य असल्यामुळें त्या ब्रह्माचे जे प्रशासन करणें वगैरे धर्म तेच मुख्य आहेत व बाकीचे आरोपित आहेत असें सिद्ध होतें. हा विरोधाचा परिहार एकदेशिमतानें चालू झाला आहे.

४४ ब्रह्म हें रूपी पदार्थांचें प्रवर्तक असल्यामुळें त्यापेक्षां उत्तम आहे आणि म्हणूनच तें स्वतः रूपरहित आहे. कारण तें देखील जर इतर पदार्थांसारखें रूपवान् असेल तर त्यांना प्रवर्तक होणार नाहीं. रूपाची उत्पत्ति अव्यक्तापासून आहे, आणि परमात्मा हा अव्यक्ताहून पर आहे.

१९ प्रकाशवच्चावैयर्थ्यात् ।

१३ शिवाय[42] एका (शाखेचे लोक) असेंच म्हणतात. (४)	१३ शिवाय एका (शाखेचे लोक) [41]असेंच म्हणतात. (८)
१४ ([43]ब्रह्म हें) व्यवहाराचें अविषयच आहे. (आणि) त्याला प्राधान्य आहे.	१४ ([44]ब्रह्म हें) रूपरहितच आहे. कारण त्या- (रूपी पदार्थापेक्षां तें) उत्तम आहे.
१५ [47]आणि प्रकाशाप्रमाणें (ब्रह्म हें	१५ [46]आणि प्रकाशाप्रमाणें (ब्र-

४५ ‘ यर्थ्यम् ’ (म.)

४६ जरी ‘ ब्रह्म हें असें नाहीं, असें नाहीं ’ (बृ. २।३।६) असें श्रुतीमध्यें सर्व विशेषांनीं रहित असें वर्णिलें आहे, ‘ तरी तें सत्य आहे, ज्ञान आहे ’ (तै. २।१।१) या श्रुतीला वैयर्थ्य न यावें म्हणून ब्रह्म हें प्रकाशरूपी आहे असें समजलें जातें. या प्रमाणेंच ‘ तो सर्वज्ञ आहे ’ (प्र. ४।१०) इत्यादि श्रुतींना वैयर्थ्य न यावें म्हणून ब्रह्म हें सर्वज्ञत्व वगैरे गुणांनीं युक्त आहे असें मानिलें आहे. तात्पर्य, ब्रह्म हें दोन्ही प्रकारचें आहे असें सिद्ध झालें. ‘ असें नाहीं ’ या श्रुतीचा अभिप्राय सूत्र २१ मध्यें स्पष्ट होईल.

४७ ज्याप्रमाणें सूर्याचा प्रकाश हा आपल्याला पाहिजेल त्या ठिकाणीं नेऊन ठेवितां येत नसल्यामुळें तो व्यवहाराचा विषय नाहीं, तथापि त्या प्रकाशाच्या सांनिध्यानें लोकांना इतर व्यवहार करतां येतात म्हणून त्याला एका दृष्टीनें व्यवहाराचा विषय असेंही म्हणतां येतें, त्याप्रमाणें ब्रह्म जरी खऱ्या रीतीनें व्यवहाराचा विषय नाहीं, तथापि त्याच्या सांनिध्यानें लोक त्याच्या संबंधानें कायिक, वाचिक व मानसिक व्यवहार करतात, या दृष्टीनें त्याला व्यवहाराचा विषय असेंहि म्हणतां येतें. आणि अशा रीतीनें सुद्धां जर ब्रह्म हें व्यवहाराचा विषय न होईल तर शास्त्राचाही विषय होत नसल्यामुळें शास्त्र व्यर्थ होईल. याप्रमाणेंच ब्रह्माला चक्षू नसून स्वभावतःच पाहण्याची शक्ति आहे असें समजावें. नाहींतर ‘ आत्म्याला चक्षू नसून तो पाहतो ’ (श्वे. ३।१९) असें जें श्रुतीमध्यें सांगितलें आहे तें व्यर्थ होईल.

४८ जरी चक्षुरिंद्रिय हें इतर पदार्थांचें प्रकाशक असल्यामुळें स्वतः प्रकाशरूपी आहे तरी त्याचा प्रकाश सूर्य वगैरेंच्या प्रकाशापेक्षां विलक्षण असल्यामुळें अंधारामध्यें चक्षुरिंद्रिय असूनही ‘ येथें प्रकाश नाहीं ’ असा व्यवहार होतो. त्याप्रमाणें ब्रह्माचें रूप हें भौतिक रूपापेक्षां विलक्षण असल्यामुळें ‘ ब्रह्म रूपरहित आहे ’ असा व्यवहार होतो. तात्पर्य ब्रह्माचें एक विलक्षण रूप आहे. म्हणूनच ‘तो सोन्यासारखा आहे ’ (मुं. ३।१।३) असें त्याचें रूप सांगणाऱ्या श्रुति व्यर्थ होत नाहींत.

१६ आह च तन्मात्रम् ।

जणूं काय निरानिराळे आकार धारण करितें). कारण (अशा रीतीनें आकार सांगणाऱ्या श्रुती) व्यर्थ होत नाहींत.

प्रकाशरूपीं आहे. त्याप्रमाणें (सर्वज्ञत्व वगैरे गुणांनीं युक्त-ही आहे. कारण (अशा-रीतीनें त्या श्रुती) व्यर्थ होत नाहींत.

१६ आणि (ब्रह्माला) फक्त तें (म्ह. चैतन्य आहे असें श्रुति) सांगते.

१६ आणि (ब्रह्म हें) तें (म्ह. प्रकाशस्वरूप आहे एवढें-) च फक्त (श्रुति) सांगते.

१७ (श्रुतीही तसेंच) दाखवि-तात. आणि स्मृतीमध्येंही (तसेंच) सांगितलें आहे.

१७ (श्रुतीही तसेंच) दाखवि-तात. आणि स्मृतीमध्येंही (तसेंच) सांगितलें आहे.

४९ म्हणजे ‘ब्रह्म हें सर्वज्ञत्व वगैरे इतर गुणांनीं युक्त नाहीं’ असें सांगण्याचा त्या (तै. २।१) श्रुतींचा उद्देश नाहीं.

५० शं. ‘परमात्म्याला अलौकिक इंद्रियांची कल्पना करावी. म्हणजे आमच्या सारखे लौकिक चक्षू नसूनही तो अलौकिक चक्षूच्या योगानें पाहतो. उ. ब्रह्म हें फक्त ज्ञानरूपी आहे त्याला इंद्रियें वगैरे कांहीं नाहींत असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

५१ ब्रह्माचें जें ज्ञान आनंद हें रूप तेंच भौतिक रूपापेक्षां विलक्षण रूप होय. कारण चतुर्वेदशिखेमध्यें ब्रह्माचें असेंच रूप सांगितलें आहे.

५२ ‘ब्रह्म हें दोषरहित आहे आणि कल्याणकारक अशा गुणांनीं युक्त आहे’ असें दोन प्रकारचें ब्रह्म श्रुतिस्मृतींमध्यें अनेक ठिकाणीं वर्णिलें आहे. (पृ. ८२ पं. १; पृ. ९८ पं. २५ व पृ. १४७ पं. १६ पहा).

१७ दर्शयति चाथो अपि स्मर्यते ।

व्यवहाराचा विषयही आहे). कारण (अशा रीतीनें शास्त्र) व्यर्थ होत नाहीं.	ह्याचें रूप असल्यामुळें रूप सांगणाऱ्या श्रुती) व्यर्थ होत नाहींत.
१६ आणि (ब्रह्माला) फक्त तें (म्ह. चैतन्य आहे असें श्रुति) सांगते.	१६ आणि (ब्रह्माचें) फक्त तें (म्ह. ज्ञान व आनंद हेंच रूप आहे असें श्रुति) सांगते.
१७ (श्रुतीही तसेंच) दाखवि-तात. आणि स्मृतीमध्येंही (तसेंच) सांगितलें आहे.	१७ (श्रुतीही तसेंच) दाखविते. आणि स्मृतीमध्येंही (तसेंच) सांगितलें आहे. (९)

५३ शं. 'काम करणें वगैरे धर्म ब्रह्माचे ठिकाणीं नाहींत' असें म्हणतां येत नाहीं. कारण ब्रह्म हें जगाचें समवायिकारण आहे. तेव्हां जगामध्यें जे धर्म भासतात ते त्याच्या समवायिकारणांत असलेच पाहिजेत. उ. 'ब्रह्म असें नाहीं असें नाहीं' (बृ. २।३।६) इत्यादि श्रुती 'ब्रह्माचे ठिकाणीं प्रापंचिक धर्म नाहींत' असेंच दाखवितात. 'त्याला आदि नाहीं' (भ. गी. १३।१२) इत्यादि स्मृतीमध्यें प्रापंचिक धर्मांचा ब्रह्माचे ठि-काणीं निषेधच केला आहे. तात्पर्य, ते धर्म परमात्म्याचे ठिकाणीं आरोपित आहेत असें समजावें.

५४ ज्ञान व आनंद हें ब्रह्माचें रूप आहे. कारण 'ब्रह्माचें आनंद हें रूप आहे' असें श्रुतिमध्यें (मुं. २।२।७) सांगितलें आहे. तसेंच 'परमात्म्याचें ज्ञान हें रूप आहे' असें मात्स्यस्मृतीवरून सिद्ध होतें.

१८ अत एव चोपमा सूर्यकादिवत् ।

१८ आणि म्हणूनच सूर्यप्रतिबिंब वगैरेंप्रमाणें (ब्रह्म आहे अशा रीतीनें ब्रह्माला) उपमा (दिल्या आहेत).	१८ आणि म्हणूनच सूर्यप्रतिबिंब वगैरेंप्रमाणें (ब्रह्म आहे अशा रीतीनें ब्रह्माला) उपमा (दिल्या आहेत).
१९ परंतु जलाप्रमाणें (निराळें मूर्त द्रव्य येथें) दिसत नसल्यामुळें (ब्रह्म) त्यासारखें नाहीं.	१९ परंतु जलां- (तील सूर्या-) प्रमाणें (ब्रह्म खोटें) नसल्यामुळें (तें) तसें (म्ह. सूर्याच्या प्रतिबिंबासारखें) नाहीं.

५५ ब्रह्म हें दोषरहित आहे म्हणूनच.

५६ परमात्म्याचे ठिकाणीं प्रापंचिक धर्मांचा आरोप आहे म्हणूनच ‘ तो वृषीसारखा आहे, मशकासारखा आहे ’ (बृ. १।३।२२) इत्यादि उपमा संभवतात. वास्तविक रीतीनें पाहिलें तर तो निरुपमच आहे. सूर्यानें संयुक्त जें जल तें सूर्यक होय. ज्याप्रमाणें जलानें संयुक्त अशा सूर्याची उपमा श्रुतीमध्यें (ब्र. बिं. १२) परमात्म्याला दिली आहे त्याप्रमाणेंच प्रापंचिक धर्मांनीं युक्त अशा परमात्म्याला वृषी वगैरेंची उपमा दिली आहे असें समजावें. येथें एकदेशिमताचें अधिकरण संपलें आहे.

५७ शं. परमात्मा आणि त्याचीं जीं रूपें म्ह. मत्स्य कूर्म वगैरे सर्व जीव यांमध्यें भेद नाहीं. म्हणूनच मत्स्य वगैरेंची उपमा जीवाला प्राप्त होते. तात्पर्य, मत्स्य कूर्म वगैरे अवतारांप्रमाणें इतर जीव देखील परमात्म्याहून निराळे नाहींत. उ. ज्याप्रमाणें जलांतील सूर्याचीं प्रतिबिंबें सूर्यापेक्षां भिन्न आहेत, सूर्याच्या अधीन आहेत आणि सूर्यासारखीं आहेत त्याप्रमाणें जीव हे परमात्म्यापेक्षां भिन्न आहेत, परमात्म्याच्या अधीन आहेत, आणि परमात्म्यासारखे आहेत असाच अभिप्राय जीवाला सूर्याच्या प्रतिबिंबाची उपमा देणाऱ्या श्रुतीचा आहे. ‘ जशीं प्रतिबिंबें जलरूपी उपाधीमुळें दिसतात तसें जीव हे शरीर वगैरे उपाधीमुळें दिसतात, वास्तविक ते परमात्मरूपच आहेत ’ असा अभिप्राय नाहीं.

१९ अम्बुवदग्रहणात्तु न तथात्वम् ।

१८ आणि म्हणूनच (श्रुतीमधील) उपमा (संभवते). सूर्यकाप्रमाणें हें होय. (९)	१८ आणि म्हणूनच सूर्यप्रतिबिंब वगैरेंप्रमाणें (जीव आहेत अशा रीतीनें जीवांना) उपमा (दिल्या आहेत). (१०)
१९ परंतु (धर्म हे) जलाप्रमाणें (प्रतिबिंबाचें) ग्रहण करीत नसल्यामुळें (त्या धर्मांच्या संबंधानें ब्रह्म हें) तसें (म्ह. त्या धर्मांनीं युक्त) होत नाहीं.	१९ परंतु जलाप्रमाणें (परमात्म्याचें) ज्ञान होत नसल्यामुळें (त्याचें सादृश्य) तसें (म्ह. व्यक्त होत) नाहीं. (११)

५८ जलामध्यें सूर्याची स्थिति खरी नाहीं. आणि येथें शरीरामध्यें परमात्म्याची स्थिति खरी आहे. तेव्हां त्याला शरीराच्या संबंधानें दोष लागतील. किंवा दृष्टांत जुळला पाहिजे म्हणून शरीरामध्यें परमात्म्याची स्थिति खरी नाहीं असें मानिलें पाहिजे असा पूर्वपक्ष्याचा अभिप्राय आहे.

५९ ज्याप्रमाणें जल हें स्वच्छ असल्यामुळें प्रतिबिंबाचें ग्रहण करतें त्याप्रमाणें काम करणें वगैरे प्रापंचिक धर्म हे अस्वच्छ असल्यामुळें परमात्म्याच्या प्रतिबिंबाचें ग्रहण करीत नाहींत म्हणून त्यामुळें परमात्म्यावर प्रापंचिक धर्मांचा आरोप आहे असें म्हणतां येत नाहीं. पूर्वीच्या अधिकरणामध्यें जें एकदेशीनें ठरविलें आहे त्याचें ह्या सूत्रामध्यें मुख्यसिद्धांत्यानें खंडन केलें आहे.

६० शं. जीव हे परमात्म्याशीं सदृश असल्यामुळें ते आपोआपच मुक्त होतील तेथें भक्तीचें कारण नाहीं. उ. ज्याप्रमाणें जलाचें स्नेहपूर्वक ज्ञान होतें त्याप्रमाणें जीवाला परमात्म्याचें स्नेहपूर्वक ज्ञान झालें पाहिजे. कारण तसें ज्ञान झाल्याशिवाय मोक्ष प्राप्त होत नाहीं. आणि तें तर भक्तीशिवाय होत नाहीं. आणि त्यामुळें जीवाला परमात्म्याचें सादृश्य असूनही स्पष्ट कळत नाहीं. याकरतां भक्ति अवश्य पाहिजे.

२० वृद्धिह्रासभाक्त्वमन्तर्भावादुभयसामञ्जस्यादेवम् ।[61]

२० (उपाधींच्या) आंत प्रविष्ट झाल्यामुळें (उपाधींचे) वृद्धि आणि ऱ्हास (ब्रह्माला) प्राप्त होतात. अशा रीतीनें दोन्ही समंजस होत असल्यामुळें (कांहीं विशेष येत नाहीं).

२१ आणि श्रुतींत (तसें) सांगितल्यामुळेंही (वरील दृष्टांत बरोबर आहे). (९)

२० (पृथ्वी वगैरेंच्या) आंत प्रविष्ट झाल्यामुळें (त्या शरीर वगैरेंचे) वृद्धि आणि ऱ्हास हे (ब्रह्माला) प्राप्त होत (नाहींत. इतकेंच फक्त येथें दृष्टांतावरून समजावें). असें मानलें म्हणजे दोन्ही (दृष्टांत) चांगल्या रीतीनें जुळतात. आणि (असें लोकांमध्येंही) दृष्टीस पडतें.

६१ ‘ स्यादेवं दर्शनाच्च । २१ प्रकृते ’ (रा.)

६२ परमात्म्याला ‘ सूर्य आणि आकाश ’ असे दोन दृष्टांत दिले आहेत. जर सूर्याप्रमाणें परमात्म्याची स्थिति शरीरामध्यें खरी नसेल तर आकाशाचा दृष्टांत जुळणार नाहीं. कारण घट वगैरेंमध्यें आकाशाची स्थिति खरी आहे. बरें; जर खरी स्थिति असेल तर सूर्याचा दृष्टांत जुळणार नाहीं. म्हणून ‘ वृद्धि व ऱ्हास होत नाहींत ’ एवढ्या पुरतेंच ते दृष्टांत दिले आहेत असें मानलें पाहिजे. लोकांमध्येंही ‘ सिंहासारखा हा मनुष्य आहे ’ असें म्हटलें असतां तेथें पराक्रम याच अंशानें दृष्टांत जुळतो. त्या दृष्टांतावरून ‘ मनुष्याची आकृति सिंहासारखी आहे असें समजत नाहीं. तेव्हां एका अंशानें साम्य घेऊन दिलेले दृष्टांत लोकांमध्यें दृष्टीस पडतात असें जाणावें.

६३ ज्याप्रमाणें आकाश हें लहान होऊन लहान वस्तूमध्यें प्रवेश करितें आणि मोठें होऊन मोठ्या वस्तूमध्यें प्रवेश करितें, त्याप्रमाणेंच ब्रह्म हें सर्व वस्तूंमध्यें प्रवेश करीत असल्यामुळें त्याला वृद्धि आणि ऱ्हास आहेत असें समजावें. असें मानलें म्हणजे

२१ दर्शनाच ।

२० (ब्रह्म[63] हें सर्व वस्तूंच्या) आंत प्रविष्ट होत असल्यामुळें (त्याला) वृद्धि आणि ऱ्हास आहेत (असें समजतें). असें मानलें म्हणजे दोन्ही (श्रुती) चांगल्या जुळतात.	२० (ब्रह्मदेव[64] वगैरेंचा सुद्धां भक्तांमध्यें) अंतर्भाव होत असल्यामुळें (भक्ति वगैरेंचे) वृद्धि आणि ऱ्हास आहेत (असें समजतें. आणि) असें मानलें म्हणजे (परमात्म्याला) दोघांविषयीं चांगलेपणा प्राप्त होत आहे.
२१ आणि (परमात्म्याचे ठिकाणीं सर्व विरुद्ध धर्म) दृष्टीस पडतात.[65]	२१ आणि[66] (भक्तीच्या मानानें सुखाचें तारतम्य) दृष्टीस पडतें. (१२)

परमात्म्याला जें काम करणें वगैरे धर्म सांगितले आहेत आणि स्थूल वगैरे धर्मांचा जो निषेध केला आहे या दोन्ही गोष्टी चांगल्या जुळतात.

६४ 'ब्रह्मदेव वगैरे देव आणि इतर म्ह. मनुष्य' या दोन्ही प्रकारच्या भक्तांविषयीं परमात्मा हा चांगलाच आहे, म्ह. सर्वांना सारखाच आहे. परंतु देवांचे ठिकाणीं भक्तीची वृद्धि आहे आणि मनुष्याचे ठिकाणीं भक्तीचा ऱ्हास आहे म्हणून त्याप्रमाणें त्यांना फळें मिळतात.

६५ अणुत्व, महत्व वगैरे विरुद्ध धर्म होत. तात्पर्य-जी वस्तू जशी दृष्टीस पडते ती तशीच मानिली पाहिजे. 'तिला विरुद्ध म्हणणें' हेंच विरुद्ध आहे असें या सूत्राचें तात्पर्य आहे.

६६ 'मनुष्य, गंधर्व वगैरेंमध्यें पूर्वीपेक्षां पुढच्याला शंभरपट आनंद अधिक आहे' असें श्रुतीमध्यें (तै. २।८।१) सांगितलेलें दृष्टीस पडतें. त्यावरूनही 'भक्ती व ज्ञान यांमध्यें कमजास्तपणा आहे' असें सिद्ध होतें.

२२ प्रकृतैतावत्त्वं हि प्रतिषेधति ततो ब्रवीति च भूयः ।

२२ प्रकृत जीं हीं (ब्रह्माचीं रूपें) त्यांचाच (श्रुती) निषेध करिते. कारण नंतर (श्रुति) पुन्हां असें म्हणते.	२१ प्रकृत[67] अशा (गुणां-) मुळ प्राप्त झालेल्या इयत्तेचाच (श्रुति) निषेध करिते. कारण नंतर (श्रुति) पुन्हां (ब्रह्माचे गुण) सांगते.
२३ तें (ब्रह्म) अव्यक्त आहे. कारण (श्रुति असेंच) सांगते.	२२ तें (ब्रह्म) अव्यक्त आहे. कारण (श्रुति असेंच) सांगते.
२४ शिवाय संराधनकालीं (योगी लोक अव्यक्त अशा ब्रह्माला पाहतात असें) प्रत्यक्ष आणि अनुमान यांवरून (समजतें).	२३ शिवाय[73] संराधनकालीं- (च या ब्रह्माचें प्रत्यक्ष होतें असें) श्रुति आणि स्मृति यांवरून (समजतें).

६७ शं. ब्रह्माचे ठिकाणीं जर गुण आहेत तर ' असें नाहीं ' (बृ, २।३।६) या श्रुतीनें कशाचा निषेध केला आहे ? उ. ' ब्रह्माची खरोखर मूर्त आणि अमूर्त अशीं दोन रूपें आहेत ' (बृ. २।३।१) इत्यादि पूर्वींच्या श्रुतीमध्यें जे ब्रह्माचे गुण सांगितले आहेत त्यावरून कोणी तेवढेच गुण आहेत असें समजून ब्रह्माची इयत्ता म्ह. परिच्छेद करूं लागतील. त्या इयत्तेचा श्रुतीनें पुढें निषेध केला आहे. गुणांचा निषेध केला नाहीं. कारण त्या निषेधाच्या पुढें श्रुतीनें पुन्हां सत्य वगैरे ब्रह्माचे गुण सांगितले आहेत.

६८ म्हणजे आनंद वगैरे जे ब्रह्माचे अलौकिक धर्म त्यांचा श्रुति निषेध करीत नाहीं. कारण निषेध सांगितल्यानंतर श्रुतीनें ब्रह्माचे आनंद वगैरे धर्म सांगितले आहेत.

६९ शं. परमात्मा हा फक्त जगाचा उत्पादक व संहार करणारा आहे. तेव्हां त्याची भक्ती करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. उ. श्रुतीमध्यें ' तो परमात्मा जग उत्पन्न करितो आणि त्याचा संहार करितो ' असें पूर्वीं सांगून पुढें 'इतकेंच नाहीं (तर आणखीही) निराळें आहे (इच्छित फळ) देणारा तो परमात्मा स्वर्ग आणि पृथ्वी यांचें पालन करितो' असें म्हटलें आहे. तात्पर्य, त्याची भक्ति केली पाहिजे.

७० ' या ब्रह्माचें रूप लोकांच्या दृष्टिगोचर होत नाहीं' असें श्रुतीमध्यें (का.६।९) सांगितलें असल्यामुळें तें ब्रह्म अव्यक्त आहे असें सिद्ध होतें. त्यावरूनही ' ब्रह्माला गुणांच्या मानानें इयत्ता नाहीं ' हेंच दृढ होतें.

७१ ' आत्म्याचें ज्ञान होत नाहीं ' असें श्रुतीमध्यें (बृ. ३। ९। २६) सांगितलें

२३ तदव्यक्तमाह हि । २४ अपि संराधने प्रत्यक्षानुमानाभ्याम् ।

२२ प्रस्तुत अशा (प्रापंचिक धर्मां-) चाच (श्रुति) निषेध[६८] करिते. कारण नंतर (श्रुति) पुन्हां असें म्हणते. (६)

२३ तें (ब्रह्म[७१]) अव्यक्त आहे. कारण (श्रुति असेंच) सांगते.

२४ अहोहो[७३] ! चांगली सेवा केली असतां (त्या ब्रह्माचें) प्रत्यक्ष होतें. आणि अनुमानावरूनही (तेंच सिद्ध होतें). (७)

२२ (परमात्मा[६९] हा सृष्टिसंहारकर्ताच आहे) अशा प्रकारचें जें (त्याचें) प्रकृतस्वरूप त्याचा (श्रुति) निषेध करिते. आणि नंतर (श्रुति) पुन्हां असें म्हणते. (१३)

२३ तें (ब्रह्म[७२]) अव्यक्त आहे. कारण (श्रुति असेंच) सांगते.

२४ आराधन[७५] केलें तरी (तें व्यक्त होत नाहीं असें) प्रत्यक्ष आणि अनुमान यांवरून (समजतें).

आहे. आणि अनुभवही असाच आहे. हें सूत्र पूर्वपक्ष्याच्या मताचें आहे.

७२ 'ब्रह्म अव्यक्त आहे' असें काठक श्रुतीमध्यें सांगितलें आहे. तेव्हां तें ब्रह्म सा-हजिक रीतीनें दृष्टिगोचर होण्यासारखें नसल्यामुळें त्याची भक्ति केली पाहिजे. म्हणजे तें प्रसन्न होऊन व्यक्त होईल.

७३ 'भक्तीच्या योगानेंच परमात्म्याचें प्रत्यक्ष होतें, अन्य साधनानें होत नाहीं असें श्रुति (का. २।२८) आणि स्मृति (भ. गी ११।५४) यांवरून समजतें. यावरूनही 'त्याला इयत्ता नाहीं' हेंच दृढ होतें. कारण ज्या वस्तूला इयत्ता असते त्या वस्तूच्या ज्ञानाला भक्तीचीच जरूर लागते असें नाहीं. संराधन म्ह. भक्तिपूर्वक ध्यान.

७४ हें सिद्धांत्याचें सूत्र आहे. भक्ताला त्या परमात्म्याचें प्रत्यक्ष होतें. ध्रुव वगैरेंच्या गोष्टीवरून 'परमात्मा हा व्यक्त होतो' असें अनुमानही होत आहे. सूत्रांतील प्रत्यक्ष आणि अनुमान या शब्दांचा श्रुति आणि स्मृति असाही अर्थ होतो. काठक श्रुति (२।२३) आणि गीता (११।५४) पहा. तात्पर्य 'ब्रह्म साकार आहे आणि अनंत गुणांनीं युक्त आहे' असें सिद्ध झालें. सूत्रांतील 'अहाहा' या शब्दानें पूर्वपक्ष्याचें मूर्खत्व प्रकट करून त्याची निंदा सुचविली आहे.

७५ 'भक्तीशिवाय नुसतें त्याचें आराधन कितीही केलें तरी तें ब्रह्म व्यक्त होत नाहीं' ही गोष्ट योगी लोकांच्या प्रत्यक्ष अनुभवावरून सिद्ध होते. आणि ह्या गोष्टीचें अनुमानही करतां येतें. कारण जें अति सूक्ष्म असतें तें अव्यक्त असतें असा नियम आहे.

२५ [७८]प्रकाशादिवच्चावैशेष्यं प्रकाशश्च कर्मण्यभ्यासात् ।

२५ प्रकाश वगैरेंप्रमाणें (त्या दोघांमध्यें) भेद नाहीं. प्रकाश- (स्वरूपी आत्मा) कर्मामुळें (भिन्न होतो). कारण अनेक वेळां (त्या दोघांमध्यें अभेद सांगितला आहे).

२६ म्हणून (जीव हा) अनंत (अशा परमात्म्या-) शीं (एक होतो). कारण (श्रुतीमध्यें या गोष्टीचें) चिन्ह आहे.

२७ परंतु दोन्ही (प्रकार-) चा

२४ प्रकाश वगैरेंप्रमाणें— (व ब्रह्माचे इतर गुण आहेत. त्यांत कांहीं) फरक नाहीं. (ते) प्रकाश (वगैरे गुण संराधनरूप-) कर्माचा अभ्यास झाला म्हणजे (उपलब्ध होतात[७७]).

२५ म्हणून (आत्मा हा) अनंत (अशा गुणांनीं युक्त आहे असें सिद्ध होतें). तेव्हां (ब्रह्माचें दोन)' प्रकार- (चें स्वरूप बरोबर जुळतें). (९)

२६ दोन्ही[८२] (प्रकार-) चा

७६ 'प्रकाशवच्चावैशेष्यम् । २६ प्रकाशश्च' (म.)

७७ म्हणूनच श्रुतीमध्यें 'जगदैश्वर्य वगैरे गुणांनीं युक्त अशा रूपानें वामदेव ऋषीला ब्रह्माचा साक्षात्कार झाला' असें (बृ. १।४।१०) सांगितलें आहे.

७८ हें सूत्र आणि पुढील सूत्र हीं पूर्वपक्षयाचीं आहेत. ज्याप्रमाणें सूर्याचा प्रकाश उष्ण भासतो, चंद्राचा प्रकाश थंड भासतो, आणि मण्याचा मध्यम भासतो असा अनुभव येत असूनही प्रकाशाचा एक उष्णस्पर्शच मानिला आहे, ते ते विशेष स्पर्श मानिले नाहींत, त्याप्रमाणें परमात्माही त्या त्या विशेष गुणांनीं रहित असाच मानला पाहिजे. आतां भक्तांच्या कामनेप्रमाणें अनेक तऱ्हांनीं तो प्रकाशित होतो. परंतु तीं त्याचीं खरीं रूपें नव्हेत. शिवाय जर त्याचें एखादें रूप खरें असतें तर सर्व ठिकाणीं तो त्या रूपानें प्रकाशित झाला असता.

७९ ज्याप्रमाणें अग्नी हा सूक्ष्म (म्ह. तन्मात्रा) या रूपानें दिसत नाहीं, परंतु स्थूल रूपानें दिसतो तसा परमात्मा नाहीं. कारण 'त्या परमात्म्याचे ठिकाणीं स्थूल, सूक्ष्म वगैरे विशेष कांहीं नाहींत' असें मांडव्य श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

८० 'हे विभो, भक्तांवर अनुग्रह करण्याकरतां तूं तसें तसें शरीर धारण करतोस' अशी श्रुतीही आहे. तात्पर्य 'परमात्याचें शरीर जरी अनेक प्रकारचें आहे तरी त्याचें स्वरूप विशेषरहितच आहे' असा पूर्वपक्ष्याचा अभिप्राय आहे.

८१ शं. जर परमात्मा व्यक्त नाहीं तर त्याची भक्ती करून तरी काय उपयोग ? उ. भक्तीच्या योगानें तो परमात्मा प्रसन्न झाला म्हणजे तो व्यक्त होतो. कारण

२६ अतोनन्तेन तथा हि लिङ्गम् । २७ उभयव्यपदेशात्त्वहिकुण्डलवत् ।

२५ प्रकाश वगैरेंप्रमाणें (परमात्मा हा) विशेषरहित आहे. (तो तपश्चर्या वगैरे) कर्मामध्यें (अनेक तऱ्हेनें) वारंवार प्रकाशित होतो. आणि (तत्क्षणीं अप्रकाशितही होतो).

२६ म्हणून (आत्म्याचा) अनंत (अशा रूपांनीं प्रकाश होतो. आणि) तसेंतसें (त्याचें) शरीर होतें.

२७ परंतु दोन्ही (प्रकार-)चा

२५ आणि प्रकाशाप्रमाणें (परमात्मा नाहीं. कारण त्याचे ठिकाणीं) विशेष नाहींत.

२६ परंतु (श्रवण, मनन वगैरेंचा) अभ्यास झाला म्हणजे (त्या परमात्मरूपी) विषयाचा प्रकाश होतो.

२७ म्हणून अनंत (शक्तीनें युक्त अशा परमात्म्या-)नें (प्रसाद केला म्हणजे मोक्ष प्राप्त होतो). कारण (श्रुतीमध्यें) या गोष्टीचें चिन्ह आहे. (१४)

२८ परंतु दोन्ही (प्रकार-)चा

त्याच्या अंगीं अनंत शक्ती आहेत. 'परमात्म्याचा प्रसाद झाला म्हणजे त्याचें दर्शन होऊन हा संसार निवृत्त होतो' असें श्रुतीमध्यें या गोष्टीचें चिन्ह आढळतें.

८२ ज्याप्रमाणें सापाचें वेटोळें हें सापाचीच एक प्रकारची अवस्था आहे त्याप्रमाणें जड वस्तू ह्या ब्रह्माची एक प्रकारची अवस्थाच आहेत. कारण ब्रह्म आणि जड वस्तू यांमध्यें अभेद आहे (बृ. ४।५।७), आणि भेद आहे (छां. ६।३।२) या दोन्ही गोष्टी श्रुतीवरून सिद्ध होतात. तात्पर्य वस्तू या दृष्टीनें अभेद आहे आणि अवस्थेच्या दृष्टीनें भेद आहे. हें सूत्र आणि पुढील सूत्र पूर्वपक्ष्याचीं आहेत.

८३ हें सिद्धांतसूत्र आहे. श्रुतीमध्यें कांहीं ठिकाणीं परमात्म्याचा सगुण अशा रूपानें निर्देश केला आहे आणि कांहीं ठिकाणीं तो निर्गुण आहे असा निर्देश केला आहे. तात्पर्य- 'परमात्मा हा अव्यक्तच आहे' असें समजूं नये. वेदांतशास्त्र हें काल्पनिक शास्त्र नव्हे, तर तें श्रुतिमूलक आहे. तेव्हां श्रुतीमध्यें जसें जसें सांगितलें असेल तसें तसें मानलें पाहिजे. मग तें विरुद्ध आहे किंवा नाहीं हें पाहण्याचें कांहीं कारण नाहीं.

८४ श्रुतीमध्यें ब्रह्माला आनंद असें म्हटलें आहे आणि आनंदी म्ह. आनंद गुणानें युक्त असेंही म्हटलें आहे. त्यावरून असें समजतें कीं ब्रह्म हें आनंदस्वरूप असूनही त्याला आनंदगुणानें युक्त असें म्हणण्यास हरकत नाहीं. ज्याप्रमाणें कुंडल म्ह. वेटोळें हें सापाचें स्वरूप असूनही त्याला कुंडली म्ह. वेटोळें ह्या रूपानें युक्त असें म्हणतात त्याप्रमाणेंच हें होय. तात्पर्य, परमात्मा हा गुणस्वरूप असूनही सगुण आहे. तेव्हां त्याची भक्ति करतां येते असें सिद्ध झालें.

२८ प्रकाशाश्रयवद्वा तेजस्त्वात् ।

निर्देश असल्यामुळें साप आणि त्याची वेटोळीं याप्रमाणें (हें जाणावें.)	निर्देश असल्यामुळें सापाच्या वेटोळ्याप्रमाणें (ब्रह्माचा जड वस्तूशीं संबंध आहे).
२८ किंवा प्रकाश आणि त्याचा आश्रय यांप्रमाणें (हें समजावें). कारण (ते दोन्ही) तेजरूपीच आहेत.	२७ किंवा प्रकाश आणि त्याचा आश्रय (ह्या दोहोंवर) तेजस्त्वजाति असल्यामुळें जसें (त्यांचें ऐक्य आहे तसें ब्रह्म आणि जड वस्तू यांचें ऐक्य आहे).
२९ किंवा पूर्वी (सांगितल्या-) प्रमाणें (हें समजावें).	२८ परंतु पूर्वी (सांगितल्या-) प्रमाणें (हें समजावें).

८५ म्हणजे जड वस्तू आणि ब्रह्म या दोहोंवर ब्रह्मत्वजाति असल्यामुळें ब्रह्म आणि जडवतू हीं दोन्ही ब्रह्मरूपच आहेत.

८६ शं. ब्रह्माचे जे धर्म आहेत ते घटपटांच्या धर्मांसारखेच अनित्य असल्यामुळें मळचें ब्रह्म धर्मरहित असेंच सिद्ध होतें. उ. ज्याप्रमाणें प्रकाशाचे आश्रय असे सूर्य वगैरे हे प्रकाशापेक्षां निराळे नाहींत. कारण ते प्रकाशाला सोडून कधींच राहत नाहींत, आणि प्रकाशरुपीही नाहींत. कारण उन्हाला सूर्य असें कोणीच म्हणत नाहींत. ह्याप्रमाणें ब्रह्म आहे म्हणजे ब्रह्म आणि त्याचे धर्म यांमध्यें भेद आहे आणि अभेद आहे. कारण ब्रह्मालाही श्रुतीमध्यें तेज असें म्हटलें आहे. तात्पर्य, ब्रह्माचे धर्म घट, पट वगैरेंच्या धर्मांसारखे अनित्य नाहींत.

८७ ज्याप्रमाणें सूर्य हा प्रकाशस्वरूप असूनही त्याला प्रकाशाचा आश्रय असें म्हणतात, त्याप्रमाणें परमात्मा हा आनंदस्वरूप असूनही त्याला आनंदाचा आश्रय असें म्हणतात.

८८ ज्याप्रमाणें पूर्वी (२।३।४२) जीव हा ईश्वराचा अंश आहे असें सांगितलें

२९ पूर्ववद्वा ।

निर्देश असल्यामुळें (परमात्मा हा दोन्ही प्रकारचा आहे). ज्याप्रमाणें साप हा (सरळ असतो आणि त्याचें) वेटोळेंही होतें त्याप्रमाणें (हें जाणावें). (८)	निर्देश असल्यामुळें सापाच्या वेटोळ्याप्रमाणें (हें समजावें).
२८ परंतु[८८] (परमात्मा हा) प्रकाशाच्या आश्रयाप्रमाणें आहे. कारण (त्याला) तेज (असें म्हणतात).	२९ किंवा[८९] (परमात्मा हा) प्रकाशाच्या आश्रयाप्रमाणें आहे (असें समजावें). कारण (तो) तेजस्वरूपच आहे.
२९ किंवा[८९] पूर्वी (सांगितल्याप्रमाणें (समजावें).	३० किंवा[९०] पूर्वीप्रमाणें (हें समजावें).

त्याप्रमाणेंच जड वस्तूही अंश आहेत असें समजावें. तात्पर्य, जडवस्तू ह्या ब्रह्माचें शरीर होत. तेव्हां ज्याचें शरीर तो अर्थातच या शरीरापेक्षां भिन्न असल्यामुळें श्रुतीमध्यें केलेला भेदाचा निर्देश चांगल्या रीतीनें जुळतो. आणि शरीरासकट जो शरीरी त्यापेक्षां तें शरीर भिन्न नसल्यामुळें श्रुतीमध्यें केलेला अभेदाचा निर्देशही चांगल्या रीतीनें जुळतो. जर जड वस्तू ह्या सापाच्या वेटोळ्याप्रमाणें किंवा प्रभेप्रमाणें असतील तर श्रुतीमध्यें केलेला भेदाचा निर्देश चांगल्या रीतीनें जुळणार नाहीं.

८९ हें सूत्र आणि पुढील सूत्र हीं एकदेशिमताप्रमाणें आहेत. पूर्वी म्हणजे १४ सूत्रापासून १८ सूत्रापर्यंत पांच सूत्रामध्यें. तात्पर्य 'ब्रह्म हें मूळचें निर्धर्मकच आहे' असें एकदेशिमत आहे.

९० ज्याप्रमाणें पूर्वीचा व पुढचा मिळून काल हा सर्व एकच आहे तरी त्या कालाला पूर्व हें विशेषण लावतां येतें. उदा. हा पूर्वकाळ आहे. त्याप्रमाणें येथें समजावें. म्हणजे आनंद हा ब्रह्मापेक्षां निराळा जरी नाहीं तरी तो ब्रह्माला विशेषण होतो आणि ब्रह्माला आनंदी असें म्हणतां येतें.

३० प्रतिषेधाच्च । ३१ परमतः सेतून्मानसंबन्धभेदव्यपदेशेभ्यः ।

३० आणि निषेध केला आहे म्हणूनही (हाच सिद्धांत होय). (६)	२९ आणि[९१] निषेध केला आहे म्हणूनही (हाच सिद्धांत होय). (६)
३१ ब्रह्माच्या पलीकडे (एक तत्व आहे असें) सेतु, उन्मान, संबंध, आणि भेद यांच्या निर्देशावरून (समजतें).	३० ब्रह्माच्या पलीकडे (एक तत्व आहे असें) सेतु, उन्मान, संबंध[९५], आणि भेद यांच्या निर्देशावरून (समजतें).
३२ परंतु साम्यामुळें (ब्रह्माला सेतु म्हटलें आहे).	३१ परंतु साम्यामुळें (ब्रह्माला सेतु म्हटलें आहे).

९१ जरा, मरण, वगैरे जे धर्म त्यांचा ब्रह्माचे ठिकाणीं श्रुतीनें निषेध केला आहे. जर जड वस्तू ह्या सापाच्या वेटोळ्याप्रमाणें किंवा प्रभेप्रमाणें ब्रह्मरूपच असतील तर त्यांचे ठिकाणींही तो निषेध संभवला पाहिजे. परंतु तो तर संभवत नाहीं. तात्पर्य 'जड वस्तू ह्या ब्रह्माचें शरीर आहेत' हाच सिद्धांत निश्चित होतो असें समजावें.

९२ 'ब्रह्म हें एकच आहे तेथें दुसरें कांहीं नाहीं' (छां. ६।२।१) ह्या श्रुतीमध्यें 'एकच आहे' एवढ्यावरूनच 'दुसरें नाहीं' हें समजत असतांना पुढें जो मुद्दाम 'दुसरें नाहीं' असा निषेध केला आहे तो ब्रह्मावरील धर्मांचा निषेध समजण्याकरतांच केला आहे. यावरूनही 'ब्रह्म हें निर्धर्मकच आहे' असें सिद्ध होतें.

९३ 'ब्रह्मापेक्षां दुसरें कांहीं नाहीं' (छां. ६।२।१) असा श्रुतीमध्यें निषेध केला आहे. त्यावरूनही 'आनंद हा गुण ब्रह्मापेक्षां निराळा नाहीं' असें सिद्ध होतें.

९४ 'शेम्यः । ३३ दर्शनात् । ३४ बुध्द्यर्थः' (म.)

९५ 'अमृताचा हा सेतु आहे' (मुं. २।२।५) या श्रुतीमध्यें ब्रह्म हें सेतु आणि अमृत हें सेतुमान् असा प्राप्यप्रापकभावसंबंधाचा निर्देश केला आहे. तसेंच पराहून परपुरुष (मुं. ३।२।८) या श्रुतीमध्यें भेदाचा निर्देश केला आहे.

९६ हें पूर्वपक्ष्याचें सूत्र नव्हे. (शंकराचार्य वगैरेंनीं हें पूर्वपक्षसूत्र मानलें आहे.) 'आनंदरूपी परमात्मा हा सेतु आहे' (बृ. ४।४।२२) ह्या श्रुतीमध्यें परमात्म्याला सेतु म्हटलें आहे. 'ज्या आनंदरूपी परमात्म्यापासून वाणी निवृत्त होतात' (तै. २।४।१) ह्या श्रुतीमध्यें उन्मान म्ह. पूर्णत्व वर्णिलें आहे. 'इतरांचा आनंद हा परमात्म्याच्या आनंदाचा लेशभूत आहे' असा श्रुतीमध्यें (बृ. ४।३।३२) परमात्म्याचा आनंद आणि आमचा आनंद यांमध्यें संबंध सांगितला आहे. तसेंच 'जीवाचें ज्ञान निराळें आणि पर-

३२ सामान्यात्तु ।.

३० [९२]आणि निषेध केला आहे म्हणूनही (हाच सिद्धांत होय). (९)

३१ ब्रह्माच्या पलीकडे (एकतत्व आहे असें) सेतु, उन्मान, संबंध, आणि भेद यांच्या निर्देशावरून (समजतें).

३२ परंतु[९७] साम्यामुळें (तसे निर्देश केले आहेत).

३१ [९३]आणि निषेध केला आहे म्हणूनही (हाच सिद्धांत होय). (१९)

३२ [९६]ह्यां (लौकिक आनंद वगैरे-) पेक्षां (ब्रह्माचे आनंद वगैरे गुण) निराळे आहेत (असें) सेतु, उन्मान, संबंध आणि भेद यांच्या निर्देशावरून (समजतें).

३३ (इतरांचे आनंद वगैरे गुण) दृष्टीस [९८]पडतात.

मात्म्याचें ज्ञान निराळें ' इत्यादि श्रुतीमध्यें आमचें ज्ञान आणि परमात्म्याचें ज्ञान यांमध्यें भेद सांगितला आहे. यावरून ' परमात्म्याचे आनंद, ज्ञान वगैरे गुण कांहीं निराळेच आहेत म्ह. अलौकिक आहेत ' असें सिद्ध झालें.

९७ ' लोकामध्यें सेतूच्या पलीकडे जसा प्रदेश असतो तसें येथें ब्रह्माच्या पलीकडे एखादें तत्व असावें ' असें समजण्याकरितां ब्रह्माला सेतु असें म्हटलें नाहीं. तर ' कांहीं अंशानें ब्रह्माचें सेतूशीं साम्य दाखवावें, या उद्देशानें म्हटलें आहे. ब्रह्म हें संसारसागरांतून तरून जाण्याचा उपाय आहे, हें दाखविण्याकरतां त्याला सेतु म्हटलें आहे. ब्रह्म हें आकाशासारखें निर्लेप आहे हें दाखविण्याकरतां त्याला आकाशाच्या उन्मानाचा निर्देश केला आहे. ब्रह्म हें कामदुधा गाईप्रमाणें इच्छित देणारें आहे हें दाखविण्याकरतां त्याला चार पाय वगैरे उन्मानाचा निर्देश केला आहे. सोळा कलांनीं युक्त असा जो पूर्ण चंद्र त्याप्रमाणें ब्रह्म हें अमृतमय आहे हें दाखविण्याकरतां त्याला सोळा कला आहेत असा उन्मानाचा निर्देश केला आहे. ' ब्रह्म हें अतिदुर्लभ आहे ' असें दाखविण्याकरतां ' ह्याचे ठिकाणीं स्वर्ग व पृथ्वी हे दोन आहेत ' असा आधाराधेयसंबंधाचा निर्देश केला आहे. तसेंच ब्रह्म हें दिव्य आहे हें दाखविण्याकरतां श्रुतीमध्यें (पृ. १९०६ पं. १) भेदाचा निर्देश करून अतिदेश केला आहे. तात्पर्य, ह्या सेतु वगैरे निर्देशावरून सेतु वगैरेंसारख्या इतर गोष्टी ब्रह्माचे ठिकाणीं आहेत असें समजूं नये.

९८ आणि 'परमात्म्याचे आनंद वगैरे गुण अदृष्ट आहेत, व्यवहाराचे अविषय आहेत, शब्दानें सांगतां येत नाहींत' असें कौंडिन्य श्रुतीमध्यें सांगितलें आहे. तात्पर्य, यावरूनही ' परमात्म्याचे गुण अलौकिक आहेत ' असें सिद्ध होतें. मध्वाचार्यांच्या पाठामध्यें ' सामान्यात्तु ' हें सूत्र नाहीं. त्याच्या ऐवजीं ' दर्शनात् ' असें मू. सं. सूत्र आहे.

३३ बुद्ध्यर्थः पादवत् । ३४ स्थानविशेषात्प्रकाशादिवत् ।

३३ बुद्धी- (च्या उपयोगा-) करितां (ब्रह्माला उन्मान कल्पिलें आहे). पादाप्रमाणें (हें होय).	३२ बुद्धी- (च्या उपयोगा-) करितां (ब्रह्माला उन्मान कल्पिलें आहे). पादाप्रमाणें (हें होय).
३४ (संबंध आणि भेद यांचे निर्देश) स्थानभेदामुळें आहेत. प्रकाश वगैरेंप्रमाणें (हें होय).	३३ स्थानभेदामुळें (उन्मान संभवतें). प्रकाश वगैरेंप्रमाणें (हें होय).
३५ आणि (असलेच संबंध आणि भेद) संभवत असल्यामुळें (त्यांचे निर्देश गौण आहेत).	३४ [34]आणि (आपला आपल्याशींच संबंध) संभवत असल्यामुळें (त्यावरून निराळें तत्व सिद्ध होत नाहीं).

९९ ज्याप्रमाणें ‘ सर्व भूतें हीं ह्याचा एक पाद आहे ’ (छां. ३।१२।६) ही पादाची कल्पना उपासनेकरतां केलेली आहे, त्याप्रमाणेंच श्रुतींमध्यें (पृ. १०९६ पं. ५ पहा) केलेला धर्मांचा अतिदेश बुद्धीकरितां म्ह. उपासनेकरितां केला आहे.

१०० परमात्म्याचे गुण जरी व्यवहाराचे विषय नाहींत तरी त्यांना आनंद वगैरे शब्द देण्याचें कारण इतकेंच कीं, आमच्या आनंद वगैरे गुणांवरून त्याच्या अलौकिक गुणांची थोडी तरी कल्पना मनांत यावी. ज्याप्रमाणें परमात्म्याच्या स्वरूपाची आपल्याला कल्पना करतां यावी म्हणून ‘ हीं सर्व भूतें हा ह्याचा एक पाद आहे’ अशी पादाची कल्पना केली आहे त्याप्रमाणेंच हें होय.

१०१ ज्याप्रमाणें सूर्य वगैरेंचा प्रकाश हा सर्वत्र व्याप्त असूनही तो खिडकी वगैरेंमधून आला म्हणजे लहानसा भासतो त्याप्रमाणें वाणी वगैरे भिन्न भिन्न स्थानांच्या संबंधानें ब्रह्माला उन्मान म्ह. एक प्रकारचें परिमाण संभवतें.

१०२ शं. सूर्यमंडलांतील पुरुषाच्या धर्मांचा चक्षूमधील पुरुषावर जो अतिदेश केला आहे तो करूं नये. फक्त ‘ तोच हा पुरुष आहे ’ असें दोघांचें ऐक्य सांगितलें म्हणजे अर्थातच तशी बुद्धी होईल. उ. ज्याप्रमाणें प्रकाश हा एक असूनही ह्याचे ठिकाणीं सूर्य, चंद्र, अग्नि वगैरे भिन्न भिन्न स्थानांमुळें भिन्न भिन्न धर्म भासतात त्याप्रमाणें पुरुष हा एक असूनही सूर्यमंडल, चक्षु वगैरे भिन्न भिन्न स्थानामुळें ह्याचे ठिकाणीं भिन्न भिन्न धर्म भासूं लागतील, ते भासूं नयेत म्हणून मुद्दाम श्रुतींमध्यें धर्मांचा अतिदेश

३५ उपपत्तेश्च ।

३३ (धर्मांचा[१००] अतिदेश) बुद्धी-करितां (केला आहे). पादा-प्रमाणें (हें होय).	३४ (लोकांना[१०१]) समजण्याक-रितां (परमात्म्याच्या गु-णांना आनंद वगैरे शब्द दिले आहेत). पादाप्रमाणें (हें होय). (१६)
३४ स्थानभेदामुळें[१०२] (अतिदेश केला आहे). प्रकाश वगैरें-प्रमाणें (हें होय).	३५ स्थानभेदामुळें[१०३] (इतरांच्या आनंद वगैरे गुणांमध्यें तार-तम्य आहे). प्रकाश वगैरें-प्रमाणें (हें होय).
३५ आणि[१०५] संभवत असल्यामुळें-ही (ब्रह्म हेंच उत्कृष्ट तत्व होय).	३६ आणि[१०६] संभवत असल्यामुळें-ही (इतरांच्या आनंद वगैरे गुणांमध्यें तारतम्य सिद्ध होतें). (१७)

केला आहे. तेव्हां पुरुषापेक्षां निराळें तत्व सिद्ध होत नाहीं.

१०३ शं. ब्रह्मदेवापासून अगदीं लहानशा किड्यापर्यंत सर्व जीवांचे जे आनंद ते सर्व परमात्म्याच्या आनंदाचें प्रतिबिंबस्वरूप आहेत. आतां जर त्यांच्या मध्यें तारतम्य म्ह. व मजास्तपणा असेल तर मूळामध्यें तो असलाच पाहिजे. उ. ज्याप्रमाणें सूर्याचा प्रकाश हा एकसारखा असूनही त्याला अयस्कांतमणि हें स्थान मिळालें म्हणजे त्यापासून अग्नि उत्पन्न होतो आणि इतर स्थान मिळालें असतां अग्नि उत्पन्न होत नाहीं असें तारतम्य दृष्टीस पडतें त्याप्रमाणेंच हें होय.

१०४ परमात्मा प्राप्त होण्याला उपायभूत असा सेतु परमात्माच आहे. कारण तो प्राप्त होण्याला त्याचीच कृपा झाली पाहिजे असें श्रुतीवरून (का. २।२३) समजतें. तेव्हां 'परमात्माच सेतु आणि तोच सेतुमान्' असा आपला आपल्याशींच संबंध संभवतो.

१०५ ब्रह्मामध्यें जर कांहीं गुण कमी असते तर त्या गुणांनीं युक्त असें ब्रह्मापेक्षां एक निराळें-उत्कृष्ट तत्व पूर्वपक्ष्याला मानतां आलें असतें. तेव्हां ब्रह्म हेंच सर्व गुणांनीं युक्त असें संभवत असल्यामुळें तेंच सर्वांपेक्षां उत्कृष्ट असें मुख्य तत्व होय. त्यापेक्षां निराळें कांहीं तत्व नाहीं.

१०६ ब्रह्मदेव वगैरे जीवांमध्यें जशी ज्याची परमात्म्याचे ठिकाणीं भक्ति असेल त्या मानानें त्याला आनंद वगैरे गुण प्राप्त होणें हें योग्यच आहे. कारण परमात्म्याचें ऐश्वर्य विलक्षण आहे.

३६ तथान्यप्रतिषेधात्[१०७] । ३७ अनेन सर्वगतत्वमायामशब्दादिभ्यः[१११] ।

३६ तसेंच अन्य (वस्तू-) चा निषेध केला असल्यामुळें- (ही ब्रह्माहून निराळी दुसरी वस्तु नाहीं).	३५ तसेंच अन्य (वस्तू-) चा निषेध केला असल्यामुळें- (ही ब्रह्माहून निराळी दुसरी वस्तु नाहीं).
३७ यावरून (आत्म्याचें) सर्वव्यापित्व (सिद्ध होतें). आयामशब्द वगैरेंवरून-(हीं हेंच समजतें). (७)	३६ [११२] या (आत्म्या-) नें सर्व व्यापिलें आहे (असें) आयामशब्द वगैरेंवरून (समजतें). (७)
३८ (कर्मांचीं) फळें या (ईश्वरा-) पासूनच (प्राप्त होतात). कारण तसेंच संभवतें.	३७ या (ईश्वरा-) पासूनच [११५]फळें (प्राप्त होतात) कारण तसेंच संभवतें.

१०७ 'थान्यत्प्रति' (म.)

१०८ 'पराहून पर पुरुष' (मुं. ३।२।८) या श्रुतीमध्यें जरी भेदाचा निर्देश केला आहे तरी श्वेताश्वतर उपनिषदामध्यें (३।९) 'ज्याच्या पलीकडे दुसरें कांहीं नाहीं' असा स्पष्टच निषेध केला आहे. 'पराहून पर' याचा अर्थ, 'पर जो समष्टि दृश्य विराट त्याहून अदृश्य जो परमात्मा तो पर आहे' असा जाणावा.

१०९ 'त्याच्या सारखा किंवा त्यापेक्षां अधिक असा कोणीच दिसत नाहीं' (श्वे. ६।८) असा श्रुतीमध्यें निषेध केला आहे.

११० शं. ब्रह्माचें रूप अव्यक्त नाहीं. कारण ध्यानकाळीं तें व्यक्त होत आहे. उ. ज्याप्रमाणें जीवाच्या आनंदापेक्षां ब्रह्माचा आनंद निराळा आहे त्याप्रमाणें ध्यानकाळीं जें रूप व्यक्त होतें तें ब्रह्माच्या खऱ्या रूपापेक्षां निराळें आहे. कारण ध्यानकाळीं जें भासतें त्यामध्यें दोषही संभवतात. आणि ब्रह्म तर निर्दुष्टच आहे. 'ज्याचा मनानें विचार करतां येत नाहीं' (के. ५) या श्रुतीनें 'ब्रह्म हें मनोगम्य नाहीं', असा निषेध केला आहे. फक्त तें ध्यानकाळचें रूप कांहीं अंशानीं ब्रह्मासारखें मात्र असूं शकेल.

१११ 'त्वमायामयशब्दा' (म.)

११२ 'त्यानें हें सर्व व्यापिलें आहे' (श्वे. ३।९), 'नारायण हा ह्या सर्वांला आंतून व बाहेरून व्यापून राहिला आहे' (म. ना. ११।६) इत्यादि श्रुतीमधील ब्रह्माचें व्यापकत्व दाखविणारे जे शब्द त्यांनाच 'आयाम' शब्द म्हणतात. तात्पर्य 'हें

३८ फलमत उपपत्तेः ।

३६ तसेंच अन्य (वस्तू-) चा निषेध केलीं[११२] असल्यामुळें- (ही ब्रह्माहून निराळें उत्कृष्ट तत्व नाहीं).

३७ यां[११३] (कारणा-) नें आयामशब्द वगैरेंवरून (आत्म्याचें) सर्वव्यापित्व (सिद्ध होतें). (१८)

३८ यां[११६] (ईश्वरा-) पासूनच फळें (प्राप्त होतात). कारण तसेंच संभवतें.

३७ तसेंच (श्रुतीमध्यें) निषध केला असल्यामुळें (ध्यानकालीं भासणारें रूप ब्रह्माच्या रूपापेक्षां) निराळें आहे. (१८)

३८ सर्वव्यापित्व[११४], मायामय शब्द, वगैरे (कारणां-) वरून ह्या (परमात्म्या-) च्या योगानें- (च सर्व जगाची प्रवृत्ति होते असें समजतें). (१९)

३९ (कर्मांचीं) फळें या (ईश्वरा-) पासूनच (प्राप्त होतात). कारण तसेंच[११७] संभवतें.

ब्रह्मच सर्वांहून पर आहे; ह्याच्या पलीकडे दुसरें कांहीं नाहीं ' असें सिद्ध झालें.

११३ या कारणानें म्हणजे ब्रह्मापेक्षां उत्कृष्ट असें अन्य तत्व नाहीं असें सिद्ध केल्यामुळें. जर ब्रह्मापेक्षां निराळें उत्कृष्ट तत्व असतें तर त्यापेक्षां ब्रह्म हें मर्यादित होत असल्यामुळें त्याचें सर्वव्यापित्व सिद्ध झालें नसतें.

११४ ' परमात्मा हा सर्वव्यापी आहे ' असें भाल्लवेय श्रुतीमध्यें सांगितलें आहे. त्या सर्वव्यापित्वाचा उपयोग ' सर्व जगाची प्रवृत्ती होणें ' हाच होय. कारण ' परमात्मा हा सर्व पदार्थांमध्यें प्रवेश करून त्यांना नांवारूपाला आणतो ' असें श्रुतीमध्येंच सांगितलें आहे. तसेंच चतुर्वेदशिखेमध्यें विष्णूच्या मायारूपी नित्य शक्तीच्या योगानें सर्व जग प्रवृत्त होतें म्हणून विष्णूला ' मायामय ' म्हणतात असें सांगितलें आहे. आणि ' विष्णूपेक्षां दुसऱ्यापासून जगाची प्रवृत्ति होते असें मानण्याला कांहीं प्रमाण नाहीं ' हें कारण सूत्रांतील ' वगैरे ' शब्दानें घ्यावें.

११५ येथें फल शब्दानें स्त्री पुत्र वगैरे ऐहिक फलें, स्वर्ग वगैरे आमुष्मिक फळें, आणि मोक्ष हीं घ्यावीत.

११६ ज्या अर्थी श्रुतीमध्यें (बृ. ४।४।२२) परमात्मा हा सर्वांचा नियंता आहे असें सांगितलें आहे त्या अर्थी तोच फलदाता आहे असें मानलें पाहिजे.

११७ ' कर्म हें फल देतें ' असें म्हणणें संभवत नाहीं. कारण कर्म हें अचेतन आहे.

३९ श्रुतत्वाच्च । ४० धर्मं जैमिनिरत एव ।

३९ आणि श्रुतीमध्यें (तसेंच) सांगितलें आहे.	३८ आणि श्रुतीमध्यें (तसेंच) सांगितलें आहे.
४० धर्म (हा फलें देतो) असें याच (कारणा-) वरून जैमिनि म्हणतो.	३९ धर्म (हा फलें देतो) असें याच (कारणा-) वरून जैमिनि म्हणतो.
४१ परंतु प्रथम (सांगितलेला ईश्वरच फलाचें कारण आहे) असें बादरायण म्हणतो. कारण (त्याला कर्माचेंही) कारण म्हटलें आहे. (८)	४० परंतु प्रथम (सांगितलेला ईश्वरच फलाचें कारण आहे असें) बादरायण म्हणतो. कारण (श्रुतीमध्यें त्याचाच) हेतु अशा रूपानें निर्देश केलों[१२०] आहे. (८)

११८ ‘ दाता जो (यजमान) त्याला ब्रह्म हें राति (म्ह. फळ देणारें) आहे ’ (बृ. ३।९।२८) अशी श्रुती आहे.

११९ ‘हा परमात्माच चांगलें व वाईट कर्म करवितो’ असें श्रुतीवरून (कौ. ३।८) समजतें. तेव्हां अर्थातच त्या कर्मापासूनच फळ प्राप्त होतें असें जैमिनीचें मत आहे.

१२० यज्ञ वगैरे कर्मामध्यें वायु वगैरे देवता फलें देतात असें ‘ तो (वायू-) च त्या (यजमानां-) ना ऐश्वर्य देतो ’ (तै. सं. २ । १ । १) इत्यादि श्रुतीवरून समजतें.

४१ पूर्वं तु बादरायणो हेतुव्यपदेशात् ॥ तृतीयेऽध्याये द्वितीयः पादः ॥

---

३९ आणि श्रुतीमध्यें (तसेंच) सांगितलें आहे.

४० धर्म (हा फलें देतो) असें याच (कारणा-) वरून जैमिनि म्हणतो.

४१ परंतु प्रथम (सांगितलेला ईश्वरच फलाचें कारण आहे) असें बादरायण म्हणतो. कारण (त्याला कर्माचेंही) कारण म्हटलें आहे). (११)

४० आणि [११८] श्रुतीमध्यें (तसेंच) सांगितलें आहे.

४१ [११९] यां (ईश्वरा-) पासूनच (उत्पन्न झालेले) धर्मा- (धर्म फलें देतात असें) जैमिनि म्हणतो.

४२ परंतु प्रथम (सांगितलेला ईश्वरच फलें देतो असें) बादरायण म्हणतो. कारण (श्रुतीमध्यें त्यालाच फलाचें) कारण असा व्यवहार केला [१२०] आहे. (२०)

आणि ' वायु वगैरे देवतांचें नियमन करणारा त्यांचा अंतर्यामि, परमात्माच आहे ' असें श्रुतीवरून-(बृ. ३।७।७) च सिद्ध होत आहे. तेव्हां ईश्वरच फलें देतो असें सिद्ध झालें.

१२१ ''परमात्मा हा पुण्य कर्माच्या योगानें पुण्य लोकांमध्यें नेतो ' असें श्रुतीमध्यें (प्र. ३।७) सांगितलें आहे. तात्पर्य, फळ देणारा ईश्वरच आहे. आतां जैमिनीनें सांगितल्याप्रमाणें कर्मही कारण आहे. परंतु तें फक्त ईश्वराला फळ देण्याच्या कार्मी सहाय मात्र होतें असें समजावें.

१ सर्ववेदान्तप्रत्ययं चोदनाद्यविशेषात् ।

अध्याय ३ पाद ३

१ चोदना वगैरेंच्या ऐक्यामुळें सर्व वेदांतामध्यें सांगितलेलीं (ज्ञानें एकच) आहेत.	१ चोदना वगैरेंच्या ऐक्यामुळें सर्व वेदांतामध्यें सांगितलेल्या (उपासना एकच) आहेत.
२ (गौण गोष्टी) भिन्न असल्यामुळें (विद्या एक) नाहीं असें म्हणशील तर	२ (कांहीं गोष्टींमुळें विधेय-) भेद (भासतो) म्हणून (उपासना एक) नाहीं

१ बृहदारण्यकामध्यें (५।९) आणि छांदोग्यामध्यें (५।१२) सांगितलेली वैश्वानराची उपासना एकच आहे. याप्रमाणेंच दहरोपासना वगैरेंविषयीं समजावें.

२ शं. सर्व वेदांत वाक्यांमध्यें उपास्य एक नाहीं. कारण प्रत्येक ठिकाणीं निरनिराळ्या तऱ्हेनें वर्णन केलें आहे. आणि त्यांपैकीं अमुक ठिकाणीं ब्रह्मच उपास्य आहे असा निश्चय होत नसल्यामुळें सर्व उपासना ब्रह्माच्या नव्हेत असें मानावें लागतें उ. सर्व उपासनांमध्यें विधिवाक्यें सारखींच आहेत. आणि मोक्षरूपी फळही सर्व ठिकाणीं एकच सांगितलें आहे. तेव्हां—' सर्व उपासना ब्रह्माच्याच आहेत ' असें सिद्ध होतें. आणि ब्रह्माचीं अनंत रूपें असल्यामुळें ही गोष्ट संभवते. आतां सर्व जीव सारखे नसल्यामुळें सर्वांना एकसारखी ब्रह्माची उपासना करतां येणार नाहीं म्हणून वेदांतामध्यें एका ब्रह्माचेंच अनेक ठिकाणीं अनेक रूपांनीं वर्णन केलें आहे.

३ शं. प्रत्येक जिज्ञासू मनुष्यानें आपआपल्या शाखेमध्यें सांगितलेल्या रीतीनेंच ब्रह्माचें ध्यान करावें. कारण प्रत्येक शाखेमध्यें निरनिराळ्या प्रकारांनीं ब्रह्माचें वर्णन केलें आहे उ. प्रत्येक मनुष्यानें सर्व शाखांमध्यें सांगितलेल्या रीतीनें श्रवण व मनन केलें म्हणजे त्याला ब्रह्माचें ज्ञान होतें. कारण सर्व शाखांमध्यें चोदना म्ह. विधि एकसारखाच आहे. ' अमक्या शाखेच्या मनुष्यानें अमुक प्रकारानें ब्रह्माचें ध्यान करावें ' असा विशेष प्रकारचा विधि कोठेंच सांगितला नाहीं.

४ ' चेदेक ' (रा. व. म.)

५ शं. छांदोग्य आणि बृहदारण्यक या दोन्ही ठिकाणच्या वैश्वानरोपासनेमध्यें विधेय भिन्न आहे असें भासतें. कारण तीं दोन भिन्न भिन्न प्रकरणें आहेत. शिवाय जर

२ भेदान्नेति [४]चेन्नैकस्यामपि ।

अध्याय ३ पाद ३

१ सर्व[२], वेदांत–(वाक्यां-) वरून (ब्रह्म) समजलें जातें. कारण चोदना वगैरेंचें ऐक्य आहे.

२ (गौण[६] गोष्टी) भिन्न असल्यामुळें (उपासना एक) नाहीं असें म्हणशील तर

१ (ब्रह्म[३] हें) सर्व वेदाच्या (अर्थाचा) निश्चय झाला म्हणजे समजतें. कारण चोदना वगैरेंचें ऐक्य आहे.

२ (भिन्न[७] भिन्न शाखांमध्यें) भिन्न भिन्न प्रकार (सांगितले) असल्यामुळें (प्रत्येक

विधेय एकच असेल तर एकच गोष्ट दोनदां सांगण्याचें कांहींच कारण दाखवितां येत नाहीं. तेव्हां यावरून त्या दोन उपासना भिन्न आहेत असें समजतें. उ. प्रकरण भिन्न असण्याचें कारण ' श्रोते भिन्न आहेत ' हें होय. आणि श्रोते भिन्न आहेत म्हणूनच एकच गोष्ट दोनदां सांगितली आहे तेव्हां त्यावरून ' विधेय भिन्न आहे ' असें सिद्ध होत नाहीं.

६ ज्याप्रमाणें अतिरात्र नामक यज्ञामध्यें कांहीं ठिकाणीं षोडशीचें (एक पात्राचें) ग्रहण करतात आणि कांहीं ठिकाणीं करीत नाहींत, परंतु तेवढ्या भेदावरून तो यज्ञ भिन्न होत नाहीं, त्याप्रमाणेंच ही ब्रह्माची उपासना भिन्न होत नाहीं. तेव्हां ब्रह्माची सामान्यरूपानें जो उपासना करतो त्यानें एका ठिकाणीं सांगितलेल्या गुणांचा अन्य ठिकाणीं संग्रह करावा आतां जो ' ओम् हें अक्षर ब्रह्म आहे ' अशी ब्रह्माची विशेषरूपानें उपासना करतो त्यानें अन्य ठिकाणीं जे गुण ओम् ह्या अक्षराच्या उपासनेमध्यें सांगितले असतील त्यांचाच संग्रह करावा; इतरांचा संग्रह करूं नये.

७ शं. ' ब्रह्म हें विज्ञानरूप आणि आनंदरूप आहे ' असें एका शाखेमध्यें (बृ. ३।९।२८) सांगितलें आहे. आणि ब्रह्म हें सत्य, ज्ञान आणि अनंत आहे असें एका शाखेमध्यें (तै. २।१।१) सांगितलें आहे. असा भेद असल्यामुळें प्रत्येक मनुष्यानें आपआपल्या शाखेमध्यें सांगितल्याप्रमाणेंच ब्रह्माचें ध्यान केलें पाहिजे. उ. हें म्हणणें बरोबर नाहीं. कारण एका शाखेमध्यें देखील अनेक प्रकार सांगितले आहेत. उदा. ' आत्मा या रूपानेंच उपासना करावी ' (बृ. १।४।७) ' ब्रह्म हें एक आहे ' (बृ. १।२।१) इत्यादि. तात्पर्य, अनेक ठिकाणीं अनेक धर्म जरी सांगितले आहेत तरी धर्मी जें ब्रह्म तें सर्व ठिकाणचें एकच आहे असें समजावें.

३ स्वाध्यायस्य तथात्वेन हि

नाहीं. (कारण) एका विद्येमध्यें देखील (गौण गोष्टी भिन्न असूं शकतात).

असें म्हणशील तर (नाहीं. कारण) एका (उपासने-) मध्यें देखील (तसल्या गोष्टी असूं शकतात).

३ (मस्तकावर अग्नि धारण करण्याचें व्रत हा) वेदाध्ययनाचा (धर्म आहे). कारण 'समाचार' (ग्रंथा-) मध्यें तें त्या रूपानेंच (सांगितलें आहे). शिवाय, प्रकरणावरून (असेंच समजतें). तसेंच, होमाप्रमाणें (हें आथर्वणिकांनाच) नियमानें सांगितलें आहे.

३ वेदाध्ययनाला तसा (म्ह. एक प्रकारचा संस्कार) होण्याकरितां (मस्तकावर अग्नि धारण करण्याबद्दलचा) तो नियम सांगितला आहे. (तो विद्येचा धर्म नव्हे. कारण त्याचा अध्ययनाशीं संबंध सांगितला आहे.) शिवाय समाचार ग्रंथामध्यें असाच अतिदेश केला आहे. आणि होमाप्रमाणें तो नियम आहे.

८ 'त्वे हि' (रा.)

९ 'राच । ४ सलिलवच्च त' (म.)

१० तेव्हां तैत्तिरीय, वाजसनेयि वगैरे शाखांच्या लोकांनीं आपआपल्या शाखेमध्यें सांगितल्याप्रमाणेंच अग्निष्टोम वगैरे यज्ञ करावेत. त्यामध्यें इतर शाखेला अनुसरून कमजास्तपणा करूं नये. शिष्टाचारही असाच आहे. पंचाग्निविद्या वगैरेंविषयीं देखील हीच व्यवस्था जाणावी.

११ 'स्वाध्यायाचें अध्ययन करावें' हा विधि सर्वसाधारण आहे. अमक्या मनुष्यानें अमुकच शाखेचें अध्ययन करावें असा विशेष तेथें सांगितला नाहीं. तसेंच सर्व

समाचारेऽधिकाराच्च सववच्च तन्नियमः ।

(नाहीं. कारण) एका उपासनेमध्यें देखील (भिन्न धर्म असूं शकतात).

३ वेदानें सांगितलेले (यज्ञ वगैरे) चांगले आचार (जसे सांगितले) तसेच करण्याबद्दल नियम आहे. (मनुष्यांना आपआपल्या शाखेमध्यें सांगितलेल्या कर्माचाच) अधिकार असल्यामुळेंही (हेंच सिद्ध होत). होमाप्रमाणें हें होय°.

मनुष्याला सर्व शाखांची जरूर) नाहीं असें म्हणशील तर (तसें नाहीं. कारण) एका (शाखे-)मध्यें देखील (भिन्न भिन्न प्रकार सांगितले आहेत).

२ (शिवाय सर्व शाखेच्या लोकांना सर्व) वेदाध्ययनाचा तसा (म्हणजे साधारण विधि) आहे. आणि (सर्व वेदांमध्यें सांगितलेल्या गोष्टींनें) आचरण करण्याचा (सर्वांना सारखाच) अधिकार आहे.

४ आणि[१२] उदकाप्रमाणें तो नियम आहे.

वेदांत सांगितलेल्या गोष्टींचा अधिकार सर्वांना आहेच. आतां प्रत्येक मनुष्याला सर्व गोष्टी करण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें शाखाभेदाची व्यवस्था केली हें निराळें आहे. परंतु तेवढ्यावरून इतर शाखेंतल्या गोष्टी करण्याचा अधिकार नाहींसा होत नाहीं.

१२ 'प्रत्येक मनुष्यानें सर्व वेदांमध्यें सांगितलेल्या रीतीनें ब्रह्माचें ध्यान करावें' हा जो नियम आहे तो शक्तीला अनुसरून आहे. तेव्हां एखाद्या मंद बुद्धीच्या मनुष्याला सर्व शाखांचें ज्ञान नसलें तरी त्याला त्याच्या शक्तीप्रमाणें ब्रह्माचें ध्यान करण्यास हरकत नाहीं. ज्याप्रमाणें 'सर्व पाणी समुद्रामध्यें जातें' हा नियम प्रवाहाच्या शक्तीला अनुसरून आहे त्याप्रमाणेंच हें होय.

४ दर्शयति च ।

४ (वेद-) ही (असेंच) सांगतो. (१)

५ (ज्ञान) एक असतांना उपयोग भिन्न नसल्यामुळें (अंगभूत गोष्टींचा) संग्रह होतो. विधींना अंगभूत अशा गोष्टी-प्रमाणें हें होय. (२)

४ (वेद[१३]-) ही (असेंच) सांगतो.

५ एका (उपासने-) मध्यें (एका ठिकाणीं सांगितलेल्या अंगभूत गोष्टींचा अन्य ठिकाणीं) संग्रह होतो. कारण ज्याप्रमाणें (एका ठिकाणीं सांगितलेल्या) विधी-च्या अंगभूत गोष्टींचा उपयोग होतो त्याप्रमाणेंच (अन्य ठिकाणीं सांगितलेल्यांचाही होतो). (१)

१३ छांदोग्यामध्यें (८।१।२) हृदयांतील आकाशाच्या आंत जें कांहीं आहे त्याची उपासना करावी असें सांगून पुढें तें काय आहे असा प्रश्न करून नंतर परमात्म्याचे पापरहितत्व वगैरे आठ गुण सांगितले आहेत. त्यावरून 'पापरहितत्व वगैरे गुणांनीं युक्त असा परमात्मा हृदयामध्यें आहे त्याची उपासना करावी' असें समजतें. आणि हें गृहीत धरूनच तैत्तिरीयकामध्यें (म. ना. १०।७) 'हृदयांतील आकाशाच्या आंत जें आहे त्याची उपासना करावी' इतकेंच सांगितलें आहे. यावरून 'या दोन्ही ठिकाणची उपासना एकच आहे' असें सिद्ध होतें. जर उपासना भिन्न असत्या तर तैत्तिरीयकामध्यें 'हृदयाकाशाच्या आंत अमुक आहे, त्याची उपासना करावी' असें सांगितलें असतें.

१४ असेंच म्हणजे 'उपास्य वस्तू एक असली म्हणजे विद्या एक असते' असेंच. किंवा 'उपासनांचे निरनिराळे प्रकार असल्यामुळें उपास्य वस्तू भिन्न भिन्न होते असें मानलें तर दोष आहे' असेंच. (क. २।१५; तै. २।७ पहा.)

१५ 'परमात्मा हा सर्व वेदाच्या योगानें जाणण्यास योग्य आहे' असें चतुर्वेद-शिखेमध्यें सांगितलें आहे.

९ उपसंहारोऽर्थाभेदाद्विधिशेषवत्समाने च ।

४ (वेद-) ही (असेंच[१४]) सांगतो.	९ (वेद[१५]-) ही (असेंच) सांगतो. (१)
५ (परमात्मरूपी[१६]) अर्थ भिन्न नसल्यामुळें (एका ठिकाणीं सांगितलेल्या धर्मांचा दुसऱ्या ठिकाणीं) संग्रह होतो. आणि ज्याप्रमाणें (धर्म) एक असतांनाही, विधीच्या अंगभूत गोष्टींचा (अन्यशाखेमध्यें संग्रह होत नाहीं) त्याप्रमाणें- (च येथें समजावें).	६ (वेदांचा[१७]) तात्पर्यार्थ भिन्न नसल्यामुळें (एका ठिकाणीं सांगितलेल्या त्याच्या धर्मांचा सर्व उपासनांमध्यें) संग्रह होतो. विधींना अंगभूत अशा गोष्टींप्रमाणें हें होय. आणि सारख्याचा-(च हा संग्रह होतो).

१६ रामाच्या उपासनेप्रमाणें कृष्णाच्या उपासनेमध्यें ' रघूंमध्यें श्रेष्ठ ' ' रावणाला मारणारा ' इत्यादि गोष्टींचा संग्रह होतो. कारण परमात्मरूपी उपास्य वस्तु दोन्ही ठिकाणीं एकच आहे. आतां कृष्णावताराच्या उपासनेमध्यें वराहावताराच्या उपासनेप्रमाणें शिंग वगैरेंची मात्र भावना करूं नये. ज्याप्रमाणें सर्व शाखांमधील अग्निहोत्रांचा अग्निहोत्रत्व धर्म जरी एक आहे तरी मनुष्य हे आपआपल्या शाखेंत सांगितल्याप्रमाणेंच अंगभूत गोष्टींचा संग्रह करितात त्याप्रमाणें मत्स्य वगैरेंची अवतार रूपानें जो उपासना करतो त्यानें त्या अवतारामध्यें संभवणाऱ्या गोष्टींचाच संग्रह केला पाहिजे.

१७ ब्रह्माचे ठिकाणीं आनंद वगैरे गुण आहेत आणि दोष नाहींत हा सर्व वेदांचा तात्पर्यार्थ एकच आहे. तेव्हां एका उपासनेमध्यें जरी कांहीं गुण सांगितले असले तरी त्या उपासनेमध्यें इतर ठिकाणीं सांगितलेल्या आनंद वगैरे गुणांचा आणि पापराहितत्व वगैरे दोषाभावांचा संग्रह होतो. रोदन वगैरे दोषांचा मात्र संग्रह होत नाहीं. कारण उपासनेमध्यें सांगितलेले जे धर्म ते गुणरूप किंवा दोषाभावरूप असल्यामुळें त्यांचा दोषांशीं सारखेपणा संभवत नाहीं. तात्पर्य, दोष हे उपासनेमध्यें घेण्याला योग्य नाहींत.

६ अन्यथात्वं शब्दादिति चेन्नाविशेषात् ।

६ शब्द (भिन्न) असल्यामुळें (उद्गीथ-विद्या) भिन्न आहेत असें म्हणाल तर नाहीं. कारण (पुष्कळ गोष्टी) एक आहेत.

७ परंतु प्रकरणें भिन्न असल्यामुळें (विद्या भिन्नच आहेत). ' मोठ्याहून मोठा ' इत्यादि (उपासनां-) प्रमाणें हें होय.

६ शब्द (भिन्न) असल्यामुळें (उद्गीथ-विद्या) भिन्न आहेत असें म्हणाल तर नाहीं. कारण (उपक्रम) एकसारखाच आहे.

७ परंतु प्रकरणें भिन्न असल्यामुळें (विद्या भिन्नच आहेत). ' मोठ्याहून मोठा ' इत्यादि (उपासनां-) प्रमाणें हें होय.

१८ ' थात्वं च श ' (म.)

१९ बृहदारण्यकामध्यें ' कर्त्याचे ठिकाणीं म्ह. गाणाऱ्याचे ठिकाणीं प्राणाची दृष्टी करावी ' असा शब्द आहे. आणि छांदोग्यामध्यें ' कर्माचे ठिकाणीं म्ह. जें गायलें जातें त्याचे ठिकाणीं प्राणाची दृष्टी करावी ' असा शब्द आहे. परंतु तेवढ्यावरून ही उद्गीथ-विद्या भिन्न होत नाहीं. कारण दोन्ही ठिकाणीं शत्रूच्या पराभवाचा उपक्रम करून ही विद्या सांगितली आहे. बृहदारण्यकामध्यें कर्मकर्तरि प्रयोगाप्रमाणें गाण्याचें कर्म घेतलें असतां शब्दांचा भेदही होत नाहीं असा पूर्वपक्ष्याचा अभिप्राय आहे.

२० शं. शांत अशा रूपानें केली जाणारी जी परमात्म्याची उपासना तीमध्यें अन्य ठिकाणीं परमात्म्याच्याच उपासनेमध्यें सांगितलेल्या क्रूर अशा रूपाचा संग्रह केला तर त्याचें अनेक तऱ्हेचें स्वरूप आहे असें मानावें लागेल. आणि त्यामुळें तें स्वरूप परमात्म्याचें नव्हे असें होईल. कारण परमात्मा एक तऱ्हेचा आहे असा शब्द (म्ह. श्रुती) आहे. उ. ज्याप्रमाणें श्रुतीवरून परमात्मा एक तऱ्हेचा मानला आहे त्याप्रमाणें श्रुतीवरूनच परमात्मा अनेक तऱ्हांचाही मानावा. अमुक श्रुती मानावी आणि अमुक श्रुती मानूं नये असा त्यांत कांहीं विशेष नाहीं. आतां शांत व क्रूर हीं स्वरूपें जरी परस्पर विरुद्ध भासतात तरी परमात्म्याचे ठिकाणीं परस्पर विरुद्ध होत नाहींत असें श्रुतीच्या जोरावर समजावें.

७ न वा प्रकरणभेदात्परोवरीयस्त्वादिवत् ।

६ शब्दांवरून[२०] (परमात्म्याच्या स्वरूपाला) निराळेपणा येईल असें म्हणशील तर नाहीं. कारण विशेष नाहीं.	७ शब्दावरून[२१] (संग्रह) होत नाहीं असें म्हणशील तर नाहीं. कारण विशेष नाहीं.
७ किंवा[२२] प्रकरणें भिन्न असल्यामुळें (परमात्म्याच्या स्वरूपाला निराळेपणा येत) नाहीं. ' मोठ्याहून मोठा ' इत्यादि (उपासनां-) प्रमाणें हें होय.	८ किंवा प्रकरणें भिन्न असल्यामुळें (गुणांचा संग्रह होत) नाहीं. ' मोठ्याहून मोठा ' इत्यादि (उपासनां-[२३]) प्रमाणें हें होय.

२१ ' आत्मा या रूपानेंच उपासना करावी ' (बृ. १।४।७) या श्रुतीमधील ' च ' या शब्दावरून गुणांचा संग्रह होत नाहीं असें समजूं नये. कारण ' गुणांचा संग्रह करूं नये ' असें विशेषवचन नाहीं. शिवाय ' सर्व गुणांनीं उपासना करावी ' असें विशेषवचन आहे. आत्मभिन्न रूपानें उपासना करूं नये हें श्रुतीमधील ' च ' या शब्दाचें तात्पर्य जाणावें.

२२ उपासक लोक अनेक तऱ्हांचे असल्यामुळें ज्याच्या त्याच्या अधिकाराप्रमाणें भिन्न भिन्न प्रकरणांमध्यें भिन्न भिन्न गुण सांगितले आहेत. वास्तविक रीतीनें परमात्म्याचे ठिकाणीं सर्व गुण आहेत. परंतु उपासकानें आपल्या अधिकाराप्रमाणें भावना करावी प्रकरण शब्दाचा अधिकार असाही अर्थ आहे. ज्ञानप्रकरणामध्यें ज्ञानाला योग्य असें अदृश्य वगैरे रूप सांगितलें आहे (मुं. १।१।६), आणि भक्तिप्रकरणामध्यें भक्ती अनेक तऱ्हेची असल्यामुळें भक्तांच्या अधिकाराप्रमाणें अथर्वणोपनिषद वगैरे अनेक ठिकाणीं अनेक तऱ्हांचें रूप सांगितलें आहे.

२३ ह्या उपासनेमध्यें ' मोठ्याहून मोठा ' इत्यादि कांहीं गुणच उपास्य या रूपानें सांगितले आहेत.

८ संज्ञातश्चेत्तदुक्तमस्ति तु तदपि ।

८ संज्ञा (एक) असल्यामुळें (विद्या एक आहे) असें म्हणशील तर (तेंही जुळत नाहीं) हें (वर) सांगितलें आहे. (शिवाय भिन्न विद्यांच्या ठिकाणीं) देखील (संज्ञा एक) असूं शकते. परंतु (जेथें विद्या भिन्न मानण्याला कांहीं कारण नाहीं तेथें संज्ञा एक असल्यामुळें विद्या एक असूं शकेल). (३)

९ आणि (ओम् हें अक्षर सर्व वेदांना) व्याप्त करीत असल्यामुळें (त्याचें उद्गीथ हें विशेषण आहे असेंच मानणें) संगतवार आहे. (४)

८ संज्ञा (एक) असल्यामुळें (विद्या एक आहे) असें म्हणशील तर (तेंही जुळत नाहीं) हें (वर) सांगितलें आहे. शिवाय (भिन्न विद्यांच्या ठिकाणीं) देखील (संज्ञा एक) असूं शकते.

९ आणि (छांदोग्यांतील पुढील विद्यांमध्यें उद्गीथाचा अवयव जो प्रणव त्याची उपास्य या रूपानें) व्याप्ति असल्यामुळें (येथला उद्गीथ शब्द प्रणवालाच लाविला आहे असें मानणें) संगतवार आहे. (२)

२४ नित्य आणि अनित्य अशा अनेक प्रकारच्या अग्निहोत्रांना 'अग्निहोत्र' हें नांव एकच आहे. तसेंच छांदोग्यांतील पहिल्या पाठ्यामध्यें अनेक विद्यांना 'उद्गीथ-विद्या' हें नांव एकच आहे.

२५ परमात्मा या रूपानें रामाची उपासना करणारा, आणि रामावतार या रूपानें रामाची उपासना करणारा या दोघांनाही 'रामोपासक' अशी एकच संज्ञा आहे; तेव्हां त्या दोन्ही उपासनांमध्यें सारख्या गुणांचा संग्रह असला पाहिजे " या शंकेचें उत्तर हें अधिकाराप्रमाणें गुणांची व्यवस्था होते हें पूर्वसूत्रांत दिलेंच आहे. संज्ञा लौकिक असल्यामुळें शास्त्रीय अधिकार तिच्यापेक्षां प्रबल आहे.

२६ उद्गीथ वगैरे ज्या ज्या म्हणून विद्या आहेत त्या सर्व एका परमात्म्याच्याच संज्ञा असल्यामुळें गुणांचा संग्रह केला पाहिजे असें म्हणशील तर ती गोष्ट पूर्वसूत्रामध्यें कबूल केलीच आहे. याविषयीं 'सर्व विद्या हीं एका परमात्म्याचींच नांवें आहेत; तेव्हां सर्व गुणांनीं युक्त अशा एका परमात्म्याचें चिंतन करावें 'असें कौण्डिन्य श्रुतीमध्यें स्पष्टच प्रमाण आहे.

२७ 'प्राप्तेश्च' (म.)

९ व्याप्तेश्च समञ्जसम् ।

८ संज्ञा[२७] (एक) असल्यामुळें (गुणांचा संग्रह होतो) असें म्हणशील तर (तेंही जुळत नाहीं) हें (वर) सांगितलें आहे. (शिवाय भिन्न उपासनांच्या ठिकाणीं) देखील ती (संज्ञा एक) असूं शकते.

९ संज्ञेवरून[२८] (गुणांचा संग्रह होतो) असें म्हणशील तर तें (पूर्वीं) सांगितलें आहे. (कारण) तसेंही (प्रमाण) आहे. (२)

९ (ॐकार[३०] अशा परमात्म्याची सर्वत्र) व्याप्ति असल्यामुळें (अनेक तऱ्हांनीं केलेलें त्याचें वर्णन) संगतवार आहे.

१० (गुणांचा संग्रह करणें आणि न करणें या दोन्ही गोष्टी) संगतवार आहेत. कारण (तशीच गुणांची) प्राप्ति आहे[३१]. (३)

२८ 'देवांनीं उद्गीथाचें आहरण (म्ह. उच्चारण) केलें' (छां. १।२।१) या श्रुतीमधला.

२९ तेव्हां बृहदारण्यकांतील 'उद्गीथ' हा शब्द उद्गीथाचा अवयव जो प्रणव त्या अर्थीं योजिला नसल्यामुळें छांदोग्यांतील उद्गीथविद्येपेक्षां बृहदारण्यकांतील उद्गीथ विद्या भिन्न आहे असें सिद्ध होतें.

३० शं. परमात्म्याच्या उपास्य रूपामध्यें बाल्य, तारुण्य वगैरे परस्परविरुद्ध अवस्थांचें वर्णन केलें असल्यामुळें अर्थातच त्याच्या शरीरामध्यें कमजास्तपणा होणार; तेव्हां 'परमात्मा एक तऱ्हेचा आहे' हें म्हणणें जुळणार नाहीं. उ. परमात्म्याला जीवाप्रमाणें एक अवस्था नष्ट होऊन दुसरी प्राप्त होते असें नाहीं, तर सर्व अवस्थांनीं युक्त अशा साकार परमात्म्याची सर्वत्र व्याप्ति आहे, आणि अशा सर्व तऱ्हा मिळून जी एक परमात्म्याची स्थिति आहे ती नेहमीं एक तऱ्हेचीच आहे, आणि ती भक्तांच्या उपासनेला अनुसरून त्या त्या भक्तांपुढें तसें तसें रूप लीलेच्या योगानें प्रकट करून त्यांना सुख देतो असें समजावें.

३१ तात्पर्य, ज्या उपासकाच्या मनामध्यें परमात्म्याचे जितके गुण प्राप्त होतात तितक्या गुणांनीं युक्त अशा परमात्म्याची त्या उपासकानें उपासना करावी. एकंदरींत गुणांचा संग्रह करणें आणि न करणें ह्या दोन्ही गोष्टी उपासकावर अवलंबून आहेत असें सिद्ध झालें.

१० सर्वाभेदादन्यत्रेमे[32] । ११ आनन्दादयः प्रधानस्य ।

१० सर्वत्र (प्राणविद्या) एकच असल्यामुळें (एका शाखेंत सांगितलेले) हे (गुण) दुसऱ्या (शाखें-) त (घालतां येतात). (५)

११ (ब्रह्मरूप) प्रधान वस्तूचे आनंद वगैरे (जे धर्म त्यांचा सर्वत्र संग्रह होतो).

१२ प्रियशिरस्त्व वगैरे (धर्म अन्यत्र) प्राप्त होत नाहींत. कारण उपचय आणि अपचय हे द्वैत असतांना-(च

१० सर्व[33] (गोष्टी) एक असल्यामुळें (एका शाखेंत सांगितलेले) हे (गुण) दुसऱ्या (शाखें-) त (घालतां येतात. म्हणून प्राणविद्या एकच होय). (३)

११ (ब्रह्मरूप) प्रधान वस्तु (एक असल्यामुळें त्या-)च्या आनंद वगैरे (धर्मांचा सर्वत्र संग्रह होतो).

१२ प्रियशिरस्त्व वगैरे (धर्म अन्यत्र) प्राप्त होत नाहींत. कारण (ते ब्रह्माचे धर्म नाहींत[34]. जर ब्रह्माचे धर्म

३१ ‘ सर्वभे ’ (म.)

३२ छांदोग्य व बृहदारण्यकयांमधील प्राणविद्या आणि कौषीतकि उपनिषदांतील प्राणविद्या एकच आहे. जरी कौषीतकि उपनिषदामध्यें छांदोग्य वगैरेंप्रमाणें वाणी वगैरेंचे वसिष्ठत्व वगैरे गुण प्राणाचे ठिकाणीं समर्पण केले नाहींत तरी ते गुण प्राणाचे ठिकाणीं समर्पण केले असें घेतां येतें. कारण इतर सर्व गोष्टी सारख्याच सांगितल्या आहेत.

३४ शं. पूर्वी एका लीलेमध्यें परमात्म्यानें भक्ताकरितां जें रूप प्रकट केलें तें नित्य असल्यामुळें त्या रूपाच्या विरुद्ध असें रूप या भक्ताला दुसऱ्या लीलेमध्यें दृष्टीस पडणार नाहीं. उ. जरी भक्त व रूपें हीं परस्परविरुद्ध भासतात तरी तीं विरुद्ध नव्हेत. कारण या अनेकांचा परमात्म्याशीं अभेद असल्यामुळें त्यांच्यामध्येंही परस्पर ऐक्यच आहे. शिवाय परमात्मा व्यापक असल्यामुळें लीलेमध्यें दृष्टीस पडणारे जें परमात्म्याचें रूप वगैरे स्वाभाविक धर्म तेही व्यापकच आहेत. म्हणून परमात्म्याला एकदम अनेक ठिकाणच्या अनेक भक्तांपुढें एका रूपानें प्रकट होतां येतें असें समजावें.

३५ कांहीं गुण घेऊन केलेल्या उपासनेपेक्षां इतर ठिकाणीं सांगितलेले सर्व गुण घेऊन केलेली उपासना अधिक फळ देणारी आहे. म्हणूनच ब्रह्मदेव वगैरेंना मोठें फल प्राप्त झालें आहे.

३६ लीलेमध्यें भासणारे जे जीव वगैरे पदार्थ ते ब्रह्मरूप होत. आतां व्यापकत्व हा धर्म ज्याप्रमाणें प्रधान ब्रह्माचा आहे त्याप्रमाणें जीवांचाही आहे. परंतु आनंद, ऐश्वर्य

१२ प्रियशिरस्त्वाद्यप्राप्तिरुपचयापचयौ हि भेदे ।

१० (परमात्म्याच्या[३४] लीलेंतील) सर्व (पदार्थां-) चा (परमात्म्याशीं) अभेद असल्यामुळें (एका लीलेमधील जे पदार्थ) हेच दुसऱ्या (लीलेमध्यें आहेत असें समजतें).	११ सर्व[३५] (उपासकांपेक्षां) भेद (असल्या-) मुळें ह्या (ब्रह्मदेव वगैरें-) ना (इतर उपासकांच्या फलापेक्षां) निराळें (फल प्राप्त होत आहे). (४)
११ प्रधान[३६] (ब्रह्मा-) चे (च) आनंद वगैरे (धर्म आहेत.)	१२ (मोक्ष[३७]रूप जें) प्रधान (फल) त्याच्या- (करितां) आनंद वगैरे (गुणांचा उपासनेमध्यें संग्रह केलाच पाहिजे). (५)
१२ प्रियशिरस्त्व[३८] वगैरे (धर्म अन्यत्र) प्राप्त होत नाहींत. कारण उपचय आणि अपचय हे द्वैत असतांना- (च	१३ प्रियशिरस्त्व वगैरे (गुण सर्वत्र) प्राप्त होत नाहींत. कारण भिन्न भिन्न (फलां-) करितां (गुणांचे) उपचय[४०]

वगैरे धर्म प्रधान ब्रह्माचेच आहेत. जीवाचे नव्हेत. म्हणून लीलेमध्यें जीवांना दुःखाची संभावना होते, आणि त्यामुळें ते प्रभूची प्रार्थना करतात.

३७ ‘ ज्याला मोक्षाची इच्छा असेल त्यानें परमात्म्याच्या उपासनेमध्यें आनंद, ज्ञान, सत्व (म्ह. निर्दोषत्व) आणि आत्मत्व (म्ह. स्वामित्व) ह्या चार गुणांचा संग्रह केलाच पाहिजे ’ असें ब्रह्मतर्कामध्यें सांगितलें आहे.

३८ श्रुतीमध्यें (पृ. ११४९ पं. ४) प्रिय वगैरेंच्या ठिकाणीं शिर वगैरेंचें रूपक केलें आहे. ते ब्रह्माच्या स्वरूपाचे धर्म नव्हेत.

३९ तैत्तिरीय उपनिषदामध्यें (२।५।१) जे आनंदमयाचे प्रियशिरस्त्व वगैरे धर्म सांगितले आहेत त्यांचा अथर्वणोपनिषदांत सांगितलेल्या आनंदमय पुरुषाच्या उपासनेमध्यें संग्रह होत नाहीं. कारण पुरुष हा आनंदानें पूर्ण भरलेला आहे. आणि जे तैत्तिरीयामध्यें आनंदमयाचे मोद आणि प्रमोद हे पंख सांगितले आहेत, त्यांमध्यें आनंदाचा कमजास्तपणा आहे. मोदामध्यें आनंदाचा उपचय म्ह. आधिक्य आहे. आणि प्रमोदामध्यें आनंदाचा अपचय म्ह. न्यूनत्व आहे. आणि भक्तिमार्गामध्यें शुद्ध अभेदज्ञान आहे. आतां उपासनामार्गामध्यें उपासकाच्या अधिकाराप्रमाणें कमजास्तपणा भासत असल्यामुळें ह्या गुणांचा संग्रह होतो.

४० उपचय म्हणजे अधिक गुणांचा संग्रह करणें. आणि अपचय म्हणजे अधिक गुणांचा संग्रह न करणें.

१३ इतरे त्वर्थसामान्यात् ।

संभवतात).

मानले तर शिर वगैरे अवयवांचा) भेद असल्यामुळें (ब्रह्माचे ठिकाणीं) उपचय आणि अपचय (यांचा प्रसंग येईल.)

१३ परंतु इतर (धर्म सर्वत्र समजले जातात). कारण तेथें एकच विषय आहे. (६)

१३ परंतु[४१] (कांहीं) इतर (धर्म सर्वत्र समजले जातात), कारण वस्तू- (चें स्वरूप दाखविण्यांत त्या धर्मांचें वस्तूशीं) साम्य आहे.

१४ (काठकामध्यें जें सांगितलें आहे, तें पुरुषासंबंधानें) ध्यानाकरितां (सांगितलें आहे). कारण (इतरासंबंधानें तें सांगितल्यापासून) कांहीं उपयोग नाहीं.

१४ (प्रियशिरस्त्व वगैरे धर्म) ध्यानाकरितां (सांगितले आहेत). कारण (त्यांचा दुसरा कांहीं) उपयोग नाहीं.

---

४१ शं. ब्रह्माच्या सर्व धर्मांचा सर्व ठिकाणीं संग्रह केला पाहिजे. परंतु तो अशक्य आहे. उ. ब्रह्माचें स्वरूप समजावून देण्याच्या कामीं सत्य, ज्ञान, आनंद वगैरे ज्या धर्मांचा उपयोग होतो त्या धर्मांचा ब्रह्माच्या सर्व उपासनांमध्यें संग्रह होतो. परंतु कारुण्य वगैरे ज्या धर्मांचा तसा उपयोग होत नाहीं त्यांचा मात्र सर्वत्र संग्रह होत नाहीं, तर ज्या उपासनेमध्यें जेवढे सांगितले असतील तेवढ्याच धर्मांचा त्या उपासनेमध्यें संग्रह होतो असें समजावें.

४२ जे धर्म विरुद्ध असे भासतात, त्यांचाही संग्रह होतो. कारण परमात्म्याच्या अनेक धर्मांमध्यें वास्तविक रीतीनें विरोध नाहीं. मागें टीप ३४ पहा. तात्पर्य, त्या धर्मांचा धर्मीच्या रूपानें संग्रह होतो.

४३ ब्रह्मदेवानें उपासना करतांना सर्व गुणांचा संग्रह केला आहे. म्हणूनच त्याला सर्वांपेक्षां उत्कृष्ट फळ प्राप्त झालें आहे. तथापि इतर सर्व देवांनीं आनंद वगैरे चारच गुण घ्यावेत असें नाहीं. तर त्यांच्या उपासनेमध्यें आनंद वगैरे गुणांहून इतर अशा कांहीं मध्यम प्रतीच्या गुणांचा संग्रह होतो. तेव्हां ज्या ज्या उपासनांचें सारखें फळ अ-

१४ आध्यानाय प्रयोजनाभावात् ।

संभवतात).	आणि अपचय (मानिले) आहेत. (६)
१३ ईतर[४२] (धर्मांचा संग्रह होतो). कारण (उपास्य) वस्तु एक आहे.	१४ परंतु[४३] (कांहीं) इतर (गुण अन्यत्र प्राप्त होतात). कारण फलाचें साम्य आहे. (७)
१४ ध्यानाकरितां (उपयोगीं पडणाऱ्या धर्मांचाच संग्रह होतो). कारण (इतरांचा संग्रह करण्यांत कांहीं) उपयोग नाहीं.[४५]	१५ (गुण[४६] हे) ध्यानाकरितां (सांगितले आहेत). कारण (त्यांचा दुसरा कांहीं) उपयोग नाहीं. (म्हणून उपासनेमध्यें इतर ठिकाणच्या गुणांचा संग्रह होतो असें सिद्ध होतें).

सेल ह्या सर्व उपासनांमध्यें सारख्या गुणांचा संग्रह होतो असें समजावें.

४४ शं. जर प्रियशिरस्त्व वगैरे धर्म ब्रह्माच्या स्वरूपाचे नव्हेत तर ते कशाकरतां सांगितले? उ. ब्रह्माचें ध्यान करतां यावें म्हणून तसें रूपक केलें आहे. तात्पर्य प्रियशिरस्त्व वगैरे ब्रह्माचे धर्म नसल्यामुळें त्यांचा सर्वत्र संग्रह होत नाहीं हें जें पूर्वीं (सू. १२) सांगितलें तें सिद्ध झालें.

४५ उदा. तैत्तिरीयामध्यें सांगितलेले जे आनंदमयाचे मोदक प्रमोद हे पंख त्यांचा अथर्वणोपनिषदांतील पुरुषाच्या उपासनेमध्यें भक्तिमार्गीयाच्या दृष्टीनें संग्रह होत नाहीं. कारण तो शुद्ध उपासक असल्यामुळें त्याला पुरुषरूपाचें ध्यान करतांना पंखांचा कांहींच उपयोग नाहीं.

४६ येथून दोन सूत्रांनीं ‘ गुणांचा संग्रह करणें आणि न करणें ’ ह्या दोन्ही गोष्टी प्रमाणसिद्ध आहेत असें सूत्रकार दाखवीत आहेत. तेव्हां पूर्वीं (सू. १०) सांगितल्याप्रमाणें व्यवस्था करण्यास हरकत नाहीं.

१५ आत्मशब्दाच्च ।

१५ आणि ‘ आत्मा ’ शब्द असल्यामुळेंही (तें पुरुषासंबंधानें सांगितलें आहे). (७)

१५ आणि आत्मा शब्द असल्यामुळेंही (हेंच सिद्ध होतें).

१६ इतर (ठिकाणच्या-) प्रमाणें (येथेंही) परमात्माच घेतला पाहिजे. कारण (याच गोष्टीला अनुकूल अशा) पुढें (विशेष गोष्टी सांगितल्या आहेत).

१६ इतर (ठिकाणच्या) प्रमाणें (येथेंही) परमात्माच घेतला पाहिजे. कारण (याचगोष्टीला अनुकूल अशा) पुढें (विशेष गोष्टी सांगितल्या आहेत).

४७ ‘ विज्ञानमयाहून निराळा असा त्याच्या आंत आनंदमय आत्मा आहे ’ (तै. २।५।१) असा श्रुतीमध्यें प्रियशिरस्त्व वगैरे धर्मांच्या प्रकरणांत आत्मा शब्द घातला आहे. तेव्हां निरवयव अशा आत्म्याला खऱ्या रीतीनें शिर, पक्ष वगैरे अवयव संभवत नसल्यामुळें ध्यानाकरतां शिर, पक्ष वगैरेंचें रूपक केलें आहे असेंच मानलें पाहिजे.

४८ आनंदमयाच्या वर्णनामध्यें (तै. २।५।१) प्रिय वगैरेंच्या वर जी शिर वगैरेंची कल्पना केली आहे ती सामान्य लोकांकरतां केली आहे. कारण त्यांना प्रिय वगैरेंचें त्यांच्या स्वतःच्या रूपानें ज्ञान होत नाहीं. म्हणून ह्यांच्या डोक्यापुढील शिर वगैरेंच्या रूपानें प्रिय वगैरेंचें ज्ञान श्रुती करून देत आहे. ‘प्रिय वगैरेंचाच आनंद हा आत्मा (म्ह. स्वरूप) आहे ’ (तै. २।५।१) ह्या श्रुतीमधील आत्मा शब्दावरून शिर वगैरे धर्म अविवक्षित आहेत. ते उत्तम अधिकाऱ्या करतां सांगितले नाहींत असें समजतें. तेव्हां अर्थातच त्यांनीं केलेल्या उपासनेमध्यें त्यांचा संग्रह होत नाहीं असें सिद्ध होतें.

४९ ‘आत्मा या रूपानेंच उपासना करावी ’ (बृ. १।४।७) अशी श्रुति आहे ‘ इतर गुण घेणें अशक्य असेल तर ते गुण न घेतां फक्त आत्मा या रूपानेंच उपासना करावी ’ असें या श्रुतीचें तात्पर्य आहे.

५० शं. श्रुतीमध्यें (तै. २।५।१) आत्मा शब्दानें शरीर वगैरे गौण आत्मा घेतला म्हणजे त्याचे ठिकाणीं प्रियशिरस्त्व वगैरे धर्म खऱ्या रीतीनें संभवतील. उ. ‘ त्यानें इच्छा केली,

१६ आत्मगृहीतिरितरवदुत्तरात् ।

१५ आणि आत्मा शब्दावरून (इतर धर्म अविवक्षित आहेत असें समजतें). (१)	१६ आणि आत्मा शब्दावरून (गुणांचा संग्रह होत नाहीं असें सिद्ध होतें). (८)
१६ इतराप्रमाणें जें आत्म्याचें ग्रहण केलें आहे, तें पुढच्यावरून केलें आहे.	१७ इतर (ठिकाणच्या-) प्रमाणें (येथें) आत्म (शब्दा-) नें (आनंद वगैरे चार गुण) घेतले पाहिजेत. कारण पुढें (तसें सांगितलें आहे). (९)

मीं पुष्कळ व्हावें प्रजा उत्पन्न करावयात ' (तै. २।६।१) असें श्रुतीमध्यें पुढें सांगितलें असल्यामुळें आत्माशब्दानें गौण आत्मा घेतां येत नाहीं. कारण गौण आत्म्याच्या हातून सर्व प्रजांची उत्पत्ति संभवत नाहीं. तेव्हां इतर श्रुती (पृ. ११५६ पं. ५) प्रमाणें येथेंही परमात्माच घेतला पाहिजे.

५१ तैत्तिरीय उपनिषदामध्यें (२.६) अन्नमय, प्राणमय वगैरे शब्दांनीं परमात्माच सांगितला आहे. आतां त्या आत्म्याचें जें ' शारीर ' शब्दावरून इतराप्रमाणें म्ह. जीवासारखें ग्रहण केलें आहे तें पुढच्यावरून केलें आहे. म्हणजे जो पूर्वीच्याचा आत्मा आहे तोच ह्याचा आहे, जो पूर्वीच्याचा आत्मा आहे तोच ह्याचा आहे अशा रीतीनें पुढें सरतें-शेवटीं सांगितलेला जो आनंदमय तो त्या अन्नमय वगैरे सर्व शरीरांचा अभिमानी आहे. तेव्हां त्याला शारीर म्हणण्यास हरकत नाहीं.

५२ ' आत्मा या रूपानेंच उपासना करावी ' (बृ. १।४।७) या श्रुतीमध्यें इतर ठिकाणच्याप्रमाणें (टीप. ३७ पहा) आत्मशब्दानें आनंद वगैरे चार गुण घेतले पाहिजेत. कारण ' ह्यामध्यें ह्या सर्वांचें एकीकरण होतें ' (बृ. १।४।७) ह्या पुढील श्रुतीनें ' आनंद वगैरे चार गुणांचा आत्म्याच्या स्वरूपामध्यें संग्रह होतो ' असें सांगितलें आहे. तेव्हां पूर्वीचें सूत्र (१२) ' आत्मा या रूपानेंच उपासना करावी ' (बृ. १।४।७) या श्रुतीशीं विरुद्ध होत नाहीं.

१७ अन्वयादिति चेत्स्यादवधारणात् ।

१७ अन्वयावरून (परमात्मा सांगितला नाहीं असें समजतें) असें म्हणशील तर (नाहीं). कारण अवधारण आहे. (८)	१७ [53]अन्वयावरून (परमात्मा सांगितला नाहीं असें समजतें) असें म्हणशील तर (नाहीं). कारण अवधारण आहे. (४)
१८ कार्यरूपानें (सांगितलेल्या आचमनाचा येथें फक्त) अनुवाद केला असल्यामुळें (त्याचा येथें विधि संभवत नाहीं. तर प्राणाला आच्छादित करण्याचा संकल्प या) अपूर्व गोष्टी-(चा येथें विधि सांगितला आहे). (९)	१८ (प्राणाला आच्छादित करण्याचा संकल्प या) अपूर्व गोष्टी- (चा येथें विधि सांगितला आहे). कारण अप्राप्त गोष्ट सांगितल्यानें (शास्त्राला साफल्य येतें). (५)

५३ शं. श्रुतीमध्यें (तै. २।२।१) पूर्वीच्या वाक्यांत ' अन्नमय आत्मा, प्राणमय आत्मा ' अशा रीतीनें आत्मा शब्दाचा गौण आत्म्याशीं अन्वय म्ह. संबंध केला आहे. तेव्हां येथेंही गौण आत्मा घेतला पाहिजे. परमात्मा घेतां येत नाहीं. उ. अन्नमय वगैरेंच्या ठिकाणीं देखील परमात्म्याचाच ग्रह होत चाललेला आहे. कारण 'आत्म्यापासून आकाश उत्पन्न झालें' (तै. २।१।१) या आरंभींच्या श्रुतीवरून ' हा परमात्मा आहे ' असें अवधारण (म्ह. निश्चय) झाला आहे. आतां पुढें प्राणमय वगैरेंच्या ठिकाणीं आत्म्याचा ग्रह झाला म्हणजे पूर्वी अन्नमय वगैरेंच्या ठिकाणीं झालेल्या आत्म्याचा ग्रह निवृत्त होतो. परंतु आनंदमयाचे ठिकाणीं झालेला आत्म्याचा ग्रह मात्र निवृत्त होत नाहीं. कारण त्याच्या पुढें दुसरा आत्मा सांगितला नाहीं.

५४ शं. अन्नमय वगैरे सर्व भिन्न भिन्न असे जीवात्मेच सांगितले आहेत. कारण त्यांना शारीर असें म्हटलें आहे. आनंदमय मात्र तेवढा परमात्मा आहे. आतां त्याला देखील जें ' शारीर ' असें म्हटलें आहे तें अन्वयावरून म्ह. संबंधावरून म्हटलें आहे. परमात्मा हा व्यापक असल्यामुळें त्याचा सर्व शरीरामध्यें संबंध आहे. बाकीचे चारी आत्मे व्यापक नसल्यामुळें ' ते जीवात्मे आहेत ' असें मानल्याशिवाय ' शारीर ' शब्द लागत नाहीं. उ. ' हाच आत्मा ' असें श्रुतीमध्यें अवधारण म्ह. निश्चय केला आहे. त्यावरून पांची ठिकाणीं एकच परमात्मा सांगितला आहे. तेव्हां पूर्वसूत्रामध्यें सांगितल्याप्रमाणें आनंदमय हा सर्व शरीरांचा अभिमानी असल्यामुळें त्याला सर्व ठिकाणचा शारीर शब्द लावावा हेंच योग्य आहे.

५५ शं. आत्मशब्दाचा व्यापक असा अर्थ असल्यामुळें आत्मशब्दामध्यें आनंद वगैरे चार गुणांहून इतर गुणांचाही अन्वय म्ह. संबंध होतो. तेव्हां ' आत्मा या रूपानेंच

रङ्गो. आचार्य. श्रीक्षेत्र वाई, जि. सातारा.

१८ कार्याख्यानादपूर्वम्

१७ अन्वयावरून (आनंदमयाला शारीर शब्द लाविला आहे) असें म्हणशील तर (नाहीं. आनंदमयच सर्वशरीराभिमानी) आहे. कारण अवधारण आहे. (२)

१८ (आत्मशब्दाचा अर्थ) पूर्वीपेक्षां निराळा आहे. कारण कार्याच्या योगानें (एकाच आत्म्याचें) प्रतिपादन केलें आहे.

१८ अन्वयावरून (निश्चय संभवत नाहीं) असें म्हणशील तर (नाहीं). कारण अवधारण आहे. (१०)

१९ (मोक्षरूपी) कार्य (अलौकिक आहे असें) सांगितलें असल्यामुळें (उपासनेमध्यें परमात्म्याच्या) अपूर्व (म्ह. अलौकिक अशा गुणांचें ध्यान केलें पाहिजे). (११)

उपासना करावी ' (बृ. १।४।७) या श्रुतीवरून कोणते गुण ध्यावेत व कोणते घेऊं नयेत तो निश्चय होत नाहीं. उ. आत्मशब्दामध्यें सर्व गुणांचा संग्रह होतो ही गोष्ट ब्रह्मदेवालाच माहीत असल्यामुळें ब्रह्मदेवानें मात्र आत्म्याच्या उपासनेमध्यें सर्व गुणांचा संग्रह करावा आणि इतरांनीं ४ गुणांचा संग्रह करावा. असें न मानलें तर आत्मरूपानेंच हें ' च ' शब्दानें दाखविलेलें अवधारण लागणार नाहीं.

५६ ' आत्म्याची उपासना करावी ' (बृ. १।४।७) अशी श्रुती आहे. ह्या श्रुतीच्या पूर्वी 'पुत्र, पति वगैरे हे आपल्याकरितां प्रिय होतात ' असें जीवाचें वर्णन केलें आहे. ह्या पूर्वीच्या जीवापेक्षां निराळा जो परमात्मा तो 'आत्म्याची उपासना करावी' या श्रुतीमध्यें आत्मशब्दाचा अर्थ आहे. कारण ' श्वासोच्छ्वास टाकणारा तोच प्राण, बोलणारा तोच वाणी; पाहणारा तोच चक्षु ' अशा रीतीनें श्रुतीमध्यें श्वासोच्छ्वास टाकणें वगैरे कार्यें दाखवून त्यांच्या योगानें प्राण वगैरे नांवें एकाच आत्म्याला प्राप्त होतात असें सांगितलें आहे. प्राण, वाणी, चक्षु इत्यादि नांवें जीवाला लावलेलीं व्युत्पत्तींत येत नाहींत. ह्या (मू. सं.) सूत्राचा दुसरा अर्थः—' (पूर्वी) कार्य असा सांगितला असल्यामुळें (ह्या) पूर्वीपेक्षा निराळा (पुढें सांगितलेला आहे असें समजतें),' तात्पर्य ' अन्नापासून पुरुष उत्पन्न होतो' (तै. २।१।१) ह्या पूर्वीच्या श्रुतीमध्यें ' पुरुष हा अन्नाचें कार्य आहे ' असें सांगितलें आहे. ' तो हा पुरुष अन्नरसमय आहे ' (तै. २।१।१) ह्या पुढील श्रुतीमध्यें जो अन्नब्रह्मरूपी पुरुष सांगितला आहे तो पूर्वीचा भौतिक नव्हे. त्याहून निराळा आध्यात्मिक घेतला आहे.

५७ अलौकिक गुणांचा जरी अनुभव नाहीं तरी उपदेशावरून त्यांची कल्पना करावी.

१९ समान एवं चाभेदात् ।

१९ एका (शाखे-) मध्यें (देखील उपास्य वस्तू) एक असल्यामुळें असेंच (विद्यांचें ऐक्य असतें). (१०)	१९ (जसे अग्निरहस्यामध्यें मनोमयत्व वगैरे गुण सांगितले आहेत) तसेच (बृहदारण्यकामध्यें ते गुण) सारखे- (च सांगितले) असल्यामुळें आणि (इतर गुणांचा) भेद नसल्यामुळें (विद्यांचें ऐक्य आहे). (६)
२० (एकाच विद्येशीं) संबंध असल्यामुळें अन्य ठिकाणीं देखील (गौण गोष्टींचा) असाच (संग्रह केला पाहिजे).	२० (एकाच विद्येशीं) संबंध असल्यामुळें अन्य ठिकाणीं देखील (गौण गोष्टींचा) असाच (संग्रह केला पाहिजे).

५८ ‘ वशित्व ’ हा गुण ‘ सत्यसंकल्पत्व ’ या गुणाचाच एक प्रकार असल्यामुळें अग्निरहस्यांतील ‘ सत्यसंकल्पत्व ’ ह्या गुणापेक्षां बृहदारण्यकामधील ‘ वशित्व ’ हा गुण निराळा होत नाहीं. म्हणून दोन्ही ठिकाणची शांडिल्यविद्या एकच आहे असें समजतें.

५९ पाहणारा, ऐकणारा, श्वासोच्छ्वास टाकणारा असा जरी भेद भासतो तरी परमात्मा एकच आहे. कारण चक्षु वगैरे हीं ब्रह्मरूपीं असल्यामुळें त्यांच्यामध्यें परस्पर अभेद (म्ह. ऐक्य) आहे.

६० शं. ‘ सारख्या उपासनेचें सारखेंच फल असतें ’ हा सिद्धांत बरोबर नाहीं. कारण ब्रह्मदेव आणि ब्रह्माणी यांनीं केलेल्या उपासना सारख्याच असल्या पाहिजेत. परंतु फलामध्यें मात्र तारतम्य दृष्टीस पडतें. कारण ब्रह्मदेवासारखा ब्रह्माणीला अधिकार नाहीं. उ. ब्रह्मदेव आणि ब्रह्माणी यांना प्राप्त झालेल्या फलांमध्यें जसें तारतम्य आहे तसें त्यांनीं केलेल्या उपासनांमध्येंही तारतम्य आहे. ब्रह्मदेवानें त्रिविक्रमत्व वगैरे विशेष धर्मांनीं परमात्म्याची उपासना केली आहे. आणि ब्रह्माणीनें पराक्रम वगैरे सामान्य ध-

२० संबन्धादेवमन्यत्रापि ।

१९ असें असतांही[५९] (तो) परमात्मा एकच आहे. कारण (चक्षु वगैरेंमध्यें) अभेद आहे.	२० (विशेष[६०] धर्म हे सामान्य धर्मांहून) भिन्न नसल्यामुळें सामान्य (धर्मांचाच अन्यत्र संग्रह होतो).
२० संबंधें[६१] असल्यामुळें इतर ठिकाणीं देखील अशीच (उपासना करावी).	२१ संबंध[६२] असल्यामुळें इतर (गुणां-) चे ठिकाणीं देखील अशीच (संग्रह करणें ही गोष्ट लागू पडते). (१२)

मांनीं परमात्म्याची उपासना केली आहे. विशेषधर्म हे सामान्य धर्मांहून भिन्न नसल्यामुळें ब्रह्मदेवानें केलेल्या उपासनेंतील विशेषधर्मांचा ब्रह्माणीनें केलेल्या उपासनेमध्यें सामान्य रूपानें संग्रह झाला आहे.

६१ कांहिंएक कार्याच्या उद्देशानें ज्या जीवाचे ठिकाणीं परमात्म्यानें प्रवेश केला असेल त्या जीवाची उपासना जर कर्तव्य असेल तर ब्रह्माचे ठिकाणीं जशी करतात तशीच त्या ठिकाणीं करावी. कारण ज्याप्रमाणें तापलेल्या लोखंडामध्यें अग्नीचा संबंध असतो त्याप्रमाणें त्या जीवामध्यें परमात्म्याचा संबंध आहे. तात्पर्य, त्या उपासनेमध्यें परमात्म्याच्या धर्मांचा संग्रह होतो, व संग्रह न करण्यापेक्षां संग्रह करणें हें अधिक श्रेयस्कर आहे. परंतु ‘ त्या जीवाचे ठिकाणीं प्रविष्ट झालेल्या परमात्म्याची मी उपासना करतों ’ अशी उपासकाची बुद्धि मात्र पाहिजे.

६२ जरी त्रिविक्रमत्व वगैरे धर्म हे परमात्म्याचे ठिकाणीं कदाचित् उपलब्ध होतात, तरी त्यांचा परमात्म्याशीं नित्य तादात्म्यसंबंध असल्यामुळें ब्रह्मदेवाला उपासना करतांना आनंद वगैरे धर्मांप्रमाणें त्रिविक्रमत्व वगैरे धर्मांचाही संग्रह करतां येतो.

२१ न वा विशेषात्। २२ दर्शयति च।

२१ किंवा (स्थान—) भेदामळें (दोन्ही उपनिषदें दोन्ही ठिकाणीं प्राप्त होत) नाहींत.	२१ किंवा (स्थानभेदामुळें उपास्यरूपाचा) भेद होतो म्हणून (दोन्ही उपनिषदें दोन्ही ठिकाणीं प्राप्त होत) नाहींत.
२२ आणि (हीच गोष्ट) श्रुति सांगते. (११)	२२ आणि (हीच गोष्ट) श्रुति सांगते. (७)
२३ आणि म्हणूनच धारण करणें, स्वर्गाला व्याप्त करणें (वगैरे विभूतींचा) देखील (संग्रह होत नाहीं). (१२)	२३ आणि म्हणूनच धारण करणें, स्वर्गाला व्याप्त करणें (वगैरे विभूतींचा) देखील (संग्रह होत नाहीं). (८)

६३ 'हा जीव परमात्म्याचा भक्त आहे म्हणून मी त्या जीवाची उपासना करतों' अशी ज्या उपासकाची बुद्धि असेल त्यानें त्या उपासनेमध्यें परमात्म्याच्या धर्मांचा संग्रह केला काय आणि न केला काय दोन्ही गोष्टी सारख्याच आहेत. त्यांत कांहीं विशेष नाहीं. हा भक्तिमार्गांतील उपासक होय.

६४ जरी पूर्वी सांगितल्याप्रमाणें (टीप ५५ पहा) आत्मशब्दामध्यें सर्व गुणांचा संग्रह होतो तरी तो सर्वांच्या दृष्टीनें होत नाहीं. तेव्हां आपआपल्या अधिकाराप्रमाणें आत्म्याचे जे गुण ज्याच्या मनामध्यें येतील त्या गुणांचा त्यानें उपासनेमध्यें संग्रह करावा, इतरांचा करूं नये. तेव्हां पूर्वी (सू. १६) 'गुणांचा संग्रह होत नाहीं' असें जें आत्मशब्दावरून सिद्ध केलें आहे तें बरोबर आहे.

६५ परमात्मा हा रामदास, ज्ञानेश्वर वगैरे ज्या जीवांचे ठिकाणीं प्रविष्ट झालेला

२६ संभृतिद्युव्याप्त्यपि चातः ।

२१ किंवा[63] (अशी उपासना करूं) नये. कारण विशेष नाहीं.	२२ किंवा[64] (अधिकारि-) भेदा-मुळें (आत्मशब्दानें सर्व गुण घेतले जात) नाहींत.
२२ आणि[65] (परमात्मा हा त्या ठिकाणीं आपले गुण प्रत्यक्ष-च) दाखवीत आहे.	२३ आणि[66] (हीच गोष्ट) श्रुति सांगते. (१३)
२३ आणि म्हणूनच[67] धारण करणें, स्वर्गाला व्याप्त करणें, ह्या धर्मांचा देखील (तेथें संग्रह करूं नये). (२)	२४ म्हणूनच[68] धारण करणें, स्वर्गाला व्याप्त करणें, हे धर्म देखील (देवांनीं केले-ल्या उपासनेमध्येंच घेतले जातात). (१४)

असतो त्या ठिकाणीं तो या जीवांच्या उपासकांना कांहीं अलौकिक चमत्कार प्रत्यक्षच दाखवितो. तेव्हां तेथें गुणांचा संग्रह करण्याची जरूर नाहीं. कारण गुणांचा संग्रह करणें म्हणजे गुणांची मनानें कल्पना करणें. जेव्हां एखादी गोष्ट प्रत्यक्षच दृष्टीस पडते, तेव्हां त्या गोष्टीची मनानें कल्पना करण्याची मुळींच जरूर नसते.

६६ ‘ आत्मशब्द हा ब्रह्मदेव वगैरेंच्या दृष्टीनें परमात्म्याच्या सर्व गुणांचें प्रति-पादन करतो, आणि इतरांच्या दृष्टीनें सर्व गुणांचें प्रतिपादन करीत नाहीं ’ असें भाल्लवेय श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

६७ म्हणूनच म्हणजे विशेष नाहीं म्हणूनच. पूर्वीचें सूत्र २१ पहा.

६८ म्हणूनच म्हणजे ‘ उपासकाच्या अधिकाराप्रमाणें गुणांचा संग्रह होतो म्हणूनच.

२४ पुरुषविद्यायामिव चेतरेषामनाम्नानात् ।

२४ पुरुषविद्येमध्यें जसें (सांगि- तलें आहे) तसें इतरांनीं सांगितलें नसल्यामुळें (तिच्या धर्मांचा संग्रह होत नाहीं). (१३)

२५ 'विद्ध करणें' वगैरे गोष्टी भिन्न असल्यामुळें (मंत्र वगैरेंचा विद्यांमध्यें संग्रह केला जात नाहीं). (१४)

२४ पुरुषविद्येमध्यें देखील (वि- द्यांचा भेद आहे). कारण (कांहीं लोकांनीं सांगितलेले गुण) इतरांनीं सांगितले नाहींत). (९)

२५ 'विद्ध करणें' वगैरे गोष्टी भिन्न आहेत (त्याप्रमाणें मं- त्रांचा अध्ययनाशीं संबंध) ही गोष्ट भिन्न असल्यामुळें (त्यांचा विद्यांमध्यें संग्रह होत नाहीं). (१०)

---

६९ 'यामपि चे' (रा. म.)

७० तैत्तिरीय शाखेंतील पुरुषसूक्तामध्यें (तै. आ. ३।१३।१) पुरुषविद्या सांगितली आहे. आणि त्याच शाखेतील उपनिषदामध्यें (तै. २) अन्नमय वगैरे सांगून पुरुषाचें स्वरूप सांगितलें आहे. परंतु या ठिकाणीं पुरुषसूक्तामध्यें सांगितलेल्या हजार मस्तकें वगैरे धर्मांचा संग्रह होत नाहीं. कारण पुरुषसूक्तामध्यें पुरुषाचें साकार असें व्यापक आधिदैविक स्वरूप सांगितलें आहे. आणि दुसरीकडे पुरुषासारखा असें सांगून तेथें त्याचें आध्यात्मिक रूप सांगितलें आहे. तात्पर्य, दोन्ही ठिकाणच्या विद्या भिन्न आहेत.

७१. शं. ज्या उपासनेमध्यें जे गुण सांगितले असतील तेवढेच गुण त्या उपासने- मध्यें घ्यावेत. इतर गुणांचा तेथें संग्रह करूं नये. आणि ज्याला या उपासनेचा अधिकार असेल त्यानेंच ती उपासना करावी. उ. सर्व गुणांनीं परमात्म्याची उपासना करण्या- सारखे ब्रह्मदेव वगैरे उत्तम अधिकारी आहेत. आणि कोणत्याही उपासनेमध्यें सर्व गुण सांगितले नाहींत. कारण सर्वांमध्यें उत्कृष्ट अशी जी पुरुषसूक्तामध्यें सांगितलेली विद्या

२९ वेधाद्यर्थभेदात् ।

२४ पुरुषविद्येमध्यें जसें (सांगितलें आहे) तसें इतरांनीं सांगितलें नसल्यामुळें (तिच्या धर्मांचा संग्रह होत नाहीं). (४)

२५ (वाणी वगैरे) परमात्म्याहून भिन्न असल्यामुळें (त्यांचे ठिकाणींच) वेध[2] वगैरे होतात.

२५ (गुणांचा संग्रह केला पाहिजे.) कारण पुरुषसूक्तामध्यें सांगितलेल्या विद्येमध्यें देखील (कांहीं) इतर (गुण) सांगितले नाहींत. (१५)

२६ वेध[3] वगैरे (धर्मांचा सर्व ठिकाणीं संग्रह होत नाहीं). कारण (त्यांचें) फल (यती वगैरेंच्या फलाहून) भिन्न आहे. (१६)

तीमध्यें देखील कांहीं गुण सांगितले नाहींत. तेव्हां योग्यतेच्या मानानें उपासना करतां यावी म्हणून उपासनेमध्यें इतर ठिकाणच्या गुणांचा संग्रह करणें बरोबर आहे.

७२ वेध म्हणजे विध्वंस. तात्पर्य, मुख्य प्राण हा परमात्म्याची विभूति असल्यामुळें त्याचा दैत्यांच्या हातून विध्वंस होत नाहीं (भाषांतर अ. २ पाद ४ सूत्र १८ टी. १ पहा). तेव्हां उपास्य जें ब्रह्म तें निर्दुष्ट आहे असें समजतें. यावरून उपास्य वस्तु निर्दुष्ट आहे असें जाणून उपासकानें उपासना करावी असें सिद्ध होतें.

७३ शं. ज्याप्रमाणें आनंद, ज्ञान, निर्दोषत्व आणि स्वामित्व हे चार गुण सर्वांनीं घेतले जातात त्याप्रमाणें वेध म्हणजे शत्रूचा नाश करणें इत्यादि गुण देखील सर्वांनीं घेतले पाहिजेत. कारण आपल्या शत्रूचा नाश व्हावा अशी सर्वांनाच इच्छा आहे. उ. फक्त मोक्षाची इच्छा करणाऱ्या अशा यतीला म्ह. संन्यस्त मनुष्याला शत्रुनाशरूपी फलाची जरूर नसल्यामुळें वेध वगैरे धर्म सर्वांनीं घेतलेच पाहिजेत असा नियम सिद्ध होत नाहीं. कारण योग्यतेच्या बाहेर उपासना केली असतां अनर्थ प्राप्त होतो असें बृहत्तंत्रामध्यें सांगितलें आहे.

२६ हानौ तूपायनशब्दशेषत्वात्कुशा-

२६ त्याग (सांगितला) असतां (तेथें ग्रहण अवश्य प्राप्त होतें). कारण ग्रहणाचें विधान हें (त्यागाच्या विधानाला) अंगभूत आहे. कुश, छंद, स्तुति, आणि गायन यांप्रमाणें हें होय. ही (गोष्ट जैमिनीनेंही) सांगितली आहे. (१९)

२६ त्याग (आणि ग्रहण यांपैकीं एक सांगितलें) असतां (तेथें दुसरें अवश्य प्राप्त होतें). कारण ग्रहणाचें वाक्य हें (त्यागाच्या वाक्याचें) अंगभूत आहे. कुश, छंद, स्तुति आणि गायन यांप्रमाणें हें होय. ही (गोष्ट जैमिनीनेंही) सांगितली आहे. (११)

७४ ' कुशच्छ ' (व.)

७५ ' परंतु (निषेधवाक्य हें) वाक्यशेष (होऊन पर्युदास) आहे. कारण विकल्प करणें अन्याय्य असल्यामुळें (तें) विधीचें अंगभूत होतें ' (पू. मी. १०।८।४) असें सूत्र आहे. अनुयाजामध्यें ' ये यजामहे ' असें म्हणूं नये हा जर स्वतंत्र निषेध मानला तर विधि आणि निषेध मिळून विकल्प होईल. म्हणून पर्युदास घ्यावा म्हणजे अनुयाजाशिवाय इतर ठिकाणीं 'ये यजामहे' असें म्हणावें असा विधि आणि निषेध यांच्या एकवाक्यतेनें अर्थ होतो. यावरून भिन्न भिन्न प्रकरणांतल्या अनेक वाक्यांची एकवाक्यता होते असें सिद्ध होतें.

७६ परमात्म्याच्या अंशभूत जीवाचा परमात्म्यापासून विभाग झाला असतां आनंद, ऐश्वर्य वगैरे जे परमात्म्याचे धर्म जीवाचे ठिकाणीं दृष्टीस पडत नाहींत त्याच धर्मांनीं संयोगाचे वेळीं म्ह. मोक्षावस्थेमध्यें जीवाचें परमात्म्याशीं साम्य होतें, इतर सर्व धर्म जीवाचे ठिकाणीं प्राप्त होत नाहींत. कारण ' जीव हा परमात्म्याप्रत प्राप्त होतो (म्ह. जीवाचा परमात्म्याशीं संयोग होतो) आणि नंतर (त्या जीवाचें परमात्म्याशीं) साम्य प्राप्त होतें ' (मुं. ३।१।३) ह्या श्रुतीमध्यें परमात्म्याप्रत प्राप्त होतो (म्ह. जीवाचा परमात्म्याशीं संयोग होतो या शब्दाचा साम्यप्राप्ति हा शेष लाविला आहे. आतां विभागाचे वेळीं जे धर्म जातात तेच धर्म संयोगाचे वेळीं पुन्हां येतात, भलते येत नाहींत म्हणून त्या संयोगामुळें होणारें जे त्या संयोगाच्या पुढें सांगितलेलें साम्य हें त्याच धर्मांनीं होतें असें मानलें पाहिजे. तेव्हां सर्व धर्म येत नसल्यामुळें मोक्षावस्थेमध्यें देखील त्यांचें ऐक्य

च्छन्दस्तुत्युपगानवत्तदुक्तम् ।

२६ विभाग झाला असतां (जे धर्म लुप्त होतात त्याच धर्मांनीं संयोगाचे वेळीं साम्य होतें). कारण (साम्यप्राप्ति हा) प्राप्त होतो या शब्दाचा शेष आहे. (तेव्हां त्याचें परमात्म्याशीं ऐक्य होत नाहीं.) कुशांचें स्थापन करतांना छंदानें केलेले जे स्तुतीमधील गायन त्याप्रमाणें हें होय. हें पूर्वी सांगितलेंच आहे. (९)

२७ ज्याप्रमाणें (लोक) कुश घेऊन यथेच्छ स्तुति करितात आणि गातात त्याप्रमाणें (मुक्त लोकांनीं संसाराचा) त्याग केल्यानंतर (यथेच्छ उपासना करावी. ही उपासना विधिप्रोक्त नव्हे.) कारण (उपासनेचे विधी हे) मोक्षवाक्याला अंगभूत आहेत. ही (गोष्ट श्रुतीनें) सांगितली आहे.

होत नाहीं. व हें साम्य देखील येतावाताचेंच आहे. कारण जीव आणि परमात्मा यांच्या आनंद वगैरेंमध्यें फार अंतर आहे. कुश म्ह. उंबराच्या समिधा. छंद म्हणजे ज्यांना गायत्री वगैरे छंद आहेत अशा वेदांतील ऋचा. यज्ञामध्यें प्रस्तोता हा समिधा स्थापन करतांना ऋचांनीं देवतांची स्तुति करीत गातो. ज्या ऋचेनें गातो त्या ऋचेंतील स्वर मात्र गाण्यामध्यें कायम असतात व्यंजनांच्या जागीं एक 'भ' हें व्यंजनच सर्व ठिकाणीं उच्चारिलें जातें. 'अभि त्वा शूर नो नुमो ' ही मूळ ऋचा 'भाभि भ्भाभूभ भो भुभो ' अशी गायली जाते. आतां मूळ ऋचा आणि गायली जाणारी ऋचा या दोहोंमध्यें जरी स्वरांनीं साम्य आहे तरी व्यंजनांनीं साम्य नसल्यामुळें त्याचें ऐक्य मानतां येत नाहीं. त्याप्रमाणें मोक्षावस्थेमध्यें जीव आणि परमात्मा यांचें सर्व धर्मांनीं साम्य नसल्यामुळें ऐक्य मानतां येत नाहीं. ही गोष्ट पूर्वी (अ. २ पा. ३ सूत्र २९) सांगितलीच आहे.

७७ ज्याप्रमाणें ब्रह्मयज्ञाचे वेळीं स्तुति करून त्यानंतर विधि नसूनही लोक हातांमध्यें दर्भ घेऊन मंत्रांनीं देवतांची यथेच्छ स्तुति करितात आणि साम गातात त्याप्रमाणें मुक्त लोकांनीं मोक्ष प्राप्त झाल्यामुळें जरी त्यांना उपासनेची जरूर नाहीं तरी केवळ परोपकारबुद्धीनें उपासना करावी. ' ब्रह्मवेत्ता साम गात असतो ' (तै. ३।१०।५) या श्रुतीवरून हेंच सिद्ध होतें.

७८ मोक्षाकरितां सांगितलेले जे उपासनांचे विधी ते मोक्षामध्यें कशी उपासना सांगतील ?

२७ सांपराये तर्तव्याभावात्तथा ह्यन्ये ।

२७ (देहांतून) जातांनाच (तो सुकृतदुष्कृतांचा त्याग करितो). कारण (मध्यें त्याला) प्राप्त होण्याजोगें असें कांहीं नाहीं. दुसरे (लोक देखील) असेंच सांगतात.

२८ स्वेच्छेनें (प्रयत्न करितां येत नसल्यामुळें आणि अशा रीतीनें) दोन्ही गोष्टी विरुद्ध होत नसल्यामुळें (देहांतून जातांनाच सुकृतदुष्कृतें टाकिलीं जातात). (१६)

२७ (देहांतून[७९]) जातांनाच (तो सुकृतदुष्कृतांचा त्याग करितो). कारण (मध्यें त्याला) प्राप्त होण्याजोगें असें कांहीं नाहीं. दुसरे (लोक देखील) असेंच सांगतात.

२८ ([८३]आणि अशा रीतीनें) दोन्ही गोष्टी विरुद्ध होत नसल्यामुळें (श्रुतीमध्यें) स्वेच्छेनें (अन्वय करावा).

७९ ज्ञानी मनुष्य हा देहांतून जातांना पुण्यपापांच्या कांहीं भागाचा त्याग करतो आणि उरलेल्या भागाचा विरजा नदी ओलांडल्यानंतर त्याग करतो. अशा दोन तऱ्हांनीं त्याच्या कर्मांचा क्षय होतो. कारण दोन्ही तऱ्हांच्या श्रुती दृष्टीस पडतात. असें येथें पूर्वपक्ष्याचें मत आहे. पुढील टीप ८६ पहा जर देहांतून जातांनाच सर्व कर्मांचा नाश होईल तर त्याचें सूक्ष्म शरीर सुद्धां नष्ट होत असल्यामुळें त्याची जी देवयान मार्गानें गति सांगितली आहे ती संभवत नाहीं.

८० ‘ जीव हा शरीररहित झाला म्हणजे त्याला प्रिय आणि अप्रिय यांचा स्पर्श होत नाहीं ’ (छां. ८।१२।१) ह्या श्रुतीनें देह नसतांना प्राप्त होण्याजोगें असें पुण्यपापाचें कांहीं फल नाहीं असें सांगितलें आहे.

८१ पातकांचा नाश झाल्याशिवाय भक्तिमार्गांत जाण्याचा अधिकारच येत नाहीं तेव्हां पूर्वींच पातकांचा नाश झाला असल्यामुळें भक्तिमार्गामध्यें गेल्यानंतर पुढें तरून जाण्यासारखें पातक वगैरे कांहीं नाहीं. आणि ज्ञानमार्गांत जाण्यापूर्वी पातकांचा नाश झालाच पाहिजे असा नियम नाहीं. कारण ‘ ज्ञान प्राप्त झाल्यानंतर त्याच्या योगानें पातकांचा नाश होतो ’ असें श्रुतीमध्यें (बृ. ४।४।२३) सांगितलें आहे. ‘ तसें ’ म्हणजे ज्ञान प्राप्त झाल्यानंतर ज्यांच्या पातकांचा नाश होतो असे लोक भक्तिमार्गांतील लोकांपेक्षां

२८ छन्दत उभयाविरोधात्।

२७ भक्तिमार्गामध्यें तरून जाण्यासारखें कांहीं नसल्यामुळें (भक्तिमार्ग हा ज्ञानमार्गाहून विजातीय आहे). कारण तसे जे लोक आहेत ते निराळेच आहेत.

२८ (मुक्त लोक स्वेच्छेनेंच उपासना करितात.) कारण मोक्षामध्यें तरून जाण्यासारखें कांहीं नाहीं. दुसरे (लोक देखील) असेंच सांगतात. (१७)

२८ (परमात्म्याच्या) इच्छेनें (कांहीं ठिकाणीं भक्तिमार्गांत गेल्यानंतर देखील पातकांचा नाश होतो). कारण (असें मानलें असतां) दोन्ही (वचनां-)चा विरोध येत नाहीं. (६)

२९ (मुक्त लोक हे) स्वेच्छेनें (कर्म करितात किंवा करीत नाहींत). कारण (त्यांना) दोन्ही गोष्टी विरुद्ध होत नाहींत.

निराळेच आहेत. मूळ संस्कृत सूत्रामध्यें संपराये असा वल्लभाचार्यांचा पाठ आहे. संपराय म्हणजे भक्तिमार्ग होय.

८२ बद्ध जीव हे एखादी अनिष्ट गोष्ट प्राप्त झाली असतां तीमधून तरून जाण्याकरितां जशी उपासना करतात तशी उपासना करण्याचें मुक्त लोकांना कारण नाहीं. कारण मोक्षामध्यें अनिष्ट कांहींच नाहीं. 'मोक्ष प्राप्त झाला असतां सर्व शोक नाहींसे होतात' असें श्रुतीमध्यें (बृ. ४।३।२२) सांगितलें आहे.

८३ 'देहत्यागाबरोबर पुण्यपापांचा त्याग होतो' असें मानलें म्हणजे श्रुति (पृ. ११९५ पं. २६ पहा) आणि हेतु (पृ. १२०५ पं. १५ पहा) या दोन्ही गोष्टी विरुद्ध होत नाहींत. तेव्हा कौषीतकि उपनिषदामध्यें 'सुकृतदुष्कृतांचा त्याग करतो' (१।४) या पुढील वाक्याचा 'देवयान मार्गाप्रत जाऊन' (१।३) या पूर्ववाक्याच्या अगोदर अन्वय करावा म्हणजे त्या श्रुतीचा विरोध येणार नाहीं.

८४ 'पापाचा क्षय झाल्यानंतर कृष्णाचे ठिकाणीं भक्ति उत्पन्न होते' असें एक वचन आहे. 'भक्तिमार्गांतील भरताचें प्रारब्धकर्म शिलक राहून त्याच्या योगानें त्याला मृगयोनि प्राप्त झाली' असें दुसरें वचन आहे.

८५ मुक्त लोकांनीं कर्म केलें तरी ते त्या कर्मांमुळें बंधांत पडत नाहींत. आणि कर्म केलें नाहीं तरी त्यांना त्यापासून प्रत्यवाय उत्पन्न होत नाहीं.

२९ गतेरर्थवत्त्वमुभयथाऽन्यथा हि विरोधः ।

२९ मार्गाच्या अर्थाबद्दल दोन तऱ्हा आहेत (असें मानलें पाहिजे). नाहींतर विरोध येईल.

३० (वर सांगितलेल्या दोन्ही रीती) बरोबरच आहेत. कारण त्या (मार्गा-) ला हेतुभूत अशा गोष्टी उपलब्ध होतात. व्यवहारांतल्याप्रमाणें (हें समजावें). (१७)

२९ दोनें[86] तऱ्हां-(नीं कर्मांचा क्षय होतो असें) मानिलें तर गति संभवते. नाहींतर विरोध येतो.

३० (देहांतून जातांनाच कर्मांचा क्षय होतो हें म्हणणें) बरोबरच आहे. कारण तशा प्रकारची गोष्ट उपलब्ध होते. व्यवहारांतल्याप्रमाणें (हें समजावें).

३१ अधिकारावर[89] असलेल्या लोकांचें जोंपर्यंत अधिकार आहे तोंपर्यंत (कर्म) कायम असतें. (१२)

---

८६ हें सूत्र पूर्वपक्ष्याचें आहे. मागील टीप ७९ पहा.

८७ मर्यादामार्ग आणि पुष्टिमार्ग या दोन तऱ्हा होत. अशी व्यवस्था मानिली नाहीं तर 'ज्ञानानेंच मोक्ष प्राप्त होतो', 'पुरुषोत्तम ज्याचा आपलेपणानें स्वीकार करतो त्याळाच तो प्राप्त होतो' अशा दोन्ही तऱ्हा सांगणाऱ्या श्रुतींचा परस्परामध्यें विरोध येईल.

८८ मुक्तांना बंध नाहीं आणि प्रत्यवाय नाहीं या दोन प्रकारांनीं मोक्षाला साफल्य आहे. जर मोक्षामध्यें सुद्धां बंध आणि प्रत्यवाय असतील तर विरोध येईल, म्ह. मोक्षाचा मोक्षपणाच नाहींसा होईल.

८९ 'वत् । ३१ यावदधिकारमवस्थितिराधिकारिकाणाम् । ३२ अनियमः सर्वेषामविरोधः शब्दानुमानाभ्याम् । ३३ अक्षर' (रा.)

९० हें सूत्र सिद्धांत्याचें आहे. 'तशा प्रकारची' म्हणजे कर्मांचा क्षय झाला तरी देहाचा संबंध आहे अशा प्रकारची. जरी विद्या ही शरीर आणि कर्म यांच्या नाशाकरतां संपादन केली, तरी ती ब्रह्मप्राप्तिरूपी आपलें फल देण्याकरतां ज्ञान्याला देवयान मार्गानें जातां यावें म्हणून त्याला सूक्ष्म शरीर देते. ज्याप्रमाणें शेताकरतां विहीर बांधली तरी तिच्यामध्यें लोक पाणी पिण्याचा वगैरे उपयोग करतात. कारण एखादी गोष्ट एखाद्या कामाकरितां केली असली तरी तिच्यापासून दुसरा उपयोग होत नाहीं असें नाहीं. त्याप्रमाणेंच हें होय.

३० उपपन्नस्तल्लक्षणार्थोपलब्धेर्लोकवत् ।

२९ ज्ञानाला दोन्ही तऱ्हांनीं साफल्य आहे असें मानलें नाहीं तर विरोध येतो. (७)

३० दोन्ही प्रकारांनीं मोक्षाला साफल्य आहे. नाहींतर विरोध येतो.

३० (मुमुक्षूपेक्षां रहस्यभक्ति करणारा) अधिक योग्यतेचा आहे. कारण त्याला त्या (परमात्म-) स्वरूपी वस्तूची उपलब्धी होते. व्यवहारातल्याप्रमाणें (हें होय). (८)

३१ (मुक्त लोकांनीं कर्म करणें किंवा न करणें या दोन्ही गोष्टी) बरोबरच आहेत. कारण (त्यांना) तशी प्रकारचें फल प्राप्त झालें आहे. व्यवहारातल्याप्रमाणें (हें समजावें). (१८)

९१ मुमुक्षूला मोक्ष प्राप्त होतो म्ह. तो अंशभूत जीव अंशी अशा परमात्म्यामध्यें लीन होतो. त्या वेळीं जीवाला आनंद होतो. परंतु परमात्मा त्याच्या अधीन नसतो. कारण त्याची भक्ति आच्छादित झालेली असते. आणि भक्ति करणारा हा भजन करतेवेळीं परमात्म्याच्या स्वरूपामध्यें लीन झालेला नसतो; त्याच्या समोर प्रत्यक्ष परमात्मा असतो. आणि त्याच्या भजनामुळें परमात्मा हा त्याच्या अधीन झालेला असतो. म्हणून तो अधिक योग्यतेचा आहे असें समजतें. ‘मुक्ति देतो परंतु भक्ति देत नाहीं’ या वचनावरून हेंच सिद्ध होतें. ज्याप्रमाणें लोकांमध्यें भर्ता स्त्रियांच्या स्वाधीन नसून बाकी घर, दार, दागिने वगैरे सर्व गोष्टी जरी स्वाधीन असल्या तरी त्यापेक्षां नुसता भर्ता स्वाधीन असणें हें अधिक योग्यतेचें समजलें जातें त्याप्रमाणेंच हें होय.

९२ मुक्तांना जें मोक्षरूपी फल प्राप्त झालें आहे तें तशा प्रकारचें आहे म्ह. साधनीभूत कर्म केलेंच पाहिजे या नियमाला सोडणारें असें आहे. ज्याप्रमाणें व्यवहारामध्यें ‘यागविधीची पूर्णता व्हावी’ या उद्देशानें सांगितलेलें जें विष्णुक्रमण वगैरे कर्म त्याची आवश्यकता यागविधीची पूर्णता झाल्यानंतर लोक धरीत नाहींत त्याप्रमाणेंच हें होय.

९३ ‘जर ज्ञानी मनुष्याच्या सर्व कर्मांचा आणि देहाचा नाश होतो तर वसिष्ठ वगैरेंना देहांतरप्राप्ति होऊन पुत्राच्या उत्पत्तिविनाशांमुळें सुखदुःखाचा अनुभव कसा आला’ अशी जी शंका येते तिचें हें उत्तर दिलें आहे.

३१ अनियमः सर्वासामविरोधः शब्दानुमानाभ्याम् ।

३१ सर्व (सगुण विद्यांशीं) अनियमानें (मार्गाचा संबंध लाविला पाहिजे. असें केलें असतां) विरोध (येत) नाहीं. असें शब्द आणि अनुमान यांवरून (समजतें). (१८)	३२ सर्व (ब्रह्मोपासकां-) ना अनियमानें (मार्गाचा संबंध लाविला पाहिजे. आणि असें केलें असतांच) शब्दें आणि अनुमान यांच्याशीं विरोध येत नाहीं. (१३)
३२ अधिकारावर असलेल्या लोकांचें, जोंपर्यंत अधिकार आहे तोंपर्यंत, (शरीरामध्यें) वास्तव्य आहे. (१९)	

९४ सर्वेषामवि (रा.) ‘ सर्वेषामविरोधाच्छब्दा ’ (म.)

९५ शब्दामध्यें म्ह. श्रुतीमध्यें (पृ. १२११ पं. १४ व पृ. १२०८ पं. ८ पहा) सर्व उपासकांना देवयानमार्ग सांगितला आहे. अनुमानामध्यें म्ह. स्मृतीमध्यें (पृ. १४८० पं. १२ पहा) देखील तसेंच सांगितलें आहे.

९६ ‘ परब्रह्माचें धारण करणें, जप करणें, शरीरसेवा करणें व ध्यान करणें ह्या चार प्रकारच्या भक्ती मोक्षाचीं कारणें आहेत’ असें अथर्वणोपनिषदामध्यें सांगितलें आहे. तीं सर्व कारणें प्रत्येक ठिकाणीं असलींच पाहिजेत असा कांहीं नियम नाहीं. त्यांपैकीं एखादें जरी कारण असेल तरी त्यापासून मोक्ष प्राप्त होतो. म्हणून श्रुतीमध्यें एके ठिकाणीं ‘ नुसत्या चिंतनापासून मोक्ष प्राप्त होतो’ असें सांगितलें आहे; दुसऱ्या ठिकाणीं ‘नुसत्या जपापासून मोक्ष प्राप्त होतो ’ असें सांगितलें आहे. नियम मानला तर या श्रुती विरुद्ध होतील. तेव्हां या शब्दावरून म्ह. श्रुतीवरून नियम नाहीं ही गोष्ट समजते. अनुमान म्ह. स्मृती होय. ‘ गोपी वगैरे केवल भावानेंच मुक्त झाल्या ’ असें स्मृतीमध्यें सांगितलें आहे. त्यावरूनही वरील गोष्ट सिद्ध होते.

३२ यावदधिकारमवस्थितिराधिकारिकाणाम् ।

३१ (धारण[96] करणें वगैरे सर्व कारणें मिळूनच मोक्ष देतात असा) नियम नाहीं. (म्हणूनच) सर्व (श्रुती-) मध्यें विरोध येत नाहीं. (ही गोष्ट) शब्द आणि अनुमान यांवरून (समजते). (९)

३२ अधिकाराला[99] योग्य अशा धर्मांचें जोंपर्यंत कार्य आहे तोंपर्यंत वास्तव्य आहे. (१०)

३२ विरोध[97] नसल्यामुळें सर्व (ज्ञानी मुक्त होतात असें समजतें. त्यांमध्यें अमुकच मुक्त होतात असा) नियम नाहीं. शब्द आणि अनुमान यांवरून (हेंच सिद्ध होतें). (१९)

३३ अधिकारावर असलेल्या लोकांपैकीं जसा (ज्याला) अधिकार असेल तसा (त्याला आनंद) असतो[100].

---

९७ ज्याप्रमाणें 'उपासनेमध्यें सर्व लोकांनीं सर्व गुणांचा संग्रह करावा' असें मानलें असतां 'ब्रह्मदेवानेंच उपासनेमध्यें सर्व गुणांचा संग्रह करावा' या वाक्याशीं विरोध येतो त्याप्रमाणें 'सर्व ज्ञानी लोक मुक्त होतात' असें मानलें असतां कांहींच विरोध येत नाहीं. शिवाय शब्दावरून ही गोष्ट सिद्ध होते. कारण 'कोणताही ब्रह्मज्ञानी फिरून संसारांत पडत नाहीं' असें कौंडिन्य श्रुतीमध्यें सांगितलें आहे. तसेंच 'ज्या अर्थी कांहीं ब्रह्मज्ञानी लोक ब्रह्मज्ञानाच्या योगानें मुक्त होतात त्या अर्थी इतर ब्रह्मज्ञानी देखील मुक्त झाले पाहिजेत' या अनुमानावरूनही हीच गोष्ट सिद्ध होते.

९८ 'तिरधि' (म.)

९९ इंद्र वगैरे अधिकारी लोकांना अधिकार चालवितां यावा म्हणून त्यांना जे ऐश्वर्य वगैरे परमात्म्याचे धर्म परमात्म्याकडून दिले जातात ते अधिकार गेल्यानंतर राहत नाहींत. नंतर त्यांना भजन वगैरे साधनांच्या योगानेंच मोक्ष प्राप्त होतो.

१०० तेव्हां जसा ज्याला आनंद पाहिजे असेल तशा आनंदाला अनुसरून तसा आनंद देणाऱ्या अशा विशेष प्रकारच्या उपासनेचाच त्याला अधिकार नियमानें असतो असें समजावें.

३३ अक्षरधियां त्ववरोध[101]: सामान्यतद्भावाभ्यामौपसदवत्तदुक्तम् ।

३३ अक्षरासंबंधानें जीं (निषेध-) ज्ञानें आहेत त्यांचा (सर्वत्र) अंतर्भाव केला पाहिजे. कारण (सर्वत्र) सारखेपणा आणि ऐक्य हीं आहेत. औपसदाप्रमाणें हें होय. ही गोष्ट (जैमिनीनें) सांगितली आहे. (२०)

३४ इयत्ता सांगितली असल्या-

३३ अक्षरासंबंधानें जीं (निषेध-) ज्ञानें आहेत त्यांचा (सर्व ब्रह्मविद्यांमध्यें) अंतर्भाव होतो. कारण (उपास्य हें सर्वत्र) सारखें आहे. आणि (तीं ज्ञानें) त्या (उपास्याच्या स्वरूपज्ञानाचीं साधनें)[102] आहेत. औपसदाप्रमाणें हें होय. ही गोष्ट (जैमिनीनें) सांगितली आहे.

३४ अनुसंधानास्तव[103] एवढ्या-(च

१०१ 'त्वविरो' (म.)

१०२ नुसत्या आनंद वगैरे गुणांच्या योगानें ब्रह्माच्या स्वरूपाचें खरें ज्ञान होत नाहीं. कारण ते गुण कांहीं अंशानें जीवाचे ठिकाणींही आहेत. परंतु 'चक्षुरहित, प्राणरहित' इत्यादि निषेधांच्या योगानें त्याचें खरें ज्ञान होतें. कारण ते निषेध जीवाचे ठिकाणीं संभवत नाहींत. म्हणून तीं ज्ञानें उपास्य अशा ब्रह्माच्या स्वरूपज्ञानाचीं साधन आहेत असें येथें म्हटलें आहे.

१०३ अक्षर म्ह. अविनाशी अशा ब्रह्माच्या स्वरूपाचें जें ज्ञान त्यापासून अविद्येचा नाश होऊन आनंदांशाचा आविर्भाव होतो. ही सामान्य मुक्ति होय. या अवस्थेमध्यें ब्रह्मभावाची प्राप्ति होऊन पुढें पुरुषोत्तमाचे ठिकाणीं भक्ति उत्पन्न होऊन अनंतर मुक्त होतो. ही खरी मुक्ति होय. तेव्हा मुक्तीचें खरें साधन भक्ति हेंच आहे. आतां 'अक्षराचें ज्ञान हें सामान्य मुक्तीचें साधन असल्यामुळें त्या अक्षराच्या ज्ञानाची मुक्तीच्या साधनामध्यें गणना केली आहे. तसेंच अक्षराच्या ज्ञानापासून प्राप्त होणारा जो तद्भाव म्ह. ब्रह्मभाव तो भक्तीच्या द्वारानें खऱ्या मुक्तीचें साधन आहे म्हणून अक्षराच्या ज्ञानाची मुक्तीच्या साधनामध्यें गणना केली आहे. अक्षराचें ज्ञान झालेल्या लोकांपैकीं कांहीं लोक अक्षरामध्येंच लीन होतात. आणि कांहीं लोक भक्ती उत्पन्न होऊन मुक्त होतात. हें औपसदाप्रमाणें आहे. यज्ञांतील औपसदनामक कर्मामध्यें एक विशेष प्रकारच्या संस्कार केलेल्या घृताचा जो यजमान आणि सर्व ऋत्विज स्पर्श करतात त्या ठिकाणीं यजमान हा आपल्या इच्छेप्रमाणें विशेष प्रीति ज्यावर असेल अशा कोणत्या तरी एका ऋत्विजाकडून प्रथम स्पर्श वगैरे विशेष गोष्टी करवितो; सर्वांकडून करवीत नाहीं. त्याप्रमाणें अक्षराला जाणणाऱ्यांपैकीं कांहींचाच परमात्मा हा भक्तिमार्गा-

३४ इयदामननात् ।

३३ अंक्षराच्या[103] ज्ञानाची जी (मुक्तीच्या साधनांमध्यें) गणना केली आहे ती सामान्य आणि सद्भाव यांवरून केली आहे. औपसदाप्रमाणें हें होय. हें (भगवद्गीतेमध्यें) सांगितलें आहे.

३४ (मुक्तांना) अक्षराचें ज्ञान असल्यामुळें त्यांमध्यें (परस्पर) विरोध नाहीं. (शिवाय त्यांच्यामध्यें दोषरहितत्व धर्मानें) साम्य आहे. (आणि परस्परावर उपकार करणारे असे) ते आहेत. शिष्याप्र[104]माणें हें होय. हें (श्रुतीमध्यें सांगितलें आहे. (२०)

३४ (अंक्षरप्राप्तीमध्यें[106] कमीपणा

३५ (प्राण[107] हा सर्वांपेक्षां उत्तम

मध्यें प्रवेश करवितो. गीतेमध्यें (भ. गी. १५।१६) क्षर आणि अक्षर यांचें स्वरूप सांगितलें आहे व (भ. गी. ८।११) ‘अक्षर जाणणाऱ्यांना परमगति म्ह. अक्षरप्राप्ति होते’ असें सांगून नंतर (भ. गी. ८।१४) ‘भक्तीच्या योगानेंच माझी प्राप्ति होते’ असें सांगितलें आहे.

१०४ ज्याप्रमाणें शिष्य हा गुरूच्या बरोबरीचा नसूनही त्याचा गुरूशीं विरोध नसतो त्याप्रमाणें सर्व मुक्तांना जरी आनंद सारखा नाहीं तरी त्यांमध्यें परस्पर विरोध नाहीं. ‘जीव जरी अनेक प्रकारचे आहेत तरी त्यांचा मोक्षामध्यें परस्पर विरोध नाहीं’ असें चतुर श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

१०५ चक्षुरहित वगैरे निषेधांनीं युक्त जे आनंद वगैरे कांहीं गुण त्यांवांचून ब्रह्माच्या स्वरूपाचें ज्ञान होत नसल्यामुळें तेवढ्याच गुणांचा सर्व ब्रह्मविद्यांमध्यें संग्रह होतो. सर्व कर्म करणें वगैरे इतर गुणांचा होत नाहीं.

१०६ मुक्ति म्ह. पुरुषोत्तमामध्यें प्रवेश होणें, आणि अक्षरब्रह्मप्राप्ति म्हणजे वैकुंठ लोकामध्यें लीन होणें. या दोन्ही ठिकाणीं संसारनिवृत्ति होते, आणि आनंदप्राप्ति होते. तरी अक्षरप्राप्तीमध्यें कमीपणा आहे. कारण तेथें जो ब्रह्मानंद होतो तो प्रजापतीच्या आनंदापेक्षां शंभरपट अधिक होतो अशी त्याची इयत्ता श्रुतीमध्यें (तै. २।८।१) सांगितली आहे; आणि मुक्तीमध्यें जो आनंद आहे त्याला मुळीं इयत्ताच नाहीं. कारण ‘पुरुषोत्तम आनंदमय आहे’ असें सांगितलें आहे.

१०७ ‘प्राण हा नाम वगैरे सर्वांपेक्षां उत्तम आहे, त्यापेक्षां दुसरा उत्तम कोणी नाहीं’ असें कौठरव्य श्रुतीमध्यें सांगितलें आहे. तेव्हां ‘सर्व उपासकांमध्यें प्राण श्रेष्ठ आहे’ असें समजतें.

३५ अन्तरा भूतग्रा[१०८]मवत्स्वात्म[१०९]नः[११०] ।

मुळें (एकच विद्या सांगितली आहे असें समजतें). (२१)

३५ भूतग्रामाप्रमाणें स्वतःचा आत्मा (सर्वांच्या) आंत आहे (असें सांगितलें असल्यामुळें विद्या एकच आहे).

३६ अन्य रीतीनें द्विरुक्ति जुळत नाहीं असें म्हणशील तर नाहीं. कारण इतर (ठिकाणच्या) उक्तीप्रमाणें (ही आहे). (२२)

गुणांचा सर्वत्र संग्रह होतो). (१४)

३५ [१११]भूतग्रामवान् असा स्वात्मा हा (सर्वांच्या) आंत आहे (असें मानलें पाहिजे); नाहींतर द्विरुक्ति जुळत नाहीं असें म्हणशील तर नाहीं. (कारण इतर ठिकाणच्या) उक्तीप्रमाणें (येथें द्विरुक्ति आहे).

---

१०८ 'मवादिति चेत्तदुक्तम् । ३७ अन्य ' (म.)

१०९ 'त्मनोऽन्यथा भेदानुपपत्तिरिति चेन्नोपदेशवत् ' (रा.)

११० शं. बृहदारण्यकामध्यें (३।४।१) याज्ञवल्क्यानें कहोल ऋषीला 'परमात्मा अंतर्यामी आहे' असें सांगितलें आहे. आणि त्याच्या पूर्वी उषस्त ऋषीला शरीररूपी जो भूतग्राम तद्वान जो आत्मा (म्ह. जीवात्मा) तो अंतर्यामी आहे असें सांगितलें आहे. दोन्ही ठिकाणीं परमात्माच सांगितला असें मानिलें तर द्विरुक्ति जुळणार नाहीं. तेव्हां दोन्ही ठिकाणची विद्या भिन्न आहे. उ. उषस्ताला सांगितलें असतां त्यावरून कहोलाची नीट समजूत झाली नाहीं म्हणून सांगितलेलीच गोष्ट दृढ करण्याकरतां याज्ञवल्क्यानें त्याच विद्येची द्विरुक्ति केली आहे. तेव्हां येथें विद्या एकच आहे असें समजावें.

१११ ज्याप्रमाणें ज्ञानमार्गामध्यें मनुष्याला अक्षरब्रह्माचें आत्मरूपानें ज्ञान होतें त्याप्रमाणें भक्तिमार्गामध्यें मनुष्याला पुरुषोत्तमाचें आत्मरूपानें ज्ञान होत नाहीं. जर पुरुषोत्तम हा स्वतःच्या आत्म्याला म्ह. 'हा स्वकीय आहे' अशा रूपानें स्वीकारलेल्या भक्ताला आत्मरूपानें आपलें ज्ञान करून देईल तर त्या भक्ताच्या भजनानंदानुभवामध्यें व्यत्यय येईल. ज्याप्रमाणें त्या भक्ताचें शरीर वगैरे अलौकिक असल्यामुळें इतर लोकासारखें असत नाहीं त्याप्रमाणें त्याचें ज्ञान देखील इतर ज्ञान्यासारखें असत नाहीं.

११२ शं. 'लक्ष्मीसहवर्तमान विष्णु हा सर्वांपेक्षां उत्तम आहे' ही गोष्ट निर्विवादच आहे. परंतु त्याहून निराळा असा ज्याप्रमाणें नाम वगैरे भूतसमुदायामध्यें एकापेक्षां दुसरा उत्तम आहे त्याप्रमाणें प्राणापेक्षां देखील दुसरा कोणी उत्तम असेल असें अनुमानानें

३६ अन्यथा भेदानुपपत्तिरिति चेन्नोपदेशान्तरवत्[113] ।

आहे.) कारण इयत्ता सांगितली आहे. (११)

३५ [111]स्वतं:च्या आत्म्याला (आत्मरूपानें ज्ञान होत नाहीं. कारण तें) व्यवधान आहे. भूतग्रामाप्रमाणें हें होय.

३६ [114]अन्य रीतीनें अभेदाचा उपदेश जुळत नाहीं असें म्हणशील तर नाहीं. कारण इतर उपदेशाप्रमाणें (हें आहे).

आहे) इतकें-(च आधिकाऱ्यांमध्यें तारतम्य आहे). कारण (श्रुतीमध्यें असें) सांगितलें आहे.

३६ [112]भूतग्रामाप्रमाणें (प्राणाहून उत्तम असा परमात्म्या-) शिवाय (दुसरा कोणी असेल) असें म्हणशील तर (तसें नाहीं) हें (पूर्वी) सांगितलें आहे.

३७ ([115]प्राणाहून उत्तम आहे असें मानलें) नाहीं तर भेद जुळत नाहीं असें म्हणशील तर नाहीं. (कारण श्रुतीनें) सांगितल्याप्रमाणें (भेद जुळतो). (२१)

सिद्ध होतें. उ. हें अनुमान श्रुतीशीं विरुद्ध आहे. ती श्रुती पूर्वी सांगितली आहे. (मागील टी. १०७ पहा.)

११३ ‘देशवत् ।’ (रा. म.)

११४ शं. ‘भक्ताला आत्मरूपानेंच पुरुषोत्तमाचें ज्ञान होतें’ असें मानलें तरच उद्धवाला कृष्णानें केलेला ज्ञानाचा उपदेश जुळतो, अन्य रीतीनें जुळत नाहीं. कारण अभेदज्ञान होण्याकरतांच तो उपदेश केला आहे. उ. हा उपदेश अभेदज्ञान व्हावें म्हणून केला नाहीं. ज्याप्रमाणें इतर कर्म करण्याचा अधिकार यावा म्हणून गायत्रीचा उपदेश केला जातो त्याप्रमाणें विरह वगैरे सहन करण्याचें भक्ताच्या शरीरामध्यें सामर्थ्य यावें म्हणून ज्ञानोपदेशरूपी संस्कारानें युक्त असें भक्ताचें शरीर केलें जातें. कारण ह्या लौकिक शरीरामध्यें स्त्रीपुरुषांचा विरह देखील सहन होत नाहीं. मग ज्या पुरुषोत्तमाचे ठिकाणीं भक्ताचें निरवधिक प्रेम असतें त्याचा विरह कसा सहन होणार ? म्हणूनच पुढें उद्धवानें विदुराला ‘मी विरहातुर आहें’ असें सांगितलें आहे. जर त्याला ज्ञानोपदेशाच्या योगानें अभेदज्ञान झालें असतें तर त्याला तसें सांगतां आलें नसतें.

११५ शं. जर प्राणाहून दुसरा कोणी उत्तम नसेल तर प्राण हा परमात्माच होईल. तेव्हां श्रुतीनें सांगितलेला जो प्राण आणि परमात्मा यांमधील भेद तो जुळणार नाहीं. उ. हा भेद बरोबरच आहे. कारण इतर सर्वांपेक्षां प्राण उत्तम आहे आणि त्यापेक्षां परमात्मा उत्तम आहे असें छांदोग्य श्रुतीमध्यें (७।१५-१६) सांगितलें आहे. हें पुढील सूत्रीं स्पष्ट होईल.

३७ व्यतिहारो विशिंषन्ति हीतरवत् ।

३७ इतर (गुणां-) प्रमाणें (ही उपासनेची) उलटापालट आहे. कारण (दोन्ही लोक) विशेष-प्रकारचें विधान करितात. (२३)

३८ (दोन्ही ठिकाणीं) तीच (सत्यविद्या सांगितली आहे). म्हणून सत्य वगैरे गुणांचा (संग्रह केला पाहिजे). (२४)

३६ ([११६] उषस्त आणि कहोल यांनीं परस्परांच्या बुद्धीची) उलटापालट करावी. कारण (दोन्ही ठिकाणीं) विशेष प्रकारचें विधान केलें आहे. इतर ठिकाणच्याप्रमाणें (हें होय).

३७ [११७] कारण (इतर ठिकाणीं) ती (परदेवता एक-) च (अनेक वेळां सांगितली आहे. कारण तेच) सत्य वगैरे (गुण वारंवार सांगितले आहेत). (१५)

११६ अंतर्यामी हा सर्व प्राण्यांच्या जीवनाचा हेतु आहे असें जें याज्ञवल्क्यानें विधान केलें आहे म्ह. उषस्ताला सांगितलें आहे त्या गोष्टीकडे कहोलानेंही लक्ष्य पुरविलें पाहिजे. तसेंच अंतर्यामी हा क्षुधा वगैरेंनीं रहित आहे असें जें कहोलाला सांगितलें आहे त्या गोष्टीकडे उषस्तानेंही लक्ष्य पुरविलें पाहिजे. म्ह. अंतर्यामी हा परमात्माच आहे अशी दोघांचीही दृढ बुद्धि होईल. याचकरतां ' सर्व प्राण्यांच्या जीवनाचा हेतु ' वगैरे गुण सांगितले आहेत. उपासना करणें ती अंतर्यामी एवढ्याच रूपानें करावयाची आहे. सूत्रांतील दृष्टांत पुढील सूत्रामध्यें स्पष्ट केला आहे.

११७ ज्याप्रमाणें विरहानें अश्रु, प्रलय, वगैरे गोष्टी होतात त्याप्रमाणें अतिविरह झाला असतां एखादे वेळीं ज्याच्या संबंधानें विरह झाला असेल त्याच्या आणि आपल्यामध्यें अभेदाचाही त्याला भास होतो. याच अभिप्रायानें ऐतरेय श्रुतीमध्यें ' जो मी तो हा (परमात्माच आहे; आणि) जो हा (परमात्मा) तो मी-(च आहें) ' असें विशेषण दिलें आहे. खराच अभेद आहे असें या श्रुतीचें तात्पर्य नाहीं.

११८ ज्याप्रमाणें श्रुतीमध्यें पूर्वी ' नांवापेक्षां मोठें काय आहे ? नांवापेक्षां वाणी मोठी आहे ' (छा. ७ । २ । १) अशीं प्रश्नोत्तरें आहेत, आणि या प्रश्नोत्तररूपी विशेषणावरूनच तेथें नांवाचें प्रकरण संपून वाणीचें प्रकरण सुरू झालें असें समजतें त्याप्रमाणें पुढें जरी प्राणापेक्षां मोठें काय आहे असा प्रश्नही नाहीं व उत्तरही नाहीं, तरी ' हा तर

३८ सैव हि सत्यादयः ।

३७ [117]इतरें (गोष्टी-) प्रमाणें (ही बुद्धीची) उलटापालट आहे. म्हणून तसें विशेषण दिलें आहे. (१२)

३८ ([118]श्रुतीमध्यें प्रश्न वगैरेंचा) अध्याहार (करावा). कारण इतर ठिकाणच्याप्रमाणें (येथेंही) विशेषण दिलें आहे. (२२)

३८ ([120]भक्तिमार्गामध्यें सत्य वगैरेंचें विधान करण्याचें कारण नाहीं.) कारण ती (भक्ती-) च सत्य वगैरे आहे.

३९ ([121]एके परदेवताच प्राणापेक्षां उत्तम आहे.) कारण सत्य वगैरे तिचींच स्वरूपें आहेत. (२३)

अतिवादी आहे कीं जो सत्याच्या योगानें भाषण करतो' (छां. ७।१६।१) ह्या ठिकाणीं 'तर' हा शब्द विशेषण दिला आहे. त्यावरून प्राणाचें प्रकरण संपून पुढें निराळें सत्याचें म्हणजे परमात्म्याचें प्रकरण सुरू झालें आहे असें समजतें. तेव्हां अर्थातच तेथें प्रश्नोत्तरें अध्याहृत घेतलीं पाहिजेत. एकंदरींत 'सत्य म्ह. परमात्मा हा प्राणापेक्षां उत्तम आहे' असें सिद्ध झालें.

११९ छांदोग्यामध्यें 'त्या देवतेनें ईक्षण केलें' (६।३।२) 'तेज हें परदेवतेमध्यें लीन होतें' (६।८।६) ह्या ठिकाणीं उपक्रम केलेल्या परदेवतेचा पुढें 'ज्याप्रमाणें भुंगे मध जुळवितात' इत्यादि अनेक ठिकाणीं (छां. ६।९।१;६।१०।१) संबंध होतो. कारण त्या सर्व ठिकाणीं 'जें सत्य आहे तो आत्मा आहे' (६।९।४;६।१०।३) इत्यादि गोष्टी एकच सांगितल्या आहेत.

१२० जसें ज्ञानमार्गामध्यें 'सत्य, शम, दम वगैरेंनीं युक्त असावें' असें मुद्दाम सांगावें लागतें तसें भक्तिमार्गामध्यें सांगण्याचें कारण नाहीं. कारण भक्तिमार्गामध्यें भक्ताच्या हृदयांत परमात्म्याचा प्रादुर्भाव झाला असल्यामुळें तेथें सत्य वगैरे आपोआपच असतात.

१२१ श्रुतीमध्यें सत्याच्या पुढें कृति, निष्ठा, ज्ञान वगैरे सांगितलीं आहेत. त्यावरून 'प्राणापेक्षां उत्तम वस्तु अनेक आहेत' असें मात्र समजूं नये. कारण सत्य वगैरे जे अनेक गुण सांगितले आहेत ते सर्व परदेवतेचीं म्ह. परमात्म्याचीं स्वरूपें आहेत.

३९ कामादीतरत्र तत्र चायतनादिभ्यः[122] ।

३९ स्थान वगैरे- (च्या साम्या-) वरून काम वगैरे (गुणांचा) इतर ठिकाणीं आणि (इतर ठिकाणच्या गुणांचा) त्या ठिकाणीं (संग्रह केला पाहिजे). (३९)	३९ स्थान[123] वगैरे- (च्या साम्या-) वरून काम वगैरे (गुण) इतर ठिकाणीं आणि त्या ठिकाणीं (सांगितले आहेत असें समजतें).
४० (प्राणाग्निहोत्राचा) लोप होत नाहीं. कारण (त्याच्याबद्दल श्रुतीचा) आदर आहे.	३९ (गुणांचा[124]) लोप होत नाहीं. कारण (त्यांच्याबद्दल श्रुतीचा) आदर आहे.

१२२ ' कामादित ' (म.)

१२३ छांदोग्यामध्यें (८।१।५) सत्यकामत्व, सत्यसंकल्पत्व वगैरे गुण स्पष्टच सांगितले आहेत. बृहदारण्यकामध्येंसुद्धां ते गुण सांगितल्यासारखेच आहेत. कारण दोन्ही ठिकाणीं हृदयरूपी स्थान सारखेंच सांगितलें आहे. शिवाय बृहदारण्यकामध्यें (४।४।२२) सांगितलेले जे वशित्व वगैरे गुण ते सत्यसंकल्पत्वरूपी गुणाचेच विशेष प्रकार आहेत. तेव्हां छांदोग्यामध्यें हृदयस्थानत्व सत्यसंकल्पत्व वगैरे गुणांच्या बरोबरच सत्यकामत्व वगैरे इतर गुण सांगितले असल्यामुळें बृहदारण्यकामध्यें ते सर्व गुण सांगितल्यासारखेच होतात. कारण एक गोष्ट कबूल केली म्हणजे तिच्या बरोबरच्या वाकीच्या निषिद्ध न केलेल्या अशा सर्व गोष्टी कबूल केल्यासारख्याच होतात. तात्पर्य, या दोन्ही ठिकाणची विद्या एक आहे असें समजावें.

१२४ विहित आणि अविहित अशी दोन प्रकारची भक्ति आहे. काम वगैरे उपाधींच्या योगानें जी परमात्म्याचे ठिकाणीं सकाम भक्ति केली जाते ती अविहित होय. कारण ती काम वगैरेंच्या योगानेंच होत असल्यामुळें तेथें ' भक्ति करावी ' असें विधान करण्याचें कारण नाहीं. आणि उपाधींवांचून केवळ प्रभूचें माहात्म्य जाणून जी निष्काम भक्ति केली जाते ती विहित होय. आतां जेथें सकाम भक्ति असते तेथें भक्ताचें मन कामामुळेंच परमात्म्याकडे लागतें म्हणून कामच मुक्तीचें साधन होतो. वगैरे शब्दानें पुत्रत्व, द्वेष वगैरे घ्यावेत. वसुदेवाचें मन पुत्रत्वामुळेंच श्रीकृष्णपरमात्म्याकडे लागलें. चैद्य, कंस वगैरे शत्रूंचें मन द्वेषामुळेंच परमात्म्याकडे लागलें. आतां जेथें निष्काम भक्ति असते तेथें भक्त हा आपलें स्थान म्ह. घर वगैरे सर्व पदार्थ परमात्म्याला समर्पण करून नंतर ते पदार्थ परमात्म्याचे आहेत असें समजून त्यांतच राहून परमात्म्याची सेवा करून मुक्त होतो म्हणून तेथें घर वगैरे पदार्थांपासूनच मुक्ति प्राप्त होते. वगैरे शब्दानें स्त्री पुत्र पशु वगैरे घ्यावेत. काम, द्वेष, घर स्त्री, पुत्र वगैरे पदार्थ हे ज्ञानमार्गामध्यें

४० आदरादलोपः ।

३९ (विहित[१२४] भक्तीहून) इतर ठिकाणीं काम वगैरे (मुक्तीचें साधन आहेत). आणि त्या-ठिकाणीं स्थान वगैरेंपासून (मुक्ति प्राप्त होते). (१३)	४० त्या (परमात्म्या-) चे ठि-काणीं (स्थित असलेली लक्ष्मी ही त्या परमात्म्याच्या) इच्छेनें (भूमी वगैरे) इतर-ठिकाणीं (देखील अवतार धारण करिते). कारण (ती सर्वांचा) आश्रय वगैरे आहे.
४० (भजन[१२७] वगैरे धर्मांचा) लोप होत नाहीं. कारण (त्यांच्या-बद्दल श्रुतीचा) आदर आहे.	४१ आदर[१२८] असल्यामुळें (उपास-नेचा) लोप होत नाहीं.

मुक्तीला प्रतिबंधक होतात. परंतु तेच पदार्थ भक्तिमार्गामध्यें मुक्तीला साधक होतात. यावरून ज्ञानमार्गापेक्षां भक्तिमार्ग हा अधिक योग्यतेचा आहे असें सिद्ध होतें.

१२५ प्रकृति ही सर्वांना स्थानभूत आहे, तिला सर्व प्रकारची इच्छा आहे, सर्व प्रकारचें ज्ञान आहे असें वत्स श्रुतीमध्यें सांगितलें आहे. तात्पर्य, इतर संसारी जीवांप्रमाणें प्रकृति ही बद्ध नसल्यामुळें ती उपासनेची अधिकारी नाहीं म्हणून श्रुतीमध्यें (छां. ७) नाम वगैरे उपासकांमध्यें तिची गणना केली नाहीं. सीता, रुक्मिणी हे तिनें अवतार धारण केले आहेत. इतर प्राण्यांसारखा तिला जन्म नाहीं.

१२६ शं. बृहदारण्यकामध्यें (४।३) निर्गुण ब्रह्मविद्या सांगितली असल्यामुळें तेथें स्पष्ट सांगितलेले वशित्व वगैरे गुण आणि त्यावरून अनुमान केलेले सत्यकामत्व वगैरे गुण हे दोन्हीही उपास्य ब्रह्माचे ठिकाणीं संभवत नाहींत. उ. सर्व उपासनांमध्यें मुख्य अशा मोक्षाकरतां सांगितलेल्या ज्या उपासना त्यांमध्येंसुद्धां श्रुतीनें मोठ्या आदरानें परमात्म्याचे गुण वर्णिले असल्यामुळें त्यांचा सर्व ठिकाणीं संग्रह केलाच पाहिजे. यावरून ‘ परमात्मा सगुणच आहे ’ असें सिद्ध होतें.

१२७ श्रुतीमध्यें (श्वे. ४।८) ज्याला ब्रह्मज्ञान नाहीं त्याचें अध्ययन निष्फळ आहे असें सांगितलें आहे. यावरून त्या वेदामध्यें सांगितलेलें कर्म देखील ज्ञानावांचून निष्फल आहे असें सिद्ध होतें. आतां तें ज्ञान भक्तीशिवाय प्राप्त होत नाहीं असें ‘भक्तीच्या योगानें मला जाणतो ’ या वाक्यावरून समजतें. अशा रीतीनें श्रुतीनें भजन वगैरे भगवद्धर्मांचा आदर दाखविला आहे म्हणून त्यांचा लोप होत नाहीं. म्हणजे नित्य कर्म करण्याचे वेळीं भजन वगैरे करण्याचा प्रसंग आला असतां अगोदर भजन वगैरे करावें आणि नंतर उरल्या वेळांत नित्य कर्म करावें.

१२८ प्रकृति ही जरी बद्ध नाहीं तरी तिचा परमात्म्याविषयीं आदर म्ह. भक्ती असल्यामुळें ती त्याची उपासना करतेच असें समजावें.

४१ उपस्थितेऽतस्तद्वचनात् ।[१२९]

४१ (भोजन) उपस्थित झालें असतां त्या (म्ह. भोजन द्रव्या-) पासून (प्राणाग्निहोत्र करावें). कारण तसें सांगितलें आहे. (२६)

४२ त्या (कर्मांगां-) च्या निर्धारणाचा (कर्माशीं) नियमानें संबंध असत नाहीं. कारण तसें दृष्टीस पडतें. शिवाय (असल्या विद्यांना) अप्रतिबंधरूप निराळेंच फल आहे. (२७)

४० (ब्रह्म[१३०]) प्राप्त झालें असतां त्या (ब्रह्मप्राप्ती-) पासून तें (यथेच्छसंचाररूपी फल) सांगितलें आहे म्हणून (गुणांचा संग्रह होत नाहीं असें नाहीं). (१६)

४१ त्या (उद्गीथ वगैरे) उपासनांचा (कर्माशीं) नियमानें संबंध असत नाहीं. कारण तसें दृष्टीस पडतें. शिवाय (असल्या उपासनांना) अप्रतिबंधरूप निराळेंच फल आहे. (१७)

---

१२९ ‘ पस्थितेस्तद्व ’ (म.)

१३० शं. मुमुक्षु मनुष्याला उपासनेमध्यें सत्यकामत्व वगैरे गुणांचा संग्रह करतां येत नाहीं. कारण त्या गुणांच्या योगानें जो उपासना करतो त्याला सर्व लोकांमध्यें यथेच्छ संचार करतां येतो असें या उपासनेचें सांसारिक फळ सांगितलें आहे (छां. ८।२।१). उ० हें फळ सांसारिक नव्हे, तर ब्रह्मप्राप्तीचेंच हें फल आहे असें समजावें.

१३१ शं. ज्ञानावांचून कर्म सफल होत नाहीं या गोष्टीवरून ज्ञान हें कर्माचें अंग आहे असें सिद्ध होतें. उ० कर्म आणि भजन या दोन्ही गोष्टी एकदम उपस्थित झाल्या नसतांही जर अगोदर भजन करावें म्हणून पूर्वसूत्रानें सांगितलें असतें तर त्यावरून तसें सिद्ध झालें असतें. ज्या वेळीं एकदम दोन्ही गोष्टी उपस्थित होतील त्या वेळीं अगोदर अमुक करावें आणि मागून अमुक करावें एवढाच फक्त विचार पूर्वसूत्रामध्यें केला आहे. म्हणून तो दोष येत नाहीं.

१३२ परमात्म्याच्या जवळ अनादिकालापासून प्रकृतीची स्थिती असल्यामुळें प्रकृती ही नित्यमुक्त आहे, बद्ध नव्हे असें समजतें. ‘ प्रकृति आणि पुरुष हे दोघे अनादिनित्यमुक्त आहेत ’ असें गोपवन श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

१३३ ‘ रणार्थनियम ’ (म.)

१३४ भक्तिमार्गापैकीं ज्या भक्तानें कर्म करावें अशी प्रभूची इच्छा नसेल त्यानें कर्म

४२ तन्निर्धारणा[133]नियमस्तद्दृष्टेः पृथग्घ्यप्रतिबन्धः फलम् ।

४१ (दोन्ही[131] गोष्टी एकदम) उपस्थित झाल्या असतां त्या (आदरा-) वरून तसें सांगितलें आहे म्हणून (ज्ञान हें कर्माचें अंग होत नाहीं). (१४)

४२ त्या[134] (प्रभूच्या इच्छे-)च्या निर्धारणाचा नियम नाहीं (म्हणून कर्म केलें पाहिजे). ज्याला त्या (भगवदिच्छे-) चें ज्ञान आहे त्याच्या (कर्मांचें) निराळेंच फल आहे हें बरोबरच आहे. (परंतु ज्याला त्या इच्छेचें ज्ञान नाहीं त्याच्या कर्मांचें) अप्रतिबंधरूप फल आहे. (१५)

४२ समीप[132] स्थिति असल्यामुळें (प्रकृति ही नित्यमुक्त आहे असें समजतें). कारण तसें सांगितलें आहे. (२४)

४३ त्या (तत्वां[135]-) चा निश्चय आणि अर्थाचा नियम हें त्या (ब्रह्मा-) च्या दर्शनापेक्षां निराळेंच आहे. कारण अप्रतिबंध हें (श्रवण व मनन यांचें) फल आहे. (२५)

करूं नये. उदा. शुक वगैरे. आणि तशी इच्छा असल्यास कर्म करावें. उदा. पांडव वगैरे. पांडवांना प्रभूच्या इच्छेचें ज्ञान झालें होतें हें गीतेवरून स्पष्ट होत आहे. त्या पांडव वगैरेंनीं केलेल्या कर्मांचें स्वर्ग वगैरे फल नव्हे. कारण पूर्णभक्तांना स्वर्ग वगैरे गोष्टी तुच्छच भासतात. तर ‘ वेदामध्यें केलेल्या मर्यादेचें रक्षण होणें ’ आणि ‘ लोकसंग्रह ’ हीं तेथें फलें आहेत. आतां ज्याला प्रभूची इच्छा कशी आहे हें कांहींच समजत नाहीं त्यानेंही कर्म केलें पाहिजे. कारण तो मध्यम प्रतीचा भक्त असल्यामुळें जर तो कर्म न करील तर त्याचें चित्त शुद्ध न राहून कदाचित् भगवत्सांनिध्यामध्यें कांहीं प्रतिबंध होईल. तेव्हां अप्रतिबंध हेंच त्याच्या कर्मांचें फल आहे असें समजावें. सूत्रकारांनीं येथें हा विचार प्रासंगिक रीतीनें केला आहे.

१३५ ब्रह्मदर्शनाकरतां उपासना म्ह. ध्यान केलेंच पाहिजे. नुसत्या श्रवणानें आणि मननानें ब्रह्मदर्शन होत नाहीं. श्रवणानें अमुक तत्वें आहेत असा निश्चय होतो, आणि मननानें अमुक वाक्याचा अमुकच अर्थ आहे असा निश्चय होतो. आतां नुसत्या ध्यानानेंही भागत नाहीं. कारण ध्यानापासून ब्रह्मदर्शन होतें, परंतु त्याला अज्ञान आणि अर्थाचा संशय असे प्रतिबंध आहेत. ते दूर करण्याकरतां श्रवण व मनन यांची जरूर आहे. श्रवण, मनन आणि ध्यान हीं तिन्हीं करावींत असें श्रुतीमध्यें (बृ. २।४।५) सांगितलें आहे.

४३ प्रदानवदेव[136] तदुक्तम् ।

४३ (पुरोडाशांच्या) प्रदानाप्रमाणेंच (हें होय). ही गोष्ट (जैमिनीनें) सांगितलेली आहे. (२८)	४२ (पुरो[137]डाशांच्या) प्रदानाप्रमाणेंच (हें होय). ही गोष्ट (जैमिनीनें) सांगितलेली आहे. (१८)
४४ अनेक चिन्हें असल्यामुळें (हे अग्नी विद्यात्मकच आहेत). तें (चिन्ह प्रकरणापेक्षां) प्रबल आहे. हें देखील (जैमिनीनें सांगितलेंच आहे).	४३ अने[140]क चिन्हें असल्यामुळें (सर्व पराविद्येमधील उपास्य देवतेचें स्वरूप सांगितलें आहे असें समजतें). तें (चिन्ह प्रकरणापेक्षां) प्रबल आहे. हें देखील (जैमिनीनें सांगितलेंच आहे). (१९)

१३६ 'देव हि तदु' (म.)

१३७ शं. दहरविद्येमध्यें (छां. ८।१।१-२) दहराकाशरूपी परमात्म्याची उपासना सांगून पुढें त्याच्या सत्यकामत्व वगैरे गुणांची निराळी उपासना सांगितली आहे. आतां या पुढील उपासनेमध्यें गुणांचा आश्रय जरी परमात्माच आहे तरी त्याचें चिंतन पहिल्या उपासनेमध्यें झालें असल्यामुळें फिरून दुसऱ्या उपासनेमध्यें त्याचें चिंतन करण्याचें कारण नाहीं. उ. पुरोडाशांच्या प्रदानाप्रमाणें येथें परमात्म्याचें चिंतन फिरून केलें पाहिजे, कारण पुढील उपासनेमध्यें विशेष प्रकारच्या गुणांनीं युक्त अशा परमात्म्याच्या स्वरूपाचें चिंतन कर्तव्य आहे. व तसें पूर्वीच्या उपासनेमध्यें झालेलें नाहीं.

१३८ 'सर्वात्मभाव' म्हणजे 'सर्व आपण आहे असें ज्ञान होणें'. हा सर्वात्मभाव ज्ञान, भक्ति वगैरेंच्या योगानें मिळवितां येत नाहीं. तो प्रभूनेंच दिला पाहिजे. शं. 'सर्वात्मभावानें मला शरण ये म्हणजे तुला कशापासूनही भीति उरणार नाहीं' या प्रभूच्या वचनावरून सर्वात्मभाव हा साधनांच्या योगानें मिळवितां येतो असें समजतें. नाहींतर प्रभूनें असें सांगितलें नसतें. उ. हें परमात्म्याचें भाषण वरप्रदानासारखेंच आहे म्हणजे ह्या वचनाचें तात्पर्य 'तूं शरण ये तुझा सर्वात्मभाव होईल, नंतर तुला कशाचीही भीति उरणार नाहीं' असें समजावें. या सूत्राचा असाही अर्थ होतो:— '(सर्वात्मभाव हा) प्रदानासारखाच आहे. हें श्रुतीमध्यें (का. २।२२) सांगितलें आहे.' परमात्म्यानें भक्ताचें वरण केलें (म्ह. भक्ताला आपलेपणानें स्वीकारिलें) म्हणजे सर्वात्मभाव प्राप्त होतो असें ह्या श्रुतीचें तात्पर्य आहे.

१३९ श्रवण वगैरेंच्या पासून ब्रह्मज्ञान होतें. परंतु तें श्रवण वगैरे गुरूपासूनच प्राप्त झालेलें पाहिजे. कारण ज्याला गुरु आहे असा मनुष्य ह्या परमात्म्याला जाणतो असें श्रुतीमध्यें (छां. ६।१४।२) सांगितलें आहे.

४४ लिङ्गभूयस्त्वात्तद्धि बलीयस्तदपि ।

४३ प्रदानासारखेंच[138] तें भाषण आहे. (१६)	४४ (श्रवण[139] वगैरे हीं गुरूनें) दिलेलींच (उपयोगी पडतात). कारण तसेंच सांगितलें आहे. (२६)
४४ चिन्हांचें[140] आधिक्य असल्यामुळें तें (वरणें-) च (काल वगैरेंपेक्षां) प्रबल आहे. हें (मागें सांगितलें आहे).	४५ अनेक[142] चिन्हें असल्यामुळें तो (म्ह. गुरुप्रसाद हा शिष्याच्या प्रयत्नापेक्षां) प्रबल आहे. (परंतु) तें (श्रवण वगैरे) देखील (पाहिजे आहे). (२७)

१४० तैत्तिरीय उपनिषदामध्यें दहरविद्या सांगून पुढें हजार मस्तकाचा देव (तै. महा. ना. ११।१) इत्यादि वर्णन केलें आहे. तें वर्णन प्रकरणावरून दहरविद्येमधील उपास्य देवतेचेंच केलें आहे असें समजूं नये; तर सर्व परविद्येमधील उपास्य देवतेचें केलें आहे असें समजावें. कारण परविद्येमध्यें जे अक्षर, शिव, शंभु, परब्रह्म वगैरे अनेक शब्द अनेक ठिकाणीं दिले आहेत त्या सर्व शब्दांचा येथें निर्देश करून अशा प्रकारचा नारायण आहे असें सांगितलें आहे; अशीं येथें अनेक चिन्हें आहेत.

१४१ शं. प्रभूनें जरी भक्ताला वरिलें तरी देश काळ वगैरे प्रतिबंधक असल्यास त्या वरण्यापासून कांहीं उपयोग होणार नाहीं. उ. सर्वात्मभाव हें वरण्याचें चिन्ह आहे. कारण सर्वात्मभावावरून वरण्याचें अनुमान होतें. तो सर्वात्मभाव इतका वाढतो कीं शेवटीं परमात्माच आहार स्वरूपानें भक्ताच्या प्राणाचें पोषण करतो. 'हें सर्व आत्म्याचेंच आहे' (छां. ७।२६।१) या श्रुतीवरून हें सिद्ध होतें. तेव्हां ज्या अर्थी वरण्याचें चिन्ह इतकें अधिक आहे त्या अर्थी वरणें देखील अधिक योग्यतेचें असलें पाहिजे. यावरून काल वगैरेंपेक्षां वरणें हें प्रबल आहे हें अर्थातच सिद्ध होतें. आतां सर्वात्मभावानें भजनामध्यें प्रतिबंध होईल अशी जर कोणी शंका घेईल तर त्या शंकेचें उत्तर पूर्वी (३ । ३ । ३५) सांगितलेंच आहे.

१४२ 'सत्यकामानें जरी ऋषभ वगैरेंपासून ब्रह्मविद्येचें श्रवण केलें होतें तरी पुन्हां गुरूची प्रार्थना केली' (छां. ४।९।३) इत्यादि अनेक चिन्हांवरून शिष्याच्या स्वतःच्या प्रयत्नापेक्षां गुरूचा प्रसाद हा अधिक प्रबल आहे असें समजतें. तथापि शिष्यानें मोक्षप्राप्तीकरतां श्रवण वगैरेंविषयीं प्रयत्न केलाच पाहिजे. वाराहामध्यें असेंच सांगितलें आहे.

४५ पूर्वविकल्पः प्रकरणात्स्यात्क्रिया मानसवत् । ४६ अतिदेशाच्च ।

४५ प्रकरणावरून मागल्या (अग्नीचा) हा एक प्रकार आहे. आणि (हे अग्नी) क्रियेला (अंगभूत) आहेत. मानसिक (सोमपात्रा-) प्रमाणें हें होय.

४६ अतिदेशावरूनही (या अग्नींचा क्रियेशीं संबंध सिद्ध होतो).

४७ परंतु (हे अग्नी) विद्यात्मकच आहेत. कारण (श्रुतीचें) निर्धारण आहे.

४४ (मनश्चित् वगैरे अग्नी हे) प्रकरणावरून मागल्या (अग्नीचे) प्रकार आहेत. आणि ते क्रियेला (अंगभूत) आहेत. मानसिक (सोमपात्रा-) प्रमाणें हें होय.

४५ अतिदेशावरूनही (या अग्नींचा क्रियेशीं संबंध सिद्ध होतो).

४६ परंतु (हे अग्नी) विद्ये- (चे अंगभूत) आहेत. कारण (श्रुतीचें) निर्धारण आहे. आणि (तसें चिन्हही) दृष्टीस[१५०] पडते.

१४३ येथून दोन सूत्रें पूर्वपक्ष्याचीं आहेत. 'हें सर्व आत्म्याचेंच आहे' या श्रुतीमध्यें वरण्याच्या चिन्हाचें म्ह. सर्वात्मभावाचें वर्णन केलें नाहीं, तर पूर्वींच्या प्रपाठकामध्यें जें अक्षरब्रह्माचें अभेदज्ञान सांगितलें आहे तेंच ह्या श्रुतीमध्यें निराळ्या प्रकारानें सांगितलें आहे. ज्याप्रमाणें पाद्य, अर्घ्य वगैरे बाह्य क्रियांपेक्षां मानसिकपूजारूपी व्यापार निराळा असला तरी तो पूजेचाच एक प्रकार समजला जातो त्याप्रमाणें हें होय.

१४४ शिष्यानें एकदां एक गुरू केला म्हणजे मागून दुसरा गुरू करूं नये असें नाहीं, तर प्रकरणावरून विकल्प होतो. प्रकरण म्ह. प्रकार होय. दुसरा गुरू हा कोणत्या प्रकारचा आहे—पूर्वींपेक्षां कमी योग्यतेचा आहे किंवा बरोबरीचा आहे किंवा अधिक आहे म्हणजे सर्व प्रकारचा अनुग्रह करणारा आहे—हें पहावें. कमी योग्यतेचा असेल तर करूं नये. अधिक असेल तर अवश्य करावा. आणि बरोबरीचा असेल तर विकल्प म्ह. पूर्वींच्या गुरूच्या संमतीनें करावा किंवा न करावा. मानासिकक्रिया म्हणजे ध्यान. ज्याप्रमाणें दोन ध्यानें सारखीं असल्यास त्यांचा विकल्प होतो त्याप्रमाणेंच हें होय.

१४५ श्रुतीमध्यें हें नामरूपात्मक सर्व जग ब्रह्म आहे असें पूर्वींच्या प्रपाठकामध्यें सांगून पुढें (छां. ७।१।४) या प्रपाठकामध्ये ऋग्वेद वगैरे हे नामस्वरूपी ब्रह्म आहे असा पूर्वी सांगितलेल्याचा अतिदेश केला आहे. यावरूनही प्रकृत श्रुतीमध्यें ज्ञानाचाच एक प्रकार सांगितला आहे असें समजतें.

४७ विद्यैव तु निर्धारणात्[147] ।

४५ प्रकरणावरून[143] पूर्वी (सांगितलेल्या आत्मज्ञानाचाच हा एक) प्रकार आहे. (बाह्य) क्रिया आणि मनाचे व्यापार ह्यांप्रमाणें हें होय.

४६ अतिदेशांवरूनही[145] (हेंच सिद्ध होतें).

४७ परंतु[148] ही विद्याच (सांगितली आहे.) कारण निर्धारण आहे.

४६ प्रकरणावरून[144] पूर्वींच्या (गुरूशीं दुसऱ्या गुरूचा) विकल्प होतो. मानसिक क्रियेप्रमाणें हें होय.

४७ अतिदेशांवरूनही[146] (हेंच सिद्ध होतें). (२८)

४८ विद्या[149] हेंच (मोक्षाचें साधन आहे). कारण निर्धारण आहे.

---

१४६ 'जे आमच्यासारखे असतील किंवा जे आमच्यापेक्षां अधिक असतील त्यांची उपासना कर' असें पौष्यायण श्रुतीमध्यें गुरूनें शिष्याला सांगितलें आहे. हाच अतिदेश होय.

१४७ 'रणाद्दर्श' (रा.)

१४८ हें सिद्धांताचें सूत्र आहे. 'हें सर्व आत्म्याचेंच आहे' (छां. ७।२६।१) ह्या प्रकृत श्रुतीमध्यें विद्या म्ह. सर्वात्मभावच सांगितला आहे. कारण 'भूमाच जाणावा' (छां. ७।२३।१) असें श्रुतीमध्यें निर्धारण केलें आहे. भूमा म्ह. सुख होय. आनंदमय जो पुरुषोत्तम तोच खरा सुखस्वरूपी आहे, अक्षरब्रह्म नव्हे. कारण त्याच्या आनंदाची इयत्ता केली आहे (अ. ३ पा. ३ सू. ३४ पहा). तेव्हां अक्षरब्रह्माचें प्रकरण पूर्वींच्याच प्रपाठकामध्यें संपलें, आणि या पुढील प्रपाठकामध्यें पुरुषोत्तमाचें प्रकरण चालू झालें असें समजतें.

१४९ 'ज्ञान हेंच मोक्षाचें साधन आहे, त्याला दुसरा मार्ग नाहीं' असें श्रुतीमध्यें (श्वे. ३।८) निर्धारण केलें आहे. तेव्हां 'ज्ञानप्राप्तीकरतां उपासना केली पाहिजे' असें सिद्ध झालें.

१५० श्रुतीमध्यें (पृ. १२७० पं. १३) ह्या मनश्चित् वगैरे अग्नींच्या प्रकरणांत 'त्यांनीं सर्व गोष्टी मनानें संपादन केल्या' असें सांगितलें आहे. ह्या चिन्हावरून हे अग्नी विद्येचे अंगभूत आहेत क्रियेचे अंगभूत नव्हेत असें सिद्ध होतें.

३८ दर्शनाच्च । ४९ श्रुत्यादिबलीयस्त्वाच्च न बाधः ।

४८ चिन्हांवरूनही (या अग्नीचें स्वातंत्र्य सिद्ध होतें).	
४९ परंतु श्रुति वगैरे प्रबल असल्यामुळें ('हे अग्नी स्वतंत्र आहेत ' या मताचा) बाध होत नाहीं.	४७ शिवाय श्रुती वगैरे (प्रकरणापेक्षां) प्रबल असल्यामुळें (हे अग्नी विद्येचे अंगभूत आहेत या मताचा) बाध होत नाहीं.
५० संबंध वगैरेंवरून (हे अग्नी स्वतंत्र आहेत असें समजतें).	४८ [१५६] अनुबंध वगैरेंवरून (हा विद्यामयक्रतु निराळा आहे

१५१ सर्वात्मभाव प्राप्त झालेल्या गोपी वगैरे भक्तांना इतर सर्व गोष्टींचें विस्मरण होऊन नंतर परमात्म्याच्या स्पर्शानें सर्व सामर्थ्य प्राप्त होतें असें दृष्टीस पडतें. तेव्हां भक्तांना हें सर्व आत्म्याचेंच आहे ह्या श्रुतीमध्यें सांगितल्याप्रमाणें खरा तशा प्रकारचा भास होतो असेंच ह्या श्रुतीचें तात्पर्य आहे.

१५२ केवळ विद्येपासूनच मोक्ष प्राप्त होतो असें नाहीं; तर परमात्म्याचें प्रत्यक्ष ज्ञान झालें म्हणजेही मोक्ष प्राप्त होतो. कारण ' परमात्म्याला पाहूनच मुक्त होतो ' असें कौशिकश्रुतीमध्यें सांगितलें आहे.

१५३ शं. दोन्ही प्रपाठकांमध्यें सनत्कुमार आणि नारद यांचा संवाद असल्यामुळें ते दोन्ही प्रपाठक मिळून एकच महावाक्य होतें. तेव्हां अर्थातच पूर्वीच्या प्रपाठकाप्रमाणें पुढच्या प्रपाठकामध्येंही ज्ञानाचाच एक प्रकार सांगितला आहे, सर्वात्मभाव सांगितला नाहीं, असें मानलें पाहिजे. उ. हें म्हणणें बरोबर नाहीं. कारण वाक्यापेक्षां श्रुती व लिंग हीं प्रबल आहेत. श्रुती मागें (सू. ४७) दाखविलीच आहे. ' तोच खालीं आहे ' (छां. ७।२५।१) इत्यादि श्रुतींमध्यें जी भक्ताची एक प्रकारची मनोवृत्ति दाखविली आहे त्याच्या पुढें परमात्म्यानें आपलेपणानें स्वीकारलेल्या भक्ताचे ठिकाणीं असलेला जो सर्वात्मभावरूपी महिमा त्यामध्यें परमात्मा असतो असें श्रुतीमध्यें (मू. सं. 'स्वे महिम्नि' छां. ७।२४।१) सांगितलें आहे. तेंही सर्वात्मभावाचें लिंग म्ह. चिन्ह होय. स्व म्ह. स्वकीय भक्ताचे ठिकाणीं असलेला जो महिमा म्ह. सर्वात्मभावरूपी उत्कर्ष त्यामध्यें परमात्मा स्थित आहे असें ह्या श्रुतीचें तात्पर्य आहे.

१५४ ' जनक वगैरे हे कर्माच्या योगानेंच सिद्धीला गेले ' असें जरी स्मृतीमध्यें (भ. गी. ३।२०) सांगितलें आहे, तरी ह्या प्रमाणानें श्रुतीचा बाध होत नाहीं. तेव्हां 'विद्या हेंच मोक्षाचें साधन आहे' ही श्रुतीवरून सिद्ध केलेली गोष्ट (पूर्वीचें सू. ४८ पहा) बरोबरच आहे. ' कर्म वगैरेंच्या योगानें खरें सुख मिळत नाहीं, तेव्हां मुख्य तत्व काय आहे तें सांग ' असें इंद्रानें ब्रह्मदेवाला विचारिलें आहे हेंही याच गोष्टीचें चिन्ह होय. सूत्रांतील

५० अनुबन्धादिभ्यः[155] प्रज्ञान्तरपृथक्त्ववद्दृष्टश्च तदुक्तम् ।

४८ [154]आणि तसें दृष्टीस पडतें.	४९ [152]आणि प्रत्यक्षज्ञानापासून (मोक्ष प्राप्त होतो). (२९)
४९. [153]शिवाय श्रुति वगैरे प्रबल असल्यामुळें (वाक्यावरून सर्वात्मभावाचा) बाध होत नाहीं.	५० [154]श्रुती वगैरे प्रबल असल्यामुळें (त्यांचा इतर प्रमाणानें) बाध होत नाहीं. (३०)
५० संबंध[157] वगैरेंवरून (सर्वात्मभावरूपी लिंगच सांगि-	५१ भक्ति वगैरेंपासून (ब्रह्मदर्शन[158] होतें). (३१)

वगैरे शब्दानें हें चिन्ह घ्यावें. आतां कर्मामुळें मोक्षामध्यें कांहीं अतिशय प्राप्त होतो म्हणून कर्माची अवश्यकता आहे असें वरील गीतावाक्याचें तात्पर्य आहे.

१५५ ' दिभ्यः । ५२ प्रज्ञान्तरपृथक्त्ववद्दृष्टिश्च त ' (म.)

१५६ यज्ञांतील ग्रह, स्तोत्र, शस्त्र वगैरे जे पदार्थ ते अनुबंध होत. ते येथें मानसिक असे कल्पिले आहेत. त्यावरून हे मनश्चित् वगैरे अग्नी ज्या क्रतूमध्यें (म्ह यज्ञामध्यें) आहेत तो क्रतु इतर क्रतूंपेक्षां निराळा म्ह. विद्यामय आहे असें समजतें. ज्याप्रमाणें दहर विद्या वगैरे विद्या कर्मांहून अगदीं पृथक् आहेत त्याप्रमाणेंच हें होय. आतां येथें हा विद्यामय क्रतु करावा असा विधिवाचक शब्द जरी नाहीं तरी ही गोष्ट अपूर्व असल्यामुळें हा विधि आहे असें मानतां येतें. कारण असे विधी दृष्टीस पडतात. एखादी नवीन गोष्ट सांगितली असतां तेथें जरी विधिवाचक शब्द नसला तरी तो विधी मानावा असें जैमिनीनें (जै सू. १०।४।२०) सांगितलें आहे.

१५७ अ. परमात्मा हा वास्तविक रीतीनें एकच असल्यामुळें त्याला दुसरा आधार संभवत नाहीं असें वरील श्रुतीचें तात्पर्य आहे. भक्ताच्या मनांतील सर्वात्मभाव दाखविण्याविषयीं त्या श्रुतीचें तात्पर्य नाहीं. उ. जर असें असेल तर पुढें 'तो हा (हें सर्व आत्मरूप आहे) असें मानणारा ' (छां. ७।२५।२) ह्या श्रुतीमध्यें जो सर्वात्मभावाचा संबंध केला आहे तो केला नसता. आतां ह्या सर्वात्मभावापासून भजनानंद प्राप्त होतो. मुक्ति प्राप्त होत नाहीं. कारण त्यांना मुक्तीची इच्छा नाहीं. ज्याप्रमाणें भक्तांचीं इतर ज्ञानें म्ह. परमात्मा इष्ट देणारा आहे इत्यादि प्रकारच्या अनेक बुद्धी असतात व त्यांपासून पृथक् पृथक् फळें प्राप्त होतात त्याप्रमाणेंच हें होय. आणि गोपी वगैरेंना सर्वात्मभावापासून प्रभूच्या स्वरूपाचें दर्शन होऊन भजनानंद प्राप्त झालेला व्यासांनीं पाहिला आहे ' मी भक्ताच्या अधीन आहे. मला भक्तांच्या योगानें स्वाधीन करून घेतात ' (भाग. ९।४।६३–६६) असें परमात्म्यानें दुर्वासाला भागवतामध्यें सांगितलें आहे.

१५८ ही गोष्ट नारायणतंत्रामध्यें सांगितली आहे. उपासकानें भक्तिपूर्वक उपासना करावी असें त्यावरून सिद्ध होतें. सूत्रांतील वगैरे या शब्दानें शम आणि दम घ्यावेत.

५१ न सामान्यादप्युपलब्धेर्मृत्युवन्न

पृथक् अशा इतर विद्यांप्रमाणें हें होय. (यासारख्या दुसऱ्या गोष्टीही प्रकरणापासून काढून घेतां येतात असें) आढळतें. हें (जैमिनीनें) सांगितलें आहे.

असें समजतें). पृथक् अशा इतर विद्यांप्रमाणें हें होय. (आणि अशा प्रकारचा विधि) दृष्टीस पडतो. हें (जैमिनीनें) सांगितलें आहे.

५१ सादृश्यावरून देखील (या अग्नींचा क्रियेशीं संबंध मानतां येत) नाहीं. कारण (ते पुरुषाच्या उपयोगीं आहेत) असें उपलब्ध होतें. मृत्यूप्रमाणें हें होय. आणि लोक हे (अग्नी) होत नाहींत.

४९ [१६०]सादृश्यावरून देखील (या अग्नींचा क्रियेशीं संबंध मानतां येत) नाहीं. कारण (एखादा धर्म घेऊन सादृश्य जुळविलेलें) दृष्टीस पडतें. मृत्यूप्रमाणें हें होय. कारण (इतरांना त्या) लोकांची प्राप्ति झालेली नाहीं.

१५९ तात्पर्य, जशी उपासना असेल तसें ब्रह्मदर्शन होतें आणि जसें ब्रह्मदर्शन होईल तसा मोक्ष प्राप्त होतो. ह्यावरून मोक्ष हा सर्वांना सारखा प्राप्त होत नाहीं हें सिद्ध होतें.

१६० अतिदेशावरून (३।३।४५) या सूत्रामध्यें जें पूर्वपक्षानें विधान केलें आहे त्याचें हें खंडन केलें आहे. ज्याप्रमाणें सूर्य वगैरेंना मृत्यूच्या लोकाची आणि त्याच्या स्थानाची प्राप्ती झाली नसूनही केवळ संहार करणें या धर्मानें सादृश्य जुळविलें आहे त्याप्रमाणें हें होय.

१६१ शं. 'दुसरें कांहीं पाहत नाहीं' (छां. ७।२४।१) इत्यादि श्रुतींमध्यें सर्वात्मभाव सांगितला नाहीं. कारण सर्वात्मभाव झाला असतां मोक्षसुखाची देखील इच्छा नसते.

हि लोकापत्तिः ।

तलें आहे असें समजतें). पृथक् (फल देणाऱ्या) इतर ज्ञानांप्रमाणें हें होय. आणि (असेंच) दृष्टीस पडतें. हें (परमात्म्यानें) सांगितलें आहे.

५१ ("[161]श्रुतीमध्यें लोकप्राप्ति सांगितली असल्यामुळें सर्वात्मभाव सांगितला नाहीं' असें म्हणतां येत) नाहीं. कारण सादृश्यावरूनही (प्रयोग झालेला) उपलब्ध होतो. कारण (भक्ताला) मृत्यूप्रमाणें लोकप्राप्ति संभवत नाहीं.

५२ ज्याप्रमाणें विशेष उपासना भिन्न भिन्न प्रकारच्या आहेत त्याप्रमाणें (ब्रह्म-) दर्शनही (भिन्न भिन्न प्रकारचें आहे.) हें (कमठ श्रुतीमध्यें) सांगितलें [51] आहे. (३२)

५३ ([162]परमात्म्याच्या(सामान्यतः दर्शनापासून देखील (मुक्ति प्राप्त होते असें) नाहीं. ज्याप्रमाणें मृत्यूपासून (मुक्ति प्राप्त होत नाहीं) त्याप्रमाणेंच हें होय. कारण (मुक्ति म्हणजे) लोकांची प्राप्ति नव्हे. (३३)

आणि प्रकृत श्रुतीमध्यें तर 'त्याचा सर्व लोकांमध्यें यथेच्छ संचार होतो' (छां. ७।२५।२) असें सांगितलें असल्यामुळें तो सुखाकरतां सर्व लोकांमध्यें जातो असें समजतें. उ. सारखेपणामुळें श्रुतीमध्यें तसें म्हटलें आहे. म्हणजे लोकांतील सुखाप्रमाणें जीं परमात्मसंबंधीं अनेक सुखें तीं या भक्ताला यथेच्छ रीतीनें प्राप्त होतात असें त्या श्रुतीचें तात्पर्य आहे. ज्याप्रमाणें 'तो मृत्यूला पाहत नाहीं' (छां. ७।२६।२) असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे त्याप्रमाणें तो लोकांनाही पाहत नाहीं. कारण 'हें सर्व आत्म्याचेंच आहे' (छां. ७।२६।१) या श्रुतीवरून 'त्याला आत्म्याशिवाय दुसरें कांहींच दिसत नाहीं' असें समजतें.

१६२ परमात्म्याचें] सामान्यतः दर्शन झालें असतां फक्त वैकुंठलोक प्राप्त होतो. आणि परमात्म्याच्या मुख्य स्वरूपाचें दर्शन झालें असतां मुक्ति प्राप्त होते.

५२ परेण च शब्दस्य ताद्विध्यं भूयस्त्वात्त्वनुबन्धः ।

५२ पुढील (आणि मागील ब्राह्मणां-) वरूनही श्रुतीचा त्या (विद्ये-)चा विधि सांगण्याचा उद्देश आहे (असें समजतें. अग्नीचे अवयव) पुष्कळ असल्यामुळें (विद्येचा अग्नीशीं) संबंध (लाविला आहे). (२९)

५० पुढील (ब्राह्मणा-) वरून (मनाश्चित् वगैरे) शब्द हे तशा प्रकारचे (म्ह. विद्यामय अग्नीचे प्रतिपादक) आहेत (असें समजतें. अग्नीचे अवयव) पुष्कळ असल्यामुळें (विद्येचा अग्नीशीं) संबंध (लाविला आहे). (२०)

५३ कांहीं (लोक देहाहून व्यतिरिक्त असा) आत्मा (नाहीं असें मानतात). कारण शरीर असतांनाच (त्याचे धर्म) असतात.

५१ शरीरीं[१६५]मध्यें आत्म्याचें अस्तित्व असल्यामुळें (तशा प्रकारच्याच त्याच्या स्वरूपाचें ध्यान करावें असें) कांहीं लोक मानतात.

१६३ ‘हें सर्व आत्म्याचेंच आहे’ (छां. ७।२६।१) या श्रुतीमध्यें जसें सांगितलें आहे तशा प्रकारचीच ‘त्याचा सर्व लोकांमध्यें संचार होतो’ (छां. ७।२५।२) ही श्रुति आहे. म्ह. पूर्वीच्या सूत्रांत सांगितल्याप्रमाणेंच त्या श्रुतीचें तात्पर्य मानलें पाहिजे. कारण ‘त्याला सर्व प्राप्त होतें’ (छां. ७।२६।२) असें श्रुतीमध्यें पुढें वाक्य आहे. आतां प्रयत्न करून मिळविलेल्या फलापेक्षां परमात्म्यानें आपण होऊन दिलेलें फल अधिक योग्यतेचें आहे म्हणून श्रुतीमध्यें मुद्दाम पुनः ‘त्याला सर्व प्राप्त होतें’ असें सांगितलें आहे. नाहीं तर ‘हें सर्व आत्म्याचेंच आहे’ या श्रुतीवरूनच ती गोष्ट समजत असल्यामुळें ‘त्याला सर्व प्राप्त होतें’ असें पुनः सांगण्याचें कारण नव्हतें.

१६४ परमात्म्याच्या दर्शनाचें भक्ति हें विशेष प्रकारचें साधन आहे असें माठर श्रुती-

९३ एक आत्मनः शरीरे भावात् ।

१२ पुढील[१६३] (वाक्या-) वरून श्रुति तशा प्रकारची आहे (असें समजतें). आधिक्या-मुळें (त्या गोष्टीचा श्रुतीमध्यें पुनः) संबंध (केला आहे).

१३ [१६६]कांहीं (लोक भक्त हा परमात्म्यासहवर्तमान सर्व उपभोग घेतो असें म्हणतात). कारण (भक्ताच्या) शरीरामध्यें परमात्म्याचा आविर्भाव होतो. (१७)

१४ परमात्म्याच्या योगानेंच (त्या परमात्म्याचें दर्शन होतें. परंतु त्याचें भक्ति हें द्वार असल्यामुळें) तशा प्रकाँ[१६४]रची श्रुति आहे. (आणि दर्शनाच्या साधनामध्यें भक्तीला) मुख्यत्व असल्यामुळें (श्रुतीमध्यें) भक्ति (ही विशेषतः सांगितली आहे). (३४)

१५ (अंश [१६७]आणि अंशी) एक आहे. कारण (अंशी अशा) आत्म्याच्या शरीरामध्यें-(च अंशाचें) अस्तित्व आहे.

मध्यें सांगितलें आहे. तात्पर्य, भक्तीमुळें परमात्मा प्रसन्न होऊन भक्ताला आपलें दर्शन देतो असें समजावें.

१६५ 'आत्मा हा ज्ञाता, कर्ता व भोक्ता आहे' अशा प्रकारचें उपासकानें आपल्या स्वरूपाचें ध्यान करावें. कारण उपासकाच्या शरीरामध्ये जीवात्म्याची अशीच स्थिति आहे.

१६६ कांहीं लोक म्ह. तैत्तिरीय शाखेचे लोक (श्रुती तै. २ । १ । १ पहा). ह्या श्रुतीवरून पूर्वीच्या सूत्रांमध्यें सांगितलेल्या गोष्टीचेंच दृढीकरण होतें.

१६७ अंशी जो आत्मा त्यानें कर्म केलें म्हणजे शरीर उत्पन्न होतें आणि त्या शरीरामध्यें तो अंशीच अंशरूपानें प्रविष्ट होतो. उदा. इंद्र अंशी आणि अर्जुन अंश होय. आतां अंशी आत्मे अनेक आहेत ही गोष्ट निराळी आहे. तात्पर्य; त्या अंशीच्या योग्यतेला अनुसरूनच तो त्याचा अंश उपासनेचा अधिकारी होतो असें समजावें.

५४ व्यतिरेकस्तद्भावाभावित्वान्न तूपलब्धिवत् ।

५४ परंतु (हें मत बरोबर) नाहीं. (आत्मा देहाहून) भिन्न आहे. कारण त्या-(देहा-) चें अस्तित्व असतांना-(ही त्या धर्माचें) अस्तित्व असत नाहीं. उपलब्धीप्रमाणें हें होय. (३०)

५२ परंतु (हें मत बरोबर) नाहीं. (संसारावस्थेपेक्षां) निराळें (असे जे पापरहितत्व वगैरे धर्म मोक्षावस्थेमध्यें आहेत त्यांचें ध्यान केलें पाहिजे). कारण तसें (ध्यान केलें) असलें तरच तसें फल मिळेल. उपलब्धी-[१६९] प्रमाणें हें होय. (२१)

५५ परंतु (कर्माच्या) अवयवांशीं संबद्ध (असलेल्या विद्यांचे जे विधी आहेत ते) प्रत्येक वेदाच्या (त्या त्या) शाखांना-(च) अनुलक्षून नाहींत.

५३ परंतु (कर्माच्या) अवयवांशीं संबद्ध (असलेल्या उपासना त्या त्या) शाखांना- (च) अनुलक्षून नाहींत. तर सर्व शाखांना अनुलक्षून आहेत.

१६८ ' स्तद्भावभावि ' (रा. म.)

१६९ ज्याप्रमाणें ब्रह्माचें जसें स्वरूप आहे तशीच त्याची उपलब्धि होते त्याप्रमाणें पापरहितत्व वगैरे गुणांनीं युक्त असें जें जीवात्म्याचें स्वरूप तें मोक्षावस्थेमध्यें प्राप्त होणारें असल्यामुळें पूर्वीं ध्यान करतांना तशा स्वरूपाचेंच ध्यान केलें पाहिजे.

१७० परमात्म्यानें ज्या भक्ताला वरिलें म्ह. आपलेपणानें स्वीकार केला तेथें भगवद्भाव संभवतो. तेव्हां त्या भक्तांना ज्याप्रमाणें परमात्म्याचें प्रत्यक्ष दर्शन होतें त्याप्रमाणें त्या परमात्म्याचें जें अक्षरब्रह्मरूप वैकुंठस्थान त्याचाही भक्ताच्या हृदयरूपी गुहेमध्यें प्रत्यक्ष आविर्भाव होतो. परंतु परमात्म्यानें ज्यांना वारिलें नाहीं अशा केवल ज्ञानी लोकांच्या हृदयरूपी गुहेमध्यें परमव्योमाचा म्ह. अक्षरब्रह्माचा आविर्भाव होतनाही. केवल ज्ञानी लोकांना अक्षर ब्रह्माची उपलब्धि म्ह. ज्ञान मात्र होतें. परंतु त्याचा आविर्भाव हा त्याच्या ज्ञानासारखा होत नाहीं तो वरण्यामुळेंच होणार आहे.

१७१ अंशी आणि अंश यांना होणारीं ज्ञानें जरी भिन्न आहेत तरी ते भिन्न नाहींत. म्हणूनच अंशीनें केलेल्या उपासनेचें फल अंशाला मिळतें. आणि अंशाला होणाऱ्या ज्ञान वगैरेंचें अंशीला अनुसंधान होतें.

५९ अङ्गावबद्धास्तु न शाखासु हि प्रतिवेदम् ।

५४ (ज्ञांनीं लोकांच्या गुहेमध्यें परमव्योमाचा) अभाव आहे. कारण (तेथें वरण्याचा अभाव असल्यामुळें) तो (भगवद्-) भाव संभवत नाहीं. (परमव्योमाचा आविर्भाव हा) उपलब्धीप्रमाणें नाहीं.

५५ अंगभूत[172] कर्माचे ठिकाणीं नियोजित (असे ऋत्विज हे सर्व) शाखांमधील (कर्म करण्याला समर्थ होत) नाहींत. कारण प्रत्येक वेदाचें (कर्म नियमित आहे).

५६ (अंश आणि अंशी यांच्या) ज्ञानामध्यें जसा भेद आहे तसा (त्या अंश आणि अंशी यांमध्यें) भेद नाहीं. कारण (अंशाच्या भोगाचें) अस्तित्व (अंशीनें केलेल्या उपासनेच्या) अस्तित्वावर अवलंबून आहे. (३१)

५७ अंगभूत[173] (देवतां-) च्या संबंधीं (उपासना कराव्यात). परंतु (तेथें) प्रत्येक वेदाच्या अनेक शाखांमध्यें (सांगितलेल्या गुणांचा संग्रह मात्र होत) नाहीं.

---

१७२ ‘ ऋग्वेदानें हौत्र कर्म करावें, यजुर्वेदानें आध्वर्यव कर्म करावें ’ अशा रीतीनें प्रत्येक वेदाचीं कर्मे नियमित केलीं आहेत. तेव्हां यजमान हा आपल्या इच्छेप्रमाणें ज्या ऋत्विजाची जें कर्म करण्याविषयीं योजना करतो , त्याला त्याच कर्माचा अधिकार पोहोंचतो. तात्पर्य, ज्याअर्थी जीवाची इच्छा इतकी म्ह. वैदिक कर्माची सुद्धां नियामक होते त्याअर्थी परमात्म्याची इच्छा किती नियामक असेल तें सांगावयालाच नको. तेव्हां परमात्म्याच्या इच्छेप्रमाणें कोणी ज्ञानमार्गांत जातो, आणि कोणी भक्तिमार्गांत जातो. तेव्हां कांहीं विरोध येत नाहीं.

१७३ परमात्म्याच्या उपासनेमध्यें त्याच्या अंगभूत देवतांच्या उपासनांचा संग्रह होतो. ‘ इतर देवतांच्या संबंधानें भाषण करूं नका ’ असें जें श्रुतीमध्यें (मुं. २।२।५) सांगितलें आहे त्याचें तात्पर्य ‘ परमात्म्याला सोडून नुसती इतर देवतांची उपासना करूं नका ’ असें समजावें. परंतु तेथें गुणांचा संग्रह होत नाहीं म्हणजे उत्तम देवतेच्या गुणांचा कनिष्ठ देवतेच्या उपासनेमध्यें संग्रह होत नाहीं. कारण ते गुण त्या ठिकाणीं संभवत नाहींत. संभव नसतांही जर गुणांचा संग्रह केला तर विरोध येईल.

५६ मन्त्रादिवद्वाऽविरोधः। ५७ भूम्नः क्रतुवज्ज्यायस्त्वं तथा हि दर्शयति।

५६ किंवा मंत्र वगैरेंप्रमाणें (येथें) विरोध नाहीं. (३१)	५४ किंवा मंत्र वगैरेंप्रमाणें (येथें) विरोध नाहीं. (२२)
५७ भूम्याच्या (उपासनेचें) प्राधान्य आहे. यज्ञाप्रमाणें हें होय. (श्रुति) असेंच दाखविते.(३२)	५५ भूम्याच्या (उपासनेचें) प्राधान्य आहे. यज्ञाप्रमाणें हें होय. (श्रुति) असेंच दाखविते . (२३)
५८ शब्द वगैरे भिन्न आहेत म्हणून (विद्या) भिन्न आहेत. (३३)	५६ शब्द वगैरे भिन्न आहेत म्हणून (विद्या) भिन्न आहेत. (२४)

१७४ ज्याप्रमाणें कांहीं मंत्रांचा एकाच कर्मामध्यें उपयोग होतो आणि कांहीं मंत्रांचा अनेक कर्मांमध्यें उपयोग होतो त्याप्रमाणें भगवदिच्छेनें कांहीं जीव नुसत्या ज्ञानमार्गामध्येंच राहतात आणि कांहीं जीव ज्ञानमार्गांतून भक्ति मार्गांत जातात. आणि कांहीं जीव आरंभींच भक्तिमार्गांत जातात. तेव्हां कांहीं विरोध नाहीं.

१७५ ज्याप्रमाणें कनिष्ठ देवतेच्या मंत्र वगैरेंचा उत्तम देवतेच्या उपासनेमध्यें संग्रह होतो, त्याप्रमाणें तेथें कनिष्ठ देवतेच्या गुणांचाही संग्रह होतो. कारण उत्तमाचे ठिकाणीं कनिष्ठाचे गुण सहजच संभवत असल्यामुळें तेथें विरोध येत नाहीं.

१७६ 'तथा च द' (म.)

१७७ ज्याप्रमाणें पुत्र झाला असतां यज्ञ करावा असें सांगून पुढें आठ कपालें द्यावींत इत्यादि जें सांगितलें आहे तो पूर्वीच्याच यज्ञाचा एक भाग समजला जातो, निराळा यज्ञ होत नाहीं, त्याप्रमाणेंच हें होय. शिवाय येथें अवयवांच्या उपासनांपासून अनर्थ प्राप्त होतात असें श्रुतीनें (छां. ३.११.५) दाखविलें आहे.

१७८ भूमा म्ह. सर्वात्मभाव. हा सर्वात्मभाव विरहावस्थेमध्यें जरी दुःख देणारा आहे तरी तो इतरापेक्षां अधिकच आहे. कारण त्यापासून पुरुषोत्तमाचा साक्षात्कार होऊन मोठा आनंद प्राप्त होत आहे. ज्याप्रमाणें दर्शपूर्णमासामध्यें अनुष्ठान करतांना क्लेश होत असले तरी त्यापासून उत्कृष्ट फल प्राप्त होत असल्यामुळें तो इतर सर्व यज्ञांपेक्षां अधिक आहे त्याप्रमाणेंच हें होय. 'तोच खालीं आहे' (छां. ७.२५.१)

१८ नाना शब्दादिभेदात् ।

५६ किंवा[१७४] मंत्र वगैरेंप्रमाणें विरोध नाहीं. (१८)	५८ किंवा[१७५] मंत्र वगैरेंप्रमाणें विरोध नाहीं. (३६)
५७ भूम्याला[१७८] क्रतूप्रमाणें आधिक्य आहे. (श्रुति) असच दाखविते. (१९)	५९ मोठेपणा या[१७९] (गुणा-) ला क्रतूप्रमाणें प्राधान्य आहे. कारण (श्रुति) असेंच दाखविते. (३७)
५८ शब्द[१८०] वगैरे भिन्न आहेत म्हणून (उपासना) भिन्न आहेत. (२०)	६० शब्द[१८२] वगैरे भिन्न आहेत म्हणून (मोठेपणा हा गुण) भिन्न भिन्न प्रकारचा आहे. (३८)

इत्यादि श्रुतींवरून सर्वात्मभावानें आधिक्य सिद्ध होतें.

१७९ दीक्षेला आरंभ करून अवभृथस्नानापर्यंत जें कर्म क्रतूमध्यें सांगितलें आहे त्याचा इतर सर्व यागांमध्यें संबंध केला तरच ते सर्व याग सफल होतात म्हणून ज्याप्रमाणें क्रतूला प्राधान्य आहे त्याप्रमाणें परमात्म्याचा जो मोठेपणा म्ह. पूर्णत्व हा गुण त्याला प्राधान्य आहे. तेव्हां त्या गुणाचा सर्व उपासनेमध्यें संबंध केला पाहिजे. यावरून पूर्ण अशा परमात्म्याचे आनंद वगैरे गुण अलौकिक आहेत असें सिद्ध होतें. गोपवन श्रुतीमध्यें असेंच सांगितलें आहे.

१८० सद्विद्या, भूमविद्या वगैरे शब्द भिन्न भिन्न असल्यामुळें त्या सर्व विद्या भिन्न भिन्न आहेत.

१८१ मत्स्य, कूर्म वगैरे अवतार जरी एकाचेच आहेत, तरी त्यांच्या उपासना भिन्न आहेत. कारण मत्स्य, कूर्म इत्यादि शब्द भिन्न आहेत, त्यांचे मंत्र भिन्न आहेत, त्यांचे आकार भिन्न आहेत, त्यांचीं कर्मेंही भिन्न आहेत. तात्पर्य, ह्या उपासना भिन्न भिन्न असल्यामुळें उपासकाच्या इच्छेप्रमाणें पाहिजे ती उपासच्या त्याला करतां येते. एकदम सगळ्यांची मिळून उपासना केली पाहिजे असा नियम नाहीं.

१८२ सर्व मनुष्यांची सारखी योग्यता नसल्यामुळें ह्या सर्वांच्या शब्द वगैरे एकाच प्रमाणापासून एकच गोष्ट अनेक प्रकारांनीं मनांत येते. म्हणून परमात्म्याचा मोठेपणा देखील उपासकाच्या योग्यतेला अनुसरून अनेकांच्या मनांमध्यें अनेक प्रकारचा येतो.

५९ विकल्पोऽविशिष्टफलत्वात् । ६० काम्यास्तु यथाकामं

५९ एक फल (सांगितलें) असल्यामुळें (विद्यांचा) विकल्प-(च नियमानें घेतला पाहिजे). (३४)	५७ एक फल (सांगितलें) असल्यामुळें (विद्यांचा) विकल्प-(च नियमानें घेतला पाहिजे).
६० परंतु काम्य विद्यांचा इच्छेनुरूप समुच्चय करावा किंवा करू नये. कारण पूर्व (सूत्रांतला) हेतु (येथें) नाहीं. (३९)	५८ परंतु काम्य विद्यांचा इच्छेनुरूप समुच्चय करावा किंवा करू नये. कारण पूर्व (सूत्रांतला) हेतु (येथें) नाहीं. (२९)
६१ (कर्माला) अंगभूत (अशा ज्या विद्या आहेत) त्यांची त्यांच्या आश्रयाप्रमाणें स्थिति आहे.	५९ (कर्मांला) अंगभूत (अशा ज्या उपासना आहेत) त्यांची त्यांच्या आश्रयाप्रमाणें स्थिति आहे.

१८३ मत्स्य कूर्म वगैरेंच्या उपासनांचें मोक्षरूपी फल एकच आहे. तेव्हां एका मनुष्याला सर्व उपासना करण्याचें कारण नाहीं.

१८४ मुमुक्षु मनुष्यानें मोक्षाच्या हेतूनें परमात्म्याची उपासना केल्यानंतर मोक्षाला उपयोगीं पडणारीं अशीं जीं पातकाचा नाश वगैरे विशेष प्रकारचीं फलें त्यांकरितां नृसिंह वगैरे देवतांचीही उपासना करावी. किंवा ‘ मोक्षाकरतां केलेल्या उपासनेमध्येंच कांहीं तीव्रपणा धारण करून त्याच्या योगानें पातकाचा नाश करण्याची इच्छा असल्यास ’ ती करूं नये असा इतर उपासनांचा विकल्प होतो.

१८५ किंवा करूं नये म्ह. ज्या ठिकाणीं एकाच उपासनेचीं अनेक फलें आहेत त्या ठिकाणीं ह्या अनेक फलांकरतां अनेक उपासना करण्याचें कारण नाहीं.

१८६ जे लोक मुमुक्षु नसतील त्यांनीं आपल्या इच्छेप्रमाणें गुणांचा संग्रह करून इतर उपासना कराव्या. आणि जे मुमुक्षु असतील त्यांनी करूं नयेत. कारण ते निरिच्छ असल्यामुळें उपासनांचा कामरूप हेतु यांचे ठिकाणीं संभवत नाहीं असा व्यवस्थित विकल्प येथें जाणावा. अथवा मुमुक्षूंनीं वाटेल तर ईश्वरार्पण बुद्धीनें उपासना कराव्या किंवा करूं नयेत असा विकल्प येथें जाणावा.

समुच्चियेरन्न वा पूर्वहेत्वभावात् । ६१ अङ्गेषु यथाश्रयभावः[187] ।

५९ [183]एकं फल असल्यामुळें (ह्या उपासनांचा) विकल्प (च घेतला पाहिजे). (२१)

६० परंतु काम्य उपासनांचा इच्छेनुरूप समुच्चय करावा किंवा करूं[185] नये. कारण पूर्व (सूत्रांतला) हेतु (येथें) नाहीं. (२२)

६१ ([188]उपासनांच्या) अंगभूत गोष्टींची त्यांच्या आश्रयाप्रमाणें स्थिति आहे.

६१ विशेष [184]प्रकारचें फल असल्यामुळें (उपासनांचा) विकल्प होतो. (३९)

६२ [186]कामनेला अनुसरून (गुणांचा संग्रह करून) कामानिक उपासना कराव्या किंवा करूं नयेत. कारण पूर्वीचा (काम हा) हेतु नाहीं. (४०)

६३ [190]अंगभूत (देवतां-) मध्यें जिचा जसा आश्रय असेल तशी (तिची भावना करावी).

१८७ ' भावात् ' (असाही वल्लभाचार्यांचा पाठ आहे).

१८८ उपासनांचे जे उद्गीथ वगैरे आश्रय ते ज्याप्रमाणें यज्ञामध्यें अवश्य असावे लागतात त्याप्रमाणें त्या उपासनाही अवश्य असल्या पाहिजेत असा पूर्वपक्षाचा अभिप्राय आहे. ' त्या उद्गीथ वगैरे ' (३।३।४१) या सूत्रामध्यें सांगितलेल्या गोष्टीचेंच या अधिकरणामध्यें सूत्रकार दृढीकरण करीत आहेत.

१८९ तात्पर्य, ज्या ठिकाणीं अनेक उपासनांचें एकच फल आहे त्या ठिकाणीं सुद्धां उपासना कोणतीही केली तरी चालेल. परंतु त्या उपासनांपैकीं एका उपासनेच्या अंगभूत गोष्टींचा मात्र दुसऱ्या उपासनेमध्यें संग्रह करूं नये.

१९० परमात्म्याच्या अंगभूत अशा सूर्य वगैरे देवतांचा जो आश्रय असेल त्या ठिकाणींच त्या देवतांची भावना करावी. परमात्म्याच्या चक्षूपासून सूर्याची उत्पत्ति श्रुतीमध्यें सांगितली असल्यामुळें परमात्म्याचा चक्षू हा सूर्याचा आश्रय होय. अशा रीतीनें आश्रय जाणावे. आणि ज्या अर्थी श्रुतीमध्यें अंगभूत देवतांचे असे आश्रय सांगितले आहेत त्या अर्थी त्यांची उपासना करावी असें सिद्ध होतें. नाहींतर त्यांचे आश्रय सांगण्याचें कांहीं कारण नाहीं.

६२ शिष्टेश्च । ६३ समाहारात् ।

६२ आणि (आश्रयाप्रमाणें त्या) सांगितल्या असल्यामुळेंही (त्यांचा समुच्चय घेतला जातो).

६३ (चुकीची) दुरुस्ती या (चिन्हा-) वरून-(ही वि- द्यांचा समुच्चय घेतला जातो).

६४ गुण साधारण आहेत असें श्रुतींत सांगितलें असल्याव- रूनही (विद्यांचा समुच्चय घेतला जातो).

६५ किंवा (उपासनांची आश्रया- प्रमाणें स्थिति असत) नाहीं. कारण त्यांचें साहचर्य श्रुती- मध्यें सांगितलें नाहीं.

६० आणि (आश्रयाप्रमाणें त्या) सांगितल्या असल्यामुळेंही (त्यांचा समुच्चय घेतला जातो).

६१ (चुकीची[193]) दुरुस्ती या (चिन्हा-) वरून-(ही वि- द्यांचा नियम घेतला जातो).

६२ गुण साधारण आहेत असें श्रुतींत सांगितलें असल्या- वरूनही (विद्यांचा नियम घेतला जातो).

६३ किंवा[196] (उपासनांची आश्र- याप्रमाणें स्थिति असत) नाहीं. कारण त्यांचें साहचर्य श्रुतीमध्यें सांगितलें नाहीं.

---

१९१ ती ती उपासना त्या त्या अंगांनीं युक्त अशीच श्रुतीमध्यें सांगितली आहे.

१९२ ‘ परमात्म्याच्या ज्या ज्या अंगामध्यें जी जी देवता स्थित असेल त्या त्या देवतेची तशीच भावना करावी ’ असें मैत्रायण श्रुतीमध्यें स्पष्टच सांगितलें आहे.

१९३ ‘ उद्गात्याला उद्गीथाचें ज्ञान नसणें ’ ही चूक होय.

१९४ ज्ञानमार्गांतील उपासनांपैकीं मत्स्य वगैरे उपासनांमध्यें कूर्म वगैरे अन्य- रूपांची भावना करण्यास हरकत नाहीं. कारण श्रुतीनें नृसिंह उपासनेमध्यें नृसिंहाची मत्स्य वगैरेंच्या रूपानेंही स्तुती केली आहे. असा अन्यरूपांचा समाहार म्ह. संग्रह श्रुतीनें केला आहे.

१९५ ‘ परमात्म्यापासून जे देव उत्पन्न झाले त्यांच्या गुणांचा परमात्म्याचे ठिकाणीं संग्रह करावा. आणि त्या त्या अंगाचे ठिकाणीं त्या त्या देवाची भावना करावी ’ असें काषायण श्रुतीमध्यें सांगितलें आहे. त्यावरूनही वरील गोष्ट सिद्ध होते. त्या श्रुतीमध्यें समाहार म्ह. गुणांचा संग्रह सांगितला आहे. सूत्रांतील समाहार शब्दानें ही श्रुति सुच- विली आहे.

१९६ ऐश्वर्य, वीर्य वगैरे गुण मत्स्य कूर्म वगैरे सर्वांमध्यें सारखेच श्रुतीमध्यें दाख- विले आहेत. तेव्हां साधारण भगवद्रूपाला प्राधान्य देऊन केलेल्या उपासनेमध्यें सर्वांचा

६४ गुणसाधारण्यश्रुतेश्च । ६५ न वा तत्सहभावाऽश्रुतेः ।

६२ कारणें[१९३] (श्रुतीमध्यें तसेंच) सांगितलें आहे. (२३)	६४ ([१९२]श्रुतीमध्यें) सांगितलें आहे त्यावरूनही (हेंच सिद्ध होतें).
६३ ([१९४]एकी ठिकाणीं सर्व रूपांनीं उपासना करतां येते असें) समाहारावरून (समजतें).	६५ समाहारावरून[१९५]- (ही हेंच सिद्ध होतें).
६४ श्रुतीमध्यें गुण साधारण[१९६] सांगितले असल्यावरूनही (हेंच सिद्ध होतें). (२४)	६६ गुण[१९७] साधारण आहेत असें श्रुतींत सांगितलें असल्यावरूनही (हेंच सिद्ध होतें). (४१)
६५ किंवा (एका ठिकाणीं सर्व रूपांनीं उपासना करूं) नये. कारण त्यांचें साहचर्य श्रुतीमध्यें सांगितलें[२००] नाहीं.	६७ किंवा (परमात्म्याच्या उपासनेबरोबर अंगभूत देवतांची उपासना करूं) नये. कारण (त्या दोन उपासनांचें) साहचर्य श्रुतीमध्यें (सर्व ठिकाणीं) सांगितलें[१९९] नाहीं.

संग्रह होतो. त्या त्या विशेष रूपाला प्राधान्य दिलें असल्यास संग्रह होत नाहीं.

१९७ ‘ उपासनेमध्यें परमात्म्याचे सर्व गुण साधारण म्ह. सारखे असल्यामुळें तेथें त्या सर्वांचा संग्रह करावा ’ असें शांडिल्य श्रुतीमध्यें सांगितलें आहे. आतां परमात्म्याचे जसे आनंद वगैरे गुण आहेत तसे सूर्य वगैरेंचे आश्रय असे जे चक्षु वगैरे ते देखील गुणच आहेत. आणि ते चक्षु वगैरे गुण उपास्य झाले म्हणजे अर्थातच त्या चक्षु वगैरे ठिकाणीं असणाऱ्या देवताही उपास्य होतात.

१९८ ‘ भावस्तु ’ (म.)

१९९ ज्याप्रमाणें उद्गीथ हें यज्ञाचें अंग असल्यामुळें त्याचें यज्ञाशीं साहचर्य आहे त्याप्रमाणें उपासनेचें उद्गीथाशीं साहचर्य नाहीं. कारण उपासना हें उद्गीथाचें अंग होत नाहीं. फक्त उद्गीथ हा उपासनेचा आश्रय मात्र आहे असें समजावें.

२०० तात्पर्य, मत्स्य वगैरेंच्या उपासनांमध्यें कूर्म वगैरेंच्या स्वरूपांचा संग्रह करणें किंवा न करणें हें उपासकांच्या इच्छेवर अवलंबून आहे असें समजावें.

२०१ आतां श्रुतीमध्यें कांहीं ठिकाणीं जी परमात्म्याच्या उपासनेमध्यें अंगभूत देवतांची उपासना सांगितली आहे ती देवांकरतां होय. म्ह. देवांनीं मात्र उपासना करतांना अंगभूत देवतांचा संग्रह करावा.

६६ दर्शनाच्च ॥ तृतीयेऽध्याये तृतीयः पादः ॥ १ पुरुषार्थोऽतः

६६ (ही गोष्ट) श्रुतीही सांगते. (३६)	६४ (ही गोष्ट) श्रुतिही सांगते. (२६).

अध्याय ३ पाद ४

१ यापासून पुरुषार्थ (सिद्ध होतो) असें श्रुतींवरून समजतें असें बादरायण म्हणतो.	१ यापासून पुरुषार्थ (सिद्ध होतो) असें श्रुतींवरून समजतें असें बादरायण म्हणतो.
२ (आत्मा हा कर्माला) अंगभूत असल्यामुळें पुरुषार्थ (सांगणाऱ्या श्रुती) इतर ठिकाणच्या (श्रुतीं-) प्रमाणें अर्थवादरूपच आहेत असें जैमिनि म्हणतो.	२ (विद्या ही कर्माला) अंगभूत असल्यामुळें पुरुषार्थ (सांगणाऱ्या श्रुती) इतर ठिकाणच्या (श्रुतीं-)प्रमाणें अर्थवादरूपच आहेत असें जैमिनि म्हणतो.

२०२ उपासकानें मत्स्योपासनेमध्यें कूर्म वगैरेंच्या रूपांची भावना केली तरी देखील त्याला त्या उपासनेचें फल जें परमात्म्याचें दर्शन तें होतांना फक्त मत्स्यरूपाचेंच दर्शन होतें. त्यावरून ज्या उपासनेमध्यें जीं रूपें सांगितली असतील त्यांपेक्षां अन्यरूपांची भावना त्या उपासनेमध्यें करण्याचें कांहीं कारण नाहीं असें सिद्ध होतें. हाच सूत्रकारांचा खरा अभिप्राय आहे.

२०३ 'परमात्मा हा सत्य, ज्ञान व परमानंद आहे' अशी नेहमीं उपासना करावी, दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची उपासना करूं नये. देवांनीं मात्र परमात्म्याच्या उपासनेमध्यें सर्व गुण घ्यावेत' असें कमठ श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

१ "(परमात्मा हाच मुख्य) पुरुषार्थ आहे. कारण (श्रुतीमध्यें) 'याहून' या शब्दाला आरंभ करून (तसेंच सांगितलें आहे) असें बादरायण म्हणतो" असाही या सूत्राचा अर्थ होतो. 'याहून पलीकडे दुसरें कांहीं नाहीं' असें तैत्तिरीय श्रुतीमध्यें

शब्दादिति बादरायणः । २ शेषत्वात्पुरुषार्थवादो यथान्येष्विति जैमिनिः ।

६६ दर्शनावरूनही[२०२] (हेंच सिद्ध होतें). (२९)	६८ (ही गोष्ट[२०३]) श्रुतीही सांगते. (४२)

अध्याय ३ पाद ४

१ या (आत्मतत्वप्राप्ती-) पासून पुरुषार्थ (सिद्ध होतो) असें शब्दावरून समजतें असें बादरायण म्हणतो.	१ या (ज्ञाना-) पासून (सर्व) पुरुषार्थ (सिद्ध होतात) असें श्रुतीवरून समजतें असें बादरायण म्हणतो.
२ (आत्मा हा कर्माला) अंगभूत असल्यामुळें पुरुषार्थ (सांगणाऱ्या श्रुती) इतर ठिकाणच्या (श्रुतीं-) प्रमाणें अर्थवादरूपच आहेत असें जैमिनि म्हणतो.	२ (ज्ञान हें कर्माला) अंगभूत असल्यामुळें (त्यापासून इतर) पुरुषार्थ प्राप्त होतात असें म्हटलें आहे. इतराप्रमाणें हें होय असें जैमिनि म्हणतो.

(म. ना. १।५) सांगितलें आहे.

२ परमात्म्याच्या प्रत्यक्ष ज्ञानापासून सर्व पुरुषार्थ प्राप्त होतात, नुसता मोक्षच प्राप्त होतो असें नाहीं. कारण ' आत्मज्ञानी मनुष्याला त्याच्या इच्छेप्रमाणें पाहिजे ते लोक प्राप्त होतात ' असें श्रुतीमध्यें (मुं. ३।१।१०) सांगितलें आहे.

३ यज्ञ वगैरे कर्मांमध्यें मुख्य उपास्य परमात्माच असल्यामुळें तो कर्माचा अंगभूत आहे. त्याच्या ज्ञानानें कर्मापासून विशेष फल प्राप्त होतें. म्हणून परमात्म्याचें माहात्म्य श्रुतीमध्यें वर्णिलें आहे. तेव्हां त्या श्रुती अर्थवाद आहेत असें समजावें.

४ मोक्षाशिवाय इतर जे स्वर्ग वगैरे पुरुषार्थ ते ज्ञानापासून साक्षात् प्राप्त होत नाहींत, तर ज्ञान हें कर्माला अंगभूत असल्यामुळें कर्माच्या द्वारानें प्राप्त होतात. ज्याप्रमाणें द्रव्य हें कर्माच्या द्वारानेंच स्वर्गाचें साधन आहे त्याप्रमाणेंच हें होय असें जैमिनीचें मत आहे.

३ आचारदर्शनात् । ४ तच्छ्रुतेः ।

३ (ज्ञानी लोकांची) वागणूक (श्रुतीनें) दाखविली असल्यामुळें (केवळ ज्ञानापासून पुरुषार्थ सिद्ध होत नाहीं).	३ (ज्ञानी लोकांची) वागणूक (श्रुतीनें) दाखविली असल्यामुळें (विद्या ही कर्माला अंगभूत आहे).
४ तशी श्रुति असल्यामुळें-(ही केवळ ज्ञानापासून पुरुषार्थ सिद्ध होत नाहीं).	४ तशी श्रुति असल्यामुळें-(ही विद्या कर्माला अंगभूत आहे).
५ बरोबर जातात असें (सांगितलें) असल्यामुळें-(ही विद्या ही पुरुषार्थाचें स्वतंत्र कारण नाहीं).	५ बरोबर जातात असें (सांगितलें) असल्यामुळें-(ही विद्या ही कर्माला अंगभूत आहे).
६ तो (वेदार्थ) जाणणाऱ्यांना (कर्मांचा अधिकार) सांगितला असल्यामुळें-(ही विद्या ही पुरुषार्थाचें स्वतंत्र कारण नाहीं).	६ तो (वेदार्थ) जाणणाऱ्यांना (कर्मांचा अधिकार) सांगितला असल्यामुळें-(ही विद्या ही कर्माला अंगभूत आहे).

५ वसिष्ठ ऋषि हा ब्रह्मवेत्ता असूनही त्यानें अग्निहोत्र वगैरे कर्में केलीं.

६ देवांनीं यज्ञ केला (तै. आ. ३।११) या श्रुतीमध्यें ज्ञानी अशा देवांची कर्मे करण्याविषयीं प्रवृत्ति झालेली दृष्टीस पडते.

७ तशी श्रुति म्हणजे ब्रह्मवेत्त्यानें कर्म केलें अशा अर्थाची. पृ. १३१२ पं. १९ पहा.

८ तशी श्रुति म्हणजे ज्ञान हें कर्माला अंगभूत आहे अशा अर्थाची. पृ. १३१३ पं. ११ पहा.

५ समन्वारम्भणात् । ६ तद्वतो विधानात् ।

३ (ज्ञानी लोकांची) वागणूक दृष्टीस पडत असल्यामुळें (जैमिनीचें असें मत झालें आहे).	३ (ज्ञानी लोकांची) वागणूक दृष्टीस पडत असल्याळें (ज्ञानापासून सर्व पुरुषार्थ साक्षात् प्राप्त होत नाहींत असें समजतें).
४ तशी[७] श्रुति असल्यामुळें-(ही ही गोष्ट सिद्ध होते).	४ तशी[८] श्रुति असल्यामुळें-(ही ही गोष्ट सिद्ध होते).
५ बरोबर जातात असें (सांगितलें) असल्यामुळें (ही विद्या ही पुरुषार्थाचें स्वतंत्र कारण नाहीं).	५ (कर्मच)[९] मुख्यत्वानें उत्पादक असल्यामुळें-(ही ही गोष्ट सिद्ध होते).
६ तो[१०] (वेदार्थ) जाणणाऱ्यांना (कर्माचा अधिकार) सांगितला असल्यामुळें-(ही विद्या ही पुरुषार्थाचें स्वतंत्र कारण नाहीं).	६ (शिवाय) तें (ज्ञान) ज्याला झालें आहे अशा मनुष्याला (देखील कर्म) सांगितलें[११] आहे. त्यावरून-(ही हीच गोष्ट सिद्ध होते).

९ 'कर्म हेंच सर्व प्रकारच्या देहांचें आणि भोगांचें उत्पादक आहे' या माठरश्रुतीमधील 'च' या शब्दावरून कर्मच मुख्य साधन आहे असें समजतें. तेव्हां अर्थातच 'स्वर्गांतील देह व भोग ज्ञानापासून साक्षात् प्राप्त होत नाहींत' असें सिद्ध होतें.

१० दर्शपूर्णमासामध्यें ब्रह्मदेवाचे जागीं ब्रह्मवेत्त्याला वरावें अशी कल्पश्रुति आहे. तेव्हां अर्थातच 'ब्रह्मज्ञान हें कर्माचा अधिकार मिळविण्याचें साधन आहे' असें सिद्ध होतें.

११ 'ज्ञानी मनुष्यानें नेहमीं कर्में करावींत' असें कमठ श्रुतीमध्यें ज्ञान्याला उद्देशून कर्माचें विधान केलें आहे.

७ नियमाच्च[१२] । ८ अधिकोपदेशात्तु बादरायणस्यैवं तद्दर्शनात् ।

७ नियम (सांगितले) असल्यामुळेंही (विद्या कर्माला अंगभूत आहे).	७ नियम (सांगितला) असल्यामुळें-(ही विद्या कर्माला अंगभूत आहे).
८ परंतु अधिक (आत्म्या-) चा उपदेश केला असल्यामुळें बादरायणाचें (मत) तसेंच आहे. ही गोष्ट श्रुती सांगतात.	८ परंतु अधिक (आत्म्या-) चा उपदेश केला असल्यामुळें बादरायणाचें (मत) तसेंच आहे. कारण तसें दृष्टीस पडतें.
९ परंतु (ज्ञानी लोकांची वागणूक) दाखविणारी श्रुति (उलट मताला देखील) सारखीच (अनुकूल आहे).	९ परंतु (ज्ञानी लोकांची वागणूक) दाखविणारी श्रुति (उलट मताला देखील) सारखीच (अनुकूल आहे).
१० (ती श्रुति) सार्वत्रिक नाहीं.	१० (ती श्रुति) सार्वत्रिक नाहीं.

१२ 'नियमात्' (रा.)

१३ 'अमुक झालें असतां अमुक कर्म केलें पाहिजे, यावज्जीव अग्निहोत्र करावें' अशा प्रकारचे नियम कर्माविषयीं ज्याप्रमाणें श्रुतीमध्यें केले आहेत त्याप्रमाणें 'मुमुक्षूनें कर्मांचा त्याग करावा' असे नियम कर्मत्यागाविषयीं केले नाहींत.

१४ 'आत्मा हा कर्माला अंगभूत आहे' हें म्हणणें बरोबर नाहीं. कारण 'यज्ञ वगैरे कर्मांच्या योगानें आत्म्याला जाणण्याची इच्छा करतात' (बृ. ४।४।२२) असें श्रुतीमध्यें सांगितलें असल्यामुळें 'आत्मा हा कर्माहून अधिक आहे' असें समजतें. आणि ह्यावरूनच 'जैमिनीनें सांगितलेल्या कर्ममार्गापेक्षां बादरायणानें सांगितलेला भक्तिमार्ग अधिक आहे' असें सिद्ध होतें. कारण 'कर्मापेक्षां आत्मा अधिक आहे. आणि कर्ममार्गापेक्षां भक्तिमार्ग अधिक आहे' असें बादरायणाच्या दृष्टीस पडतें म्ह. अनुभवांत येतें.

१५ 'स्वर्ग, मोक्ष वगैरे सर्व फळें ज्ञानापासूनच प्राप्त होतात; पण तो जसें जसें कर्म करतो तसें तसें तें फळ त्याला अधिक प्राप्त होतें' असें काठक्य श्रुतीमध्यें सांगितलें

९ तुल्यं तु दर्शनम् । १० असार्वत्रिकी ।

७ नियम[१३] (सांगितले) असल्यामुळेंही (विद्या कर्माला अंगभूत आहे).	७ नियम (सांगितला) असल्यामुळेंही (हेंच सिद्ध होतें).
८ परंतु[१४] (हें बरोबर नाहीं). कारण (श्रुतीमध्यें कर्माहून) अधिक अशा (आत्म्या-) चा उपदेश केला आहे. त्याप्रमाणेंच बादरायणाचें (मत आहे). कारण तसें दृष्टीस पडतें.	८ परंतु[१५] अधिक (अशा फलाचा) उपदेश केला असल्यामुळें बादरायणाचें (मत) पूर्वीप्रमाणेंच आहे. आणि तसेंच दृष्टीस पडतें.
९ (ज्ञानी[१८] लोकांची वागणूक उलट मर्ती देखील) सारखीच दृष्टीस पडते.	९ परंतु[१९] ज्ञान हें सारखेंच आहे. (१)
१० (श्रुति[२०]) सार्वत्रिक नाहीं.	१० (ज्ञानाचा अधिकार) सर्वांना नाहीं.

आहे. यावरून ज्ञान हें कर्माला अंगभूत होत नाहीं तर उलट कर्म हेंच ज्ञानाला अंगभूत होतें असें बादरायणाचें मत आहे. ज्ञानी अशा धर्मराजानें केलेल्या राजसूययज्ञाचें फल त्याला अधिक प्राप्त झालेलें दृष्टीस पडतें.

१६ ‘ तुल्यं दर्शनम् ’ (व.)

१७ आतां कांहीं ज्ञानी लोक जें कर्म करतात तें निष्काम कर्म होय. कारण निष्काम कर्म हें ज्ञानाचें अंगभूत आहे.

१८ शुकाचार्य वगैरे ज्ञानी लोकांनीं कर्माचा त्याग केलेला दृष्टीस पडतो.

१९ कर्म करण्यानें आणि न करण्यानें ज्ञानी मनुष्याच्या फलामध्यें तारतम्य होतें; परंतु ज्ञानामध्यें तारतम्य नाहीं. ज्ञान हें सर्वांचें सारखेंच असतें.

२० म्ह. सर्व ब्रह्मवेत्ते कर्म करतात असें श्रुतीमध्यें सांगितलें नाहीं. उलट बृहदारण्यक श्रुतीमध्यें आम्हीं कशाकरतां अध्ययन करावें, भजन करावें असें मात्र सांगितलें आहे.

११ विभागः शतवत् । १२ अध्ययनमात्रवतः ।

११ शंभर (वस्तूंच्या-) प्रमाणें (विद्या आणि कर्म यांचा) विभाग आहे.	११ शंभरांप्रमाणें (विद्या आणि कर्म यांचा) विभाग आहे.
१२ फक्त अध्ययन करणाऱ्यालाच (कर्माचा विधि सांगितला आहे).	१२ फक्त अध्ययन करणाऱ्यालाच (कर्माचा विधि सांगितला आहे).
१३ (कांहीं) नियामक नसल्या- मुळें (ते नियम ज्ञानी मनु- ष्याला उद्देशून सांगितले) नाहींत.	१३ (२६ कांहीं) नियामक नसल्या- मुळें (ते नियम स्वतंत्र क- र्माविषयींच) नाहींत.

२१ ज्याप्रमाणें 'शेत आणि रत्न विकणाऱ्याला दोनशें रुपये मिळतात' असें म्हटलें असतां सामर्थ्यें शेताचे शंभर आणि रत्नाचे शंभर असा विभाग मनांत येतो त्याप्रमाणें विद्या आपलें निराळें फल देतें आणि कर्म आपलें निराळें फल देतें असा येथें विभाग समजावा. तात्पर्य, विद्या ही कर्माची अंगभूत नव्हे.

२२ ज्याप्रमाणें मनुष्याच्या आनंदाला आरंभ करून ब्रह्मानंदापर्यंत प्रत्येक आनंद पूर्वींपेक्षां शंभर पटींनें जास्त असल्यामुळें त्यांच्यामध्यें तारतम्य आहे (श्रुति तै. २।८ पहा) कारण जसा ज्याचा अधिकार असेल तसा त्याला परमात्म्यानें आनंद दिला आहे, त्याप्रमाणें सर्व ज्ञानी लोकांचा अधिकार सारखा नसल्यामुळें त्यांमध्यें विभाग म्ह. तारतम्य आहे. तेव्हां परमात्म्याहून अन्य ठिकाणीं जर भाव असेल तर त्या भावाला अनुसरून तो अधिकारी तसें तसें कर्म करितो. आणि ज्या अधिकाऱ्याचा अन्य ठिकाणीं मुळींच भाव नाहीं तो मुळींच कर्म करीत नाहीं. हाच श्रेष्ठ अधिकारी होय.

२३ ज्याप्रमाणें देवांमध्यें विभाग आहे म्ह. सर्व देवांना सोमाचा अधिकार नाहीं तर दोहोंनीं अधिक अशा शंभरांनाच आहे त्याप्रमाणें ज्ञानाचा अधिकार कांहीं लोकांनाच आहे.

२४ ब्रह्मदेवाच्या जागीं ब्रह्मवेत्त्याला वरावें असें जें पूर्वीं (टीप १० पहा) सांगितलें आहे त्या ठिकाणीं ब्रह्म शब्दाचा वेद असा अर्थ आहे. परमात्मा असा अर्थ

१३ नाविशेषात् ।

११ शंभर[23]प्रमाणें (ज्ञानी लोकांमध्यें) विभाग आहे.	११ शंभरा[23]प्रमाणें (लोकांमध्यें) विभाग आहे.
१२ फक्त[24] अध्ययन करणाऱ्यालाच (कर्माचा अधिकार आहे).	१२ फक्त[25] अध्ययन करणाऱ्यालाच (ज्ञानाचा अधिकार आहे). (२)
१३ (कर्मत्यागाविषयीं नियम सांगितले नाहींत असें) नाहीं. कारण (त्यामध्यें कांहीं) विशेष[27] नाहीं.	१३ (ज्ञानाचा[26] अधिकार सर्वांना) सारखा नाहीं. (३)

नाहीं. तेव्हां वेद जाणणाऱ्या मनुष्याला कर्मामध्यें ब्रह्मत्व द्यावें असा अर्थ होतो. तात्पर्य, ब्रह्मज्ञान हें कर्माचें अंगभूत होत नाहीं.

२५ विष्णुभक्तालाच वेदाध्ययन करण्याचा अधिकार आहे त्यानें वेदार्थाचा विचार केला म्हणजे त्यालाच ज्ञानाचा अधिकार आहे. फक्त अध्ययन करणारा. म्ह. इतर कांहीं विरुद्ध आचरण न करणारा.

२६ जिवंत आहे तोंपर्यंत कर्म करावें (ई. २) इत्यादि जे नियम आहेत त्या ठिकाणीं कर्म शब्दानें स्वतंत्र कर्मच घ्यावयाचें अशाविषयीं कांहीं नियामक नाहीं. तर विद्येचें अंगभूत जें निष्काम कर्म तें देखील तेथें घेतलें आहे. तात्पर्य, ज्ञानी मनुष्याला स्वतंत्र कर्म करण्याचें कांहीं कारण नसल्यामुळें ‘ विद्या कर्माला अंगभूत नाहीं ’ हें सिद्ध होतें. जनक वगैरे कर्माच्या योगानें सिद्धीला गेले (भ. गी. ३।२०) ह्या स्मृतीमध्येंही कर्मशब्दानें विद्येचें अंगभूत जें कर्म तेंच घ्यावें स्वतंत्र कर्म घेऊं नये.

२७ ज्ञानी लोक ‘ कर्माच्या त्यागानें अमृतत्वाप्रत प्राप्त झाले ’ (म. ना. १०।५) अशी श्रुति आहे. तेव्हां अर्थातच ‘ मुमुक्षु मनुष्यानें कर्माचा त्याग करावा ’ असा नियम सांगितल्यासारखाच होत आहे. तेव्हां विद्या कर्माला अंगभूत आहे असें म्हणतां येत नाहीं.

२८ मनुष्यापेक्षां ऋषींना ज्ञानाचा अधिकार जास्त आहे. त्यांच्यापेक्षांही देवांना ज्यास्त आहे. आणि म्हणूनच त्यांच्या फलामध्यें तारतम्य होतें.

१४ स्तुतयेऽनुमतिर्वा ।

१४ किंवा (कर्माची) परवानगी (विद्येच्या) स्तुतीकरितां (सांगितली आहे).	१४ (किंवा कर्माची) परवानगीच (विद्येच्या) स्तुतीकरितां (सांगितली आहे).
१५ आणि कांहीं (लोक) स्वेच्छेनें वागून (कर्माविषयीं अनादर दाखवितात).	१५ [29]आणि (विद्वान् लोक) स्वेच्छेनें (गार्हस्थ्याचा त्याग करितात असें) कांहीं (शाखांचे लोक म्हणतात).
१६ आणि (कर्माच्या अधिकाराचा ज्ञानाच्या योगानें) नाश होतो असें (श्रुति सांगते).	१६ [30]आणि (कर्माचा ज्ञानाच्या योगानें) नाश होतो असें (श्रुति सांगते).

२९ ब्रह्म शब्दाचा वेद असा अर्थ आहे. असें पूर्वी (टी. २४) सांगितलें आहे. परंतु जरी परमात्मा असा अर्थ घेतला तरी देखील हरकत नाहीं. कारण ' ब्रह्मवेत्त्याला ब्रह्मत्व यावें ' असें सांगून श्रुतीनें जी ब्रह्मज्ञान्याला कर्म करण्याची संमति दिली आहे ती कर्माची प्रशंसा करण्याकरतांच दिली आहे. पण त्यावरून ब्रह्मज्ञान्याला वास्तविकच कर्माचा अधिकार आहे असें समजूं नये.

३० ' ज्ञानी मनुष्यानें यथेच्छ आचरण करावें ' (बृ. ३।५।१) असें जें श्रुतीमध्यें सांगितलें आहे तो विधि नव्हे. तात्पर्य, ज्ञानी मनुष्यानें देखील सदाचरणच केलें पाहिजे. कारण ह्या ज्ञान्यांमध्यें इतर ज्ञान्यांपेक्षां विशेष आहे.

३१ जर विद्या ही कर्माला अंगभूत असेल तर विद्वान् लोकांना स्वेच्छेनें गृहस्थाश्रमांतील कर्माचा त्याग करतां येणार नाहीं.

१५ कामकारेण चैके । १६ उपमर्दं च ।

१४ किंवा[31] (कर्माची) स्तुती करण्याकरितां संमति (दिली आहे).	१४ (ज्ञानी मनुष्यानें[31] यथेच्छ आचरण करावें असें त्याच्या) स्तुतीकरितां (सांगितले आहे), किंवा (ती केवळ) संमति (दिली आहे).
१५ आणि[32] स्वेच्छेनें (कर्म केलें असतां त्यासंबंधानें) एका शाखेचे (लोक तसें पठन करितात).	१५ यथेच्छ आचरण केलें (तरी मोक्ष प्राप्त होतो असें) एका शाखेचे (लोक पठन करितात[33]).
१६ आणि (कर्माचा व त्याच्या अधिकाराचा ज्ञानाच्या योगानें) नाश होतो असें (श्रुति सांगते).	१६ आणि (कर्माचा ज्ञानाच्या योगानें) नाश होतो असें (श्रुति सांगते[35]).

३२ 'ब्रह्मज्ञान्याचा महिमा कर्माच्या योगानें वाढत नाहीं, आणि कमी होत नाहीं' (बृ. ४।४।२३) असें एका शाखेमध्यें सांगितलें आहे. त्यावरून ब्रह्मज्ञान्याला कर्माचा अधिकार आहे असें सिद्ध होतें अशी जी शंका येते तिचें हें उत्तर दिलें आहे.

३३ 'यथेच्छ आचरण करणारे, पाहिजे ते खाणारे, हवें तसें बोलणारे ज्ञानी लोक देहत्याग करून परमात्म्याप्रत प्राप्त होतात' असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

३४ 'ज्ञानी मनुष्यांचीं कर्में क्षीण होतात' असें श्रुतीमध्यें (मुं. २।२।८) सांगितलें आहे.

३५ ओम् शब्द उच्चारून आत्म्याला पाहणाऱ्यांचीं पुण्यपापें नष्ट होतात असें चतुर श्रुतीमध्यें सांगितलें आहे. या श्रुतीवरून ज्ञानी मनुष्याच्या प्रारब्ध कर्माचा सुद्धां जर नाश होत आहे तर अर्थातच त्याचें ज्ञानप्राप्तीनंतरचें यथेच्छ आचरण मोक्षप्राप्तीला प्रतिबंधक होणार नाहीं असा या सूत्राचा अभिप्राय आहे.

१७ ऊर्ध्वरेतःसु च शब्दे हि । १८ परामर्शं जैमिनिरचोदना

१७ आणि स्त्रीसंगवर्जित अशा आश्रमांना अनुलक्षून (विद्या सांगितली आहे). आतां (ते आश्रम देखील अस्तित्वांत आहेत असें) शब्दांवरून (सूचित होतें). (१)	१७ आणि स्त्रीसंगवर्जित अशा आश्रमांना अनुलक्षून (विद्या सांगितली आहे). आतां (ते आश्रम देखील अस्तित्वांत आहेत असें) शब्दांवरून (सूचित होतें).
१८ (या वाक्यामध्यें इतर आश्रमांचा फक्त) परामर्श केला आहे असें जैमिनि म्हणतो. तीं विधिवाक्यें नाहींत. आणि (त्या आश्रमांचा इतर श्रुति) निषेध करिते.	१८ (या वाक्यामध्यें इतर आश्रमांचा फक्त) परामर्श केला आहे असें जैमिनि म्हणतो. कारण (तेथें) विधि नाहीं. आणि (त्या आश्रमांचा इतर श्रुति) निषेध करिते.
१९ (इतर आश्रमांचें देखील) अनुष्ठान केलें पाहिजे असें बादरायण म्हणतो. कारण श्रुतीमध्यें सारखाच निर्देश केला आहे.	१९ (इतर आश्रमांचें देखील) अनुष्ठान केलें पाहिजे असें बादरायण म्हणतो. कारण श्रुतीमध्यें सारखाच निर्देश केला आहे.

३६ 'त्या (परमात्म्या-) ला जाणणारा मुक्त होतो' (चित्ति. उ. तै. आ. ३।११) या श्रुतीवरून मोक्षाचें साधन जें आत्मस्वरूपाचें ज्ञान तेंच खरें ज्ञान असें समजतें. हें ज्ञान केव्हांही कर्माला अंगभूत होत नाहीं. इतर ज्ञान हें कर्माला, अंगभूत झालें तरी हरकत नाहीं; कारण संन्यासाश्रमामध्यें देखील त्या आश्रमाचें कर्तव्यकर्म असल्यामुळें त्या कर्माला अंगभूत जें ज्ञान तें खरें नव्हे.

३७ ज्ञानोत्तरकालीं यथेच्छ आचरण केलें तरी चालतें. परंतु ज्ञानाच्या पूर्वी मात्र मुमुक्षूनें यथेच्छ आचरण करूं नये. कारण स्त्रीसंगवर्जित लोकांनाच ज्ञानाचा उपदेश करावा असें माठर श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

३८ 'दनाचाप' (रा.)

३९ ज्ञानाच्या द्वारानें मोक्ष प्राप्त करून देण्याविषयीं कर्मविधींचें तात्पर्य आहे असें जें इतर लोक मानतात तें जैमिनी मानीत नाहीं. ज्याप्रमाणें श्रुतीमध्यें कर्माविषयीं विधिबोधक शब्द आहेत त्याप्रमाणें ज्ञानाविषयीं नाहींत. हा जो अविधि (म्ह. विधि नसणें) त्यावरून देखील वरील गोष्ट सिद्ध होते. असें या सूत्राचें तात्पर्य आहे.

४० 'ज्ञानी मनुष्यानें यथेच्छ आचरण करावें' असा जो श्रुतीमध्यें (बृ. ३।५।१)

चापवद्वति हि । १९ अनुष्ठेयं बादरायणः साम्यश्रुतेः ।

१७ आणि संन्यासाश्रमी लोकांना (कर्म संभवत नसल्यामुळें ज्ञान हें कर्माचें अंगभूत नव्हे. ज्ञानाचें खरें स्वरूप) श्रुतीवरून ([३८] समजतें).	१७ (यथेच्छ आचरण करणाऱ्याला ज्ञानाचा अधिकार नाहीं). कारण श्रुतीमध्यें स्त्रीसंगवर्जित लोकांना-(च ज्ञानाचा उपदेश करावा असें[३७] सांगितलें आहे).
१८ ([३९] कर्मविधींचा जो ज्ञानद्वारा मोक्षाशीं) संबंध त्याचा जैमिनि आणि अविधि निषेध करितात.	१८ (श्रुतीमध्यें[४०] सांगितलेल्या आचाराचा) परामर्श आहे असें जैमिनि म्हणतो. कारण विधि नाहीं आणि निषेध आहे.
१९ [४१] बादरायण हा कर्माचा (निषेध करितो). कारण श्रुति सारखीच आहे.	१९ कर्तव्य[४२]कर्मी-(मध्यें कामचार आहे) असें बादरायण म्हणतो. कारण श्रुतीमध्यें सारखेपणा दाखविला आहे.

कामचार सांगितला आहे तो इतर ठिकाणीं श्रुतीमध्यें सांगितलेल्या 'सकाळीं उठून स्नान करून संध्या करावी' इत्यादि आचाराचा परामर्श आहे. हेंच त्याचें यथेच्छ आचरण असल्यामुळें त्याला कामचार असें म्हटलें आहे. तात्पर्य, ज्ञानी मनुष्यानें पापकर्म करूं नये. कारण त्याला पापकर्म करण्याविषयीं 'ब्राह्मण मारावा' इत्यादि प्रकारचा विधि नाहीं. उलट 'ब्राह्मणाला मारूं नये' इत्यादि निषेध मात्र स्पष्ट आहेत.

४१ ज्याप्रमाणें कर्मत्याग करणाऱ्याची श्रुतीमध्यें (तै. सं. १।५।२) निंदा केली आहे त्याप्रमाणें ज्ञानरहिताचीही श्रुतीमध्यें (ई. ३) निंदा केली आहे. तात्पर्य, मनुष्याला ज्ञान अवश्य असल्यामुळें कर्माचा ज्ञानाच्या द्वारानें मोक्षाशीं संबंध आहे असें मानलें पाहिजे.

४२ कामचार म्ह. वाईट कर्म करणें नव्हे; तर चांगल्या कर्मांपैकींच आपल्या इच्छेनें हवीं तीं करावीत आणि हवीं तीं करूं नयेत. कारण ज्ञानी मनुष्यानें कोणतेंही (चांगलें) कर्म केलें तरी सारखेंच (बृ. ३।५।१) असा श्रुतीमध्यें सारखेपणा दाखविला आहे. या श्रुतीमध्यें कर्म शब्दानें चांगलें कर्मच घेतलें आहे. कारण ज्ञानी मनुष्याला वाईट कर्में संभवत नाहींत.

२० विधिर्वा धारणवत् ।

२० किंवा (हा इतर आश्रमांचा) विधि (सांगितला आहे असें समजावें). धारण करण्याप्रमाणें हें होय. (२)

२१ (कर्मांच्या अंगांचें) ग्रहण केलें असल्यामुळें (उद्गीथ वगैरेंसंबंधीं श्रुती ह्या) केवल स्तुतिरूप आहेत असें म्हणशील तर नाहीं. कारण त्यांमध्यें अपूर्व गोष्टी (सांगितल्या) जातात.

२२ भावनावाचक शब्द असल्यामुळेंही (या श्रुती विधिबोधक आहेत). (३)

२० (हा आश्रमांचा) विधीच (सांगितला आहे असें समजावें). धारण करण्याप्रमाणें हें होय. (१)

२१ (कर्मांच्या अंगांचें) ग्रहण केलें असल्यामुळें (उद्गीथ वगैरेंसंबंधीं श्रुती ह्या) केवल स्तुतिरूप आहेत असें म्हणशील तर नाहीं. कारण त्यांमध्यें अपूर्व गोष्टी (सांगितल्या) जातात.

२२ (विधिप्रत्ययानें युक्त असा) क्रियाशब्द असल्यामुळेंही (या श्रुती विधिबोधक आहेत). (२)

४३ ज्याप्रमाणें योग्यानें मानसिक मूर्तीचें धारण करावें (म्ह. मनामध्यें मूर्ति आणावी) असें जें धारण सांगितलें आहे तें मनाचें समाधान होण्याकरतांच सांगितलें आहे, त्याचा स्वतंत्र उपयोग नाहीं; त्याप्रमाणें श्रुतीमध्यें हा कर्माचा विधि भक्ति उत्पन्न होण्याकरतांच सांगितला आहे. त्याचा स्वतंत्र उपयोग नाहीं.

४४ ज्याप्रमाणें ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या तीन वर्णांना वेदाचें धारण करण्याविषयीं विधि सांगितला आहे त्याप्रमाणें ज्ञानी मनुष्याला यथेष्ट आचरण करण्याविषयीं श्रुतीमध्यें (बृ. ३।५।१) विधीच सांगितला आहे असें समजावें. ज्ञानी मनुष्यानें यथेष्ट आचरण केलें तरी अधर्माची मात्र शंका घेऊं नये. कारण ब्राह्मामध्यें ज्ञानी मनुष्याची स्वेच्छेनें प्रवृत्ति होते असें सांगितलें आहे.

४५ शं. ब्रह्मज्ञान्याचें माहात्म्य कर्मानें वाढत नाहीं व कमी होत नाहीं ह्या साम्यश्रुतीमध्यें ज्ञानाची केवळ स्तुति आहे म्ह. ज्ञान हें स्वतंत्र रीतीनें मोक्षसाधन नसल्यामुळें त्याची स्वतंत्र रीतीनें जरूर नाहीं. परंतु ज्ञानाची कर्माला अंगभूत अशा रूपानें जरूर

२१ स्तुतिमात्रमुपादानादिति चेन्नापूर्वत्वात् । २२ भावशब्दाच्च ।

२० किंवा[43] हा धारणाप्रमाणें (कर्माचा) विधि आहे.

२१ (साम्यश्रुती ही) केवळ[45] स्तुति आहे. कारण (ज्ञानी लोकांना कर्माचा) स्वीकार (श्रुतींत सांगितला आहे) असें म्हणशील तर नाहीं. कारण (ज्ञानाचें) अपूर्व फल सांगितलें आहे.

२० किंवा[44] हा (यथेष्ट आचरण करण्याविषयीं) विधि (सांगितला आहे असें समजावें). धारण करण्याप्रमाणें हें होय.

२१ (सामान्य[46] विधीचें) ग्रहण केलें असल्यामुळें (यथेष्ट आचरावें ही) केवल स्तुति आहे असें म्हणशील तर नाहीं. कारण (ज्ञानी लोकांना) पराधीनता आहे.

२२ भावशब्दावरूनही[48] (हेंच सिद्ध होतें).

असल्यामुळें त्याची केवळ प्रशंसा केली आहे. आणि ह्या श्रुतीवरूनच ज्ञानी मनुष्याला कर्माचा स्वीकार करितां येतो. उ. वरील श्रुतिमध्यें ज्ञानी मनुष्याचा कर्माच्या फलाशीं संबंध होत नाहीं. हें ज्ञानाचें फळ अपूर्व सांगितलें असल्यामुळें येथें विधीच मानला पाहिजे. ही केवळ स्तुति आहे असें म्हणतां येत नाहीं.

४६ शं. ज्ञानी लोकांनीं निषिद्ध आचरण करूं नये. कारण इतर लोकांना सदाचरण करण्याविषयींचे जे सामान्य विधी ते ज्ञानी लोकांना देखील लागू पडतात. तात्पर्य, यथेष्ट आचरण करावें ही केवळ ज्ञानी लोकांची प्रशंसा केली आहे. उ. विधि न मानतां केवल स्तुति मानणें बरोबर नाहीं. इतर सर्व लोक-ज्ञानी सुद्धां-परमात्म्याच्या अधीन असल्यामुळें त्यांच्या संबंधानें स्तुति न मानतां विधीच मानणें बरोबर आहे.

४७ हें सूत्र वल्लभाचार्यांच्या पाठामध्यें नाहीं.

४८ भाव म्ह. इच्छा. चतुर श्रुतीमध्यें तसें सांगितलें आहे.

२३ पारिप्लवार्था इति चेन्न विशेषितत्वात् ।

२३ (वैदिक आख्यानें) पारिप्लवाकरितां आहेत असें म्हणशील तर नाहीं. कारण (श्रुतीमध्यें) विशेष सांगितला आहे.

२४ तेव्हां एकवाक्यता असल्यामुळें (वैदिक आख्यानें हीं विद्यांचा बोध करून देण्याकरितां आहेत). (४)

२५ म्हणूनच अग्नी प्रज्वलित करणें वगैरे (कर्मां-)ची (विद्येला) जरूर नाहीं. (५)

२३ (वैदिक आख्यानें) पारिप्लवाकरितां आहेत असें म्हणशील तर नाहीं. कारण (श्रुतीमध्यें) विशेष सांगितला आहे.

२४ आणि एकवाक्यतेनें अन्वय होत असल्यामुळें (वैदिक आख्यानें हीं विद्यांचा बोध करून देण्याकरितां आहेत). (३)

२५ म्हणूनच अग्नीचें आधान करणें वगैरे (कर्मां-) चो (विद्येला) जरूर नाहीं. (४)

४९ तेव्हां अर्थातच त्या श्रुतीमध्यें सांगितलेलें ज्ञान पारिप्लवाकरितांच सांगितलें असल्यामुळें ज्ञान हें कर्माला अंगभूत होतें असा शंकाकाराचा अभिप्राय आहे. ' वरुणाचा मुलगा भृगु हा आपल्या बापाकडे गेला' (तै. ३।१) इत्यादि श्रुती आख्यान सांगणाऱ्या जाणाव्या.

५० विशेष रूपानें म्ह. कर्मापेक्षां ज्ञानामध्यें परमानंद देणें वगैरे अधिक धर्म आहेत असें.

५१ शं. ज्याच्या योगानें (बृ. ३।५।१) इत्यादि श्रुतीमध्यें परस्पर विरुद्ध अशा तीन गोष्टी सांगितल्या आहेत त्या अशाः-१ ज्ञानी लोकांनीं नियमानें सर्व धर्मांचें आचरण करावें. २ ज्ञानी लोकांनीं कांहीं गोष्टी संबंधानें नियम पाळावेत आणि कांहीं गोष्टी संबंधानें यथेच्छ आचरण करावें. ३ ज्ञानी लोकांनीं सर्व गोष्टी संबंधानें यथेच्छ आचरण करावें. तात्पर्य श्रुतीच्या अर्थामध्यें व्यवस्था नाहीं. उ. गौपवन श्रुतीमध्यें मनुष्य, देव आणि ब्रह्मदेव असे ज्ञान्यांचे तीन प्रकार सांगितले आहेत. त्या तीन प्रकारच्या ज्ञानी लोकांना अनुसरून श्रुतीमध्यें तीन तऱ्हा सांगितल्या आहेत. तेव्हां कांहीं विरोध येत नाहीं.

५२ ' वाक्योप ' (म.)

५३ ज्ञान हें आख्यानामध्येंच सांगितलें आहे असें नाहीं; अन्यत्रही सांगितलें आहे. तेव्हां तें ज्ञान कर्माला अंगभूत आहे असें म्हणतां येत नाहीं. आणि त्यामुळें आख्याना-

२४ तथा चैकवाक्यतोपबन्धात् । २५ अत एवं चाग्नीन्धनाद्यनपेक्षा ।

२२ (आख्यान सांगणाऱ्या श्रुती) पारिप्लवाकरितां आहेत असें म्हणशील तर नाहीं. कारण (ज्ञान हें श्रुतीमध्यें) विशेष रूपानें सांगितलें आहे.

२३ तेव्हां एकवाक्यता असल्यामुळें (ज्ञान हें आख्यानामध्यें सांगितलें असलें तरी तें कर्माला अंगभूत होत नाहीं).

२४ म्हणूनच (श्रुतीमध्यें ज्ञानी मनुष्याला) अग्नि, इंधन वगैरेंची जरूर (दाखविली) नाहीं. (१)

२३ ('उपांच्या योगानें' इत्यादि श्रुति) अव्यवस्थित अर्थाची आहे असें म्हणशील तर नाहीं. कारण (श्रुतीमध्यें ज्ञान्यांचे) विशेष प्रकार सांगितले आहेत.

२४ आणि अशा रीतीनें (श्रुतींची) एकवाक्यता होत असल्यामुळें (असें मानणें हेंच योग्य आहे).

२५ म्हणूनच (ज्ञानाला मोक्ष देतांना) अग्निहोत्र वगैरे (कर्मां-)ची जरूर लागत नाहीं.

मध्यें सांगितलेलें ज्ञानसुद्धां कर्माला अंगभूत होत नाहीं. कारण ज्ञान सांगणाऱ्या सर्व श्रुतींची एकवाक्यता केली पाहिजे.

५४ 'एवाग्नी' 'एव चाग्नी' (व.)

५५ म्हणूनच म्हणजे स्त्रीसंगवर्जित अशा आश्रमांचा श्रुतीनें विद्येच्या संबंधानें स्वीकार केला आहे म्हणूनच. स्त्रीसंगवर्जित आश्रमामध्यें अग्नीचें आधान म्ह. मंत्रपूर्वक स्थापन संभवत नाहीं. म्हणून त्या आश्रमांतील लोकांना विद्याप्राप्तीकरतां अग्निहोत्र, दर्शपूर्णमास वगैरे कर्मांची जरूर नाहीं. तर फक्त त्या आश्रमामध्यें सांगितलेल्या कर्मांचीच जरूर आहे असें समजावें.

५६ म्हणूनच म्ह. ज्ञानाला कर्मांची जरूर नाहीं म्हणूनच. ज्ञानी जो मनुष्य तत्स्वरूपी यज्ञाचें जें श्रुतीमध्यें, (म. ना. २५।१) 'आत्मा हा यजमान आहे, श्रद्धा ही पत्नी आहे' असें वर्णन केलें आहे त्यामध्यें लौकिक अग्नि, इंधन म्ह. समिधा वगैरे, यांची जरूर दाखविली नाहीं. तात्पर्य, ज्या ज्ञानामुळें ज्ञानी मनुष्य यज्ञस्वरूप होतो म्ह. जें ज्ञान दुसऱ्याला यज्ञस्वरूप करतें त्या ज्ञानाला मोक्षरूपी फल देतांना यज्ञाची जरूर आहे हें म्हणणें मुळींच संभवत नाहीं.

५७ म्हणूनच म्ह. ज्ञानी लोकांनीं यथेच्छ आचरण केलें तरी त्यांना मोक्ष प्राप्त होतो ही गोष्ट प्रमाणसिद्ध आहे म्हणूनच.

२६ सर्वापेक्षा च यज्ञादिश्रुतेरश्ववत् ।

२६ यज्ञ वगैरे (कर्मे ' साधन ' या रूपानें) सांगितलीं असल्यामुळें (विद्येला) सर्व (कर्मां-) ची जरूर आहे. अश्वाप्रमाणें हें होय.

२७ तथापि (मुमुक्षूनें) शम, दम वगैरेंनीं युक्त असलें पाहिजे. कारण ' विद्येला साधनभूत ' अशा रूपानें त्यांचा विधि (सांगितला आहे). म्हणून त्यांचें अवश्य अनुष्ठान केलें पाहिजे. (६)

२६ यज्ञ वगैरे (कर्मे ' साधन ' या रूपानें) सांगितलीं असल्यामुळें (विद्येला) सर्व (कर्मां-) चो जरूर आहेच. अश्वाप्रमाणें हें होय. (५)

२७ तथापि (मुमुक्षूनें) शम, दम वगैरेंनीं युक्त असलें पाहिजे. कारण ' विद्येला साधनभूत ' अशा रूपानें त्यांचा विधि (सांगितला आहे). म्हणून त्यांचें देखील अवश्य अनुष्ठान केलें पाहिजे. (६)

५८ गमन करण्याचें साधन जो अश्व त्याला ज्याप्रमाणें खोगीर वगैरे साधनांची जरूर लागते, त्याप्रमाणें मोक्षाचें साधन जी विद्या तिला गृहस्थाश्रमी लोकांचे ठिकाणीं यज्ञ वगैरे सर्व कर्मांची जरूर लागते.

५९ पुरुषोत्तमाचें ज्ञान उत्पन्न होण्याला यज्ञ वगैरे कर्म, ज्ञान, व भक्ति या सर्वांना जरूर आहे. कारण निष्काम कर्मापासून परमात्म्याची प्राप्ति होते असें श्रुतीमध्यें (बृ. ४।४।२२) सांगितलें आहे. आणि या उद्देशानेंच श्रुतीमध्यें कर्मांचें प्रतिपादन केलें आहे. पुष्टिमार्गांतील भक्ताला मात्र कर्म वगैरेंची जरूर नाहीं. या अभिप्रायानेंच श्रुतीमध्यें (का. २।२३) 'परमात्मा हा कशानेंही प्राप्त होत नाहीं. तर त्याची प्राप्ति होण्याला त्याचीच कृपा झाली पाहिजे ' असें सांगितलें आहे. ज्याप्रमाणें घोडा हा देशांतराला जाण्याच्या मात्र उपयोगीं पडतो. त्या ठिकाणीं जें एखादें कृत्य केलें जातें त्याच्या उपयोगीं पडत नाहीं. त्याप्रमाणें कर्म हें ज्ञान प्राप्त करून देण्याच्या कामीं मात्र उपयोगी पडतें; म्हणजे आधिभौतिक वगैरे अनेक प्रकारच्या अडचणी कर्मांच्या योगानें दूर होतात. ज्ञानप्राप्ति झाल्यानंतर मोक्षप्राप्तीच्या वेळीं त्याचा कांहीं उपयोग नाहीं.

२७ शमदमाद्युपेतः स्यात्तथापि तु तद्विधेस्तदङ्गतया तेषामवश्यानुष्ठेयत्वात् ।

---

२५ (ज्ञानोत्पत्तीला कर्म वगैरे) सर्वांची अपेक्षा आहे. म्हणूनच यज्ञ वगैरे कर्में श्रुतीमध्यें सांगितलीं आहेत. अश्वाप्रमाणें हें होय.

२६ ([63]जरी भक्तिमार्गांतील मनुष्य) शम, दम वगैरेंनीं युक्त असतो तरी (ज्ञानमार्गांतील मनुष्याच्या) त्या (ज्ञानप्राप्ति-) ला साधनभूत अशा रूपानें त्या (शम वगैरे-) चा विधि (सांगितला आहे). कारण (ज्ञानमार्गांतील मनुष्याला) त्यांचें अनुष्ठान अवश्य कर्तव्य आहे.

२६ यज्ञ वगैरे (कर्म साधन या रूपानें) सांगितलीं असल्यामुळें (ज्ञानोत्पत्तीला) सर्व (कर्मां-) ची जरूर आहे. अश्वाप्रमाणें हें होय.

२७ (जरी ज्ञानानेंच मोक्ष प्राप्त होतो) तथापि (ज्ञानी मनुष्यानें) शम, दम वगैरेंनीं युक्त असलें पाहिजे. कारण त्यांचा विधि सांगितला[64] आहे. (आणि म्हणूनच) त्या (ज्ञाना-) चें साधन[65] अशा रूपानें त्यांचें अवश्य अनुष्ठान केलें पाहिजे.

---

६० ज्याप्रमाणें घोडा हा एखादे ठिकाणीं जाण्याच्या मात्र उपयोगी पडतो, तेथील कांहीं कर्तव्य कर्मांच्या उपयोगी पडत नाहीं; त्याप्रमाणें कर्म हें ज्ञानोत्पत्तीला उपयोगी पडतें, मोक्षाच्या उपयोगी पडत नाहीं.

६१ ' पामण्यवश्या ' (रा.)

६२ जरी गृहस्थाश्रमी मुमुक्षु हा इंद्रियांच्या व्यापारामध्यें आसक्त असतो. तथापि त्या गृहस्थाश्रमी मुमुक्षूनें शम, दम वगैरेंनीं युक्त असलें पाहिजे. विहित कर्मे करतांना इंद्रियांच्या व्यापारामध्यें आसक्ति असो. परंतु अविहित आणि निरर्थक अशा कर्मांचा प्रसंग आला असतां शम व दम हेच पाहिजेत, असें या सूत्राचें तात्पर्य आहे.

६३ भक्तिमार्गांतील मनुष्याचें अंतःकरण भक्तीच्या योगानेंच शुद्ध होत असल्यामुळें त्याच्याकरतां शम वगैरेंचा विधि केला नाहीं असें समजावें.

६४ आचार्यापासून विद्या प्राप्त झाल्यानंतर मुमुक्षूनें शम, दम वगैरेंनीं युक्त असावें ' असा माठरव्य श्रुतीमध्यें विधि सांगितला आहे.

६५ ज्ञानाचें साधन म्ह. प्राप्त झालेल्या ज्ञानाची कायमची स्थिति होण्याचें साधन.

२८ सर्वान्नानुमतिश्च प्राणात्यये तद्दर्शनात् ।

२८ प्राणसंकटींच सर्व अन्न (खाण्या-) ची परवानगी आहे (असें समजतें) कारण (श्रुति) तसें सांगते.	२८ प्राणसंकटींच सर्व अन्न (खाण्या-) ची परवानगी आहे (असें समजतें). कारण (श्रुति) तसें सांगते.
२९ बाध होत नसल्यामुळेंही (प्रकृत वाक्य हें अर्थवादरूप आहे).	२९ बाध होत नसल्यामुळेंही (हेंच सिद्ध होतें).
३० आणि (ही गोष्ट) स्मृतींतही सांगितली आहे.	३० (ही गोष्ट) स्मृतींतही सांगितली आहे.
३१ आणि म्हणूनच स्वेच्छाचार बंद करणारी श्रुति (जुळते). (७)	३१ आणि म्हणून स्वेच्छाचार बंद करणारी श्रुति (जुळते). (७)

६६ ‘ ज्ञानी मनुष्यानें जरी शम वगैरेचें अनुष्ठान केलें तरी त्याचें अंतःकरण शुद्ध राहणार नाहीं. कारण आहार शुद्ध असल्याशिवाय अंतःकरण शुद्ध असत नाहीं. आणि ज्ञानी मनुष्याला तर पाहिजे तें अन्न खाण्याची परवानगी आहे ’ अशी जी शंका येते तिचें हें उत्तर आहे. ज्ञानमार्गांतील मनुष्यासंबंधानेंच सूत्रकारांनीं हें सांगितलें आहे. कारण भक्तिमार्गांतील मनुष्याला प्राणसंकट येण्याचा मुळींच संभव नाहीं.

६७ ‘ चाक्रायण ऋषीनें प्राणसंकटकाळींच अभक्ष्यभक्षण केलें ’ असें श्रुतीमध्यें सांगितलेलें चिन्ह दृष्टीस पडतें.

६८ प्राणसंकटीं जरी पाहिजे तें खाल्लें तरी त्याच्या योगानें अंतःकरण अशुद्ध होण्याचा संभव नसल्यामुळें कांहीं बाध म्ह. ज्ञानाला प्रतिबंध होत नाहीं.

६९ यथेच्छ आचरण केलें नाहीं तरी त्याच्या योगानें ज्ञानाचा कांहीं बाध होत नाहीं.

७० ‘ अपि स्मर्यते ’ (रा. ब. म.)

२९ अबाधाच्च । ३० अपि च स्मर्यते । ३१ शब्दश्चातोऽकामकारे[73] ।

२७ प्राणसंकटींच[66] सर्व अन्न (खाण्या-) ची परवानगी आहे (असें समजतें). कारण (श्रुति) तसें सांगते.	२८ प्राणसंकटींच सर्व अन्न (खाण्या-) ची परवानगी आहे (असें समजतें). कारण तसें दृष्टीस[67] पडतें.
२८ शिवाय बाध होत नसल्यामुळें[68] (दोष येत नाहीं).	२९ बाध होत नसल्यामुळेंही[70] (हेंच सिद्ध होतें).
२९ स्मृतीमध्येंही (असेंच) सांगितलें[71] आहे.	३० स्मृतीमध्येंही (असेंच) सांगितलें[72] आहे.
३० आणि म्हणूनच[74] स्वेच्छाचार बंद करणारी श्रुति (जुळते). (२)	३१ ज्याअर्थीं स्वेच्छाचार न करण्याविषयीं श्रुति[75] आहे त्याअर्थीं (ज्ञानी मनुष्यानें निषिद्धाचरण करूं नये).

७१ तात्पर्य, ज्या अर्थीं अज्ञानी मनुष्याला सुद्धां प्राणसंकटीं पाहिजे तें खाल्लें असतां पाप उत्पन्न होत नाहीं त्या अर्थीं ज्ञानी मनुष्याला तें उत्पन्न होत नाहीं हें सांगावयाला नकोच.

७२ भूतभविष्यकालच्या गोष्टी जाणणारा आणि त्रैलोक्याचा उद्धार करण्याविषयीं समर्थ असा जरी ज्ञानी असला तरी त्यानें श्रुतीस्मृतींमध्यें सांगितलेल्या आचाराचा त्याग करूं नये असें हरिवंशामध्यें सांगितलें आहे.

७३ ‘ मचारे ’ (म.)

७४ ज्ञान प्राप्त झाल्यानंतर त्याच्या योगानें स्वेच्छाचारापासून पातक उत्पन्न होत नाहीं; परंतु ज्ञानप्राप्तीच्या पूर्वी पातक उत्पन्न होईल म्हणूनच ‘ मुमुक्षु जनानें शम, दम वगैरेंनीं युक्त असावें ’ असें श्रुतीमध्यें (बृ. ४।४।२३) सांगितलें आहे.

७५ ‘ ज्ञानी मनुष्यानें यथेच्छ आचरण करूं नये ’ असें कौण्डिन्य श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

३२ विहितत्वाच्चाश्रमकर्मापि । ३३ सहकारित्वेन च ।

३२ आश्रमाचीं कर्में (अमुमुक्षूनें) देखील (करावयाचीं आहेत). कारण त्यांचा विधि सांगितला आहे.	३२ (यज्ञ वगैरे हीं) आश्रमाचीं कर्मेंही आहेत. कारण त्यांचा विधि सांगितला आहे.
३३ आणि (तीं कर्में) सहकारी या रूपानें (सांगितलीं असल्यामुळें विद्येला सहकारीही आहेत).	३३ आणि (तीं कर्में) सहकारी या रूपानें (सांगितलीं असल्यामुळें मुमुक्षूनें तीं कर्में करावींत).
३४ दोन्ही पक्षीं त्याच (धर्मांचें अनुष्ठान करावयाचें आहे. असें) दोन्ही प्रकारच्या चिन्हांवरून (समजतें).	३४ दोन्ही पक्षीं त्याच (धर्मांचें अनुष्ठान करावयाचें आहे असें) दोन्ही ठिकाणच्या चिन्हांवरून (समजतें).

७६ यज्ञ वगैरे कर्में हीं विद्येचीं साधनें आहेत म्हणून तीं कर्में मुमुक्षूनेंच फक्त करावयाचीं असें मात्र समजूं नये. तर तीं आश्रमाचीं कर्मेंही आहेत. तात्पर्य, गृहस्थाश्रमी वगैरे मनुष्यांनीं अग्निहोत्र वगैरे कर्में अवश्य केलींच पाहिजेत.

७७ ज्याप्रमाणें ज्ञानी मनुष्यानें संकटकालाशिवाय विहित अन्नच भक्षण केलें पाहिजे त्याप्रमाणें विहित कर्म देखील त्यानें केलें पाहिजे.

७८ ज्ञानी मनुष्यानें फक्त निषिद्धाचरण करूं नये इतकेंच नाहीं, तर त्यानें आश्रमसंबंधीं कर्में केलीं पाहिजेत. कारण कौषीतकिश्रुतीमध्यें ‘ ज्ञानी मनुष्य जरी आत्म्याला पाहतो तरी त्यानें चांगलीं कर्में करावीं. त्यांच्या योगानें त्याला अधिक आनंद प्राप्त होईल ’ असें सांगितलें आहे.

७९ शं. ज्ञान प्राप्त झाल्यानंतर त्याच्या योगानें कर्मांचा नाश होणार आहे तेव्हां त्यानें उगीच कर्में कां करावींत. उ. कर्में हीं शम दम, वगैरेंना सहाय आहेत म्हणून तीं केलीं पाहिजेत. कर्मांशिवाय शम, दम वगैरे कायम राहणार नाहींत. आणि ज्ञान स्थिर होणार नाहीं.

८० ‘ ज्याप्रमाणें प्रधान हा राजाला सहायभूत आहे ’ इत्यादि कमठ श्रुतीमध्यें मोक्षप्राप्तीच्या कामीं कर्म हें ज्ञानाला सहायभूत आहे असें सांगितलें आहे. त्यावरून ‘ समुच्चयवाद सिद्ध होतो ’ असें मात्र समजूं नये. कारण कर्मांचें साहाय्य घेतल्याशि-

३४ सर्वथापि त एवोभयलिङ्गात् ।

३१ आश्रमांचीं कर्में देखील (ज्ञानी मनुष्यानें करावयाचीं आहेत). कारण त्यांचा विधि सांगितला आहे.	३२ आणि (ज्ञानी मनुष्यानें) आश्रमांचीं कर्मेंही (केलीं पाहिजेत). कारण त्यांचा विधि सांगितला आहे.
३२ आणि (तीं कर्में) सहकारी असल्यामुळेंही (केलीं पाहिजेत).	३३ आणि (तीं कर्में) सहकारी असल्यामुळेंही (केलीं पाहिजेत). (१)
३३ सर्व बाजूंनींही त्याच (धर्मांचें अनुष्ठान करावयाचें आहे असें) दोन्ही प्रकारच्या चिन्हांवरून (समजतें).	३४ सर्व (साधनें) असलीं तरी (जे ज्ञानाला योग्य आहेत) तेच (ज्ञानाप्रत प्राप्त होतात) असें दोन्ही प्रकारच्या चिन्हांवरून (समजतें).

वाय देखील ज्ञानामध्यें मोक्ष प्राप्त करून देण्याचें सामर्थ्य आहे. आतां कर्मांच्या योगानें मोक्षामध्यें कांहीं विशेष प्रकारचा आनंद प्राप्त होतो ही गोष्ट निराळी.

८१ 'यज्ञ वगैरे कर्में हीं विद्येचीं अंगें आहेत ' असें सांगणाऱ्या श्रुतीमध्यें आणि ' यज्ञ वगैरे कर्में करणें हें आश्रमाचें कर्तव्य आहे ' असें सांगणाऱ्या श्रुतीमध्यें यज्ञ वगैरे शब्द सारखेच असल्यामुळें त्या दोन्ही कर्मांचें एकच स्वरूप आहे असें समजतें.

८२ भक्तिमार्गांतील जीं भगवच्छ्रवण वगैरे साधनें त्यांची आवश्यकता येथून सूत्रकार दाखवीत आहेत. श्रवण वगैरे साधनांच्या बरोबर आश्रमकर्में करावयाचीं म्हणून प्राप्त झालीं असोत किंवा नसोत; सर्व बाजूंनीं श्रवण वगैरे धर्मांचें अनुष्ठान केलेंच पाहिजे. दोन्ही प्रकारचीं चिन्हें म्हणजे श्रुति आणि स्मृति या दोन्ही ठिकाणचीं चिन्हें होत. ' धीर मनुष्यानें त्या (परमात्म्या-) लाच जाणून' (बृ. ४।४।२१) इत्यादि श्रुतीमध्यें इतर साधनांचा तिरस्कार करून श्रवण वगैरे साधनांचीच आवश्यकता दाखविली आहे. 'श्रवण वगैरे करणाऱ्यांनाच तुझे पाय दृष्टीस पडतात ' असें स्मृतीमध्येंही सांगितलें आहे. भगवद्गीतेवरूनही हेंच सिद्ध होतें. अ. ९ श्लोक १३ पहा.

८३ इंद्र आणि विरोचन या दोघांना ब्रह्मदेवानें जरी उपदेश सारखाच केला आहे तरी इंद्र योग्य असल्यामुळे त्याला ज्ञान प्राप्त झालें हें एक चिन्ह होय. आणि विरोचन अयोग्य असल्यामुळें त्याला ज्ञान प्राप्त झालें नाहीं हें दुसरें चिन्ह होय.

३५ अनभिभवं च दर्शयति ।

३५ आणि (नित्य कर्में करणारा मनुष्य क्लेशांनीं) अभिभूत होत नाहीं असें (श्रुति) दाखविते. (८)	३५ आणि (त्या कर्मांच्या योगानें विद्येचा) पराभव होत नाहीं असें (श्रुति) दाखविते. (८)
३६ परंतु मध्येंच (लोंबत राहणाऱ्याला) देखील (विद्येचा अधिकार आहे). कारण तसें दृष्टीस पडतें.	३६ परंतु मध्येंच (लोंबत राहणाऱ्याला) देखील (विद्येचा अधिकार आहेच). कारण तसें दृष्टीस पडतें.
३७ आणि स्मृतीमध्येंही (असेंच) सांगितलें आहे.	३७ स्मृतीमध्येंही (असेंच) सांगितलें आहे.

८४ पापकर्मांच्या योगानें जो विद्येचा पराभव म्ह. उत्पत्तीचा प्रतिबंध होणार तो यज्ञ वगैरे पुण्यकर्में केल्यानें होत नाहीं. कारण ‘धर्माच्या (म्ह. पुण्यकर्मांच्या) योगानें पाप दूर होतें’ (म. ना. २२।१) असें श्रुतींत सांगितलें आहे.

८५ श्रवण वगैरे करणाऱ्या मनुष्यानें जरी आश्रमकर्म केलें नाहीं तरी त्याला दोष लागत नाहीं असें ‘तो सर्व पातकें तरून जातो’ (बृ. ४।४।२३) इत्यादि श्रुति दाखविते.

८६ ‘देवांना दैवी संपत्तीच प्राप्त होते. दैत्यांना आसुरी संपत्तीच प्राप्त होते असा स्वभाव आहे. त्यामध्यें केव्हांही बदल होत नाहीं’ असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे. तेव्हां ज्ञान ही दैवी संपत्ति असल्यामुळें ती अयोग्यांना प्राप्त होणार नाहीं असें अर्थातच सिद्ध होतें.

८७ रैक्व, भीष्म, संवर्त वगैरे आश्रमरहित असूनही ब्रह्मनिष्ठ झालेले दृष्टीस पडतात.

८८ हें कांहींच नव्हे म्ह. श्रवण, मनन वगैरेंपेक्षां आश्रमाचे धर्म कमी योग्यतेचे आहेत हें फार थोडें सांगितलें आहे. वास्तविक पाहतां हें कांहींच नव्हे.

८९ आश्रमांचीं कर्में जीं पुत्रोत्पादन वगैरे त्यांविषयीं आसक्ति ठेविली असतां

३६ अन्तरा चापि तु तद्दृष्टेः । ३७ अपि च स्मर्यते ।

---

३४ आणि (श्रवण वगैरे करणारा मनुष्य दोषांनीं) अभिभूत होत नाहीं असें (श्रुति) दाखविते.

३५ आणि (स्वभाव) अभिभूत होत नाहीं असें (श्रुति) दाखविते.

३५ (हें कांहींच नव्हे), तर उलट (आश्रमाचे धर्म हे) त्या (परमात्म्या-) चे ठिकाणीं दृष्टि ठेवणाऱ्याला (फल प्राप्तीच्या) आड येणारे आहेत (असें श्रुति दाखविते).

३६ मध्यें असलेल्या (लोकांचा) देखील (स्वभाव अभिभूत होत नाहीं). कारण त्यांची (तशीच) दृष्टि आहे.

३६ (आश्रमाचे धर्म आड येतात) हें काय सांगावें ? (ज्ञान वैराग्य वगैरे सुद्धां आड येतात असें) स्मृतीमध्यें सांगितलें आहे.

३७ स्मृतीमध्येंही (असेंच) सांगितलें आहे.

आत्मसुखानुभवामध्यें विघ्न येईल या हेतूनें ' आम्हांला प्रजेच्या योगानें काय करावयाचें आहे '(बृ. ४ । ४ । २२) इत्यादि श्रुतिमध्यें आश्रमाच्या कर्माविषयीं उपेक्षा दाखविली आहे.

९० मनुष्य हे मध्यें असणारे लोक होत. कारण त्यांना देवांप्रमाणें सम्यग्ज्ञान नाहीं आणि दैत्यांप्रमाणें विपरीत ज्ञानही नाहीं. तेव्हां ते जरी ज्ञानाला अयोग्य नाहींत तरी त्यांना ज्ञान प्राप्त होत नाहीं. कारण त्यांची दृष्टि सम्यग्ज्ञान आणि विपरीत ज्ञान या दोहोंनीं नेहमीं मिश्रित असते.

९१ ' अपि स्मर्यते ' (रा. म.)

९२ ' जपाच्या योगानेंही ब्राह्मण सिद्धीला जातो' (पृ. १३६४ पं. ७ पहा) या स्मृतीवरून आश्रमरहित लोकांना जरी अग्निहोत्र वगैरे कर्में करतां येत नाहींत तरी त्यांच्या विद्येला जप हाच साधन होतो असें सिद्ध होतें.

९३ ' माझ्या भक्ताला ज्ञान नको, वैराग्य नको. त्याचें प्रायशः कल्याण होणारच ' (भाग ११।२०।३१) या स्मृतीमध्यें ज्ञान व वैराग्य यांची सुद्धां अपेक्षा धरिली नाहीं.

९४ दैत्यांना अधोगति प्राप्त होते, देवांना ऊर्ध्वगति प्राप्त होते, आणि मनुष्य मध्य स्थितींत राहतात, या तिघांचाही स्वभाव बदलत नाहीं, असें स्कांदामध्यें सांगितलें आहे.

३८ विशेषानुग्रहश्च । ३९ अतस्त्वितरज्ज्यायो लिङ्गाच्च ।

३८ आणि (विधुर वगैरे लोकांना) विशेष प्रकारच्या धर्मांच्या योगानें (विद्येला) अनुग्रह (संभवतो).

३९ परंतु यापेक्षां दुसरें (विद्येचें साधन) अधिक चांगलें आहे. कारण (त्या गोष्टीचीं) चिन्हें (आढळतात). (९)

४० परंतु जो तसा झाला आहे तो त्याहून भिन्न होत नाहीं असें नियम, तसलीं (वचनें)

३८ आणि (विधुर वगैरे लोकांना) विशेष प्रकारच्या धर्मांच्या योगानें (विद्येला) अनुग्रह होतो (असें सांगितलें आहे).

३९ यापेक्षां दुसरेंच (विद्येचें साधन) अधिक चांगलें आहे. कारण (त्या गोष्टीचीं) चिन्हें (स्मृतीमध्यें आढळतात). (९)

४० परंतु जो तसा झाला आहे तो त्याहून भिन्न होत नाहीं. कारण (शास्त्रानें) त्या (नै-

९५ 'अहं च' (म.)

९६ ज्ञानमार्गांतील मनुष्याला केवळ मुक्ति प्राप्त होते, परंतु भक्तिमार्गांतील मनुष्याला मुक्ति प्राप्त होऊन पुढेंही परमात्मा त्याच्या अधीन असतो असा त्याच्यावर विशेष प्रकारचा अनुग्रह होतो असें 'मी भक्ताच्या आधीन आहें' (भाग ९।४।६३) इत्यादि स्मृतीमध्यें सांगितलें आहे.

९७ श्रुति पहा. क. सं. अ. ४।७।३३

९८ 'इतरज्ज्यायो' असाही वल्लभाचार्यांचा पाठ आहे.

९९ स्मृति मागें (पृ. १२६५ पं. १९) पहा.

१०० यावरून म्ह. पूर्वी दाखविलेल्या श्रुतिस्मृतींवरून ज्ञानमार्गांतल्या मुक्तीपेक्षां भक्तिमार्गांतली स्थिति चांगली असें समजतें. शिवाय, भक्तिमार्गांतील लोकांना शरीर, इंद्रियें वगैरे असल्यामुळें त्यांना भजन वगैरेंच्या योगानें आनंदाचा अनुभव घेतां येतो. मुक्तांना तो घेतां येत नाहीं या चिन्हावरूनही वरील गोष्ट सिद्ध होते.

१०१ म्हणूनच म्ह. दैत्यांना ज्ञान प्राप्त होत नाहीं म्हणूनच. जर दैत्यांना ज्ञान प्राप्त होत असतें तर दैत्य हे देव होत असल्यामुळें कदाचित् देवांपेक्षां दैत्य कमी असते. परंतु ज्या अर्थी दैत्य फार आहेत त्या अर्थी त्यांना ज्ञान प्राप्त होत नाहीं असेंच म्हणावें लागतें. 'जनसमुदायामध्यें जाऊं नये' असें स्मृतीमध्यें सांगितलें आहे हें चिन्ह होय. असुर फार असल्यामुळें जनसमुदायामध्यें जाण्याचा स्मृतीमध्यें निषेध केला आहे. या चिन्हावरूनही वरील गोष्ट सिद्ध होते.

१०२ 'तु तद्भावो' (म.)

१०३ 'नियमात्तद्रूपा' (रा.)

४० तद्भूतस्य तु[102] नातद्भावो जैमिनेरपि नियमातद्रूपाभावेभ्यः ।

३७ ([९६] भक्तिमार्गांतील मनुष्यावर परमात्म्याचा) विशेष प्रकारचा अनुग्रह होतो असेंही (स्मृतीमध्यें सांगितलें आहे).

३८ यांवरून इतर (म्ह. मुक्तीं-) पेक्षां (देखील भक्तिमार्गांतली स्थिति) चांगली (असें समजतें. या गोष्टीचें) चिन्ह- ही (आढळतें). (३)

३९ परंतु जो तसा[१०५] झाला आहे तो जैमिनि जरी असला तरी त्याहून भिन्न होत नाहीं असें

३८ आणि (परमेश्वराचा देवांचे ठिकाणीं) विशेष प्रकारचा अनुग्रह आहे असें (श्रुति दाखविते).

३९ [१०१] म्हणूनच इतर (म्ह. दैत्य हे देवांपेक्षां) फार असतात. चिन्हावरूनही (हेंच सिद्ध होतें).

४० जो तसा[१०६] झाला आहे तोच तसा होतो असें नियम, तसें न होणें आणि अभाव

१०४ शास्त्र पहा (पृ. १३६७ पं. ५). तात्पर्य नैष्ठिक ब्रह्मचारी, वानप्रस्थ आणि संन्याशी यांना आश्रम सोडणें हें शास्त्रविरुद्ध असल्यामुळें आश्रम सोडणाऱ्या मनुष्याला विद्येचा अधिकार नाहीं असें समजावें.

१०५ जो पुष्टिमार्गांतील भक्त परमात्म्यानें आपलासा करून घेतला आहे त्याची स्थिति कधींही बदलत नाहीं. म्हणजे तो भगवद्भावापासून कधींच भ्रष्ट होत नाहीं. त्याला मोक्ष प्राप्त होत नाहीं. ह्या अवस्थेमध्यें प्रत्यक्ष परमात्म्याबरोबर अनेक प्रकारचे व्यवहार करतां येतात. ही अवस्था मोक्षापेक्षां देखील श्रेष्ठ आहे. मुख्य कर्ममार्गी जो जैमिनि त्याची देखील हीच अवस्था राहणार. मग अन्याचें संबंधानें विचार करण्याची जरूर नाहीं. भक्त लोक हे नेहमीं त्या परमात्म्याच्या स्थानाला पाहतात (तै. सं. १।३।६) ह्या श्रुतीमध्यें 'नेहमीं' या शब्दानें नियम दाखविला आहे. यावरून हेंच सिद्ध होतें. कारण त्यांची ती स्थिति बदलून जर त्यांना मुक्ति मिळाली तर त्यानंतर त्यांना परमात्म्याचें स्थान पाहतां येणार नाहीं. तसें नसणें म्ह. ही अवस्था मोक्षाचें साधन नव्हे. कारण मुक्तांना देखील ही अवस्था दुर्लभ आहे असें सांगितलें आहे. जर ही अवस्था साधनरूप असती तर त्या अवस्थेचें मोक्षरूपी फळ मिळालें पाहिजे होतें. अभाव म्ह. या अवस्थेपेक्षां उत्तम स्थितीचा अभाव आहे त्यावरूनही हेंच सिद्ध होतें.

१०६ 'जो देवजातीमध्यें उत्पन्न झाला आहे तोच देव होतो' इत्यादि नियम श्रुतीमध्यें केले आहेत. तसेंच देव वगैरे हे तसे म्ह. दैत्य वगैरे होत नाहींत असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे. तसेंच परमात्मा हा ऐश्वर्यरूपी आहे अशी त्याची देवांनीं उपासना केली म्हणून देवांना भाव म्ह. भूति (ऐश्वर्य) प्राप्त झालें आणि दैत्यांनीं तशी उपासना केली नाहीं म्हणून त्यांना अभाव म्ह. ऐश्वर्य प्राप्त झालें नाहीं असेंही श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

४१ न चाधिकारिकमपि पतनानुमानात्तदयोगात् ।

नसणें, आणि अभाव यांवरून (समजतें). जैमिनि देखील (ही गोष्ट मानतो.) (१०)

४१ अधिकार-(लक्षणा-) मध्यें सांगितलेलें (प्रायश्चित्त) देखील (नैष्ठिकाला संभवत) नाहीं. कारण (ब्रह्मचर्याचा भंग हा) अप्रतिकार्य आहे असें अनुमान असल्यामुळें (नैष्ठिकाचा) त्या (प्रायश्चित्ता-)शीं संबंध होत नाहीं.

४२ परंतु कांहीं (लोक हें) उपपातक आहे (असें मानतात. आणि नैष्ठिकाला देखील प्रायश्चित्त) आहे (असें म्हणतात. अभक्ष्य-) भक्षण करण्याप्रमाणें हें होय. हें (जैमिनीनें) सांगितलें आहे. (११)

ष्ठिक वगैरे आश्रमां-) त्या धर्मांच्या अभावापासून (त्या आश्रमांतील लोकांचें) नियमन केलें आहे. जैमिनि देखील (ही गोष्ट मानतो).

४१ अधिकार-(लक्षणा-) मध्यें सांगितलेलें (प्रायश्चित्त) देखील (नैष्ठिक वगैरेंना संभवत) नाहीं. कारण (त्यांच्या व्रताचा भंग झाला असतां) पातित्य येतें असें स्मृतींत सांगितलें असल्यामुळें (त्यांना) तें (प्रायश्चित्त) संभवत नाहीं.

४२ परंतु कांहीं (लोक हें) उपपातक आहे (असें मानतात. आणि नैष्ठिक वगैरेंना देखील प्रायश्चित्त) आहे (असें म्हणतात. अभक्ष्य-) भक्षण करण्याप्रमाणें हें होय. हें (११०स्मृतीमध्यें) सांगितलें आहे.

१०७ पुष्टिमार्गांतील भक्तांना ब्रह्मदेव वगैरेंप्रमाणें मोठा अधिकार देखील परमात्मा देत नाहीं. कारण ब्रह्मदेवाच्या लोकापर्यंत हे सर्व पुनः परत फिरणारे आहेत (भ. गी. ८।१६) अशी स्मृति आहे. आणि या भक्तांची स्थिति कायमची असल्यामुळें त्यांचें पतन संभवत नाहीं. शिवाय या भक्तांना नेहमीं भक्तिरसाचा अनुभव येत असल्यामुळें त्यापेक्षां कमी प्रतीचे जे ब्रह्मदेव वगैरेंचे अधिकार त्यांची त्यांना इच्छाच होत नाहीं.

१०८ परमात्म्याच्या ऐश्वर्याची व देवांच्या अधिकारांची देखील इतरांनीं इच्छा करूं नये. कारण त्या ऐश्वर्याला अयोग्य असा मनुष्य वगैरेंनीं जर तसा प्रयत्न केला तर त्यांचें पतन होईल असें अनुमान होतें. कारण एखादा मनुष्य जर आपल्याला अयोग्य अशा ठिकाणीं चढूं लागला तर तो तेथून पडतो असें दृष्टीस पडतें.

१०९ ' मर्यादायेकें भावशमनवत्त ' (म.)

११० गुरूच्या घरीं राहणाऱ्या ब्रह्मचाऱ्याच्या संबंधानें ज्या गोष्टी सांगितल्या आहेत त्यांपैकीं आपआपल्या आश्रमाला अविरुद्ध अशा सर्व गोष्टी पुढील सर्व लोकांना लागू पडतात असें स्मृतीमध्यें सांगितलें आहे.

४२ उपपूर्वमपि[११२] त्वेके भावमशनवत्तदुक्तम् ।

नियम, तसें नसणें आणि अभाव यांवरून (समजतें). (४)

यांवरून (समजतें). जैमिनि देखील (ही गोष्ट मानतो). (९)

४० अधिकार[११०] देखील (त्यांना परमात्मा देत) नाहीं. कारण स्मृतीमध्यें पतन सांगितलें आहे. आणि त्यांचा त्या (अधिकाराशीं) संबंध नाहीं.

४१ अधिकाराची[११०] देखील (इतरांनीं इच्छा करूं) नये. कारण पतनाचें अनुमान होतें. म्हणून तसें करितां येत नाहीं.

(अधिकार[१११] हे) उपपतनच आहे असें कांहीं लोक (म्हणतात. आणि) भाव हा अशनाप्रमाणें आहे असें (समजतात). हें (श्रुतीमध्यें) सांगितलें आहे. (९)

४२ उपदेव[११२] या शब्दाची देखील (इच्छा करूं नये) असें कांहीं लोक (म्हणतात). भावशमनाप्रमाणें हें होय. हें (श्रुतीमध्यें) सांगितलें आहे.

१११ अधिकारावर आरूढ झालेले लोक भक्तिभावापासून भ्रष्ट होतात; परंतु अधिकार संपतांच फिरून भक्तिरसाची आशा आहे. म्हणून अधिकार हें उपपतन आहे. आणि मोक्ष हें तर महापतन आहे. कारण मुक्त लोक भक्तिभावापासून भ्रष्ट होतात. आणि फिरून कधींही भक्तिरस उत्पन्न होण्याची आशाही नाहीं. तात्पर्य भक्तिमार्गांतील स्थिति मोक्षापेक्षांही श्रेष्ठ आहे. अशन म्ह. उपभोग. भक्तिभाव हा साक्षात् परमात्मस्वरूपाच्या उपभोगासारखाच आहे. इतकी भक्तिरसाची योग्यता आहे. भक्तांना अशा तऱ्हेचे उपभोग प्राप्त होतात हें श्रुतीमध्यें सांगितलें आहे. पुढें अ. ४ पा. ३ सू. १७ वरील परिशिष्ट पहा.

११२ ज्यांच्या भावामध्यें म्ह. अंतःकरणामध्यें शमन म्ह. शांति आहे ते भावशमन म्ह. ऋषि होत. ज्याप्रमाणें इतरांना ऋषि हा शब्द दुर्लभ आहे त्याप्रमाणें उपदेव हा शब्द दुर्लभच आहे. देवांपेक्षां कमी योग्यतेचे जे गंधर्व वगैरे ते उपदेव होत. उप हा शब्द कमी योग्यतेचा दर्शक आहे. उदा. उपगुरु. इंद्रद्युम्न श्रुतीमध्यें आणि बृहत् संहितेमध्यें असेंच सांगितलें आहे.

४३ बहिस्तूभयथापि स्मृतेराचाराच्च । ४४ स्वामिनः फलश्रुतेरित्यात्रेयः ।

४३ दोन्हीं पक्षीं (त्यांना) बाहेर-(च टाकिलें पाहिजे.) असें स्मृति आणि (शिष्टांचा) आचार यांवरून (समजतें). (१२)	४३ दोन्हीं पक्षीं (त्यांना) बाहेर- (च ११३ टाकिलें पाहिजे) असें स्मृति आणि (शिष्टांचा) आचार यांवरून (समजतें). (१०)
४४ (उपासनांचें कर्तृत्व) यजमानालाच आहे, कारण (श्रुतीमध्यें) फल सांगितलें आहे; असें आत्रेय म्हणतो.	४४ (उपासनांचें कर्तृत्व) यजमानालाच आहे, कारण (श्रुतीमध्यें) फल सांगितलें आहे; असें आत्रेय म्हणतो.
४५ (हीं) ऋत्विजांचीं (कर्में) आहेत असें औडुलोमि म्हणतो कारण त्या (कर्मा-) करितांच (तो) विकत घेतला जातो.	४५ (हीं) ऋत्विजांचीं (कर्में) आहेत असें औडुलोमि म्हणतो. कारण त्या (कर्मा-) करितांच (तो) विकत घेतला जातो. (११)

११३ आश्रमापासून भ्रष्ट झालेल्या लोकांना ब्रह्मविद्येच्या अधिकारी लोकांतून बाहेर टाकले पाहिजे.

११४ भक्तांचा परमात्म्याचे ठिकाणीं नुसता भाव असो किंवा त्यांना परमात्म्याचें प्रत्यक्ष दर्शन होवो. दोन्हीं अवस्थांमध्यें त्यांनीं घरामध्यें राहूं नये. कारण घरांत राहिलें असतां कदाचित् विषयासक्त होऊन भक्तिरसापासून भ्रष्ट होण्याचा संभव आहे. ‘सर्व स्वजनाचे ठिकाणीं प्रीति सोडून माझे ठिकाणी चांगल्या रीतीनें मन लावून सम दृष्टीनें संचार कर’ असें स्मृतीमध्यें सांगितलें आहे. उद्धव, विदुर वगैरे शिष्ट लोकांचा आचारही असाच आहे.

११५ पूर्वीच्या सूत्रामध्यें ज्या गोष्टीची इच्छा करूं नये म्हणून सांगितलें त्याच्या बाहेर म्ह. त्या शिवाय इतर गोष्टीची म्ह. ज्ञान, भक्ति वगैरेंची इच्छा केली तरी हरकत नाहीं, आणि न केली तरी हरकत नाहीं. कारण तसली इच्छा केली तरी त्याचें पतन होत नाहीं असें स्मृतीमध्यें सांगितलें आहे. आणि योग्य गोष्टीचीच इच्छा करावी असा शिष्ट लोकांचा आचार सांगितला आहे.

११६ पुष्टिमार्गांतील भक्ताला भक्तिमार्गाचा स्वामी जो श्रीकृष्ण परमात्मा त्यापासूनच उत्तम फल प्राप्त होतें असें पुढील श्रुतीवरून समजतें:—परमात्मा हा ज्याला

४९ आर्त्विज्यमित्यौडुलोमिस्तस्मै हि परिक्रियते ।

४२ [114]दोन्ही पक्षीं (त्यांनीं घराच्या) बाहेर- (च असले पाहिजे) असें स्मृति आणि (शिष्टांचा) आचार यांवरून (समजतें).

४३ (यांच्यां) बाहेर दोन्हीं तऱ्हेनें (वागलें असतां दोष नाहीं) असें स्मृति आणि आचार यांवरून (समजतें). (६)

४३ [116]स्वामीपासूनच फल प्राप्त होतें असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे म्हणून (बाहेर जाणें हें साधन या रूपानें करावयास नको) असें आत्रेय म्हणतो.

४४ [117]श्रुतीमध्यें सांगितलें असल्यामुळें स्वामीनाच फल प्राप्त होतें असें आत्रेय म्हणतो.

४४ (हें) [119]ऋत्विजांचें (कर्म) आहे असें औडुलोमि म्हणतो. कारण त्या (कर्मा-) करितांच (तो) विकत घेतला जातो.

४९ [120]ज्या अर्थी त्यांच्याकारितां व्यापार केला जातो (त्या अर्थी त्यांना) ऋत्विजा- (प्रमाणें फल प्राप्त होतें) असें औडुलोमि म्हणतो.

करतो (म्ह. ज्या भक्ताचा आपलेपणानें स्वीकार करतो) त्याला आपण प्राप्त होतो (का. २।२३). तात्पर्य घराचे बाहेर जाणें हें परमात्मदर्शनाचें साधन असें समजून तें भक्तानें केलें पाहिजे असें नाहीं.

११७ ज्ञानाचें साधन जीं इंद्रियें त्यांचे प्रेरक इंद्रियाभिमानी देव असल्यामुळें देव हे ज्ञानाचे स्वामी होत. त्यांनाच ज्ञानाचें फल प्राप्त होतें असें माध्यंदिनायन श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

११८ ‘ परिक्रीयते ’ (व.)

११९ ज्याप्रमाणें यजमान हा आपल्या कामाकरितां ऋत्विजांचा स्वीकार करतो त्याप्रमाणें परमात्मा हा एकट्याला क्रीडा करतां येत नाहीं म्हणून भक्तांचा स्वीकार करतो. म्हणून भक्त लोक घरदार सोडून परमात्म्याच्या जवळ जातात. तेव्हां हें ऋत्विजांचें कर्म आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

१२० इंद्रियांचें अभिमानी जे देव ते इंद्रियांच्या द्वारानें जो ज्ञानाच्या उपयोगी पडणारा असा व्यापार करतात तो प्रजाकरतां करीत असल्यामुळें त्याचें कांहीं तरी फल प्रजांना मिळालें पाहिजे. ज्याप्रमाणें ऋत्विजांना यज्ञाचें स्वर्ग वगैरे फल मिळालें नाहीं तरी थोडेसें फल मिळतें त्याप्रमाणेंच हें होय.

४६ [121]श्रुतेश्च । ४७ सहकार्यन्तरविधिः पक्षेण तृतीयं तद्वतो विध्यादिवत् ।

४६ श्रुतींत सांगितलें असल्यामुळें-हीं (हीं ऋत्विजांचीं कर्में आहेत). (१३)

४७ ज्याला सामान्य ज्ञान आहे अशा मनुष्याला सहकारी अशा निराळ्या गोष्टीचा विधिच सांगितला आहे. (बाल्य आणि पांडित्य यांच्या विधींच्या मानानें मौनाचा विधि) तिसरा आहे. विधि वगैरेंप्रमाणें हें होय.

४८ परंतु (गृहस्थाला) सर्व (कर्में) असल्यामुळें (श्रुतीनें) गृहस्थाश्रम सांगूनच उपसंहार केला आहे.

४६ [123]तसें मनुष्याला ज्याप्रमाणें विहित (आश्रमधर्म) वगैरे (विद्येला सहकारी होतात) त्याप्रमाणें तिसरें (मौन) निराळें सहकारीच पाक्षिक विहित आहे (असें समजावें).

४७ परंतु सर्व (आश्रमा-) मध्यें (विद्या) असल्यामुळें (श्रुतीनें) गृहस्थाश्रम सांगून केलेला उपसंहार सर्व आश्रमाबद्दल आहे.

१२१ रामानुज आणि मध्वाचार्य यांच्या पाठामध्यें हें सूत्र नाहीं.

१२२ ह्या लोकांतील आणि परलोकांतील सर्व उपाधी सोडून जें ह्या (श्रीकृष्ण परमात्म्या-) चे ठिकाणीं मन लावणें हीच भक्ति होय, आणि हेंच नैष्कर्म्य (म्ह. कर्म-राहित्य) होय, असें अथर्वणोपनिषदामध्यें सांगितलें आहे. त्यावरून भक्तिमार्ग हाच मुख्य मार्ग आहे असें सिद्ध होतें. हेंच सूत्रकाराचें मत आहे.

१२३ ज्याप्रमाणें विद्वान् मनुष्याला विद्याप्राप्तीचीं आश्रमधर्म श्रवण व मनन हीं साधनें आहेत. त्याप्रमाणें श्रुतीनें (पृ. १३७७ पं. १० पहा) मौन हें एक निराळेंच साधन सांगितलें आहे. मौन हें श्रुतीमध्यें तिसरें आहे. कारण श्रुतीमध्यें बाल्य आणि पांडित्य या दोघांचा विधी पूर्वी सांगून नंतर मौनाचा विधि सांगितला आहे. जरी एका पक्षानें म्ह. मौन शब्दाचा सामान्य ज्ञान असा अर्थ घेतला असतां पांडित्य आणि मौन एकच होतात तेव्हां मौनाला तिसरें म्हणतां येत नाहीं, तरी एका पक्षानें म्ह. मौन शब्दाचा उत्कृष्ट ज्ञान असा अर्थ घेतला असतां पांडित्यापेक्षां मौन हें निराळें होत असल्यामुळें मौनाला तिसरें म्हणतां येतें. जेव्हां एखाद्याला प्रापंचिक संस्कार प्रबल असल्यामुळें विशेष प्रकारचें ऐक्यज्ञान होत नाहीं त्या पक्षीं या विधीची जरूर आहे.

१२४ परमात्म्यानें आपलेपणानें भक्ताचा स्वीकार करणें हेंच परमात्मप्राप्तीचें मुख्य साधन श्रुतीमध्यें (का. २।२३) सांगितलें आहे. आतां इतर ठिकाणीं श्रुतीमध्यें (बृ. ४।४।२३) जीं शम, दम वगैरे साधनें सांगितलीं आहेत तीं एका पक्षानें म्ह. मर्यादामार्गांतील मनुष्यासंबंधानें सांगितलीं आहेत. कायिक, वाचिक आणि मानसिक या

४८ कृत्स्नभावात्तु गृहिणोपसंहारः ।

४५	श्रुतीवरूनही[१२३] (हेंच सिद्ध होतें). (६)		
४६	एकी[१२४] पक्षानें (शम वगैरे) निराळें साधन सांगितलें आहे. तिसरें (देखील) ज्यांचे ठिकाणीं तो (स्नेह) उत्पन्न झाला आहे त्याला विधि वगैरेंप्रमाणेंच आहे. (७)	४६	(प्रजा[१२५] हा एक देवांचा ज्ञानप्राप्तीचे कामीं) निराळा सहकारी सांगितला आहे. हा तिसरा पक्ष आहे. त्या (प्रजा वगैरे) ज्यांना आहेत त्यांच्या विधि वगैरेंप्रमाणें हें होय. (७)
४७	परंतु (भजनाची[१२६]) पूर्णता होत असल्यामुळें (श्रुतीनें) गृहस्थाश्रम सांगून उपसंहार केला आहे.	४७	सर्व[१२७] (गृहस्थाश्रमांतील कर्में देवांचे ठिकाणीं संभवत) असल्यामुळें (त्यांना अनुलक्षून श्रुतीनें) गृहस्थाश्रम सांगूनच उपसंहार केला आहे.

तिहींपैकीं मुख्य जें तिसरें साधन त्याची देखील साधन या दृष्टीनें पुष्टिमार्गांतील भक्ताला जरूर नाहीं. कारण त्याचें ठिकाणीं परमात्म्याविषयीं स्नेह उत्पन्न झाला असल्यामुळें त्याचें मन साहजिकच परमात्म्याकडे लागत आहे. ज्याप्रमाणें पुष्टिमार्गांतील भक्ताच्या प्रवृत्तीला इतर विधि वगैरे कारणीभूत होत नाहींत त्याप्रमाणेंच हीं साधनें समजावींत.

१२५ ज्याप्रमाणें प्रजानें युक्त अशा राजाला प्रजापालनरूप कर्मांमध्यें प्रजा सहकारी म्हणून सांगितल्या आहेत, (त्या प्रजापालनरूपी कर्माचें मुख्य फल राजाला मिळतें, व थोडें फल प्रजानांही मिळतें) त्याप्रमाणें देव हे इंद्रियांच्या द्वारानें ज्ञान संपादन करतात. त्या कामीं प्रजा ही देवांना सहकारी आहे. आतां त्या ज्ञानाचें मुख्य फल देवांनाच मिळालें व थोडें फल प्रजांना मिळतें. हा तिसरा पक्ष सूत्रकारांचाच आहे.

१२६ गृहस्थाश्रमी मनुष्याला सर्व प्रकारानें परमात्म्याचें भजन करतां येतें. शिवाय त्याच्यासंबंधानें त्याच्या घरांतील इतर लोकही कृतार्थ होतात. म्हणून त्याच्या भजनाची पूर्णता होते म्हणून श्रुतीनें तसा उपसंहार केला आहे. बाकी घर सोडून जाणाऱ्या मनुष्याला परमात्मप्राप्ति होत नाहीं असा मात्र त्या श्रुतीचा अभिप्राय नाहीं.

१२७ छांदोग्य श्रुतीमध्यें (पृ. १३८० पं. २१ पहा) जो गृहस्थाश्रम सांगून उपसंहार केला आहे तो देवांना सर्व गृहस्थाश्रमांतील धर्म संभवतात म्हणून केला आहे. तेव्हां त्यावरून मनुष्यमध्यें संन्यासाश्रमापेक्षां गृहस्थाश्रमच श्रेष्ठ आहे असें समजूं नये. मनुष्यामध्यें गृहस्थापेक्षां संन्यासी श्रेष्ठ आहे. आणि त्यापेक्षांही देव श्रेष्ठ आहेत असें समजावें. यावरून देव उत्तम आहेत हें सिद्ध होतें.

४९ मौनवदितरेषामप्युपदेशात्। ५० अनाविष्कुर्वन्नन्वयात्।

४९ मौनाप्रमाणें इतरांचा देखील निर्देश केला असल्यामुळें (चारी आश्रम सारखेच घेतले पाहिजेत). (१४)

५० 'प्रौढि न मिरवतां (त्यानें रहावें' असा प्रकृत वाक्याचा अर्थ होय). कारण (अशा रीतीनें या वाक्याचा) संबंध जुळतो. (१५)

५१ प्रस्तुत (गोष्टी-) ना प्रतिबंध

४८ मौनाप्रमाणें इतर (आश्रमधर्मां-) चा देखील (श्रुतींमध्यें विद्येचें साधन या रूपानें) निर्देश केला असल्यामुळें (मौन हें सर्व आश्रमाबद्दल आहे). (१२)

४९ 'प्रौढि न मिरवतां (त्यानें रहावें' असा प्रकृत वाक्याचा अर्थ होय). कारण (अशा रीतीनें या वाक्याचा) संबंध [१३०] जुळतो. (१३)

५० प्रतिबंध[१३१] प्रस्तुत नसेल तर

१२८ निरिच्छा वगैरे जे संन्यासाश्रमांतील धर्म त्यांना मौन म्हणतात. ते ज्याप्रमाणें वाणी, मन आणि शरीर यांचें नियमन करणारे आहेत, त्याप्रमाणें सर्व इंद्रियें परमात्म्याकडे लावणें वगैरे गृहस्थाश्रमांतील धर्मही वाणी वगैरेंचें नियमन करणारे श्रुतीमध्यें सांगितले आहेत. म्हणून श्रुतीमध्यें तसा उपसंहार केला आहे.

१२९ मौन म्ह. संन्यासाश्रम होय. कौठरव्य श्रुतीमध्यें देवांना संन्यासाश्रमाचे धर्म सांगितले आहेत. आणि त्याप्रमाणेंच इतर सर्व आश्रमाचे धर्मही त्यांना सांगितले आहेत. यावरूनही देव उत्तम आहेत हें सिद्ध होतें.

१३० 'जो दुराचरणापासून थांबला नाहीं त्याला आत्मप्राप्ती होत नाहीं' असें श्रुतीमध्यें (का. २।२४) सांगितलें असल्यामुळें यथेच्छविहार हा विद्येला विरुद्ध आहे असें समजतें. तेव्हां तो बाल्य शब्दाचा अर्थ घेतां येत नाहीं. कारण त्या बाल्याचा विद्येचें साधन या रूपानें संबंध करतां येत नाहीं.

१३१ ज्याअर्थी त्याचा परमात्म्याशीं संबंध झालेला आहे म्हणजे त्याच्या अंतःकरणामध्यें परमात्मा प्रगट झालेला आहे त्याअर्थी त्याचा भगवद्भाव गुप्त असणारच. नाहींतर अयोग्य मनुष्याला देखील त्यापासून फलप्राप्ती होण्याचा संभव आहे. आतां इतर कर्में केल्याशिवाय त्याचा भगवद्भाव गुप्त राहणार नाहीं. म्हणून श्रुतीनें तशा गृहस्थाश्रमीं मनुष्याला देखील स्वाध्याय अध्ययन करणें वगैरे कर्में सांगितलीं आहेत. तेव्हां तीं

५१ ऐहिकमप्यप्रस्तुतप्रतिबन्धे तद्दर्शनात्[133] ।

४८ (शिष्टांर्थ[126]) मौनाप्रमाणें इतर (धर्मा-)चा देखील (श्रुतीमध्यें) निर्देश केला आहे म्हणून (तसा उपसंहार केला आहे असें समजावें). (८)	४८ [129]मौनाप्रमाणें इतरांचा देखील निर्देश केला आहे, त्यावरून (हेंच सिद्ध होतें). (८)
४९ (भक्तानें आपला भगवद्भाव) प्रकट न करितां (परमात्म्याचें भजन करावें). कारण (त्याचा परमात्म्याशीं) संबंध झालेला[131] आहे.	४९ (गुरूनें[132] शिष्याला) गुप्त रीतीनें (उपदेश करावा असें) युक्तीवरून (सिद्ध होतें). (९)
५० [135]प्रस्तुत (गोष्टी-)ला प्रति-	५० प्रतिबंध[136] प्रस्तुत नसेल तर या

कर्में सांगितलीं असल्यामुळें त्याचीं सर्व इंद्रियें परमात्म्याकडे लागणार नाहींत असें समजूं नये. तो फक्त लोकदृष्ट्या कर्में करीत आहे परंतु त्याचें कर्मांकडे लक्ष नाहीं.

१३२ गुरुनें चवाठ्यावर जाऊन उपदेश केला तर तो भलत्या मनुष्याच्या कानीं पडेल, आणि ' अयोग्य मनुष्याला उपदेश करूं नये ' असा श्रुतीमध्यें निषेध केला आहे. हीच युक्ति होय.

१३३ 'कर्मप्रस्तु' (रा. म.)

१३४ ज्ञानपूर्वक केलेलें कर्म अधिक प्रबळ आहे (म्हणजे त्या कर्मापासून विद्या लवकर प्राप्त होते, त्याला प्रतिबंध होत नाहीं) असें श्रुतीमध्यें (छां. १।१।१०) सांगितलें आहे. त्यावरून प्रतिबंध होत असतो असें सिद्ध होतें. ज्या विद्येचें मोक्षाशिवाय इतर असें अभ्युदयरूपीं फल (म्ह. संसारामध्यें उत्कृष्ट स्थिति असणें) आहे त्या विद्येचा ह्या सूत्रामध्यें विचार केला आहे. आतां प्रतिबंध असेल तर अन्य जन्मीं विद्या उत्पन्न होते. एकंदरीत विद्या अमुक कालीं उत्पन्न होते असा कालाविषयीं नियम नाहीं.

१३५ परमात्म्याचें भजन करणें ही प्रस्तुत गोष्ट होय. ऐहिक कर्म म्ह. अपत्यसंस्कार करणें वगैरे लौकिक कर्म होय.

१३६ जर प्रारब्ध कर्म प्रतिबंधक नसेल तर मनुष्याला या जन्मींच परमात्म्याचें प्रत्यक्ष ज्ञान होतें, आणि तें कर्म प्रतिबंधक असेल तर अन्य जन्मीं प्रत्यक्ष ज्ञान होतें, असें सोपणी श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

५२ एवं मुक्तिफलानियमस्तदवस्थावधृतेस्तदवस्थावधृतेः ॥

(अभ्युदयरूपी फल देणारी विद्या) या जन्मीं उत्पन्न होते. कारण (श्रुति) असेंच सांगते. (१४)

५१ याप्रमाणेंच[137] मुक्तिरूपी फल देणाऱ्या (विद्ये-) विषयीं (देखील काळाचा) नियम नाहीं. कारण (येथेंही पूर्वींच्या हेतूची) तीच अवस्था कायम आहे; तीच अवस्था कायम आहे. (१५)

नसतांना (विद्या) या जन्मीं देखील (उत्पन्न होते). कारण (श्रुति) असेंच सांगते. (१६)

५२ मुक्ति- (रूप) फलासंबंधानें असा नियम नाहीं. कारण ती अवस्था (श्रुतीनें) निश्चित केली आहे; कारण ती अवस्था (श्रुतीनें) निश्चित केली आहे. (१७)

---

१३७ प्रतिबंधक असणें आणि नसणें हा पूर्व सूत्रांतील हेतु ह्या विद्येविषयीं देखील लागू पडतो, म्हणजे प्रतिबंध असेल तर ही विद्या देखील अन्य जन्मींच उत्पन्न होते आणि प्रतिबंध नसेल तर ह्या जन्मींच उत्पन्न होते.

१३८ 'परमात्म्यासहवर्तमान साक्षात् विहार करणें' हें मुक्तीचें फल होय. परमात्मा ज्याचा आपलेपणानें स्वीकार करतो त्यालाच तें फल मिळतें, इतराला मिळत नाहीं. मुक्त लोक फिरून संसारांत पडत नाहींत (छां. ८।१५।१) ह्या श्रुतिमध्यें मोक्षावस्था कायम राहते असा ह्या अवस्थेचाच फक्त निश्चय केला आहे. मुक्तीच्या फलासंबंधानें त्या श्रुतीमध्यें उल्लेख केला नाहीं. आतां परमात्म्याची कृपा होऊन भक्तानें जरी परमात्म्याच्या

तृतीयेऽध्याये चतुर्थः पादः समाप्तः ॥

बंध नसतांना ऐहिक (कर्म) देखील करावें. कारण तें (श्रुतीमध्यें सांगितलेलें) दृष्टीस पडतें.

९१ [१३८]याप्रमाणें (मुक्ताला) मुक्तीचें फल मिळतेंच असा नियम नाहीं. कारण ती अवस्था- (च फक्त श्रुतीनें) निश्चित केली आहे; कारण ती अवस्था- (च फक्त श्रुतीनें) निश्चित केली आहे. (९)

जन्मीं (प्रत्यक्ष ज्ञान होतें). कारण (श्रुति) असेंच सांगते. (१०)

९१ [१३९]याप्रमाणेंच मुक्तिरूपी फलाविषयीं (देखील) नियम नाहीं. त्या (ब्रह्मा-) चे ठिकाणीं स्थित असलेल्या (ज्ञान्या-) ला निश्चयानें (मोक्ष प्राप्त होतोच असें सांगितलें आहे); त्या (ब्रह्मा-) चे ठिकाणीं स्थित असलेल्या (ज्ञान्या-) ला निश्चयानें (मोक्ष प्राप्त होतोच असें सांगितलें आहे). (११)

बरोबर यथेच्छ विहार केले तरी तो फिरून संसारांत पडला असें मात्र होत नाहीं. कारण हे विहार प्रापंचिक नव्हेत.

१३९ ज्ञानी मनुष्याला प्रतिबंधक कर्म नसेल तर शरीर पडल्याबरोबर मोक्ष प्राप्त होतो, नाहींतर कांहीं जन्म घ्यावे लागतात. एकंदरींत कांहीं नियम सांगतां येत नाहीं. परंतु ‘ज्ञान्याला मोक्ष प्राप्त होत नाहीं’ असें मात्र कधींही होत नाहीं. कारण ‘ब्रह्मनिष्ठ मनुष्याला मोक्ष प्राप्त होतोच (छां. २।२३।२)’ असें श्रुतीमध्यें निश्चयानें सांगितलें आहे.

१ आवृत्तिरसकृदुपदेशात् । २ लिङ्गाच्च ।

अध्याय ४ पाद १

१ (ज्ञानक्रियेचा) अनेकवार उपदेश केला असल्यामुळें (त्या क्रियेची) आवृत्तिच केली पाहिजे.

२ चिन्हावरून देखील (आवृत्ति सूचित होते). (१)

३ (परमेश्वराला) आत्मा असेंच मानतात, व (त्याचा आत्मा असाच श्रुती) बोध करून देतात. (२)

१ (ज्ञानक्रियेची) अनेकवार आवृत्ति केली पाहिजे. कारण (तसा) उपदेश केला आहे.

२ स्मृतीवरून देखील (आवृत्ति सूचित होते). (१)

३ (परमेश्वराला) आत्मा असेंच मानतात, व (त्याचा आत्मा असाच श्रुती) बोध करून देतात. (२)

---

१ श्रुतीमध्यें वेदनाचा (म्ह. ज्ञानक्रियेचा) उपदेश केला आहे. आणि वेदन व उपासना यांमध्यें कांहीं भेद नाहीं. (पहा पृ. १३९६ पं. १०)

२ 'जड आणि जीव हे ब्रह्मस्वरूप आहेत' असा उपदेश छांदोग्यामध्यें (छां. ६।८।७) उद्दालकानें श्वेतकेतूला नऊं वेळां केला आहे. यावरून 'श्रवण वगैरेंची आवृत्ति केली पाहिजे' असें सिद्ध होतें. ह्या दोन सूत्रांचा असाही अर्थ होतो:—(सू. १) अनेकवार आवृत्ति (हें कर्माचें फळ होय). कारण (श्रुतीमध्यें पुनर्जन्माचा) अनेकवार उपदेश केला आहे. अनेकवार आवृत्ति म्हणजे पुन्हा पुन्हा जन्माला येणें. हा जीवात्मा ह्या अंगापासून निघून फिरून जन्माला येतो असें बृहदारण्यकामध्यें वारंवार सांगितलें आहे. (सू. २) स्मृतीवरूनही (आवृत्ति सूचित होते). 'लोक हे गतागतास प्राप्त होतात' (भ. गी. ९।२१), हे अर्जुना ब्रह्मदेवापर्यंत हे सर्व लोक फिरून जन्माला येणारे आहेत (भ. गी. ८।१६) अशी स्मृती आहे. ज्ञान व भक्ति यांच्या फलापेक्षां कर्माचें फल निकृष्ट आहे असें ह्या २ सूत्रांचें तात्पर्य आहे.

३ 'तो हा अणिमा होय आणि एतत्स्वरूपच हें सर्व आहे' (छां. ६।८।७) अशा रीतीनें श्रुतीमध्यें उद्दालकानें श्वेतकेतूला अनेकवार म्ह. नऊं वेळां उपदेश केला

२ आत्मेति तूपगच्छन्ति ग्राहयन्ति च ।

अध्याय ४ पाद १

१ (श्रवण[२] वगैरेंची) आवृत्तिच केली पाहिजे. कारण (श्रुतीमध्यें) अनेकवार उपदेश केला आहे.	१ (श्रवण[३] वगैरेंची) आवृत्तिच केली पाहिजे. कारण (श्रुतीमध्यें) अनेकवार उपदेश केला आहे.
२ स्मृतीवरून[५] देखील (आवृत्ति सूचित होते). (१)	२ चिन्हावरून[६] देखील (आवृत्ति सूचित होते). (१)
३ (मुमुक्षु लोक ब्रह्माची) आत्मा अशा रूपानें (उपासना करितात, व शेवटीं ते त्यामध्यें) प्रविष्ट होतात आणि (दुसऱ्याला असाच) उपदेश करितात.	३ (मुमुक्षु लोक विष्णूची) आत्मा अशा रूपानें उपासना करितात. आणि (दुसऱ्याला असाच) उपदेश करितात. (२)

आहे, त्यावरून श्रवण, मनन वगैरेंची आवृत्ति केली पाहिजे असें सिद्ध होतें.

४ ‘ इतरांचा संबंध नसून फक्त ध्येयस्वरूपानें जें एकसारखें ज्ञान होणें त्यालाच ध्यान म्हणतात. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार आणि धारणा ह्या सहा अंगांपासून हें ध्यान उत्पन्न होतें ’ असें स्मृतीमध्यें सांगितलें आहे.

५ ‘ माझ्या पुण्यकारक गोष्टी ऐकून जसा जसा हा आत्मा शुद्ध होत जातो तसा तसा त्याला सूक्ष्म तत्त्वाचा बोध होतो ’ या स्मृतीवरून श्रवण वगैरेंची आवृत्ति सूचित होते.

६ ‘ भृगु हा आपल्या वरुणनामक पित्याकडे फिरून गेला ’ (तै ३।१।१) असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे. या चिन्हावरून श्रवण वगैरे अनेक वेळां केलें पाहिजे असें समजतें.

७ उपासना करणारा जसा आपण आपल्या शरीराचा आत्मा असतो त्याप्रमाणें त्या उपासना करणाऱ्याचा ब्रह्म हा आत्मा आहे. कारण जीव हें परमात्म्याचें शरीर आहे. तात्पर्य उपासना तशीच केली पाहिजे.

४ न प्रतीके न हि सः । ५ ब्रह्मदृष्टिरुत्कर्षात् ।

४ प्रतीकांच्या ठिकाणीं (आत्म्याचें ग्रहण केलें जात) नाहीं. कारण तो (त्यांना 'आत्मा' असें समजत) नाहीं. (३)

५ (आदित्य वगैरेंवर) ब्रह्माची दृष्टि (कर्तव्य) आहे. कारण (तशा रीतीनें त्यांना) उत्कर्ष प्राप्त होतो. (४)

६ (कर्मांच्या)अंगांवरच आदित्य वगैरेंच्या बुद्धींचा आरोप करावयाचा आहे. कारण (अशा रीतीनेंच कर्मसमृद्धि) जुळते. (५)

४ प्रतीकांच्या ठिकाणीं (आत्म्याचें ग्रहण केलें जात) नाहीं. कारण (प्रतीक हें उपासकाचा) तो (म्ह. आत्मा होत) नाहीं.

५ (प्रतीकांचे ठिकाणीं फक्त) ब्रह्माची दृष्टि (कर्तव्य) आहे. कारण (तशा रीतीनें त्यांना) उत्कर्ष प्राप्त होतो. (३)

६ (कर्मांच्या)अंगांवरच आदित्य वगैरेंच्या बुद्धींचा आरोप करावयाचा आहे. कारण (आदित्य वगैरेंच्या ठिकाणींच उत्कृष्टत्व) जुळतें. (४)

---

८ (मू. भं.) सूत्रामध्यें 'प्रतीकेन' असें तृतीयांत एक पद आहे. 'वस्तूच्या खऱ्या स्वरूपापेक्षां निराळ्या रूपानें तिची उपासना करणें' ह्याला प्रतीक म्हणतात. अशी जर परमात्म्याची उपासना असेल तर मोक्ष प्राप्त होणार नाहीं.

९ तात्पर्यः-'नांवाची ब्रह्मरूपानें उपासना करावी' (छां. ७।१।५) ह्या श्रुतीमध्यें सांगितलेली उपासना नांव हेंच ब्रह्म आहे असें समजून करूं नये, तर नांवाचे ठिकाणीं ब्रह्म आहे असें समजून करावी.

१० 'हें सर्व ब्रह्म आहे' (छां. ३।१४।१) ह्या श्रुतीमध्यें प्रतीक समजून उपदेश केला असें समजूं नये, तर हें सर्व खरेंच ब्रह्म असल्यामुळें श्रुतीनें तसा अनुवाद केला आहे. आतां ती ब्रह्मदृष्टि उपासकाचा अधिकार जास्त वाढत चालला म्हणजे आपोआपच प्राप्त होते. तात्पर्यः—प्रतीकोपासनेच्या योगानें मोक्ष प्राप्त होत नाहीं.

६ आदित्यादिमतयश्चाङ्ग उपपत्तेः ।

४ कारण प्रतीकानें तो (मोक्ष प्राप्त होत) नाहीं.	४ प्रतीकांच्या ठिकाणीं (ब्रह्मदृष्टी करूं) नये. कारण (प्रतीक हें) तो (परमात्मा) [१०]नव्हे. (३)
५ ब्रह्मदृष्टि ही (अधिकाराच्या) उत्कर्षानें (लब्ध होते). (२)	५ (विष्णूच्या ठिकाणीं) ब्रह्मदृष्टि (करून नेहमीं उपासना करावी.) कारण (तो) उत्कृष्ट आहे. (४)
६ [११]आदित्य वगैरेंच्या ठिकाणीं (ज्या ब्रह्मत्वाविषयीं) बुद्धी आहेत, त्या अंगाचे ठिकाणीं आहेत. आणि हें बरोबरच आहे.	६ [१२]आदित्य वगैरेंनीं अंगांच्या ठिकाणीं उपासना कराव्या. आणि हें बरोबरच आहे. (५)

११ प्राचीनयोग्य वगैरेंनीं ज्या आदित्य वगैरेंच्या उपासना केल्या आहेत (छां-५।१३।१ पहा) त्या प्रतीक उपासना नव्हेत म्ह. आदित्य वगैरेंच्या ठिकाणीं ब्रह्मत्वाचा आरोप करून केलेल्या नव्हेत. तर त्या खऱ्याच ब्रह्मोपासना आहेत. आणि हें बरोबरच आहे. कारण आदित्य वगैरे हे साकार अशा विराट् ब्रह्माचे अंगभूतच असल्यामुळें त्यांना ब्रह्म म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

१२ आदित्य वगैरे देव हे परमात्म्याच्या ज्या ज्या अंगापासून उत्पन्न झाले त्या त्या अंगाची त्या त्या देवांनीं आमचा हा ‘आश्रय आहे’ अशी उपासना केली पाहिजे. आणि हें बरोबरच आहे. कारण मोक्षाचे वेळीं त्या त्या देवांचा त्या त्या अंगामध्येंच लय व्हावयाचा आहे.

७ आसीनः संभवात् । ८ ध्यानाच्च ।

७ (उपासकानें) बसूनच (उपासना करावयाची आहे). कारण (त्या स्थितींतच उपासना) संभवते.	७ (उपासकानें) बसूनच (उपासना करावयाची आहे). कारण (त्या स्थितींतच उपासना) संभवते.
८ (उपासना ही) ध्यानरूप असल्यामुळें देखील (ती बसूनच करावयाची आहे).	८ (उपासना ही) ध्यानरूप असल्यामुळें देखील (ती बसूनच करावयाची आहे).
९ आणि अचलत्वाला अनुलक्षूनच (पृथ्वीला 'ध्यान' शब्द श्रुतीनें लाविला आहे).	९ आणि अचलत्वाला अनुलक्षूनच (पृथ्वीला 'ध्यान' शब्द श्रुतीनें लाविला आहे).
१० स्मृतिकारही (असेंच) सांगतात. (६)	१० स्मृतिकारही (असेंच) सांगतात.

१३ उपासनेमुळें उपासकाविषयीं परमात्म्याच्या मनामध्यें प्रीति उत्पन्न होते. आणि त्यामुळें परमात्मा हा भक्तापुढें नेहमीं बसलेला असतो. परमात्मा हा भक्ताच्या अधीन असतो हें येथें सुचविलें आहे.

१४ उपासकानें परमात्म्याचें ध्यान केलें म्हणजे त्याच्या योगानें परमात्मा हा त्याच्या हृदयामध्यें प्रकट होऊन नेहमीं बसलेला असतो.

१५ स्मरणरूप उपासना आणि ध्यानरूप उपासना अशी उपासना दोन प्रकारची आहे. त्यांपैकीं पहिली बसल्याशिवायही करतां येईल; परंतु दुसरी मात्र बसल्याशिवाय करतां येत नाहीं. कारण मनुष्य बसला नाहीं तर ध्यानामध्यें विक्षेप येण्याचा संभव असतो.

९ अचलत्वं चापेक्ष्य । १० स्मरन्ति च ।

७ (प्रीतिरूप[13] साधनाचा) संभव असल्यामुळें (परमात्मा हा उपासकांच्या पुढें) बसलेला असतो.	७ (उपासकानें) बसूनच (उपासना करावयाची आहे). कारण (त्या स्थितींतच उपासना) संभवते.
८ ध्यानामुळेंही[14] (परमात्मा हा उपासकांपुढें बसलेला असतो).	८ (उपासना[15] ही) ध्यानरूप असल्यामुळें देखील (ती बसूनच करावयाची आहे).
९ आणि (त्याठिकाणीं परमात्म्याचें) अचलत्व हें (भक्ताच्या इच्छेला) अनुलक्षून असतें.	९ (ध्यानाला[16] शरीराच्या) अचलत्वाचीही जरूर आहे.
१० आणि[17] (कांहीं भक्त हे परमात्म्याचें केवल) स्मरण करितात. (२)	१० स्मृतिकारही[18] (असेंच) सांगतात.

१६ जरी ध्यानाचे पूर्वी प्रत्याहार म्ह. इंद्रियांचें नियमन केलें जातें तरी तेवढ्यानें भागत नाहीं. कारण शरीर जर स्थिर नसेल तर चित्त विक्षिप्त होऊन ध्यान करतां येणार नाहीं.

१७ कांहीं भक्त हे परमात्म्याच्या स्वरूपाची अपेक्षा न धरतां फक्त परमात्म्याचें स्मरण करतात. आणि त्या आनंदामध्यें निमग्न होऊन त्यापुढें मोक्षसुख देखील तुच्छ मानतात. या सूत्राचा दुसरा अर्थः—स्मृतिकारही असेंच सांगतात. 'मी भक्ताच्या अधीन आहें' अशी स्मृति (भाग. ९।४।६३) आहे.

१८ 'शरीर सारखें धारण करून आसनावर बसून उपासना करावी' (भ. गी. ६।१३) असें स्मृतीमध्यें सांगितलें आहे.

११ यत्रैकाग्रता तत्राविशेषात् । १२ आ प्रायणात्तत्रापि हि दृष्टम् ।

११ (श्रुतीमध्यें) विशेष प्रकारचे नियम सांगितले नसल्यामुळें जेथें एकाग्रता करितां येईल तेथें (उपासना करावी). (७)	११ (श्रुतीमध्यें इतर गोष्टींविषयीं) विशेष सांगितला नसल्यामुळें जेथें एकाग्रता करितां येईल तेथें (उपासना करावी). (५)
१२ आमरणांत- (च आवृत्ति केली पाहिजे). कारण त्या-कालीं देखील (अनुवृत्ति असते असें श्रुतीवरून) दिसून येतें. (८)	१२ आमरणांत (उपासना केली पाहिजे). कारण त्या सर्व-कालींही (उपासना) दृष्टीस पडते. (६)
१३ तें प्राप्त झालें असतां पुढल्या आणि मागल्या पातकांचे अश्लेष आणि नाश होतात. कारण (श्रुतींत) तसें सांगितलें आहे. (९)	१३ ती (विद्या) प्राप्त झाली असतां पुढल्या आणि मागल्या पातकांचे अश्लेष आणि नाश होतात. कारण (श्रुतींत) तसें सांगितलें आहे. (७)

१९ परमात्मा हा ज्या भक्ताच्या मनामध्यें प्रकट होतो आणि ज्या भक्ताला आपलें स्वरूप बाहेर दाखवितो त्या दोन्ही तऱ्हेच्या भक्तांची जर परमात्म्याचे ठिकाणीं एकाग्रता असेल तर त्या दोन्ही तऱ्हेच्या भक्तांची योग्यता सारखीच समजली जाते. त्यांच्या मध्यें कांहींच तारतम्य नाहीं.

२० तात्पर्य:—उपासना ही अमक्याच ठिकाणीं करावी किंवा अमक्याच वेळीं करावी असा कांहीं नियम नाहीं.

२१ मोक्षप्राप्तीकरतां केली जाणारी उपासना आमरणांत केली पाहिजे. कारण आयुष्य आहे तोंपर्यंत उपासना करणारा जो उपासक तो ब्रह्मलोकाप्रत प्राप्त होतो असें सांगितलेलें दृष्टीस पडतें.

२२ परलोकामध्यें पुरुषार्थ म्हणून प्राप्त होणारें जें मुख्य फळ त्याला प्रायण म्हणतात. तें प्राप्त होतोपर्यंत जरी कदाचित् परमात्मा त्या भक्ताच्या पुढें बाहेर प्रकट झाला,

१३ तदधिगम उत्तरपूर्वाघयोरश्लेषविनाशौ तद्व्यपदेशात् ।

११ जेथें [22]एकाग्रता असते तेथें विशेष नसल्यामुळें (तारतम्य नाहीं). (४)	११ जेथें एकाग्रता होईल तेथें (उपासना करावी). कारण (त्यांत कांहीं) विशेष नाहीं. (६)
१२ [23]प्रायणापर्यंत (एकच अवस्था कायम असते). आणि त्यामध्येंही दृष्ट (फल असतें). (५)	१२ मोक्ष[23] प्राप्त होतोंपर्यंत (उपासना केली पाहिजे). कारण त्या (मोक्षावस्थे-) मध्यें सुद्धां (उपासना केली आहे असें श्रुतीवरून) दिसून येतें. (७)
१३ तें [24]प्राप्त झालें असतां पुढल्या आणि मागल्या पातकांचे अश्लेष आणि नाश होतात. कारण (श्रुतींत) तसें सांगितेलं आहे.	१३ तें प्राप्त झालें असतां पुढल्या आणि मागल्या पातकांचे अश्लेष आणि नाश होतात. कारण (श्रुतींत) तसें सांगितलें आहे.

तरी त्या भक्ताला ' हा परमात्मा माझ्या बाहेर आहे ' असें अनुसंधान होत नाहीं. त्याची स्थिति एक सारखीच असते. आ प्रायणावस्थेमध्यें सुद्धां त्या भक्ताला परमात्म्याशीं आलाप करणें वगैरे दृष्ट फल आहे असें समजावें.

२३ ' मोक्ष प्राप्त होतोंपर्यंत ओंकाराचें म्ह. विष्णूचें ध्यान करावें ' अशी श्रुति आहे. ' मोक्ष प्राप्त होतोंपर्यंत त्या (परमात्म्या-) ची नित्य उपासना करावी, मुक्त देखील त्याची उपासना करतात ' असें सौपर्ण श्रुतिमध्यें सांगितलेलें दृष्टीस पडतें.

२४ विद्येच्या योगानें परमात्मा संतुष्ट होऊन उपासकांचीं पातकें दूर करतो असा अभिप्राय आहे.

२५ पुष्टिमार्गांतील भक्ताला कसें फळ मिळतें तें पूर्वी सांगितलें. आतां येथून चार सूत्रांनीं मर्यादामार्गांतील भक्ताला कसें फल मिळतें त्यासंबंधीं विचार केला आहे.

१४ इतरस्याप्येवमसंश्लेषः पाते तु। १५ अनारब्धकार्ये एव तु पूर्वे तदवधेः॥

१४ इतराचे देखील अशा रीतीनें अश्लेष आणि नाश होतात. (आणि अशा रीतीनें शरीर) पडतांच (मुक्ति मिळते).(१०)

१५ परंतु ज्यांचीं कार्यें उत्पन्न झालीं नाहींत अशाच मागील (कर्मांचा नाश होतो). कारण (श्रुतीनें) त्याची अवधी नियमित केली आहे. (११)

१६ परंतु अग्निहोत्र वगैरे (कर्मं) त्या (ज्ञाना-) चेंच कार्य उत्पन्न करितात. कारण (श्रुतींत) तसें (सांगितलेलें) दृष्टीस पडतें.

१४ इतराचा[२६] देखील अशा रीतीनेंच अश्लेष होतो. परंतु (शरीर) पडल्यानंतर (नाश होतो). (८)

१५ परंतु ज्यांचीं कार्यें उत्पन्न झालीं नाहींत, अशाच मागील (कर्मांचा नाश होतो). कारण (श्रुतीनें) त्याची अवधी नियमित केली आहे. (९)

१६ परंतु अग्निहोत्र वगैरे (कर्मं) त्या (विद्यारूपी) कार्याकरितां केलीं पाहिजेत. कारण (श्रुतींत[३]) तसें (सांगितलेलें) दृष्टीस पडतें.

---

२६ ज्याप्रमाणें ज्ञानी मनुष्याच्या पातकाचा नाश होतो त्याप्रमाणें त्याच्या पुण्याचाही नाश होतोच; परंतु त्याचें शरीर आहे तोंपर्यंत पुण्याचा नाश होत नाहीं. कारण त्यावेळीं त्याला उपासना करण्याकरतां वृष्टि, अन्न वगैरें इष्ट फळांची जरूर असल्यामुळें पुण्याची आवश्यकता आहे.

२७ मनुष्याचा कांहीं एका संगदोषामळें जो भगवद्भावापासून भ्रंश होतो त्याला पात म्हणतात.

२८ परमात्म्याशीं द्वेष करणाऱ्या अशा पापी मनुष्याला ज्या वेळीं कायमचा नरकपात प्राप्त होतो त्यावेळीं त्याच्या पुण्याचेही अश्लेष आणि नाश होतात. सूत्रांतील तु-शब्दाचा अनुत्थान (ज्यापासून उत्थान होत नाहीं. म्ह. कायमचा) असा अर्थ आहे. जो प्राणी थोड्या पातकामुळें कांहीं वेळ पर्यंत नरकांत राहून फिरून परत येतो त्याच्या मात्र पुण्याचा नाश होत नाहीं.

२९ सर्व जगाचें मूल कारण अशी जी परमात्म्याची इच्छा तिच्यामुळेंच प्रारब्ध कर्मांचा नाश होत नाहीं. आतां जर प्रारब्ध कर्मांचाही नाश व्हावा अशी परमात्म्याची इच्छा असेल तर तो होतोच. म्हणूनच पुष्टिमार्गांतील भक्तांच्या सर्व कर्मांचा नाश होतो असें समजावें.

१६ अग्निहोत्रादि तु तत्कार्यायैव तद्दर्शनात् ।

१४ इतराचे देखील अशा रीतीनें अश्लेष आणि नाश होतात. [30]पात झाला तरीही (पुढील कर्मांचा अश्लेषच होतो).	१४ [30]कायमचा (नरक-) पात प्राप्त झाला असतां इतराचे(म्ह. पुण्याचे) देखील अशा रीतीनें अश्लेष आणि नाश होतात.
१५ परंतु ज्यांचीं कार्यें उत्पन्न झालीं नाहींत अशाच मागील (कर्मांचा नाश होतो, इतरांचा होत नाहीं). ती ही गोष्ट मूळ कारणामुळें होते.	१५ आणि ज्यांचीं कार्यें उत्पन्न झालीं नाहींत, अशाच मागील (कर्मांचा नाश होतो). कारण (श्रुतीनें) त्याची अवधी सांगितली आहे.
१६ परंतु[31] (ज्ञानी मनुष्य) अग्निहोत्र वगैरे (जीं कर्में करितो तीं) त्याच कार्याकरतां करितो. कारण तसें दृष्टीस पडतें. (६)	१६ [32]ज्ञानी मनुष्याचीं अग्निहोत्र वगैरे (निष्काम कर्में) तेंच कार्य उत्पन्न करितात. कारण तसें (सांगितलेलें) दृष्टीस पडतें.

३० श्रुति (बृ. ४।४।२२) पहा. विद्या जरी उत्पन्न झाली असली तरी कर्मामुळें तिच्यामध्यें कांहीं विशेष मरणापर्यंत होत असतो.

३१ शं:—ज्ञानी मनुष्याच्या पुढील कर्मांचा अश्लेष होत असल्यामुळें त्यानें अग्निहोत्र वगैरे कर्में करूं नयेत. फक्त प्रारब्ध कर्मांच्या नाशाकरतां उपभोग मात्र घ्यावेत. उ:—ज्ञानी मनुष्य जीं अग्निहोत्र वगैरे कर्में करतो तीं त्याच कार्याकरतां म्ह. प्रारब्ध कर्मांचा नाश होण्याकरतांच करतो. म्हणून सनक वगैरे ज्ञानी मनुष्य अग्निहोत्र वगैरे कर्में करीत नाहींत, तर ‘ अग्निहोत्र वगैरे कर्में घडावींत ’ असेंच ज्याचें प्रारब्ध कर्म असेल तोच ज्ञानी तीं कर्में करतो. कारण त्याच्या या प्रारब्ध कर्मांचा त्यानें अग्निहोत्र वगैरे कर्में केल्याशिवाय नाशच होणार नाहीं. ‘ पूर्वीचें कर्म हें पुढील कर्मांचें कारण आहे ’ असें श्रुतीमध्यें (बृ. ४।४।५) सांगितलेलें दृष्टीस पडतें.

३२ ज्ञानप्राप्तीच्या पूर्वीच्या निष्काम कर्मांपासून ज्ञान प्राप्त होतें, आणि ज्ञानप्राप्तीच्या नंतरच्या निष्काम कर्मांपासून मोक्ष प्राप्त होतो, मुमुक्षु मनुष्याचें पुण्य ज्ञानाच्या द्वारानें मोक्षाच्या उपयोगीं पडतें, आणि ज्ञानी मनुष्याचें पुण्य मोक्षातिशयाला कारणीभूत होतें असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

१७ अतोऽन्यापि ह्येकेषामुभयोः[33] ।

१७ ह्याहून दुसरींही (चांगलीं कर्में आहेत. त्यांचाच) कांहीं (लोकांनीं) प्रयोग सांगितला आहे. (त्यांच्याबद्दल) दोघांचें- (हीं ऐकमत्य आहे). (१२)	१७ ह्याहून दुसरींही दोन प्रकारचीं[34] (चांगलीं कर्में आहेत. त्यांचाच) कांहीं (लोकां-) नीं प्रयोग सांगितला आहे.
१८ 'जें कांहीं विद्येच्या योगानें' ही श्रुति (असेंच सुचविते). (१३)	१८ 'जें[37] कांहीं विद्येच्या योगानें' ही श्रुति (फळप्राप्तीचा प्रति- बंध सुचविते). (१०)

३३ 'अतोऽन्यदपीत्येकेषामुभयोः' (म.)

३४ विद्याप्राप्तीच्या पूर्वीची आणि पुढची.

३५ पुष्टिमार्गांतील भक्तांच्या प्रारब्ध आणि संचित अशा दोन्ही तऱ्हेच्या कर्मांचा नाश होतो. नाश होतो म्हणजे तीं कर्में त्याच्या मित्राकडे आणि शत्रूकडे जातात. 'ज्ञानानें कर्मांचा नाश होतो' आणि 'प्रारब्ध कर्मांचा नाश होत नाहीं' ह्या श्रुतींहून निराळी अशी दुसरी श्रुति आहे:- 'ज्ञानी मनुष्याचें पुण्यकर्म त्याचे मित्र घेतात आणि पापकर्म त्याचे शत्रू घेतात' (शाठ्या.). आतां जर पूर्वीच्या श्रुतीवरून संचित कर्मांचा ज्ञानानें नाश होतो आणि प्रारब्ध कर्मांचा उपभोगानें नाश होतो असें मानावें तर पुढील श्रुतीमध्यें सांगितल्याप्रमाणें मित्र आणि शत्रु हे त्याचें कोणतें कर्म घेणार तें सांगतां येत नाहीं. तेव्हां ह्या पुढील श्रुतीवरून असें मानलें पाहिजे कीं, पुष्टिमार्गांतील भक्तांची संचित आणि प्रारब्ध अशीं दोन्हीं प्रकारचीं कर्में त्याच्या शत्रुमित्रांकडे जातात. पुष्टिमार्गांतील भक्त हा परमात्म्याला अत्यंत प्रिय असल्यामुळें त्या भक्ताला आपली प्राप्ति शीघ्र व्हावी अशी परमात्म्याला उत्कंठा होते; परंतु 'प्रारब्ध कर्मांचा भोगाशिवाय नाश होत नाहीं' असा परमात्म्यानेंच घालून दिलेला नियम त्याच्या उत्कंठेच्या आड येतो. कारण भोग होतोंपर्यंत परमात्म्याला भक्ताला आपली प्राप्ति करून देतां येत नाहीं. म्हणून परमात्म्यानें अशी तोड काढली कीं, भक्ताच्या प्रारब्ध कर्मांचा नाश न करतां फक्त तें कर्म भक्तापासून दूर करून भक्ताला मोकळा करून आपली प्राप्ति शीघ्र करून द्यावी, आणि तें प्रारब्ध कर्म त्याच्या शत्रुमित्राकडे वांटून देऊन त्यांच्याकडून भोग

१८ यदेव विद्ययेति हि ।

१७ कांहीं[३५] (लोकां-) च्या दोन्ही (कर्मां-) चा (नाश होतो). कारण ह्या (श्रुती-) हून अन्य तऱ्हेचीही (श्रुति) आहे.

१७ ह्याहून[३६] अन्य (असें पुण्य) देखील (ज्ञानी मनुष्याचें नष्ट होतें. कारण) दोघांचा-(ही त्याग होतो असें) कांहीं लोक (पठण करितात).

१८ 'जें कांहीं[३८] विद्येच्या योगानें' ही श्रुति तर (प्रकरणावरून उद्गीथोपासनेविषयीं आहे).

१८ 'जें कांहीं विद्येच्या योगानें' ही श्रुति (ज्ञानी मनुष्याचें पुण्य मोक्षोपयोगी आहे असें सुचविते[३९]).

घेऊन ह्या प्रारब्ध कर्मांचा नाश करावा.

३६ पूर्वसूत्रामध्यें निष्काम कर्मांपासून उत्पन्न झालेल्या पुण्याबद्दल विचार केला. तेव्हां येथें ह्याहून अन्य म्हणजे सकाम कर्मांपासून उत्पन्न झालेलें पुण्य. दोघांचा म्ह. पुण्यपापांचा. 'ज्ञानी मनुष्याचें पुण्य त्याचे मित्र घेतात आणि पाप त्याचे शत्रू घेतात' (शाट्या.) ह्या श्रुतीवरून ज्ञानी मनुष्याच्या पुण्यपापांचा त्याग होतो हें सिद्ध होतें.

३७ शं:--ज्ञानी मनुष्याचें जें पुण्यकर्म त्याचे मित्र घेतात तें संचित कर्मच होय. कारण प्रारब्ध कर्मांचा उपभोगाशिवाय नाश होत नाहीं. परंतु संचित कर्म संभवत नाहीं. कारण कर्म केलें कीं लागलींच त्यांच्या फलाच्या उपभोगाला आरंभ झाला पाहिजे. उ:- 'जें कांहीं विद्येच्या योगानें कर्म केलें जातें तें अधिक प्रबल होतें (म्ह. त्याचें फल तत्काल मिळतें)' (छां. १।१।१०) ह्या श्रुतीवरून विद्यारहित कर्मांचें फल तत्काल मिळत नाहीं असें सूचित होतें. तेव्हां संचित कर्म संभवत असल्यामुळें पूर्वीचा दोष येत नाहीं.

३८ 'जें कांहीं विद्येच्या योगानें' ह्या श्रुतीमध्यें 'ज्ञानपूर्वक केलेल्या कर्मांमध्यें अतिशय सामर्थ्य असतें' असें जें सांगितलें आहे तें संभवत नाहीं. कारण 'ज्ञान प्राप्त झाल्यानंतर त्याचा पुढील कर्मांशीं मुळींच संबंध होत नाहीं' असें पूर्वी सांगितलें आहे अशी जी शंका येते तिचें हें उत्तर दिलें आहे.

३९ कारण ज्ञानी मनुष्यानें थोडेंसें जरी निष्काम कर्म केलें तरी ज्ञानपूर्वक केलें असल्यामुळें अनंत फल देणारें होतें.

१९ भोगेन त्वितरे क्षपयित्वा संपद्यते ॥ चतुर्थाध्याये प्रथमः पादः ॥

१९ दुसऱ्या (पुण्यपापां-) चा उपभोगाच्या योगानें नाश करून-(च मुमुक्षू हा ब्रह्मा- प्रत) प्राप्त होतो. (१४)	१९ दुसऱ्या (पुण्यपापां-) चा उपभोगाच्या योगानें नाश करून नंतर (मुमुक्षु) मुक्त होतो. (११)

अध्याय ४ पाद २

१ वाणी मनामध्यें (लय पावते). कारण असें दृष्टीस पडतें; आणि श्रुतिही (अशीच) आहे.	१ वाणी मनामध्यें (लय पावते). कारण असें दृष्टीस पडतें; आणि श्रुतिही (अशीच) आहे.

४० ' त्वाऽथ सं ' (रा. व. म.).

४१ ज्या शरीरामध्यें मनुष्याला ज्ञान प्राप्त झालें तें शरीर पडल्याबरोबरच तो मुक्त होतो असें समजूं नये. तर प्रारब्ध कर्मांचा उपभोग घेण्याला काय जे एक दोन दाहा जन्म लागतील तितके जन्म घेऊन नंतर तो मुक्त होतो असें या सूत्राचें तात्पर्य आहे.

४२ पुष्टिमार्गांतील भक्ताला मोक्ष प्राप्त होतेवेळीं त्याचीं स्थूल शरीर आणि लिंग-शरीर अशीं दोन्हीं शरीरें नष्ट होतात, व त्याला परमात्म्याच्या कृपेनें अलौकिक शरीर प्राप्त होतें, आणि तो सर्व प्रकारचे सुखोपभोग घेतो असें समजावें.

४३ दुसऱ्यांचा म्ह. ज्यांच्या फळभोगाला आरंभ झालेला आहे अशा पुण्यपापांचा. ह्याप्रमाणेंच महापापी मनुष्य हा उपभोगाच्या योगानें पुण्याचा नाश करून नरकाप्रत प्राप्त होतो असें समजावें.

१ शं:-मरणसमयीं वाणीच्या वृत्तींचा मनामध्यें लय होतो, वाणीचा होत नाहीं. कारण वाणीची उत्पत्ति मनापासून होत नसल्यामळें ' तिचा मनामध्यें लय होतो ' असें

१ वाङ्मनसि दर्शनाच्छब्दाच्च ।

१९ दुसऱ्यां[४३] (शरीरां-) चा नाश करून (अलौकिक शरीर प्राप्त झाल्या-) नंतर (भक्त हा) भोगानें युक्त होतो. (७)	१९ दुसऱ्यांचा उपभोगाच्या योगानें नाश करून नंतर (मुमुक्षु हा ब्रह्मप्रत) प्राप्त होतो[४३]. (८)

अध्याय ४ पाद २

१ (परमात्म्याच्या[२]) दर्शनानें आणि (त्याच्या) शब्दा- (च्या श्रवणा-) नें वाणी मनाशीं (संयुक्त होऊन ब्रह्मानंदाचा अनुभव घेते).	१ वाणी मनामध्यें (लय पावते). कारण असें दृष्टीस पडतें; आणि श्रुतिही (अशीच) आहे.

म्हणतां येत नाहीं. उ:--वाणीचाच मनामध्यें लय होतो. कारण मरणकाळीं मनाचे व्यापार बंद होण्यापूर्वीच वागिंद्रिय नाहींसें होतें असा अनुभव येतो. आतां जरी 'वाणीच्या वृत्तीचा लय होतो' असें मानलें असतांही हा अनुभव विरुद्ध होत नाहीं, तरी 'वाणीचा मनामध्यें लय होतो' (छां. ६।८।६) ही श्रुति विरुद्ध होतेच. आतां जरी वाणीची उत्पत्ति मनापासून होत नाहीं तरी हरकत नाहीं. कारण वाणीचा मनामध्यें लय होतो म्हणजे वाणी ही मनाशीं संयुक्त होते, तिचा खरोखर लय होत नाहीं.

२ भक्तीच्या अतिशयामुळें जेव्हां भक्ताला परमात्म्याचें दर्शन होतें किंवा त्याच्या मुरली वगैरेंचा शब्द ऐकूं येतो त्या वेळीं त्या भक्ताचें मन तर तदेकाग्र होऊन ब्रह्मानंदाचा अनुभव घेत असतेंच. परंतु वाणी वगैरे इतर इंद्रियें सुद्धां आपआपले व्यापार सोडून मनाशीं संयुक्त होऊन त्याच्या द्वारानें ब्रह्मानंदाचा अनुभव घेतात.

३ मनाची अभिमानी जी रुद्र देवता म्ह. शेष आणि सुपर्ण तीमध्यें वाणीची अभिमानी जी उमा देवता म्ह. वारुणी आणि सुपर्णी ती लीन होते. कारण वाणी ही मनाच्या अधीन आहे असें दृष्टीस पडतें. आणि श्रुतीमध्यें (छां. ६।८।६) तसेंच सांगितलें आहे.

२ अत एव च सर्वाण्यनु । ३ तन्मनः प्राण उत्तरात् ।

२ म्हणूनच सर्व (इंद्रियें मनाच्या) पाठीमागून (जातात). (१)

३ तें मन प्राणामध्यें (लय पावतें) असें पुढील (वाक्या-) वरून (समजतें). (२)

४ तो (प्राण) अध्यक्षामध्यें (लय पावतो). कारण त्याप्रत प्राप्त होतात वगैरे (गोष्टी सांगितल्या) आहेत.

५ (प्राणासह अध्यक्ष महा-)

२ म्हणूनच सर्व (इंद्रियें वाणीच्या) मागून (मनामध्यें लीन होतात हें म्हणणें संभवतें). (१)

३ तें मन प्राणामध्यें (लय पावतें) असें पुढील (वाक्या-) वरून (समजतें). (२)

४ तो (प्राण) अध्यक्षामध्यें (लय पावतो). कारण त्याप्रत प्राप्त होतात वगैरे (गोष्टी सांगितल्या) आहेत. (३)

५ (प्राणासह अध्यक्ष सर्व)

४ 'लय होतो म्हणजे खरा लय होत नाहीं, तर फक्त मनाशीं संयोग होतो' असें मानलें म्हणूनच. कारण तेथेंही 'लीन होतात' याचा अर्थ 'संयुक्त होतात' असा घेतां येतो.

५ म्हणूनच म्हणजे श्रुतीमध्यें सांगितलें आहे म्हणूनच. 'अग्नीमध्यें सर्व देव लीन होतात, अग्नि इंद्रामध्यें लीन होतो, इंद्र उमेमध्यें लीन होतो, उमा रुद्रामध्यें लीन होते, याप्रमाणें इतर देव हे आपल्या अनुकूल अशा वस्तूमध्यें लीन होतात' असें गौपवन श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

६ येथेंही प्राणामध्यें म्ह. जलामध्यें मनाच्या वृत्तीचा लय होतो असें समजूं नये, तर मनाचा प्राणाशीं संयोग होतो असें समजावें.

७ तें म्हणजे सर्व इंद्रियांनीं संयुक्त असें. ज्याप्रमाणें एखाद्या पक्ष्याचा पाय दोरीनें बांधून त्याला सोडलें म्हणजे तो पक्षी चोहोंकडे हिंडून पुन्हां त्या बंधनांतच येऊन पडतो, त्याप्रमाणें मन हें जरी कांहीं वेळ परमात्म्याशीं एकाग्र झालें तरी तें फिरून आपल्या प्राणरूपी बंधनांतच येऊन पडतें. कारण 'हे सोम्या! प्राण हें मनाचें बंधन आहे' (छां. ६।८।२) असें श्रुतीमध्यें पुढें वाक्य आहे.

८ मनाची अभिमानी जी रुद्रदेवता ती प्राणामध्यें म्ह. चतुर्मुखामध्यें लीन होते. कारण 'वाणी मनामध्यें लीन होते' याच्या पुढें 'मन प्राणामध्यें लीन होतें' असें श्रुतीमध्यें (छां. ६।८।६) वाक्य आहे.

९ परमात्मा हा आपल्या अत्यंत भक्तांचा पुष्टिमार्गामध्यें अंगीकार करतो, त्यामुळें तो प्राण अध्यक्षाशीं म्ह. परमात्म्याशीं संयुक्त होतो. आणि ते भक्त मुक्त होतात. वगैरे शब्दानें परमात्म्याला अनुकूल वागणें वगैरे कारणें घ्यावींत. कांहीं अत्यंत भक्तांना

४ सोऽध्यक्षे तदुपगमादिभ्यः । ५ भूतेषु तच्छ्रुतेः ।

२ आणि म्हणूनच सर्व (इंद्रियें वाणीच्या) मागोमाग (मनाशीं संयुक्त होऊन ब्रम्हानंदाचा अनुभव घेतात).

३ ते मन प्राणाशीं (संयुक्त होतें असें) पुढील (वाक्या-) वरून (समजतें).

४ तसेंच अंगीकार करणें वगैरे (कारणां-) वरून तो (प्राण) अध्यक्षाशीं (संयुक्त होतो). (१)

५ ([12]मर्यादामार्गांतील लोकांच्या

२ आणि म्हणूनच सर्व (देवता आपआपल्याला) अनुकूल (अशा वस्तूंमध्यें लीन होतात). (१)

३ तें मन प्राणामध्यें (लय पावतें) असें पुढील (वाक्या-) वरून (समजतें). (२)

४ तो (प्राण) अध्यक्षामध्यें (लीन होतो). कारण त्याची प्राप्ति वगैरे (गोष्टी सांगितल्या) आहेत. (३)

५ ([13]इतर देव) भूतांमध्यें (लीन

जी साधनांवांचून मुक्त होण्याची इच्छा असते तो पुष्टिमार्गांतील प्रकार होय. आणि साधनांच्या क्रमानें जी मुक्त होण्याची इच्छा असते तो मर्यादामार्गांतील प्रकार होय. त्या मर्यादामार्गांतील लोक जेव्हां मुक्त होतात तेव्हां त्यांच्या वाणी वगैरे इंद्रियांचा भूतांमध्यें लय होतो असें पुढील सूत्रामध्यें सांगितलें आहे. कारण श्रुतीमध्यें (बृ. ३।२।१३) ह्यांनीं मनुष्याच्या इंद्रिय वगैरेंचा भूतांमध्यें लय सांगितला आहे. कारण ज्याप्रमाणें पुष्टिमार्गांतील लोकांना परमात्म्याचें प्रत्यक्ष दर्शन होतें त्याप्रमाणें मर्यादामार्गांतील लोकांना होत नाहीं, हा त्यांच्या मध्यें कमीपणा आहे.

१० प्राण हा परमात्म्यामध्यें लीन होतो. कारण 'प्राण हा परमात्म्यापत प्राप्त होतो, प्राणाची सर्व स्थिति परमात्म्यावरच अवलंबून आहे' असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

११ मरणानंतर जीवात्मा हा प्राणासहवर्तमान एकट्या तेजामध्येंच राहत नाहीं. तर सर्व भूतांमध्यें राहतो. कारण श्रुतीमध्यें (पृ. १४५८ पं. ४ पहा) तसें सांगितलें आहे.

१२ मागच्या सूत्रावरील टीप ९ पहा.

१३ 'अग्नीमध्यें सर्व देव लीन होतात' असें जरी गोपवन श्रुतीमध्यें सांगितलें आहे तरी त्यांचा एकट्या अग्नीमध्येंच लय होतो असें नाहीं, तर सर्व भूतांमध्यें होतो. कारण 'भूतांमध्यें देव लीन होतात' असें बृहच्छ्रुतीमध्यें सांगितलें आहे. त्या भूतांचा परमात्म्यामध्यें लय होतो. तो पृथ्वी आणि आकाश यांचा बृहस्पतीच्या द्वारानें परमात्म्यामध्यें लय होतो. वायूचा इंद्राच्या द्वारानें होतो आणि जलाचा सोमाच्या द्वारानें होतो. अग्नीचा पूर्वी सांगितलाच आहे.

६ नैकस्मिन्दर्शयतो हि ।

भूतांच्या ठिकाणीं राहतो. कारण श्रुति तसेंच सांगते.

भूतांच्या ठिकाणीं राहतो. कारण श्रुति तसेंच सांगते.

६ एकस्या (तेजा-) मध्येंच (जीव राहत) नाहीं. कारण (श्रुतिस्मृती असें) दाखवितात. (३)

६ (एक-) एकस्या (भूता-) मध्येंच (जीव राहतो असें) नाहीं. कारण (श्रुतिस्मृती असें) दाखवितात. (४)

७ मार्गाच्या आरंभापर्यंत (ही उत्क्रांति ज्ञानी आणि अज्ञानी अशा दोघांनाही) सारखीच आहे. ज्यानें (क्लेश) दग्ध केले नाहींत, त्याचें (हें) अमृतत्व आहे. (४)

७ मार्गाच्या आरंभापर्यंत (ही उत्क्रांति ज्ञानी आणि अज्ञानी अशा दोघांनाही) सारखीच आहे. (शरीर वगैरेशीं संबंध) दग्ध होण्यापूर्वीचें (हें) अमृतत्व आहे.

१४ 'जीव हा आरंभीं एका भूतामध्यें राहतो, नंतर तेथून निघून दुसऱ्या भूतामध्यें राहतो, अशा रीतीनें एक एकस्या भूतामध्यें' असें वरील श्रुतीचें तात्पर्य समजूं नये. कारण श्रुतीमध्यें त्रिवृत्करण सांगितलें आहे. आणि स्मृतीमध्येंही 'परस्परांचें मिश्रण झाल्याशिवाय एकएकटीं पंचमहाभूतें कोणतेंही कार्य करण्याला समर्थ होत नाहींत' असें सांगितलें आहे.

१५ 'प्राणोत्क्रमणाचे वेळीं वाणी वगैरे इंद्रियें आपआपल्या आश्रयांमध्यें लीन झालीं असतां त्यावेळीं जीव हा कोणाच्या आश्रयानें असतो?' असा आर्तभागऋषीनें प्रश्न विचारल्यानंतर याज्ञवल्क्यऋषीनें 'कर्माच्या आश्रयानें जीव असतो' असें (बृ. ३।२।१३) उत्तर दिलें आहे. त्या उत्तरांतील कर्म शब्दाला 'मर्यादामार्ग' असा अर्थ आहे. त्याठिकाणीं तो मर्यादामार्ग एकस्या भक्तालाच आहे किंवा एकस्या ज्ञान्यालाच आहे असा कांहींच नियम सांगितला नाहीं.

१६ महोपनिषद् आणि चतुर्दशशिखा या दोन श्रुतींमध्यें 'ऋभूंचा पृथ्वीमध्यें लय होतो' इत्यादि क्रमानें भिन्न भिन्न देवतांचा भिन्न भिन्न भूतामध्यें लय सांगितला

७ समाना[17] चासृत्युपक्रमादमृतत्वं चानुपोष्य ।

वाणी वगैरेंचा) भूतांमध्यें (लय होतो). कारण श्रुति तसेंच सांगते.

६ (मर्यादामार्ग[19] हा) एक-त्याला- (च आहे असा नियम) नाहीं. कारण (या-ज्ञवल्क्य आणि आर्तभाग हे असें) दाखवितात.(२)

७ संसाराच्या[18] आरंभापासून (मोक्षापर्यंत मर्यादामार्गांतील स्थिति) कायमच आहे, आणि (पुष्टिमार्गांतील लो-कांना) अमृतत्व देखील साधनांवाचून प्राप्त होतें हेंही कायमच आहे).

होतात). कारण श्रुति तसेंच सांगते. (४)

६ ऐक्या[16] (अग्नी-) मध्यें (सर्व देव लीन होत) नाहींत. कारण (श्रुती असें) दाखवितात. (५)

७ पुरुषाशीं तुल्य (अशी जी प्रकृति[20] ती पुरुषामध्यें लीन होत नाहीं. तिला) उपा-सना केल्यावांचून (म्ह. स्वाभाविकच) अमृतत्व प्राप्त झालें आहे, कारण (तिचा) संसाराशीं मुळींच संबंध नाहीं.

आहे. आतां तेथें ज्या देवतांचा अग्नीमध्यें लय सांगितला आहे त्या सर्व देवता ' अग्नी-मध्यें सर्व देव लीन होतात ' या गोपवन श्रुतींतील सर्व शब्दानें घ्याव्यात.

१७ ' समनाः ' (म.)

१८ शां. ' ज्ञानी मनुष्याला देह वगैरे असतांनाच अमृतत्व प्राप्त होतें ' असें श्रुतीमध्यें सांगितलें असल्यामुळें त्याची अज्ञान्यासारखी उत्क्रांति होत नाहीं. अमृतत्व म्हणजे सर्व बंधांतून मुक्त होणें. उ:—हें अमृतत्व निराळें आहे. ' पूर्वीच्या पातकांचा नाश होणें आणि पुढील पातकांशीं संबंध न होणें ' अशा प्रकारचें हें अमृतत्व ज्ञानी मनुष्याला देह वगैरे असतांनाच प्राप्त होतें.

१९ मर्यादामार्ग आणि पुष्टिमार्ग या दोन मार्गांचें स्वरूपच तसें असल्यामुळें पूर्वी सांगितल्याप्रमाणें त्यांचे विषय नियत आहेत असें समजावें.

२० प्रकृति म्ह. लक्ष्मी- मूळ संस्कृत सूत्रामध्यें ' असृत्युपक्रमात् ' असा पदच्छेद आहे. समना म्ह. पुरुषाशीं तुल्य. नृ म्ह. पुरुष. त्याच्याशीं सम म्ह. तुल्य.

८ तदापीतेः[२१] संसारव्यपदेशात् । ९ सूक्ष्मं[२५] प्रमाणतश्च तथोपलब्धेः ।

---

८ तें (तेज) मोक्षापर्यंत (राहतें). कारण (श्रुतीमध्यें) संसाराचा निर्देश केला आहे.

९. (तें तेज स्वरूपानें) आणि परिमाणानें सूक्ष्म (असलें पाहिजे). कारण तसें दृष्टीस पडतें.

१० म्हणूनच (स्थूल देहाच्या)

८ तें ([२२]अमृतत्व शरीर वगैरे धारण करणाऱ्याचेंच आहे). कारण मोक्षापर्यंत संसार असतो असा (श्रुतीमध्यें) निर्देश केला आहे.

९. ([२३]ज्ञानी मनुष्याला) सूक्ष्म (शरीर) असतें. कारण प्रमाणावरून तसें उपलब्ध होतें.

१० [२४]म्हणूनच ('ज्यावेळीं' ही

---

२१ 'तदपीते सं' 'तदपीतेः सं.' (म.)

२२ जर मोक्षप्राप्तीच्या पूर्वीं मध्येंच संसाराचा नाश झाला असता तर त्यावेळीं शरीररहित अशा आत्म्याचें तें अमृतत्व आहे असें म्हणतां आलें असतें.

२३ शं.:—पूर्वीं (१५ टी. मध्यें) श्रुतीमधील कर्म शब्दाला मर्यादामार्गी असा अर्थ केला आहे. परंतु श्रुतीनें मर्यादामार्गी या अर्थी कर्म शब्दाचा प्रयोग कां केला आहे. उ:– परमात्म्याच्या भजनपूजनापासून होणारा जो आनंद तो मर्यादामार्गातील मोक्षावस्थेमध्यें नसल्यामुळें तो मोक्ष संसार नसून संसारासारखाच आहे. हें सुचविण्याकरतां कर्म शब्दाचा प्रयोग केला आहे. कारण कर्म हें संसाराचें बीज आहे. म्हणूनच पुष्टिमार्गातील लोक तसल्या मोक्षाची सुद्धां इच्छा करीत नाहींत. तुकारामांनींही एका अभंगामध्यें 'नलगे मुक्ती धनसंपदा' असें म्हटलें आहे. हेंच पुष्टिमार्गातील मुख्य तत्व होय. हें तत्व सूक्ष्म असल्यामुळें ज्यांना समजत नाहीं ते लोक पुष्टिमार्गांत असून सुद्धां विशेष प्रकारच्या मोक्षाची इच्छा करतात. आतां तुकारामासारखे जे लोक मोक्षाची इच्छा करीत नाहींत ते नेहमीं ब्रह्मानंदामध्यें निमग्न असतात. 'ब्रह्माचा आनंद जाणणारा कशापासूनही भीत नाहीं' (तै. २।४।१) ह्या श्रुतीवरून हें सूक्ष्म तत्व सिद्ध होतें.

२४ 'जो परमात्म्यामध्यें लीन होतो तो मुक्त होतो आणि जो प्रकृतीमध्यें लीन होतो तो संसारांत पडतो' असें सौपर्णश्रुतीमध्यें सांगितलें आहे.

२५ 'सूक्ष्मं तु प्रमा' असाही मध्वाचार्यांचा पाठ आहे.

२६ देवयानमार्गानें जाणाऱ्या ज्ञानी मनुष्याचा चंद्राशीं संवाद श्रुतीमध्यें वर्णिला

१० नोपमर्देनातः ।

८ त्या ([26]पुष्टिमार्गांतील मोक्षावस्थेच्या) वेळीं (मर्यादामार्गांतील) मोक्षावस्थेला संसार असें म्हटलें असल्यामुळें (श्रुतीमध्यें मर्यादामार्गाला कर्म असें म्हटलें आहे).

९ ([27]पुष्टिमार्गांतील तत्व) सूक्ष्म आहे. कारण प्रमाणावरून तसें उपलब्ध होतें.

१० ([30]विरहावस्थेंमध्यें सर्व वस्तूंचा)

८ (त्या प्रकृतीचें पुरुषाशीं सर्वथा साम्य नाहीं.) कारण तिच्या ठिकाणीं लीन झाला असतां संसारा- (प्रत प्राप्त होतो असें) सांगितलें [29]आहे.

९ शिवाय (पुरुष हा प्रकृतीपेक्षां) सूक्ष्म (आहे) आणि परिमाणानें- (ही अधिक आहे). कारण तसें दृष्टीस[28] पडतें.

१० म्हणून[31] (पुरुषाच्या विशेष

असल्यामुळें त्यावेळीं त्याला सूक्ष्म शरीर आहे असें सिद्ध होतें. तात्पर्यः—अज्ञान्यासारखी ज्ञान्याची उत्क्रांति आहे.

२७ पूर्वसूत्रावरील टीप २३ पहा.

२८ 'ज्ञान, आनंद, ऐश्वर्य वगैरे गुणांच्या परिमाणानें पुरुष हा प्रकृतीपेक्षां अधिक आहे' असें चतुर श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

२९ 'ज्यावेळीं मनुष्याच्या हृदयांतील असलेल्या सर्व इच्छा सुटतात त्यावेळीं लागलीच त्याला अमृतत्व प्राप्त होतें' (का. ६।१४) ह्या श्रुतीमध्यें जें अमृतत्व सांगितलें आहे तें वर सांगितलेलेंच अमृतत्व होय, मोक्ष नव्हे. सूत्रकारांनीं सहज प्रसंग आल्यामुळें जीवन्मुक्तीचें खंडन करण्याकरतां मुद्दाम हें सूत्र केलें आहे. कारण इतर लोक ह्या वरील श्रुतीवरून जीवन्मुक्तीचें समर्थन करतात.

३० शं:—भक्त लोकांनीं इतरांना पुष्टिमार्गांतील मुख्य तत्त्वाचा उपदेश केलेला कोठेंही आढळत नाहीं याचें कारण काय ? उ:—भक्तांच्या पुढें जेव्हां परमात्म्यानें आपलें स्वरूप प्रकट केलें नसेल तेव्हां त्याच्या विरहामुळें सर्व वस्तूंचा उपमर्द होतो म्ह. सर्व वस्तू तिरोहित होतात. म्हणून त्यावेळीं उपदेश संभवत नाहीं. आणि जेव्हां परमात्म्यानें आपलें स्वरूप प्रकट केलें असेल तेव्हां तें समोर असल्यामुळें दुसरें कांहीं सुचत नाहीं.

३१ परमात्म्याचे जे ज्ञान वगैरे विशेष म्ह. असाधारण गुण ते जर प्रकृतीचे ठिकाणीं असते तर त्या परमात्म्याच्या गुणांचा असाधारणपणाच मुळीं नाहींसा होत असल्यामुळें अर्थातच त्या गुणांचा उपमर्द झाला असता. तात्पर्यः—नित्यत्व, मुक्तत्व वगैरे धर्मांनीं तिचें पुरुषाशीं साम्य आहे असें समजावें.

११ अस्यैव चोपपत्तेरेष ऊष्मा ।[32]

नाशानें (सूक्ष्म देह नाश पावत) नाहीं.

श्रुती बंधाच्या) नाशानें (प्राप्त होणारें अमृतत्व सांगत) नाहीं.

११ आणि या (सूक्ष्म देहा-) चीच ही उष्णता आहे. कारण (हीच गोष्ट) जुळते. (९)

११ आणि[33] त्या (सूक्ष्म देहाचें अस्तित्व आहे असें) म्हणतां येत असल्यामुळें (त्याची) उष्णता (उपलब्ध होते).

१२ निषेध केला असल्यावरून (ब्रह्मवेत्याचे प्राण देहांतून निघन जात नाहींत) असें म्हणाल तर नाहीं. कारण हा जीवापासून-(च्या उत्क्रांतीचा निषेध आहे).

१२ निषेध केला असल्यावरून (ब्रह्मवेत्याचे प्राण देहातून निघून जात नाहींत) असें म्हणशील तर नाहीं. कारण जीवापासून- (च्या उत्क्रांतीचा तो निषेध आहे). आणि कांहीं (शाखां-) मध्यें हें स्पष्टच (सांगितलें) आहे.[34]

३२ ' पत्तेरूष्मा ' (रा. व. स.)

३३ मरणसमयीं जी ज्ञानी मनुष्याच्या देखील शरीरामध्यें कांहीं ठिकाणीं उष्णता उपलब्ध होते, ती या सूक्ष्म देहाचीच होय. कारण सूक्ष्म देह हा स्थूल देहाच्या एका भागामध्येंच असूं शकतो. आणि स्थूल देहाची उष्णता ही सर्व शरीरभर असते (म. ना. उ. ११।११ पहा).

३४ ऊष्मा म्ह. विरहसंताप होय. परमात्म्याचें स्वरूप अंतर्हित झाल्यामुळें जो भक्ताला विरहसंताप होतो तो परमात्म्याचाच धर्म होय. कारण परमात्म्याचें स्वरूप ज्याला दृष्टीस पडलें असेल त्यालाच तो संताप होतो, नाहींतर होत नाहीं, व पुढें त्यालाच परमात्मप्राप्ति होते, असें परमात्म्याच्या स्वरूपाशीं याचे अन्वयव्यतिरेक जुळतात. तेव्हां ' पुष्टिमार्गांतील भक्तांना विरहसंताप संभवत नाहीं ' अशी शंका येथें घेऊं नये. आतां तो संताप रसस्वरूपच आहे असें समजावें.

३५ ' परब्रह्म हें ऊष्मावत् आहे आणि भक्तादि ऊष्मावत् आहे आणि नाहीं ' ह्या

१२ [36]प्रतिषेधादिति चेन्न शारीरात्।

उपमर्द होत असल्यामुळें (आणि संयोगावस्थेमध्यें) ह्या (परमात्म्याच्या स्वरूपा-) मुळें (उपदेश संभवत) नाहीं.

११ [34]भूमा हा ह्या (आनंदरस-स्वरुपी परमात्म्या-) चाच (धर्म होय). कारण (त्याला तो) संभवतो.

१२ निषेध केला [37]असल्यामुळें (भक्तांना दुःख होत नाहीं) असें म्हणशील तर नाहीं. कारण शरीराच्या संबंधानें (होणाऱ्या दुःखाचा तो निषेध केला आहे).

गुणांचा) उपमर्द न करितां (त्याच्याशीं प्रकृतीचें साम्य आहे).

११ [35]भूमा (सांगणाऱ्या श्रुतीव-रून) ह्याच (गोष्टी-) ची उपपत्ति होते.

१२ निषेध केला असल्यामुळें (प्रकृतीचें पुरुषाशीं मुळींच साम्य नाहीं) असें म्हणशील तर नाहीं. कारण (तो नि-षेध) जीवापेक्षां (केला आहे).

सौपर्णश्रुतीवरूनही ‘प्रकृतीचें पुरुषाशीं कांहीं अंशानें साम्य आहे’ हीच गोष्ट सिद्ध होते.

३६ ‘प्रतिषेधादिति चेन्न शारीरात्स्पष्टो ह्येकेषाम्’ असें ह्या दोन सूत्रांचें एकच सूत्र रामानुजाचार्यांच्या पाठामध्यें आहे.

३७ परमात्म्याला जो पाहतो त्याला मृत्यूपासून सुद्धां पीडा होत नाहीं असा श्रुतीमध्यें (छां. ७।२६।१) निषेध केला आहे.

३८ ‘परमात्मा हा असम आहे त्याचें दुसऱ्याशीं साम्य नाहीं’ असा जो चतुर्वेदशिखेमध्यें निषेध केला आहे त्याचा अर्थ ‘परमात्म्याचें जीवाशीं साम्य नाहीं’ असा आहे.

३९ ‘जो कामरहित वगैरे झाला आहे त्यापासून प्राणांचें उत्क्रमण होत नाहीं’ असें श्रुतीमध्यें (बृ. ४।४।६) स्पष्ट सांगितलें आहे. तेथें त्यापासून म्ह. कामरहित अशा जीवापासून. ब्रह्मवेत्याचें देखील अज्ञानी मनुष्यासारखेंच देहांतून प्राणांचें उत्क्रमण होतें हें रामानुजाचार्यांना संमत आहे.

१३ स्पष्टो ह्येकेषाम् । १४ स्मर्यते च ।

१३ (तुझें म्हणणें बरोबर नाहीं). कारण कांहीं (शाखां-) मध्यें (शरीरापासूनच्याच उत्क्रांतीचा) स्पष्ट (निषेध) आहे.	
१४ स्मृतीमध्येंही (असेंच) सांगितलें आहे. (६)	१३ स्मृतीमध्येंही (असेंच) सांगितलें आहे. (५)
१५ तीं (इंद्रियें वगैरे) परब्रह्मात (लय पावतात). कारण (श्रुति) असेंच सांगते. (७)	१४ तीं (तेज वगैरे भूतें[45]) परमात्म्यामध्यें- (च लीन होतात). कारण (श्रुति) असेंच सांगते. (६)
१६ (या कलांचें ब्रह्माशीं) पूर्ण ऐक्यच आहे. कारण (श्रुति असें) सांगते. (८)	१५ (या भूतांचें परमात्म्याशीं) ऐक्य होतें. कारण (श्रुति असें) सांगते. (७)

४० परमात्मा हा रसस्वरूपी आहे (तै. २।७।१) इत्यादि श्रुतीवरून प्रभूच्या स्वरूपाची प्राप्ति झाली असतां कर्मजन्यदुःख होत नाहीं असें समजतें.

४१ 'मत्स्य, कूर्म वगैरे अवतार हे परमात्म्याशीं सम आहेत, जीव हे परमात्म्याशीं असम आहेत आणि प्रकृतीही समासम आहे' असें माध्यंदिनांच्या शाखेमध्यें स्पष्टच सांगितलें आहे.

४२ 'ब्रह्मवेत्ता हा मस्तकांतील नाडींतून उत्क्रांत होऊन सूर्यमंडलाचा भेद करून ब्रह्मलोकाचें अतिक्रमण करून उत्कृष्ट गतीप्रत प्राप्त होतो' असें स्मृतीमध्यें सांगितलें आहे.

४३ 'ज्यांचें मन माझे ठिकाणीं आसक्त झालेलें आहे त्यांचें मी पोषण करतों, माझ्या वांचून ते लोक मोठ्या संकटानें प्राण धारण करतात' असें भागवतामध्यें (भाग. द. पू. ४६।६) प्रभूचें वचन आहे.

४४ माध्यंदिनांच्या शाखेप्रमाणेंच वाराह स्मृतीमध्यें सांगितलें आहे.

४५ तेज वगैरे भूतें म्ह. ज्ञानी जीवांशीं संयुक्त असलेलीं भूतें. वाणी मनामध्यें लीन होते, मन प्राणामध्यें, प्राण जीवामध्यें, जीव, तेज वगैरे भूतांमध्यें आणि तीं भूतें परमात्म्यामध्यें लीन होतात म्ह. संयुक्त होतात. कारण 'तेज हें परदेवतेमध्यें लीन होतें (छां. ६।८।६) असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे. त्यावेळीं प्रळयावस्थेप्रमाणें सुखदुःखोपभोग बिलकूल होत नाहीं.

४६ भक्तांच्या हृदयामध्यें आणि त्यांच्या डोळ्यापुढें परमात्म्याचा प्रकाश होणें,

१५ तानि परे तथा ह्याह। १६ अविभागो वचनात्।

१३ [४०]कांहीं (शाखां-)मध्यें तर (ही गोष्ट) स्पष्टच (सांगितली) आहे.	१३ कांहीं ([४३]शाखां-)मध्यें तर (ही गोष्ट) स्पष्टच (सांगितली) आहे.
१४ [४३]स्मृतीमध्येंही (असेंच) सांगितलें आहे.	१४ [४४]स्मृतीमध्येंही (असेंच) सांगितलें आहे. (६)
१५ [४६]त्या (सर्व गोष्टी) उत्कृष्ट अशा (गोकुला-) मध्यें (आहेत). कारण (श्रुति) असेंच सांगते. (३)	१५ तीं (देवतें[४७]) परमात्म्यात-(च लय पावतात). कारण (श्रुति) असेंच सांगते. (७)
१६ ([४९]भक्तांचा परमात्म्याशीं) वियोग होत नाहीं. कारण (श्रुति असेंच) सांगते. (४)	१६ (मुक्तांची इच्छा) निराळी नाहीं. कारण (तसें) सांगितलें आहे. (८)

त्याच्या विरहानें भक्तांना अत्यंत पीडा होणें आणि फिरून त्यांना दर्शन देऊन आनंदित करणें इत्यादि पूर्वी सांगितलेल्या गोष्टी जरी वैकुंठामध्यें सुद्धां होत नाहींत तरी त्या गोकुलामध्यें आहेत. वैकुंठापेक्षांही गोकुल हें परमात्म्याचें उत्कृष्ट स्थान होय. 'ज्या ठिकाणीं गाई वगैरे पुष्कळ आहेत अशा विष्णूच्या उत्कृष्ट स्थानांतील वस्तूंची आम्ही इच्छा करतो' असें जें ऋक्संहितेमध्यें (ऋ. सं. २।२।२४) वर्णन केलें आहे तें या गोकुलालाच लागू पडतें.

४७ 'देवांचा भूतांमध्यें लय होतो' असें पूर्वी (सू. ५) सांगितलें. परंतु शेवटीं त्यांचा परमात्म्यामध्यें लय होतोच; नाहींतर त्यांना मोक्षच प्राप्त होणार नाहीं. 'सर्व देव हे प्राणाच्या द्वारानें परमात्म्यामध्यें लीन होतात' असें कौषीतक श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

४८ परमात्म्याशीं ऐक्य होतें म्हणजे ऐक्य झाल्यासारखा त्यांचा संयोग होतो, कीं जो संयोग झाला असतां तीं भूतें पृथक् व्यवहार होण्याला योग्य असत नाहींत. श्रुतीमध्यें पूर्वीपासून तशाच संयोगाचें वर्णन चालू आहे.

४९ 'भक्त हे विष्णूच्या उत्कृष्ट स्थानाला नेहमीं पाहतात' (तै. सं. १।३।६) या श्रुतीमध्यें 'नेहमीं' असा शब्द घातला आहे. त्यावरून भक्तांचा परमात्म्याशीं वियोग होत नाहीं हें सिद्ध होतें.

५० 'परमात्म्याच्या इच्छेनेंच मुक्तांना इष्ट वस्तू प्राप्त होतात' असें श्रुतीवरून आणि ब्राह्मपुराणावरून सिद्ध होतें.

१७ तदोकोऽग्रज्वलनं तत्प्रकाशितद्वारो विद्यासामर्थ्यात्तच्छेषगत्यनुस्मृतियो-

१७ त्या (दोघांच्याही हृदयरूपी) स्थानाचें टोंक (जरी सारखेंच) प्रकाशित होतें, (आणि) त्या (प्रकाशा-) च्या योगानें (उत्क्रांतीचें) द्वार (जरी सारखेंच) प्रकाशित होतें, (तरी ज्ञानी मनुष्य मस्तकापासूनच निघतो असें) विद्येच्या सामर्थ्यावरून आणि त्या (विद्यां-) ना अंगभूत अशा मार्गाची उपासना सांगितली असल्यावरून (समजतें). तेव्हां हृदयांतील ब्रह्माच्या अनुग्रहानें (तो मस्तकांतील) शंभराहून अधिक अशा (नाडीच्या द्वारा) नें (निघून जातो असें सिद्ध होतें). (९)

१६ त्या (जीवा-) च्या (हृदयरूपी) स्थानाचें टोंक प्रकाशित होऊन त्याच्या योगानें (ज्याला उत्क्रांतीचें) द्वार प्रकाशित झालें आहे असा हृदयांतील (परमात्म्या-) नें अनुग्रह केलेला (ब्रह्मवेत्ता) विद्येच्या सामर्थ्यानें आणि त्या (विद्ये-) ला अंगभूत अशी जी (आपल्याला प्राप्त होणारी उत्कृष्ट) गति तिचें स्मरण झाल्यानें शंभराहून अधिक अशा (मस्तकांतील नाडीच्या द्वारा-) नें (निघून जातो). (८)

१८ (दोघेही) रश्मींचें अनुसरण करतात.

१७ (ज्ञानी रात्रीं मृत झाला तरी) रश्मीचें अनुसरण करतोच. (९)

५१ मर्यादामार्गांतील ज्ञानी मनुष्यांच्या उत्क्रांतीचा प्रकार येथून सूत्रकारांनीं सांगितला आहे. 'संन्यास' हीच विद्येची अंगभूत गति होय.

गाच्च हार्दानुगृहीतः शताधिकया । १८ रश्म्यनुसारी ।

१७ (ज्ञानी आणि अज्ञानी अशा) त्या (दोघांच्याही हृदयरूपी) स्थानाचें टोंक (जरी उत्क्रांतीचे वेळीं सारखेंच) प्रकाशित होतें आणि त्या (प्रकाशा-) च्या योगानें (उत्क्रांतीचें) द्वार (जरी सारखेंच) प्रकाशित होतें (तरी ज्यावर) विद्येच्या सामर्थ्यामुळें हृदयांतील (परमात्म्या-) नें अनुग्रह केला आहे असा (त्या दोहोंपैकीं ज्ञानी मनुष्यच) त्या (विद्ये-) ला अंगभूत अशा गतीमध्यें (जी परमात्म्याची) स्मृति तिच्या योगानें शंभराहून अधिक अशा (मस्तकांतील नाडीच्या द्वारा-) नें (निघून जातो). (९)

१७ (परमात्म्याच्या हृदयरूपी) त्या स्थानाचें टोंक प्रकाशित होऊन त्याच्या योगानें ज्याला (नाडीचें) द्वार प्रकाशित झालें आहे असा हृदयांतील (परमात्म्या-) नें अनुग्रह केलेला (ब्रह्मवेत्ता) विद्येच्या सामर्थ्यानें आणि त्या (विद्ये-) ला अंगभूत अशी जी (हृदयापासून ब्रह्मापर्यंत) गति तिचें स्मरण झाल्यानें शंभराहून अधिक अशा (मस्तकांतील नाडीच्या द्वारा-) नें (निघून जातो).

१८ (तो ज्ञानी मनुष्यच) रश्मीचें अनुसरण करतो.

१८ (आणि तेथून पुढें तो) रश्मीचें अनुसरण करतो.

५२ देवांना मोक्ष कसा प्राप्त होतो तें सांगितलें. आतां ज्ञानी मनुष्यांना मोक्ष कसा प्राप्त होतो तो प्रकार येथें सूत्रकारांनीं सांगितला आहे.

१९ [53]निशि नेति चेन्न संबन्धस्य यावद्देहभावित्वाद्दर्शयति च ।

चतुर्थाध्याये द्वितीयः पादः ॥

१९ रात्रीं (जीव रश्मींचें अनुसरण करीत) नाहीं असें म्हणशील तर नाहीं. कारण (नाडी आणि रश्मी यांचा) संबंध देह आहे तोंपर्यंत आहे. (श्रुति-) ही (असेंच) सांगते. (१०)

२० म्हणूनच दक्षिणायनामध्यें (मरणाऱ्या मनुष्याला) देखील (विद्येचें फल मिळतेंच).

२१ आणि स्मृतीनें योग्यासंबंधानें-(च कालविनियोग) केला आहे. आणि (तेथील सांख्य व योग) हे स्मृतींत सांगितलेलेच आहेत. (११)

१८ रात्रीं (मृत झालेल्या ज्ञानी मनुष्याला ब्रह्मप्राप्ति होत) नाहीं असें म्हणशील तर नाहीं. कारण देह आहे तोंपर्यंत- (च ज्ञानी मनुष्याचा कर्मांशीं) संबंध [54]असतो. (श्रुति-) ही (असेंच) सांगते. (१०)

१९ म्हणूनच दक्षिणायनामध्यें (मरणाऱ्या मनुष्याला) देखील (विद्येचें फल मिळतेंच).

२० [58]आणि योग्यासंबंधानें- (च त्यांना) स्मरण करण्यास योग्य अशा ह्या (दोन गति) स्मृतीमध्यें सांगितल्या आहेत. (११)

---

५३ ‘ निशि नेति चेन्न संबन्धात् ’, ‘ यावद्देहभावित्वाद्दर्शयति च ’ अशीं या एका सूत्राचीं दोन सूत्रें मध्वाचार्यांच्या पाठामध्यें आहेत.

५४ तेव्हां जरी कदाचित् रात्रीं देहपात झाला तरी त्याचक्षणीं त्याचा कर्मांशीं संबंध सुटल्यामुळें तो मुक्त होतो, संसारांत पडत नाहीं. श्रुतीमध्यें (छां. ६।१४।२) असेंच सांगितलें आहे, कीं ज्ञानी मनुष्याला मुक्त होण्याला काय तो देह पडेपर्यंतच अवकाश लागतो. आतां रात्रीं मरणाची जी निंदा केली आहे ती अज्ञानी मनुष्यांच्या संबंधानें समजावी.

५५ ज्ञानी मनुष्याला जरी रात्रीं मरण आलें तरी आमरणकालापर्यंत त्याचा संन्यास कायम असल्यामुळें आणि परमात्म्याचें स्मरण कायम असल्यामुळें त्याला विद्येनें फल मिळालेंच पाहिजे. ‘ त्याच्या ज्ञानानेंच मुनि होतो ’ (बृ. ४।४।२२) या श्रुतीमध्यें ज्ञान हेंच मोक्षाचें मुख्य साधन सांगितलें आहे.

५६ ‘ जोंपर्यंत शरीर आहे तोंपर्यंत नाडी आणि रश्मि यांचा वियोग होत नाहीं ’ असें माध्यंदिनांच्या शाखेमध्यें सांगितलें आहे.

५७ ‘ ज्ञानी मनुष्याला केव्हांही मरण येवो त्याला मोक्ष प्राप्त होतो ’ असें नारायणाध्यात्मामध्यें स्पष्टच सांगितलें आहे.

५८ ‘ प्रति स्मर्यैते ’ (रा. व.) ‘ प्रति स्मर्यंते ’ (म.)

२० अतश्चायनेऽपि दक्षिणे। २१ योगिनः प्रति च स्मर्यते स्मार्ते चैते॥

१९ रात्रौ (तो रश्मीचें अनुसरण करीत) नाहीं असें म्हणशील तर नाहीं. कारण देह आहे तोंपर्यंत (त्याचा विद्येला अंगभूत अशा गतीमधील परमात्म्याच्या स्मृतीशीं) संबंध आहे. (श्रुति-) ही (असेंच) सांगते.

२० म्हणूनच दक्षिणायनामध्यें सुद्धां (ज्ञानी मनुष्याचें उत्क्रमण पूर्वीं सांगितल्याप्रमाणें होतें).

२१ स्मृतीनें योग्यासंबंधानें-(च कालविनियोग) केला आहे. कारण (तेथील सांख्य व योग) हे स्मृतींत सांगितलेलेच आहेत. (६)

१९ रात्रौ (तो रश्मीचें अनुसरण करीत) नाहीं असें म्हणशील तर नाहीं. कारण (त्यावेळीं-ही नाडी आणि रश्मी यांचा) संबंध आहे.

२० ([५८]आणि तो संबंध) देह आहे तोंपर्यंत आहे. (श्रुति-) ही (असेंच) सांगते.

२१ [५९]म्हणून दक्षिणायनामध्यें (मरणाऱ्या ज्ञानी मनुष्याला) देखील (मोक्ष प्राप्त होतो). (९)

२२ (ह्या दोन[६०] गति) स्मृतीमध्यें योग्यांना अनुलक्षून सांगितल्या आहेत. आणि त्या स्मरणानें प्राप्त होण्याऱ्या आहेत. (१०)

५९ शं:--दक्षिणायन हें पितृयानमार्गामध्यें असल्यामुळें त्यामध्यें मृत झालेल्या मनुष्याला मोक्ष प्राप्त होणार नाहीं. कारण स्मृतीमध्यें 'देवयानमार्ग हा मोक्षप्राप्तीचा मार्ग आहे आणि पितृयानमार्ग हा फिरून संसारांत पडण्याचा मार्ग आहे' असें सांगितलें आहे. उ:--ह्या दोन मार्गांचें योगी लोकांनीं नेहमीं अनुसंधान करावें ह्या हेतूनें स्मृतीमध्यें हे दोन मार्ग सांगितले आहेत. कारण 'हे मार्ग जाणणाऱ्याला मोह होत नाहीं' असें गीतेमध्यें (भ. गी. ८।२७) सांगितलें आहे. तात्पर्य:--ज्ञानी मनुष्य जरी पितृयानमार्गानें चंद्रापर्यंत गेला तरी तेथून पुढें तो ब्रह्मापत प्राप्त होतो असें समजावें. शिवाय दक्षिणायन वगैरे शब्दांनीं ते ते काल न घेतां त्यांच्या अभिमानी देवताच घेतल्या आहेत, तेव्हां कांहीं दोष येत नाहीं.

६० 'देवयानमार्गानें ब्रह्मप्राप्ति होते आणि पितृयानमार्गानें चंद्रप्राप्ति होऊन फिरून संसार प्राप्त होतो' ह्या दोन प्रकारच्या गती मरणाच्या कालावर अवलंबून नाहींत, तर त्या योगावर अवलंबून आहेत. म्हणजे ज्ञानयोग्याला ब्रह्मप्राप्ति होते आणि कर्मयोग्याला चंद्रप्राप्ति होते. शिवाय मरण्याचे वेळीं पूर्व संस्काराप्रमाणें जसें ज्याला स्मरण होतें तशी त्याला गति प्राप्त होते. तात्पर्य:--ज्ञानी मनुष्य केव्हांही मृत झाला तरी त्याला ज्ञानयोगामुळें आणि मरणाचे वेळीं देवयानमार्गाच्या स्मरणामुळें ब्रह्मप्राप्ति होते असें सिद्ध झालें.

१ अर्चिरादिना तत्प्रथितेः।

अध्याय ४ पाद ३

१ (ब्रह्म प्राप्त करून घेणारा प्रत्येक जण) आर्चि वगैरे (मार्गा-) नें-(च जातो). कारण तो (मार्ग) प्रसिद्ध आहे. (१)	१ (ब्रह्म प्राप्त करून घेणारा प्रत्येक जण) आर्चि वगैरे (मार्गा-) नें-(च जातो). कारण तो (मार्ग) प्रसिद्ध आहे. (१)
२ संवत्सरापासून वायूप्रत (जा- तो असें) अविशेष आणि विशेष यांवरून (समजतें). (२)	२ संवत्सरापासून वायूप्रत (जा- तो असें) अविशेष आणि विशेष या (दोन प्रकारच्या निर्देशां-) वरून (समजतें). (२)

१ मर्यादामार्गांतील जो भक्त आहे तो अर्चि वगैरे मार्गानें जात नाहीं. ज्ञानी मनुष्यच ह्या मार्गानें जातो. कारण श्रुतिस्मृतींमध्यें तसें प्रसिद्ध आहे. श्रुतीमध्यें (छां. ५।१०।१) पंचाग्निविद्येच्या प्रकरणांत ' जे असें जाणतात ' असा उपक्रम करून अर्चि वगैरे मार्ग सांगितला आहे. स्मृतीमध्यें (भ. गी. ८।२४) सुद्धां हा मार्ग सांगून पुढें ' ब्रह्मवेत्ते लोक ह्या मार्गानें जातात ' असें सांगितलें आहे.

२ ' ज्ञानी मनुष्याचा अर्चिरादिमार्ग आहे आणि कर्म करणाऱ्यांचा धूमादि-मार्ग आहे, असे दोनच मार्ग प्रसिद्ध आहेत ' असें स्मृतीमध्यें सांगितलें आहे. तेव्हां ज्ञानी मनुष्याच्या मार्गाचा आरंभ वायूपासूनही होतो असें समजूं नये. कारण ज्ञानी मनुष्याचे मार्ग दोन नाहींत.

३ ' वायुशब्दा ' (म.)

४ देवयानमार्गाचे जे अर्चि वगैरे टप्पे आहेत त्यांपैकीं मास आणि आदित्य यांच्या मध्यें संवत्सर आहे असें छांदोग्यामध्यें (५।१०।१) सांगितलें आहे. आणि बृहदारण्यकामध्यें (बृ. ६।२।१५) देवलोक सांगितला आहे, ह्या दोघांपैकीं संवत्सर हा मासाप्रमाणें काळ असल्यामुळें मासापुढें अगोदर संवत्सर, नंतर देवलोक आणि नंतर आदित्य असा क्रम आहे. परंतु श्रुतीमध्यें दुसरीकडे (बृ. ५।१०।१) आदित्याच्या पूर्वी वायु सांगितला आहे. तेव्हां आदित्याच्या पूर्वी संवत्सरानंतर देवलोक घ्यावा किंवा वायु घ्यावा असा संशय येतो; म्हणून येथें सूत्रकारांनीं संवत्सरापुढें वायूच घ्यावा असें सांगितलें आहे. कारण देवलोक शब्दाचा वायु हाच अर्थ आहे. बृहदारण्यकामध्यें एका ठि-

२ वायुमब्दादविशेषविशेषाभ्याम् ।

अध्याय ४ पाद ३

१ (ज्ञानी मनुष्यच) आर्चि वगैरे (मार्गा-) नें (जातो). कारण तसेंच प्रसिद्ध आहे.	१ (ज्ञानी मनुष्याचा जाण्याचा मार्ग) अर्चीला आरंभ करूनच आहे. कारण तसें प्रसिद्ध आहे. (१)
२ संवत्सरापासून वायूप्रत (जातो असें) अविशेष आणि विशेष यांवरून (समजतें).	२ (अर्चीपासून वायूप्रत जातो असें) अविशेष आणि विशेष अशा (दोन्ही) रीतीनें केलेल्या वायु शब्दा- (च्या निर्देशां-) वरून (समजतें). (२)

काणीं वायूला ' देवलोक ' या अविशेष म्ह. सामान्य शब्दानें निर्देश केला आहे. आणि दुसरे ठिकाणीं ' वायू ' या विशेष शब्दानें निर्देश केला आहे.

५ देवयानमार्गांने जे अर्चीपासून संवत्सरापर्यंत टप्पे ते भूलोकासंबंधीच असल्यामुळें सर्व सारखेच आहेत; त्यांमध्यें कांहीं विशेष नाहीं. म्हणून तेथपर्यंत वायु घालतां येत नाहीं. आता संवत्सरानंतर मात्र लागलींच म्ह. आदित्याच्या अगोदरच वायु घातला पाहिजे. कारण वायु हा अंतरिक्षलोकाचा अधिपति आहे व सूर्य हा द्युलोकाचा अधिपति आहे. आणि भूलोकांतून जातांना अगोदरच अंतरिक्ष लोक लागतो असा आदित्यापेक्षा वायूमध्यें विशेष आहे. आतां ज्याला वायुलोकांमध्यें उपभोग घ्यावयाचा नसेल तो तेथें न जातां एकदम पुढें जातो या अभिप्रायानें छांदोग्य श्रुतीमध्यें (छां. ४।१५।५) वायूचें नांव काढलें नाहीं.

६ ' तो (ज्ञानी) वायूप्रत जातो ' असा श्रुतींमध्यें वायु शब्दाचा अविशेष म्ह. सामान्य रूपानें निर्देश केला आहे. आतां पूर्व सूत्रांत सांगितल्याप्रमाणें मार्गाचा आरंभ अर्चीपासून होतो असें प्रसिद्ध असल्यामुळें जरी वायूच्या पूर्वी आर्चि घेतला तरी दिवस, शुक्लपक्ष वगैरे जे मार्गांतील इतर टप्पे ते वायूच्या पूर्वी घेण्याला कांहीं प्रमाण नाहीं. शिवाय ' ज्ञानी मनुष्य निघाला म्हणजे दुसऱ्यानदां वायूप्रत जातो आणि तेथून दिवस, शुक्लपक्ष यांत जातो ' असा श्रुतींमध्यें विशेष रीतीनें वायु शब्दाचा स्पष्ट निर्देश केला आहे. तेव्हां अर्ची पासून वायूप्रत जातो हें सिद्ध झालें.

३ तडितोऽधिवरुणः संबन्धात् । ४ आतिवाहिकास्तल्लिङ्गात् ।

३ विजेच्या पुढें वरुण आहे. कारण (वरुणाचा विजेशीं) संबंध आहे. (३)

४ (अर्चि वगैरे पदार्थ) आतिवाहिक आहेत. कारण त्या (गोष्टी-) चें चिन्ह आहे.

५ (मार्ग आणि त्या मार्गानें जाणारे असे) दोघेही ज्ञानरहित असल्यामुळें तें (म्ह. अर्चि वगैरे देवताच आतिवाहिक आहेत हें) सिद्ध होतें.

३ विजेच्या पुढे वरुण आहे. कारण (वरुणाचा विजेशीं) संबंध आहे. (३)

४ (अर्चि वगैरे पदार्थ) आतिवाहिक आहेत. कारण त्या (गोष्टी-) चें चिन्ह आहे.

७ ' तटितो ' (म.)

८ त्या सूत्रापुढें ' वरुणाच्चाधीन्द्रप्रजापती ' असें सूत्र वल्लभाचार्याच्या पाठामध्यें आहे.

९ शां. कौडिन्य श्रुतीमध्यें संवत्सराच्या पुढें वरुणलोक घातला आहे आणि गौपवन श्रुतीमध्यें संवत्सराच्या पुढें वीज घातली आहे. तेव्हां संवत्सरानंतर अगोदर कोण आहे असा संशय येतो. उ. संवत्सरानंतर वीज आणि तिच्या पुढें वरुण आहे. कारण तडिल्लोकानें म्ह. विजेनें वरुणलोक धारण केला जातो असा श्रुतीमध्यें वरुणाचा विजेशीं संबंध सांगितला आहे.

१० कारण इंद्र हा सर्व दिक्पालांमध्यें श्रेष्ठ आहे; आणि प्रजापति हा सर्व देवांचा स्वामी आहे असा संबंध आहे. हा अर्चि वगैरे मार्ग जरी एकच आहे, तरी त्या-मार्गांतील सर्व लोकांमध्यें सर्व उपासक जात नाहींत. ज्याला ज्या लोकामध्यें उपभोग घ्यावयाचा असेल, तोच त्या लोकांत जातो; नाहींतर परभारेंच निघून जातो. म्हणूनच त्या मार्गांतील टप्पे श्रुतीमध्यें सर्व ठिकाणीं सारखे दाखविले नाहींत.

११ ' वाहिकस्त ' (म.)

१२ ' त्या ब्रह्मासंबंधी अमानुष पुरुष त्या देवयानमार्गांतील लोकांना विद्युल्लोकांतून ब्रह्माप्रत पोंचवितो ' असें श्रुतीमध्यें (छां. ४।१५।५) सांगितलें आहे. त्या चिन्हावरून मार्गस्थ लोकांना पोंचविणारे असे ब्रह्मसंबंधी आतिवाहिक म्ह. वाटाडे पुरुष अनेक आहेत असें सिद्ध होतें. तेव्हां ज्यांना विद्युल्लोकांतून वरुण वगैरेंच्या लोकांमध्यें

५ उभयव्यामोहात्तत्सिद्धेः[14]।

३ विजेच्या पुढें वरुण आहे. कारण (वरुणाचा विजेशीं) संबंध आहे.	३ विजेच्यां[11] पुढें वरुण आहे. कारण (वरुणाचा विजेशीं) संबंध आहे. (३)
४ वरुणाच्या पुढें इंद्र आणि प्रजापति हे आहेत[10]. (१)	
५ (अर्चिमार्गामध्यें[12] नियमानें) आतिवाहिक आहेत. कारण त्यांचें चिन्ह आहे.	४ (पूर्वी[13] सांगितलेला वायु) आतिवाहिक आहे. कारण त्या (गोष्टी-) चें चिन्ह आहे.
६ (ज्ञानी[15] आणि भक्त या) दोघांना मोह उत्पन्न होत असल्यामुळें ती (इच्छा) सिद्ध होते.	५ दोघांविषयीं[16] संशय आला असतां तो (म्ह. पूर्वी सांगितलेला वायु, आतिवाहिक आहे असें) सिद्ध होतें. (४)

उपभोगाकरतां जाणें असेल, त्यांना देखील प्रजापति लोकानंतर ते आतिवाहिक पुरुषच ब्रह्माप्रत पोंचवितात असें समजावें.

१३ आतिवाहिकनामक जो वायूचा पुत्र तो गौण वायु होय. आणि वायुदेवता ही मुख्य वायु होय. अर्चिमार्गामध्यें दोनदां वायु सांगितला आहे. एक अर्चीच्या पुढें आणि दुसरा अगदीं शेवटीं म्ह. ब्रह्माच्या अलीकडे. त्यांपैकीं अर्चीच्या पुढील जो वायु तो अगोदर सांगितला आहे. याच चिन्हावरून तो गौण म्ह. आतिवाहिक आहे असें सिद्ध होतें.

१४ हें सूत्र रामानुजाचार्याच्या पाठामध्यें मुळींच नाहीं.

१५ ' शं. ज्ञानी मनुष्य देवयानमार्गानें जातो ' असें म्हणतां येत नाहीं. कारण तो विरक्त असल्यामुळें त्याला त्या मार्गांतील अर्चि वगैरे लोकांमध्यें होणाऱ्या सुखोपभोगाची जरूर नाहीं. उ. परमेश्वर हा आपण उत्पन्न केलेल्या मार्गाचा उपयोग व्हावा म्हणून ज्ञानी मनुष्यांना मुद्दाम मोह उत्पन्न करतो. म्हणून त्यांना मध्यें त्या त्या लोकांतील सुखोपभोगाची इच्छा होते. तसेंच भक्तांना देखील तो मोह उत्पन्न करतो. म्हणून त्यांना देखील कदाचित् देवयानमार्गांतील सुखोपभोगाची इच्छा होण्याचा संभव आहे.

१६ पूर्वीचा आतिवाहिक आहे किंवा पुढचा आतिवाहिक आहे असा दोघांविषयीं संशय आला असतां पुढच्या वायूला ' द्युलोकाचा स्वामी ' असें विशेषण दिलें असल्यामुळें पूर्वीचाच आतिवाहिक आहे असें सिद्ध होतें. ब्रह्मतर्कामध्यें तर ' अर्चीच्या पुढें आतिवाहिक नांवाचा वायूचा पुत्र आहे असा स्पष्टच उल्लेख केला आहे.

६ वैद्युतेनैव ततस्तच्छ्रुतेः ।

६ तेथून (जीव हे) विजेमध्ये असणाऱ्या (पुरुषा-) नेंच (नेले जातात). कारण श्रुतींत तसें सांगितलें आहे. (४)

७ कार्य-(रूप ब्रह्मा-) प्रत (जीव नेले जातात असें) बादरि (म्हणतो). कारण या (ब्रह्मा-) संबंधानेंच गति संभवते.

८ (ब्रह्मासंबंधानें) विशेष गोष्टी सांगितल्या असल्यामुळेंही (कार्यरूप ब्रह्माप्रतच जीव नेले जातात).

५ तेथून (जीव हे) विजेमध्यें असणाऱ्या (पुरुषा-) नेंच (नेले जातात). कारण श्रुतींत तसें सांगितलें आहे. (४)

६ [११]कार्य-(रूप ब्रह्माचे उपासकच नेले जातात असें) बादरि (म्हणतो). कारण या (उपासका-) संबंधानेंच गति संभवते.

७ (ब्रह्मलोकासंबंधानें) विशेष गोष्टी सांगितल्या असल्यामुळेंही (कार्यरूप ब्रह्माचे उपासकच नेले जातात असें समजतें).

१७ विद्युल्लोकांतील पुरुष म्ह. विद्युल्लोकामध्यें राहणारा पुरुष नव्हे, तर ब्रह्माप्रत पोंचविण्याकरतां विद्युल्लोकामध्यें आलेला ब्रह्मसंबंधी पुरुष होय. असें मानलें नाहींतर 'विद्युल्लोकांत येऊन ब्रह्माप्रत पोंचवितो' (बृ. ६।२।१५) या श्रुतींतील 'येऊन' हा शब्द लागणार नाहीं. तेव्हां असें श्रुतीमध्यें सांगितलें असल्यामुळें ज्याला ज्या लोकांतून ब्रह्माकडे जाणें असेल त्याला तो ब्रह्मपुरुष त्या लोकांत येऊन ब्रह्माप्रत पोंचवितो असें सिद्ध होतें.

१८ दुसऱ्या वायूच्या पुढें लागलींच ब्रह्मप्राप्ति होते, मध्यें दुसरा कोणताही लोक नाहीं. कारण श्रुतीमध्यें (छां. ४।१५।६) त्या विजेमधील अमानुष पुरुष त्या मार्गांतील लोकांना ब्रह्माप्रत पोंचवितो असें सांगितलें आहे. विजेचा जो स्वामी वायू तोच विजेमधील अमानुष पुरुष होय. बृहत्तंत्रामध्यें असें स्पष्टच सांगितलें आहे.

७ कार्यं बादरिरस्य गत्युपपत्तेः । ८ विशेषितत्वाच्च ।

७ विद्युल्लोकांतील पुरुषानेंच (देवयानमार्गांतील लोक) त्या त्या (लोकां-) तून (ब्रह्माप्रत नेले जातात). कारण श्रुतींत तसें सांगितलें आहे. (२)

८ कार्य- (रूप ब्रह्मा-) प्रत (जीव नेले जातात असें) बादरि (म्हणतो). कारण (या ब्रह्मासंबंधानेंच) त्याची गति संभवते.

९ (ब्रह्मासंबंधानें) विशेष गोष्टी सांगितल्या असल्यामुळेंही (कार्यरूप ब्रह्मप्रतच जीव नेले जातात).

६ त्यां[१८] (दुसऱ्या वायू-) नंतर विजेचा स्वामी अशा (त्या वायू-) नेंच (ज्ञानी मनुष्य ब्रह्माप्रत नेले जातात). कारण श्रुतींत तसें सांगितलें आहे. (१)

७ कार्य-[२१] (रूप ब्रह्मा-) प्रत (जीव नेले जातात असें) बादरि (म्हणतो). कारण या (ब्रह्मा-) संबंधानेंच गति संभवते.

८ (ब्रह्मासंबंधानें) विशेष सांगितला असल्यामुळेंही[२२] (कार्यरूप ब्रह्माप्रतच जीव नेले जातात).

१९ येथून आठ सूत्रें पूर्वपक्ष्याच्या मताचीं आहेत, देवयानमार्गानें जे लोक नेले जातात ते ब्रह्मदेवाचे उपासक होत. कारण परब्रह्माचे उपासक जे लोक यांना फक्त अविद्यानिवृत्तीच कर्तव्य असल्यामुळें दुसरीकडे कोठें जावें लागत नाहीं. आणि ब्रह्मदेवाच्या उपासकांना त्याच्या लोकांमध्यें जावयाचें असतें, तेव्हां त्यांना गति संभवते.

२० येथून पाच सूत्रें पूर्वपक्ष्याचीं आहेत.

२१ जरी ज्ञानी मनुष्य असला तरी त्याचा संसारबंध ब्रह्मदेव आहे तोंपर्यंत नष्ट होत नसल्यामुळें त्याच्या पूर्वी परब्रह्मप्राप्ति संभवत नाहीं, म्हणून त्याची गति ब्रह्मदेवासंबंधानेंच संभवते. जरी ब्रह्मदृष्टि झाली तरी तो ब्रह्मदेवाच्या लोकामध्येंच जातो असें अध्यात्मामध्यें सांगितलें आहे.

२२ 'ज्ञानी मनुष्य चतुर्मुख ब्रह्माप्रत प्राप्त होतो' असा कौषीतक श्रुतीमध्यें स्पष्ट विशेष सांगितला आहे.

९ सामीप्यात्तु तद्व्यपदेशः। १० कार्यात्यये तदध्यक्षेण सहातः परमभिधानात्।

९ परंतु सामीप्यामुळें (अपर-ब्रह्माचा) तसा निर्देश होतो.

१० कार्य-(रूप ब्रह्मलोका-) चा प्रलय प्राप्त झाला असतां (जीव हे) त्या (लोकां-) च्या अध्यक्षासह तेथून पर-(ब्रह्मा-) प्रत (प्राप्त होतात). कारण (श्रुतींत असें) सांगितलें आहे.

११ स्मृतींत देखील असें सांगितलें असल्यामुळें (जीव हे अशा रीतीनेंच परब्रह्माप्रत प्राप्त होतात).

१२ (तो जीवांना) पर- (ब्रह्मा-) प्रतच (नेतो असें) जैमिनि म्हणतो. कारण (तो त्या शब्दाचा) मुख्य (अर्थ) आहे.

८ परंतु सामीप्यामुळें[२३] (कार्य ब्रह्माचा) तसा निर्देश होतो.

९ कार्य-(रूप ब्रह्मलोका-) चा प्रलय प्राप्त झाला असतां (उपासक हे) त्या (लोकां-) च्या अध्यक्षासह तेथून पर-(ब्रह्मा-) प्रत (प्राप्त होतात). कारण (श्रुतींत असें) सांगितलें[२४] आहे.

१० स्मृतींत देखील असें सांगितलें असल्यामुळें (जीव हे अशा रीतीनेंच परब्रह्माप्रत प्राप्त होतात).

११ पर- (ब्रह्माचे उपासकच आर्चि वगैरे मार्गानें जातात असें) जैमिनि म्हणतो. कारण (ब्रह्म शब्दाचा परब्रह्म हाच) मुख्य (अर्थ) आहे.

२३ ‘ देवयानमार्गाच्या शेवटीं त्या उपासकांना अमानव पुरुष ब्रह्माप्रत पोंचवितो’ असा श्रुतीमध्यें (छां. ४।१५।५) नपुंसकलिंगी ब्रह्म शब्दाचा निर्देश केला आहे, तेव्हां त्याचा ब्रह्मदेव हा अर्थ घेतां येत नाहीं अशी जी शंका येते तिचें उत्तर पूर्वपक्ष्यानें ह्या सूत्रामध्यें दिलें आहे. परब्रह्मापासून आरंभींच ब्रह्मदेव उत्पन्न झाला असल्यामुळें ब्रह्मदेवाचें परब्रह्माशीं सामीप्य आहे. म्हणून परब्रह्माचा वाचक जो नपुंसकलिंगी ब्रह्म शब्द तो ‘ ब्रह्मदेव ’ या अर्थी गौण रीतीनें घातला आहे असें समजावें.

२४ ‘ अपरब्रह्माच्या म्हणजे ब्रह्मदेवाच्या लोकांतून परब्रह्माकडे जातांना मध्यें दुसऱ्या कोणत्याही लोकामध्यें जावें लागत नाहीं ’ असें अपरब्रह्माचें परब्रह्माशीं सामीप्य आहे.

२५ शं. ब्रह्मवेत्ता हा जर कार्य ब्रह्माप्रत प्राप्त होतो तर श्रुतीमध्यें ‘ ब्रह्मवेत्ता परब्रह्माप्रत प्राप्त होतो ’ (तै. २।१।१) असा निर्देश कसा केला ? उ. कार्यब्रह्माची प्राप्ति

११ स्मृतेश्च । १२ परं जैमिनिर्मुख्यत्वात् ।

१० परंतु [२६]सामीप्यामुळें (अपर ब्रह्माचा) तसा निर्देश होतो.

११ कार्य- (रूप ब्रह्मलोका-) चा प्रलय झाला असतां (जीव हे) त्या (लोकां-) च्या अध्यक्षासह तेथून पर (ब्रह्मा-) प्रत (प्राप्त होतात). कारण (श्रुतींत असें) [२७]सांगितलें आहे.

१२ स्मृतींत देखील असें सांगितलें असल्यामुळें (जीव हे अशा रीतीनेंच परब्रह्माप्रत प्राप्त होतात).

१३ ([२९]तो जीवांना) पर (ब्रह्मा-) प्रतच (नेतो असें) जैमिनि म्हणतो. कारण (तो त्या शब्दाचा) मुख्य (अर्थ) आहे.

९ परंतु [२५]सामीप्यामुळें तसा निर्देश होतो.

१० कार्य-(रूप ब्रह्मलोका-) चा प्रलय प्राप्त झाला असतां (जीव हे) त्या (लोकां-) च्या अध्यक्षासह तेथून पर-(ब्रह्मा-) प्रत (प्राप्त होतात). कारण (श्रुतींत असें) [२८]सांगितलें आहे.

११ स्मृतींत देखील असें सांगितलें असल्यामुळें (जीव हे अशा रीतीनेंच परब्रह्माप्रत प्राप्त होतात).

१२ (तो जीवांना) पर-(ब्रह्मा-) प्रतच (नेतो असें) जैमिनि म्हणतो. कारण (तो त्या शब्दाचा) मुख्य (अर्थ) आहे.

झाली म्हणजे थोड्या वेळांतच परब्रह्माची प्राप्ति होते असें कार्य ब्रह्म आणि परब्रह्म यांचे सामीप्य असल्यामुळें तसा निर्देश केला आहे. तात्पर्य ब्रह्मवेत्ता हा आरंभीं कार्यब्रह्माप्रत प्राप्त होऊन नंतर परब्रह्माप्रत प्राप्त होतो असा या श्रुतीचा अर्थ आहे.

२६ ‘ अर्चिमार्गानें गेलेला मनुष्य फिरून परत फिरत नाहीं ’ असें जें श्रुतीमध्यें (बृ. ४।१५।५) सांगितलें आहे त्याचें तात्पर्य ते उपासक लोक ब्रह्मदेवाबरोबर परब्रह्माप्रत जातात असें समजावें. (म. ना. १२।३ पहा)

२७ ‘ ब्रह्मदेवाचें आयुष्य संपलें म्हणजे त्याच्या बरोबर त्याच्या लोकांतील सर्व जीव मुक्त होतात ’ असें श्रुतीमध्यें (मुं. ३।२।६) सांगितलें आहे.

२८ ‘ज्ञानी मनुष्य ब्रह्मदेवाप्रत प्राप्त होऊन नंतर प्रलयाचे वेळीं ब्रह्मदेवासहवर्तमान ते परब्रह्माप्रत जातात ’ असें सौपर्ण श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

२९ येथून तीन सूत्रें सिद्धांत्याचीं आहेत.

१३ दर्शनाच्च । १४ न च कार्ये [33]प्रतिपत्त्यभिसंधिः ।

१३ (श्रुतींत) सांगितलें असल्यामुळें (जीव परब्रह्माप्रतच जातात).	१२ ([32]श्रुतींत) सांगितलें असल्यामुळें (परब्रह्माचे उपासकच जातात).
१४ आणि प्राप्तीचा संकल्प हा कार्य (ब्रह्म-) ला अनुलक्षून नाहीं. (५)	१३ [34]आणि (ज्ञानी मनुष्याचा) संकल्प हा कार्य- (ब्रह्मा-) ला अनुलक्षून नाहीं.
१५ प्रतीकांचा आश्रय न करणा-	१४ प्रतीकांचा[37] आश्रय न करणा-

३० 'ज्ञानी मनुष्य ह्या शरीरांतून निघून परंज्योतीप्रत प्राप्त होतो' असें श्रुतीमध्यें (छां. ८।३।४) सांगितलें असल्यामुळें 'देवयानमार्गानें गेलेला मनुष्य परब्रह्माप्रत प्राप्त होतो' असें सिद्ध होतें.

३१ 'देवयानमार्गांतील मनुष्य ब्रह्मलोकाप्रत जातो' असें श्रुतीमध्यें (कौ. १।३) सांगितलें आहे. या श्रुतीमध्यें ब्रह्मलोकाच्या पूर्वी प्रजापतिलोकाचा निर्देश केला असल्यामुळें ब्रह्मलोक शब्दाचा अर्थ ब्रह्मदेवाचा लोक असा नाहीं.

३२ श्रवण, मनन वगैरे साधनांच्या योगानें ज्ञानी मनुष्यांना परब्रह्माचें प्रत्यक्ष दर्शन होतें, यावरून ज्ञानी लोक परब्रह्माप्रतच जातात हें सिद्ध होतें.

३३ 'प्रत्यभि' (रा.)

३४ 'ज्ञानी मनुष्य हा सर्वस्वरूपी होण्याविषयींचा संकल्प करीत असतो' असें श्रुतीवरून (छां. ८।१४।१) सिद्ध होत असल्यामुळें त्याचा संकल्प ब्रह्मदेवाला अनुलक्षून नसतो असें समजतें.

३५ 'भक्त हा ब्रह्मासहवर्तमान सर्व कामांचा उपभोग घेतो' असें तैत्तिरीय उपनिषदामध्यें (तै. २।१।१) सांगितलें आहे. तेथें ब्रह्म शब्दानें परब्रह्मच घेतलें पाहिजे. कारण तेथें 'परब्रह्माप्रत प्राप्त होतो' (तै. २।१।१) असा उपक्रम पूर्वी केला आहे (पुढील टीप ४० पहा). यावरून इतर ठिकाणीं देखील परब्रह्माच्या प्राप्तीविषयींच श्रुतीचा अभिप्राय असावा असें सिद्ध होतें.

३६ 'था च दोषा' (रा. म.)

३७ हें सूत्र सिद्धांत्याचें आहे. जे लोक नाम वगैरे इतर वस्तूंची ब्रह्माच्या दृष्टीनें उपासना करतात किंवा त्या वस्तूंचें जें स्वतःचें रूप त्या दृष्टीनें त्या वस्तूंची उपासना करतात ते प्रतीकांचा आश्रय करणारे लोक होत. त्यापेक्षां निराळे म्ह. जे लोक परब्रह्माची उपासना करतात किंवा परब्रह्मस्वरूपी जो प्रकृतिरहित आत्मा त्याची उपासना करतात,

१५ अप्रतीकालम्बनान्नयतीति बादरायण उभयथा[३६]ऽदोषात्तत्क्रतुश्च ।

१४ (श्रुतींत[३३]) सांगितलें असल्यामुळें (जीव परब्रह्माप्रतच जातात).

१५ आणि[३४] कार्य- (ब्रह्मा-) च्या प्राप्तीविषयीं (श्रुतीचा) अभिप्राय नाहीं. (३)

१६ प्रतीकांचा[३८] आश्रय न करणा-

१३ दर्शन[३२] होत असल्यावरूनही (ज्ञानी लोक परब्रह्माप्रत जातात असें समजतें).

१४ आणि (ज्ञानी मनुष्याला) कार्य- (ब्रह्मा-) ची उपासना नाहीं. (व त्याचा) संकल्प- (ही तसा) नाहीं.

१५ प्रतीकांचा[३९] आश्रय न करणा-

तेच लोक देवयानमार्गानें ब्रह्माप्रत जातात असें बादरायणाचें मत आहे. पूर्वींचे दोन्ही पक्ष बरोबर नाहींत. कारण बादरीच्या मतावर श्रुतींशीं विरोध हा दोष येतो (मागील टीप ३० पहा). तसेंच 'परब्रह्माचा जो उपासक तोच परब्रह्माप्रत जातो' या जैमिनीच्या मतावर देखील श्रुतींशीं विरोध हा दोष येतोच. कारण श्रुतीमध्यें (छां. ५।१०।१) पंचाग्निविद्येतील उपासकांनाही देवयानमार्ग सांगितला आहे. तात्पर्य ज्याचा परब्रह्माविषयींचा संकल्प असतो मग तो परब्रह्मोपासक असो, किंवा पंचाग्निविद्येप्रमाणें परब्रह्मरूपी जीवाचा उपासक असो, तो देवयानमार्गानें परब्रह्माप्रत जातो असें समजावें.

३८ उपास्यदेवता ही शुद्धब्रह्मस्वरूपी नाहीं असें समजून त्या देवतेच्या ठिकाणीं ब्रह्माची भावना करून उपासना करणारे जे लोक ते प्रतीकांचा आश्रय करणारे होत. त्यांचे हातून दोन्ही तऱ्हांनीं दोष घडतो. एक 'उपास्यदेवता ही शुद्धब्रह्मरूपी असूनही ती तशी नाहीं असें मानणें,' आणि दुसरा 'तिच्यावर ब्रह्माची भावना करणें'. यामुळें त्यांना ब्रह्मपुरुष ब्रह्माप्रत पोंचवीत नाहीं. उपास्यदेवता ही शुद्धब्रह्मरूपच आहे अशा समजुतीनेंच जे उपासना करतात त्यांनाच तो नेतो. तसेंच ब्रह्माचा संकल्प करणारे जे भक्त ते भक्तीच्या योगानें ब्रह्माप्रत जातात. त्यांना तर नेणाऱ्या ब्रह्मपुरुषाची देखील जरूर लागत नाहीं. मू. सं. सूत्रामध्यें 'दोषात्' असा पदच्छेद आहे, 'अदोषात्' असा नाहीं.

३९ प्रतीक म्ह. शरीर होय. आधिकारांच फक्त ज्यांची दृष्टि आहे, व्याप्त अशा रूपानें सर्व ठिकाणीं नाहीं, ते प्रतीकांचा आश्रय करणारे होत. तेव्हां व्याप्त अशा रूपानें दर्शन करण्याला जे अधिकारी देव, ऋषी वगैरे तेच परब्रह्माप्रत प्राप्त होतात असें बादरायणाचें मत आहे. हेंच सिद्धांतमत होय. कारण बादरि आणि जैमिनि या दोघांच्या पक्षांवर परस्परांनीं दोष दिले असल्यामुळें तीं दोन्हीं मतें ग्राह्य होत नाहींत. शिवाय श्रुतीवरून (बृ. ४।४।५) ब्रह्माचा संकल्प करणारा ब्रह्माप्रत प्राप्त होतो असें समजतें.

१६ विशेषं च दर्शयति ॥ चतुर्थोध्याये तृतीयः पादः ॥

त्यांना (तो) नेतो असें बादरायण म्हणतो. दोन्हीं तऱ्हा (मानिल्या) असतां दोष (येत) नाहीं. कारण त्या (ब्रह्मा-) चा जो संकल्प करितो तो (च ब्रह्माप्रत प्राप्त होतो).	त्यांना (अर्चि वगैरे) नेतात असें बादरायण म्हणतो. कारण दोन्हीं (पक्षां-) वर दोष येतो. (तेव्हां) त्या (ब्रह्मा-) चा जो संकल्प करतो तो (च ब्रम्हाप्रत प्राप्त होतो).
१६ आणि (श्रुति) विशेष (प्रकारचें फल) सांगते. (६)	१५ आणि (श्रुति) विशेष (प्रकारचें फल) सांगते. (५)

अध्याय ४ पाद ४

१ (जीव हा ब्रह्माशीं) एक होऊन (आत्मरूपानें) व्यक्त होतो. कारण (श्रुतीमध्यें) ' स्व ' शब्द आहे.	१ (जीव हा ब्रह्माप्रत) प्राप्त होऊन (आत्मरूपानें) व्यक्त होतो. कारण (श्रुतीमध्यें) ' स्व ' शब्द आहे.

४० तैत्तिरीयोपनिषदामध्यें असें म्हटलें आहे:-(मू. सं.) ब्रह्मविदाप्नोति परम्। तदेषाभ्युक्ता। सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म। यो वेद निहितं गुहायां परमे व्योमन्। सोऽश्नुते सर्वान्कामान्सह। ब्रह्मणा विपश्चितेति। (तै. २।१।१) याचा अर्थ:-ब्रह्मवेत्ता (ब्रह्माप्रत) प्राप्त होतो (आणि भक्त) परब्रह्माप्रत (प्रत्यक्ष पहातो), कारण (अनुभव घेणाऱ्या लोकांनीं) असें म्हटलें आहे:- सत्य, ज्ञान, आणि अनंत अशा ब्रह्माला जो जाणतो (तो ब्रह्माप्रत प्राप्त होतो, आणि जो ज्ञानी परमात्म्याच्या अनुग्रहानें विशेष भक्तिमान होतो तो भक्त आपल्या हृदयाकाशरूपी) गुहेमध्यें (प्रगट झालेलें जें वैकुंठरूपी) परम व्योम सामर्थ्य असलेल्या (परमात्म्याला प्रत्यक्ष पाहतो). तो ब्रह्मासहवर्तमान सर्व कामांचा उपभोग घेतो. तात्पर्य:-ब्रह्मप्राप्ति जरी दोघांना होत आहे तरी ज्ञानमार्गांतील लोकांना नुसती अक्षरब्रम्हप्राप्ति होते, आणि भक्तिमार्गांतील लोकांना परब्रह्मप्राप्ति होते, असा विशेष या श्रुतीनें दाखविला आहे असें समजावें. नाहीं तर परस्पर विरुद्ध अशा अनेक श्रुतींची एकवाक्यता होणार नाहीं. त्या श्रुती अशा:- ' ब्रह्मवेत्ता ब्रह्माप्रत प्राप्त होतो ' (तै. २।१।१) ह्या श्रुतीमध्यें ज्ञान हें ब्रह्मप्राप्तीचें साधन आहे असें सांगितलें आहे. ' हा आत्मा प्रवचन वगैरेंच्या योगानें प्राप्त होत नाहीं ' (का. २।२।३) इत्यादि श्रुतीमध्यें परमात्म्याची इच्छा नसेल तर ज्ञानानें सुद्धां तो प्राप्त

१ संपद्याविर्भावः स्वेन शब्दात् ।

त्यांना (तो) नेतो असें बादरायण म्हणतो. कारण दोन्ही तऱ्हांनीं दोष येतो आणि त्या (ब्रह्मा-) चा जो संकल्प करतो तोही (ब्रह्माप्रत प्राप्त होतो). (४)	त्यांना (तो परब्रह्माप्रत) नेतो असें बादराण म्हणतो. कारण (पूर्वी सांगितल्याप्रमाणें) दोन्ही (पक्षां-) वर दोष येतो. आणि त्या (ब्रह्मा-) चा जो संकल्प करतो तो (त्याप्रत प्राप्त होतो असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे).
१७ आणि (श्रुति) विशेष दाखविते. (५)	१६ आणि (श्रुति) विशेष दाखविते. (६)

अध्याय ४ पाद ४

१ (ब्रह्माप्रत) प्राप्त होऊन- (ही फिरून जीवाची) अभिव्यक्ति परमात्म्या-(च्या अनुग्रहा-) नें होते असें श्रुतीवरून (समजतें).	१ (ज्ञानी जीव हा ब्रह्माप्रत) प्राप्त होऊन (त्या ब्रह्माला) न सोडतां स्वतःच्या (रूपा-) नें (यथेच्छ उपभोग घेतो असें) श्रुतीवरून (समजतें). (१)

होत नाहीं असें सांगितलें आहे. ह्या दोन श्रुतींचा परस्पर विरोध आहे. तसेंच ‘ मुक्तांना दुसरें कांहींच दिसत नाहीं ’ (बृ. २।४।१४) आणि ‘ मुक्त हा सर्व कामांचा उपभोग घेतो ’ (तै. २।१।१) या श्रुतींमध्येंही विरोध येतो.

४१ मनुष्य हे बहिःप्रकाश आहेत, ऋषि हे अंतःप्रकाश आहेत, आणि देव हे सर्वप्रकाश आहेत असा चतुर्वेदशिखेमध्यें विशेष दाखविला आहे.

१ ‘ संपद्याऽविर्भाय स्वेन शब्दात् ’ (म.)

२ ज्ञानी मनुष्य ब्रह्मासहवर्तमान सर्व कामांचा उपभोग घेतो असें श्रुतीमध्यें (तै. २।१।१) सांगितलें आहे. आणि उपभोग हा शरीराशिवाय संभवत नाहीं. म्हणून परमात्मा हा आपल्या भक्तांना भजनानंद द्यावा अशा इच्छेनें त्यांच्यावर अनुग्रह करून ते ब्रह्माप्रत प्राप्त झाले असतांही फिरून त्यांना देहधारी अशा रूपानें व्यक्त करतो, असें या सूत्राचें तात्पर्य आहे. आतां मुक्त हा फिरून संसारांत पडत नाहीं असें जें श्रुतीमध्यें (छां. ८।१५।१) सांगितलें आहे, तें मर्यादामार्गांतील मुक्त झालेल्या जीवांविषयीं सांगितलें आहे असें समजावें. शिवाय परमात्म्याच्या लीलेनें भक्ताला प्राप्त झालेले हे उपभोग संसारांतील नव्हेतच.

३ सौपर्ण श्रुतीमध्यें असें सांगितलें आहे.

१ मुक्तः प्रतिज्ञानात् ।

२ (आतां तो) मुक्त होतो. कारण (श्रुतीनें तशी) प्रतिज्ञा केली आहे.

३ प्रकरणावरून (ज्योति म्हणजे) आत्मा (होय असें समजतें). (१)

४ (मुक्त जीव हा ब्रह्माशीं) अविभक्त (असा राहतो). कारण (श्रुतीमध्यें तसें) दृष्टीस पडतें. (२)

२ (त्यावेळीं तो देह वगैरपासून) मुक्त होतो. कारण (श्रुतीनें तशी) प्रतिज्ञा केली[४] आहे.

३ आत्मा हा (पापरहित वगैरे गुणांनीं युक्त आहे असें) प्रकरणावरून (समजतें). (१)

४ (मुक्त जीव हा) अविभक्तपणानें (ब्रह्माचा अनुभव घेतो). कारण (तसें) दृष्टीस पडतें. (२)

४ तात्पर्य:–' स्वरूपानें उत्पन्न होतो ' (छां. ८।३।४) या श्रुतीचा कर्माचा संबंध दूर झाल्यामुळें ' स्वतःच्या रूपानें व्यक्त होतो ' असा अर्थ समजावा.

५ ' ब्रह्मवेत्ता परब्रह्माप्रत प्राप्त होतो ' अशी श्रुतीनें (तै. २।१।१) मुक्तीबद्दलची प्रतिज्ञा पूर्वी करून पुढें तो ज्ञानी मनुष्य सर्व कामांचा उपभोग घेतो असें सांगितलें आहे. त्यावरून हा उपभोग घेणारा जरी देहधारी असला तरी तो मुक्तच आहे असें सिद्ध होतें.

६ ' जीव हा प्रत्येक दिवशीं सुप्त होऊन परमात्म्यामध्यें प्रवेश करतो, पण तो तेव्हां बद्ध असतो, त्या वेळीं तो कांहींच उपभोग घेत नाहीं, आणि मुक्त होऊन जेव्हां परमात्म्यामध्यें प्रविष्ट होतो तेव्हां तो सर्व कामांचा उपभोग घेतो ' असें बृहच्छ्रुतीमध्यें सांगितलें आहे. त्यावरून जीव हा त्यावेळीं जरी उपभोग घेतो तरी तो मुक्तच आहे असें सिद्ध होतें.

७ शं:–' जीव हा मोक्षावस्थेमध्यें आत्मरूपानें व्यक्त होतो ' असें म्हटलें तर ती अवस्था निद्रावस्थेसारखीच असल्यामुळें मोक्षाला पुरुषार्थ असें म्हणतां येणार नाहीं. उः–जीव हा मोक्षावस्थेमध्यें पापरहित वगैरे गुणांनीं युक्त अशा आत्मरूपानें व्यक्त होतो असें प्रकरणावरून समजतें. हाच निद्रावस्थेपेक्षां मोक्षावस्थेमध्यें विशेष आहे.

८ ' ज्ञानी मनुष्य ब्रह्मासहवर्तमान सर्व कामांचा उपभोग घेतो ' (तै. २।१।१)

३ आत्मा प्रकरणात्। ४ अविभागेन दृष्टत्वात्।

२ (तो अभिव्यक्त झालेला जीव) मुक्तच आहे. कारण (श्रुतीनें तशी) प्रतिज्ञा केली आहे.	२ (तो भोग घेणारा जीव) मुक्तच आहे. कारण (श्रुतीनें तशी) प्रतिज्ञा केली आहे. (२)
३ (ब्रह्म म्हणजे निर्गुण) परमात्मा होय असें प्रकरणावरून समजतें.	३ प्रकरणावरून (ज्योति म्हणजे) आत्मा (होय असें समजतें). (३)
४ (पुढील[10] श्रुति पूर्वींच्या श्रुतीशीं) विभक्त नाहीं. कारण (तसें) दृष्टीस पडतें. (१)	४ ([11]मुक्त जीवांचे भोग परमात्म्याच्या भोगाहून) विभक्त नाहींत. कारण (तसें) दृष्टीस पडतें. (४)

या श्रुतीमध्यें ब्रह्म शब्दाचा निर्गुण परब्रह्म असा अर्थ आहे. कारण 'परब्रह्माप्रत प्राप्त होतो' (तै. २।१।१) असें मागून परब्रह्माचेंच प्रकरण चालूं झालें आहे. तात्पर्य:—त्या अवस्थेमध्यें ज्ञानी मनुष्य जरी उपभोग घेत आहे, तरी ती मोक्षावस्थाच आहे असें समजावें. जर ब्रह्म शब्दाचा 'सगुण ब्रह्म' असा अर्थ असता, तर मात्र त्या अवस्थेला मोक्षावस्था असें म्हणतां आलें नसतें.

९ मोक्षावस्थेमध्यें जीवाला आत्म्याच्या खऱ्या स्वरूपाचें ज्ञान होतें. त्यामुळें त्या अवस्थेमध्यें 'मी परमात्म्यापेक्षां निराळा नाहीं त्याच्याच शरीराचा एक भाग आहे' असा त्याला अनुभव येतो असें या सूत्राचें तात्पर्य आहे.

१० 'ब्रह्मवेत्ता परब्रह्माप्रत प्राप्त होतो' (तै. २।१।१) ह्या श्रुतीमध्यें आरंभ केलेलें परब्रह्माचें प्रकरण 'ब्रह्मासहवर्तमान सर्व कामांचा उपभोग घेतो' (तै. २।१।१) ह्या श्रुतीच्या पूर्वींच संपलें आहे असें मात्र समजूं नये. कारण त्या दोन श्रुतींच्या मध्यें 'तें असें म्हटलें आहे' असें वाक्य दृष्टीस पडतें. तेव्हां अर्थातच त्या दोन श्रुतींचा संबंध आहे असें सिद्ध होत असल्यामुळें पुढील श्रुति पूर्वींच्या श्रुतींशीं विभक्त नाहीं हें सिद्ध होतें.

११ परमात्म्याचे भोग आणि मुक्तांचे भोग एकच आहेत. कारण 'मी जें ऐकतों जें पाहतों त्याचाच हे मुक्तलोक शरीरत्याग करून अनुभव घेतात' अशी चतुर्वेदशिखेमध्यें परमात्म्याची उक्ति आहे.

५ ब्राह्मेण जैमिनिरुपन्यासादिभ्यः । ६ चिति[14] तन्मात्रेण तदा[15]त्मकत्वा-

५ (जीव हा) ब्राह्म- (स्वरूपा-) नें (व्यक्त होतो असें) उपन्यास वगैरेंवरून जैमिनि म्हणतो.

६ (जीव हा) केवळ चैतन्य-रूपानें (व्यक्त होतो). कारण तें त्याचा आत्मा आहे असें औडुलोमि म्हणतो.

७ असें मानलें तरी उपन्यास (वगैरे-) वरून पूर्वीचें (रूपही आहे असें समजत) असल्यामुळें (कांहीं) विरोध येत नाहीं असें बादरायण म्हणतो. (३)

५ (जीव हा) ब्राह्म- (स्वरूपा-) नें (व्यक्त होतो असें) उपन्यास वगैरेंवरून जैमिनि म्हणतो.

६ (जीव हा) केवळ चैतन्य-रूपानें (व्यक्त होतो). कारण तें त्याचा आत्मा आहे असें औडुलोमि म्हणतो.

७ असें मानलें तरी उपन्यासावरून पूर्वीचें (रूपही आहे असें समजत) असल्यामुळें (कांहीं) विरोध येत नाहीं असें बादरायण म्हणतो. (३)

१२ पुष्टिमार्गांतील मुक्त जीव हा जेव्हां फिरून देहधारी होऊन उपभोग घेतो तेव्हां त्याचें शरीर परब्रह्मासारखेंच सच्चिदानंदस्वरूपीं असतें. इतर जीवांसारखें लौकिक असत नाहीं. कारण ब्रह्मवेत्ता परब्रह्माप्रत प्राप्त होतो असा पूर्वी श्रुतीमध्यें उपन्यास केला आहे. असें जैमिनीचें मत आहे.

१३ मुक्त जीव हा परमात्म्याच्या शरीरानेंच उपभोग घेतो. कारण 'ब्रह्मनिष्ठ हा ह्या मर्त्यशरीराचा त्याग करून ब्रह्माप्रत प्राप्त होऊन त्या ब्रह्माच्या योगानें पाहतो, ऐकतो, सर्व प्रकारचा अनुभव घेतो' असा माध्यंदिनायन श्रुतीमध्यें उपन्यास केला आहे. 'मुक्त जीव हा हरीच्या हातानें घेतो, हरीच्या दृष्टीनें पाहतो, हरीच्या पायानें जातो' असें स्मृतीमध्यें सांगितलें आहे. तात्पर्यः—मोक्षावस्थेमध्यें जीवाला स्वतंत्र देह नाहीं.

१४ 'चित्तिमात्रेण' (म.)

१५ 'दात्मत्वा' (व.)

१६ ब्रह्म हें चित्स्वरूप आहे असें बृहदारण्यक (४।५।१३) श्रुतीवरून समजतें. तात्पर्यः—मोक्षावस्थेमध्यें उपभोग घेतांना शरीर नसतें असें औडुलोमीचें मत आहे.

१७ 'जीव हा सर्व अचिद्वस्तूंचा त्याग करून जो केवळ चिद्रूप होतो तीच मोक्षावस्था होय' असें उद्दालक श्रुतीमध्यें सांगितलें आहे. तात्पर्यः— मोक्षावस्थेमध्यें जीवाला ज्ञानस्वरूपी स्वतंत्र देह आहे.

दित्यौडुलोमिः । ७ एवमप्युपन्यासात्पूर्वभावादविरोधं बादरायणः ।

५ (जीव[17] हा) ब्राह्म (शरीरा-) नें (उपभोग घेतो असें) उपन्यास वगैरेंवरून (सिद्ध होतें). जैमिनि देखील असेंच मानतो.

६ (जीव[18] हा) चित्स्वरूप (ब्रह्मा-) मध्यें केवल त्या (चित्स्वरूपा-) नेंच (उपभोग घेतो). कारण (जीवाचें स्वभावतः) तें (म्ह. चित् हें) स्वरूप आहे असें औडुलोमि म्हणतो.

७ (जीव[18] हा शरीरानेंच उपभोग घेतो.) कारण (श्रुतीमध्यें) असाही उपन्यास केला आहे, (आणि तें शरीर भोगाला योग्य असेंच) पूर्वीपासून असल्यामुळें विरोध येत नाहीं असें बादरायण म्हणतो.

५ (जीव[13] हा) ब्राह्म (शरीरा-) नें (उपभोग घेतो असें) उपन्यास वगैरेंवरून जैमिनि म्हणतो.

६ (जीव[17] हा) केवळ चित्स्वरूप (अशा शरीरा-) नेंच (उपभोग घेतो). कारण (तो) तत्स्वरूपच आहे असें औडुलोमि म्हणतो.

७ [19]असाही उपन्यास केला असल्यामुळें (आणि) पूर्वीचें (जैमिनिमतही प्रमाणसिद्ध) असल्यामुळें (दोन्ही मतांमध्यें) विरोध नाहीं असें बादरायण म्हणतो. (५)

१८ श्रुतीमध्यें ज्या ठिकाणीं ‘ जीव हा ब्रह्मासहवर्तमान सर्व कामांचा उपभोग घेतो ’ असें म्हटलें आहे तेथें ‘ तो आपल्या हृदयरूपी गुहेमध्यें परमात्म्याला प्रत्यक्ष पाहतो ’ असाही ‘ उपन्यास केला आहे. त्यावरून उपभोगाचे वेळीं शरीर असतें असें सिद्ध होतें. कारण शरीराशिवाय हृदयरूपी गुहा संभवत नाहीं. शं:-मुक्ताला नवीन प्राप्त झालेलें जें लौकिक शरीर त्याच्या योगानें त्या जीवाला ब्रह्मासहवर्तमान हवेतसे उपभोग कसे घेतां येतील? उ:—ज्या मुक्ताला जे उपभोग पुढें प्राप्त होणारे आहेत त्या भोगांना योग्य असेंच शरीर परमात्म्यानें पूर्वीपासूनच त्याला दिलेलें असतें, म्हणून कांहीं विरोध येत नाहीं असें बादरायणाचें मत आहे.

१९ सौपर्ण श्रुतीमध्यें जीव हा चित्स्वरूप आहे असा उपन्यास केला आहे. आणि पूर्वीं (टी. १३) सांगितल्याप्रमाणें जैमिनीचें मतही प्रमाणसिद्ध होत आहे. तेव्हां त्या दोन्ही गोष्टी खऱ्याच आहेत. तेव्हां त्या दोन्ही मतांमध्यें मुक्त जीवाला देह असणें आणि देह नसणें या मुद्यासंबंधानें जो विरोध भासतो तो बरोबर नाहीं, असें बादरायणाचें मत आहे. कारण ‘ मुक्त जीव हा सर्व अचित् वस्तूंचा त्याग करून केवल चित्स्वरूप होऊन परमात्म्यामध्यें प्रवेश करून त्याच्या शरीराच्या साहाय्यानें यथेच्छ उपभोग घेतो ’ अशा रीतीनें नारायणाध्यात्मामध्यें विरोधाचा परिहार केला आहे.

८ संकल्पादेव[२०] तु तच्छ्रुतेः । ९ अत एव चानन्याधिपतिः ।

८ संकल्पा- (च्या योगा-) नेंच (मुक्त लोक आपलीं कार्यें करून घेतात). कारण श्रुतींत तसें सांगितलें आहे.

९ याकारितांच (ज्ञानी जीवाला) दुसरा अधिपति नाहीं. (४)

१० (ज्ञानी जीवाला शरीर आणि इंद्रियें) नसतात असें बादरि म्हणतो. कारण (श्रुति) तसेंच सांगते.

८ संकल्पा- (च्या योगा- नेंच (मुक्त लोक आपलीं कार्यें करून घेतात). कारण श्रुतींत तसें सांगितलें आहे.

९ याकारितांच (ज्ञानी जीवाला) दुसरा अधिपति नाहीं. (४)

१० (ज्ञानी जीवाला शरीर आणि इंद्रियें) नसतात असें बादरि म्हणतो. कारण (श्रुति) तसेंच सांगते.

२० 'देव त' (रा.) 'देव च त' (व. म.)

२१ मोक्षावस्थेमध्यें मुक्तांना परब्रह्माच्या इच्छेला अनुसरून त्या ब्रह्मासहवर्तमान हवेतसे उपभोग प्राप्त होतात अशा प्रकाराची जी ब्रह्माची प्राप्ति ती सर्वांना होत नाहीं. तर ज्याला अशी परब्रह्मप्राप्ति करून देण्याविषयीं परमात्म्याचा संकल्प असतो त्यालाच ती परब्रह्मप्राप्ति होते. कारण 'हा परमात्मा ज्या भक्ताला वरतो म्ह. पुष्टिमार्गांत घेतो त्यालाच तो प्राप्त होतो आणि त्यालाच आपली तनू प्रकाशित करतो' असें श्रुतीमध्यें (का. २।२३) सांगितलें आहे.

२२ 'मुक्तानें संकल्प केल्याबरोबर त्याचे पितर त्याचे जवळ प्राप्त होतात' असें श्रुतीमध्यें (छां. ८।२।१) सांगितलें आहे, त्यावरून ही गोष्ट सिद्ध होते.

२३ ज्या भक्तांना मोक्षाचें साधन किंवा फल परमात्म्याशिवाय दुसरें कांहींच दिसत नाहीं त्यांचें स्वामित्व तो परमात्मा स्वतः करतो.

१० अभावं बादरिराह ह्येवम् ।

८ संकल्पा[२१]- (च्या योगा-)नेंच (कांहीं मुक्तांना अशी पर-ब्रह्मप्राप्ति होते). कारण श्रुतींत तसें सांगितलें आहे.	८ परंतु[२२] (मुक्तांना) संक-ल्पाच्या योगानेंच (यथेच्छ उपभोग घेतां येतात). का-रण श्रुतींत तसें सांगितलें आहे. (६)
९ आणि[२३] म्हणूनच ज्या (भक्तां-)ना दुसरा कोणी नाहीं त्यांचा (हा परमात्मा) अधिपति आहे.	९ थोंकरतांच[२४] (मुक्तांना) दु-सरा अधिपति नाहीं. (७)
१० (मुक्ताला[२५] शरीर वगैरे) नसतें असें बादरि म्हणतो. कारण (श्रुति) तसेंच सां-गते.	१० (मुक्ताला बाह्य शरीर) न-सतें असें बादरि म्हणतो. कारण (श्रुति) तसेंच सां[२७]-गते.

२४ ज्याप्रमाणें राजवाड्यामध्यें जाणाऱ्या मनुष्याचें एखादा क्षुद्र द्वारपाल सुद्धां नियमन करूं शकतो त्याप्रमाणें कोणीही क्षुद्र मनुष्य मुक्तांचें नियमन करूं शकत नाहीं. कारण मुक्त हे सत्यसंकल्प असल्यामुळें परमात्मा, आचार्य वगैरेंहून निराळा असा त्यांचा इतर कोणीही अधिपति नाहीं.

२५ ‘ शरीररहित अशा त्या आत्म्याला प्रिय आणि अप्रिय यांचा संबंध होत नाहीं ’ असें श्रुतीमध्यें (छां. ८।१२।१) सांगितलें आहे. त्यावरून त्याला शरीर वगैरे नाहीं असें सिद्ध होतें.

२६ ‘ ब्रह्मवेत्त्याला सर्व आत्मरूपच होतें, त्याला दुसरें कांहींच दिसत नाहीं ’ असें श्रुतीमध्यें (बृ. २।४।१४) सांगितलें असल्यामुळें त्याला भोगही नाहींत, आणि भोगाचें साधन जें शरीर वगैरे तेंही नाहीं असें बादरीचें मत आहे.

२७ ‘ मुक्त जीव हा शरीररहित असतो ’ असें कौठरव्य श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

११ भावं जैमिनिर्विकल्पामननात् ।

११ (त्याला शरीर आणि इंद्रियें) असतात असें जैमिनि म्हणतो. कारण (त्याच्या संबंधानें श्रुतीमध्यें) विकल्प सांगितला आहे.	११ (त्याला शरीर आणि इंद्रियें) असतात असें जैमिनि म्हणतो. कारण (त्याच्या संबंधानें श्रुतीमध्यें) विकल्प सांगितला[२९] आहे.
१२ याकरतां (त्याला) दोन्ही तऱ्हा आहेत, द्वादशाहाप्रमाणें हें होय असें बादरायण म्हणतो.	१२ ह्या (संकल्पाच्या योगा-) नेंच (त्याला) दोन्ही तऱ्हा आहेत. द्वादशाहाप्रमाणें हें होय असें बादरायण म्हणतो.
१३ जेव्हां शरीर नसतें तेव्हां स्वप्नांतल्याप्रमाणें (ही गोष्ट) जुळते.	१३ जेव्हां शरीर नसतें तेव्हां स्वप्नांतल्याप्रमाणें (ही गोष्ट) जुळते.

२८ 'त्याभ्नाना' (म.)

२९ 'ज्ञानी जीवाला शरीर नाहीं' असें ज्या श्रुतीवरून पूर्व सूत्रामध्यें सिद्ध केलें आहे त्या श्रुतीचा अभिप्राय 'कर्मामुळें प्राप्त होणारें शरीर त्याला नाहीं' असा आहे. तेव्हां त्या श्रुतीशीं विरोध नाहीं.

३० तैत्तिरीय श्रुतीमध्यें (२।१।१) ब्रह्मप्राप्तीविषयीं विकल्प म्ह. अनेक तऱ्हा सांगितल्या आहेत. मागें अ. ४ पा. ३ सूत्र १७ परिशिष्टांतील टीप ४० पहा. यावरून पुष्टिमार्गांतील मुक्तांना शरीर वगैरे असतें असें सिद्ध होतें.

३१ 'मुक्त हा ज्योतिस्वरूपानें नेहमीं आनंदित असतो, मग तें स्वरूप, चित्स्वरूप असो किंवा अचित्स्वरूप असो, नित्य असो किंवा अनित्य असो' असा औद्दालक श्रुतीमध्यें अचित्स्वरूप आणि अनित्य अशा स्थूल देहाविषयीं विकल्प सांगितला आहे.

३२ मुक्ताचें शरीर हें शरीरत्व या धर्मानें युक्त आहे आणि त्या धर्मानें रहित आहे असें दोन प्रकारचें आहे. कारण 'मुक्त हा सर्व कामांचा उपभोग घेतो' (तै. २।१।१) या श्रुतीवरून त्याचें शरीर भोगाचें साधन आहे असें सिद्ध होतें, या दृष्टीनें तें शरीरत्व या

१२ द्वादशाहवदुभयविधं बादरायणोऽतः । १३ त[३४]न्वभावे संध्यवदुपपत्तेः ।

११ (मुक्ताला शरीर वगैरे) असतें असें जैमिनि म्हणतो. कारण (श्रुतिमध्यें) विकल्प सांगि[३१]तला आहे.	११ (मुक्ताला बाह्य शरीरही) असतें असें जैमिनि म्हणतो. कारण (श्रुतीमध्यें) विकल्प सांगि[३१]तला आहे.
१२ (तें शरीर) द्वादशाहाप्रमाणें दोन[३२]प्रकारचें आहे. कारण (तशी श्रुति आहे असें) बादरायण म्हणतो. (२)	१२ (मुक्तांचे भोग) द्वादशाहाप्रमाणें दोन्ही [३३]प्रकारचे आहेत असें बादरायण म्हणतो. (आणि ही गोष्ट) या (कारणा-) वरून (बरोबर जुळते).
१३ परंतु[३५] (तें) नसून तें (दृष्टीस पडतें). स्वप्नांतल्याप्रमाणें (ही गोष्ट) जुळते.	१३ जेव्हां शरीर नसतें तेव्हां स्वप्नांतल्याप्रमाणें (ही गोष्ट) जुळते.

धर्मानें युक्त आहे असें म्हणतां येतें. कारण जें शरीर असतें तें भोगसाधन असतें असा साधारण नियम आहे. 'मुक्ताला हें सर्व आत्म्यापासूनच प्राप्त होतें' (छां. ७।२६।१) या श्रुतीवरून तें शरीर साक्षात् आत्म्यापासूनच प्राप्त होत असल्यामुळें तें आत्म्यासारखेंच अविकृत आहे आमच्यासारखें भौतिक नव्हे. या दृष्टीनें त्याला शरीरत्व या धर्मानें रहित असें म्हणतां येतें. कारण जें शरीर असतें तें भौतिक असतें असा साधारण नियम आहे.

३३ मुक्तांचे भोग बाह्य शरीराच्या योगानें प्राप्त होणारे आहेत आणि बाह्य शरीरावांचूनही प्राप्त होणारे आहेत असे दोन्ही प्रकारचे आहेत. जशी त्यांची इच्छा असेल तसे ते प्राप्त होतात. 'या कारणावरून' म्हणजे पुढील सूत्रामध्यें दाखविलेल्या कारणावरून.

३४ 'तत्त्वभावे' (व.)

३५ कृष्ण वगैरे अवतारांमध्यें जें परमात्म्यानें शरीर धारण केलें आहे तें आमच्या भौतिक शरीरासारखेंच लौकिक आहे असा भास होतो खरा; परंतु तें वास्तविक रीतीनें आमच्या भौतिक शरीरासारखें लौकिक नाहीं. आतां जो भास होतो तो स्वप्नाप्रमाणें मिथ्याभूत होय. असुर वगैरे अज्ञानी लोकांना मोह उत्पन्न करण्याकरतां परमात्म्यानें ती केवळ कला उत्पन्न केली आहे.

१४ भावे जाग्रद्वत्। १५ प्रदीपवदावेशस्तथा हि दर्शयति।

१४ जेव्हां (शरीर) असतें तेव्हां जागृतींतल्याप्रमाणें (ही गोष्ट जुळते). (५)	१४ जेव्हां (शरीर) असतें तेव्हां जागृतींतल्याप्रमाणें (ही गोष्ट जुळते).
१५ (जीव हा) दीपाप्रमाणें (सर्व शरीरामध्यें) शिरतो. कारण (श्रुति) तसेंच सांगते.	१५ (जीव हा) दीपाप्रमाणें (सर्व शरीरामध्यें) शिरतो. कारण (श्रुति) तसेंच सांगते.
१६ (मुक्त जीवाला विशेषप्रकारचें ज्ञान नाहीं असें) स्वा-	१६ (ज्ञान नसणें ही स्थिति) स्वाप्यय आणि मरण यांपैकीं

३६ पुष्टिमार्गांतील मुक्त झालेल्या भक्तांना जें परमात्म्याचें शरीर दृष्टीस पडतें ते मात्र जसें दृष्टीस पडतें तसेंच खरोखर आहे. परमात्म्यानें आपल्या लीलेनें भक्तांना सुख देण्याकरतांच तें उत्पन्न केलें आहे.

३७ ज्याप्रमाणें दीप हा आपल्या प्रभेच्या योगानें सर्व देशाला व्यापतो त्याप्रमाणें जीव हा अणु असूनही चैतन्याच्या योगानें सर्व शरीर व्यापतो. आणि यामुळें एका जीवाचा अनेक शरीरामध्येंही प्रवेश होण्यास हरकत नाहीं. 'जीव हा अणु आहे आणि ज्ञानाच्या योगानें अनेक शरीरामध्यें शिरतो' असें श्रुतीमध्यें (श्वे. ५।९) सांगितलें आहे.

३८ शं. भक्तांची ज्ञानशक्ति आणि क्रियाशक्ति परमात्म्यासारखी पूर्ण नसल्यामुळें त्यांना मोक्षावस्थेमध्यें यथेच्छ सुखोपभोग घेतां येणार नाहींत. उ. ज्याप्रमाणें दिव्याला दिवा लावतांना एक दिवा हा दुसऱ्या तेलवात वगैरे साधनांमध्यें शिरतो म्हणून त्या दुसऱ्या दिव्यामध्यें पहिल्या दिव्यासारखी शक्ति उत्पन्न होते, त्याप्रमाणें भक्तांचा पति जो परमात्मा तो भक्तांच्या शरीरामध्यें शिरतो म्हणून त्यांमध्यें परमात्म्यासारखी शक्ति उत्पन्न होते. परमात्मा हा जरी सर्वांचाच पति आहे तरी त्याचें भक्ताविषयीं विशेष प्रेम असतें. जसें पतीचें स्त्रीविषयीं प्रेम असतें तसेंच हें होय. 'एक देव हा अनेक प्रकारांनीं प्रविष्ट होतो' असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

३९ शं. जर मुक्तांना बाह्य शरीर असेल तर त्यांना अज्ञानी जीवाप्रमाणें दुःखही होईल. उ. ज्याप्रमाणें दीप हा मशाल वगैरेंमध्यें प्रवेश करून त्यांतील तेल वगैरेंचा उपभोग घेतो; परंतु त्यांतील काळेपणा मात्र घेत नाहीं, त्याप्रमाणें मुक्त जीव हा बाह्यशरीरामध्यें

१६ स्वाप्ययसंपत्त्योरन्यतरापेक्षमाविष्कृतं हि ।

१४ (तें) [३६]असून- (च दृष्टीस पडतें). जागृतींतल्याप्रमाणें (ही गोष्ट जुळते). (३)	१४ जेव्हां (शरीर) असतें तेव्हां जागृतींतल्याप्रमाणें (ही गोष्ट जुळते).
१५ ([३८]परमात्मा हा) दीपाप्रमाणें (भक्तांच्या शरीरामध्यें) शिरतो. कारण (श्रुति) तसेंच सांगते.	१५ ([३९]मुक्त जीव हा) दीपाप्रमाणें (त्या बाह्य शरीरामध्यें) शिरतो. कारण (श्रुति) तसेंच सांगते.
१६ [४१]स्वाप्यय आणि मोक्ष यांपैकीं एकाला अनुलक्षून (श्रुती-	१६ [४२]स्वाप्यय आणि मोक्ष यांपैकीं एकाला अनुलक्षून (श्रुती-

प्रवेश करून सुखाचा मात्र उपभोग घेतो; दुःखाचा उपभोग घेत नाहीं. कारण ‘ त्यावेळीं त्याचे सर्व शोक नाहींसे होतात ’ असें श्रुतीमध्यें (बृ ४।३।२२) सांगितलें आहे. ह्या श्रुतीमध्यें ‘ स्वर्गांतील जीवाची स्थिति वर्णिली आहे ’ असें मात्र समजूं नये. कारण पुढें श्रुतीमध्यें ‘ तो पुण्यपापरहित आहे ’ असें सांगितलें आहे. आणि स्वर्गांतील जीवाला पुण्य हें अवश्य असणारच. तेव्हां या पुढील श्रुतीवरून पूर्वींची श्रुति निद्रावस्थेला किंवा मोक्षावस्थेला अनुलक्षूनच आहे असें समजावें. हेंच पुढील सूत्राचें तात्पर्य आहे.

४० ‘ परमात्म्यानें आलिंगित असा जीव कांहींच जाणीत नाहीं ’ अशी जो स्थिति श्रुतीमध्यें (बृ. ४।३।२१) वर्णिली आहे, ती निद्रावस्थेला किंवा मरणावस्थेला अनुलक्षून वर्णिली आहे. मोक्षावस्थेला अनुलक्षून वर्णिली नाहीं. कारण ‘ मुक्त जीव हा दिव्यचक्षूच्या योगानें ब्रह्मलोकांतील सर्व पदार्थ पाहतो, तेथें रममाण होतो ’ असें श्रुतीमध्यें (छां. ८।१२।५) सांगितलें आहे. त्यावरून मुक्त जीव हा सर्व जाणतो असें स्पष्ट होतें.

४१ ‘ परब्रह्म हें कशाचा उपभोग घेत नाहीं आणि त्या परब्रह्माचा कोणी उपभोग घेत नाहीं ’ असें जें श्रुतीमध्यें (बृ. ३।८।८) सांगितलें आहे तें निद्रावस्थेला अनुलक्षून होय. आणि ‘ तो ब्रह्मासहवर्तमान सर्व कामांचा उपभोग घेतो ’ असें जें श्रुतीमध्यें (तै. २।१।१) सांगितलें आहे, तें मोक्षावस्थेला अनुलक्षून होय. अशा रीतीनें श्रुतीमध्यें परस्पर विरोध येत नाहीं असें समजावें.

४२ स्वाप्यय म्ह. निद्रा. पूर्वींच्या सूत्रावरील टीप ३९ पहा.

१७ जगद्व्यापारवर्जं[४३] प्रकरणादसंनिहितत्वाच्च ।

व्यय आणि ऐक्य यांपैकीं (कोणत्या तरी) एकाला अनुलक्षूनच (म्हटलें आहे). कारण (ही गोष्ट तेथेंच) स्पष्ट झालेली आहे. (६)

१७ (मुक्तांना) जगा-(संबंधी-)च्या व्यापाराखेरीज (बाकीचें ऐश्वर्य आहे असें समजतें). कारण (परमेश्वरच तेथें) प्रकृत आहे; आणि (इतर म्ह. मुक्त) जवळ नाहींत.

१८ प्रत्यक्ष सांगितलें असल्यावरून (मुक्तांचें ऐश्वर्य अमर्यादित

(कोणत्यातरी) एकाला अनुलक्षूनच (सांगितली आहे). कारण (मुक्त जीव सर्वज्ञ असतो ही गोष्ट श्रुतीमध्यें) स्पष्ट झालेली आहे. (५)

१७ (मुक्तांना) जगा-(संबंधी-)च्या व्यापाराखेरीज (बाकीचें ऐश्वर्य आहे असें समजतें). कारण (परमेश्वरच तेथें) प्रकृत आहे; आणि (इतर म्ह. मुक्त) जवळ नाहींत.

१८ प्रत्यक्ष[४६] सांगितलें असल्यावरून (मुक्तांचें ऐश्वर्य अमर्यादित

४३ ‘जगद्व्यापारवर्जम् । १८ प्रकरणादसंनिहितत्वाच्च ।’ (म.)

४४ मुक्तांना ब्रह्मासहवर्तमान यथेच्छ उपभोग प्राप्त होतात. परंतु आमच्या सारखें बोलणें, चालणें, पाहणें वगैरे लौकिक व्यापाराच्या योगानें प्राप्त होत नाहींत. कारण जर त्यांना आमच्यासारखे उपभोग प्राप्त होतील तर त्यांना मुक्तच म्हणतां येणार नाहीं. आणि ‘ब्रह्मवेत्ता परब्रह्माप्रत प्राप्त होतो’ (तै. २।१।१) असें मुक्तांचें प्रकरण चालू करून त्यांतच ‘ते यथेच्छ उपभोग घेतात’ असें सांगितलें आहे. शिवाय परमात्म्याची लीला ही काळ आणि माया यांच्या अधीन नाहीं. तेव्हां अर्थातच त्या लीलेच्या योगानें उपभोग घेणाऱ्या मुक्तांच्या दृष्टीनें काल आणि माया यांच्या अधीन असलेलें जग फार दूर असतें.

४५ जगाची उत्पत्ति करणें वगैरे जे व्यापार ते खेरीज करून बाकीचे सर्व काम मुक्त जीवांना प्राप्त होतात. ते व्यापार फक्त परमात्म्याचेच आहेत. ‘मुक्तांना सर्व काम प्राप्त होतात’ असें जें श्रुतीमध्यें (ऐ. ४।६) सांगितलें आहे, तेथें सर्व शब्दानें जगाची उत्पत्ति करणें वगैरे व्यापार खेरीज करून बाकीचेच काम घ्यावेत. कारण तेथें मागून जीवाचेंच प्रकरण चालू झालेलें आहे. आणि जगाची उत्पत्ति वगैरे करण्याचें सामर्थ्य जीवाच्या जवळ नाहीं.

४६ शं. ‘त्या मुक्ताचा सर्व लोकांमध्यें यथेच्छ संचार होतो’ असें श्रुतीमध्यें

१८ प्रत्यक्षोपदेशादिति चेन्नाधिकारिकमण्डलस्थोक्तेः ।

मध्यें तसें) वर्णन केलें आहे. (४)

मध्यें तसें वर्णन केलें आहे). कारण (ही गोष्ट पुढील श्रुतीवरून) स्पष्ट होत आहे. (८)

१७ (मुक्तांना) जगांतील (लौकिक) व्यापाराशिवाय (उपभोग प्राप्त होतात असें) प्रकरणावरून आणि (जग) जवळ नाहीं या कारणावरून (समजतें).

१७ (मुक्तांना) जगा-(संबंधी-)च्या व्यापाराखेरीज (बाकीचे काम प्राप्त होतात).

१८ [४६]प्रकरणावरून आणि (तें सामर्थ्य त्यांच्या) जवळ नाहीं यावरून (ही गोष्ट सिद्ध होते).

१८ [४७]प्रत्यक्ष सांगितलें असल्यामुळें (मुक्तांना जगांतील लौकिक

१९ [४८]प्रत्यक्ष सांगितलें असल्यावरून (मुक्तांच्या व्यापारा-

(छां. ७।२५।२) प्रत्यक्ष सांगितलें असल्यामुळें मुक्त जीवांचें ऐश्वर्य परमेश्वराप्रमाणें अमर्यादितच असलें पाहिजे. उ. आधिकारिक म्ह. अधिकारावर नेमलेले ब्रह्मदेव वगैरे, त्यांच्या मंडलामध्यें म्ह. लोकांमध्यें होणारे जे भोग ते वरील श्रुतीमध्यें सांगितले आहेत. जगाची उत्पत्ति वगैरे व्यापार सांगितले नाहींत.

४७ शं. ' मुक्तजीव सर्व वस्तू पाहतो ' असें श्रुतीमध्यें (छां. ७।२६।२) प्रत्यक्ष सांगितलें असल्यामुळें मुक्तांना लौकिक, अलौकिक सर्व प्रकारचे उपभोग प्राप्त झाले पाहिजेत. उ. श्रुतीमधील ' सर्व ' शब्दाचा जगांतील एकंदर सर्व वस्तू असा अर्थ नाहीं. तर आपआपल्या अधिकाराप्रमाणें ज्या वस्तू ज्या मुक्ताच्या उपभोगाला योग्य असतील त्या वस्तू तेथें ' सर्व ' शब्दानें सांगितल्या आहेत असें समजावें.

४८ शं. ' सर्व देव ह्याला बलि (म्ह. नजराणा) देतात ' (तै. १।५।३) असें श्रुतीमध्यें प्रत्यक्ष सांगितलें आहे. तेव्हां अर्थातच मुक्तांना जगाची उत्पत्ति वगैरे करणें अशक्य नाहीं. उ. परमात्म्यानें अधिकारावर नेमलेले जे इंद्र वगैरे देव त्यांच्या मंडलाचा अधिपति जो ब्रह्मदेव तो श्रुतीमधील ' ह्याला ' या शब्दानें घेतला आहे. कारण त्याचेंच प्रकरण चालू आहे. तेव्हां त्यालाच सर्व देव बलि देतात, मुक्तांना देत नाहींत. तात्पर्य:- 'मुक्तांच्या व्यापारांमध्यें जगाची उत्पत्ति वगैरे व्यापार घेतां येत नाहींत' असें सिद्ध झालें.

१९ । विकारावर्ति च तथा हि स्थितिमाह ।

आहे) असें म्हणशील तर नाहीं. कारण आधिकारिक आणि मंडलस्थ (असा परमेश्वर त्याला प्राप्त होतो) असें म्हटलें आहे.

१९ आणि कार्यामध्यें न राहणारें (असेंही परमेश्वराचें रूप आहे). कारण तशा रूपानें (परमेश्वर) राहतो असें (श्रुति) सांगते.

२० आणि प्रत्यक्ष आणि अनुमान असेंच दाखवितात.

आहे) असें म्हणशील तर नाहीं. कारण (तेथें) आधिकारिकांच्या मंडलामध्यें असलेले (भोग) सांगितले आहेत.

१९ आणि (मुक्त जीव हा) विकाररहित (आणि ऐश्वर्यानें युक्त अशा ब्रह्मा-) चाच (अनुभव घेतो). कारण (त्याची) तशी स्थिति (श्रुतीनें) सांगितली आहे.

२० शिवाय श्रुतिस्मृती असेंच दाखवितात.

४९ ' विकारावर्ति च तथ हि दर्शयति ' (म.)

५० शं. मुक्ताला जर भोग प्राप्त होत असतील तर ते भोग बद्ध जीवांच्या भोगासारखे विनाशी असले पाहिजेत. उ. मुक्त जीव हा बद्धासारखा उपभोग घेत नाहीं. तर तो ऐश्वर्यानें युक्त आणि विकार रहित अशा ब्रह्माचा अनुभव घेतो. आतां स्वर्ग वगैरे लोक या ब्रह्माच्या ऐश्वर्याच्या बाहेर नसल्यामुळें अर्थातच त्या लोकांतील भोग मुक्ताला प्राप्त होतात. मुक्तांची अशी स्थिति तैत्तिरीय उपनिषदामध्यें (२।७।१) सांगितली आहे.

५१ लीलेमध्यें भक्ताला प्रभूच्या सह वर्तमान जे उपभोग प्राप्त होतात ते लौकिक नव्हेत. प्रभूचें विलक्षण सामर्थ्य असल्यामुळें त्याच्या लीलेविषयीं लोकदृष्टीनें कोणतीही शंका घेऊं नये. ' परमात्म्याचे ठिकाणीं तर्क चालत नाहींत ' असें जें श्रुतीमध्यें (का. २।९) सांगितलें आहे तेथें हेंच दर्शविलें आहे. ' अनंत गुणांनीं युक्त अशा प्रभूच्या ठिकाणीं विरुद्ध कांहींच नाहीं ' असें जें स्मृतीमध्यें (भाग. ६।९।३६) सांगितलें आहे तेथें देखील हेंच दर्शविलें आहे.

५२ ' मुक्त लोक हे मनुष्याच्या संसाररूपी भोंवऱ्याला प्राप्त करीत नाहींत ' असें श्रुतीमध्यें (छां. ४।१५।६) सांगितलें आहे. तात्पर्यः-जगाची उत्पत्ति करणें वगैरे व्या-

२० दर्शयतश्चैवं प्रत्यक्षानुमाने ।[55]

व्यापार असतात) असें म्हणशील तर नाहीं. कारण (तेथें) अधिकारांत असलेल्या (वस्तू-) च्या समुदायामध्यें असलेले (पदार्थ) सांगितले आहेत.

१९ (भक्तांचे उपभोग हे) विकारामधले नव्हेत. कारण (श्रुतीनें) तशी स्थिति सांगितली आहे.

२० शिवाय श्रुतिस्मृती असेंच दाखवितात.

मध्यें जगाची उत्पत्ति वगैरे व्यापार सुद्धां घेतां येतात) असें म्हणशील तर नाहीं. कारण आधिकारिकाच्या मंडलामध्यें (मुख्यत्वानें) असलेला (जो ब्रह्मदेव तो तेथें) सांगितला आहे.

२० आणि (मुक्त हे) ज्याच्या योगानें (लोक) संसारांत फिरतात असा (जगाची उत्पत्ति करणें वगैरे व्यापार करीत नाहींत. श्रुति) असेंच दाखविते. (९)

२१ (मुक्तांची) स्थिति (एक प्रकारचीच आहे असें श्रुति) सांगते. आणि प्रत्यक्ष आणि अनुमान असेंच दाखवितात.

पार ईश्वराचेच आहेत मुक्तांचे नाहींत असें सिद्ध झालें. ह्या सूत्रामध्यें पूर्व सूत्रापासून ' नाहीं ' या शब्दाचा संबंध केला आहे.

५३ ' स्थितिमाह दर्शयतश्चैवं प्रत्यक्षानुमाने ' (म.)

५४ ' ह्या परमात्म्याच्या भीतीनें वारा वाहतो, सूर्य उगवतो ' (तै. २।८।१) इत्यादि श्रुति जगाची उत्पत्ति वगैरे व्यापार परमेश्वराचेच आहेत असें दाखविते. स्मृतीमध्यें (भ. गी. ९।१०) ' मी हें जग उत्पन्न करतों ' असें सांगितलें आहे.

५५ पूर्वसूत्रावरील टीप ५१ पहा.

५६ ' परमात्म्याप्रत प्राप्त झालेला हा (मुक्त) उत्पन्न होत नाहीं, मरत नाहीं, कमी होत नाहीं, ज्यास्ती होत नाहीं, सदा एक रूपानें स्थित असतो अशा त्या आत्मद्रव्याला कसलीही आपत्ति वगैरे येत नाहीं ' असें जाबाल श्रुतीमध्यें सांगितलें आहे. मोक्षधर्मामध्येंही असेंच सांगितलें आहे. ज्ञानी लोकांना प्रत्यक्ष अनुभवही असाच आहे. शिवाय ज्याअर्थी मुक्तांना इतर मनुष्यासारखा कमज्यास्तपणा प्राप्त होण्याचें कर्म वगैरे कांहीं कारण नाहीं त्याअर्थी त्यांची स्थिति बदलत नाहीं अशा अनुमानावरूनही ही गोष्ट सिद्ध होते.

२१ भोगमात्रसाम्यलिङ्गाच्च ।

२१ भोगाचेंच फक्त साम्य सांगितलें आहे या चिन्हावरून देखील (मुक्त जीवांचें ऐश्वर्य अमर्यादित नाहीं असें समजतें).	२१ भोगाचेंच फक्त साम्य सांगितलें आहे या चिन्हावरून देखील (मुक्त जीवांचें ऐश्वर्य अमर्यादित नाहीं असें समजतें).
२२ (ते) परत येत नाहींत असें श्रुतीवरून (समजतें, ते) परत येत नाहींत असें श्रुतीवरून (समजतें). (७)	२२ (ते) परंत येत नाहींत असें श्रुतविरून (समजतें, ते) परत येत नाहींत असें श्रुतीवरून (समजतें). (६)

५७ 'तो (ज्ञानी) ब्रह्मासहवर्तमान सर्व कामांचा उपभोग घेतो ' (तै. २।१।१) या श्रुतीमध्यें मुक्त जीव आणि परमात्मा यांचें फक्त भोगामध्येंच साम्य दाखविलें आहे. या चिन्हावरून ' जगाची उत्पत्ति वगैरे व्यापारांमध्यें त्यांचें साम्य नाहीं असें सिद्ध होतें.

५८ ' मुक्त लोक हे ब्रह्मासहवर्तमान सर्व कामांचा उपभोग घेतात ' (तै. २।१।१) या श्रुतीमध्यें जें भोगाचें साम्य सांगितलें आहे त्या चिन्हावरून ' ब्रह्मासहवर्तमान भोग घेणें ' हीच मुक्तांची उत्कृष्ट स्थिति आहे असें समजतें. यावरून अर्थातच परमात्म्याच्या स्वरूपाचें ज्ञान होऊन त्याच्या लीला प्राप्त होणें हेंच मुख्य फल आहे हें सिद्ध होतें.

अध्याय ४ पाद ४ समाप्त.

२२ अनावृत्तिः शब्दादनावृत्तिः शब्दात् ॥ चतुर्थाध्याये चतुर्थः पादः ॥

२१ भोगावेंच[58] साम्य श्रुतीमध्यें सांगितलें आहे या चिन्हावरून देखील (परमात्म्याचें स्वरूप हेंच मुख्य फल आहे असें समजतें).	२२ भोगामध्येंच (विशेष संभवतो. मुक्तांमध्यें) साम्य आहे या गोष्टीच्या चिन्हावरूनही (त्यांची स्थिति एक प्रकारची आहे ही गोष्ट सिद्ध[59] होते). (१०)
२२ (ते) परत येत नाहींत असें श्रुतीवरून (समजतें, ते) परत येत नाहींत असें श्रुतीवरून (समजतें). (५)	२३ (ते) परत[61] येत नाहींत असें श्रुतीवरून (समजतें, ते) परत येत नाहींत असें श्रुतीवरून (समजतें). (११)

५९ मुक्तांना जरी अनेक प्रकारचे भोग प्राप्त होतात तरी त्या भोगामुळें त्यांची स्थिति बदलत नाहीं. या गोष्टीचें चिन्ह श्रुतीमध्यें दृष्टीस पडतें. मुक्तांना उत्पत्ति, मरण, र्‍हास व वृद्धि वगैरे कांहीं नाहीं, ते यथेच्छ उपभोग घेतात अशी श्रुति आहे.

६० ‘ ज्ञानी मनुष्य ब्रह्मलोकाप्रत प्राप्त होऊन तेथून परत फिरत नाहीं ’ असें श्रुतीमध्यें (छां. ८।१५।१) सांगितलें असल्यामुळें मुक्त जीव परत येत नाहींत असें समजतें. भगवद्गीतेवरून-(८।१५।१६) ही ही गोष्ट सिद्ध होते.

६१ ‘मुक्त झालेले जीव हे फिरून संसारांत पडत नाहींत’ असें छांदोग्य (८।१५।१) श्रुती वगैरेंवरून सिद्ध होतें.

अध्याय ४ पाद ४ समाप्त.

श्री.

शांकरब्रह्मसूत्रभाष्याच्या मराठी भाषांतरामध्यें आलेल्या श्रुती वगैरेंचें सूचीपत्र.

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
ईशोपनिषद्.	
२	१३१४-१३२१-१३२२
७	५१-४६०-४८३-१५०८
८	५९
केनोपनिषद्.	
१।३	५१-१०५६
१।४	५५-१५९
२।३	५५
कठोपनिषद्.	
१।१२	३९९
१।१५	३९९
१।२०	१८७-३९९-४००
१।२३	१०१३
१।२४	१०१३
२।४	४०३
२।६	९९१
२।७	१३८८
२।९	५०७
२।१२	१८९-१९०-४०३
२।१४	५०-१८७-३११-३६६-३९९-१०१३-१२२४-१५०२
२।१५	११८५-१३४८

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
२।१८	१८२-४००-८२२
२।२२	५०-२९८-४०५
२।२४	१८०
३।१	१८६-१८८-१२२२
३।२	१२२४
३।३	१८६-१९०-८१३
३।४	५८-१८६-८९०
३।९	१९०-११५४
३।१०	२८७-४०५-११५१
३।११	६२-२७६-३८४-३८७-३९८-११५२
३।१२	२८९-३९८-११५३
३।१३	३८९-११५४
३।१५	११९-१२२-२९७-१०५०-१०५३-११५३
४।१	१०८७
४।४	४०२
४।१०	४०२-१४०८
४।११	२५१-५३५-१०५२
४।१२	३१०
४।१३	३१०
४।१५	१५२८
५।५	१५९-३६५
५।६	३९९
५।७	४००-१४६३
५।८	१०१२-१०१३-१०१९
५।११	८८४
५।१५	१४१-१५४

अध्याय वगैरे.	पृष्ठ,
६।१	३६५
६।२	३६४-११२६-१३१६
६।३	३६५
६।११	४८६
६।१३	१०६२-१०७९
६।१४	१४६९
६।१६	१५००-१५०२-१५४९
६।१७	३१३
६।१८	४८६
प्रश्नोपनिषद्.	
१।१	३६०
१।१०	२०२
२।३	१५८-९३१
३।३	९४
३।६	८३७
३।९	१४५१
३।१०	१४३०
४।२	२६३
४।३	२६३
४।६	२६३
४।८	९१२-९१९
४।९	८५३
५।२	२७४-१५१७
५।४	२७३
५।५	२७४-२७५-२८४
६।३	७८-४६४-८४६-९३२

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
६।४	७८-४१७-४६४-८४१-९००-९०७-९२२-९३२
६।५	१४७१-१४७२
६।८	५२
मुंडकोपानिषद्.	
१।१।१	२२०
१।१।२	२२०-२५५-४६६-७८१-९०४
१।१।५	२१६-१२२०
१।१।६	२१६-४७०-१०८६
१।१।७	२१७-४६६-४७१
१।१।९	७९-२१८-२९४-५८७-१२१६
१।२।७	२२०
१।२।११	१२२५-१३२९-१४८३
१।२।१२	२२१
१।२।१३	२१९
२।१।१	८२०
२।१।२	५०-१६८-२१९-२२२-२९३-५७९-९०५-९२३ १०५३-१५०६
२।१।३	२२३-२२४-८०१-८१४-९००-९०३-९०४-९०७ ९२४-९२६-९४३
२।१।४	२२३
२।१।८	९००-९११-९१२
२।१।१०	२२५-९०५
२।२।५	२४८-३०७
२।२।६	८९७
२।२।८	५१-५४-१५२-२५३-१२१७-१४३२-१४३८
२।२।९	३०७

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
२।२।१०	१४१-१५४-३०५
२।२।११	४२-२५०-४५९-५१३-५३२-७८३-९०५-१३९१-१५०५
३।१।१	५१८-१८७-१९०-१९१-२५६-१३३२
३।१।२	१९१
३।१।३	४७०-११९६-१२०८
३।१।८	१०८६-१०८७-१०८९
३।१।९	८२४-८४५
३।२।६	४६०-१३३७
३।२।७	१४७१
३।२।८	२५३-४५४-१०८९
३।२।९	४६-५१-५४-२९७-१०८८-१३०९
३।२।१०	११२४
३।२।११	११२४
मांडूक्योपनिषद्.	
५	१५४१
तैत्तिरीयोपनिषद.	
१।१।१	११८८
१।५।३	१५४३
१।६।२	७७७-७८०-१५४३-१५४४-१५४५
१।७।१	७७७
१।११।१	१३२८
१।११।२	९८६
२।१	२०-९४-१०१-१०५-११०-१११-११३-१२६-१२९-२६६-४२६-४२८-४३१-४६०-५४३-६९८-७७३-७७४-७७८-७८३-७८६-७८९-७९६-८०१-८०२-८०५-८०७-८०८-८२६-८३४-९००-१०८०-११५८-१३०९-१४०१-१५१६

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
२।२	११०
२।३	११०
२।४	११०-८६६-१०५६-१०८०
२।५	१०१-१०६-१११-८५४-८६६-११४९
२।६	१०७-१०९-११२-११३-११६-४२८-४३१-४६० -४६८-४७०-५०१-५०९-५२६-५६६-८०१-८०९ ८२२-८८४-१०७९
२।७	१०२--१०५--१०७--११०--११३-१२४--४२७. ४३१--४६९--५४८--५४९-८०३-८२०--१०८६- ११२६
२।८	१०२-११३-११४-२०४-३६६-१३१६
२।९	५१-१०३-११२-११३-१५०८
३।१	२२-२७-३३-३५-३२४-४६७-८१०-१५०८
३।२	७७८
३।६	२३-१०३-१०६-११३-१२९
३।१०	२२४
नारायणोपनिषद.	
१०।६	१३३७
७८	१३३७
८०	११८३-११८५
ऐतरेय.	
१।१	७८-४२९-११५६-११५९
१।२	४२७-११५६-११५७-११५९
२।१।१।१	४२
२।१।२।६	८८
२।१।३।१	११५७

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
૨।૨।૪।૬	૧૨૨૮
૨।૩।૨।૧	૧૦૦
૨।૪।૧।૧	૫૪૭
૨।૪।૨।૨	૧૧૫૮
૨।૪।૨।૪	૫૦૩
૨।૪	૯૩૭-૧૨૫૫
૩।૨।૩।૧૨	૧૪૫-૧૧૨૫
૩।૮।૧	૫૯-૩૫૧
૩।૧૧	૧૧૬૧
૩।૧૨	૧૧૬૧
૩।૧૨	૧૧૬૧
૫।૩	૧૧૬૧

छांदोग्योपानिषद.

૧।૧।૧	૧૧૩૨-૧૧૩૯-૧૨૪૬-૧૨૮૪-૧૩૧૯-૧૩૪૧-૧૪૨૧
૧।૧।૩	૧૩૩૯
૧।૧।૭	૧૧૪૨-૧૨૪૭-૧૩૪૨
૧।૧।૯	૧૩૦૨
૧।૧।૧૦	૧૧૩૨-૧૨૪૮-૧૨૪૯-૧૩૧૩-૧૩૧૯-૧૪૨૦-૧૪૨૧-૧૪૪૫-૧૪૪૭
૧।૨।૧	૧૧૨૯
૧।૨।૨	૧૧૩૨
૧।૨।૭	૧૧૨૯-૧૧૩૦
૧।૨।૯	૯૩૨
૧।૨।૧૩	૧૩૭૫
૧।૩।૧	૧૪૧૭

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
१।५।१	१३९७
१।५।२	१३९७
१।५।५	१३०१
१।६।१	१२३४-१३४०-१४१८-१४१९-१४२२-१४२३
१।६।६	११८-१९९-१०९५-१२३४
१।६।७	११८-१९९
१।६।८	११९-१०९६-१३३५
१।७।१	११८
१।७।५	११८-१०९६-११७८
१।७।६	११९-१२१-१०९६
१।७।७	१४२३
१।७।८	१३७६
१।७।९	१२३५-१३४२-१३७६
१।९।१	१२४-२८८-४६८-११३६
१।९।२	१२८-११३६
१।१०।१	१३५४
१।१०।४	१३५४-१३५५
१।१०।९	१२४८
१।१०।१०	१२४९
१।१०।११	१२४९
१।११।४	१३०
१।११।५	१३०-१३२
२।१।१	१४२४
२।२।१	१२८४-१३४१-१४१७-१४१९-१४२०-१४२३-१४२४
२।२।३	१२५०-१३४२-१४२१

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
२।३।२	१३७४
२।७।२	१४२४
२।८।१	१४१८-१४२४
२।९।१	१४२४
२।१०।५	११९९
२।११।१	१४१६-१४२४
२।१३।२	१३५३
२।२३।१	१३२४-१३२६-१३२७-१३२९-१३३०--१३३१-१३६७-१३८२
२।२३।३	२७०
३।१।१	३४५
३।६।१	९७१
३।६।२	३४५
३।११।१	१२१९
३।११।३	१४४
३।१२।१	१४४
३।१२।६	१४०-१४४-१४७-५८०-८७९-१५४५
३।१२।७	१४४-१४७-११०२
३।१२।८	११०२
३।१२।९	११०२
३।१३।६	१४७-४२१
३।१३।७	१३६-१३८-१३९
३।१३।८	१३९
३।१४।१	१००-१४५-१६७-१७०-५१४-७८४-७८५-८०१ १०६४-१२९४
३।१४।२	१२२--१६१--१६७--१६९--२३६--३०६--८४७-- १०४९-१०६४-१२९३-१२९७-१३९१-१५१७
३।१४।३	१२७-१६९-८४७-११०४-११८०

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
३।१४।४	१६९-१७०-१७३-५८७-१२९८
३।१५।२	१२९९
३।१५।३	११९०
३।१६।७	११८७
३।१७।६	१४३१
३।१८।१	५३-२३६-१३९७-१४०७-१४१०
३।१८।२	३४६
३।१८।३	९३७-१३९७
३।१८।४	९२६
३।१९।१	५३ ३४६-४२७-४३२-५४८-५४९-१४०७-१४१० १४१६-१४१९
३।१९।४	१४१६
४।१।१	१३४३
४।१।३	३५७
४।१।४	१३९६
४।२।२	१३२६
४।२।३	३५६
४।३।१	५३-३४६-१२५४-१३४५
४।३।२	५३-१२५५-१२९३
४।३।४	१२५८
४।३।५	३५९
४।३।६	१२५६
४।३।८	१४५-१२५९
४।४।५	३६१
४।१०।५	१२९-१९९-२००-१२९३-१२९७-१५१५
४।१४।१	१९९-२०१
४।१४।३	२०१-१४३४
४।१५।१	१९६-१९८-२०१-११८०-१२३४
४।१५।२	१९८

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
४।१५।२	१९८
४।१५।४	१९८-११८०
४।१५।५	२०२-१४७९-१४९०-१४९२-१४९४-१४९७
४।१५।६	१४९४-१५००-१५०२-१५४८
४।१७।१०	१३०५-१४४५
५।१।१	९२३-१११७-१२९३
५।१।६	९३१
५।१।७	५०३-९३१
५।२।१	१३५२-१३५३-१३५५-१३५६
५।२।२	११६६
५।२।९	५३८-१०१७
३।३।२	९५८-९६४-९९३-९९६-१४५८
५।४।१	९६४-१२७४
५।४।२	९६४-९६८
५।७।१	६०
५।८।१	६०
५।९।१	९५८-९६५
५।९।२	११२२
५।१०।१	९९३-१२११-१३२५-१३२९-१३३१-१३३२ १४८८-१४९४
५।१०।२	१४८८-१५२०
५।१०।३	९६८-९९४
५।१०।४	९६८-९७०
५।१०।५	४९-९७५-९९९-१०००
५।१०।६	१००२-१००३-१००९
५।१०।७	९७७-९८०-९८५-१००९-१५१२
५।१०।८	९५६-९९३-९९४-९९५-१४८६
५।१०।१०	११२०

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
५।११।१	२३०-२३२-२३३-१२८८
५।११।५	१३१२-१३१८
५।११।६	२३०
५।११।७	२६०
५।१२।१	१२८८-१२८९
५।१२।२	१२९०-१२९१
५।१८।१	२३०-२३३-११२६-१२९०
५।१८।२	२३१-२३२-२३५-१२४४-१२८९
५।१९।१	२३५-१२३९-१२४२
५।२४।२	१२४०
५।२४।३	२३३-१४३४
५।२४।५	१३४०
६।१।१	९१-४६५-४६६-५३१-५६३-५६४-७८१-७८२-७८६-७८८-९०९-११६४
६।१।२	४६६
६।१।३	९१-४६६
६।२।१	४२-७७-८४-४२७-४२८-४५९-५४७-५६२-५६३-५९५-७७२-७७८-७८२-७८६-७८७-१०६८-१०९७-११५०-११६२-११६३
६।२।२	४३७-७९९
६।२।३	७७-८०-८३-८४-४२७-४२८-४६८-५०२-५०४-७७२-७७३-७८२-७८३-७८५-८०१-८०३-८०५-८०६-८०९-९००-९०८-११६०-१३१६
६।२।४	८४-५०२-८०६-८०९
६।३।१	९९८
६।३।२	८४-२७०-४३३-४५५-५४४-५६६-५८०-५९६-८२३-९४६-१०२२-१०६०
६।३।३	१३८-९४७

અધ્યાય વગૈરે.	પૃષ્ઠ.
૬।૩।૪	૯૫૧-૯૫૨
૬।૪।૧	૪૧૦-૫૩૧-૯૦૬-૯૫૦
૬।૪।૬	૯૫૧
૬।૪।૭	૯૫૧
૬।૫।૧	૯૫૨
૬।૫।૪	૮૧૪-૯૦૮-૧૨૨૭-૧૪૫૩
૬।૮।૧	૯૧-૨૮૭-૫૬૮-૫૮૦-૮૪૧-૧૦૨૫-૧૦૨૬-૧૦૩૨-૧૦૪૪-૧૦૯૫-૧૧૦૧-૧૧૦૨-૧૪૬૦-૧૫૪૦
૬।૮।૨	૧૩૩-૨૪૨-૧૦૨૬
૬।૮।૩	૯૩-૧૪૬૦-૧૫૦૮
૬।૮।૪	૨૫૯-૪૩૦
૬।૮।૫	૯૩-૧૪૬૦
૬।૮।૬	૮૫-૧૪૪૯-૧૪૫૨-૧૪૫૬-૧૪૫૭-૧૪૬૨
૬।૮।૭	૪૨-૫૪-૮૫-૮૭-૯૦-૧૫૨--૧૭૮--૧૯૨--૧૯૭-૨૯૬-૩૧૩-૪૩૧-૪૫૫-૫૩૨-૫૩૩-૫૩૫-૫૩૯-૫૬૬--૫૬૯--૭૮૨--૮૨૨--૮૪૮--૮૮૫--૯૦૯-૧૦૧૯-૧૦૨૫-૧૦૬૮-૧૦૮૯
૬।૮।૭	૧૧૪૦-૧૧૬૨-૧૧૬૪-૧૨૧૮-૧૨૨૭--૧૩૧૭-૧૩૨૮-૧૪૦૦-૧૪૦૧-૧૪૦૭-૧૫૧૦-૧૫૨૮
૬।૯।૨	૫૧૫-૧૦૨૬
૬।૯।૩	૫૧૫-૮૫૦-૧૦૩૮
૬।૧૦।૨	૧૦૩૬
૬।૧૧।૩	૮૧૬-૮૨૧
૬।૧૪।૨	૨૯-૮૭-૧૨૧૫-૧૨૧૭-૧૩૦૯-૧૪૪૦-૧૪૪૮
૬।૧૬।૨	૫૩૯
૭।૧।૧	૩૬૦
૭।૧।૩	૫૨-૨૬૧-૨૬૬-૪૩૧-૧૩૦૯

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
७।१।५	१२९९-१४१०-१४१६-१५२१
७।२।१	२६२-१५२१
७।२।२	१४१६-१५२१
७।३।१	१५२१
७।४।३	१४१६
७।६।१	१४२७
७।११।१	१४९०
७।१५।१	२६१-२६३-४२१-१२९३
७।१६।१	२६४-२६५
७।२३।१	२६१-२६३
७।२४।१	९८-११३-११९-२६१-२६२-२६७-५४४-१३९१ १५०२-१५२८
७।२५।१	११०३
७।२५।२	४५९-५१३-५३२-११०३-१५०५-१५२९-१५३०-१५४३
७।२६।१	९४-२६७
७।२६।२	५२-२६६-७६३-१२१७-१५२६-१५३९
८।१।१	२८०-४४४-११८०-१२३६-१४७५-१५१६
८।१।२	२८३-२८५-३०४-११०४-११८१
८।१।५	२८४-१२३६-१२३७-१२९३-१२९७
८।१।६	२०-२८५-१२३८-१५३५-१५४३
८।२।१	१५१८-१५३३-१५३४-१५३५
८।३।२	२८६-१०३८
८।३।३	९२-८३७
८।३।४	२८९-३०२-१५२९
८।४।१	२८७-१०३८-१०४५-१०९३
८।४।२	१०३०-१०९४
८।४।३	१४८५

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
८।५।१	१३४७
८।५।३	१३६२-१५०३
८।६।१	१४७६
८।६।२	१४७७
८।६।२	१०२४-१०२६-१०२८-१०२९
८।६।५	३६८-१४७६-१४७८-१४८२-१४८३
८।६।६	१४७५-१४७६-१५००-१५०२-१५०५
८।७।१	४६-१०७-१२०-१७१-३६८-५६८--५७०--५८७- ८७७-१३०९-१३९४-१५२५-१५३०
८।७।२	३४८
८।७।४	२९४-२९९-१३१६
८।८।१	८४१
८।९।१	२०३
८।९।३	२९५-२९९-३६८-१३१६-१५२५
८।१०।१	२९५-२९९
८।१०।४	१५२५
८।११।१	२९५
८।११।२	२९५-२९९
८।११।३	३०० ३२४-१५२५
८।१२।१	४९-६७-२४९-३००-१५२५
८।१२।२	३००
८।१२।३	३००-३६७-३६८-४५४-१३१७-१५२२-१५२५- १५२६-१५२७-१५३०
८।१२।४	८२६-८२७-९३९
८।१२।५	१५३१
८।१३।१	११९५-१२०३-१२०६
८।१४।१	१२५--२८८--२८९--३६९--३७०--५४३--९४९- १०५३-१५०३-१५०५

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
८।१५।१	१३१४ १३२१-१३८०
बृहदारण्यकोपनिषद्.	
१।२।२	८०७
१।२।४	३३१
१।३।१	११२९
१।३।२	५०२-९४३-११२९-११३०-११३३
१।३।७	९४३-११२९
१।३।१२	९३८
१।३।२२	९३५
१।३।२३	११३१
१।३।२४	११३५
१।३।२८	१३७४
१।४।१	११५७-११५९
१।४।६	१८१
१।४।७	४६-३९१-४२७-४३२-४३३-८२२
१।४।१०	५४-१५६-१५९-१७८-३४८-४५९-५३९-८२२-८४८-८८५-९७२-१०८९-१२१८-१४०६-१४०७ १५२८
१।४।१५	४६
१।५।२	१४४६
१।५।३	८५१-९१५-९३२-९४४
१।५।१३	१२५५
१।५।१६	१४९२
१।५।२०	९४०
१।५।२१	९४२-९४५-१२५४ १२५८
१।५।२२	७९६-१२५७-१२५८
१।५।२३	१२५५-१२५६-१२५७-१२५८

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
१।६।३	२६३
२।१।१	१०७९
२।१।१६	४४४-१०३५
२।१।१७	४४४-८८१-८९३-८९४-८६६-१०२५-१०३०
२।१।१८	८९३-१०१५
२।१।१९	१०२५-१०२६-१०३०-१०३१
२।१।२०	८२०-९००-९०२-९०८-१०३६-१०८५
२।२।३	४०९
२।२।४	३४६
२।३।१	१०७६
२।३।५	७७७
२।३।६	९९--१०५६--१०७६--१०८२--१०८३--१०८४-१०९१
२।४।२	४५१
२।४।३	४५१
२।४।५	२९-४६-४७-६०-४५२-४८६-५६८-५९०--८९७-१३१६
२।४।६	६१--४५१-४५२-४५६-४५९-५१०-५१३-५३५-७८३-११०३-१३९१
२।४।१०	३५-१३१६
२।४।११	९१२
२।४।१२	२४९-४५०-४५७-५७९-१५४१
२।४।१३	४५७
२।४।१४	४२--५५--४५०--४५८--९६१--१०३३--१३३३-१४०९-१५१५-१५४१
२।५।१	१०५२
२।५।१८	२८४-१०६०
२।५।१९	४२-५४-६१-१५५-८२२-१०६४-१०५४-१०९१-११०३

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
३।१।१	१३१२
३।१।५	९२५-९२८-१२५५
३।१।९	५३
३।२।१	३८७-९११
३।२।८	९१३-९१९
३।२।१०	१२७४
३।२।११	१४६७
३।२।१३	५९४-९६३-१४५८
३।३।२	३६४
३।४।१	१०८९-१२१८-१२२५-१३१६-१४०७-१५०५
३।४।२	५६-२११-२६८-३६६।७९५-१२२८
३।५।१	१२२५--१२२८--१३१७--१३१८-१३७७-१३८० १३८३
३।७।१	२०७
३।७।२	२०७-२४९
३।७।३	१९८-८०९-१०८९-१४०७
३।७।४	६१४
३।७।९	१२२
३।७।२२	२१२-८७१-८७८
३।७।२३	८२--१०८-१७५-१७७-१७८-२१०-४५९-८०९-८४८-८६१-८७८-८८४-१०९१
३।८।७	२६९-२७०
३।८।८	९९--१५३--२६९-२७२-५४०-५७९-५८७-७९३-१०४९-१०५३-१२१९-१२९१-१४०१-१५०६
३।८।९	२७१-२८८-५८७-६१४-१३१६
३।८।११	२७२-२९३-४५९-८४८-१३१७-१४०१
३।९।१	३२५
३।९।२	३२५

અધ્યાય વગૈરે.	પૃષ્ઠ.
૩।૯।૪	૯૧૨-૯૧૪-૯૧૯
૩।૯।૯	૪૨૭
૩।૯।૧૦	૨૦૭
૩।૯।૨૬	૬૧-૬૨-૪૮૮-૫૪૦-૫૭૯-૬૮૮-૧૦૮૬-૧૨૩૮-૧૩૯૧-૧૫૦૬
૩।૯।૨૮	૧૦૩-૧૧૪-૧૨૭-૮૨૬-૧૪૦૧
૩।૧।૨	૧૨૯૮
૪।૨।૪	૫૧-૩૦૮-૫૪૧-૫૮૩-૧૫૦૮
૪।૩।૫	૧૪૧
૪।૩।૬	૩૦૮
૪।૩।૭	૩૭૨-૮૩૭-૮૪૮-૮૪૯-૮૬૦-૮૬૪-૧૧૬૨
૪।૩।૮	૮૧૭
૪।૩।૯	૮૨૬-૧૦૧૧-૧૦૧૯
૪।૩।૧૦	૫૮૪-૧૦૧૧-૧૦૧૨-૧૦૧૬
૪।૩।૧૧	૮૨૬-૮૩૨
૪।૩।૧૨	૮૫૩-૯૩૧-૧૦૧૪
૪।૩।૧૩	૮૬૫
૪।૩।૧૪	૩૭૪-૧૦૧૩-૧૨૩૮
૪।૩।૧૫	૫૦-૩૭૪-૮૨૪-૧૨૩૮
૪।૩।૧૬	૪૮૮-૧૦૩૮
૪।૩।૧૯	૧૫૪૧
૪।૩।૨૧	૯૩-૩૭૩-૮૬૧-૧૦૨૫-૧૦૯૬
૪।૩।૨૨	૩૭૪-૧૦૪૫-૧૪૦૯
૪।૩।૨૩	૮૨૭ ૧૪૦૩-૧૫૨૮
૪।૩।૩૦	૩૦૦-૮૨૬-૧૫૪૦
૪।૩।૩૧	૧૦૩૩
૪।૩।૩૨	૧૧૨-૨૬૭-૮૬૨-૧૪૯૯-૧૫૪૦
૪।૩।૩૩	૯૭૩
૪।૩।૩૫	૩૭૩-૫૬૯

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
४।३।३८	१४५६
४।४।१	८३३-९१७-९५७-१४७३
४।४।२	८३३--९१७-९१८--९४०-९६२-१३१३--१३१९ १४३०-१४५६-१४६८-१४७३
४।४।३	९५९
४।४।४	९५७
४।४।५	८२३-८४८-९८६-१४५८
४।४।६	८३१--९७६०-१०८८-१३१९--१३२०--१४४८- १४६१-१४६५-१४६८-१५०९-१५१६-१५४०
४।४।७	६९-२९३-१०२९-१४६९
४।४।९	१३६५
४।४।१२	६१
४।४।१६	१४१-३०७-१५२६
४।४।१७	४१३
४।४।१८	१३१-३६५-४२१
४।४।१९	४५९-५३२-५३५-८८४-११०३-१४०८-१५०८
४।४।२१	२५३-१३९४
४।४।२२	११९-२२८-३७२-३७५-५४५-८३३-८३४-८४२- ८७८-१२३६-१२३७--१३२३--१३२५--१३३१- १३४७-१३४८-१३५७-१३५८-१३५९-१३६०- १४०३-१४३७-१४४०-१४४२-१४४५-१४४६
४।४।२३	१८८-१३४९
४।४।२४	१४३-११०७
४।४।२५	४५९-५४०-८२२-११६२-१३९१-१५०६
४।५।१	१३४३
४।५।६	४४९--४५६--४६६-४९७-७८१-१३०९-१३४४- १३९४-१३९५-१४००
४।५।७	१४०८

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
४।५।९	४६६
४।५।११	४५२
४।५।१२	२५१-८२४-८२६-१०५६-१५३१
४।५।१४	८२४
४।५।१५	६१-९८-१९३-२६७-५३४-५४४-१३०९-१३१८-१३९१-१५१५-१५४०
५।१।१	१२९
५।४।१	१२३१-१२३२
५।५।१	११७५
५।५।२	१९७-११७५-१२३१-१२३२
५।५।३	१२९-११७५-११७७-१२३२
५।५।४	११७५-११७७-१२३२
५।६।१	११७२-११७३
५।८।१	४१२
५।९।१	२३१
५।१०।१	१४८३-१४८५-१४८८
६।१।१	१११७-१११८
६।१।६	११२१
६।१।७	५०२
६।१।१३	५०४-९२४
६।१।१४	११४५-११६७-११६९-१३५२
६।२।९	४१२-९६९
६।२।१४	११२०-११२२
६।२।१५	१५४-१२१२-१४८३-१४८४-१४८५-१४८९-१४९८
६।२।१६	९७०.९७५-१२१२
श्वेताश्वतरोपनिषद्	
१।१	४१०
१।२	४१०

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
१।११	१०२१
१।१२	१०५२
२।८	४८६
२।१०	१४२८
२।१२	३५२
३।८	१५२-२६६-२६६-४३१-४८७-८४९-१५१५
३।९	११०३
३।१९	८२-५८८
४।३	१७२-८७८
४।५	४०७
४।६	८८४-१२२२
४।७	१२२३
४।१०	३९३-४१०
४।११	४१०
४।१९	७९५-१५०३
५।२	४७८
५।८	८३५-८४५
५।९	८३५-८४४
६।८	८२-५७४
६।९	९४-७९९
६।११	५८-११३-४१२-८२३-१२२७
६।१२	५४४
६।१३	४८७
६।१४	१४१-१५४६
६।१८	३४१-३८८
६।१९	९८-४६५-५७८-१५०६
कौषीतकि ब्राह्मणोपनिषद्	
१।२	८३१-९९०

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
१।३	१२०५-१४८३-१४८७-१४८८-१४८९-१४९२
१।४	११९६-१२०५
१।७	१४८५
२।५	१२६८
२।१४	५०३-११४५
३।१	१५१-१५२-१३४३
३।२	१५१-१३४४
३।३	९४-१३३-१५१-१५५-३४०-८३१
३।६	८४१-८४५
३।८	१५१-१५३-१५५-३७५-५९४-८७१-११०९
४।१	४३९
४।२	४३७
४।४	४३७
४।१९	४३७-४३९-४४३-१०२५-१०२८
४।२०	४३७-४३८-४४२-४४३-१०२८
जाबालोपनिषद्	
१	२४४
४	१३२५-१३२८-१३६७
५	४८८-१३३९
जाबालश्रुति	१२४०-१२४३-१४०६
कैवल्योपनिषद्	
१	१३३७
ब्रह्मबिन्दूपनिषद्	
१२	१०५८
नृसिंहतापिनी	
२	१४०१
अग्निरहस्य	१२६२-१२६३-१२६९-१२७०

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
ऋक्संहिता	
मं. सू. ऋ.	
१।३०।६	५०७
१।९८।१	२३२
१।१०४।१	४७१
१।१६४।३९	१२८
२।६।७	१२८७
८।७।१७	९२२
८।५३।७	४२३
९।४६।४	३९१
१०।१४।१	९९२
१०।७१।३	३२९
१०।८८।३	२३६
१०।८८।१२	२३२
१०।१२१।१	२२४
१०।१९०।३	२४३-५९७
तैत्तिरीयसंहिता.	
अष्ट. अध्या. अनु.	
१।१।१	४१
१।६।१	४१८
२।१।१	३५०-१३४५
२।२।१०	४८३
२।३।६	१२६९
२।५।५	११३५
२।६।१	१३१०
२।७।८	१३५०
३।१।२	१३०४

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
३।५।७	१२४७-१३१०
४।१।१	११८८-११९१
४।१।८	२२४
५।१।७	९११-९१२
५।३।१२	१४३५
५।४।१२	११९९
६।१।१	१३१०
७।१।१	३५५
७।५।५	१२८७
७।५।१२	९१२-९१६
तैत्तिरीय ब्राह्मण	
१।६।३	१४१
२।२।४	३३२
२।४।७	११७९
३।१।४	३४३
३।२।४	९६६
३।३।९	११९९
३।६।८	१२८६
३।१२।९	१४१-४८८
तैत्तरीयारण्यक	
२।२	१४४८
३।१२	९८-४९५-५४४-८७८
शतपथ—ब्राह्मण.	
६।१।२।२।४	३४९-५०२
६।२।६	९७०
१०।३।३।६	१३१
१०।५।२।३	१२७४
१०।५।४।१६	१२७५-१२१२

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
१०।६।२।११	२३७
१०।६।३।२	१७४-२८३
१०।५।२।१३	३६०
छंदोग ब्राह्मण.	३३०
षड्विंश-ब्राह्मण.	
१।१	३४९
ताण्ड्य-ब्राह्मण.	
२०।१२।५	३५९
इतर श्रुति.	१३-३१-४०-५१-५९-६४-६५-६९-११९--१३४-२४२-३४१-४२२-५८२-७७६-७७७-७८१-७९४-७९५-८१५-८३३-८३४-८६६-८७३-८७८-८८०-८८५--९००--९२५--९२८--९६७--९६९--९७१-१००८-१०१७-१०५०-१०५३-१०५७--१०५८-११०३-११०४-११०७-१११४-११६७--११७१-११८८-११९४-११९६-११९९-१२००--१२०१-१२०६-१२२१-१२२९-१२६५-१२६६-१२६७-१२६८-१२७०-१२७१-१२७५-१२८४--१२९३ १३०४-१३१५-१३१७-१३२८-१३२९-१३३३--१३३६-१३४०-१३४१-१३४३-१३५६-१३५८-१३६०-१३६७-१३६९-१३७४-१३७५-१३७९-१३८०-१३९२-१४३१-१४४३-१४४४--१४४५-१४५३-१४६०-१४६४-१४६६-१४७७--१४९२-१५०५-१५२०-१५३६-१५४६
श्रीमद्भगवद्गीता.	
२।२४	११०४
२।२५	९७-५०८-१०८६
२।३९	१४४६
२।४९	१४४६

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
२।१४	७०
३।१७	१४०३
३।३५	१३६८
४।११	५९५
४।३७	१२१७
५।१४	५४४
५।१३	५४४
५।१७	१३३७
६।१	१३६१
६।११	१४२७
६।२७	१३८९
६।४०	१३८९
६।४३	१३८९
६।४५	१३६४-१३८९
७।६	४७९
७।१९	४५९
७।२१	११०९
७।२२	११०९
८।६	१००-१२९८-१४३१
८।१०	१४३१
८।२३	१४७९-१४८०
८।२४	२०२-१४८०
८।२६	१२१२
१०।२	५०८
१०।४	८०४
१०।५	८०५
१०।३७	१३७९
१०।४१	१००-१२१

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
१०।४२	१४७
१३।२	१७५-१९२-४५९
१३।१२	१०५७
१३।१३	१७२
१३।२७	४५९
१३।३१	२९८
१४।१७	७६
१५।२	५९७
१५।६	३०८-१५४६
१५।७	८८०
१५।१२	३०८
१५।२०	६१
१८।६१	१७४-५४५

ब्रह्मसूत्राणि.

१।१।१	७१
१।१।२	२०-३२८-३८३-४६४-५४३
१।१।४	१०५४-१०६६-१११३
१।१।५	१०९-२१०-२८३-४७२-६०३
१।१।१२	१०१-११५०
१।१।१८	६०३
१।१।२२	१००-३७१
१।१।२४	३६७
१।१।२८	१०२८
१।१।३०	३०२
१।१।३१	४४१
१।२।७	३०३
१।२।११	२५७-१२२४
१।२।२१	२५७

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
१।३।१४	१०३०-१२३७
१।३।२०	२९०
१।३।४०	१५३६
१।४।१	४८४-११९४
१।४।१७	८५०
१।४।२३	७४९
१।४।२४	७४९
१।४।२८	६०३
२।१।४	८३
२।१।६	६४२
२।१।११	५०९
२।१।१२	६४२
२।१।१४	१४५-५१३-१०२०
२।१।२४	६१५-७९२
२।१।३६	३३९
२।२।२०	७३१
२।३।१	४२९
२।३।१७	७६३
२।३।२९	१५१८
३।१।१	३९४
३।१।२	१४५८
३।२।११	१५३१
३।२।१४	१०६५
३।२।१८	१०६१
३।३।७	११३७
३।३।११	१२२०
३।३।३१	१५१९
३।३।४२	१३०४

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
३।३।४४	१२६६
३।४।१	१३१६-१३४५
३।४।२	१३१५
३।४।४	१३१८
३।४।६	१३२०
३।४।७	१३२१
३।४।१६	१३१५
३।४।२०	१३५०
३।४।२५	१२५९
३।४।२६	१३५७-१३५८-१३८६
४।२।१३	१५०९
४।३।४	१४७९
४।३।७	१५०१-१५१८
४।३।१०	१५४७
४।३।१२	१५१८
४।४।११	१५३८
जैमिनिसूत्राणि.	
१।१।१	४७-७१
१।१।५	४५
१।१।२५	४५
१।२।१	३९-४५-६३
१।२।७	४०-१४४०
१।३।३	४८०
१।३।८	१३७१
१।३।१९	१३७१
२।२।१	१२२४
२।४।१०	११११९
३।१।८	१२२१

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
३।३।१२	११९१-१२६४
३।४।३	१३३४
३।४।१५	९०२
४।१।१	७१
६।८।२१	१३६९
१०।८।१५	१२०१
११।४।७	१२७३
संकर्षकांड.	१२६०
पाणिनिसूत्राणि.	
१।४।३०	४६७
२।१।५०	४२०
५।४।२१	१०४
६।४।१५८	२६१
आपस्तम्बधर्मसूत्र.	४७९
न्यायसूत्राणि.	
१।१।२	५२
१।१।१८	७५३
वैशेषिकसूत्राणि.	
१।१।१०	६६७
४।१।१	६५७
४।१।४	६५७
४।१।५	६५८
४।२।२	६४१
७।१।९	६३८
७।१।१०	६३८
७।१।१७	६३९
योगसूत्राणि.	

अध्याय वगैरे.	पृष्ठ.
१।१।६	९३४
२।४४	३५२
गौडपादकारिका.	
१।१६	५१४
३।१५	४३७
महाभारत.	३१०-४७९-४८२-१४६९
मनुस्मृति.	
१।५	२१०
१।२१	३३१
१०।४	३६७
१०।१२६	३६०
१२।९१	४८२
१२।१०५	५१९
१२।१०६	५१९

यास्क, उपवर्ष, शौनक वगैरेंचीं वाक्यें.

२८-४५-६२-७१-७२-१०७-१३१-२२३-२३४-
३२५-३२६-३३१-३३४-३३९-३४१-३४२-३४४-
३४९-३५९-३६१-३६२-३८८-४१६-४१७-४७९-
४८६-५०८-५८१-७०४-८१२-८४३-८६४-८८३-
८८४-९१९-९३८-९४८-९८३-९८७-१०५७-
१०८७-११६७-१२०२-१२१७-१२१८-१३१३-
१३४१-१३४८-१३५५-१३५६-१३६४-१३६५-
१३६७-१३६९-१३७१-१३७२-१३७३-१३८५-
१३९२-१४३३-१४५८-१४७०-१५०१-१५१२-
१५१३.

अधिकरणांची वर्णानुक्रमानें सूची.

अंशाधिकरणः—	२।३।४३
अक्षराध्यधि	३।३।३३
अक्षराधि	१।३।१०
अग्निहोत्राद्यधि	४।१।१६
अग्नीन्धनाद्यधि } अग्नीन्धनाधि }	३।४।२५
अङ्गावबद्धाधि	३।३।५५
अतस्तद्भावाधि	२।२।१२
अत्ताधि	१।२।९
अदृश्यत्वाधि	१।२।२१
अध्यक्षाधि	४।२।४
अनारब्धकार्याधि } अनारब्धाधि }	४।१।१५
अनाविष्काराधि } अनाविष्कुर्वदधि }	३।४।५०
अनियमाधि	३।३।३१
अनिष्टादिकार्याधि	३।१।१२
अनुकृत्याधि	१।३।२२
अन्तरत्वाधि	३।३।३५
अन्तराधि	१।१।२०
अन्तराधि	{ १।२।१३ ३।३।३५
अन्तराविज्ञानाधि	२।३।१५
अन्तर्याम्यधि	१।२।१८
अन्यथात्वाधि	३।३।६
अन्याधिष्ठिताधि	३।१।२४
अपशूद्राधि	१।३।३४
अप्रतीकालम्बनाधि	४।३।१५
अबाधि	२।३।११
अभावाधि	{ २।२।२८ ४।४।१०
अयनाधि	४।२।२०
अर्चिराद्याधि	४।३।१
अर्थान्तरत्वादिव्यपदेशाधि	१।३।४१
अलोपाधि	३।३।४०
अविभागाधि	{ ४।२।१६ ४।४।४
अविभागेनदृष्टत्वाधि	४।४।४
असंभवाधि	२।३।९
आकाशाधि	१।१।२२
आतिवाहिकाधि	४।३।४
आत्मगृहीत्यधि	३।३।१६
आत्मत्वोपासनाधि	४।१।३
आत्माधि	२।३।१७
आत्मेत्याधि	४।१।३
आदराधि	३।३।४०
आदित्यादिमत्याधि	४।१।६
आधिकारिकाधि	{ ३।३।३२ ३।४।४१
आध्यानाधि	३।३।१४
आनन्दमयाधि	१।१।१२
आनन्दाद्यधि	३।३।११
आनुमानिकाधि	१।४।१
आप्रायणाधि	४।१।१२
आरम्भणाधि	२।१।१४
आवृत्त्याधि	४।१।१

आश्रमकर्माधि .... ३।४।३२
आसीनाधि .... ४।१।७
आसृत्युपक्रमाधि .... ४।२।७
इतरक्षपणाधि .... ४।१।१९
इतरव्यपदेशाधि .... २।१।२१
इतराश्लेषाधि } .... ४।१।१४
इतरासंश्लेषाधि }
इन्द्रप्राणाधि .... १।१।२८
इन्द्रियाधि .... २।४।१७
इयदाधि } .... ३।३।३४
इयदामननाधि }
ईक्षतिकर्माधि .... १।३।१३
ईक्षत्याधि .... १।१।५
उत्क्रान्तिगत्याधि .... २।३।१९
उत्क्रान्तिप्रतिषेधाधि .... ४।२।१२
उत्क्रान्त्याधि .... २।३।१९
उत्तराधि .... १।३।१९
उत्पत्त्यसंभवाधि .... २।२।४२
उपलब्ध्याधि .... २।२।२८
उपसंहारदर्शनाधि .... २।१।२४
उपसंहाराधि { २।१।२४ / ३।३।५
उभयलिङ्गाधि .... ३।२।११
एकस्मिन्नसंभवाधि .... २।२।३३
एकाग्रताधि .... ४।१।११
ऐकात्म्याधि .... ३।३।५३
ऐहिकमप्यप्रस्तुतप्रतिबन्ध
इत्याधि } .... ३।४।५१
ऐहिकाधि }
कम्पनाधि .... १।३।३९
कर्त्राधि .... २।३।३३
कर्मानुस्मृतिशब्दविध्याधि } ३।२।९
कर्मानुस्मृत्याधि }
कामाद्याधि .... ३।३।३९
काम्याधि .... ३।३।६०
कारणत्वाधि .... १।४।१४
कार्याख्यानाधि .... ३।३।१८
कार्याधि .... ४।३।७
कृतात्ययाधि .... ३।१।८
कृत्स्नप्रसक्त्याधि .... २।१।२६
गतेरर्थवत्त्वाधि } .... ३।३।२९
गत्यर्थवत्वाधि }
गुहाधि } .... १।२।११
गुहांप्रविष्टाधि } ....
चमसाधि .... १।४।८
चराचरव्यपाश्रयाधि .... २।३।१६
जगद्वाचित्वाधि .... १।४।१६
जगद्व्यापाराधि .... ४।४।१७
जन्माद्याधि .... १।१।२
जिज्ञासाधि .... १।१।१
ज्ञाधि .... २।३।१८
ज्योतिराधि { १।१।२४ / १।३।४०
ज्योतिराद्याधि } २।४।१४
ज्योतिराद्यधिष्ठानाधि }
ज्योतिर्दर्शनाधि .... १।३।४०
तक्षाधि .... २।३।४०
तडिदधि .... ४।३।३
तत्साभाव्यापत्त्याधि .... ३।१।२२
तदधिगमाधि .... ४।१।१३

तदनन्यत्वाधि	.... २।१।१४
तदन्तरप्रतिपत्त्यधि	.... ३।१।१
तदभावाधि	.... ३।२।७
तदभिध्यानाधि	.... २।३।१३
तदापीत्यधि	.... ४।२।८
तदोकोग्राधि, तदोकोधि	.... ४।२।१७
तद्दृष्टयाधि	.... ३।४।३६
तद्भूताधि	.... ३।४।४०
तन्निर्धारणाधि, तन्निर्धारणानियमाधि	३।३।४२
तेजोधि	.... २।३।१०
दक्षिणायनाधि	.... ४।२।२०
दहराधि	.... १।३।१४
देवताधि	.... १।३।२६
द्युभ्वाद्याधि	.... १।३।१
नप्रतीकाधि	.... ४।१।४
नविलक्षणत्वाधि	... २।१।४
नातिचिराधि	.... ३।१।२३
पत्याधि	.... २।२।३७
परमाणुजगदकारणत्वाधि	२।२।१२
पराधि	२।३।४१, ३।२।३१
परामर्शाधि	.... ३।४।१८
परायत्ताधि	.... २।३।४१
पाञ्चरात्राधि	.... २।२।४२
परिप्लवाधि	.... ३।४।२३
पाशुपताधि	.... २।२।३७
पुरुषविद्याधि	.... ३।३।२४
पुरुषार्थाधि	.... ३।४।१
पृथिव्याधि, पृथिव्यधिकाराधि	२।३।१२
प्रकृतैतावत्त्वाधि	.... ३।२।२२
प्रकृत्याधि	.... १।४।२३
प्रतर्दनाधि	.... १।१।२८
प्रतिषेधाधि	.... ४।२।१२
प्रतीकाधि	.... ४।१।४
प्रदानाधि	.... ३।३।४३
प्रदीपाधि	.... ४।४।१५
प्रमिताधि	.... १।३।२३
प्रयोजनवत्त्वाधि	.... २।१।३२
प्राणश्रैष्ठ्याधि	.... २।४।८
प्राणसंपत्त्यधि	.... ४।२।४
प्राणाणुत्वाधि	.... २।४।७
प्राणाधि	.... १।१।२३
प्राणोत्पत्त्यधि	.... २।४।१
फलाधि	.... ३।२।३८
बहिराधि	.... ३।४।४३
बादर्याधि	.... ४।४।१०
बालाक्यधि	.... १।४।१६
ब्रह्मदृष्ट्याधि	.... ४।१।५
ब्राह्माधि	.... ४।४।५
भूमज्यायस्त्वाधि	.... ३।३।५७
भूमाधि	.... १।३।८
भोक्त्रापत्त्यधि	.... २।१।१३
भोगाधि	.... ४।१।१९
मनःसंपत्त्याधि, मनोधि	.... ४।२।२
महद्दीर्घाधि	.... २।२।११
मातरिश्वाधि	.... २।३।८

मुक्तिफलाधि
मुक्तिफलानियमाधि } ३।४।५२
मुग्धाधि .... ३।२।१०
यत्रैकाग्रताधि .... ४।१।११
यथाश्रयभावाधि .... ३।३।६१
यदेवाधि .... ४।१।१८
यावदधिकाराधि .... ३।३।३२
योगप्रत्युक्त्याधि .... २।१।३
रचनानुपपत्त्याधि .... २।२।१
रश्म्यधि .... ४।२।१८
लयाधि .... ४।२।१५
लिङ्गभूयस्त्वाधि .... ३।३।४४
वाक्यान्वयाधि .... १।४।१९
वाक्संपत्त्याधि
वागाधि } .... ४।२।१
वागाधिलयाधि .... ४।२।१५
वायुक्रियाधि .... २।४।९
वाय्वधि .... ४।३।२
विकल्पाधि .... ३।३।५९
विद्याज्ञानसाधनत्वाधि.... ४।१।१८
विधुराधि .... ३।४।३६
विपर्ययाधि .... २।३।१४
वियदधि .... २।३।१
विलक्षणत्वाधि .... २।१।४
वेधाद्याधि .... ३।३।२५
वैश्वानराधि .... १।२।२४
वैषम्यनैर्घृण्याधि .... २।१।३४
व्यतिहाराधि .... ३।३।३७
व्याप्त्याधि .... ३।३।९
शब्दादिभेदाधि .... ३।३।५८
शरीरेभावाधि .... ३।३।५३
शास्त्रयोनित्वाधि .... १।१।३
शिष्टापरिग्रहाधि .... २।१।१२
श्रेष्ठाणुत्वाधि .... २।४।१३
संकल्पाधि .... ४।४।८
संख्योपसंग्रहाधि .... १।४।११
संज्ञामूर्तिक्लृप्त्याधि .... २।४।२०
संध्याधि .... ३।२।१
संपद्याविर्भावाधि .... ४।४।१
संबन्धाधि .... ३।३।२०
संभृत्याधि .... ३।३।२३
संसारव्यपदेशाधि .... ४।२।८
सत्याधि .... ३।३।३८
सप्तगत्याधि .... २।४।५
समन्वयाधि .... १।१।४
समानाधि .... ३।३।१९
समुदायाधि .... २।२।१८
सर्वत्रप्रसिद्ध्याधि .... १।२।१
सर्वधर्मोपपत्त्याधि .... २।१।३७
सर्ववेदान्तप्रत्ययाधि .... ३।३।१
सर्वव्याख्यानाधि .... १।४।२८
सर्वान्नानुमत्याधि .... ३।४।२८
सर्वापेक्षाधि .... ३।४।२६
सर्वाभेदाधि .... ३।३।१०
सर्वोपेताधि .... २।१।३०
सहकार्यन्तरविध्याधि .... ३।४।४७
सांपरायाधि .... ३।३।२७
साभाव्यापत्त्याधि .... ३।१।२२
सुषुप्त्युत्क्रान्त्याधि .... १।३।४२
सेतून्मानाधि .... ३।२।३१
स्तुतिमात्राधि .... ३।४।२१
स्मृत्याधि .... २।१।१
स्वाम्याधि .... ३।४।४४
हान्याधि .... ३।३।२६

न्यायांचें सूचीपत्र.

विषय.	पृष्ठ.	पंक्ति.
अन्धगोलाङ्गूलन्याय	८७	१९
अन्धपरंपरान्याय	७९२	८
अर्के चेन्मधु इतिन्याय	१३१३	७
उत्कृष्टदृष्टिरितिन्याय	१४१४	१७
छत्रिन्याय	१८७ १२२४	२२ ३
तत्क्रतुन्याय	१५२८	७
द्विचन्द्रदर्शनन्याय	१४४८	७
नरनगरन्याय	११०१	९
पञ्जरचालनन्याय	९२७	१
परमतमप्रतिषिद्धमितिन्याय	९३४	१
प्रक्षालनादितिन्याय	१०८० १०८२	६ १९
प्रधानमल्लनिबर्हणन्याय	४७२ ९२३	२३ ६
प्रायदर्शनन्याय	११२७	२
बीजाङ्कुरन्याय	९९६	१

विषय.	पृष्ठ.	पंक्ति.
विष्णुप्रतिमान्याय	१४०७	६
सप्तभङ्गीनयन्याय	७३६	१
स्थूणानिखननन्याय	५९३ १२७८	५ १३

श्री.

शब्दांच्या संक्षिप्त खुणा.

अ.	अग्निरहस्य.
आ. ध. सू.	आपस्तम्ब-धर्म-सूत्र.
ई.	ईशोपनिषद्.
ऋ. सं.	ऋक्संहिता.
ऐ.	ऐतरेयोपनिषद्.
ऐ. आ.	ऐतरेयारण्यक.
ऐ. ब्रा.	ऐतरेय-ब्राह्मण.
ऐ. श्रु.	ऐतरेय-श्रुति.
क. } का. }	काठकोपनिषद्.
के.	केनोपनिषद्.
कै.	कैवल्योपनिषद.
कौ.	कौषीतकिउपनिषद्.
छ.	छन्दोग-ब्राह्मण.
छा.	छान्दोग्योपनिषद्.
जा.	जाबालोपनिषद्.
जै. सू.	जैमिनिसूत्र.
ता.	ताण्ड्य-ब्राह्मण.
तै.	तैत्तिरीयोपनिषद्.
तै. आ.	तैत्तिरीयारण्यक.
तै. ब्रा.	तैत्तिरीय-ब्राह्मण.
तै. सं.	तैत्तिरीय-संहिता.
दी.	ब्रह्मसूत्रार्थ-दीपिका.
ना.	नारायणोपनिषद्.
नृसिं.	नृसिंहतापिनी.
न्या. सू.	न्यायसूत्र.
पा. सू.	पाणिनिसूत्र.
पू. मी.	पूर्वमीमांसा.

प्र.	प्रश्नोपनिषद्.
बृ.	बृहदारण्यकोपनिषद्.
ब्र.	ब्रह्मबिन्दूपनिषद्.
ब्र. सू.	ब्रह्मसूत्र.
भ.	भगवद्गीता.
म.	मध्वाचार्य.
म. ना.	(महा-) नारायणोपनिषद्.
मनु.	मनुस्मृति.
म. भा.	महाभारत.
म- स्मृ.	मनुस्मृति.
मां.	माण्डूक्योपनिषद्.
मुं.	मुण्डकोपनिषद्.
यो. सू.	योगसूत्र.
रा.	रामानुजाचार्य.
व.	वल्लभाचार्य.
वा.	वाजसनेयि-ब्राह्मण.
वै. सू.	वैशेषिकसूत्र.
श.	शतपथ-ब्राह्मण.
शं.	शंकराचार्य.
श्वे.	श्वेताश्वतरोपनिषद्.
ष,	षड्विंश-ब्राह्मण,
सं,	संकर्षकाण्ड,

श्री.

शंकराचार्य, रामानुजाचार्य, वल्लभाचार्य आणि मध्वाचार्य यांच्या मध्यें ज्या शब्दांच्या अर्थासंबंधानें मतभेद आहे, अशा शब्दांची

सूची.

शब्द	अ. पा. सू.	अर्थ.
अथ	१ । १ । १	१ आनन्तर्य (शं. रा. म.) २ अधिकार (व.)
अधिक	२ । १ । २२	१ भिन्न (शं. रा.) २ मोठें (व. म.)
अधिकार	३ । ३ । ३	१ प्रकरण (शं.) २ अतिदेश (रा.) ३ हक=योग्यता (व. म.)
अधिष्ठान	२ । २ । ३९	१ देखरेख करणें (शं. रा.) २ आश्रय (व. म.)
अनवस्थिति	१ । २ । १७	१ नेहमीं स्थिति नसणें (शं. रा. व.) २ अनवस्था नामक दोष (म.)
अनुकृति	१ । ३ । २२	१ अनुकरण (शं. व. म.) २ साम्य (रा.)
अनुगम	१ । १ । २८	१ तात्पर्य (शं. रा. व.) २ संबंध ३ अभ्यास (म.)
अनुबन्ध	३ । ३ । ५०	१ संबंध (शं. व.) २ यज्ञांतील ग्रह वगैरे पदार्थ (रा.) ३ भक्ति (म.)
	३ । ३ । ५२	१ संबंध (शं. रा. व.) २ भक्ति (म.)
अनुमान	१ । ३ । २८	१ स्मृति (शं. रा.) २ अनुमान प्रमाण (व. म.)
	३ । २ । २४	१ स्मृति (शं. रा. व.) २ अनुमान प्रमाण (व. म.)
	४ । ४ । २०	१ स्मृति (शं. रा. व.) २ अनुमान प्रमाण (म.)

शब्द	अ. पा सू.	अर्थ.
अन्त	३ । ३ । १	१ शेवट (शं. रा. व.) २ निश्चय (म.)
अन्तर	३ । १ । १	१ अन्य (शं. रा. म.) २ मध्य (व.)
अन्तरा	२ । ३ । १५	१ मध्यें (शं. रा. व.) २ वांचून (म.)
	३ । ३ । ३५	१ अंत (शं. रा.) २ व्यवधान (व.) ३ शिवाय (म.)
	३ । ४ । ३६	१ मध्यें (शं. रा. म.) २ व्यवधान (व.)
अन्वय	३ । ४ । ५०	१ संबंध (शं. रा. व.) २ युक्ति (म.)
अपि	३ । २ । २४	१ समुच्चय (शं. रा. म.) २ निंदा (व.)
अपूर्व	३ । ४ । २१	१ नवीन (शं. रा. व.) २ पराधीन (म.)
अभिध्या	१ । ४ । २४	१ संकल्प (शं. रा. व. म.) २ उपासना (व.) ३ इच्छा (म.)
अभ्यास	१ । १ । १२	१ एक गोष्ट अनेक वेळां करणें (शं. व. म.) २ गुणाकार करणें (रा.)
अरूपवत्	३ । २ । १४	१ निराकार (शं.) २ रूपरहित असल्यासारखें (रा.) ३ व्यवहाराला अविषय (व.) ४ रूपरहित (म.)
अर्थ	१ । ३ । ४१	१ वस्तु (शं. रा. म.) २ उपयोग (व.)
	३ । ३ । २५	१ विषय (शं. रा.) २ परमात्मा (व.) ३ फल (म.)
अर्थवत्	१ । ४ । ३	उपयोगी (शं. रा.) २ अर्थप्रमाणें (व.) ३ वाचक (म)
अवधि	४ । १ । १५	१ मर्यादा (शं. रा. म.) २ मूळ कारण (व.)

शब्द	अ. पा. सू.	अर्थ
अवर	२ । १ । १६	१ मागून उत्पन्न झालेलें (शं.) २ अन्य (रा.) ३ अधम प्रपंच (व.) ४ अधान (म.)
अवरोध	३ । १ । २१	१ संग्रह (शं. रा. व.) २ प्राप्ति (म.)
अशन	३ । ४ । ४२	१ भक्षण (शं. रा.) २ उपभोग (व.)
अशब्द	१ । १ । ५	१ ज्याला शब्द प्रमाण नाहीं तें (शं. रा.) २ ज्याचें शब्दानें प्रतिपादन करतां येत नाहीं तें (व. म.)
आतिवाहिक	४ । ३ । ४	१ वाटाड्या (शं. रा. व.) २ आतिवाहिक नांवाचा वायूचा पुत्र (म.)
आधिकारिक	३ । ३ । ३२	१ अधिकारी लोक (शं. रा. म.) २ अधिकाराला योग्य असे धर्म (व.)
	४ । ४ । १८	१ अधिकार देणारा (शं.) २ अधिकारावर नेमलेला (रा. म.) ३ अधिकारांत असलेली वस्तु (व.)
आभास	२ । ३ । ५०	१ प्रतिबिंब (शं. म.) २ मिथ्याभूत (रा. व.)
आमनन	२ । ४ । १४	१ कथन (शं. व. म.) २ संकल्प (रा.)
आश्रितत्व	१ । १ । ३१	१ स्वीकार करणें (शं. रा. म.) २ दुसऱ्यावर अवलंबून असणें (व.)
इन्धन	३ । ४ । २५	१ प्रदीप्त करणें (शं.) २ आधान करणें (रा. म.) ३ प्रदीप्त करण्याचें साधन समिधा वगैरे (व.)
उन्मान	२ । ३ । २२	१ परिमाण (शं. रा. व.) २ परिमाणातीतत्व (म.)
	३ । २ । ३१	१ परिमाण (शं. रा. व.) २ पूर्णत्व (म.)
उपक्रम	१ । ४ । ९	१ आदि (शं. म.) २ कारण (रा.) ३ आरंभ (व.)

शब्द.	अ. पा. सू	अर्थ.
उपगम	४ । १ । ३	१ मानणें (शं. रा.) २ प्रवेश करणें (व.) ३ उपासना करणें (म.)
	४ । २ । ४	१ प्रति (शं. रा. म.) २ अंगीकार (व.)
उपपत्ति	२ । १ । २३	१ संभव (शं. रा. म.) २ अनुरोध (व.)
उपायन	३ । ३ । २६	१ ग्रहण (शं. रा.) २ मोक्ष (म.) ३ प्राप्त होणें (व.)
उपोष्य	४ । २ । ७	१ जाळून (शं. रा.) २ उपासना करून (म.) ३ साधन (व.)
उभय	३ । २ । ११	१ द्वय (शं. रा. व.) २ अनेक (म.)
ऊष्मा	४ । २ । ११	१ उष्णता (शं. रा.) २ संताप (व.) ३ घ्राणनादिकांमध्यें विषय न होण्याचें सामर्थ्य (म.)
एक	३ । ३ । ५३	१ कांहीं लोक (शं. रा. व.) २ अभिन्न (म.)
औपसद	३ । ३ । ३३	१ यज्ञांतील एक विशेष प्रकारचें कर्म (शं. रा. व.) २ शिष्य (म.)
क	१ । २ । १६	१ स्वार्थी प्रत्यय (शं. रा. व.) २ ब्रह्म (म.)
करण	२ । ४ । ११	१ इंद्रिय (शं. व. म.) २ क्रिया (रा.)
कर्मन्	१ । ३ । १३	१ कर्म कारक (शं. रा. व.) २ क्रिया (म.)
कल्पन	१ । ४ । १०	१ कल्पना (शं. व. म.) २ सृष्टि (रा.)
कार्य	३ । ३ । १८	१ कर्तव्य (शं.) २ अप्राप्त (रा.) ३ फल (व. म.)

शब्द	अ. पा. सू.	अर्थ.
कुश	३ । ३ । २६	१ उंबराच्या सामधा (शं. रा. व.) २ दर्भ (म.)
कृत्स्नभाव	३ । ४ । ४८	१ सर्व असणें (शं. रा. म.) २ पूर्णता (व.)
कैवल्य	२ । १ । ३३	१ फक्त (शं. रा. म.) २ मोक्ष (व.)
गति	१ । १ । १०	१ बोध (शं. म.) २ प्रवृत्ति (रा.) ३ मोक्ष (व.)
	२ । ४ । ५	१ समजणें (शं. म.) २ गमन (शं. रा. व.)
	३ । ३ । २९	१ मार्ग (शं.) २ गमन (रा.) ३ ज्ञान (व.) ४ मोक्ष (म.)
गौण	१ । १ । ६	१ जी गोष्ट मुख्यरीतीनें संभवत नाहीं ती (शं. रा.) २ सगुण (व. म.)
ग्रहण	३ । २ । १९	१ ज्ञान (शं. रा. म.) २ घेणें (व.)
चरण	१ । १ । २४	१ पाद (शं. रा. व.) २ संचार (म.)
ज्ञ	२ । ३ । १८	१ ज्ञानस्वरूप (शं. व.) २ ज्ञाता (रा. म.)
ज्योतिस	१ । ३ । ३२	१ ज्योतिश्चक्र (शं. व.) २ परब्रह्म (रा.) ३ सर्वज्ञत्व (म.)
	१ । ४ । ९	१ तेज (शं. व.) २ ब्रह्म (रा.) ३ ज्योतिशब्द (म.)
ताद्विध्य	३ । ३ । ५२	१ त्याचा विधि (शं.) २ तथाप्रकार (रा. व. म.)
तु	४ । १ । १४	१ निश्चय (शं.) २ व्यवच्छेद (रा.) ३ अपि (व.) ४ अनुत्थान (म.)
दर्शन	१ । १ । २५	१ दृष्टीस पडणें (शं. रा. म.) २ ज्ञान (व.)
	१ । ३ । ४०	१ अवलोकन (शं. रा. म.) २ न्याय (व.)

शब्द.	अ. पा. सू	अर्थ.
नाना	१ । ४ । ११	१ अनेक (शं. व. म.) २ भिन्न (रा.)
पति	२ । २ । ३७	१ ईश्वर (शं. व.) २ पशुपति (रा. म)
पर	३ । २ । ३१	१ पलीकडे (शं. रा. व.) २ अन्य (म.)
	३ । ३ । ५२	१ पुढील (शं. रा. व.) २ परमात्मा (म.)
	४ । २ । १५	१ परमात्मा (शं. रा. म.) २ उत्कृष्ट स्थान (व.)
पारिप्लव	३ । ४ । २३	१ यज्ञांतील एक प्रयोग (शं. रा. व.) २ स्थिरत्व-निवृत्ति (म.)
प्रकरण	३ । ३ । ७	१ प्रकरण (शं. रा. व. म.) २ अधिकार (व.)
प्रकृति	१ । ४ । २३	१ उपादान कारण (शं. रा. व.) २ प्रकृति हा शब्द (म.)
प्रतिपत्ति	१ । ३ । २७	१ प्राप्ति (शं. रा. म.) २ प्रवृत्ति (व.)
	४ । ३ । १४	१ प्राप्ति (शं. व.) २ उपासना (म).
प्रतीक	४ । ३ । १५	१ चिन्ह (शं. रा. व.) २ शरीर (म.)
प्रत्यक्ष	१ । ३ । २८	१ श्रुति (शं. रा.) २ प्रत्यक्ष प्रमाण (व. म.)
	३ । २ । २४	१ श्रुति (शं. रा. व.) २ प्रत्यक्ष प्रमाण (व. म.)
	४ । ४ । २०	१ श्रुति (शं. रा. व.) २ प्रत्यक्ष प्रमाण (म.)
प्रत्यय	२ । २ । १९	१ कारण (शं. रा. व.) २ ज्ञान (म.)
प्रभव	१ । ३ । २८	१ उत्पत्ति (श. रा.) २ प्रकाश (व.) ३ अस्तित्व (म.)

शब्द	अ. पा. सू.	अर्थ.
प्रमाण	४ । २ । ९	१ परिमाण (शं. म.) २ ज्ञानकरण (रा. व.)
प्रमित	१ । ३ । २४	१ मोजलेला (शं. रा. व.) २ निश्चित (म)
प्रायण	४ । १ । १२	१ मरण (शं. रा) २ पुरुषार्थ (व. म.)
भाव	३ । ४ । २२	१ विधि (शं) २ क्रिया (रा.) ३ इच्छा (म.)
	३ । ४ । ४२	१ अस्तित्व (शं. रा.) २ भक्तिभाव (व.) ३ चित्त (म.)
भूयस्त्व	३ । ३ । ५२	१ बाहुल्य (शं. रा. व.) २ प्राधान्य (म.)
मण्डल	४ । ४ । १८	१ बिंब (शं.) २ लोक (रा.) ३ समुदाय (व. म.)
माया	३ । २ । ३	१ अविद्यमान वस्तु जिच्या योगानें दृष्टीस पडते ती (शं. व. म.) २ आश्चर्य (रा.)
मोक्ष	२ । १ । ११	१ निःश्रेयस (शं. म.) २ सुटका (शं. रा. व.)
योग	१ । १ । ३१	१ संबंध (शं. व.) २ योग्यता (रा. म.)
योनि	१ । १ । ३	१ प्रमाण (शं. रा. म.) २ कारण (शं. व.)
रचना	२ । २ । १	१ रचणें (शं. रा. व.) २ प्रवृत्ति (म.)
रूपक	१ । ४ । १	१ एका वस्तूवर दुसऱ्या वस्तुची कल्पना करणें (शं. रा. व.) २ सदृश (म.)
लिङ्ग	३ । २ । २६	१ चिन्ह (शं. म.) २ प्रकार (रा.) ३ शरीर (व.)
	४ । १ । २	१ चिन्ह (शं. म.) २ स्मृति (रा. व.)

शब्द	अ. पा. सू.	अर्थ.
वा	३ । ३ । ७	१ परंतु (शं. रा.) २ अथवा (व. म.)
	३ । ४ । २०	१ अथवा (शं. व. म.) २ निश्चय (रा.)
विकार	४ । ४ । १९	१ कार्य (शं.) २ विकृति (रा.) ३ प्रभूच्या लीलेविरुद्ध गोष्ट (व.) ४ ससार (म.)
विभाग	२ । ३ । ७	१ भेद (शं. म.) २ उत्पत्ति (रा. व.)
	४ । २ । १६	१ भेद (शं. रा. म.) २ वियोग (व.)
विपर्यय	२ । ३ । ३८	१ उलथापालथ (शं. रा.) २ कमीपणा (व. म.)
	३ । २ । ५	१ मोक्ष (शं. रा. म.) २ देवाचे ठिकाणीं भीपणा आणि विषयांचे ठिकाणीं असक्ति (व.)
विप्रतिषेध	२ । २ । ४५	१ विरोध (शं. व. म.) २ निषेध (रा.)
विशेष	२ । १ । ५	१ भेद (शं. व.) २ वेगळेपण (श. रा.) ३ एक प्रकारचे सामर्थ्य (म.)
	२ । ३ । १५	१ भेद (शं. रा.) २ विशेष गोष्ट (व. म.)
	३ । २ । २५	१ भेद (शं. रा.) २ विशेष प्रकार (व. म.)
विशेषित	२ । ४ । ५	१ विशेषण देणें (शं. व. म.) २ विशेषरूपानें सांगणें (रा. व.)
वैशेष्य	२ । ४ । २२	१ आधिक्य (श. रा. म.) २ संयुक्तत्व (व)
व्यतिरेक	२ । ३ । ६	१ भेद (श. रा. म.) २ उत्पत्ति (व.)

शब्द.	अ. पा. सू.	अर्थ.
व्यतिहार	३ । ३ । ३७	१ उलटापालट (शं. रा. व.) २ अध्याहार (म.)
व्यामोह	४ । ३ । ५	१ मोह (शं. व.) २ संशय (म.)
शब्द	४ । ४ । १	१ वर्णसमुदायरूप शब्द (शं. रा.) २ श्रुति (व. म.)
शास्त्र	१ । १ । ३०	१ शासन करणारे वेद वगैरे ग्रंथ (शं. रा. व.) २ अंतर्यामी (म.)
शिष्ट	२ । १ । १२	१ शिष्टलोक (शं. व.) २ अवशिष्ट (रा. म.)
श्रुति	२ । ३ । १	१ वेद (शं. व. म.) २ श्रवण (रा.)
संराधन	३ । २ । २४	१ ध्यान (शं. रा.) २ सेवा (व. म.)
संशोक	३ । १ । २१	१ स्वेद (शं. रा.) २ शोक (व. म.)
समन्वय	१ । १ । ४	१ तात्पर्य (शं.) २ संबंध (रा. व.) ३ निश्चय करणारीं उपक्रम वगैरे चिन्हें (म.)
समाकर्ष	१ । ४ । १५	१ संबंध (शं. रा.) २ आकर्षण केली जाणारी वस्तु (व.) ३ आकर्षण (म.)
समाचार	३ । ३ । ३	१ समाचारनामक ग्रंथ (शं. रा.) २ आचरण (व. म.)
समाधि	२ । ३ । ३९	१ मनाच्या वृत्तीचा निरोध करणें (शं. रा. व.) २ अलंबुद्धि (म.)
समाहार	३ । ३ । ६३	१ दुरुस्ती (शं. रा.) २ संग्रह (व. म.)
संतति	२ । ३ । ४९	१ व्यापकत्व (शं. रा.) २ प्रवाह (व.) ३ पूर्णशक्ति (म.)
संपत्ति	४ । ४ । १६	१ मोक्ष (शं. व. म.) २ मरण (रा.)

शब्द	अ. पा. सू.	अर्थ.
संप्रसाद	१ । ३ । ८	१ प्राण (शं.) २ जीव (रा.) ३ सुषुप्ति (व.) ४ पूर्णसुखरूप (म.)
सामान्य	३ । ३ । ३३	१ साम्य (शं. रा. म.) २ सामान्यगोष्ट (व.)
	३ । ३ । ५१	१ सादृश्य (शं. रा. म.) २ साधारणस्वरूप (व.)
सांपराय	३ । ३ । २७	१ देहांतूनजाणें (शं. रा.) २ भक्तिमार्ग (व.) ३ मोक्ष (म.)
सूर्यक	३ । २ । १८	१ सूर्यप्रतिबिंब (शं. रा. म) २ सूर्यानें युक्त जळ (व)
सृति	४ । २ । ७	१ मार्ग (शं. रा.) २ संसार (व. म.)
स्थान	१ । २ । १४	१ आश्रय (शं. व. म.) २ स्थिति (रा.)
स्थित	२ । ४ । ६	१ निश्चित (शं. व.) २ विद्यमान (रा.) ३ कर्म (म.)
स्मार्त	४ । २ । २१	१ स्मृतीमध्यें सांगितलेलें (शं. व.) २ स्मरण करण्यास योग्य (रा.) ३ स्मरणानें प्राप्त होणारें (म.)
स्व	४ । ४ । १	१ 'स्व' हा शब्द (शं. रा.) २ परमात्मा (व.) ३ स्वकाय (म)
स्वशब्द	२ । ३ । २२	१ स्वतःचा शब्द (शं. रा. म.) २ 'स्व' हा शब्द (व)
स्वात्मन्	२ । ३ । २०	१ स्वतःचें रूप (शं. रा. व.) २ परमात्मा (म.)
स्वाध्याय	३ । ३ । ३	१ वेदाध्ययन (शं. रा. म.) २ वेद (व.)
हानि	३ । ३ । २६	१ त्याग (शं. रा. म.) २ वियोग (व.)
हि	१ । २ । ११	१ कारण (शं. रा.) २ योग्य (व.) ३ प्रसिद्धि (म.)

श्री.

शांकर-ब्रह्मसूत्र-भाष्याच्या मराठी भाषांतरामध्यें आलेल्या विषयांची वर्णानुक्रमानें

सूची.

विषय.	पृष्ठ.	विषय.	पृष्ठ.
अक्षर	२६९	आकाशोत्पत्ति	७७१
अक्षरज्ञान	१२२०	आख्यानें	१३४३
अग्निकल्पना	१२६२	आचमन	११६७
अंगुष्ठमात्र	३१०	आत्मधर्म	१५२९
अत्ता	१७९	आत्मनित्यत्व	७९८, ८१९
अध्यास	६, ११३९	आत्म-शब्द	११५६
अनुशय	९७८	आत्मसाक्षात्कार	१४०३
अन्तर्यामी	२०७	आत्मा	२५, ६२, ३७२, ४४९
अन्न	१३५२		
अभावाद्भावोत्पत्ति	७०४		
अयुतसिद्धत्व	६६६	आत्माध्यास	१३, २४
अर्थवाद	३५०		
अवरोहप्रकार	९९९	आत्म्याचें अणुत्व	८३०
अविद्या	९	आत्म्याचें कर्तृत्व	८५३
अव्यक्त	३८३	आत्म्याचें ज्ञानस्वरूपत्व	८२५
अव्यवहार्यत्व	१३७२	आत्म्याचें प्रमातृत्व	११
अशनाया	९३	आत्म्याचें विभुत्व	८३२
असत्यात्सत्योत्पत्ति	५३७	आदित्यादिभावना	१४१७
अहंप्रत्यय	६९	आनन्दमय	१०२
अहंभावना	१४०५	आनन्दादिगुण	११४८
आकाश	६९८	आवृत्ति	१३९४
आकाश-शब्द	१२४, २६९	आश्रम	१३२६, १३६६
		आहुतिसंख्यानियम	९९५

विषय.	पृष्ठ.	विषय.	पृष्ठ.
इन्द्रियचालक	९३६	कामादिगुण	१२३६
इन्द्रियभौतिकत्व	८१४	कारकव्यापार	५५९
इन्द्रियलय	१४४९	कार्यकारणैक्य	५३०
इन्द्रियसंख्या	८११	कूटस्थनित्य	५०
इन्द्रियाणुत्व	९२१	क्षणिकत्व	६९०, ७०१, ७३०
इन्द्रियोत्पत्ति	८९९		
उदक	८०५		
उद्गीथविद्या	११२९	गुणवाद	३५१
उद्गीथ हें विशेषण	११३९	गुणोपसंहार	११२७
उद्भिज्जजीव	१००३	गुहाप्रविष्ट	१८६
उपादान- कारण	४६३, ७५१	जगद्व्यापार	१५४२
		जगाचें कारण	४२६
उपासनानियम	१४२५	जीव	८७६, १०२०
उपासनाफल	१३८६		
उपासनाविधि	१३४०	जीवन्मुक्ति	६७
ऋत्विक्कर्म	१३७३	जीवपरिमाण	७४३
ऐक्य	१५२२	जीवेश्वरैक्य	५७०, १२२९
औपाधिक-कर्तृत्व	८५९		
कपिल	४०१	जैनमत	७३४
कर्तृत्व	८६९	जैनमतखंडन	७३९
कर्म	१३१०, १३४५, १३४६, १३५७	ज्ञान	५९, ७६
		ज्ञानपूर्वक -कर्म	१४४४
		ज्ञानविषय	४३७
कर्मत्याग	११९५	ज्ञानाधिक्यविधि	१३७७
कर्मनाश	१४३२	ज्ञानी	१५३३
कर्मफल	२०	ज्ञान्याची देहस्थिति	१२१३
कर्मफलासंकर	८८९	ज्ञान्याचें प्राणोत्क्रमण	१४५९
कर्मशेष	९७५		
कर्मांगोपासना	१२४६, १२८४, १३००	ज्योतिःशब्द	१३६, ३६७
		डोळ्यांतील पुरुष	१९६

विषय.	पृष्ठ.
तप्यतापकभाव	६२५
तर्क	५१७
तेज	८००
त्रिवृत्करण	९५१
दहराकाश	२८०
देवयानमार्ग	१४८२
देवांना अधिकार	३२३
देहातिरिक्तात्मा	१२७७
देहान्तरप्राप्ति	९५७
धर्मजिज्ञासा	१८
ध्यानविषय	२७४
ध्वनि	३३५
नामरूपव्याकरण	९४७
नित्यकर्म	१४४२
पंचाग्निविद्या	९५८, ११२०
परमाणुकारणवाद	६४५
परमाणुसंयोग	६५०, ६७२
परापरब्रह्म	१५१७
परिणामिनित्य	५०
पर्यंकविद्या	१२०५
पुरुषविद्या	११८२
पुरुषार्थाचें परत्व	११५१
पृथिवी	८०६
प्रतीकोपासना	१४१०
प्रधान	२०९, ३८४
प्रधानकारणवाद	७७, ४७७, ६०२

विषय.	पृष्ठ.
प्रमाण	११
प्रमाणप्रामाण्य	५३७
प्रलयक्रम	८१०
प्रवृत्ति	६०९
प्रस्तावना	१
प्राणविद्या	११४४, १२५४
प्राणशब्द	१३०, १५१, ३६४
प्राणस्वरूप	९२४
प्राणाणुत्व	९३४
प्राणेंद्रियभेद	९४२
प्राणोत्क्रमण	१४४९
प्राणोत्पत्ति	९२२
प्रायश्चित्त	१३६९
प्रारब्धकर्म	१४३९
फलदाता	११०५
बौद्धमत	६७९
बौद्धमतखंडन	६८३
ब्रह्मभावना	१४१३
ब्रह्मलक्षण	२६
ब्रह्माचे दोन प्रकार	९८
ब्रह्माचें स्वरूप	९८, १०४८, १०४९
ब्रह्माहून पर नाहीं	१०९७
भागवतखंडन	७६२
भूतयोनि	२१६
भूमा	२६१
मयट्-प्रत्यय	११०

विषय.	पृष्ठ.
मिथ्याभिमान	१४०२
मुक्त	१५३५
मुमुक्षु	१३८३
मूर्च्छा	१०४२
मोक्ष	५१, ५६, १३९०
मोक्षसाधन	१३०९
यमलोकगति	९९१
रात्रिमरण	१४७५
वर्ण	३३६
वायूत्पत्ति	७९६
वासना	७३०
विज्ञानवाद	७११
विज्ञानवादखंडन	७१६
विद्या	९
विद्याभेदाभेद	१११२, १२२३, १२९२
विद्याविकल्प	१२९७
विद्येच्या बाहेरचे मंत्र	११८८
विधुरांना अधिकार	१३६३
वेदाचें नित्यत्व	३३८
वेदान्तवाक्यें	४५
वैशेषिकमत	५५०, ६३४, ६४५
वैशेषिकमतखंडन	६६४
वैश्वानर	२२१
वैश्वानरविद्या	१२३९, १२८८

विषय.	पृष्ठ.
शरीराचें जन्ममरण	८१६
शांडिल्यविद्या	११७१, ११७९
शूद्रांना अधिकार	३५६
श्रुत्यादिप्रमाणें	३०, ११९१
संवर्गविद्या	१२५४
संसारानादित्व	५९५
सगुणोपासकांचा देवयानमार्ग	१२०७
सत्कार्यवाद	५४७
सत्यविद्या	११७५, १२३१
सप्तभंगीनय	७३६
समवाय	५५३, ६५१
सर्वत्र ब्रह्मोपासना	१७०
सर्वभासक	३०५
सांख्यमत	४७६, ६०३
साधनचतुष्टय	१९
सुषुप्ति	१०२४
सूक्ष्म महाभूतें	१४६२
सूर्यमंडलांतील पुरुष	११८
स्थूलसूक्ष्मतारतम्य	६६१
स्फोट	३३३
स्वप्न	१०११
स्वर्गाद्याधार	२४८
स्वाभाविक प्रवृत्ति	६१३, ६१६
हृदय-शब्द	९२

ज्या सूत्रांमध्यें पदच्छेदासंबंधानें मतभेद आहे त्यांची सूची.

अ.	पा.	सू.	
१	३	३०	च । आवृत्तौ (शं. रा.) च । अवृत्तौ (म.)
२	२	१५	विपर्ययः । दर्शनात् (शं. रा. म.) विपर्ययः । अदर्शनात् (ब.)
२	३	६	प्रतिज्ञा–अहानि (शं. रा.) प्रतिज्ञा–हानि (ब. म.)
२	३	१६	व्यपदेशः । भाक्तः (शं. रा. ब. म.) व्यपदेशः । अभाक्तः (रा.)
२	३	१७	आत्मा । अश्रुतेः (शं. ब. म.) आत्मा । श्रुतेः (रा.)
२	३	२५	वा । लोकवत् (शं.) वा । आलोकवत् (रा. ब. म.)
३	१	१८	तृतीये । तथो (शं. रा. म.) तृतीये । अतथो (ब.)
३	१	२२	साभाव्य–आपत्ति (शं.) सा । आभा । व्यापत्ति (ब.)
३	१	२४	अन्याधिष्ठिते । पूर्वं (शं. रा. म) अन्य धिष्ठिते । अपूर्वं (ब.)
३	२	६	वा । सः । अपि (शं. रा. ब.) वासः । अपि (म.)
३	३	१९	समाने । एवं (शं. रा. म.) समानः । एवं (ब.)
३	३	२६	छन्दस–स्तुति (शं. रा. ब.) छन्द–स्तुति (म.)
३	३	३६	अन्यथा । भेदा (शं. रा. म.) अन्यथा । अभेदा (ब.)
३	३	५३	एके । आत्मनः (शं. रा. ब.) एकः । आत्मनः (म.)
३	३	५९	विकल्पः । अविशिष्ट (शं. रा. ब.) विकल्पः । विशिष्ट (म.)
३	३	६५	वा । तत्सह (शं. रा. ब.) वा । अतत्सह (म.)
४	१	४	प्रतीके । न (शं. रा. म.) प्रतीकेन (ब.)
४	२	७	च । आसृति (शं. रा. ब.) च । असृति (म.)
४	३	१५	उभयथा । अदोषा (शं.) उभयथा । दोषा (रा. ब. म.)
४	४	१९	विकार–अवर्ति (शं. रा. ब.) विकार–आवर्ति (म.)